

म. ग्रं. मं. टाणे
विषय
मं नं



BFFBK-005232

दा.फ.
५२३२





हिंदुसमाजोद्धारक वाङ्मयमाला-पुस्तक ५ वें.

उद्धरेदात्मनात्मानं-गीता

ब्रह्मज्ञान व बुवाशाही



लेखक
महादेवशास्त्री दिवेकर

REFBK-005232

शके १८५७] मूल्य १॥ रुपाया [बलिप्रतिपदा

—प्रकाशक—
महादेवशास्त्री दिवेकर
मिरज.

[सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे स्वाधीन]

—मुद्रक—
शंकर रामचंद्र दाते बी. ए.
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव, पुणें शहर

ग्रंथ संग्रहालय
स्वंड प्रत
सं. ..... नं. .....
ता. .....
डा. सं.

अर्पण-पत्रिका

बुवांचा प्रसाद ज्यांना भोवला अशा
लाखो तळमळणाऱ्या जीवांना
त्यांच्या समाधानार्थ मी
हा ग्रंथ अर्पण करीत
आहें.

—महादेवशास्त्री दिवेकर

आधारभूत ठळक ग्रंथांची यादी

(१) ऋग्वेद संहिता
(२) दशोपनिषदें
(३) भगवद्गीता
(४) मनुयाज्ञवल्क्यादि स्मृति
(५) महाभारत
(६) भागवत
(७) अर्थसंग्रह
(८) प्रस्थानत्रयीवरील शांकरभाष्य
(९) ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वर गाथा
(१०) एकनाथी भागवत व एकनाथी भारूड
(११) दासबोध व समर्थांचे अभंग
(१२) तुकारामाचा अभंग गाथा
(१३) गीतारहस्य
(१४) भारतीय तत्त्वज्ञान (केळकर)
(१५) विज्ञानबोध (माटे)
(१६) उपासनींचें सर्व प्रसिद्ध वाङमय
(१७) नारायणबुवाविषयींचे सर्व प्रसिद्ध ग्रंथ
(१८) केसकर बुवांवरचीं पद्यें व चरित्रें
(१९) बुवाशाहीवरील अनेकांचे लेख
(२०) लेखकाचे स्वतःचे ग्रंथ

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि- सं. ६४९

प्रास्ताविक निवेदन

जगच्चालकाच्या कृपेनें आज हा नवा ग्रंथ महाराष्ट्र वाचकांपुढें ठेवण्याचा सुयोग आला, याबद्दल अत्यानंद वाटतो. या ग्रंथाचा उगम सन १९२० सालीं महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेपुढे नाशिक येथें मांडलेल्या आमच्या धर्म व समाजसुधारणेच्या योजनेंतूनच झालेला आहे. हिंदुसमाजाच्या दौर्बल्याला जीं अनेक कारणें आहेत, त्यांतील निवृत्तिपरता हें एक प्रमुख कारण आहे. या निवृत्तिपर वेदांताचे धागेदोरे शोधीत शोधीत बौद्ध क्रांतीपर्यंत जावें लागतें, आणि तो सर्व इतिहास ' आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष' या ग्रंथांत आम्ही साधार मांडला आहे. निवृत्तिपर वेदांताचीं बीजें गौतम बुद्धाच्या शिकवणींत असलीं तथापि आज त्या तत्त्वाचे प्रचारक हे बुवा, हे महाराज व आधुनिक संताळेच होत. या वर्गाविषयीं प्रस्तुत लेखकानें ' हिंदुसमाज समर्थ कसा होईल ? ' प्रकरण ८ व ९ मध्यें बरेंच विवेचन केलेलें आहे. आजवर जो विषय सामान्यत्वानें लिहिला, ऐतिहासिक व तात्त्विक दृष्टया ज्याची चर्चा केली, त्याचेंच विशेष परिणत फळ म्हणजे हा ग्रंथ होय.

मंदिरप्रवेशाच्या प्रचारानिमित्त वऱ्हाडांत प्रस्तुत लेखक १९३२ त गेला असतांना असें समजलें कीं अकोला येथील एका सुसंस्कृत, चित्पावन पदवीधरानें आपली उपवर मुलगी ब्रह्मप्राप्तीकरितां एका महाराजाला म्हणे अर्पण केली ! ही वार्ता कळल्यावर वैदिक आर्यांचें श्रेष्ठ तत्त्वज्ञान व स्त्री पातिव्रत्य या दोहोंबद्दल अंतःकरणांत असलेला अभिमान जागृत झाला आणि ब्रह्मज्ञान व बुवाबाजी या विषयावर १९३३ च्या मेपासून मी लेख लिहूं लागलों. किर्लोस्कर मासिकाचे संपादक मोठ्या उत्तेजनानें व गौरवानें ते लेख छापूं लागले. किर्लोस्कर मासिकांतील पहिल्या ३।४ लेखांनीं समाजाचीं मनें वरींच आकर्षिलीं गेलीं, आणि अनेक लोकांच्या सूचना आल्यामुळें **बुवाशाही विध्वंसक संघाची** स्थापना करावी लागली!

संघाच्या प्रवेशपत्राचा नमुना पृष्ठ १२४ वर दिला आहे. त्यावरून संघाचा हेतु बुवाशाहीचा विध्वंस व्हावा एवढाच असून 'बुवा' या व्यक्तीशीं संघाला कांहीं कर्तव्य नाहीं, हें सिद्ध आहे. शाही म्हणजे राज्य; बादशाही म्हणजे बादशहाचें राज्य. या राज्याप्रमाणें जरी बुवांचीं राज्यें नसलीं तथापि समाजाचे मनावर या बुवांचें जें वर्चस्व, जें वजन व जी एक सत्ता, जी एक पक्कड म्हणून असते, ती नष्ट होऊन प्रज्ञावान, पौरुषवान, पुरुषार्थी, सज्जन व प्रापंचिक अशा सद्गृहस्थांचा आदर्श समाजापुढें यावा, एवढाच या यत्नाचा हेतु आहे.

व्यक्तीप्रमाणें समाजालाहि मन आहे. समष्टीचें मन म्हणजेच ईश्वरी साहय होय ! महात्माजींनीं निर्बंधभंग सुरू केला त्यावेळीं त्यांना आपल्या कार्याला एवढें स्वरूप येईल अशी कल्पना नव्हती. भट्टप्रभु परिषदेपासून पोटजातींच्या एकीकरणाच्या उद्देशानें मी जेव्हां माहिती मिळवूं लागलों तेव्हां अनेक वृत्तपत्रांचें प्रसिद्धीच्या दृष्टीनें मोठें साहय होऊन, अकोल्यास टोलेजंग अशी ब्राह्मण परिषद भरेल, अशी मलाहि कल्पना नव्हती. बुवाशाहीबद्दलहि अंदाज हाच कीं चार दोन लेख लिहिले कीं विषय संपेल ! पण आज जें त्याला समष्टीच्या साहयानें मोठें महत्त्वाचें व खळबळीचें स्वरूप आलें आहे त्याचें कारण हेंच कीं, समष्टिरूपी ईश्वराला बुवाशाहीचा प्रतिकार व्हावा असें वाटत असल्यामुळें, तो कोणाला तरी निमित्त करून हें कार्य घडवीत आहे, यांत शंका नाहीं.

१९११ सालीं रँगलर डॉ. परांजपे यांनीं या विषयावर टाइम्समध्यें लेख लिहिले, पुढें केसरींत 'भोंदू गुरूंची साथ' सुरू झाली. विविधवृत्तानें १९२८ सालीं उपासनीबाबावर चांगली झोड उठविली. श्री. रा. प्र. कानिटकर यांनी १९३१मध्यें मुंबई येथील प्रगति पत्रामध्यें नारायणबुवाविषयीं लेख लिहिले आणखी इतर खाजगी व सार्वजनिक प्रयत्न पुष्कळच झालेले आहेत! अनेकांनीं या पूर्वीं चालूं केलेलें हें कार्य समष्टिरूपी ईश्वरानें दिवेकर व किर्लोस्कर यांना निमित्त करून अनेक बंधु भगिनींना बुवांच्या सहवासांतील स्वानुभव सांगण्याविषयीं धैर्य देऊन, चालविलें आहे इतकेंच. समाजांत कोणत्याहि गोष्टींचा अतिरेक झाला कीं त्या अतिरेकाच्या प्रतिकाराची वृत्ति स्वाभा-

विकच उद्भूत होते. अतिरेकाला योग्य मुरड घालणें म्हणजेच सुधारणा होय ! हें लक्षांत घेतलें म्हणजे दिवेकर–किर्लोस्करांनीं हा नसता उपद्व्याप केला नसून समाजरूपी निधीनें या प्रतिनिधींकडून हें कार्य चालविलें आहे असें स्पष्ट म्हणावें लागतें.

यापूर्वी पुष्कळांनीं लेख लिहिले व उघड चर्चाहि केली. तथापि या विषयाला महत्त्व न येण्याचें कारण लोकांचीं मनें त्यावेळीं रिकामीं नव्हतीं. तर तीं निरनिराळ्या महत्त्वाच्या विषयांत गुन्तलीं होतीं हें होय ! १९३१ सालीं श्री. कानिटकर यांनीं नारायणमहाराजांविषयीं लिहिलेला लेख फारच परिणामकारक आहे. पण समाजाचें मन कायदेभंगासारख्या मोठ्या कार्याकडे वेधलें होतें. परंतु यावेळीं समाजाला असलाच कांहीं तरी निराळा विषय पाहिजे होता म्हणून आणि लेखक व संपादकावर एका लेखामुळें खटला झाला म्हणून या विषयाला महत्त्व आलें !

गुरुवर्य पं. नारायणशास्त्री मराठे व प्राज्ञपाठशाळा पाठीशीं असल्यामुळें व दे. भ. तात्यासाहेब केळकर यांच्या प्रोत्साहनामुळें (आर्थिक प्रोत्साहनामुळें नव्हे) केसरी पत्राच्या आश्रयानें हिंदुसंघटनाला पोषक अशा अनेक विषयावर लेख लिहून मला लोकजागृति करतां आली. अनेक वृत्तपत्रांच्या विशेषतः केसरीच्या व रा. मुंडले यांच्या ब्राह्मण पत्रिकेच्या साह्यानें ब्राह्मणांतील पोट जातींच्या एकीकरणाला चालना देण्याचें कार्य मी केलें. प्रस्तुत बुवाशाहीच्या विध्वंसाचें कार्य किर्लोस्कर मासिकाचे संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर यांच्या सहकार्यानें आणि किर्लोस्कर बंधूंच्या लिमिटेड कारखान्याचे जनक श्रीमंत लक्ष्मणरावजी किर्लोकर यांच्या प्रोत्साहनानें (आर्थिक प्रोत्साहनानें नव्हे) करतां आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

कोणत्याहि प्रकाशित केलेल्या लेखाला मोबदला देण्याची किर्लोस्कर मासिकाची प्रथा आहे. माझ्या बाबतींत कांहीं निराळी व्यवस्था आहे असें नाहीं. हिशेबानेंच ते इतरांप्रमाणें मलाहि पुरस्कार देतात. ते पैसे देतात म्हणून किंवा त्यांनीं द्यावेत म्हणून मी कांहींहि लिहिलेलें नाहीं व लिहीत नसतों. माझे विचार मी लिहितों. त्यांना पसंत पडलेले लेख ते छापतात. नापसंत लेख परत करतात. या बुवाशाहीच्या विध्वंसाबाबतींत आम्हां उभयतांचें मतैक्य

आहे. इतकें स्पष्ट केल्यानंतर लेखकावर पैशाविषयीं जे कुत्सित आरोप येतात त्यांना उत्तर देण्याचें प्रयोजनच नाहीं. कोणतेंहि सार्वजनिक कार्य हें समाजाच्या उन्नतीकरितां करावयाचें असतें· पैसा व मान मिळावा या हेतूनें व पैशावर नजर देऊन हीं कार्यें करावयाचीं नसतात. कार्याला व कार्य करणारालाहि पैसा व इतर साहय लागतें. परंतु ' यान्ति न्यायप्रवृत्तस्य तिर्यंचोऽपि सहायताम्' या प्रमाणें कार्य करीत राहिलें म्हणजे आपोआप सर्व तऱ्हेचें अवश्य साहय मिळतें, असा या लेखकाला गेल्या सत्तावीस वर्षांचा अनुभव आहे.

बेळगांव येथील पिकेटिंग, जुनें समर्थ विद्यालय, अर्जुनवाड व चिकोडीचे खाजगी आश्रम, प्राज्ञपाठशाळा वाई, ब्राह्मण परिषद, हिंदुधर्म परिषद, हिंदु संघटन, कीर्तन संमेलन, अस्पृश्योद्धार, ग्रामोद्धार, ब्राह्मणांतील आंतरज्ञाती विवाह इत्यादि विविध क्षेत्रांत लेखकानें ज्या वृत्तीनें अल्पस्वल्प सेवा केली, तीच वृत्ति ईश्वरकृपेनें याहि कार्यामध्यें आहे, एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

आभार—हा ग्रंथ सिद्ध होण्याला अनेकांचें पुष्कळच साहय झालेलें आहे. लेखकाच्या आरोग्याविषयीं अगत्य बाळगणारे डॉ. पळसुले, व डॉ. भडकमकर पुणें, डॉ. एम्. डी. जोशी—मुंबई, डॉ. टिळक व डॉ. कैकणी मुंबई, डॉ. गोसावी व डॉ. भडभडे मिरज, वैद्य नानलशास्त्री—पुणें, वळवंतराव कुलकर्णी—कऱ्हाड, व वैद्य आडिवरेकर-मिरज अशा या डॉक्टर व वैद्यांचें गेल्या दोन वर्षांत आम्हांस अतिशय साहय झालेलें आहे. कारण संग्रहणी जाऊन गृध्रसी विकार झाला व आतां न्युरायटीजमुळें डावा पाय अधु झाला आहे. शेंकडों रुपये खर्चून जे औषधोपचार होऊं शकत नाहींत ते डॉ. टिळक, डॉ. एम्. डी. जोशी व डॉ. पळसुले वगैरे अगदीं कांहीं न घेतां निरपेक्षपणें करीत असतात याबद्दल या आरोग्यदात्यांचे प्रथम आभार मानले पाहिजेत.

श्री.रा.प्र.कानिटकर पुणें, यांनीं १९३१ सालीं मुंबई येथील प्रगति पत्रांत छापलेल्या आपल्या लेखांतील भाग• ग्रंथांत घालण्यास परवानगी दिली, खामगांव येथील रा. पेंडसे यांनीं आपले एक वर्षाचे अनुभव लिहून पाठविले, लोकसंग्रह छापखान्याचे व्यवस्थापक श्रीं. मामाराव दाते यांनीं छपाईचें

काम सुबक, वक्तशीर व व्यवस्थित करून दिलें, येथील आमचे मित्र रा. भाऊराव आपटे यांनीं पाहिजे त्या वेळेस येऊन निरलसपणानें सर्व प्रकारचें साह केलें, याबद्दल आम्ही वरील सर्व सद्गृहस्थांचे आभारी आहोंत.

बुवाशाहीविरुद्ध असणाऱ्या अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तींचें साहय या ग्रंथाला झालेलें असल्यामुळें लेखक हचा सर्वांचा ऋणी आहे. तथापि किर्लोस्कर मासिकाचे संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनीं या ग्रंथांत घालण्याकरितां चित्रांचे अनेक ब्लॉक विनामूल्य दिले, आणि इतरहि अनेक प्रकारचें वैचारिक प्रोत्साहन त्यांचेकडून मिळालें, हें येथें अवश्य सांगितलें पाहिजे.

शेवटीं ज्या जनताजनार्दनाचे प्रेरणेनें हिंदुसमाजोद्धारक वाङमयमालेचें हें पांचवें पुष्प अर्पण करण्याचा हा सुयोग आला त्याबद्दल त्याचे चरणी विनम्र होऊन हें प्रास्ताविक निवेदन पुरें करतों.

वास्तव्य–मिरज
बलिप्रतिपदा
१८५७

हिंदुसमाजसेवक
महादेवशास्त्री दिवेकर

आहे. इतकें स्पष्ट केल्यानंतर लेखकावर पैशाविषयीं जे कुत्सित आरोप येतात त्यांना उत्तर देण्याचें प्रयोजनच नाहीं. कोणतेंहि सार्वजनिक कार्य हें समाजाच्या उन्नतीकरितां करावयाचें असतें· पैसा व मान मिळावा या हेतूनें व पैशावर नजर देऊन हीं कार्यें करावयाचीं नसतात. कार्याला व कार्य करणारालाहि पैसा व इतर साहय लागतें. परंतु ' यान्ति न्यायप्रवृत्तस्य तिर्यंचोऽपि सहायताम्' या प्रमाणें कार्य करीत राहिलें म्हणजे आपोआप सर्व तऱ्हेचें अवश्य साहय मिळतें, असा या लेखकाला गेल्या सत्तावीस वर्षांचा अनुभव आहे.

बेळगांव येथील पिकेटिंग, जुनें समर्थ विद्यालय, अर्जुनवाड व चिकोडीचे खाजगी आश्रम, प्राज्ञपाठशाळा वाई, ब्राह्मण परिषद, हिंदुधर्म परिषद, हिंदु संघटन, कीर्तन संमेलन, अस्पृश्योद्धार, ग्रामोद्धार, ब्राह्मणांतील आंतरज्ञाती विवाह इत्यादि विविध क्षेत्रांत लेखकानें ज्या वृत्तीनें अल्पस्वल्प सेवा केली, तीच वृत्ति ईश्वरकृपेनें याहि कार्यामध्यें आहे, एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

आभार--हा ग्रंथ सिद्ध होण्याला अनेकांचें पुष्कळच साहय झालेलें आहे. लेखकाच्या आरोग्याविषयीं अगत्य बाळगणारे डॉ. पळसुले, व डॉ. भडकमकर पुणें, डॉ. एम्. डी. जोशी--मुंबई, डॉ. टिळक व डॉ. कैकणी मुंबई, डॉ. गोसावी व डॉ. भडभडे मिरज, वैद्य नानलशास्त्री--पुणें, वळवंतराव कुलकर्णी--कऱ्हाड, व वैद्य आडिवरेकर-मिरज अशा या डॉक्टर व वैद्यांचें गेल्या दोन वर्षांत आम्हांस अतिशय साहय झालेलें आहे. कारण संग्रहणी जाऊन गृधसी विकार झाला व आतां न्युरायटीजमुळें डावा पाय अधु झाला आहे. शेंकडों रुपये खर्चून जे औषधोपचार होऊं शकत नाहींत ते डॉ. टिळक, डॉ. एम्. डी. जोशी व डॉ. पळसुले वगैरे अगदीं कांहीं न घेतां निरपेक्षपणें करीत असतात याबद्दल या आरोग्यदात्यांचे प्रथम आभार मानले पाहिजेत.

श्री.रा.प्र.कानिटकर पुणें, यांनीं १९३१ सालीं मुंबई येथील प्रगति पत्रांत छापलेल्या आपल्या लेखांतील भाग• ग्रंथांत घालण्यास परवानगी दिली, खामगांव येथील रा. पेंडसे यांनीं आपले एक वर्षाचे अनुभव लिहून पाठविले, लोकसंग्रह छापखान्याचे व्यवस्थापक श्रीं. मामाराव दाते यांनीं छपाईचें

काम सुबक, वक्तशीर व व्यवस्थित करून दिलें, येथील आमचे मित्र रा. भाऊराव आपटे यांनीं पाहिजे त्या वेळेस येऊन निरलसपणानें सर्व प्रकारचें साह् केलें, याबद्दल आम्ही वरील सर्व सद्गृहस्थांचे आभारी आहोंत.

बुवाशाहीविरुद्ध असणाऱ्या अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तींचें साहय या ग्रंथाला झालेलें असल्यामुळें लेखक हचा सर्वांचा ऋणी आहे. तथापि किर्लोस्कर मासिकाचे संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनीं या ग्रंथांत घालण्याकरितां चित्रांचे अनेक ब्लॉक विनामूल्य दिले, आणि इतरहि अनेक प्रकारचें वैचारिक प्रोत्साहन त्यांचेकडून मिळालें, हें येथें अवश्य सांगितलें पाहिजे.

शेवटीं ज्या जनताजनार्दनाचे प्रेरणेनें हिंदुसमाजोद्धारक वाङमयमालेचें हें पांचवें पुष्प अर्पण करण्याचा हा सुयोग आला त्याबद्दल त्याचे चरणीं विनम्र होऊन हें प्रास्ताविक निवेदन पुरें करतों.

वास्तव्य–मिरज
बलिप्रतिपदा
१८५७

हिंदुसमाजसेवक
महादेवशास्त्री दिवेकर

अनुक्रमणिका

प्रकरण	१ लें	विषय–प्रवेश	....	१– ९
,,	२ रें	ब्रह्म व जगत्	....	९– २१
,,	३ रें	ईश्वर व त्याची अविद्या	....	२१– २९
,,	४ थें	संसाराचें अनादित्व व कर्म	....	३०– ३७
,,	५ वें	आत्मविचार व जीवस्वरूप	....	३७– ४४
,,	६ वें	पंचकोश व मरणोत्तर स्थिति	....	४५– ५१
,,	७ वें	मोक्षाचें व मुक्ताचें स्वरूप	....	५१– ६४
,,	८ वें	गुरुकृपा व मोक्ष	....	६४– ८३
,,	९ वें	श्रद्धा, भावना व अर्थवाद	....	८३– ९३
,,	१० वें	महाराज व चमत्कार	....	९३–१००
,,	११ वें	श्री एकनाथ व साधकाचें पतन ...	....	१०१–१०८
,,	१२ वें	तुकाराम व ढोंग्यांचा परामर्श....	....	११०–१२३
,,	१३ वें	बुवाशाहीचे अनर्थ	....	१२३–१४०
,,	१४ वें	ब्रह्मविद्येची विटंबना....	....	१४१–१५७
,,	१५ वें	रिपुदमन का रिपुत्याग ?	....	१५८–१७५
,,	१६ वें	ईश्वरप्राप्तीचा राजमार्ग	....	१७५–१९६
,,	१७ वें	वाकेशाही व उपासनी बाबा	....	१९७–२१९
,,	१८ वें	बाबा व भक्त यांच्या जबान्या	....	२२०–२४१
,,	१९ वें	नारायण महाराज	....	२४१–२८०
,,	२० वें	विलायती छापाचे देशी बुवा	....	२८१–२९२
,,	२१ वें	उपसंहार	....	२९२–·९५

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वतंत्र मत
सं. नि. नं. ८५२
ता. २७/१२/३७
दि.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ३.७.१
दि.
५२३२

ब्रह्मज्ञान व बुवाशाही

प्रकरण १ ले.

विषय-प्रवेश

हिंदुस्थान देशाची प्रसिद्धी तो अनेक धर्मांचा उत्पादक देश म्हणून सर्वत्र आहे. अत्यंत प्राचीन असा सनातन वैदिक धर्म या देशांतच उत्पन्न झाला. जैन व बौद्ध धर्म हेहि येथेंच उगम पावले. फार काय पण ख्रिस्ती व महंमदी धर्मांवरसुद्धां या देशांतील धर्मांची छाप पडली आहे, असें तज्ञ लोक म्हणत असतात. देश मोठा अवाढव्य, धर्म अत्यंत प्राचीन आणि लोकसंख्याहि पुष्कळ असल्यामुळें धर्मांच्या नांवावर हिंदुस्थानांत जितके चमत्कार व अनिष्ट प्रकार चालत असतील तितके इतरत्र क्वचितच असावेत! मनुष्यस्वभाव सर्वत्र सारखा असला तरी साक्षरता, विचारशक्ति व तर्कशुद्धता हीं ज्या समाजांत जितकीं अधिक असतील, त्या मानानें तो समाज धर्मांच्या नांवाखालीं होणारे वेडगळ प्रकार पुष्कळच कमी करील, यांत शंका नाहीं. हिंदुस्थानामध्यें भोळेपणा अधिक, शिक्षण कमी, त्यामुळें धर्मांच्या विशेषतः ब्रह्मज्ञानाच्या नांवाखालीं पुष्कळच अनाचार व अनिष्ट प्रकार हल्लीं चालूं आहेत. म्हणून प्रस्तुत ग्रंथांत श्रीशंकरभाष्याधारें वेदांतशास्त्रांतील प्रथम मुख्य मुख्य सिद्धांत मांडणार आहे. ब्रह्मज्ञानाच्या नांवावर समाजांत जी हल्लीं बुवाशाही बोकाळत चाललेली आहे, तीमुळें प्रज्ञावंत माणसेंसुद्धां कशीं प्रज्ञाहत होत आहेत, आणि तीं प्रपंचाला, समाजाला व परंपरेनें राष्ट्राला कशीं निरुपयोगी होत चालली आहेत हेंहि नंतर येथें दाखविणार आहे.

हिंदुस्थान देश हा पारतंत्र्यांत पडलेला देश आहे आणि ह्या देशाची अवनति सर्व बाजूंनीं झालेली आहे; यांत शंका नाहीं. अत्यंत अवनत स्थितींतसुद्धां अभिमान बाळगण्याजोगें अथवा जगाला सांगण्याजोगें असें कांहीं हिंदुस्थानाजवळ आहे काय असा प्रश्न केल्यास त्याचें उत्तर देण्याची कांहींना मोठी पंचाईत पडते! जगांतील कांहीं देश सृष्टिसौंदर्यामुळें तर कांहीं शोधांमुळें, कांहीं शास्त्रसंपन्नतेमुळें तर कांहीं पराक्रमामुळें व मुत्सद्दीपणामुळें प्रसिद्धीस आलेले आहेत. हिंदुस्थानाजवळ आज जगाला सांगण्यासारखें कांहीं असेल तर तें गतवैभव, उच्च असें तत्त्वज्ञान, वेरूळसारखीं लेणीं, हिमालय व गंगानदी हेंच होय. सर्व जगांतील अत्यंत प्राचीन असें जें वैदिक वाङ्मय त्याचा उद्भव हिंदुस्थानांतच झाला. सर्वजगांत परमोच्च व श्रेष्ठ पर्वत जो हिमालय तो हिंदुस्थानांत आहे. सर्व श्रेष्ठ, पवित्र व पावन गंगानदी ही या भरतखंडालाच पुनीत करीत आहे. पाणिनीसारखा वैय्याकरण, कालिदासासारखा महाकवि, व्यासासारखा सर्वज्ञ, सर्वश्रेष्ठ व सर्वसंग्राहक ग्रंथकार, शंकराचार्यांसारखा तत्त्ववेत्ता वगैरे याच देशांत उत्पन्न झाल्यामुळें, तीं अभिमानाचीं स्थानें म्हणून सांगतां येतात. तसेंच आर्य संस्कृतीचें वैशिष्ट्य म्हणून तीन ऋणें फेडण्याची कल्पना, चार आश्रमांची पद्धति, धर्ममताबद्दल सहिष्णुत्व, अनेकांत एकत्व पाहाण्याची दृष्टि, त्याग व विद्यादान यांचें महत्त्व, कर्मफल व त्याचा भोग यांची मीमांसा, आणि सर्वश्रेष्ठ असें तत्त्वज्ञान हीं सर्व अभिमानानें जगाला सांगण्याजोगींच आहेत.

उपनिषदांमध्यें जें तत्त्वज्ञान सांगितलेलें आहे, तें सर्वश्रेष्ठ असून त्या तत्त्वज्ञानाच्या पुढें अद्याप जगाची मजल गेलेली नाहीं, यांत शंका नाहीं. मनुष्यप्राण्याला खाणेंपिणें, प्रजा, पैसा, सुख व आनंद हीं पाहिजे असतात. निरतिशय आनंदाचें स्थान हे सामान्य सुखापलीकडे असल्यामुळें मनुष्याची बुद्धि दृश्य जगापलीकडे अर्थात् त्याच्या बुडाशीं कांहीं आहे कीं काय असा शोध करूं लागते.

मनुष्य हा ज्ञानवान् प्राणी आहे. मनुष्य व पशु यांत जर कांहीं अंतर असेल तर तें विवेक व ज्ञान हेंच होय! सामान्य ज्ञानामध्यें पुष्कळ माणसें

संतुष्ट असतात, त्याचें कारण त्यांचा बौद्धिक अधिकार तेवढाच असतो. खाणें, पिणें, मुलेंबाळें व सामान्य संसार एवढाच त्यांचा पुरुषार्थ असतो. कुशाग्र बुद्धीचीं माणसें विशेष ज्ञानाकडे वळतात व तीं विविध शास्त्रांमध्यें शोध लावून मानवी प्रगतीला साहाय्य करतात. सामान्य ज्ञान व विशेष ज्ञान यांच्या पलीकडे तत्त्वज्ञानाचें क्षेत्र आहे. कोणत्याही विषयांत खोल जाऊन त्यांतील मूळ तत्त्व पाहण्याची बुद्धि फार थोड्यांमध्यें असते, म्हणूनच जगांत तत्त्ववेत्ते फारच थोडे निर्माण होतात. तत्त्वज्ञानाचा विषय हा फार थोड्यांकरितां आहे, अर्थात् फारच थोडीं माणसें या क्षेत्रांत प्रवेश करतात.

वेदांतशास्त्रदृष्ट्या ब्रह्मज्ञानाचा अधिकार पाहिजे त्याला कधीही प्राप्त होत नाहीं. हें ज्ञान प्राप्त होण्याला जसा बौद्धिक अधिकार लागतो त्याप्रमाणेंच अन्तःकरणाची एक विशिष्ट भूमिका असावी लागते. हिंदुधर्म-शास्त्रदृष्ट्या धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ आहेत. धर्म म्हणजे धारणपोषण, अर्थ म्हणजे द्रव्यप्राप्ति, काम म्हणजे उपभोग अर्थात् तो सर्व प्रकारचा. या तिहींतच बहुतेक माणसें गुरफटलेलीं असतात. चौथा पुरुषार्थ मोक्ष. हा क्वचित् एखाद्यास पाहिजे असतो. तीन पुरुषार्थ ज्यानें साध्य केले, जगांतील उपभोग ज्यानें बहुतेक सर्व घेतले, जाणावयाच्या लौकिक गोष्टी बहुतेक ज्यानें जाणल्या, मग 'ततः किम्' पुढें काय? पुढें कांहीं आहे कीं नाहीं असें म्हणून ज्याची बुद्धी शोध करूं लागली, तोच या विषयाचा जिज्ञासु अधिकारी होय. मोक्षाबद्दलची तळमळ व तत्त्वज्ञानाची जिज्ञासा हीं उत्पन्न होण्यास पुष्कळ अंशीं आकस्मिक आपत्ति, वैतागाचे प्रसंग आणि विवेक वैराग्य हीं कारणीभूत होतात. म्हणूनच मनुष्याच्या उतार वयांत त्याला जसजसा आपला अंतकाल जवळ आला असें वाटतें; तसतशी या विषयाकडे त्याची थोडीबहुत प्रवृत्ति होते. पण ती खरी टिकाऊ अशी नसल्यामुळें मोक्षमार्गाकडे आलेलीं थोडींच माणसें शेवटचें ध्येय गांठीत असतात. यास्तव गीतेंत हजारांतील एखादा मनुष्य या मार्गा-कडे वळतो व जे लक्षावधी या मार्गाकडे वळतात त्यांतील एखाद्यालाच ब्रह्मतत्त्व कळतें असें म्हटलें आहें.

शेकडा शंभर मनुष्यांचे पुरुषार्थ धर्म, अर्थ व काम हेच होत.

उद्यां जर खरोखरीच परमेश्वर येऊन एखाद्या गांवांतील लोकांना तुम्हाला मोक्ष देतो असें म्हणूं लागेल तर त्या ईश्वराबरोबर सुद्धां मोक्षाकरितां कोणी जाणार नाहींत. विद्यार्थी म्हणतील आमच्या परीक्षा पास होऊं द्यात. पदवीधर तरुण व तरुणी म्हणतील कीं आमचीं आधीं लग्नें होऊं द्यात. बहुतेक प्रत्येकजण म्हणेल कीं ईश्वरा आम्हाला पैसे दे, कोणी म्हणेल मुलगा दे, कोणी म्हणेल बायको दे. पण, मोक्ष दे व आम्ही तुझ्याबरोबर येतों, असें म्हणण्यास कोणीहि तयार होणार नाहीं. फार काय प्रत्यक्ष तुकाराम महाराजांच्या बायकोनें आपल्या पतीला अशाच आशयाचें उत्तर दिल्याचें सांगतात ! यावरून वाचकांनीं हाच बोध घ्यावयाचा कीं मनुष्यस्वभाव म्हणजे मनुष्याची सामान्य प्रवृत्ति हीच कीं 'अथ जाया मे स्यात्। अथ वित्तं मे स्यात् । म्हणजे मला बायको पाहिजे, मुलें पाहिजेत, पैसा पाहिजे, आणि मला काम पाहिजे. पुरुषार्थ पुरुषार्थ जो म्हणतात तो हाच होय ! म्हणून श्रीकृष्णासारख्या सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्त्याला युद्धाच्या प्रसंगींच तत्त्वज्ञानाचे प्रश्न विचारणारा एक अर्जुन भेटला व दुसरा निर्वाणकालीं तत्त्वपृच्छा करणारा उद्धव भेटला! पहिला अर्जुन, दुसरा उद्धव व तिसरा अर्धवटसा धर्मराज या अडीच शिष्यांशिवाय श्रीकृष्णालासुद्धां कोणी तत्त्वजिज्ञासु आढळला नाहीं. यावरूनहि या विषयाचे अधिकारी फार थोडे असतात असें दिसून येईल.

आपल्या धर्मशास्त्रकर्त्यांनीं आश्रमाची व्यवस्थाहि हेंच मानसशास्त्र लक्षांत घेऊन केली असावी असें म्हणतां येतें. ब्रह्मचर्य व गार्हस्थ्य हेच खरे संसाराचे आश्रम. प्रत्येक मनुष्य तीन ऋणें घेऊन जन्माला येतो.

'जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणैर्ऋणवाञ्जायते यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः स्वाध्यायेन ऋषिभ्यः' म्हणून त्यानें यज्ञ करून देवांचें,प्रजेनें पितरांचें व ज्ञानवान् होऊन ऋषींचें ऋण फेडलें पाहिजे किंवा निराळ्या तऱ्हेनें बोलावयाचें तर मनुष्यलोक, पितृलोक व देवलोक हे माणसानें मिळवावयाचे असतात. या लोकप्राप्तीचीं साधनें–

'मनुष्य लोकः पुत्रेणैव जय्यो नान्येन कर्मणा। कर्मणा पितृलोको विद्यया देवलोकः।

मराठी ग्रंथ संग्रहालय
३३०१
स्थळ प्रत
सं. नि. नं. ८२८
ता. २८/१२/४३

त्र, कर्म व विद्या हीं होत. यापैकीं पहिल्या आश्रम सांगितलेले आहेत. कोणत्याहि द्विजानें अनाश्रमी असूं नये. 'अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः।' अनाश्रमी राहिल्यानें दोष आहे. गृहस्थाश्रमामध्यें तीन ऋणें फेडावींत व मोक्षाचा विचार नंतर करावा असेंच मनूचेंहि म्हणणें आहे.

ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् ।
अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यधः ॥ मनु अ. ६-३५ ॥
अधीत्य विधिवद्वेदान्पुत्रांश्चोत्पाद्य धर्मतः ।
इष्ट्वा च शक्तितो यज्ञैर्मनो मोक्षे निवेशयेत् ॥ मनु अ. ६-३६॥

वरील श्लोकांत तीन ऋणें न फेडणारा अधोगतीस जातो असें सांगून पुढें ब्रह्मचर्यांत अध्ययन, गृहस्थाश्रमांत पुत्रोत्पादन व यज्ञ संपादन करून मग मन मोक्षमार्गाकडे लावावें, म्हणजे या जबाबदाऱ्या पार पाडल्यावरच मोक्षाचा अधिकार प्राप्त होतो असें म्हटलेलें आहे.

तीन आश्रम यथास्थित पार पाडून चौथ्या आश्रमाकडे वळणारे लोक फार थोडेच असतात. तीन आश्रम पार पाडणें, तीन ऋणांतून मुक्त होणें व इतकें केल्यावर ब्रह्मज्ञानाच्या विचारास लागणें ही गोष्टहि पुष्कळांना शक्य नसते. यावरूनहि मोक्षमार्गाचा अधिकारी किती दुर्मीळ आहे याची कल्पना येते.

वैदिक वाङ्मयापैकीं उपनिषद् ग्रंथामध्यें या ब्रह्मज्ञानाचा म्हणजे तत्त्वज्ञानाचा व त्याच्या अधिकाऱ्याचा विचार पुष्कळच केला आहे. मानवी अन्तःकरणाचें निरीक्षण करून उपनिषदांतील या तत्त्ववेत्त्यांनीं असें ठरविलें आहे कीं तीन एषणांच्या म्हणजे इच्छांच्या पलीकडे जो गेला आहे, तोच या ज्ञानाचा अधिकारी होय ! त्या तीन एषणा म्हणंजे पुत्र, वित्त व लौकिक या होत किंवा विषय, वित्त व लौकिक असें म्हटलें तरी चालेल. जोंवर स्त्रीविषयीं आसक्ति, द्रव्याविषयीं प्रेम व लौकिकाची हाव आहे, तोंवर ब्रह्मज्ञानाची खरी जिज्ञासा त्या मनुष्याला झालेली नाहीं असें खुशाल समजावें. विषयाविषयीं अनासक्ति, लौकिक आणि पैसा यांच्याविषयीं वैराग्य उत्पन्न होणें हें खरोखरीच फार कठीण आहे.

'एतमेव प्रव्राजिनो लोकमिच्छन्तः प्रव्रजन्ति। एतद्ध स्म वैतत्पूर्वे

विद्वांसः प्रजां न कामयन्ते । किं प्रजया करिष्यामो येषां नोऽयमात्मा नोऽयं लोक इति । ते ह स्म पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति । ' (वृ.आ.अ. ४ ब्रा. ४ मं.२२.)

आत्मलोकाची इच्छा करणारे संन्यासी, पुत्र, वित्त व लौकिक याच्या एषणा टाकून या मार्गाकडे वळतात. जगांतील विषय, वित्त व लौकिक या संबंधींच्या ज्यांच्या सर्व इच्छा नष्ट झालेल्या आहेत, तेच चतुर्थाश्रमी होतात व मोक्षविचार करतात.

सर्व जग या तीन एषणांतच म्हणजे इच्छांमध्येंच गुरफटलेलें आहे. परमार्थाच्या मार्गांत, विषय, वित्त आणि लौकिक हे मोठे खळगे असून सर्व साधक या ना त्या खड्ड्यांतच पडतात. एषणात्रयीच्या पलीकडे जाऊन शम, दम, उपशम तितिक्षा, वैराग्य व त्याग या दैवी साधनांत रंगून जाणारा मनुष्य खरोखरीच विरळा असतो ! तीन एषणांचा त्याग हा कांहीं सामान्य त्याग नव्हे. जगांतील विग्रह, युद्धें व मारामाऱ्या हीं सर्व या एषणात्रयीमुळेंच होत आहेत. या तीन एषणा म्हणजे जगांतील त्रिविध पुरुषार्थ होत.

परमार्थ ग्रंथामध्यें माणसाचे बद्ध, मुमुक्षु, साधक आणि सिद्ध असे चार वर्ग केलेले आहेत. पैकीं सर्व जग बद्धच आहे. मुमुक्षु फारच थोडे, साधक लक्षामध्यें एखादा व सिद्ध तर कोटी मनुष्यांमध्यें एखादा असतो कीं नाहीं याची शंकाच आहे. इतका हा मार्ग खडतर व कठीण आहे.

मोक्षाधिकाऱ्याविषयीं श्रीमत् आद्य शंकराचार्य लिहितातः—अपरा विद्येविषयीं ज्याला विरक्ति उत्पन्न झाली आहे तोच पराविद्याधिकारी होतो. आत्मविद्येला संन्यासच विहित आहे. कारण इतर आश्रमांतील बंधनें तेथें नसतात. इतर आश्रमांतील कर्मे न केलीं तर दोष आहे. व करूं लागलें तर चित्ताला व्यग्रता येते. शमदमादि साधनांना चतुर्थाश्रमच पाहिजे. कारण तेथें अननुष्ठाननिमित्त प्रत्यवाय नाहीं व आश्रमधर्माची व्यग्रता नाहीं. साधकानें शमदम, उपशम, तितिक्षा इत्यादि अंतरंग साधनांनीं बुद्धीची समता व चित्तशुद्धी संपादन केली पाहिजे.

"परा व अपरा अशा दोन विद्या असून त्यांच्या सहाय्यानेंव अभ्युदय व

निःश्रेयस प्राप्त होतात. अन्नाचा व मनाचा संबंध आहे. म्हणून आहार-शुद्धीनेंच चित्तशुद्धी होते. साधकानें चित्तविक्षेपकारक सर्व गोष्टी त्यजाव्या. साक्षात्काराला चित्तविक्षेप बाधक होतो. वृत्तीची एकतानता सदैव राहिली पाहिजे व त्याचकरितां वागादींचा संयम सांगून योगाचें आचरणहि सांगितलेलें आहे. (सामान्य व्यवहारांत इंद्रियसंयम पाहिजेच पण त्याहि-पेक्षां तो परमार्थात पाहिजे) आत्म्याची आराधना भक्ति, ध्यान व प्रणिधान यांनीं होते. पण तें होण्यास वृत्ति अन्तर्मुख व्हावी लागते. चित्तप्रसाद ही वाव फार मोठी आहे. चित्तप्रसादामुळें संतुष्ट असलेले योगी परंज्योतीला पाहूं शकतात."

जगाच्या बुडाशीं म्हणजे ह्या नामरूपालीकडे कोणतें तत्त्व आहे हें जिज्ञासाबुद्धीनें जाणणें, त्याचा विचार करणें व ते सर्व सिद्धात ध्यानांत वागवून नेटका प्रपंच करणें हा विषय निराळा व ब्रह्म काय आहे हें समजून घेऊन त्याचा निदिध्यास लावून घेऊन तद्रूप होणें; हा विषय निराळा. जगांतील तत्त्ववेत्ते व हिंदुस्थानांतील तत्त्ववेत्ते यांमध्यें हाच मोठा फरक आहे असें समजण्यांत येतें. जगांतील तत्त्ववेत्त्यांनीं मळ तत्त्वाचा म्हणज ब्रह्माचा शोध करण्याचा यत्न केला, व त्यांनीं तें तत्त्व असें असें आहे, आपल्याला इतकें इतकें बुद्धीनें कळलें असें सांगितलें. अर्थात् तें लांबून सांगितलें, जवळून म्हणजे तद्रूप होऊन सांगितलें नाहीं. पण हिंदुस्थानांतील तत्त्ववेत्ते बहुतेक आत्मसाक्षात्कारी होते. त्यांनीं त्या तत्त्वाचा निदिध्यास लावून घेतला व ते तद्रूप झाले म्हणून त्यांचे बोल हे अनुभवाचे बोल होत असें समजतात. परंतु सर्व ब्रह्मवेत्त्यांचे ब्रह्मज्ञानविषयक सिद्धांत सारखें नसल्यामुळें आपल्या इकडील ब्रह्मवेत्त्यांनासुद्धां ब्रह्म हें कितपत कळलें होतें याची शंकाच येते. सर्वांना जर या तत्त्वाचें सारखेंच आकलन झालेलें होतें तर सूत्रकार, भाष्यकार, साधुसंत व भगवद्भक्त यांमध्यें एकवाक्यता असावयास पाहिजे होती. पण ती तशी नाहीं हें स्पष्ट आहे. यास्तव तत्त्व समजून घेणें व तत्त्वरूप होणें, मोक्ष मिळविणें हा मार्ग कांहींचे करितां सोडून देऊन तत्त्वज्ञानाचे सिद्धांत समजून घेऊन कोणत्या वृत्तीनें, कोणत्या युक्तीनें, कोणत्या बुद्धीनें, स्वतःचा, समाजाचा व राष्ट्राचा प्रपंच करावा

हेंच मुख्यतः सर्वसामान्य माणसांनीं शिकावयास पाहिजे. ज्याचा शोध अद्याप पूर्णपणें लागलेला नाहीं, ज्याविषयीं पूर्ण व स्पष्ट कल्पना नाहींत, त्या फंदांत न पडतां जें बुद्धीला व युक्तीला पटण्याजोगें बुद्धीच्या व शक्तीच्या आटोक्यांतलें असें आहे, तेंच स्वसमाज व स्वराष्ट्रोत्कर्षाचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून तत्त्वज्ञानांतील सिद्धांत ध्यानांत वागवून शक्तीनें व युक्तीनें नेटका प्रपंच करण्याचा मार्गच सर्वांनीं आक्रमावा हेंच श्रेयस्कर होय!

प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन ब्रह्मरूप होणाऱ्या साधकाकरितां नाहीं; तर तें प्रापंचिकांकरितां आहे. जे लोक अज्ञानानें, अनधिकारानें व भ्रमानें उगाच या ब्रह्ममार्गांत पडतात व फजीत होतात, त्यांना ब्रह्मविद्येचे मुख्य मुख्य सिद्धांत काय आहेत; हें येथें सांगावयाचें आहे. तसेंच, गुरुकृपा व अनुग्रह, श्रद्धा व भावना, ईश्वर व त्याची भक्ति, साधु व चमत्कार इत्यादि विषयांचा उहापोहहि प्रस्तुत ग्रंथांत करावयाचा आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ब्रह्मज्ञान व तदनुपंगिक अनेक विपय मांडून त्यांचें यथार्थ ज्ञान नसल्यामुळें लोक बुवाशाहीच्या जाळ्यांत कसे सांपडतात हें दाखविण्याकरितां हा ग्रंथ आहे.

ब्रह्मज्ञान म्हणजे जगताच्या मूल तत्त्वाचें ज्ञान होय. हें ज्ञान सर्व ज्ञानांत श्रेष्ठ आहे. याच्या प्राप्तीला परमार्थ म्हणतात. परमार्थ, ब्रह्मज्ञान, ईश्वरप्राप्ति यांच्यामागें जो लागलेला असतो त्याला साधक, अधिकारी, यति, संन्यासी म्हणतात. **परमार्थ, ईश्वरभक्ति, ब्रह्मज्ञान हा कधींहीं धंदा होऊंच शकत नाहीं. यांना जे लोक धंद्याचें स्वरूप आणतात ते बुवा होत.** या धंद्याच्या निमित्तानें जे इतरांना प्रज्ञाहत करितात, दुस-यांचें द्रव्य लुबाडतात व त्यांस कुमार्गाला प्रवृत्त करितात, ते परमार्थ-मार्गांतील कापडी नसून ढोंगी होत. त्यांचें जें समाजावर अवास्तव वजन व दडपण असतें, त्यांची जी समाजांत प्रतिष्ठा असते, त्यांच्या अलौकिकपणा-विषयीं जनमनावर जी पक्कड असते, तीच बुवाशाही होय. **किंवा परमार्थ मार्गांतील लुच्चेगिरी म्हणजे बुवाशाही होय.** प्रत्येक धंद्यांतील लुच्चे-गिरी म्हणजे बुवाशाही नव्हे किंवा राजकारण व धर्मकारणादि क्षेत्रांतील झब्बूशाही, म्हणजेहि बुवाशाही नव्हे. परमार्थ व ब्रह्मज्ञान येवढ्या मर्यादित

क्षेत्रांतील लुच्चेगिरी म्हणजेच बुवाशाही होय. न्यायालयें; कचेऱ्या व निर्बंध (कायदे) इत्यादि मार्गानीं इतर क्षेत्रांतील दोष नष्ट करितां येतात. पण परमार्थ व ब्रह्मज्ञान हें क्षेत्र असें आहे कीं तेथें कायदा पोंचत नाहीं व लोकांना या विषयांतील ज्ञान वेताचें असतें. म्हणूनच ते बुद्धिहत होतात. पारमार्थिक क्षेत्रांतील बुद्धिहत्या थांबावी हा या ग्रंथाचा उद्देश आहे तो कितपत साधला आहे हे वाचकांनींच ठरवावयाचें आहे.

प्रकरण २ रें. : :

ब्रह्म व जगत्

जगाचें आदिकारण मग तें ब्रह्म असो, ईश्वर असो; त्याचें सम्यक् ज्ञान अद्याप कोणालाहि झालेलें नाहीं, असें गेल्या प्रकरणांत म्हटलें; त्याचा प्रथम थोडा विचार करूं. वेदांतील तत्त्वज्ञानाचा विचार केला तर असें दिसतें कीं ऋग्वेदांतच (संहितेंत) कुठें कुठें तत्त्वज्ञानाचे इतस्ततः कांहीं विचार विखुरलेले आहेत. विश्वाचें सम्यक् स्वरूप ऋग्वेदांतील मंत्रद्रष्ट्यांना ज्ञात झालें होतें असें दिसत नाहीं. पृथ्वी, अंतराल व आकाश हे तीन लोक त्यावेळीं मानले होते; व द्यौ, वरुण, मित्र, सूर्य, सविता, विष्णु, अर्यमा, उषा, चंद्र, मातरिश्वा, रुद्र, मरुत् इत्यादि देवता त्या कालीं होत्या. सृष्टी ही कोणा एका कर्त्यानें घडविली कां ती आपोआप उत्पन्न झाली, या संबंधाचे दोन्ही प्रकारचे विचार ऋग्वेदांत आढळतात. यापेक्षां सृष्टीच्या उत्पत्ती-संबंधानें कांहीं निराळ्या कल्पनाहि सांगितलेल्या दिसतात.

ऋग्वेदांत सुमारें पंचवीस ठळक ठळक देवता आहेत. त्या तील कांहीं असुरांशीं भांडणाऱ्या, कांहीं गणवाचक, कांहीं दस्युवाचक अशाहि आहेत. देवतांच्या सगुण स्वरूपाच्या कल्पना ऋग्वेदांत पुष्कळ आहेत. कांहीं कारणानें वैदिक ऋषींना अनेक देवता मानणें हें बरें वाटलें नाहीं. अर्थात् त्यांनीं एकेश्वरत्वाची कल्पना परिणत केली. कांहीं ठिकाणीं त्या

ईश्वरानें सृष्टी उत्पन्न केली तर कांहीं ठिकाणीं ती स्वयंभ आहे, असेहि विचार त्यांनीं प्रदर्शित केले आहेत. नासदीय सूक्त, हिरण्यसूक्त व पुरुषसूक्त यांमध्येंच विशेषतः सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधाचे व तत्त्वज्ञानाचे इतर विचारहि आढळतात. ऋग्वेदांतील ऋषींना गोंधळांत टाकणारे अनेक तात्त्विक प्रश्नहि दिसतात. त्यांचीं उत्तरें त्यांनीं दिलेलीं नाहींत. पण प्रश्न मात्र उत्पन्न करून ठेवलेले आहेत. पुष्कळ नीतिकल्पनांचा उहापोह ऋग्वेदामध्यें आलेला आहे.

तत्त्वज्ञानाचा विचार वरीलप्रमाणें जो थोडावहुत आहे तो ऋग्वेद संहितेमध्यें आहे. यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद यांमध्यें तो जवळ जवळ नाहींच. वेदांतील मंत्रद्रष्टे ऋषी हे भाविक, साधेभोळे, प्रापंचिक असे दिसतात. ते आपल्या भोंवतीं अतिमानुष अशा देवता व शक्ति .या सर्वत्र पाहतात. देवतांची अवकृपा होऊं नये व आपणाला दुःख प्राप्त होऊं नये अशा इच्छेनें ऋग्वेदांतील ऋषी हे देवतांच्या सारख्या स्तुत्या करीत आहेत असा भास होतो. देवतांची स्तुति करून, त्यांना लोभवून, त्यांना द्रव्यें देऊन संतुष्ट करण्यांत त्या कालचे ऋषी मग्न झालेले दिसतात!

वेदानंतर तत्त्वज्ञानाचे प्रमाणग्रंथ म्हणजे उपनिषदें होत. उपनिषदांमध्यें तत्त्वज्ञानाचे अनेक विचार सिद्धांत म्हणून मांडलेले आहेत. संहितावाङ्मयामध्यें इतिहास, कथा, दंतकथा, प्रार्थना, गीतें, कवनें इत्यादि आहेत. परंतु उपनिषदांत विद्वत्तायुक्त प्रौढ भाषा, ज्ञानाचें तेज, तज्जन्य आनंद, सांगितलेल्या सिद्धांताविषयीं आत्मविश्वास, तर्क व स्फूर्ति इत्यादि सर्व आढळतात. उपनिषदें हीं प्रायः तत्त्वज्ञानप्रधान असल्यामुळें विषयाची विवेचनपद्धति मोठी सरस आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत हिंदुलोक उपनिषदांना प्रमाण मानतात. हीं उपनिषदें अनेक असलीं तरी मुख्यतः दहाच उपनिषदें प्रमाणभूत आहेत. सर्व उपनिषत्कर्ते निरनिराळे असल्यामुळें प्रत्येकाचें स्वतंत्र मत दिसतें. हिंदुस्थानांतील तत्त्वज्ञानविषयक विविध पंथांना उपनिषदांचाच आधार आहे. अर्थात् त्यांमध्यें ब्रह्म, ईश्वर, अविद्या, जीव, कर्म, पंचकोश, मरणोत्तर आत्म्याची स्थिति वगैरे अनेक विषय आलेले आहेत. ब्रह्मसूत्रें हीं उपनिषद् वाक्यांचा समन्वय करतात. आणि

हस्तलिखित ग्रंथ संग्रहालय
हस्त प्रत
सं. ... नं. ...
ता. ... ...
३०२

तसेंच ही उपनिषदांचाच पुष्कळ अंशी अनुवाद करते. प्राचीन ऋषींना जें तत्त्वज्ञान स्फुरलें त्यांच्यापुढें अद्याप जगांतील तत्त्वज्ञानाची मजल गेलेली नाहीं. तें त्यांचें बुद्धिवैभव पाहून अभिमान तर वाटतोच पण त्यांच्याबद्दल अत्यंत आदरहि उत्पन्न होतो. कारण ज्या वेळेला जगांतील इतर मानव समाज पूर्ण मनुष्यस्थितीलाहि आलेले नव्हते, अशा वेळीं वैदिक आर्यांनीं समाजाच्या विविध अंगांचा विचार करून तत्त्वज्ञानाचे श्रेष्ठ सिद्धांत सांगितले; ही खरोखरीच अभिमानास्पद गोष्ट होय!

उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचा परिचय करून देणें हें येथें अप्रस्तुत आहे. कारण तें कार्य पुष्कळांनीं आजवर केलें आहे. उपनिषदांतील ऋषींनीं जें तत्त्वज्ञान म्हणून सांगितलें आहे त्याचा आढावा घेतल्यास जगताच्या आदि कारणाचा पूर्ण व समाधानकारक असा शोध त्यांनाहि लागल्याचें दिसत नाहीं. उपनिषदांत युक्तिवाद नाहीं, अनुमान नाहीं, सर्व सिद्धांतवाद आहे. सूत्ररूपानें, कथानक घेऊन, दृष्टांत देऊन, कोठें संवादाचाहि आश्रय करून गहन विषय समजून सांगण्याचा यत्न फार उत्तम तऱ्हेनें केला आहे. उपनिषदांतील कित्येक संवाद असे आहेत कीं तीं प्रश्नोत्तरें पाहून त्या वेळच्या ज्ञानाची कल्पना येते. त्या वेळच्या वादविवादांत साक्षात्कारी ब्रह्मवेत्त्यांनीं म्हणून जीं उत्तरें दिलीं आहेत ती उत्तरें आजकालचा एखादा पंडितहि देऊं शकेल असें वाटतें, त्या कालीं साधनें बेताचीं, भौतिक शास्त्राची मदतहि अपूर्ण, असें असल्यामुळें त्यांचें ज्ञान त्या कालाच्या मानानें पुष्कळच उंच होतें असें म्हटलें पाहिजे.

प्रश्न आहे तो असा कीं उपनिषदांतील ऋषींचें ज्ञान हें बुद्धिनिष्ठ होतें कां साक्षात्कारनिष्ठ होतें ? आपली बुद्धि इतकी चालते, आपल्याला तर्कानें इतकें इतकेंच जाणतां येतें, असें त्यांनीं कांहीं ठिकाणीं म्हटलेलें आहे. तर्काच्या सहाय्यानें होणारें ज्ञान व साक्षात्कारजन्य ज्ञान यांमध्यें फरक आहे. उपनिषदांत ज्यांचीं ज्यांचीं नांवें ज्ञानी म्हणून पुढें आलेलीं आहेत, त्या सर्वांना ब्रह्मतत्त्वाचा खरोखरींच साक्षात्कार झाला होता कीं नाहीं याबद्दल शंका वाटते. साक्षात्कारी माणसांचें ज्ञान हें असें पाहिजे कीं तें अंतिम तत्त्वाच्या स्वरूपालाच जाऊन भिडावें! तसें तें नसल्यामुळें उप-

निषदांतील सर्व ऋषी हे साक्षात्कारी नव्हते तर ते महाबुद्धिमान् होते, त्या कालांत ते श्रेष्ठ ज्ञानी होते, असेंच म्हणणें योग्य वाटतें.

उपनिषदांतील कांहीं ऋषींनीं तर प्रांजलपणानें आपलें अज्ञान कबल केलें असून कांहीं ठिकाणीं तसे प्रश्नहि आपल्यापेक्षां जाणत्यांना विचारले आहेत. पण सामान्य लोकांची समजूत मात्र अशी कीं सर्व वैदिक ऋषी हे साक्षात्कारी होते, म्हणून पंडितांनींहि उपनिषदांतील सर्व वाक्यांची ओढाताण करून एकवाक्यता करण्याचा प्रयत्न केला आहे. साक्षात्काराच्या अंगीं आदि तत्त्वाच्या प्रत्यक्ष दर्शनाची शक्ति आहे व तसा साक्षात्कार आपणास झाला आहे असें सांगणारे लोक आजहि आढळतात! साक्षात्कार झाला असें म्हणणारे बुवा व महाराज व त्यांच्यावर अंधश्रद्धा ठेवणारे त्यांचे भक्त यांच्याशिवाय इतर कोणीहि त्यांना विश्वाचें आदि कारण कळलें आहे असें समजत नाहींत; हें एकपरी बरें आहे.

उपनिषदांमध्यें विश्वोत्पत्तीचा विचार आला असून पूर्वी कांहीं नव्हतें, ही सृष्टि अनादि आहे, परमेश्वरानें ती निर्माण केली, अशीं विविध उत्तरें दिलेलीं आहेत. ब्रह्म, आत्मा, ब्रह्मात्मभेद, त्याच्या प्राप्तीचे मार्ग, मरणोत्तर जीवाची स्थिति वगैरे विषय उपनिषदांत असून जगाचें आदि कारण ब्रह्म आहे, तें निर्गुण आहे, तें सर्वसत्ताधीश आहे, विभु आहे व व्यापक आहे, असें म्हटलें आहे. जगाचें आदि कारण अशा तऱ्हेचें असलें तरी त्यासंबंधीं मनुष्यमात्राचें कर्तव्य काय हा प्रश्न उपस्थित होतोच. कारण एकदां विश्व निर्माण झाल्यावर त्याचा जर मूळ कारणाशीं कांहीं संबंध राहात नसेल तर शुद्ध जिज्ञासेशिवाय तें जाणण्याचें दुसरें कांहीं कारण राहात नाहीं. परंतु उपनिषदामध्ये ब्रह्माची उपासना करावी व उपासनेनें ज्ञान प्राप्त करून घ्यावें, असेंहि म्हटलें आहे.

ब्रह्माचें जें स्वरूप वर्णन केलें आहे तें ग्रहण करणेंच मुळीं कठिण जातें. अर्थात् त्याचें सम्यक् ज्ञान होणें व उपासना घडणें हें किती तरी कठीण वाटतें. तथापि ब्रह्मसाक्षात्काराचा अनुभव सुषुप्तीमध्यें येतो व तो घ्यावा असें ठिकठिकाणीं सांगितलें आहे. गाढ निद्रेचे वेळीं आत्मा ब्रह्मस्वरूपाप्रत जातो, पण तो पुन्हां संसारांत पडतो म्हणून निराळे यत्न करून आत्मप्राप्ति संपादन करावी असें उपनिषदांचें मत आहे.

जगाचें मूळ ब्रह्म आहे. तें विभु, सर्वव्यापी, नित्य असें जर आहे तर या सृष्टींत आपल्याला जें नामरूपात्मक द्वैत दिसतें याची वाट काय ? या प्रश्नाचें उत्तर उपनिषदांतहि माया किंवा आभास हेंच आहे. माया शब्द उपनिषदांतहि आलेला आहे. एकाचे अनेक कां झाले, शुद्ध ब्रह्मापासून ही नामरूपात्मक सृष्टि कशी उत्पन्न झाली, याचें समर्पक उत्तर उपनिषदांतहि नाहीं. एकापासून अनेक कसे झाले? या विकट प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां उपनिषदांमध्यें मृत्तिका व घट, सुवर्ण व अलंकार, लोह व त्याचे विकार इत्यादि अनेक दृष्टांत दिलेले आहेत; पण ते दृष्टांत समाधानकारक वाटत नाहींत. आजचीं ज्ञानाचीं साधनें, शोध व प्रगति लक्षांत घेतां उपनिषदांतील विचारसरणी सर्वस्वी बिनचुक व समाधानकारक अशी वाटत नाहीं. त्या कालांत उपनिषदांतील कांहीं ऋषींचें ज्ञान श्रेष्ठ होतें यांत शंका नाहीं. पण तें पूर्णत्वाला गेलें होतें असें म्हणवत नाहीं. उपनिषदांवरूनहि जगाच्या आदि कारणाचा शोध अद्याप पूर्णपणें लागलेला नाहीं, असें म्हणतां येतें.

आजपर्यंतचा मानव जातीचा इतिहास पाहिला तर असें दिसून येतें कीं त्या त्या परिस्थितीप्रमाणें त्या त्या मानव समाजानें जगण्याकरितां तत्त्वज्ञान हें उत्पन्न केलें. मनुष्य समाजाच्या बाल्यावस्थेंत असें दिसतें कीं जिकडे तिकडे मानव जातीच्या टोळ्या स्थिर होण्याकरितां भटकत होत्या व मारामाऱ्याहि करीत होत्या. शिकार करणें व त्यावर जगणें, धनगरी वृत्तीनें जगणें, आज इकडे तर उद्यां तिकडे अशा पद्धतीनें गाई, मेंढ्या घेऊन स्थिर होण्याचा यत्न करणें, असें करीतच मनुष्य समाज स्थिर झाला आहे. अर्थात् भटकेपणा, स्थैर्य व स्वास्थ्य अशी जी जी समाजाची स्थिति असेल, त्या त्या स्थितीला अनुरूप असें तत्त्वज्ञान वेळोवेळीं उत्पन्न झालेलें आहे.

माणसांचे मनांत विचार असतात, अर्थात् समाजाचें मनहि विचारी असतें. समाजाच्या मनांत जे जे विचार येतात त्यांतूनच तत्त्वज्ञान उत्पन्न होतें. अर्थात् तें तत्त्वज्ञान कुणी तरी त्या त्या काळचा मोठा मनुष्य बोलतो. त्या मोठ्या माणसाच्या साध्या बोलण्यालासुद्धां सिद्धांताचें स्वरूप येतें व लोक तें खरें मानूं लागतात. वैदिक आर्यांचें तत्त्वज्ञान, बुद्ध व ख्रिस्त यांचें

तत्त्वज्ञान त्या त्या कालांतील स्थितीचा अभ्यास केल्यास तेंहि परिस्थिति-सापेक्ष व समाजसापेक्षच होतें असें दिसतें.

माणसांनीं विग्रह केले, लढाया मारल्या, कत्तली केल्या, वंशक्षय केला म्हणजे एक प्रकारचें औदासिन्य उत्पन्न होतें, व जग हें क्षणभंगुर वाटूं लागतें. जगत् हें दुःखमय आहे, क्षणभंगुर आहे, तेव्हां या मायापाशांत न पडतां ईश्वराला शरण जावें अशा प्रकारच्या तत्त्वज्ञानानें हिंदुसमाजाच्या मनाला जी मरगळ आलेली आहे, तिच्या कारणाचा शोध केल्यासहि वरील नियमच दृष्टीस पडतो. भारतीय युद्धानंतरच हें क्षणभंगुरतेचें तत्त्वज्ञान उत्पन्न झालें ! वैदिक आर्यांच्या तत्त्वज्ञानांत हा विषय नाहीं. बुद्धकाल, आचार्यकाल व पुढें संतकाल या तिन्ही कालांतील तत्त्वज्ञानाचा शोध केल्यास असें वाटूं लागतें कीं या तत्त्वज्ञानाचा उगम अशाच परिस्थितींत झाला असून त्याचा प्रभाव असा आहे कीं अद्यापहि आपला समाज यांतून सुटत नाहीं.

ईश्वर, ब्रह्म, परब्रह्म म्हणून जें कांहीं म्हणतात, तें निश्चयानें खरोखरीच कोणाला कळलेलें नाहीं व सांगतांहि येत नाहीं. म्हणजे त्या विषयाचें ज्ञान अपूर्ण असून त्याचा पुष्कळ शोध अद्याप व्हावयाचा आहे, एवढेंच सत्य होय! तथापि जग हें कधींहि पूर्ण असत नाहीं, कोणताहि विषय अपूर्ण राहातो, या दृष्टीनें ब्रह्मज्ञानाच्या क्षेत्रांत जरी अपूर्णता असली तरी जे कांहीं नियम व सिद्धांत त्या शास्त्रांतील तज्ज्ञांनीं मांडलेले आहेत व जे थोडेबहुत तर्कास पटणारे असे आहेत त्यांचें ज्ञान अवश्य पाहिजे. जगांतील ज्ञानाचीं जशीं विविध क्षेत्रें आहेत तसें तत्त्वज्ञानाचेंहि एक मोठें क्षेत्र आहे. म्हणूनच या विषयांत जे कोणी तज्ज्ञ झाले व ज्यांना विद्वानांमध्यें व समाजामध्येंहि बरेच मान आहे, त्यांचीं मतें अवश्य समजून घेतलीं पाहिजेत. विशेषतः उपनिषदांतील अद्वैत सिद्धांत हा श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं तर्कशुद्ध व शास्त्रशुद्ध अशा पद्धतीनें मांडलेला आहे, म्हणून तो समजून घेणें अगत्याचें आहे.

प्रस्तुत ग्रंथांत वेदांतशास्त्रांतील मुख्य सिद्धांतविषयक जीं (आठव्या प्रकरणापर्यंत) प्रकरणें देणार आहोंत, त्यांना मुख्यतः श्रीमत् आद्य शंकरा-

चार्य यांच्या शारीरभाष्याचा आधार घेतलेला आहे. श्रीमत् आचार्य हे अद्वैत सिद्धांत प्रस्थापित करणारे आहेत. महाराष्ट्रांतील पुष्कळ विद्वान् व समंजस लोक या मताचे अनुयायी आहेत. महाराष्ट्रांतील सर्व प्रसिद्ध असे साधुसंतहि भक्तीपुरता द्वैत संबंध मान्य करीत असले तथापि शेवटीं अद्वैत सिद्धांतालाच ते मान देतात. बृहन्महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें तर तो अद्वैत मतानुयायी आहे असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. माध्व, रामानुज व वल्लभ सांप्रदायी लोकहि महाराष्ट्रांत बरेच आहेत. त्यांमध्यें विद्वान् व समंजस अशा लोकांची संख्याहि कांहीं कमी नाहीं. जीव, जगत् आणि ब्रह्म अथवा जीव, जगत् आणि ईश्वर यांचा संबंध काय हाच काय तो सर्वांमध्यें मतभेदाचा प्रश्न आहे. पुनर्जन्म, कर्म, पंचकोश मरणोत्तर स्थिति, विश्वाची उभारणी व संहारणी या बाबतींत मात्र सर्व आचार्यांची बहुतेक एकवाक्यता आहे. आचार्यांमधील हे मतभेद या पुस्तकांत देणें शक्य नाहीं. बृहन्महाराष्ट्रावर अद्वैत मताचीच छाप पुष्कळ आहे. म्हणून श्रीमत् शंकराचार्यांच्या शारीरभाष्याच्या आधारेंच पुढील संकलनात्मक विचार देत आहें.

उपनिषदांतील वेदवाक्यांचा समन्वय करण्याकरितां ब्रह्मसूत्रें उत्पन्न झालीं आणि त्या ब्रह्मसूत्रावरील शारीरभाष्यामध्यें उपनिषदें व ब्रह्मसूत्रें यांचें सार अत्यंत तर्कशुद्ध व शास्त्रशुद्ध पद्धतीनें मांडलेलें आहे.

शारीरभाष्यांत वेदांतांतील निरनिराळीं प्रमेयें इतस्ततः विषयानुरोधानें योग्य अशीं सांगितलेलीं आहेत. प्रत्येक विषय अगदीं प्रकरणवार एकापुढें एक असा मुळींच आलेला नाहीं. सूत्रार्थ सांगणें, उपनिषद् वाक्यांतील विरोधपरिहार करणें, स्वपक्षाचें समर्थन व परपक्षांचें खंडन करितांना वेदांताच्या अनेक सिद्धांतांचा आचार्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं पुरस्कार केलेला आहे म्हणून ब्रह्मसूत्र भाष्याची विषयवार विभागणी करून एकेक विषयावरील सर्व ठिकाणीं आलेलीं वाक्यें एकत्र केलीं पाहिजेत. हें काम मोठें किचकट, त्रासदायक, वराच वेळ घेणारें असें आहे. शिवाय ब्रह्मसूत्र भाष्याचीं ज्यानें अनेक पठणपाठणाचे निमित्तानें पारायणें केलीं आहेत असाच अधिकारी मनुष्य हें साक्षेपाचें कार्य करण्यास हवा. ईश्वरकृपेनें परमहंस परिव्राजक श्री **केवलानंद सरस्वती** (गुरुवर्य नारायणशास्त्रीबुवा मराठे)

यांनीं आमच्या विनंतीला मान देऊन हें संशोधनाचें, विषयविभागणीचें आणि विषयानुरोधानें वचनांच्या एकीकरणाचें काम अवघ्या तीन महिन्यांत मोठ्या साक्षेपानें करून दिलें! शारीरभाष्यांतील सिद्धान्त अवघ्या पंधरा प्रकरणांत सांगतां येतील अशी वचनांची क्रमवार सुसंगत व वेमालुम जुळणी श्री स्वामीजींनीं केली आहे. याबद्दल श्री स्वामीजींचे आम्ही अत्यंत ऋणी आहोंत. हा सर्व संग्रह आमचे हातीं आल्यावर त्याचे आधारें सुलभ शांकर वेदांत या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध करावा असें वाटलें. परंतु आर्थिक आश्रयाचा संभव न दिसल्यामुळें ती कल्पना तेथेंच राहिली. अद्यापहि जर एखाद्या शांकरभक्ताला मूळ शंकराचार्यांचा वेदांत काय आहे हें समजून घ्यावयाची हौस असेल तर मूळ वचनें व त्यांचे अर्थ देऊन प्रत्येक प्रकरणाला एक सुंदर उपोद्घात जोडून शांकर वेदांत या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध करण्याजोगी भरपूर सामग्री आमचेजवळ आहे; एवढें जाहीर करतों. या ग्रंथाचा उपयोग भविष्यकालीं विश्वविद्यालयामध्येंहि होण्याजोगा असल्यामुळें धंदेवाईकांनींसुद्धां हा ग्रंथ प्रकाशित करण्याचें ठरविल्यास त्यांना लौकिक व अर्थप्राप्ति हीं दोन्हीं मिळाल्याशिवाय राहणार नाहींत. अस्तु.

शांकरदर्शन हा मोठा ग्रंथ व सुलभ शांकरवेदांत हा छोटा ग्रंथ जरी आज प्रकाशित होत नसला तथापि दुधाची तहान ताकावर भागवावी या म्हणीप्रमाणें प्रस्तुत पुस्तकांत श्री स्वामी महाराजांनीं कृपेनें दिलेल्या या संग्रहाच्या आधारेंच पुढील प्रकरणें लिहिलेलीं आहेत. जरूर तेथेंच भाष्यांतील वचनें दिलीं असून भाष्यवचनांचें तात्पर्य मराठींत दिलेलें आहे. संदर्भ व दुवा जुळावा म्हणून क्वचित् ठिकाणीं आमचीं वाक्यें मधून मधून कंसांत दिलीं आहेत. वेदांतविषयक पुढील आठव्या प्रकरणापर्यंत इतकी प्रस्तावना करून आतां जगाचें मूळ जें ब्रह्म-तत्त्व, त्याकडे वळतों.

ब्रह्म-विचार

(जगाच्या मूल कारणाचा शोध करतां करतां उपनिषदांतील सर्व ऋषी एकवाक्यतेनें असें सांगतात कीं) जगाचें मूल एकच आहे तें ब्रह्म आहे, तें एकमेवाद्वितीय आहे, तेथें द्वितीय संबंध नाहीं. ब्रह्म हें वस्तुमात्रांत

भिन्न भिन्न नाहीं तें सत्य व अनंत असल्यामुळें सर्वत्र एकच आहे. ब्रह्मावांचून जगांत दुसरें कांहीं नाहीं.

सर्वस्यहि जनिमतो वस्तुजातस्य जन्मादि ब्रह्मणो भवति इति निर्धारितम् । (शां. भा. अ. ३ पा. २ सूत्र ३२)

भोक्ता, भोग्य हीं सर्व ब्रह्मच होत. ज्ञान, विज्ञान व प्रज्ञान स्वरूप असें तें ब्रह्म आहे. (मिठाचा खडा अंतरवाह्य खारट, गुळाचा खडा अंतरवाह्य गोड, कापराची वडी अंतरवाह्य सुगंधित, तसेंच) ब्रह्म हें अंतरबाह्य ज्ञानमय आहे. तें कूटस्थ, नित्य व विज्ञानमय असल्यामुळें त्याचा उच्छेद होत नाहीं. जगांत जें जें म्हणून उपलब्ध होतें तें ब्रह्मज्योतीमुळेंच होय. ब्रह्म हें इतरांना प्रकाशक आहे, इतरांमुळें तें प्रकाशित होत नाहीं. चैतन्यरूप ब्रह्मामुळेंच अखिल जगत् भासतें. तें सुखविशिष्ट, ज्ञानविशिष्ट, आनंदविशिष्ट, अजर, अमर, सुखरूप व एकरस असें आहे. निष्कल, निष्क्रिय, शांत, निरंजन, अस्थूल, अनणु, अदीर्घ, अ-ह्स्व असें तें आहे. समस्त उपाधिरहित व निर्विकल्प असें जगाचें मूलतत्त्व असून तेंच ब्रह्म आहे. तें सर्वात्मक, सर्वशक्तिमान, नित्य व सर्वव्यापी असें आहे.

वाङ्मनसातीतं अविषयांतःपाति प्रत्यगात्मभूतं नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त-स्वभावं ब्रह्म । अ. ३ पा. २ सू. २२+

ब्रह्म हें सांपडण्यास कठीण आहे, तें सर्वगत असलें तरी त्याचें स्थान मनुष्यहृदयांत आहे. मनुष्यहृदयाच्या अपेक्षेनें परब्रह्माला अंगुष्ठमात्र असें म्हटलें आहे. याच्या प्राप्तीनें अमृतत्व मिळतें. तें चराचराचें बीज आहे.

चराचर बीजस्य ब्रह्मणः सर्वात्मकस्य । अ.१ पा. १ सू. २४.

जें ज्यापासून उत्पन्न होतें तें त्यांतच लीन होतें. म्हणून ब्रह्म हेंच या सृष्टीचें कारण होय! परमात्मा हा सर्व विकारजातांचा उपसंहार करणारा आहे. हें ब्रह्म पूर्ण आहे. अर्थात् पूर्णापासून उत्पन्न होतें तें पूर्ण व त्यांतून वजा केलें तरी बाकी पूर्णच राहातें. सर्व जीव या परब्रह्मानें अधिष्ठित आहेत. हें ब्रह्म कधीं बदलत नाहीं; तें मनापेक्षां वेगवान् आहे. तें न धांवतां सर्वांच्या पुढें जातें.

+टीप—हे आंकडे ब्रह्मसूत्र भाष्यांतील अध्याय, पाद व सूत्र यांचे आहेत असें समजावें.

तें दूरही आहे, जवळहि आहे. तें निष्कंप आहे व कंपहि पावतें. तें विश्वाच्या आंतहि आहे व बाहेरहि आहे. तें स्वयंभू आहे. श्रोत्राचें श्रोत्र, मनाचें मन, वाचेची वाचा, प्राणाचा प्राण असें तें आहे. याच्या आश्रयानें इंद्रियें काम करतात, पण तीं कांहीं केल्या त्याला जाणत नाहीत. ब्रह्म हें इंद्रियांना अविषय आहे. तथापि ब्रह्म जाणणें हाच पुरुषार्थ होय!

ब्रह्म हें जाणलेलें व न जाणलेलें या पलीकडचें आहे. ज्याच्या सत्तेनें सर्व जाणतां येतें, त्या मूळ सत्तेला कोण कसा जाणूं शकेल?

ब्रह्म जर अविषय आहे तर तें शास्त्राला विषय कसें होतें? याचें उत्तर असें कीं शास्त्र हें अशा अशा तऱ्हेचें ब्रह्म आहे, तें असें असें जाणा असें न सांगतां आत्म्याशीं अभिन्न असलेलें ब्रह्मतत्त्व ज्या अविद्येमुळें म्हणजे अज्ञानामुळें कळत नाहीं त्या अज्ञानाची निवृत्ति करण्याकरितां शास्त्र आहे. अज्ञान-निवृत्ति हेंच शास्त्राचें प्रयोजन होय!

ब्रह्म हें शास्त्रसिद्ध आहे. तें सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् असल्यामुळें वेदांनाहि अगोचर आहे. तर्काचा येथें प्रवेश नाहीं. ब्रह्मासारख्या अगम्य विषयांत तर्काचा प्रवेश नाहीं.

ब्रह्म हाच खरा जाणण्याचा विषय आहे. कारण तेंच या जगताचा आधार आहे. सर्व वेदांत वाक्यांचें पर्यवसान ब्रह्मज्ञान व्हावें एतदर्थ आहे.

ब्रह्म हें आकाशाप्रमाणें सर्वगत असल्यामुळें त्याचें जाणें येणें संभवत नाहीं. तें सर्वत्र असलें तरी अविद्यानाशाशिवाय त्याचें स्वरूप कळत नाहीं. तें इंद्रियग्राह्य नाहीं, मन व वाणी यापलीकडचें आहे. म्हणूनच तें सांगतां येत नाहीं, ऐकतां येत नाहीं व जाणतांहि येत नाहीं. ब्रह्म सांगणारा, ऐकणारा व जाणणारा हा एक आश्चर्यच समजला पाहिजे.

अविद्यानिवृत्तीचें साधन ब्रह्मज्ञान हेंच होय! त्या ज्ञानामुळें शोक व मृत्यु हे नष्ट होतात. या विज्ञानाशिवाय अमृतत्वाची म्हणजे मोक्षाची प्राप्ति नाहीं. सर्व आचार्यांच्या मतें ज्ञानानेंच मोक्ष होतो असा सिद्धांत. नित्य, शुद्ध, बुद्ध स्थितींत असणें हेंच मोक्षाचें स्वरूप होय! हा मोक्ष आनंद देतो, कर्मक्षय करतो व अभय देतो. मोक्ष हा कर्मसाध्य नाहीं. 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' असाच सिद्धांत आहे.

या ब्रह्मज्ञानामध्यें नियोग अथवा प्रेरणा नाहीं. द्वैत प्रपंचाचा प्रविलय केल्याशिवाय ब्रह्मज्ञान नाहीं. अविद्याध्यस्त हा जो कार्यप्रपंच ब्रह्मावर भासतो, त्याचा ज्ञानानें निरास करणें म्हणजेच प्रविलय होय.

ब्रह्म हें जगाचें निमित्त व उपादान कारण आहे. मनुष्यांच्या साधु कर्मानें ब्रह्म मोठें होत नाहीं व असाधु कर्मानें तें लहानहि होत नाहीं. सर्व कालीं व सर्व स्थलीं एका स्वरूपांत राहाणारें असें हें तत्त्व आहे. सत्य, ज्ञान, अनंत, आनंद, अजर अशा तऱ्हेच्या विविध विशेषणांवरून सर्व संसारधर्म ज्यापासून निवृत्त झालेले आहेत असें तें तत्त्व आहे. ब्रह्म हें परिणामी नित्य आहे.

परब्रह्माची सत्ता ही पारमार्थिक सत्ता होय. जगाची व्यावहारिक सत्ता, स्वप्न, रज्जु–सर्प, शुक्तिरजत यांची सत्ता प्रातिभासिक होय. परमार्थावस्थेमध्यें सर्व व्यवहारांचा अभाव असला तरी ब्रह्मदर्शन होईपर्यंत हा सर्व प्रपंच व्यवस्थित असतो. म्हणून व्यवहारावस्थेमध्यें ईश्वर, जीव, भोक्ता, भोग्य आणि इतर व्यवहार हे श्रुतीनेंच मान्य केले आहेत. म्हणून ब्रह्मज्ञान होईपर्यंत सर्व व्यवहार सत्य आहेत. कोणत्याहि स्थितींत जो अर्थ अगदीं एकरूपानें असतो तोच परमार्थतः खरा असतो, व तसेंच ब्रह्म आहे.

जगत् हें सत्य कां मिथ्या ?

(जगताच्या मूलतत्त्वाचें स्वरूप येथवर पाहिलें. आतां जें दृश्य जगत् आपणास दिसतें तें सत्य कीं मिथ्या हें पाहूं. श्रीशंकराचार्यांनीं जगत् हें मिथ्या म्हणजे खोटें, अभावरूप, भ्रमात्मक असें मानलेलें आहे असा समज आढळतो, परंतु तो चुकीचा आहे. आचार्यांनीं तीन सत्ता मानलेल्या आहेत. त्या व्यावहारिक, पारमार्थिक व प्रातिभासिक या होत ! भ्रमापेक्षां स्वप्न सत्य, स्वप्नापेक्षां जागृतींतील अनुभव सत्य, अर्थात् त्यापेक्षां ब्रह्मानुभव सत्य होय.

वंध्यापुत्र, खपुष्प, शशशृंग यांसारखें जगत् नाहीं. कारण हे पदार्थ जगांत मुळीं नाहींतच. खपुष्पादिपेक्षां शुक्तिरजत, रज्जुसर्प, मृगजल यांना सत्यांश अधिक आहे. कारण भ्रमालासुद्धां जें अधिष्ठान पाहिजे तें येथें

आहे. सर्पाला रज्जु, रजताला शुक्ति व पुरुषाला स्थाणु हे मूळ आहेतच; त्याशिवाय भ्रम शक्य नाहीं.

व्यावहारिक सत्तेंत पदार्थ प्रत्यक्ष अनुभवाला येतातच. त्या दृष्टीनें पंच-महाभूतें हीं सत्य असून ब्रह्माला त्या सत्यांचें सत्य असें म्हटलेलें आहे. शांकरभाष्यांत शशविषाण, रज्जुसर्प इत्यादि दृष्टांत निराळ्या धोरणानें मधून मधून पुष्कळ ठिकाणीं आलेले असले तरी त्यांचा अर्थ जगत् हें मिथ्या अर्थात् खोटें म्हणजे अभावरूप असा मुळींच नाहीं.

नामरूपात्मक जगताला वेदांत्यांनीं अनिर्वचनीय असें म्हटलें आहे. म्हणजे जग सत्हि आहे व असत्हि आहे. ब्रह्माच्या दृष्टीनें ब्रह्माहून अभिन्न म्हणून जग सत्च आहे. परंतु अधिष्ठान सोडून जर ब्रह्माचा विचार केला तर तें असत् आहे. अलंकार हे सुवर्णाशीं अनन्य म्हणून सत्च आहेत. पण सुवर्ण सोडल्यास म्हणजे आधार सोडल्यास ते असत्च ठरतात. अर्थात् पारमार्थिक दृष्ट्या जग हें ब्रह्मावर भासतें म्हणून सत् आहे. म्हणजे जगाला ब्रह्माहून स्वतंत्र अस्तित्व नाहीं.

व्यावहारिक दृष्ट्या हें विश्व खरें असलें तरी पारमार्थिक दृष्ट्या तो भ्रम आहे. पण भ्रमाच्या कल्पनेला तरी कांहीं आधार पाहिजेच. कल्पना सुद्धां आधाराशिवाय कशी निर्माण होईल ? रज्जूच्या ठिकाणीं सर्प भासणें व शिपीवर रुप्याचा भास होणें याला एक पाहणारा निराळा लागतो. परंतु भ्रमाचे हे सर्व दृष्टांत ब्रह्मविचार करतांना लागूं पडत नाहींत. कारण पाहणारा जर ब्रह्माहून अन्य नाहीं तर भ्रम कोणाला आणि कशाचा होणार? अर्थात् हा भ्रम मायेमुळें होतो. म्हणजे ब्रह्माच्या ठिकाणीं जगत् सुद्धां मायेनें भासतें, असें उत्तर वेदांती देतात. निर्गुण अशा परब्रह्मांत मुळारंभीं इंद्रियास दिसणारा हा जगताचा देखावा कां दिसूं लागला? किंवा परमेश्वरानें ही जड सृष्टी केव्हां व कां उत्पन्न केली, याचें उत्तर वेदांत्यांना नीटसें देतां येत नाहीं. म्हणून ते म्हणतात कीं हें जग अनादि आहे, जीव अनादि आहे व त्याचें कर्म अनादि आहे. तात्पर्य, जग हें अनादि असल्यामुळें व्यावहारिक सत्तेमध्यें तें खरें आहे, असें समजणें भाग आहे. जगन्मिथ्या याचा आचार्यकृत अर्थ हाच कीं, ज्याला ब्रह्मज्ञान झालें त्याला तें झाल्यानंतर

हें जगत् खोटें आहे आणि खोटें याचा अर्थहि हाच कीं परमसत्य माहीत झाल्यानंतर त्याच्या खालोखाल असलेलीं इतर सत्यें उपेक्षणीय म्हणजे असत्य होत. तात्पर्य ब्रह्म सत्य आहे म्हणून त्याच्या अपेक्षेनें जग मिथ्या आहे, इतकेंच.

शबल ब्रह्मापासून ही पंचभूतात्मक सृष्टि झाली असें वेदांती मानतात. शबल ब्रह्म म्हणजे मायायुक्त ब्रह्म. त्यालाच ईश्वर म्हणतात. प्रथम भूतसूक्ष्में उत्पन्न झालीं. त्यांच्या सत्त्वांशापासून पंचज्ञानेंद्रियें, राजस अंशापासून पंचप्राण, आणि तामस अंशापासून कर्मेंद्रियें झालीं. भूतसूक्ष्मांच्या मीलित सत्त्वांशापासून मन, बुद्धि, चित्त व अहंकार हीं उत्पन्न झालीं. त्याचप्रमाणें या भूतसूक्ष्मांचें विशिष्ट प्रमाणांत मीलन होऊन ही सर्व भूतभौतिक सृष्टि उत्पन्न झाली. अशी ही सृष्टीच्या उत्पत्तीची सांख्यांची प्रक्रिया वेदांत्यांनींहि मान्य केलेली आहे.)

प्रकरण ३ रें. : :

ईश्वर व त्याची अविद्या

(गेल्या प्रकरणांत विश्वाच्या मूल कारणासंबंधीं व जगतासंबंधीं वेदांती काय म्हणतात हें सांगितलें. प्रस्तुत प्रकरणांत वेदांत्यांना ईश्वर कां मानावा लागतो, त्याचें कार्य काय, प्रयोजन काय, वगैरे प्रश्नांचीं उत्तरें दिलीं आहेत.)

जगाचें मूळ केव्हांहि एकच असणार. तें कारण ज्या स्वरूपाचें असेल त्याच स्वरूपाचें त्याचें कार्यहि संभवणार. वस्तुतः कार्य व कारण यांमध्यें अनन्यत्व असतें. कार्य हें कारणांत लीन असतें. याला सत्कार्यवाद म्हणतात. ब्रह्मापासून जग उत्पन्न होतें, असें मानलें तर ब्रह्म विकारी ठरतें. (ती आपत्ति टाळण्याकरितां वेदांत्यांनीं उपाधिविशिष्ट व उपाधिविवर्जित अशीं ब्रह्माचीं दोन रूपें मानलीं आहेत.) श्रुतिवाक्यांपैकीं पुष्कळ वाक्यें ब्रह्माच्या निर्गुण व सगुण स्वरूपाची चिकित्सा करतात. शुद्ध ब्रह्माला

शबलत्व येतें. मायेचा स्वीकार म्हणजेच शबलत्व. जरी स्थावरजंगम इत्यादि सर्व पदार्थांमध्यें एकच परमेश्वर आहे, तथापि त्या त्या ठिकाणीं असणाऱ्या चित्तोपाधि–विशेष–तारतम्यामुळें कूटस्थ, नित्य, एकरूप जो आत्मा त्याच्या ठिकाणींहि तरतम भावानें उपाधीमुळें ऐश्वर्य व शक्तिविशेष हीं आढळतात. उपाधियुक्त ब्रह्म म्हणजे ईश्वर व निरुपाधिक ब्रह्म हेंच मूलत व आहे.

मृत्तिका व सुवर्ण हीं जशीं घट व अलंकार यांचीं उपादान कारणें आहेत, त्याचप्रमाणें सर्वज्ञ ईश्वर हा जगताचें उपादान कारण आहे. उत्पन्न झालेल्या जगताचें नियंत्रण हें ईश्वराकडेच आहे. तें तो सहज लीलेनें करतो. जगताचा लयहि ईश्वरांतच होतो. जारज, स्वेदज, अंडजादींच्या लयाचें कारण जसें पृथ्वी आहे, तसेंच ईश्वर हा जगाच्या लयालाहि कारणीभूत आहे.

परमेश्वरानें अंभःप्रभृति सृष्टि उत्पन्न केली व ती सर्व स्वतःशिवाय कशी राहील ? या विचारानें त्यानें तींत प्रवेश केला. परमेश्वरावांचून भूत, वर्तमान व भविष्य अशा सृष्टीचा कोणी नियंता नाहीं. अग्नि, वायु व सूर्य इत्यादींनीं युक्त असणारें हें जगत् त्या परमेश्वराच्या प्रशासनामुळेंच आपापल्या व्यापारामध्यें व्यापृत आहे.

नहि अन्यः परमेश्वरात् भूतभव्यस्य निरंऽकुशं ईशिता (१।३।२४)+

प्रशासन हें पारमेश्वर कर्म होय. द्यौ, पृथ्वी, अंतरिक्ष यांचें स्थान ईश्वर होय. गारुड्याला जशी स्वतःच्या मायेची बाधा (ती खोटी असल्यामुळें) होत नाहीं तशीच ईश्वरालाहि स्वतःच्या मायेपासून कांहीं बाधा होत नाहीं. कारण तो तिजपासून अगदीं अलिप्त असतो. ईश्वरपर अनेक श्रुतिवाक्यें असलीं तरी त्या सर्वांनीं एकच ईश्वर मानला आहे. उपाधि–भेदानें भेदनिर्देश असला तरी स्वरूपतः मूळींच भेद नाहीं.

यथा स्वयं प्रसारितया मायया मायावी त्रिष्वपि कालेषु न संस्पृश्यते, अवस्तुत्वात् । एवं परमात्मापि संसारमायया न संस्पृश्यते । २।१।९

न उपभोगगंधोऽपि शक्यः ईश्वरस्य कल्पयितुम् । १।२।८

सगुण व निर्गुण असे श्रुतीनें ब्रह्माचे दोन भेद कल्पिले आहेत. उपाधियुक्त सगुण ब्रह्म तो ईश्वर होय ! व उपाधि–विवर्जित जें तत्त्व तें निर्गुण

+ टीपः—आंकडे–अध्याय, पाद व सूत्र यांचे आहेत.

ब्रह्म होय ! सगुण ब्रह्म हें सवितृमंडलामध्यें आहे, तसेंच तें अन्यत्रहि आहे. या ईश्वराला विभु, सर्वज्ञ, प्राज्ञ, परमात्मा असेंहि म्हटलेलें आहे. प्राज्ञाच्या म्हणजे ईश्वराच्या ज्ञानानें शोकविच्छेद होतो असें तज्ज्ञ म्हणतात.

प्राज्ञविज्ञानाद्धि शोकविच्छेद: इति वेदान्तसिद्धान्त: ।१।४।६

परब्रह्म व अपरब्रह्म असे ब्रह्माचे दोन भेद आहेत. त्यांतील अपरब्रह्म हें मनोमय, प्राणमय म्हणजे उपाधियुक्त असें मानलेलें आहे. सूर्यमंडळ, सत्यलोक इत्यादि त्या अपरब्रह्माचीं स्थानें आहेत. त्यालाच हिरण्यगर्भ असेंहि म्हणतात. सर्वनियामक ईश्वर म्हणजेच हिरण्यगर्भ होय !

पशूपेक्षां मनुष्य ज्ञानी, मनुष्यापेक्षां विद्वान् ज्ञानी, त्याचेपेक्षां योगी ज्ञानी व सर्वांपेक्षां ईश्वर ज्ञानी असतो, हें काय सांगावयास पाहिजे ? त्याला सृष्टि–स्थिति–संहार–विषयक ज्ञान पूर्ण असतें म्हणूनच तो सर्वज्ञ होय. अविद्यावस्थेमध्यें **अभिमानानें कर्म करणाऱ्या जीवाचा** ईश्वर हा करविता आहे. कर्माध्यक्ष, सर्वभूताधिवास, साक्षी, चेता, असा जो ईश्वर त्याच्या अनुज्ञेनेंच जीवाचें बरेंवाईट होतें. ईश्वर हा पर्जन्याप्रमाणें आहे. ज्याप्रमाणें गुच्छ, गुल्म, व्रीहि, यवादि बीजांच्या ठिकाणीं जशी त्यांची असाधारण शक्ति आहे व त्या शक्तीला प्रगट करण्याचें सामर्थ्य जसें पर्जन्यामध्यें आहे, त्याचप्रमाणें जीव–प्रयत्नापेक्षेनेंच ईश्वर त्याला शुभाशुभ कर्मांचीं फळें देतो. संसार अनादि असल्यामुळें पूर्वप्रयत्न, पूर्वतर प्रयत्न व त्याच्या अपेक्षेनें फळ, असें हें रहाटगाडगें चालूं आहे.

या नामरूपात्मक जगताचें कारण शबल ब्रह्म म्हणजे ईश्वरच होय ! तो ईश्वर सर्वज्ञ असल्यामुळें त्याला जाणणारा सर्वज्ञ होतो. (आधुनिक शास्त्रज्ञहि जगताचें आदि कारण चित्जडात्मक असेंच कांहीं तरी असावें असें म्हणतात) शबल ब्रह्म म्हणजे चित् व जड यांचा संयोगच होय. चित् म्हणजे ब्रह्म व जड म्हणजे अविद्या यांपासूनच हा प्रपंच झाला आहे.

जगताचें कारण अचेतन नाहीं. तें चेतन आहे. आत्मा, परमात्मा, ब्रह्म अशीं जगताचीं निरनिराळीं कारणें सांगितलीं असलीं तरी त्या सर्वांचा अर्थ सर्वशक्तिमान, सर्वज्ञ असा ईश्वर हेंच जगत्कारण असा समजावा. अनेक वेदांतवाक्यामध्यें ब्रह्माच्या आधारानें जगत् उत्पन्न झालें असें म्हटलें

आहे. त्या ठिकाणीं सर्वज्ञ, सर्व-शक्ति, मायामय असें ब्रह्म म्हणजे ईश्वर व तोच जगत्कारण होय असें समजावें. शुद्ध ब्रह्माचा एक अंश शबल होतो व त्यापासून जगदुत्पत्ति होते, असें म्हटलें तरी चालेल. उपनिषदां-मध्यें सर्वज्ञ ईश्वर हाच जगताचें कारण होय असें म्हटलें आहे. सर्वज्ञ, सर्वेश्वर हा उत्पत्ति, स्थिति व संहाराला कारणीभूत आहे. सर्व विकारांचें मूळ' परमेश्वरच आहे. तो अखिल जगताचा कर्ता आहे. सर्वज्ञ, सर्वेश्वर, सर्वात्मा अशीं त्याला विशेषणें दिलेलीं आहेत. तो नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त असा आहे. जीवचैतन्य व ईशचैतन्य यांत उपाधीमुळें फार अंतर आहे; म्हणून जीव हा जगताचें कारण होऊं शकत नाहीं.

एकाच ईश्वरापासून हें सर्व जगत् उत्पन्न झालें तर त्यामध्यें एक भोक्ता व दुसरा भोग्य, एक अन्न व दुसरा खाणारा असें कां व्हावें ? सर्वत्र समताच कां दिसूं नये ? त्याचें उत्तर असें कीं एकाच पाण्याचे फेस, लाटा, बुडबुडे हे जसे विकार होतात व व्यवहार घडतो, तसेच जगांतीलहि व्यवहार होतात. एका कारणापासून उत्पन्न होणाऱ्या अनेक कार्यांत एकरूपता असतेच असें नाहीं.

जीव हा स्वतंत्र आहे व कर्ता आहे, तर तोच जगताचें कारण कां नसावा ? त्याचें कारण हें कीं जीव हा अल्पज्ञ, अल्पशक्तिमान आहे. व सर्व जगाचा कर्ता मी आहें असें जीव स्वप्नांतहि म्हणत नाहीं. जो ज्याचा कर्ता असतो, तो अभिमानानें त्याचें स्मरण करतो व तोच त्याचा उपसंहार करूं शकतो. तसें सामर्थ्य जीवाला नाहीं. म्हणून सर्वशक्तिमान ब्रह्म अर्थात् जीवचैतन्याहून निराळें असें जगत्कारण समजलें पाहिजे. परमात्म्या-हून अन्य असें जगताचें कोणतेंहि कारण नाहीं. प्रत्येक कार्यांत परमेश्वरच अधिष्ठाता आहे.

जगताचें कारण जर ब्रह्म तर त्या ब्रह्मालाहि दुसरें कारण नको काय ? त्यावर उत्तर असें कीं ब्रह्माला एक दुसरें कारण मानलें तर त्यालाहि एक तिसरें कारण मानावें लागेल म्हणजे (सत्राजिताचा बाप अठराजित व अठराजिताचा बाप एकोणीसजित अशी ही लांवड लागेल. व तशी लागल्यास अनवस्था प्रसंग येईल.) म्हणून अद्वितीय जें ब्रह्म त्याला कोणतेंही कारण

नाही. हें अद्वितीय ब्रह्म वाह्य साधनांचीं विलकुल अपेक्षा करितां जगत् निर्माण करितें. महाप्रभावशाली हे असे स्वसामर्थ्यानें बाह्यसाधननिरपेक्ष काय पाहिजे तें करूं शकतात, तसेंच ब्रह्माचेंहि आहे. ब्रह्म हें विचित्रशक्ति संपन्न आहे. म्हणून त्यापासून विचित्र शक्तियुक्त जगत् उत्पन्न होतें चेतन परमात्म्याला तो सर्वशक्तिमान असल्यामुळें हें जगत् लीलेनें उत्पन्न करतां येतें (सामान्य माणसापेक्षां समाजाला महत्कार्य करता येतें व त्याहिपेक्षां राजा मोठें कार्य करूं शकतो. ईश्वर हा राजाधिराज असल्यामुळें तो काय पाहिजे तें लीलेनें उत्पन्न करूं शकतो. जी गोष्ट इतरांना कठिण दिसते तीच तो लीलेनें करूं शकतो).

ईश्वर जर जगताचें कारण आहे असें सिद्ध झालें तर त्याच्या ठिकाणीं निर्दयता व विषमता हे दोष आहेत असें नाहीं कां म्हणतां येणार ? कारण त्यानें विषम सृष्टि उत्पन्न केली आहे. त्यांत सुखी, दुःखी, श्रीमंत, गरीब, सज्जन, दुर्जन असे लोक आहेतच ना ? त्यावर उत्तर असें कीं ईश्वरानें प्राण्यांचीं धर्माधर्म व पापपुण्यें इत्यादि कर्में लक्षांत घेऊन जगत् रचिलें आहे. त्यांत ईश्वराचा दोष नाहीं. ईश्वर हा पावसासारखा आहे. पावसाचें पाणी जमिनींत ज्या जातींचें बीज पेरलें असेल त्याला विकसित होण्याला मदत करतें. (पाणी हें कारलें, ऊस व मिरची याच्या बुडाशीं गेलें कीं त्या त्या ठिकाणीं जी बीजगत शक्ति असते तिचाच विकास करतें. ज्या बीजामध्यें जी शक्ति नाहीं, ती पाणी कधींहि उत्पन्न करूं शकत नाहीं.) तात्पर्य, ही सृष्टि सापेक्ष आहे. व ती अनादि असल्यामुळें ईश्वरावर कोणतेहि दोष येऊं शकत नाहींत. ईश्वर हा सम, साक्षी, प्रभु व निर्लेप असा आहे. एकदां ईश्वरापासून जगत् उत्पन्न झालें अशी प्रक्रिया स्वीकारली म्हणजे पुढील जगत्प्रक्रिया सांख्यांचे मताप्रमाणें सर्व व्यवस्थित जमते.

(वेदांत्यांना शुद्ध ब्रह्मापासून हें विविध प्रकारचें जगत् कसें उत्पन्न झालें याचें वरोवर उत्तर देतां आलें नाहीं, म्हणून किंवा अधिक सयुक्तिक पद्धतीनें पटावें म्हणून त्यांनीं शुद्ध ब्रह्माचा एक अंश शबल झाला आणि त्यापासून हें जगत् उत्पन्न झालें अशी मांडणी केली आहे. हें शबल ब्रह्म म्हणजेच ईश्वर व त्याची शक्ति होय. या शक्तीलाच अविद्या, माया,

अव्याकृत अशीं निरनिराळीं नांवें आहेत. या अविद्येमुळेंच जगाचा पसारा झालेला असून तिच्या नाशानेंच म्हणजे निवृत्तीनें मोक्षप्राप्ति होते असें वेदांती म्हणतात. आतां अविद्येविषयी वेदांती क.य म्हणतात तें पाहूं.)

अविद्या

संसाराला बीजभूत अशी अविद्या आहे. तिचा नाश ब्रह्मज्ञानानेंच होतो. ईश्वर, ईश्वर म्हणून जो म्हणतात त्याची सिद्धि अविद्येमुळेंच होते. चित् व जड यांचा जो अन्योन्य भ्रम तीच अविद्या होय! तिचा निरास केल्यानेंच वस्तुस्वरूपाचा निश्चय होतो. ज्याची अविद्या निवृत्त झाली आहे, तो पुन्हां जन्माला येऊं शकत नाहीं. द्वैतबुद्धि ही अविद्याजन्य असते. व एकत्व-ज्ञान हें अविद्यानिवर्तक असतें, आत्मज्ञान उत्पन्न झालें कीं अविद्या तत्काळ नष्ट होते. विद्येनें म्हणजे ज्ञानानें अविद्याकृत कार्यप्रपंचाचा विलय होतो. सत् ज्ञानानें मिथ्या ज्ञान दग्ध होतें. मिथ्याज्ञाननिमित्त जो बंध तो सम्यक् ज्ञानानेंच तुटतो. भ्रमामुळें जे अनर्थ होतात ते टाळण्यास भ्रमनिरास हेंच साधन आहे.

जीव व ईश्वर यांमध्यें समानधर्मत्व नाहीं, याचें कारण अविद्या ही होय! अविद्यानाश झाला कीं आत्मस्वरूप दिसतें त्याकरितां कोठें जावें किंवा यावें लागत नाहीं. जीव, ईश्वर हे भेद अविद्याकृतच होत. अविद्येमुळेंच जीव मी कर्ता, भोक्ता, मी सुखी, मी दुःखी अशी अभिमानाची भाषा बोलतो. अहंकार व ममत्व यांचें बीज अविद्याच होय! ईश्वरस्वरूपाच्या अज्ञानामुळें जीव बंधांत पडलेला आहे.

ब्रह्मवेत्ते म्हणतात कीं आपल्या गुणांनीं गुप्त असलेली ही परमेश्वराची शक्ति समस्त जगताला विधायक अशी आहे. ही शक्ति दैवी असून तिच्यामध्यें नामरूपें अव्याकृत असतात. म्हणून ही शक्ति नामरूपाची पूर्वावस्था होय! स्थूल जगत् हें या सूक्ष्म शक्तीमध्यें सूक्ष्मरूपानें विलीन असतें.

अव्यक्त शब्दानें हिचा उल्लेख केला जातो. परमेश्वराच्या आश्रयानें असणारी मायामयी महासुषुप्ति अशी ही अविद्या नांवाची बीजशक्ति आहे! या शक्तीमध्येंच ज्ञानरहित जीव अनंत कालपर्यंत झोंपी गेलेले असतात.

सर्वज्ञ ईश्वराची संसारविस्ताराला कारणीभूत असलेली सतासताहून विलक्षण व अनिर्वचनीय अशी ही आत्मभूत असलेली मायाशक्ति हीच प्रकृति म्हणजे जगताचें मूल-कारण होय !

आत्म्यावर अनात्म्याचा जो इतरेतराध्यास तीच अविद्या होय !

देहादि जो अनात्मा तो आत्मा आहे असें मानणें, व तोच मी आहें अशी आत्मबुद्धि असणें ही अविद्या होय !

अशेष संसाराचें बीज अविद्या होय ! अविद्याजन्य अनेक अनर्थांचें निवर्हण ज्ञानानें होतें. केवळ अविद्या वैषम्याचें कारण नाहीं. ती एकरूप आहे. जीवाच्या ज्या लोभ-मोहादि वासनायुक्त कर्माच्या इच्छा असतात, त्यांमुळें अविद्या वैषम्यकारी होते. **शोकमोहादींचें कारण, बंधाचें कारण, दुःखाचें कारण अविद्याच होय !**

ईश्वराच्या ठिकाणीं सर्वज्ञत्व, सर्वशक्तिमत्व इत्यादि जे गुण येतात, ते अविद्योपाधिंच्या अपेक्षेमुळेंच होत ! अविद्याकृत ज्या नामरूपोपाधी त्यांमुळेंच ईश्वर उत्पन्न होतो. कार्यप्रपंच अविद्याकृतच असतो. कर्तृत्व, संसारित्व, दुःखोपभोग इत्यादि सर्व अविद्याकृतच होत ! अविद्याकृत भेदाचें विद्येनें निरसन करून, जीव एकात्मतेला पोंचतो.

तत्त्व आणि अन्यत्व यांहून अनिर्वचनीय, संसारप्रपंचाला बीजभूत अशी ही सर्वज्ञ ईश्वराची मायाशक्ति आहे. अविद्याकल्पित रूपभेद असल्यामुळें ब्रह्म वास्तविक सावयव होऊं शकत नाहीं. ब्रह्म हें अविद्येमुळेंच सर्व व्यवहाराला पात्र होतें.

वास्तविक अविद्याकल्पितच जीवभेद, नामरूप, देहादि उपाधी, द्वैत, कर्तृत्व, भोक्तृत्व, जीवभाव इत्यादि आहेत.

जोंवर अविद्या निवृत्त होत नाहीं, तोंवर जीवत्वाची निवृत्ति होत नाही. अविद्येमुळें जीव मी व माझें म्हणून सर्व व्यवहार करतो. एकच परमेश्वर अविद्येमुळें अनेक रूपानें भासतो.

शरीरेंद्रिय-मनोबुद्धि-विषयवेदनायुक्त जो जीव त्यालाच भोग होतो. जसा स्वप्नद्रष्टा स्वप्नांतील मायेनें लिप्त होत नाहीं, किंवा गारुडी आपल्या मायेनें जसा स्वतः लिप्त होत नाहीं त्याप्रमाणें परमात्माहि स्वतःच्या मायेनें

लिप्त होत नाहीं. जीवभाव हा अव्यक्ताधीन आहे. आत्म्यालाच शरीराभिमानी समजून सशरीरी समजतात.

मुक्ताला पुनरुत्पत्ति प्रसंग नाहीं याचें कारण तो आपलें मिथ्या ज्ञान नष्ट करतो.

सम्यक् ज्ञानानेंच मिथ्या ज्ञानाचें स्वरूप नष्ट होतें. म्हणजे ब्रह्मात्मैक्य तत्त्वज्ञानानें मिथ्या ज्ञानाला अपाय होतो. देहादि अनात्म्याच्या ठिकाणीं जो आत्मत्वाचा निश्चय लोकांमध्यें दिसतो तो तत्त्वज्ञानाच्या अनवबोधामुळेंच होय.

देहादींच्या ठिकाणीं जो अहंप्रत्यय आहे तो मिथ्या का गौण असा प्रश्न आल्यास तो प्रत्यय गौण नसून मिथ्याच आहे असें म्हणावें लागतें. ज्या दोन वस्तूंत प्रसिद्ध वस्तुभेद असतो तेथेंच गौण प्रत्यय होतो. उदा. पुरुषाच्या ठिकाणीं सिंह शब्द गौण अर्थानें वापरला जातो. परंतु भलत्या ठिकाणीं जर सिंह शब्दाची योजना केली तर तो भ्रम समजावा. मंद अंधकारामध्यें हा खांब आहे असें न समजल्यामुळें 'तो पुरुष आहे' असा जसा भ्रम होतो, तसाच अज्ञानानें देहादि संघाताच्या ठिकाणीं म्हणजे अनात्म्याच्या ठिकाणीं होणारा आत्मप्रत्यय गौण नसून मिथ्या समजला पाहिजे.

मिथ्या आहे अनुभव ज्याचा तोच भ्रम व त्यालाच अध्यास म्हणतात. जीवाचा मिथ्याभिमान प्रत्यक्ष आहे. व तोच कर्मसंबंधाला कारणीभूत होतो. स्वदेहाचे ठिकाणीं दाह अगर छेद झाल्यास तन्निमित्तक जें दुःख होतें तें देहाभिमानाच्या भ्रांतिमुळेंच होय! त्याचप्रमाणें पुत्रमित्रादिकांना होणाऱ्या दुःखानें जो दुःखानुभव येतो तो पुत्रमित्रादिकांचे ठिकाणीं असलेल्या मिथ्या अभिमानामुळेंच होय! म्हणून मिथ्याभिमानजन्य जो भ्रम त्यामुळेंच हा दुःखानुभव येतो हें निःसंशय होय! जीवकृत घटाकाश मठाकाशादि भेदबुद्धि ही जशी मिथ्या आहे तशीच अविवेकानें केलेली ईश्वर आणि संसारी जीव एतद्विषयक बुद्धीहि मिथ्याच होय! कर्तृत्वभोक्तृत्व हीं सुद्धां अविवेकजन्य होत. परस्परांचें ज्ञान न झाल्यामुळें एकमेकांचा एकमेकांवर जो भ्रम होतो त्यालाच अध्यास म्हणतात.

शोकादींचें कारण अविद्या होय! अविद्येची निवृत्ति ज्ञानानें होते..

अविद्यानिवृत्ति हें ब्रह्मज्ञानाचें फल असल्यामुळें तिकडे जिवाची प्रवृत्ति होणें असंभाव्य नाहीं. अनात्म्याच्या ठिकाणीं जी आत्मबुद्धी दिसते तो भ्रमानेंच होय.

अविद्या ही एक बीजशक्ति म्हणून अवश्य मानली पाहिजे. ती शक्ति प्रभावी आहे. तिच्याशिवाय ईश्वराचें अस्तित्व सिद्ध होऊं शकत नाहीं. शक्तिरहित परमेश्वराला प्रवृत्त होण्याला कोणतेंच कारण नसल्यामुळें ही शक्ति आहे म्हणूनच ईश्वराचें जगत्कर्तृत्व सिद्ध होतें. ती अविद्या कोणाला होते असें जर तूं विचारशील तर जो तूं विचारणारा त्यालाच ती होते, म्हणजे त्याच्या ठिकाणीं ती असते. विचारणारा अज्ञानी आहे म्हणूनच तो विचारतो. जर तो असें म्हणेल कीं "मी ईश्वर आहें" आणि जर खरोखरी त्याला असें ज्ञान झालें तर अविद्या संपली; अविद्या ही त्याच्याकरितां नाहींच.

जगदुत्पत्तीच्या पूर्वीं ईश्वर असतो. पण जगदुत्पत्तीपूर्वीं असें कोणतें कर्म होतें कीं जें ईश्वराच्या ज्ञानाचा विषय झालें ? त्याला उत्तर हेंच कीं सतासताहून विलक्षण आणि अनिर्वचनीय अशीं जीं अव्याकृत नामरूपें होतीं तींच कर्में होत !

देहाचे ठिकाणीं प्रेम, त्याला सुख देण्याविषयीं आस्था, त्याला कोणी त्रास दिल्यास त्यासंबंधींचा द्वेष व त्याचा उच्छेद करणाऱ्याबद्दल भय व मोह इत्यादि अनंत, भेद व अनर्थांचा समूह असा हा संसार सर्वांना प्रत्यक्ष आहेच ! (हा संसार एकदम उपस्थित झाला काय ? तो कां व कसा झाला ? त्याचा व जीवकृत कर्माचा कांहीं संबंध आहे काय ? याचा विचार पुढील प्रकरणांत करितों.)

प्रकरण ४ थें. : :

संसाराचें अनादित्व व कर्म

वेदांत्यांनीं संसार हा अनादि मानलेला आहे. हें जगत् जर आदिमान मानलें तर अनवस्था प्रसंग येईल असें सर्व वेदांती म्हणतात. वृक्ष आधीं कां बीज आधीं हा उलगडा जसा कधींच होत नाहीं; कारण बीजाशिवाय वृक्ष नाहीं, वृक्षाशिवाय बीज नाहीं. त्याचप्रमाणें कर्माशिवाय सृष्टी नाहीं व सृष्टीशिवाय कर्म नाहीं. संसार जर अकस्मात् म्हणजे एकाएकीं उत्पन्न झाला तर ज्यांना मुक्त असें समजतात त्यांना पुन्हा जन्म घ्यावा लागेल ! सृष्टींत जी विषमता दिसते ती पूर्वकर्माच्या अपेक्षेनेंच होय. एकरूप असणारी केवल अविद्या ही वैषम्याचें कारण होऊं शकत नाहीं. प्राण्यांचे विकार व वासना यांनीं युक्त जीं कर्मे त्यांमुळेंच जगांत विषमता उत्पन्न होते.

शरीराशिवाय कर्म नाहीं, कर्माशिवाय शरीर नाहीं. मग पहिलें कर्म कोठून आलें, याचें उत्तर कर्म अनादि आहे हेंच होय!

" धाता यथा पूर्वमकल्पयत । नान्तोनचादिः ॥ "

इत्यादि श्रुतिस्मृति वाक्यें हि संसाराचें अनादित्वच सांगतात. तो अनादि आहे म्हणजे त्याचा आरंभ कळत नाहीं, असें म्हणूनच उपपत्ति लागते. पूर्वकर्म सापेक्ष उत्तरोत्तर जी सृष्टी निर्माण होते तीच पुढेंहि चालूं असते.

जगत्रूपानें प्रगट होणारी शक्ति एकच आहे. जगताचा लय झाला तरी त्या शक्तीचा लय होत नाहीं. शक्ति अवशिष्ट असते म्हणूनच उत्पत्ति संभवते. अनेक शक्ती मानल्या तर अनवस्था प्रसंग येईल.

जें द्रव्य विशेष अवस्थेला प्राप्त होतें तें कार्य होय. कार्य हें उत्पत्तीच्या पूर्वीं नसतें पण त्याचा अभाव असतो; असें नसून तें बीजरूपानें असतें. उत्पत्तीपूर्वीं जर कार्याचा अत्यंत अभाव असेल तर तें कसें उत्पन्न होणार? कार्य हें कारणांत लीन असतें म्हणूनच त्याची उत्पत्ति होते. उत्पत्ति होणें

म्हणजे क्रिया होणें होय ! व क्रिया म्हटली कीं तिला कर्ता पाहिजे कर्त्याशिवाय क्रिया होत नाहीं. कर्ता, क्रिया व कार्य अशी ही परंपरा आहे.

चेतन व शुद्ध असें जें ब्रह्म त्यापासून अचेतन व जड असें जगत् कसें उत्पन्न होईल ? कार्य हें कारणाशीं अनन्य असतें, आणि कार्यचे गुण कारणांत असतात, असें जर आहे तर ब्रह्मामध्यें जगत् रूपानें भासण्याचा कांहीं धर्म आहे असें सिद्ध होऊं शकेल ! पण शुद्ध ब्रह्माचे ठिकाणीं कोणताच धर्म नसल्यामुळें जगदुत्पत्तीला कारणीभूत असें शवल ब्रह्म मानणें सयुक्तिक दिसतें अर्थात् त्या कारणांत जग हें लीन असतें.

कार्य व कारण यांमध्यें अनन्यत्व असतें. मृत्तिकाघट, तंतुपट, सुवर्ण व अलंकार यांमध्यें अनन्यत्व आहे. तसेंच शवल ब्रह्म व जगत् यांतही अनन्यत्व आहे. घटरूपानें प्रगट होण्याची शक्ति मृत्तिकेंत आहे. अलंकाररूपानें प्रगट होण्याची शक्ति सुवर्णांत आहे. तशीच जगत् रूपानें प्रगट होण्याची शक्ति मायायुक्त व कर्मयुक्त अशा ब्रह्मामध्यें असल्यामुळें जगदुत्पत्ति संभवते. जें ज्या ठिकाणीं स्वरूपतः नसतें तें तेथून उत्पन्न होत नाहीं. उदाहरणार्थ वाळूपासून तेल उत्पन्न होत नाहीं. सत्कार्यवादानें कार्यकारणांची व्यवस्था लागते. दुधामध्यें दह्याचे परिमाणु असतात म्हणूनच ते दधिरूपानें प्रगट होतात. पाण्यापासून दही कधीं होत नाहीं. याचें कारण हेंच कीं कारणाहून अन्य असें कार्य शेकडों वर्षें झालीं तरी उत्पन्न होत नाहीं. अभावापासून भावाची उत्पत्ति नाहीं. मूल द्रव्य विशेष अवस्थेला गेलें कीं त्याला कार्य म्हणतात. ब्रह्मानेंच स्वतःला जगद्रूपानें बिभागून घेतलें, तें त्यांत प्रविष्ट झालें, इत्यादि वाक्यें आणि गीतेंतील

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥अ.१०-४२॥

एका अंशमात्रानें या अखिल जगाचें धारण करून मी राहिलों आहे म्हणजे एका शवलांशापासून जगदुत्पत्ति झाली हाच सिद्धांत खरा ठरतो.

कार्य व कारण यांत अनन्यत्व असतें. कार्य हें कारणस्वरूपच असतें. कारणामध्यें फेरबदल झाला कीं कार्याचा भास होतो. पण तें कार्य कारण-

रूपच असतें. सर्व अवयव दुमडून बसलेला देवदत्त व हातपाय पसरून प्रशस्त बसलेला देवदत्त हे एकच होत. दुधामध्यें दह्याचे परमाणु असतात म्हणूनच ते कार्यरूपानें म्हणजे दधिरूपानें परिणत होतात. म्हणजे ज्यांत जें नाहीं तें त्यापासून कधीं उत्पन्न होत नाहीं. अभावापासून भाव उत्पन्न होत नाहीं. एकच द्रव्य भिन्नभिन्न विशेष अवस्थांना अगर एकाच अवस्थेलाहि जाऊं शकतें. भिन्नभिन्न अवस्थांचीं निरनिराळीं कारणें नसून एकाच कारणाची ती परिणती होय !

सत्कार्यवाददृष्ट्या शुद्ध, नित्य व सत् ब्रह्मापासून अशुद्ध, अनित्य व असत् असें जग कसें उत्पन्न झालें अशी शंका येते व त्या शंकेच्या निराकरणाकरितांच शुद्ध ब्रह्मापेक्षां निराळें अर्थात् शवल ब्रह्म म्हणजे मायाविशिष्ट ईश्वर हेंच जगताचें कारण असें वेदांत्यांनीं मानलेलें आहे. शुद्ध ब्रह्मापासून जगताची उत्पत्ति शक्य नाहीं. जगदुत्पत्तीला शवल ब्रह्म हेंच कारण मानलें पाहिजे. चेतन, एकमेवाद्वितीय असें ब्रह्म हेंच इतर बाह्य साधनांची अपेक्षा न करितां जगत् रूपानें परिणत होत असतें. अर्थात् परिणत होणारें शुद्ध ब्रह्म नव्हे. त्यानें आपणा स्वतःला जगत्रूपानें परिणत केलें अशी श्रुति आहे. त्यावरूनहि हाच सिद्धांत निघतो.

जगांत कोणतेंहि व कांहींहि अकस्मात् उत्पन्न होत नाहीं. तसें झाल्यास तो अनवस्था प्रसंगच होईल. कोणत्याहि कार्योत्पत्तीला निमित्त व उपादान कारणें लागतात. जें जेथून उत्पन्न होतें, व जें ज्यांत लीन होतें तेंच त्याचें उपादान कारण होय ! निमित्तकारणें अनेक असूं शकतात. जगत् हें ब्रह्मापासूनच उत्पन्न होतें व शेवटीं ब्रह्मांतच लीन होतें, म्हणून त्याचें उपादान कारण ब्रह्मच होय ! कारण हें कार्यात्मक असत नाहीं. तर कार्यच कारणात्मक असतें. कारणाव्यतिरिक्त कार्य असत नाहीं. कारणाधीन असणें हेंच कार्याचें स्वरूप होय. जगांत सामान्यापासूनच विशेष उत्पन्न झालेलें दिसतें पण विशेषापासून सामान्य होत नाहीं.

जगताचें कारण एकमेवाद्वितीय ब्रह्मच आहे. असें ठरण्यास अनेक कारणें आहेत. एक जाणलें असतां सर्व जाणलें जातें. एकाचें ज्ञान होतांच सर्वांचें ज्ञान होऊं शकेल, असें जर जगांत कांहीं असूं शकेल तर तें ब्रह्मच

होय ! (शुद्ध तर्कदृष्टया विचार केला तरी आधुनिक पंडितहि जगताचें कारण चित्जडात्मक असें एकच असावें, असें म्हणतात.) घटाकाश, मठाकाशादि जशीं महाकाशांत लीन होतात, किंवा अलंकार सुवर्णरूप असत त, त्याप्रमाणें भोक्तृभोग्यरूप जो प्रपंच तोहि ब्रह्माव्यतिरिक्त असूं शकत नाहीं.

ब्रह्मानेंच विचार करून हें जगत् उत्पन्न केलें. म्हणजे चेतन ईश्वरानें तें उत्पन्न केलें असें समजावें.

कर्म

कर्म हेंच सर्व कांहीं करणारें आहे असा सिद्धांत आहे. प्राणिमात्रांचीं जीं कर्में व अकर्में त्यांपासून उत्पन्न होणारा जो धर्म आणि अधर्म तत्सापेक्षच उत्तरोत्तर सृष्टि निर्माण होत असते. सृष्टि ही अनादि असली तरी कर्महि प्रवाहरूपानें अनादि आहे. वैदिक, स्मार्त, लौकिक असें कोणतेंहि कर्म केलें तथापि त्या कर्माचे जे अदृश्य परिणाम असतात व जे मानवबुद्धीस अगोचर असतात तेच अदृष्ट किंवा अपूर्व होय ! कर्मापासून कांहीं अपूर्व उत्पन्न होतें. म्हणजे पुण्य किंवा न कळणारा परिपाक तयार होतो. कर्माचीं जीं प्रत्यक्ष फलें दिसतात त्यापेक्षां त्याचीं न दिसणारीं अशीं कांहीं फलें असूं शकतात.

कांहींचें म्हणणें असें कीं जीं कर्में केलीं जातात त्यांचीं फळें भोगून जो अभुक्त असा फलावशेष असतो तोच अनुशय होय ! भांड्यांतील सर्व तेल ओतून बाहेर काढलें तरी जसा थोडा अंश त्याला चिकटलेलाच असतो तसाच जो कर्माचा अंश शिल्लक राहतो; तोच अंश विशिष्ट देश, काल व जातीच्या ठिकाणीं मनुष्याला जन्म घ्यावयास लावतो. या जगांतील आनंद भोगल्यावर इतर लोकांत जाऊन आनंदाचा अवशेष भोगावा लागत असतो. लौकिक कर्मामध्यें मी देहवान् आहें या अहंकारानेंच कर्म होतें. देहाव्यतिरिक्त जें आत्मविज्ञान तें लौकिक कर्मामध्यें असत नाहीं. सर्वांची प्रवृत्ति दृष्टार्थाकडेच असते. कर्में अहंकारानें केलीं कीं त्यांचें फल या देहीं

अगर देहांतरांत भोगावें लागतें. पण देहाव्यतिरिक्त केवळ आत्मभावानें जर कर्म केलें, तर तें कर्म अहंकार नसल्यामुळें कर्त्याला बंधक होत नाहीं.

एक देह सोडून दुसरा देह घेण्याचें निमित्त कारण कर्मच होय! भूत-सूक्ष्में म्हणजे पंचमहाभूतांचे सूक्ष्म अंशही एक कारण आहेच ! परंतु तें उपादान कारण असून निमित्त कारण कर्मच होय ! मिथ्या ज्ञानाच्या अभिमानानें जें कर्म केलें जातें तेंच देहपातानंतर निराळ्या कर्मभोगाला प्रारंभ करतें. विहित कर्मे निष्ठेनें जे जे करीत असतात ते ते या जगांत कर्म-फलाचा उपभोग घेऊन शेष जीं कर्मे राहातात, त्यांमुळें देश, जाति, कुल, रूप, आयुष्य, श्रुत, वृत्त, वित्त वगैरे सर्व प्राप्त करून घेतात. मनुष्याला बऱ्यावाईट कर्मांचीं फळें भोगावीं लागतात. बरेवाईट हे शब्द सापेक्ष आहेत. तथापि कर्त्याला त्या कर्मांचा अभिमान असतो म्हणून दोन्ही फळांचा त्याला उपभोग घ्यावा लागतो. कदाचित् दुष्कृत हें सुकृताच्या जोरामुळें जरी कांहीं काल मागें पडलें तथापि केव्हां तरी तें (सुकृतांश कमी होतांच) पुढें येतें व कर्मफल भोगावयास लावतें. कांहीं कर्मफलांना तात्पुरता प्रतिबंध करतां आला तथापि देशकालनिमित्ताच्या अपेक्षेनें तीं कर्मेहि विपाकाला उपस्थित होतात. शास्त्रसुद्धां अमुक कर्मांचें अमुकच निश्चित फल असें सांगूं शकत नाहीं. कांहीं कर्मे वीर्यविशेषामुळें कल्पनेबाहेरहि फल देऊं शकतात. इष्ट फल, अनिष्ट फल व मिश्र फल अशीं त्रिविध फलें कर्मापासून प्राप्त होत असतात. कर्माचें फल हें तत्काल मिळतें असें नाहीं. कर्म-परिपाकावद्दल नियम नाहीं.

(कांहीं पिकें तीन महिन्यांनीं तर कांहीं सहा, तर कांहीं नऊ व बारा महिन्यांनींही येतात. कर्मबीजांचेंहि तसेंच आहे.) उपासना या कर्माचें फल हें चित्तैकाग्र्य अगर समाधान या रूपानें लौकर अनुभवाला येतें. कांहीं कर्मांचीं फलें अनित्य असलीं तरी तीं या लोकांत अगर याहून अन्य लोकांत भोगावीं लागतातच.

कर्मफलदाता कोण ?

(हें अखिल जगत् म्हणजे कर्म होय ! कर्म व कर्माचा परिपाक यांशिवाय जगांत कांहीं नाहीं. कर्ममय अशा या जगांत मनुष्य रोज

स्थल प्रत
सं..... नं.....
ता.....

अनेक कर्में करतो. इतकी कीं, रोजच्या कर्मांचें मनुष्याला स्मरणही होणार नाहीं. मनुष्याला जसें कर्मांचें स्मरण अशक्य आहे, त्याप्रमाणेंच त्याला मी हें अमुक एक कर्म केलें व त्याचें हें अमुक फल आहे असें समजणेंहि कठिणच आहे. अहंकारयुक्त सर्व कर्में फल देतात. तें फल कर्त्यालाच भोगावें लागतें यांत संशय नाहीं. कर्ता अनेक कर्में करून व त्यांचीं फळें भोगण्यापूर्वी जर नष्ट झाला तर त्या कर्मांचीं फळें कोणी भोगावीं ? अमुक कर्म अमुक कर्त्याचें आहे व अमुक कर्माचें अमुक फल आहे हें कोणी व कसें ठरवावें हा मोठा विचाराचा प्रश्न आहे. मानवी बुद्धीला अद्याप हें कोडें उलगडलें नाहीं.) म्हणून जगन्नियामक, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वाध्यक्ष, सृष्टिस्थितिसंहार करणारा, देश व काल यांचा नियामक असा जो परमेश्वर तोच कर्म करणाऱ्या जीवांना कर्मानुरूप फळें देतो व त्यांना तीं भोगावीं लागतात, हा सिद्धांत मानावा लागतो.

कर्माचें फल हें कर्माच्या अपेक्षेप्रमाणें (सापेक्ष) किंवा अपूर्वापेक्षे-प्रमाणें ईश्वरच देत असतो. ईश्वर हाच जगताचा आधार व अधिष्ठान आहे. तोच आपल्या कूटस्थ, तटस्थ व उदासीन सत्तेनें सर्वांना त्यांच्या त्यांच्या संस्कारांप्रमाणें प्रेरणा करतो व तदनुरूप कर्में घडून येत असतात. अर्थात् जो प्रेरक तोच फलदाता होय ! प्राणिमात्रांना आपल्या कर्मानुरूप फलें भोगतां यावीं म्हणून ईश्वर या विचित्र सृष्टीला उत्पन्न करीत असतो.

ईश्वर हा उगाच विचित्र म्हणजे वैषम्ययुक्त सृष्टि निर्माण करीत नाहीं. तो ती जर तशी करील तर मोठा अन्याय होईल. ईश्वराचें सर्व करणें सापेक्ष (म्हणजे प्राणिमात्रांच्या कर्माप्रमाणेंच) असतें. तो सर्वाध्यक्ष व सर्वशक्तिमान् असल्यामुळें कर्मसापेक्ष बरोबर फल देतो.

कर्माचें फल कोण देतो, याबद्दल ब्रह्मसूत्र अध्याय ३ पाद २ मध्यें सूत्रें ३८ ते ४१ मध्यें चर्चा आहे. त्यांत धर्म, अपूर्व वगैरे फलदात्री न मानतां ईश्वर हाच कर्मफलदाता आहे असें बादरायणाचार्यांनीं मानलेलें आहे.

सदाचार व असदाचार असे दोन कर्मविभाग होतात. तेहि सापेक्ष

आहेत. श्रौतस्मार्त कर्मेहि देशकालसापेक्षच आहेत. अर्थात् त्या त्या कालांत जो जो सदाचार (व त्याविरुद्ध असलेला जो दुराचार) त्याप्रमाणें फल उत्पन्न होतें. ज्यांचें चारित्र्य, आचार व शील हीं चांगलीं आहेत (म्हणजे जे समाजोपयुक्त व्यवसाय करून पोट भरतात, आपला भार दुसऱ्यावर घालीत नाहींत आणि जे पवित्र, शुद्ध, निर्मलपणें परस्त्री व परद्रव्य-विषयक शुचिता राखून जगांत वावरतात) त्यांना सद्गति मिळते.

सुकृत व दुष्कृत हीं सापेक्ष असतात. त्यांची सार्वकालिक एक व्याख्या ठरवितां येत नाहीं. मनुष्य (आपल्या मनांत घोळवून घोळवून) जें करूं लागतो ती क्रिया. ती नेहमी पुरुषाधीन असते. पण वस्तु मात्र पुरुष-निरपेक्ष असते. वस्तु व क्रिया यांतील पहिली स्वतंत्र व दुसरी परतंत्र आहे. तसेंच पहिली निरपेक्ष व दुसरी सापेक्ष आहे. क्रिया ही ज्याच्या आश्रयानें होते त्यालाच ती फलरूपानें भोगावी लागते. कायिक, वाचिक, मानसिक अशीं कर्मे आहेत. तीं कर्मे कशीं करावींत हें समजण्याकरितां व अभ्युदय व्हावा म्हणून धर्म समजून घ्यावा असें शास्त्र सांगतें.

मनुष्यापासून अगदीं ब्रह्मदेवाच्या देहापर्यंत जें सुख-तारतम्य असतें तें धर्माधर्मांचेंच फल होय! त्याचप्रमाणें मनुष्यलोकाच्या खालचा जो नरकादि लोक आहे त्याचीहि संगति लागते. धर्म हा आचरण्याकरितां (तसाच अधर्महि टाकण्याकरितां) जाणावयाचा असतो. उच्च उच्च स्थितीला प्राप्त होणें हें धर्माचें फल व नीच स्थितीला जाणें हें अधर्माचें फल होय! दुःख प्राप्त न व्हावें म्हणूनच अधर्माचरण करूं नये! मीमांसकांनीं अधर्माचरण घडल्यास जें प्रायश्चित्त सांगितलें आहे तें चित्तशुद्धीकरितां आहे. त्यामुळें अशेष दुरितांचा जरी क्षय होत नसला तथापि तें एक निमित्त आहे (व त्यामुळें मनाला थोडें बरें वाटतें असा सिद्धांत आहे. प्रायश्चित्त म्हणजे शिक्षा. व्यवहारांतहि अपराधाबद्दल शिक्षा भोगली कीं अपराधाचा दोष नष्ट होतो.)

शास्त्रांत सांगितलेलीं (पण आज अशुद्ध व विपरित वाटणारीं) कर्मे हीं धर्म्य का अधर्म्य असा एक प्रश्न आहे परंतु मीमांसक म्हणतात कीं तीं वेदांनीं सांगितलेलीं आहेत म्हणून धर्म्य आहेत. (परंतु आजच्या जगाला हें अमान्य आहे.) प्रत्येकानें आपापलीं नित्य नैमित्तिक कर्मे निष्कामतेनें करावीं.

चित्तशुद्धि हें त्याचें फल होय! नित्य नैमित्तिक कर्में केल्यानें विशेष फल मिळतें असें नाहीं. पण तीं न केल्यानें जो प्रत्यवाय घडतो त्याला प्रतिबंध होतो. पूर्वजन्मार्जित कर्माचा नित्यनैमित्तकांशीं विरोध नाहीं. तीन आश्रमांमध्यें जें जें करावयास सांगितलें आहे, तें न केल्यानें पाप लागतें. पण संन्याशाला विधीनें तो त्याग करतो म्हणून कांहींहि दोष लागत नाहीं, ब्रह्मवेत्त्यानें शमदमादि साधनांतच निमग्न असावयाचें असतें. गृहस्थाश्रमांतील पंचयज्ञादि कर्में आणि इतर कर्में हीं सर्व लोकयात्रा व चित्तशुद्धि यांकरितां आहेत.

आपत्कालामध्यें सर्वान्न–भक्षणाला अनुमति आहे. उषस्त चाक्रायणानें सारवानाजवळील हुलगे खाल्ल्याची गोष्ट प्रसिद्धच आहे. जीव जगण्यःकरितां कुणाचेंहि व कांहींहि खाल्लें तरी दोष नाहीं. (याप्रमाणें वेदांत्यांनीं ब्रह्म, जगत्, ईश्वर, अविद्या, संसार व कर्में यांचा विचार केला आहे.)

प्रकरण ५ वें. :

आत्मविचार व जीवस्वरूप

गेल्या तीन प्रकरणांत ब्रह्म व जगत्, ईश्वर व अविद्या, संसार व कर्म यांचा विचार केला, आतां आत्मा व जीव यांचें स्वरूप पाहूं.

(जगांत ब्रह्म आहे कीं नाहीं अशी शंका कुणालाहि घेतां येईल, पण आपण स्वतः आहों कीं नाहीं याची शंका मात्र घेतां येणें शक्य नाहीं. कारण मी नाहीं असा बोध कोणालाहि होत नाहीं. उलट, मी सदैव आहें हीच जाणीव प्रत्येक जीवाला असते. चार्वाकादिकांचें म्हणणें असें कीं शरीर, मन, बुद्धि, यांच्या मिश्रणामुळें चेतन आत्मा निर्माण होतो. अर्थात् आत्मा हा शरिराचा गुण आहे.) परंतु वेदांती म्हणतात कीं, आत्म्याचे धर्म व देहाचे धर्म हे भिन्न भिन्न आहेत. रूप, आकार, वजन, लांबीरुंदी, हे देहधर्म आहेत. मृतावस्थेमध्यें सुद्धां हे धर्म असतात. पण ाण, चैतन्य, स्मृति हे

आत्म्याचे धर्म देह असूनहि मृतावस्थेमध्यें आढळत नाहींत. देह असून जे धर्म उपलब्ध होत नाहींत, ते आत्म्याचे धर्म होत. अर्थात् शरिराहून आत्मा भिन्न असला पाहिजे.

पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या भूतांव्यतिरिक्त चैतन्य म्हणून कांहीं आहे कीं नाहीं ? जर असेल तर तें भूतांचा धर्म होऊं शकत नाहीं. अग्नीची उष्णता ही अग्नीला जाळीत नाहीं. शिकलेला चांगला नट स्वतःच्या खांद्यावर बसत नाहीं; त्याप्रमाणेंच चैतन्य हा जर पंचभूतांचा धर्म असेल तर तें त्या पदार्थांना आपले विषय करूं शकणार नाहीं. घटाला व पटाला आपलें रूप दृष्टीस पडत नाहीं. परंतु चैतन्य मात्र सर्व पदार्थांना विषय करतें. त्यावरून देहाव्यतिरिक्त आत्मा असला पाहिजे.

आत्म्याच्या उपलब्धीला देहाची जरूरच आहे असें नाहीं. कारण स्वप्नामध्यें हा देह स्वस्थ पडला असतांनासुद्धां आत्म्याचें अस्तित्व अनुभवाला येतें. तेथें सूक्ष्म देहानें आत्मा पाहिजे तिकडे संचार करतो. यावरून देहाव्यतिरिक्त आत्मवस्तु आहे असें मानणें भाग आहे. शिवाय भूत, भविष्य व वर्तमान या तीनहि वस्तु जरी ज्ञेय रूपानें भिन्न भिन्न असल्या तरी ज्ञाता हा अभिन्नच असतो. तीन्ही अवस्थेंत त्याचें स्वरूप कायमच आहे. म्हणून देहाचा नाश झाला तरी आत्म्याचा नाश होत नाहीं असें म्हणावें लागतें.

सुषुप्तीमध्यें जीव परब्रह्माशीं एकरस होतो पण तो अनुभव टिकाऊ नसतो. सुषुप्तीमध्यें अविद्या बीजरूपानें अवशिष्ट असल्यामुळें ती जीवाला जागी करते व पुन्हां संसारांत पाडते. सुषुप्तींत बीजरूपानें असलेले संस्कार तेच जागृतीमध्यें अभिव्यक्त होतात. बुद्धीचा संबंधहि सुषुप्तीमध्यें बीज-रूपानेंच असतो. जें सूक्ष्मरूपानेंच असतें तेंच अभिव्यक्त होतें. कोणत्याहि वस्तूची उत्पत्ति एकाएकी संभवत नाहीं. गाढ निद्रेप्रमाणेंच मरणसमयीं अविद्या बीजरूपानें राहाते, म्हणूनच ती पुनर्जन्माला कारणीभूत होते.

केवळ आत्मा हा कर्ता नाहीं, बुद्धिसंयोगामुळें तो कर्ता होतो. केवळ बुद्धि ही जड असल्यामुळें ती कर्ती होत नाहीं. आत्मा व बुद्धि मिळून कर्तृत्व संभवतें. हें कर्तृत्व जीवाला अविद्येमुळें किंवा मायेमुळेंच आहे.

जगांत प्रत्येक मनुष्याला जाया, पुत्र आणि इतर भोग्यभूत वस्तु केवळ स्वतःकरितां म्हणजे जीवाकरितां प्रिय असतात. जीव हा चेतन असून, तो शरिराचा अध्यक्ष आणि प्राणांना धारण करणारा असा आहे. वागादिक जीं इंद्रियें व त्यांकडून होणारीं जीं कार्यें त्यांचा अध्यक्ष नि प्राण धारण करणारा असा हा जीव आहे.

ईश्वर व जीव यांचा व्यवहार ईश व ईशितव्य या नात्यानें होतो. जीव व ईश हे मुळांत एक असले तरी अविद्येमुळें नामरूप व कार्यकारण–संघाताभिमानी जो जीव त्यावर ईश्वराची सत्ता असते. शरीररूपी पिंजऱ्यांत जीव हा पक्षी बसलेला असून, तो कर्मफलें चाखतो, पापपुण्यें करतो, व सुखदुःखें भोगतो. जीव हा ईश्वरांश असला तरी प्रत्येक शरीरामुळें तो भिन्नत्वाप्रत गेलेला आहे. प्रत्येक जीव ईश्वरस्वरूप असला तरी, तो पाहतो, ऐकतो, बोलतो असाच व्यवहार होतो. जीव हा स्वरूपज्ञान होईपर्यन्त (शरीर, इंद्रिय, मन, बुद्धि, विषय व त्यांचें ज्ञान या उपाधीमुळें) तो पृथक्त्वानें राहातो. अन्नमयादि पंचकोशांच्या पलीकडे जीव आहे. तथापि, विज्ञानमय व आनंदमय कोशच त्याच्या अस्तित्वाचीं साधनें आहेत. मन ही एक जीवाची उपाधि आहे. स्नान, आचमन इत्यादि क्रियेमुळें जीवाच्या देहाला संस्कार करतात. मी देह आहें असें समजणारा जो जीव त्या करितांच हे संस्कार होत. मी सुसंस्कृत आहें, मी शुद्ध आहें, अशी जी बुद्धि दिसते ती देहसंहत आत्म्याचीच होय.

जीवो हि नाम चेतनः शरीराध्यक्षः प्राणानां धारयिता प्रसिद्धेर्निर्वचनाच्च । १।१।६

अस्त्यात्मा जीवाख्यः शरीरेंद्रियपंजराध्यक्षः कर्मफलसंबंधी । २।३।१७

जीवाचें स्वरूप वरीलप्रमाणें आहे. तथापि स्वामी व भृत्य याप्रमाणेंच जीव व ईश यांचा संबंध आहे. अग्नीच्या ठिणगीप्रमाणें जीव व ईश मानले तर त्यांचा अवयव अवयवी असा संबंध येईल. परंतु ब्रह्म हें निरवयव असल्यामुळें अविद्यामूलकच जीव व ईश यांचा भेद मानला पाहिजे. ईश्वराचा एक अंश म्हणजे जीव होय. गीतेंत 'ममैवांशः' असें म्हटलें आहे. निरवयव ब्रह्माचे अंश व अंशी हे भाव संभवत नाहींत. म्हणून एकच पर-

मात्मा सर्व भूतांतरात्म्याच्या स्वरूपानें नटलेला आहे असें मानावें लागतें. यावर अशी शंका येते कीं जीव व ईश्वर यांमध्यें ज्ञान व ऐश्वर्य या दृष्टीनें मोठा भेद दिसतो. दोहोंत जर अंशांशीं भाव आहे तर जीवाच्या ठिकाणीं ईश्वराहून विपरीत धर्म कां दिसावेत ? त्याचें उत्तर देहोपाधीमुळें (अविद्येमुळें)जीव हा ज्ञान व ऐश्वर्य यांचा तिरस्कार करणारा असा होतो, हें होय. **जीवः परमात्मांश एव सन् तिरस्कृतज्ञानैश्वर्यो भवति देहयोगात्।** ३।२।६

उपाधिविशेषामुळें ब्रह्मच असणारा जीव कर्ता व भोक्ता होतो उपाधिसंबंधानें जीव ही संज्ञा व उपाधिराहित्यामुळें ब्रह्म ही संज्ञा दिली जाते.

बुद्ध्याद्युपाधिकृतं तु विशेषमाश्रित्य ब्रह्मैवसन् जीवः कर्ता भोक्ता च इत्युच्यते । १।१।३१

शरिराचा स्वामी तो आहे म्हणून जीवाला शारीर आत्मा असें म्हणतात. शरीर या उपाधीनें तो शारीर होतो. या शारीरचेतन जीवाला धर्माधर्माचीं पापपुण्यें हीं फलें भोगावीं लागतात. कर्तृत्व भोक्तृत्वादि संसारधर्मानें जो युक्त तो क्षेत्रज्ञ होय. क्षेत्र म्हणजे शरीर, त्या उपाधीनें बद्ध तोहि क्षेत्रज्ञच होय ! जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन्हींचा जीव हा साक्षी होय ! जीव हा उपाधीमुळें परिच्छिन्न आहे. आकाशाच्या ठिकाणीं जशीं घटाकाश, महाकाश, हीं उत्पन्न होतात. तसाच उपाधि–निबंधनामुळें जीव ह उत्पन्न होतो. तात्पर्य, जीव उपाधितंत्र आहे. आत्म्याच्या ठिकाणीं या सर्व उपाधींचा आरोप केलेला आहे. स्फटिक जसा रक्तपुष्पसंन्निकर्षानें तांवडा दिसतो, तसेंच आत्मवस्तूचें होतें. बुध्यादि उपाधिसंबंध जोंवर असतो तोंवरच जीवाचें जीवत्व असतें. मी ब्रह्म आहें, असें अविद्या–निरासपूर्वक जीवाला समजलें कीं तो मुक्त होतो. स्थाणूच्या ठिकाणीं पुरुष बुद्धीचा प्रथम भ्रम होतो. तो नष्ट झाला कीं स्थाणूचें स्वरूप कळतें.

बुद्धि ही जीवाची उपाधि होय. तिचे कतृत्व भोक्तृत्वादि धर्म आहेत. त्यांमुळेंच नित्यमुक्त अशा आत्म्याचे मागें संसार लागतो. देहादि जो इंद्रियसंघात तोच मी असें विपरीत ज्ञान आत्म्याला होतें. मी जातों, चालतों, इत्यादि शरीरधर्मयुक्त व्यवहार होतात. ही भ्रांति नष्ट होण्यास ज्ञान हेंच

साधन होय. जीव हा शरीररूप होऊन राहातो, पण ईश्वर हा शरीरांत (शरीराहून वेगळा) राहातो. एकाच पाण्याचे मिठाचा खडा व बर्फ हे विकार होतात, व जल हें द्रवरूप असलें तरी घन होतें. तसेंच अहंकारामुळें जीवाला जीवत्व येतें.

ब्रह्मज्ञान होईपर्यन्त उपाधि सुटत नाहीं. बुद्धीचा व आत्म्याचा संयोग झाला कीं तो संसारी होतो. व तो त्याचा संसारीपणा बुद्धि-संयोग नष्ट झाल्याशिवाय जात नाहीं. सुषुप्ति व प्रलय या ठिकाणी बुद्धीचा संबंध नसतो असें नाहीं. तो संबंध असतो म्हणूनच जागें होणें, पूर्व व्यवहार करणें वगैरे घडतें. बुद्धिसंयोगजन्य संसार आहे व बुद्धिवियोग-जन्य मोक्ष आहे. भिन्न भिन्न जीवांमध्येंहि उपाधिमुळेंच भेद आहे. परमार्थतः भेद नाहीं. एका शरिराचा अभिमानी एकच जीव कर्ता व भोक्ता आहे.

जीवाचें परिमाण काय यावद्दल वाद आहे. कोणी म्हणतात तो अणु आहे, कोणी म्हणतात तो महत् आहे. केसाच्या टोकाच्या शंभराव्या हिश्श्या-इतका जीव सूक्ष्म आहे असेंहि म्हणतात. जीव अणु असेल तर तो एक-देशस्थ होईल व सकल देहगत त्याचें अस्तित्व जाणवणार नाहीं. हरिचंदन नांवाच्या चंदनाचा टिळा कपाळाला लावला तर तो सकल शरिराला आल्हाद देतो, तसाच अणु आत्माहि सकल देह व्यापतो. शरीरांतील त्वचा सबंध शरीरभर असते, त्यामुळें चंदनाची शीतलता पसरते, तशीच आत्म्या-चीही स्थिति आहे (अशी चर्चा करून जीवाचें परिमाण मध्यम मानलेलें आहे) ज्या उपाधीशीं तो संलग्न असतो, तेवढाच जीव लहान मोठा बनतो. एवंच बुद्धीचे गुण आत्म्यावर लादलेले असतात व त्यामुळें तसा निर्देश होतो.

आकाश सर्वत्र असलें तरी उपाधिमुळेंच जसा त्यावर आरोप होतो, तसेंच जीवाचेंहि येणें व जाणें बुद्धि उपाधीमुळें होतें. उपाधिविहीन जीव कुठें जात नाहीं व येत नाहीं. जीव हा अणु, व्यापि व मध्यम परिणामक मानला तरी त्यावर आपत्ती येतातच. म्हणून तो स्वतःसिद्ध आहे, आगंतुक नाहीं. इतर प्रमाणानें त्याच्या सिद्धीची जरूर नाहीं असेंच समजलें पाहिजे. जीव हा जन्मत नाहीं व मरत नाहीं, व त्यावर संस्कारहि होत नाहींत. पण तो जगतो व मरतो हे व्यवहार गौण होत. देहप्रादुर्भावामुळेंच हे सगळे भाषा-

प्रयोग आहेत. जो स्वयंसिद्ध अज, नित्य व शाश्वत आहे तो कसा उत्पन्न होणार? क्वचित् त्याच्या उत्पत्तीचें व प्रलयाचें विवेचन असलें तरी तें औपाधिकच समजावें. वर्तमान, अतीत, अतीततर व अनागत या सर्वांचें ज्ञान आत्म्याला असतें म्हणून तो सदा सर्वदा असणारा आहे. शरिराचे संयोग व वियोग, यावरून त्याला जन्म व मरण ही संज्ञा प्राप्त होते. जीव जें आपलें शरीर समजतो त्याला जर पीडा होऊं लागली तर तो तेथून निघून जातो.

जीव हा नित्य चैतन्य स्वरूप आहे, कां आगंतुक चैतन्य स्वरूप आहे, कां स्वतः अचेतन आहे असे प्रश्न आहेत. वेदांती म्हणतात कीं तो नित्य चैतन्य स्वरूप आहे. सुषुप्तींत चैतन्य नाहीं असें नाहीं. तेथें विषयाचा अभाव असल्यामुळें चैतन्याची प्रवृत्ति नसते इतकेंच.म्हणून नित्योपलब्ध म्हणजे सदैव असणारा हेंच आत्म्याचें स्वरूप होय. 'नित्योपलब्धिस्वरूपत्वात्' ॥ २।३।४०

चैतन्य हा आत्म्याचा गुण आहे कां नाहीं असा प्रश्न येतो. त्याचें उत्तर तो त्याचा गुण असल्यामुळेंच त्याचें सर्व शरीरभर ज्ञान होतें हें होय. परब्रह्म म्हणजे जीव असा जर सिद्धांत आहे तर त्याचे सर्व धर्म जीवामध्यें आहेतच.

जीव हाच कर्ता आहे. व म्हणूनच विधिवाक्यें सार्थ होतात. जीव हा कर्ता, बोद्धा, विज्ञाता नसता तर या आज्ञा व्यर्थ ठरल्या असत्या. तो प्राण धारण करणारा आहे, बुद्धियुक्त आहे, म्हणूनच लौकिक व वैदिक क्रियांमध्यें त्याला कर्तृत्व आहे. "श्रोतव्यः, मंतव्यः" हीं वाक्यें सुद्धां कर्तृत्वानेंच उपदिष्ट आहेत. हा जीवच भोक्ता आहे, कारण तो कार्य करून भोगेच्छा धरतो. जीवाला मिथ्या ज्ञानजन्य कर्तृत्वाचा उपभोग घ्यावा लागतो. तें अज्ञान नष्ट झालें कीं शरिरादींचा अभिमान नष्ट होतो व जीव परम सुखी होतो.

प्रश्नः—जीवाच्या कर्तृत्वाला ईश्वराची अपेक्षा असते कां नसते ?

उत्तरः—अविद्येच्या उपाधीमुळें जीवाच्या ठिकाणीं कर्तृत्व संभवतें. पण तें कर्माध्यक्ष, सर्वभूताधिवास, साक्षी, प्रेरक, असा जो ईश्वर त्याच्या अनुग्रहानें संभवतें व त्याच्याच अनुग्रहानें मोक्षसिद्धि होते. रागादि दोषानें

युक्त असा जीव स्वेच्छेनें पाहिजे तीं कर्में करतो. शेती करणें, नांगर धरणें इत्यादि कर्मांत जशी ईश्वराची अपेक्षा नसते, त्याचप्रमाणें जीवाचीं कर्मेंहि ईश्वरनिरपेक्षच व्हावयास पाहिजेत, हें खरें. पण ईश्वर हा हृदयामध्यें राहून प्रेरणा करीत असल्यामुळें त्याच्या अधिष्ठानावर म्हणजे साक्षित्वानेंच सर्व क्रिया होतात. ईश्वर हा जीवाकडून वन्यावाईट गोष्टी जर करवून घेत असेल तर त्या ईश्वरावर निर्दयता व विषमता हे दोष येतील, आणि अकृताभ्यागम व कृतप्रणाश म्हणजे न केलेलें कर्म चिकटणें व केलेलें कर्म नष्ट होणें हे दोषहि येतील. तस्मात् जीवाकडून धर्माधर्मलक्षण जीं कर्मे घडतात, त्यांचे जे संस्कार असतात त्यांच्या अपेक्षेप्रमाणें ईश्वर कर्मे करवितो. 'पर्जन्यवत् ईश्वरो द्रष्टव्यः निमित्तत्व मात्रेण' ज्या तऱ्हेचें बीज असेल तसें त्याचें विकसन करणें हा जसा पर्जन्याचा धर्म तसेंच ईश्वराचेंहि आहे.

जीवाचें कर्तृत्व पूर्वप्रयत्नापेक्ष असलें तरी जीवाला अगदींच स्वातंत्र्य नाहीं असें नाहीं. म्हणूनच जीव करतो व ईश्वर त्याचेकडून करवितो अशी भाषा वापरतात. 'कुर्वंतं हि तं ईश्वरः कारयति' पूर्वप्रयत्नाच्या अपेक्षेनें तो आतां कर्म करवितो व पूर्वतर प्रयत्नाच्या अपेक्षेनें पूर्वीचीं कर्मे करवितो असा सिद्धांत निघतो.

जीव जर कर्ता आहे आणि स्वतंत्र आहे तर स्वहिताला अनिष्ट व विपरीत असें कर्म कां करतो ? याचें उत्तर हेंच कीं जीवाला अत्यंत स्वातंत्र्य नाहीं. कोणत्याहि क्रियेला देशकाल, निमित्त व साधनें यांची अपेक्षा असते. तीं जशीं असतील तसें कर्म घडतें. ज्ञान, बुद्धि आणि संगति यांचाहि कर्माशीं संबंध आहे. आचाऱ्याचें कर्तृत्व उदक, अग्नि व शिधा यांच्या आधीन असलें, तथापि त्याच्या ठिकाणीं मुळींच कर्तृत्व नाहीं असें म्हणतां येत नाहीं.

प्रश्नः—जीवाच्या ठिकाणीं असणारें कर्तृत्व हें स्वाभाविक आहे कां औपाधिक आहे? जर तें स्वाभाविक असेल तर अग्नि व उष्णता, सूर्य व प्रकाश याप्रमाणें जीव व कर्म, यांचा संबंध असल्यामुळें मोक्ष अशक्यच होईल.

उत्तरः—जीवाच्या ठिकाणचें कर्तृत्व स्वाभाविक नसून औपाधिक

आहे. अविद्येमुळेंच तो कर्ता, भोक्ता, सुखी, दुःखी असा होतो. अविद्येचा निरास केला कीं कर्तृत्व संपलें ! जसा एखादा सुतार, वाकस, किंकरें यांच्या सहाय्यानें मजुरीस गेला म्हणजे काम करतो, पण तो घरीं आल्यावर स्वस्थ व निर्व्याप असतो, तसाच जीवहि शरीरोपाधीमुळें व अहंकारामुळें कर्ता व भोक्ता होतो. त्या उपाधीचा अहंकार सुटला कीं जीव मुक्तच होतो.

अविद्येच्या व्यवधानामुळेंच जीव व ईश्वर यांचें समानधर्मत्व असतांना सुद्धां ज्ञान व ऐश्वर्यविहीन जीव होतो.

उपाधीचा अभिमानी जीव झाला कीं, त्याचा निर्लेपपणा गेला. जीवाचें अल्पत्व उपाधीमुळेंच नष्ट करतां येत नाहीं व त्यामुळेंच सर्वज्ञत्वाचा असंभव असतो.

नहि शारीरस्य उपाधि-परिच्छिन्न दृष्टेः सर्वज्ञत्वं सर्ववित्त्वं वा संभवति । १।२।२१

अवस्थात्रयीचा जो साक्षी तो त्या अवस्थांहून भिन्न आहे व तो नाहीं असें म्हणतां येणें अशक्य आहे. सर्व प्राणी सारखे असले तरी ज्ञान व ऐश्वर्य यांमध्यें परस्पर कमी अधिकपणा दिसतो. याचें कारण प्राण्यांच्या कर्मामुळें उत्पन्न झालेले प्रतिबंध हें होय. जितके प्रतिबंध कमी तितकी बुद्धि शुद्ध होय, व ती ज्ञान आणि ऐश्वर्य यांना अनुकूल असते. (अविद्यात्मक देह ही जीवाची उपाधि आहे. ही पंचकोशांनीं युक्त असते. त्या पचकोशांची चर्चा पुढील प्रकरणांत करितों.)

प्रकरण ६ वें. : :

पंचकोश व मरणोत्तर स्थिति

वेदांत्यांनीं अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय असे पांच कोश मानलेले आहेत. या पांचापलीकडे आत्मतत्त्व आहे. सर्व कोशांत आत्मा अनुस्यूत आहे. जीवाला हें शरीर त्याच्या कर्मामुळेंच मिळालेलें आहे. शरीर हें वात, पित्त व कफ या त्रिधातूंचें आणि तेज, आप व अन्न यांचें बनलेलें आहे. मूढांना अन्नमय शरीर हाच आत्मा वाटतो. चैतन्य युक्त जो देह तोच आत्मा असें चार्वाक मानतात.

स्थूलाप्रमाणेंच सूक्ष्म शरीरही आहे. त्यामध्यें पंचप्राण, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, अंतःकरणचतुष्टय, व पंचविषयांचे सूक्ष्म संस्कार यांचा अन्तर्भाव असतो. सूक्ष्म शरीर आहे, याचें निदर्शक अंगांतील उष्णता हें होय. मेल्यानंतर शरीरांत उष्मा नसतो याचें कारण सूक्ष्म शरीर स्थूल शरीराबाहेर गेलेलें असतें. शरीरांत जो वायु तोच मुख्य प्राण होय! त्याचे पांच प्रकार आहेत. प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे ते होत. वायु हा प्राण होऊन नासिकेंत प्रविष्ट झाला. अग्नि हा मुखांत प्रविष्ट झाला, सूर्य नेत्रांत प्रविष्ट झाला, इत्यादि वाक्यांवरून भूतसूक्ष्मांची कल्पना येते. प्राण हा उच्छ्वसन करणारा असून तो समोर जात असतो. अपानवायु हा खालीं जाणारा असून निश्वासादि कर्मे करतो. व्यान हा या दोन वायूंच्या संधीमध्यें असतो व तो वीर्य उत्पन्न करतो. उदान हा उत्क्रांतीला कारणीभूत असून त्याची गती ऊर्ध्व असते; आणि समानवायु हा सर्वांगामध्यें सम प्रमाणांत अन्नरस पोंचवीत असतो. नाभि हें एक प्राणाचें स्थान आहे. प्राण हा एक सर्वात्मा आहे, असें प्रतिपादन केलें आहे. सर्व इंद्रियें थकलीं तरी प्राण कधींच थकत नाहीं. परंतु प्राण म्हणजे कांहीं आत्मा नव्हे, कारण तो जड आहे. प्राण हा जीवाचा सर्वाधिकारी

आहे, पण स्वतंत्र नाहीं. प्राण म्हणजे इंद्रिय नव्हे. प्राण हा सूक्ष्म व परिच्छिन्न आहे. प्राणाचें कार्य गर्भधारणेपासून सुरू होतें. म्हणूनच तो ज्येष्ठ व श्रेष्ठ आहे, तो क्रियाशक्तिमान असल्यामुळें त्यापासून आयुष्य, शरीराची हालचाल व धारणा हीं प्राप्त होतात. सुषुप्तींत इंद्रियें निजलीं तरी प्राण जागाच असतो. तो जागून शरीराची धारणा करतो. आयुष्य म्हणजेच प्राण होय, व आयुष्य म्हणजेच अन्न होय ! इंद्रियें, मन व बुद्धि हीं प्राणापेक्षां निराळीं आहेत. करणें (इंद्रियें) सूक्ष्म व परिच्छिन्न आहेत. तीं अकरा आहेत. पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें व मन हीं तीं होत. इंद्रियांचा संबंध जीवाशीं आहे. अंतःकरण हें एक निराळें मानलें आहे. त्यालाच मन, बुद्धि, चित्त, अहंकार इत्यादि नांवें आहेत. लाक्षणिक अर्थानें क्वचित् प्राणाला इंद्रियें असेंहि म्हटलें आहे.

मन व बुद्धि यांचें मूलद्रव्य एकच आहे. कार्य व कारणसंघातामध्यें बुद्धि ही मुख्य आहे. ज्ञानशक्ति हें बुद्धीचें लक्षण असून ती बुद्धि हृदयांत असते. मनहि प्रायः हृदयांतच असतें. तें हृदय पुंडरिकांत सांपडतें, असेंहि म्हणतात. मनाच्या योगशास्त्रसिद्ध पांच वृत्ती आहेत. त्या म्हणजे श्रोत्रादि इंद्रियद्वारां विषयाकडे जाणें या होत! श्रद्धा हा एक मनाचा आणि बुद्धीचा किंबहुना जीवाचा धर्म आहे असें म्हणतां येईल. श्रद्धा म्हणजे प्रत्ययविशेष होय ! जात्या जीव हा श्रद्धाळु आहे. जीवाला जसजसा बरा वाईट अनुभव येईल तसतसा तो नंतर संशयी बनतो. श्रद्धा व संशय हे दोन्ही धर्म, मन व बुद्धीचे होत.

कोणत्याही जीवाला जे विषय ज्ञात असतात त्याबद्दलच सुख किंवा दुःख उत्पन्न होतें. अज्ञात विषयाबद्दल कधींच कोणाला सुखदुःख होत नाहीं. जीवाला जसजसें भिन्न विषयांचें ज्ञान होतें तशी तशी त्याची आकांक्षा वाढते व ती जसजशी वाढेल तसतशी इच्छा परिपूर्ति न झाल्यास दुःख, द्वेष, संताप इत्यादि उत्पन्न होतात.

जीवाला प्राण व इंद्रियें यावांचून भोग होत नाहीं आणि प्राण व इंद्रियें हीं केव्हांही आश्रयावांचून राहात नाहींत. अर्थात् या देहांतून भूतसूक्ष्मांच्या आश्रयानें असणारे प्राण व इंद्रियें हीं देह सोडून बाहेर जातात व तीं तशीं

वाहेर गेलीं म्हणजे दुसऱ्या देहामध्यें जीवाला भोग देतात. जीवाबरोबर भूतसूक्ष्मांचे अंश हे मोक्ष होईपर्यंत असतात. भूतसूक्ष्मेंहि भर्जित बीजवत् झालीं कीं जीवाला मोक्ष मिळतो. भूतसूक्ष्में आहेत, तोंवरच जीवाला बंध आहे, त्यांचा लय झाल्यानंतर जीव हा ब्रह्मसंपन्न होतो.

जीवाच्या मुख्य अवस्था तीन आहेत. त्या जागृति, स्वप्न व सुषुप्ति या होत. या शरिरांतून वाहेर पडणें ही एक चवथी अवस्था असून मूर्च्छा हीहि एक पांचवी अवस्था मानलेली आहे. विषयांचें ग्रहण करून मनोपाधि विशेषानें त्यांचा भोग जीव जागृतींतच घेतो. जागृतींतील विशेष वासना स्वप्नामध्यें उद्भूत होतात व तेथें तो स्वप्नाचा भोग घेतो. जागृति व स्वप्न यांचा पूर्ण उपरम जेथें होतो, तेथें उपाधिविशेषाच्या अभावामुळें जीव आपल्या ठिकाणींच लीन होतो व म्हणून तिला सुषुप्ति म्हणतात. जागृतींत जीव हा देह व इंद्रियरूपी पिंजऱ्याचा अध्यक्ष असतो. जागृतीमध्यें जीव हा विषयासक्त असतो व इंद्रियाचे योगानें विषयांचें शोधन करतो. स्वप्न हें जागृतींतील वासनामूलकच आहे. स्वप्नांत वासना-निर्मित सृष्टीचा अनुभव जीव घेतो व जागृतींत आल्यावर मी अमुक अमुक पाहिलें असें म्हणतो. स्वप्नामध्यें सर्व सृष्टि मनोमात्रच असते. स्वप्नाचा कर्ता जीवच असतो. स्वप्न हें वासनामूलक असतें. (गाढ झोंप ज्याला येत नाहीं, मेंदूचा विकार ज्याला आहे, अशांनाच प्रायः पुष्कळ स्वप्नें पडतात. 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' ही म्हण प्रसिद्ध आहे. त्यावरून मनाचा व स्वप्नाचा संबंध दृढ आहे असें दिसतें.)

इंद्रियांचे सर्व व्यापार जेथें लीन झालेले असतात व जेथें तो कांहीं ऐकत नाहीं, पाहात नाहीं, विशेष ज्ञान करून घेत नाहीं, जेथें तो सद्रूपी जो आत्मा त्याशीं लीन झालेला असतो. जेथें तो कुणालाहि ओळखीत नाहीं, ती सुषुप्ति अवस्था होय! सुषुप्तीचें कारण श्रम हें होय! सर्व इंद्रियें जेव्हां थकतात तेव्हांच सुषुप्ति प्राप्त होते. सुषुप्तीमध्यें जीवाचा विनाश होत नाहीं. फक्त जीवाला विशेष विज्ञान नसतें. पण सुषुप्तीनंतर मी गाढ निजलों होतों असें जीव सांगतोच. सुषुप्तीमध्यें जीव हा ब्रह्मसंपन्न होतो. मात्र ती अवस्था अज्ञानमिश्रित असते. सुषुप्ती-

मध्यें जीवाचें स्थान ब्रह्मच असतें, प्रज्ञानघन जो आत्मा त्याला जीवानें आलिंगन दिल्यानंतर मग त्याला बाहेरचें कांहींहि स्मरत नाहीं. सुषुप्तीमध्यें मन हें पुरीततो नाडीमध्यें शयन करीत असल्यामुळें तें एकत्राला जातें. तेथें दुसरा विषयच असत नाहीं. (जीवाला दररोज आत्मसुख पाहिजे असतें. तें सुख गाढ सुषुप्तींतच मिळतें. अज्ञानमिश्रित आत्मसुखच कां होईना पण तें जीवाला पाहिजे असतें. त्या सुखाविना जीवाला बरें वाटत नाहीं. जो गाढ झोंपी जातो त्याचें आरोग्य चांगलें असतें.) जो निजलेला असतो, तोच जागा होतो. कारण त्याचें कर्म व अविद्येचे संस्कार हे लगेच जागृत होतात व ते त्या जीवाला कांहीं वेळानें प्रेरणा करितात. समुद्रांत टाकलेला जलबिंदु पुन्हां शोधून काढतां येत नाहीं, पण जीव हा महासमुद्रस्थानीय परब्रह्मांत जरी झोपेंत लीन झाला असला तरी तेथून त्याला बाहेर काढतां येतें. याचें कारण जीवाचें कर्म व अविद्या हेंच होय ! अविद्येचें जें सूक्ष्म बीज सद्भावानें असतें त्यामुळेंच जीव उत्थान पावतो व तो उत्थान पावल्यावर पुनश्च पूर्वसंस्कारानुरूप सर्व व्यवहार नेमके करतो. सुषुप्तींत त्याची अविद्या सुप्त असते. ती जागृतींत पुन्हां प्रगट होते व जणुं ब्रह्माशीं कांहीं संबंध आलाच नाहीं अशा प्रकारें जागृतींतील व्यवहार सुरू होतो.

मूर्च्छा हें मरणाचें द्वार होय ! मरण म्हणजे अपसरण होय. एका देहांतून दुसऱ्या देहांत जातांना मूर्च्छा येते. मूर्च्छेमध्यें जीवाला ज्ञान नसतें. पण सुषुप्तींतील सुख असतें असेंहि नव्हे. मूर्च्छेंतून मनुष्य शुद्धीवर येतो, तेव्हां तो एवढा वेळपर्यंत मला कांहींच कळलें नाहीं वगैरे बोलतो. मूर्च्छेताचा देह पृथ्वीवर पडतो. त्याला शुद्धि असत नाहीं, व देहावर झालेले आघात त्याला कळत नाहींत. दुःखाच्या असह्य वेदनेंतून मूर्छा उत्पन्न होते. सुषुप्तीमध्यें दुःखाच्या असह्यतेचा भागच नसतो. तात्पर्य, जीवाच्या जागृत, स्वप्न, सुषुप्ति, अपसरण व मूर्च्छा अशा पांच अवस्था असून जीव शरीर हें पंचकोशांनीं युक्त आहे. पंचकोशांपैकीं अन्नमय व प्राणमय कोश हे स्थूल शरीरांतील असून मनोमय, विज्ञानमय व आनंदमय हे कोश सूक्ष्म शरीरामध्यें अन्तर्भूत होतात. स्थूल व सूक्ष्म देहापलीकडे आत्मा आहे, म्हणून सुषुप्तीला कारण देह असेंहि म्हणतात.

मरणोत्तर जीवाची स्थिति

कर्मप्रयुक्त इंद्रियविषयात्मक जीवाला बंधन असतें. तो कर्माश्रित असतो म्हणून पंचभूतांच्या उपादानानें त्याला देहांतराची प्राप्ति होते. जीवाचीं अनेक अनारब्ध कर्मे असतात. त्यांचा भोग भोगण्याकरितां दुसऱ्या देहांत जाणें जरूर असतें व तेंच त्याचें अभिव्यंजक होय ! ज्यांचीं परस्परविरुद्ध फलें आहेत, अशा अनेक कर्मांचीं फलें जीवाला एकदम भोगणें शक्य नसतें. म्हणून फलभोगार्थ जीवाला पुनर्जन्म आहे. जर अनेक कर्मांचीं फलें जीवाला कदम भोगतां आलीं, तर विविध ठिकाणीं जाऊन विविध देहांनीं फल भोगण्याचा प्रसंगच जीवावर येणार नाहीं.

एका देहांतून दुसऱ्या देहांत जातांना जीव हा भूतसूक्ष्मांच्या सह (चिकटून) जातो. आकाश, पर्जन्य, पृथ्वी, पुरुष व स्त्री अशा पंच अग्नींतून तो श्रद्धा, सोम, वृष्टि, अन्न व रेत इतक्या स्वरूपानें जातो. मुख्य प्राणाचें उत्क्रमण झाल्यावर त्याचे मागोमाग पंचप्राण जातात. पंचप्राणांची गति ही आश्रय असल्यावाचून संभवत नाहीं. भूतसूक्ष्मेंहि सर्वत्र असतात. त्यांच्या आश्रयानें जीव (मुख्य प्राण) पंचप्राण, पंच–ज्ञानेंद्रियें, पंच–कर्मेंद्रियें व अंतःकरण यासह जातो. भूतसूक्ष्मांच्या आश्रयाशिवाय प्राणांची गति संभवत नाहीं.

एका देहांतून दुसऱ्या देहांत जातांना जीवाबरोबरच विद्या व कर्म हीं जात असतात. विद्या म्हणजे संसारविषयक विद्या व इतरहि सर्व संस्कार, आणि कर्म म्हणजे विहित व प्रतिषिद्ध कर्मे. म्हणजे पूर्वप्रज्ञा, भूतसूक्ष्में, विद्या व कर्म हीं चार जीवाबरोबर जातात. जीवाचा मुख्य मंत्री प्राण आहे. त्याच्यासह सेंद्रिय, समनस्क, पूर्वप्रज्ञेनें युक्त असा जीव एक देह सोडून दुसऱ्या देहांत जातो.

देहाद्देहांतर प्रतिपत्तौ देहबीजैर्भूतसूक्ष्मैः संपरिष्वक्तो रहति जीवः ३।१।१

जीवो मुख्यः प्राणसचिवः सेंद्रियः समनस्कोऽविद्या–कर्म–पूर्व–प्रज्ञा-परिग्रहः पूर्वदेहं विहाय देहांतरं प्रतिपद्यते। ३।१।१

ज्ञान्याचें उत्क्रमण असें होतें–वाणी मनांत, मन प्राणांत, प्राण तेजांत

व तेज आत्म्यामध्यें लीन होतें. अज्ञान्याचें उत्क्रपण निराळ्या तऱ्हेनें होतें. कांहीं ठिकाणीं विद्वान् व अविद्वान् ह्या दोघांचेंहि उत्क्रमण सारख्याच तऱ्हेनें होतें असें म्हटलें आहे. कांहींचें म्हणणें असें कीं ज्ञान्याचे प्राण ब्रह्मरंध्रांतून जातात, आणि इतरांचे प्राण इतर द्वारांतून जातात.

परलोकाचें अस्तित्व कर्मफलभोगार्थच मानावें लागतें. सर्व कर्मांचीं फलें एका जन्मांत जीव भोगूं शकत नाहीं. जीवाचा जन्म हेंच त्याच्या मागच्या अनेक कर्मांचें फल होय! तीं कर्में जीवाला अज्ञात असतात. तथापि पूर्व कर्मांचें फल जर आतां मिळतें तर विद्यमान कर्मांचें फल पुढें मिळणार हें सिद्ध आहे.

कांहीं ठिकाणीं सप्त पाताल, सप्त स्वर्ग व सप्त नरक मानलेले आहेत. प्राण्यांच्या बऱ्यावाईट कर्मांप्रमाणें त्यांना या गति प्राप्त होतात. स्वर्गांत जाणारे निरिच्छ नसतात. ते सानुशय म्हणजे ज्यांच्या इच्छेचे अवशेष असतात असे ते असतात म्हणून तेथून ते परत फिरतात. सत्कर्म करणारे वरच्या योनींत जातात व दुष्कर्म करणारे खालच्या योनींत येतात.

विशिष्ट देशजातिकुलरूपायुः – श्रुतवृत्तवित्तसुखमेधसो जन्म प्रतिपद्यन्ते इति । ३।१।८


सत्कर्मवंतांना विशिष्ट देश, उत्तम जाति, उत्तम कुल अशा ठिकाणीं जन्म मिळतो व आयुष्य, वित्त, वृत्त, सुख इत्यादींची प्राप्तीहि होते. जीव प्रथम सूक्ष्म आकाशरूप होतो. पुढें धूम व वायु या रूपानें आणि धान्याच्या रूपानें खालीं येतो. व्रीहींतून अन्न व अन्नांतून रेत या भावानें दुसऱ्या योनींत जातो. भूतग्राम हा चतुर्विध आहे. जरायुज, अंडज, स्वेदज, उद्भिज हे ते चार प्रकार होत. सर्वच प्राणी रेतःसेकानें गर्भ धारण करतात असें नाहीं. बगळी हा रेतःसेकाशिवाय गर्भधारणा करते. स्वेदज व उद्भिज जीव ग्राम्य धर्माशिवायच उत्पन्न होतात. स्थावर योनींत जन्म घेणें हीहि एक उपभोगाचीच अवस्था आहे, मात्र तें पुण्यफळ नव्हे.

मरणानंतर किती दिवसांनीं दुसऱ्या योनींत जन्म होतो हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. सामान्य जो अवरोह सांगितला आहे तो असा कीं, जलमय शरीराचा क्षय होऊन आकाश, वायु, धूम, मेघ व अन्न अशा

क्रमानें जीवाचें निःसरण होतें. या निःसरणाला एक वर्ष अगर अधिकहि काल लागत असावा. पण कांहीं श्रुतींचें म्हणणें असें आहे कीं, तृणजलूके-प्रमाणें पुढील देहावर पाऊल ठेवल्याशिवाय पूर्व देहाचें स्थान जीव मुळीं सोडीतच नाहीं. पुढें कुठें जावयाचें हें ठरलेलेंच असतें व त्याप्रमाणें जीवाचें निःसरण होतें, हाच इत्यर्थ आहे.

नन्वन्या श्रुतिः जलूकावत् पूर्वदेहं न मुञ्चति यावत् (तावत्) न देहान्तरमाक्रमतीति दर्शयति 'तद्यथा तृणजलायुका' इति ॥ ३।१।१

(सर्व जीव अज्ञान व कर्म यांमुळें पुनः पुनः जन्म घेत असतात, परंतु ज्ञानी मात्र पुनर्जन्म घेत नाहीं. त्याला ज्ञानामुळें मुक्ति मिळते. त्या मोक्षाचें व मुक्ताचें स्वरूप कसें आहे हें पुढील प्रकरणांतच पाहूं.)



प्रकरण ७ वें. : :

मोक्षाचें व मुक्ताचें स्वरूप

ब्रह्मवेत्त्याचे पंचप्राण बाहेर न जातां ते परब्रह्मांतच लीन होतात, व स्थूल शरीर पृथ्वींत मिळतें. पंचमहाभूतांचे अंश स्वस्थानीं जातात आणि जीवज्योति ब्रह्मस्वरूपांत लीन होते. प्राकृत मनुष्याम-यें अविद्या-निमित्तक पंचभूतांचे अवशेष असतात. पण ते ज्ञान्यांमध्यें नसल्यामुळें तो अकल, अमत असा होतो.

ब्रह्मवेत्त्याला व्यवहार नाहीं, कर्म नाहीं व जगहि नाहीं. कारण सर्वत्र आत्मस्वरूपानेंच जो पाहातो, त्याच्या ठिकाणीं क्रिया, कारक, फल, व एवंगुणविशिष्ट भेदभाव नसल्यामुळें मुळींच व्यवहार नसतो. तत्त्वमसि त्या महावाक्यानें ब्रह्मात्मभाव येत असल्यामुळें त्या अवस्थेंत मुळींच व्यवहार नाहीं.

दर्शयतिच–यत्रत्वस्यसर्वमात्मैवाभूत्. इत्यादिना ब्रह्मात्मत्व-दर्शिनंप्रतिसमस्तस्य क्रियाकारकफललक्षणस्य व्यवहारस्याभावं ॥ २।१।१४

ज्ञान झाल्यानंतर ज्ञानपूर्व व ज्ञानोत्तर कर्मांचा लेप ज्ञान्याला लागत नाहीं. ज्ञान झाल्यानंतर जें क्रियमाण होतें त्यांत मी कर्ता आहें ही जाणीव नसते व पूर्वप्रसिद्ध जें कर्तृत्व व भोक्तृत्व त्याहून मी निराळा अशी जाणीव असल्यामुळें संचित कर्माचा संबंध ज्ञान्याकडे येत नाहीं. ज्ञान्याला कर्तृत्वादि व्यवहार नाहीं व त्याला इतरांप्रमाणें यथापूर्व संसारहि नाहीं.

यत्रत्वस्य सर्वमात्मैवाभूत् इति विवेकिनः कर्तृत्वादि व्यवहारं वारयति ।१।२।१२

ज्ञानानेंच ब्रह्मात्मदर्शन होतें. शरिरादिकांच्या अभिमानानें जे दुःख-भयादि भाव उत्पन्न होतात तेच ज्ञानानें पुढें नष्ट होतात. देहाभिमानाची निवृत्ति झाली कीं मिथ्या ज्ञान आणि दुःखभयादि भाव हे नष्ट होतात.

पुण्य व पाप हीं सर्व उडवून ब्रह्मवेत्ता निरंजन अशा परमपदाला जातो. त्याचीं पुण्यें त्याच्या मित्रांकडे व पापें त्याच्या शत्रूंकडे जातात. प्रिय ज्ञातिबांधव वं अप्रिय ज्ञातिबांधव यांमध्यें त्याचें सुकृत व दुष्कृत वाटलें जातें. ज्ञानानें सर्व कर्मांचा नाश होतो, अशी ही ब्रह्मविद्या आहे. ब्रह्म-वेत्त्याला पुनर्जन्म नाहीं. 'अमृतत्वं हि विद्वान् अश्नुते ' अशी स्मृतीहि आहे.

ब्रह्मवेत्त्याला क्रियमाण व संचित यांची बाधा होत नसली तरी प्रारब्धकर्म हें त्याला भोगावयाला लागतेंच.

भोगेनत्वितरे क्षपयित्वा संपद्यते ४।१।१९

इतरे तु आरब्धकार्ये पुण्यपापे उपभोगेन क्षपयित्वा ब्रह्म संपद्यते।

ब्रह्मवेत्त्याला कर्तव्य नाहीं. आत्मज्ञान झाल्यावर तो कोणाकरितां कशाची व काय बरें इच्छा करणार ? म्हणून त्याला विधि नाहीं, निषेध नाहीं व कर्तव्यहि पण नाहीं.

अलंकारोह्ययमस्माकं यत् ब्रह्मावगतौ सत्यां सर्वकर्तव्यता-हानिः कृतकृत्यता चेति १।१।४

आत्मानुभवी कृतकृत्य होतो म्हणून त्याला कसलेंच कर्तव्य उरत नसतें.

आत्मैकत्व ज्यांचें झालें आहे व जे आप्तकाम आहेत, त्यांनीं क्लेशबीजें विशेषत्वानें दग्ध केलीं आहेत. त्यांना प्रारब्धभोगाच्या क्षयावाचून दुसरी कसलीही अपेक्षा नसते.

नहि आत्मैकत्वदर्शिनां आप्तकामानां इहैव दग्धाशेषक्लेशबीजानां आरब्धभोग-कर्माशयक्षपणव्यतिरेकेण अपेक्षितव्यं किंचिदस्ति । ३।३।३०

ब्रह्मज्ञानोत्तर सर्वत्र एकात्मभाव आरूढ झाल्यानंतर 'भूयः कदाचित् आकांक्षा नोपजायते' कसलीच आकांक्षा उत्पन्न होत नाहीं. कारण पुरुषार्थाची समाप्ति ज्ञानानें होते, व तो नित्य तृप्त होतो. ४।३।१४

ब्रह्मात्मदर्शन झाल्यानंतर कोणत्याहि यत्नांतराची जरूर नाही. कारण हा अधिकारी अनियोज्य असतो. नियोज्य म्हणजे ज्याचा नियोग करतां येतो तो. पण हा अधिकारी विधिनिषेधाच्या पलीकडचा असल्यामुळें तो कोणालाहि आज्ञा करण्यास योग्य असा होत नाहीं. विधिनिषेध हे नियोज्याच्या मागें असतात. आत्म्याहून अन्यत् दुसरी कोणतीहि वस्तु हा पाहात नसल्यामुळें तेथें नियोज्य-नियोजक भावच नसतो. शरीराचा अहंकार जेथें आहे तेथें वेदाचा निग्रह लागूं पडतो. परंतु शरीराव्यतिरिक्त आत्म्याचें ज्यांना दर्शन झालें आहे, अशांना वेदाचा निग्रह किंवा अनुग्रह कांहींच संभवत नाहीं. म्हणूनच ब्रह्मज्ञान्यानें अग्निहोत्रादि कर्में करण्याचें कारण नाहीं.

ब्रह्मवेत्त्याला विधिनिषेध, निग्रह, अनुग्रह वगैरे कांहींच लागूं नसतात, तर मग तो पाहिजे तसा वागतो कीं काय ?

नच नियोगाभावात् सम्यग्दर्शिनो यथेष्टचेष्टाप्रसङ्गः सर्वेत्राभिमानस्यैव प्रवर्तकत्वात् अभिमानाभावाच्च सम्यग्दर्शिनः

२।३।४८

ब्रह्मवेत्ता यथेष्टाचार करूं शकत नाहीं. कारण त्याच्या ठिकाणीं अभिमान नसतो. अभिमान हाच भलत्या गोष्टीला प्रवृत्त करणारा असतो. आजवर साधक स्थितींत त्यानें जे नियम पाळले त्याचेंच आचरण स्वभावतः ज्ञान्याकडून होत असल्यामुळें तो पाहिजे तसा वागणें शक्य नाहीं.

' कुर्वन्नेव इह कर्माणि ' ' न कर्म लिप्यते नरे ' इत्यादि वाक्यांवरून ज्ञानोत्तरहि कर्म संभवतेंच. ज्ञान्यांनीं जरी लोकसंग्रहार्थ कर्में केलीं तरी त्यांना त्यांचा लेप लागत नाहीं.

ब्रह्मवेत्त्याचीं सर्व कर्मे क्षीण झालीं असल्यामुळें त्याच्या प्राणाचा उत्क्रांति व गति होत नाहीं. पुण्यपापें जावून निष्कलंक निरंजन अशा परब्रह्मामध्यें तो लीन होतो. विद्येनें म्हणजे ज्ञानानें बीजशक्तीचा म्हणजे वासनेचा दाह झाल्यामुळें मुक्ताला पुनरुत्पत्ति नाहीं. मुक्त हा परब्रह्माशी अविभक्तपणानेंच असतो. तो परमज्योतीशीं प्राप्त होऊन स्वरूपांतच लीन होतो. मुक्त हा ब्रह्माशीं कसा एकरूप होतो याबद्दल विविध मतें आहेत. तो शरीरांत असूनहि शरीराभिमानी नसल्यामुळें कांहींच करीत नाहीं व त्याला कशाचाहि लेप लागत नाहीं.

अज्ञानामुळेंच आत्म्याला शरीर धारण करावें लागतें. शरीरपातानंतर साधक मुक्त होतो असें नव्हे. तर तो देहांत असतांनाच जिवंतपणीं मुक्त होतो. मिथ्या शरीराभिमान हाच मुळीं बंधन हेतु आहे. तो गेल्यानंतर बंध कसला व मुक्ति कसली ?

ब्रह्मज्ञानोत्तर पूर्व आणि उत्तर म्हणजे संचित व क्रियमाण यांचा दाह होतो हें पूर्वीच सांगितलें आहे. फक्त प्रारब्ध मात्र भोगून संपवावयाचें असतें. प्रारब्धकर्माचा क्षय झाला कीं देहपात होतो व देहपातानंतर पुन्हां देह घेण्याचें कारण पडत नाहीं. प्रारब्धाचा मात्र ब्रह्मज्ञानानें नाश होत नाहीं. प्रारब्ध कर्म हें भोगावेंच लागतें. कारण त्या कर्मानेंच हा देह प्राप्त झालेला असतो. प्रारब्धकर्म जर नष्ट होईल तर ज्ञान होतांच मृत्यु येईल. अहो, " ज्ञानाग्नि सर्व कर्में भस्म करतो " असें जर आहे तर कांहीं कर्मांचा दाह व कांहीं कर्मांचा अदाह हें योग्य आहे काय ? त्याचें उत्तर असें कीं देहाचा म्हणजे प्रारब्धकर्माचा आश्रय न करतां मुळीं ज्ञानच उत्पन्न होत नाहीं. कुलाल चक्राची जी गति असते तिला जर प्रतिबंध नसेल तर ती गति आपोआपच थांबावी लागते. प्रारब्धकर्माला प्रतिबंध नसल्यामुळें ज्ञान्यालाहि तें भोगावें लागतें.

'भोगेन तु इतरे क्षपयित्वा संपद्यते।' ४।१।१९

म्हणजे प्रारब्धकर्माच्या क्षयानेंच मोक्ष मिळतो. जीवन्मुक्त हा सर्वज्ञ असतो म्हणजे त्याला सर्व कांहीं करतां येतें असें नव्हें, कांहीं ब्रह्मवेत्ते लोकोपकारार्थ त्यांना विशिष्ट अधिकार असतो म्हणून कांहीं कालपर्यंत कर्मे करतात व ब्रह्मत्वाप्रत जातात.

ब्रह्मज्ञान हें अनुभवारूढ आहे. ब्रह्मज्ञान होतांच मी सर्वात्मा आहें असा बोध होतो. ब्रह्मज्ञानी कांहीं कालपर्यंत शरीरधारणा करतो कीं नाहीं? कारण एकाच हृदयानें ब्रह्मवेदन व देहधारण कसें संभवतें? त्याचें उत्तर असें कीं ब्रह्मज्ञान होतांच ज्ञानी मरत नाहीं तर त्याचा देहात्मभाव नष्ट होतो व तसें झाल्यावर कांहीं काल म्हणजे प्रारब्धक्षयापर्यंत देहधारण संभवतें. असंसारी ब्रह्माचें ज्ञान झाल्यावर प्रवृत्तिनिवृत्तीचे विधि तेथें नाहींत.

तत्त्वमसि वाक्यानें ब्रह्मज्ञान होतांच, विद्या उत्पन्न होऊन अविद्या नष्ट होते. तत्त्वज्ञानाशिवाय प्रपंचप्रविलय करा असें शेंकडों वेळां जरी सांगितलें तरी शक्य नाहीं. ज्ञानक्षेत्रांत नियोग, आज्ञा, प्रेरणा, बलात्कार हीं संभवत नाहींत. प्रपंचावस्थेंत जो जीव नियोज्य असतो तोच ज्ञानावस्थेमध्यें अनियोज्य होतो. जीवाचें जीवत्व हें अविद्याकृत असल्यामुळें तें नियोज्य असतें, पण ब्रह्माच्या ठिकाणीं नियोगाचा अभाव असतो.

ज्ञानापूर्वी विधिनिषेध उपपन्न आहेत. त्यानंतर ते नाहींत 'दृष्टव्यः श्रोतव्यः' हीं वाक्यें विधि नसून तीं स्वाभाविक बहिर्मुख वृत्तीचा त्याग करून अंतर्मुख वृत्तीनें विचार करा असें सांगतात.

ब्रह्मज्ञानानंतर झालेलीं कर्मे कर्त्याला चिकटत नाहींत आणि अविद्येमुळें झालेलीं पूर्व कर्मे नष्ट होतात. कमलपत्राला जसें पाणी चिकटत नाहीं त्याचप्रमाणें कर्माचें होतें. ब्रह्मविद्येमध्यें कर्मक्षयार्थ प्रायश्चित्त नसलें तरी अकर्त्रात्मबोधानेंच कर्मक्षय होतो कर्तृत्व भोक्तृत्वाचा माझ्या ठिकाणीं संबंध नाहीं अशी ब्रह्मवेत्त्याची भावना असते, म्हणूनच मोक्ष उपपन्न होतो. नाहीं तर अनादि कालापासून प्रवृत्त असलेल्या कर्मांचा क्षयाभाव असल्यानें मोक्ष अशक्यच झाला असता. अकर्त्रात्मबोध ज्याला झाला आहे त्याला सुकृत दुष्कृत सर्व सारखींच होत.

सम्यक् ज्ञानाशिवाय काम्य व निषिद्ध वर्जनाची वृत्ति मरेपर्यंत जाणें शक्य नाहीं. कारण अत्यंत निपुण लोकसुद्धां अपराध करूं शकतात. तत्त्व-ज्ञानानेंच अशेष कर्माचा क्षय होतो. तात्पर्य ब्रह्मज्ञान झालें म्हणजेच कर्म-संबंध नष्ट होतो. अकर्त्रात्मबोध हा ब्रह्मज्ञानावाचून नसतोच. तो ज्याला उत्पन्न झाला त्याला सुकृतदुष्कृतांची मुळींच पर्वा नसते. ज्ञानामुळें कर्मबीज दाह होतो, असें मानलेंच पाहिजे, नाहीं तर एका कर्माचा क्षय झाल्यावर अदग्ध बीज दुसरें कर्म तेथें येऊन वसेल. सम्यक् दर्शनानें ज्यांचा तमोध्वंस झाला आहे, त्यांना पुनर्जन्म नाहीं. मुक्ताला मात्र अनेक शरीरें घेण्याची अपेक्षाच नसते. अध्यात्मविद्येचें फल मोक्षच होय.

ब्रह्मज्ञान्याला दुःखाचा अनुभव असतो काय ? देहाभिमान्यालाच मिथ्या ज्ञानानें मी सुखी, मी दुःखी, मी कर्ता, मी भोक्ता असा अनुभव असतो. जागृतींतील दुःखें सुषुप्तींत नसतात, आणि केवळ चैतन्य स्थितींत तर सर्व दुःखविमुक्तता असून आत्मानुभव प्रतीत होतो.

(अद्वैत वेदांत परंपरेंतील श्रीशंकराचार्य हे एक मोठे तत्त्ववेत्ते आहेत आणि त्यांचे सिद्धांतच आज विद्वानांमध्यें मान्य आहेत. त्यांनीं ब्रह्मवेत्ता कसा वागतो, त्याची लक्षणें काय व तो यथेष्ट आचार करतो कीं काय याचें विवेचन आणखी कांहीं ठिकाणीं फार उत्तम केलेलें आहे. तें मूळ भाष्य आणि त्यांचा भावार्थ यांसह येथें देतो. हेतु हा कीं हें वाचून तरी या ब्रह्मनिष्ठ म्हणवून घेणाऱ्या महाराज लोकांकडे पाहाण्याची लोकांची दृष्टि थोडी निवळावी.)

बृहदारण्यक अ. ३ ब्रा. ५

यस्मात्पूर्वे ब्राह्मणा एतमात्मानम् साधनफलस्वभावं विदित्वा सर्वस्मात्साधनफलस्वरूपादेषणालक्षणाद्व्युत्थाय भिक्षाचर्यं चरन्ति स्म । दृष्टादृष्टार्थं कर्म तत्साधनं च हित्वा । तस्मादद्यत्वेऽपि ब्राह्मणो ब्रह्मवित्पाण्डित्यं पण्डितभावमेतदात्मविज्ञानं पाण्डित्यं निर्विद्य निःशेषं विदित्वाऽऽत्मविज्ञानं निरवशेषं कृत्वेत्यर्थः । आचार्यत आगमतश्चैषणाभ्योव्युत्थाय । एषणाव्युत्थानावसानमेव हि तत्पांडित्यम् । एषणातिरस्कारोद्भवत्वादेषणाविरुद्धत्वात् । एषणामतिरस्कृत्य न

ह्यात्मविषयस्य पांडित्यस्योद्भव इत्यात्मज्ञानेनैव विहितमेषणाव्युत्थानम्। आत्मज्ञानसमानकर्तृकक्त्वाप्रत्ययोपादानलिङ्गश्रुत्या दृढीकृतम्।

भावार्थ--पूर्वीचे ब्रह्मवेत्ते आत्म्याला जाणून एषणांचा त्याग करून भिक्षाचर्यानें राहात असत. ब्रह्मवेत्ते ब्रह्मविद्या जाणून व एषणांचा त्याग करून असतात. विषय; वित्त द लौकिक या एषणांच्या तिरस्काराशिवाय आत्मज्ञान होतच नाहीं. म्हणून आत्मज्ञानाचें साधन एषणात्याग हें होय ! ज्याच्या ठिकाणीं एषणा म्हणजे इच्छा आहेत तो ब्रह्मवेत्ताच नव्हे.

तस्मादेषणाभ्यो व्युत्थाय ज्ञानबलभावेन बाल्येन तिष्ठासेत्स्थातुमिच्छेत्। साधनफलाश्रयणं हि बलमितरेषामनात्मविदाम्। तद्बलं हित्वा विद्वान्साधनफलस्वरूपात्मविज्ञानमेव बलं तद्भावमेव केवलमाश्रेयत् तदाश्रयणे हि करणान्येषणाविषय एनं हृत्वा स्थापयितुं नोत्सहन्ते। ज्ञानबलहीनं हि मूढं दृष्टादृष्टविषयाणामेषणायामेवैनं करणानि नियोजयंति, बलं नामा ऽऽत्मविद्ययाऽशेषविषयदृष्टिरतिरस्करणम्। अतस्तद्भावेन बाल्येन तिष्ठासेत्। तथा " आत्मना विन्दते वीर्यम् " इति श्रुत्यन्तरात्। " नायमात्मा बलहीनेन लभ्यः " इति च।

भावार्थ--ब्रह्मवेत्ता एषणात्याग करून बालभावानें राहातो. आत्मज्ञान हेंच त्याचें बल असतें. त्यामुळें त्याचीं इंद्रियें लौकिक एषणांत त्याला ओढून नेऊं शकत नाहींत. ज्ञानबलहीन जो मूढ असतो, त्याचीं इंद्रियें त्याला पाहिजे तिकडे ओढतात. पण आत्मबलवान् आत्मनिष्ठाला इंद्रियें कांहीं करूं शकत नाहींत.

बाल्यं च पाण्डित्यं च निर्विद्य निःशेषं कृत्वाऽथ मननान्मुनिर्योगी भवति। एतावद्धि ब्राह्मणेन कर्तव्यं यदुत सर्वात्मप्रत्ययतिरस्करणमेतत्कृत्वा कृतकृत्यो योगी भवति। अमौनं चाऽऽत्मज्ञानमात्मप्रत्ययतिरस्कारौ पांण्डित्यबाल्यसंज्ञकौ निःशेषं कृत्वा मौनं नामानात्मप्रत्यय तिरस्करणस्य पर्यवसानं फलं तच्च निर्विद्याथ ब्राह्मणः कृतकृत्यो भवति। ब्रह्मैव सर्वमिति प्रत्यय उपजायते। स ब्राह्मणः कृतकृत्योऽतो ब्राह्मणः ॥

भावार्थः—बाल्य व पांडित्य या दोन्ही अवस्था भोगून पुढें तो मननानें योगी होतो. ब्रह्मवेत्त्यानें सर्व अनात्म प्रत्ययांचा तिरस्कार करून मौन व अमौन यांचाहि त्याग करून सर्वत्र ब्रह्म आहे या अनुभवांतच राहावें व त्यामुळेंच तो कृतकृत्य होतो.

परमार्थावस्थायां सर्वव्यवहाराभावं वदन्ति वेदान्ताः सर्वे।
व्यवहारावस्थायांतु उक्तः श्रुतावपि ईश्वरादि व्यवहारः। २।१।१४
सर्व व्यवहाराणामेव प्रागब्रह्मात्मताविज्ञानात् सत्यत्वोपपत्तेः।२।१।१४

परमार्थावस्थेमध्यें सर्व व्यवहाराचा अभाव असला तरी त्यापूर्वी सर्व व्यवहार उपपन्न होतात.

ब्रह्मवेत्ता यथेष्ट आचार करतो काय?

छांदोग्य उपनिषत् अध्याय २ खंड २३ वरील शांकरभाष्य

एकत्वप्रत्ययविधिजनितेन प्रत्ययेन विधिनिमित्तभेदप्रत्ययस्योपमर्दितत्वाद्यमनियमाद्यनुपपत्तिः परिव्राजकस्येति चेत् । न । बुभुक्षादिनैकत्वप्रत्ययात्प्रच्यावितस्योपपत्तेर्निवृत्त्यर्थत्वात् । नच प्रतिषिद्धसेवाप्राप्तिः। एकत्वप्रत्ययोत्पत्तेः प्रागेव प्रतिषिद्धत्वात् । न हि रात्रौ कूपे कण्टके वा पतित उदितेऽपि सवितरि पतति तस्मिन्नेव । तस्मात्सिद्धं निवृत्तकर्मा भिक्षुक एव ब्रह्मसंस्थ इति ॥

भावार्थ—एकत्वप्रत्यय विधिजनित जो अनुभव त्यानें विधीचें निमित्त असा जो भेदप्रत्यय त्याचा नाश केलेला असल्यामुळें परिव्राजकाला यमनियमादींची अनुपपत्तिच आहे, म्हणजे तो यथेष्ट आचरण करूं शकेल असा पूर्वपक्ष. परंतु क्षुधा, तृषा इत्यादि दोषांनीं ज्याला एकत्वापासून प्रच्यावित केलेलें आहे त्याला त्या दोषांच्या निवृत्तीकरितां यमादिकांची जरूर असते. म्हणून संस्कारवशानें तो यमादि नियमाकडे वळतो. विद्वानाला प्रतिषिद्ध आचरणाची प्राप्तीच नाहीं. कारण एकत्वप्रत्ययापूर्वीच प्रतिषिद्ध कर्मांचा निषेध केलेला असतो. अहोरात्रींसुद्धां जो काट्यांत अगर विहिरींत पडत नाहीं तो दिवस उगवल्यावर काट्याकुट्यांत पडत नाहीं हें काय सांगावयाला पाहिजे ?

ब्रह्मसूत्र अध्याय २ पाद ३ सूत्र ४८

सत्यं व्यतिरेकदर्शिनो नियोज्यत्वं तथापि व्योमादिवद्देहाद्यसंहतत्व-मपश्यत एवात्मनो नियोज्यत्वाभिमानः । नहि देहाद्यसंहतत्वदर्शिनः कस्यचिदपि नियोगो दृष्टः । किमुतैकात्म्यदर्शिनः । नच नियोगाभावा-त्सम्यग्दर्शिनो यथेष्टचेष्टाप्रसंङ्गः । सर्वत्राभिमानस्यैव प्रवर्तकत्वाद-भिमानाभावाच्च सम्यग्दर्शिनः । तस्माद्देहसंबन्धादेवानुज्ञापरिहारौ । ज्योतिरादिवत् ।

देह व आत्मा यांत जे भेद पाहातात त्यांचे ठिकाणीं नियोग म्हणजे आज्ञा संभवते व तिचा अभिमानहि संभवतो. देहादींशीं आपला कांहींच संभव नाहीं अशाला नियोग संभवत नाहीं. मग ब्रह्मात्मैक्य जाणणारे जे आहेत त्यांना तो संभवत नाहीं, हें काय सांगावयास पाहिजे! ऐकात्म-दर्शीला नियोगाचा अभाव आहे म्हणजे यथेष्टाचरणाला अनुज्ञा आहे असें नव्हे. यथेष्टाचरण हें अभिमानानेंच घडतें व ज्ञान्याला देहाभिमान नसतो. म्हणून ज्ञान्याकडून यथेष्टाचरण घडेल हें संभवत नाहीं. तात्पर्य, देहसंबंधा-मुळेंच अनुज्ञा व परिहार संभवतात.

हाच विषय ब्रह्मसूत्रभाष्य अध्याय ३ पाद ४ सूत्र ५० मध्यें आलेला आहे.

'अनाविष्कुर्वन्नन्वयात्'

या सूत्रावर आचार्य असा प्रश्न उत्पन्न करतात कीं ब्रह्मज्ञानापूर्वी सर्व वैदिक व लौकिक व्यवहार ब्रह्मवेत्त्यानें केलेच पाहिजेत. पण ज्ञानोत्तर तो वाटेल तसा वागतो कीं काय ? त्याचें उत्तर असें कीं यथेष्टाचार हा शक्य नाहीं. ज्ञाता बाल्यभावानें राहातो, यांतील बाल्य शब्दाचा अर्थ 'दंभ-दर्पादि रहितत्वम्' 'अप्ररूढेंद्रियत्वम्' असाच ते करतात. म्हणजे मुलाच्या इंद्रियांत जी शक्ति असते ती अप्ररूढ म्हणजे विकसित न झाल्यामुळें लहान मूल जसें स्वतःला पुढें पुढें न करतां दंभ व दर्परहित असतें त्याप्रमाणेंच हा सत्पुरुष असतो.

'ज्ञानाध्ययनधार्मिकत्वादिभिरात्मानमविख्यापयन्दम्भदर्पादिरहितो भवेत्-यथा बालोऽप्ररूढेन्द्रियतया न परेषामात्मानमाविष्कर्तुमीहते तद्वत्'।

तसेंच स्मृतीमध्येंहि पुढील वचन आहे.

यं न सन्तं न चासन्तं नाश्रुतं न बहुश्रुतम् ।
न सुवृत्तं न दुर्वृत्तं वेद कश्चित्स ब्राह्मणः ॥
गूढधर्माश्रितो विद्वानज्ञातचरितं चरेत् ।
अन्धवज्जडवच्चापि मूकवच्च महीं चरेत् ॥

जो स्वतः आहे कीं नाहीं, विद्वान् का अविद्वान्, सुवृत्त का दुर्वृत्त याचा पत्ताहि लोकांना न लागूं देतां अगदीं अज्ञात स्वरूपांत असतो म्हणजे त्याच्या ठिकाणीं अमानित्व, अदंभित्व या वृत्ति असतात अर्थात् तो वाटेल तसा भ्रष्टाचार तर कधींच करीत नाहीं.

आद्य शंकराचार्यांच्या खालोखाल अद्वैत परंपरेमध्यें श्रीविद्यारण्यांना मान आहे. तेव्हां त्यांचें सत्पुरुषाविषयींचें मत येथेंच देणें योग्य वाटतें तें देऊन व समदृष्टीवद्दल श्रीएकनाथ व श्रीसमर्थ काय म्हणतात हें सांगून, हें प्रकरण आवरतें घेतों.

पं. विद्यारण्य यांचा पंचदशीनामक वेदांतशास्त्रावर एक प्रकरण ग्रंथ आहे. त्यांतील चौथ्या प्रकरणांत ते म्हणतातः—

तत्त्वं बद्ध्वापि कामादीन्निशेषं न जहासि चेत् ।
यथेष्टाचरणं ते स्यात्कर्मशास्त्रातिलङ्घनः ॥५४॥
बुद्धाद्वैतसतत्त्वस्य यथेष्टाचरणं यदि ।
शुनां तत्त्वदृशां चैव को भेदोऽशुचिभक्षणे ॥५५॥

तसेंच सातव्या प्रकरणामध्यें पुढील श्लोक आहेत.

अथवा कृतकृत्योऽपि लोकानुग्रहकाम्यया ।
शास्त्रीयेणैव मार्गेण वर्ते ऽहं का मम क्षतिः ॥२६८॥
देवार्चनस्नानशौचभिक्षादौ वर्ततां वपुः ।
तारं जपतु वावतद्वत्पठत्वाम्नायमस्तकम् ॥२६९॥
विष्णुं ध्यायतु धीर्यद्वा ब्रह्मानन्दे विलीयताम् ।
साक्ष्यहं किंचिदप्यत्र न कुर्वे नापि कारये ॥२७०॥

या श्लोकांचा भाव असा आहे कीं साधक जर तत्त्वज्ञान झाल्यावर सुद्धां काम, क्रोध, लोभ इत्यादि दुष्ट विकारांना न टाकील,तर अहंकारानें त्याचे-कडून विधिनिषेधांचें उल्लंघन होईल व तो साधक यथेष्टाचार करील. आत्मज्ञानी मनुष्य जर यथेष्टाचरण करूं लागेल तर कुत्रीं व तत्त्ववेत्ते यांमध्यें

स्थळ प्रत
सं. ..... नं. .....
ता. .....

अमंगल पदार्थ भक्षण करणाऱ्या विषयीं भेद तरी कोठून राहाणार ? कारण कुत्रीं जशी विष्टा भक्षण करतात तशाच ज्ञानीहि करील. तात्पर्य, खरा तत्त्ववेत्ता यथेष्ट आचार करीत नाहीं.

सातव्या प्रकरणांत विद्यारण्य म्हणतात कीं जो खरा ज्ञानी असतो तो कृतकृत्य झाल्यामुळें लोकानुग्रहार्थ शास्त्रीय अशा मार्गानींच वागतो, व तसें वागण्यांत त्याला कमीपणा मुळींच वाटत नाहीं. देवार्चन, स्नान, शौच, भिक्षा, वेदांतशास्त्राचें अध्ययन, प्रणवाचा जप या सर्व गोष्टी तो करतो. इतकेंच नव्हे तर ब्रह्मानंदांत लीन असतांना सुद्धां विष्णूचें ध्यान साक्षित्वानें करून तो अलिप्त असतो.

आतां येथें प्रसंगप्राप्त म्हणून मुक्ताच्या समदृष्टित्वाचें थोडें विवेचन करतों. कारण लोकांमध्यें **सर्वत्र समदृष्टि** म्हणजे वाटेल तसें वागणें अशी अडाणीपणाची समजूत आहे. त्या समजुतीचें निराकरण श्रीएकनाथ व श्रीसमर्थ यांनीं केलेलें आहे. तें त्यांच्याच शब्दांवरून चांगलें समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें विवेचन अधिक न करतां तें त्यांच्याच शब्दांत देतों.

समदृष्टि म्हणजे काय ? साखर आणि माती, पंडित आणि चावट पोरें, राजहंस आणि कोंबडे व मनुष्य आणि गधडे, हीं सर्व सारखीं मानून व्यवहार करणें चुकीचें होय ! दृष्टीमध्यें म्हणजे वृत्तीमध्यें समत्व लागतें. चित्ताचें समत्व हेंच योगाचें सार होय ! गाईला अन्न वाढणें व ब्राह्मणाला गवत खावयास घालणें ही समदृष्टि नव्हे किंवा कुत्र्याला बसावयास सिंहासन देऊन साधूपुढें पटकुर टाकणें हेंहि समत्व नव्हे. ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या अधिकारानुरूप वागविणें व शुद्ध सात्त्विक भावनेनें अखंड असणें हेंच चित्ताचें समत्त्व होय ! परमेश्वरहि जे मला ज्या भावानें शरण येतात त्यांना मी तसेंच फल देतों असें म्हणतो.

श्रीएकनाथी---भागवत अ. ३

नवल श्रद्धेचें लक्षण । ब्रह्मा मुंगी समसमान ।
तरी यथोचित विधान । सर्वथा जाण चुकेना ॥ ३७० ॥
अर्घ्यपाद्यादि पूजन । सकळ दान आणि सन्मान ।
हे श्रद्धा ब्राह्मणीं संपूर्ण । एकासी तें जाण अन्नमात्रचि ॥ ३७१ ॥

एका अन्न आच्छादन । एकासी ते कोरडे कण ॥
एका तृण आणि जीवन । एका पयपान यथोचित ॥ ३७२ ॥
जेणें ज्यासी सुख संपूर्ण । तें तें करी उचित श्रद्धें जाण ।
अनुचित श्रद्धेचें विंदाण । दुःखकारी संपूर्ण सर्वार्थीं ॥ ३७३ ॥
जेवीं ब्राह्मणा वाढिलें तृण । गाईस वाढिलें मिष्टान्न ।
श्वानासी वैसणें सिंहासन । साधूसी आसन थारोळा ॥ ३७४ ॥
व्याघ्रासी पडिल्या लंघन । त्यासी अर्पूं नये गोदान ।
गाय गादल्या संपूर्ण । तैलाभ्यंजन करूं नये ॥ ३७५ ॥
हो कां देह इंद्रियें जरी एकें । तरी जिव्हाकर्म नव्हे नाकें ।
तेवीं एक भूतात्मा भूतवेखें । उचितोन्मुखें यजावा ॥ ३७६ ॥
करितां यथोचित अर्पण । जरी क्रिया दिसे भिन्न भिन्न ।
तरी अंतरश्रद्धा अभिन्न । हें मुख्य लक्षण भागवत धर्मीं ॥ ३७७ ॥

वरील ओव्यांचा अर्थ स्पष्ट आहे. त्यावरून सर्वभूतीं समत्व म्हणजे काय हें कळेल.

श्रीसमर्थही ' समत्वाविषयीं ' पुढीलप्रमाणें लिहितात.

दासबोध दशक १३ समास ८

रायापासून रंकवरी । अवघ्या मनुष्यांचिया हारी ।
सगट समान सरी । कैसी करावी ॥ ८ ॥
देव दानव मानव । नीच योनी हीन जीव ।
पापी सुकृति अभिप्राव । उदंड आहे ॥ ९ ॥
येकांशें जग चाले । परी सामर्थ्य वेगळालें ।
येका संगें मुक्त केलें । येका संगें रवरव ॥ १० ॥
साकर माती पृथ्वी होये । परी ते माती खातां नये ।
गरळ आप नव्हे काये । परी तें खोटें ॥ ११ ॥
पुण्यात्मा आणि पापात्मा । दोहींकडे अंतरात्मा ।
साधु भोंदु सीमा । सांडूंच नये ॥ १२ ॥
पंडित आणि चाटें पोरें । येक कैसीं ॥ १३ ॥
मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंवडे ।

राजे आणि माकडें । येक कैसीं ॥ १४ ॥
भागीरथीचें जळ आप । मोरी संवदणीचें तेंहि आप ।
कुश्चिळ उदक अल्प । सेववेना ॥ १५ ॥
या कारणें आचार शुद्ध । त्या उपरी विचारशुद्ध ।
वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥ १६ ॥

ब्रह्मनिष्ठसुद्धां आचारशुद्ध, विचारशुद्ध, विरक्त आणि सुबुद्ध असा पाहिजे असें श्री समर्थ म्हणतात.

तुकारामासारखे सत्पुरुषसुद्धां काय सांगतात तें पाहा—

परपीडक तो आम्हा दावेदार । विश्वीं विश्वंभर म्हणवुनी ।

म्हणजे सर्वाभूतीं जरी विश्वंभर असला, म्हणजे एक तत्त्व असलें तरी परपीडकाचा तिरस्कार अवश्य केलाच पाहिजे आणि जशास तसें, नेमकें, तंतोतंत असेंच सापेक्ष वर्तन केलें पाहिजे.

तुकाराम एके ठिकाणीं म्हणतात कीं,

" सर्पविंचू नारायण । परी ते **वंदावे दुरून** ॥ "

सर्पविंचू इत्यादि प्राणीसुद्धां नारायणरूप असले तथापि त्यांना जवळ जाऊन मिठी मारावयाची नाहीं, तर दुरूनच त्यांच्याकडे पाहावयाचें. जो जसा भेटेल व जसा असेल त्याच्याशीं त्याचें यथातथ्य स्वरूप समजून घेऊन तसेंच वागणें, हेंच खरें समत्व होय ! तसें वर्तन न घडल्यास हानि होण्याचा प्रसंग येतो.

समत्व बुद्धियुक्त ज्ञानी देशकाल पाहातात; कुल, समाज व देश पाहातात; पात्रापात्रविचार करतात आणि 'घटापुढे घट' व 'खटनटापुढें खटनट' आणून सापेक्ष वर्तन करतात. एकांतिक निरपेक्ष वर्तन हें कधींच शक्य नाहीं.

आतां वृत्तीचें किंवा बुद्धीचें समत्व म्हणजे हर्ष, विषाद, शोक, मोह, स्तुति, निंदा, मानापमान, शुभ, अशुभ या सर्व स्थितीत वृत्तीचें स्थैर्य कायम ठेवणें हें होय. यालाच गीतेमध्यें 'समत्वं योगमुच्यते' असें म्हटलें आहे. सिद्धि व असिद्धि या ठिकाणीं वृत्ति सम ठेवून अखंड कर्मे करीत राहणें हेंच समत्व होय. हें समत्व अंगीं बाणण्याकरितां अनेक कार्ये करावीं

लागतात. विकार उत्पन्न होण्याचे म्हणजे समत्व ढळण्याचे विविध प्रसंग ज्या वेळेला येतील त्याच वेळीं समत्ववृत्ति दृढ होते. तात्पर्य समत्व म्हणजे सर्व सारखें व सर्व सारखें म्हणजे ना बरें ना वाईट, अशी जी समजूत आहे ती सर्वथैव चुकीची आहे. असो.

समाजांत ब्रह्मवेत्त्यासंबंधीं जशा चुकीच्या कल्पना आहेत तशाच त्या गुरुसंबंधींहि आहेत. तथापि त्यांचा विचार विस्तारभय स्तव पुढील प्रकरणावरच टाकणें वरें!

प्रकरण ८ वें. : :

गुरुकृपा व मोक्ष

गेल्या प्रकरणांत मुख्यतः शांकरभाष्याधारें मुक्ताच्या स्वरूपाचें विवेचन केलें.आतां आपल्या समाजामध्यें मनुष्याला जें कांहीं मिळतें तें गुरूच्या कृपेनेंच मिळतें, मोक्ष किंवा ब्रह्मज्ञान हें गुरुकृपेवांचून होत नाहीं, जर मोक्ष संपादन करादयाचा असेल तर गुरूलाच शरण जावें, त्याची सर्व प्रकारची सेवा करावी, त्याला प्रसन्न करून घ्यावें म्हणजेच मनुष्य कृतार्थ होतो अशा ज्या समजुती आहेत, त्यांना अनुसरून प्रस्तुत प्रकरणामध्यें गुरूचीं लक्षणें कोणतीं, तो कसा असावा, ज्ञानप्राप्ति कशामुळें होते अशा प्रश्नांचा विचार करण्याचें योजिलें आहे.

प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आजच्या या ज्ञानयुगामध्यें ज्ञानाचीं साधनें पुष्कळ सुलभ झालीं असल्यामुळें या कालांत कोणी गुरूचें महत्त्व अवास्तव सांगूं लागेल तर हंसूंच येईल. मुद्रणकलेनें आणि वाहतुकीच्या साधनानें ज्ञानाचीं द्वारें सर्वांना सताड उघडीं केलीं असल्यामुळें आज आपणांस गुरूचें महत्त्व व श्रेष्ठत्व पूर्वीइतकें वाटत नाहीं, हें सहजच आहे. परंतु ज्या कालीं मुद्रणकला नव्हती, फार काय पण लिपीहि नव्हती, अशा काळीं जें ज्ञान

पठणपाठण परंपरेनें समाजांत वावरत होतें त्या वेळीं त्या ज्ञानाची व त्या ज्ञानदात्या मनुष्याची किंमत श्रेष्ठ वाटावी, यांत कांहीं आश्चर्य करण्याजोगें नाहीं. पूर्वीं आजच्यासारख्या मुक्तद्वारी शाळा नव्हत्या. ज्ञानाची देवाण-घेवाण ही विशिष्ट वर्गांतच होई. त्यामुळें विशिष्ट वर्गच ज्ञानसंपन्न असे. सर्वसामान्य समाज हा विद्या व ज्ञान यांपासून बराचसा दूर होता.

अव्वल इंग्रजींत इंग्रजी जाणणारे दुर्मिळ होते, त्यामुळें इंग्रजी पांच-चार ईयत्ता झालेल्यांना ओढून नेऊन मामलेदार व मुन्सफ करीत असत ! आज तशी स्थिति आहे काय ? हीच स्थिति फार प्राचीन काळीं विद्वानांची असली पाहिजे. वेद, वेदांगें, उपवेद, शास्त्रें, वगैरे चौदा विद्या जाणणारे लोक समाजांत थोडे होते आणि त्यांच्याकडे शिकावयाला सुद्धां फार थोडेच लोक जात असत. म्हणून शिकविणाऱ्यांची मिजास एवढी होती कीं १२।१२ वर्षें शिष्य झाडलोट करीत राहिले तरी ते त्यांना शिकवीत नसत. अगदीं अलीकडील शास्त्री, वैदिक, गवई यांच्या आख्यायिका जरी आपण घेतल्या तरी हेंच दिसतें कीं वारान्वारा चोवीस वर्षें ज्यांनीं गुरु-गृहामध्यें पाहिजे ती गुरुसेवा करून काढलीं त्यांनाच विद्या प्राप्त झाल्या ! !

गुरूचे घरीं झाडितो सारवीतो । मला तो गमे भूतळींचा रवी तो ॥

या प्राकृत कवितेपासून तों गुरुगीतेंतील 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु' या श्लोकापर्यंत गुरुस्तुति व गुरुसेवा यांचेंच वर्णन आहे, झाडणें, लोटणें तर राहोच पण मलमूत्र स्वच्छ करण्यापर्यंतचीं सर्व कामें शिष्यांनीं केलीं! गुरूच्या पिकदाण्या धुणें, गांजा चोळून देणें व तंबोरा छेडणें असलीं कामें कित्येक वर्षें केल्यानंतर ज्यांना गायनविद्या आली असले गवई आजहि हयात आहेत, पण ते मात्र आज दुसऱ्यांकडून पूर्वीप्रमाणें सेवेची इच्छा करीत नाहींत, हेंहि तितकेंच खरें आहे. ज्ञानवानांची संख्या कमी असणें व ज्ञानप्रसाराचीं साधनें बिलकुल नसणें, या स्थितींतूनच विद्वान गुरूचें महत्त्व उपस्थित झालें. अर्थात् त्या मानानें ब्रह्मज्ञान देणाऱ्या गुरूचें वर्णन देवाइतकें झालें असल्यास कांहींच आश्चर्य नाहीं. श्वेताश्वेतर उपनिषदांमध्यें पुढील श्लोक आहे.

यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥

ब्र. ५

त्यावरून देव व गुरु यांच्या ठिकाणीं ज्याची दृढभक्ति असते, त्यालाच हें ज्ञान होतें असें दिसतें. पण सांप्रत भौतिक शास्त्राच्या वाढीमुळें पुष्कळसे निसर्ग–नियम कळूं लागल्यामुळें देवाचेंहि महत्त्व कमी झालें आणि विद्वानांची वाढती संख्या व ज्ञानप्रसाराचीं वाढतीं साधनें यांमुळें विद्येची आणि गुरूंचीहि अपूर्वाई पहिल्यासारखी राहिलेली नाहीं.

आतां मोक्षाकरितां गुरूला शरण जाण्यासंबंधीं तत्त्वज्ञानप्रधान अशा उपनिषदामध्यें काय विचार केला आहे तो पाहूं !

परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन ।
तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ।।१२।।

प्रथम मुंडक द्वि. खं.

अर्थ–वेदविद्यासंपन्न मनुष्य कर्माच्या योगानें प्राप्त होणाऱ्या लोकांचें परीक्षण करून व नुसत्या कर्मानें आत्मज्ञान होत नाहीं हें पाहून त्याला वैराग्य उत्पन्न होतें. अशा माणसानें समिध हातीं घेऊन तें आत्मस्वरूप यथातथ्य जाणण्याकरितां वेदविद्यासंपन्न व ब्रह्मनिष्ठ अशा गुरूला शरण जावें.

वरील मंत्रांत उपभोगलालसा ज्याची कमी झाली, त्यानें ब्रह्मविद्येमध्यें निष्णात व वैदिक धर्मामध्यें निष्णात अशा गुरूला शरण जावें, व पुढील मंत्रांत अशा विद्वानानें प्राप्त झालेल्या अशा शिष्यास विद्या शिकवावी असें म्हटलें आहे. विरक्त असा अधिकारी पाहून अशा ज्ञात्या गुरूनें मस्तकावर हात ठेवून त्याला कृतार्थ करावें असें येथें बिलकुल म्हटलेलें नाहीं. पुढील कांहीं मंत्रांमध्यें ब्रह्मज्ञानाचीं साधनें सांगितलेलीं आहेत, अर्थात् तींहि विचारार्ह आहेत.

वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः । संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्त्वाः ।।
ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले । परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ।। ६ ।।

—तृतीय मुंडक द्वि. खं.

अर्थ–वेदांताचें ज्ञान ज्यांना सुनिश्चित झालें आहे आणि ज्यांचें अन्तःकरण वैराग्यानें शुद्ध झालेलें आहे, तेंच ब्रह्मलोकामध्यें जाऊन प्रलयाचे वेळीं मुक्त होतात.

या मंत्रांत वेदांताचें ज्ञान व विज्ञान (अनुभव) सुनिश्चित पाहिजे व पूर्ण वैराग्यहि पाहिजे. ज्ञान व वैराग्य हीं मोक्षाचीं साधनें सांगितलीं आहेत.

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा । सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम्।।
अंन्तःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो। यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः।।५।।

—तृतीय मुंडक प्र. खं.

अर्थ—सत्यानें, तपानें, ब्रह्मचर्यानें आणि सम्यक् ज्ञानानेंच आत्मप्राप्ति होते. ज्यांच्या अन्तःकरणांतील मल, विक्षेप व आवरण इत्यादि दोष गेलेले आहेत, असे यति त्या आत्म्याला आपल्या अंतःशरीरांत पाहातात.

येथेंहि सत्य, ब्रह्मचर्य, सम्यक् ज्ञान हेच मोक्षाचे उपाय सांगितलेले असून सम्यग्ज्ञानहोण्याकरितां गुरूकडे जावें, असाच निष्कर्ष निघतो. गुरुकृपा संपादन करून वरदहस्त प्राप्त करून घ्यावा असें येथेंहि म्हटलेलें नाहीं. याहिपेक्षां साधनांचें स्पष्टीकरण पुढील मंत्रांत आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो । न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यः। तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम् ।।३।।

—तृतीय मुंडक द्वि. खं

अर्थ—हा आत्मा नुसत्या व्याख्यानानें प्राप्त होत नाहीं, तर्कबुद्धीनें प्राप्त होत नाहीं, किंवा बहुश्रुतपणानेंहि प्राप्त होत नाहीं. तर जो कोणी या आत्म्याचा शोध मोठ्या निष्ठेनें, प्रेमानें व सद्भावानें करितो, त्यालाच तो आत्मा आपलें स्वरूप दाखवितो.

येथेंहि तीव्र जिज्ञासा, शुद्ध व कुशाग्र बुद्धि हींच आत्मप्राप्तीचीं साधनें सांगितलेलीं आहेत. गुरुकृपा व वरदहस्त यांचा मुळींच संबंध नाहीं.

तत्त्वज्ञानप्रधान अशा उपनिषद् ग्रंथामध्यें गुरूकडून कानमंत्र घेणें, त्याची सेवा करणें व त्याला प्रसन्न करून घेणें या विषयाचा मागमूसहि नाहीं. मात्र उत्तरकालीन वेदांतग्रंथामध्यें ही कल्पना अनेक सांप्रदायिकांनीं घेतली असल्यामुळें दीक्षागुरूचें महत्त्व फार वाढलें. वास्तविक त्रैवर्णिकांना उपनयनाचे वेळीं जो गायत्री मंत्राचा उपदेश होतो; तीच खरी दीक्षा होय ! पण अलीकडे दीक्षागुरु, मोक्षगुरु असे गुरू लागूं लागले व त्यांचें महत्त्वहि वाढलें !

कोणतेंहि ज्ञान संपादन करण्याला गुरूची आवश्यकता आहेच. आजच्या वैज्ञानिक युगांतसुद्धां त्याची जरूर कमी नाहीं, पण ती जरूरी दिशा दाखविण्यापुरती आहे आणि ती दाखविली गेली म्हणजे बाकीचा मार्ग हा ज्याचा त्यानेंच आक्रमण करणेचा आहे. जिज्ञासा, बुद्धिमत्ता, अवलोकन, दीर्घप्रयत्न यांच्या योगानें दिशा कळल्यावर ज्ञानसंपन्न व्हावयाचें असतें, परंतु समाजांत मात्र अगदीं विपरित कल्पना वावरत आहेत.

उपनिषदामध्यें राजा जनक व याज्ञवल्क्य, नारद व सनत्कुमार, नचिकेता नि यम, उद्दालक व श्वेतकेतु इत्यादिकांचे तत्त्वज्ञानविषयक मोठे गंभीर मजेदार संवाद आलेले आहेत. पुष्कळ ठिकाणी शिष्य व गुरु असेंहि नातें आहे. पण कोठेंहि गुरूनें शिष्याच्या मस्तकावर हात ठेवून ब्रह्म दाखविण्याची कृति स्वीकारलेली नाहीं. सनत्कुमार व नारद यांचीं बरींच प्रश्नोत्तरें झालीं आहेत. त्याचप्रमाणें जनक व याज्ञवल्क्य, नचिकेता व यम यांचींहि झालीं असून तेथें कोठेंहि, " शिष्या ये, तुझ्या डोक्यावर हात ठेवतों व तुला आतां कृतार्थ करतों " असें म्हटलेलें नाहीं. पण आश्चर्य असें कीं शिष्यसेवेनें गुरु संतुष्ट झाला कीं तो शिष्य-मस्तकावर वरदहस्त ठेवतो व तो ठेवल्यावरोबर विजेचें बटन दाबतांच जसा प्रकाश पडतो तसा हृदयांत ब्रह्मज्ञानाचा प्रकाश पडून तो कृतार्थ होतो, अशी भ्रामक समजूत आहे. या समजुतीला उपनिषदादि ग्रंथांमध्यें मुळींच आधार नाहीं. भारत, भागवत, गुरुचरित्र आणि अलीकडील प्राकृत ग्रंथ यांमध्येंच या कल्पनेला आधार मिळतात, परंतु ते अर्थवादात्मक म्हणजे स्तुतिपर समजले पाहिजेत.

कोणतेंहि शास्त्रीय ज्ञान संपादन करावयाचें झाल्यास सर्व ठिकाणीं गुरूची आवश्यकता सारखीच भासते. गुरूकडे जाणें, त्याला प्रश्न विचारणें, त्याचेकडून विषयाचें ज्ञान करून घेणें आणि त्याच्या सहवासांत राहून त्याची सेवा करणें हे तें ज्ञान मिळविण्याचे मार्ग होत. श्रीमत् भागवतामध्यें यदु व अवधूत यांचा संवाद आला आहे, त्यांत अवधूतानें चोवीस गुरू केल्याचें सांगितलें आहे. त्या चोवीस गुरूंमध्यें पृथ्वी, आप, तेज यांसारखे जड पदार्थ, पक्षी, एक लहान मुलगी, पिंगला नामक वेश्या आणि लोहार यांचाहि

समावेश झालेला आहे, म्हणजे इतक्या गुरूंकडून अवधूतानें एकेक गुण घेतला व तो अंगीं वाणविण्याचा अभ्यास केला; एवढेंच यावरून निष्पन्न होतें. अवधूताच्या या गोष्टीमध्यें गुरुसेवेला फारशी जागाच राहात नाहीं. अर्थात् गुरुसेवाच जेथें नाहीं तेथें कृपेचा प्रश्न कसा उद्भवणार?

जिज्ञासु मनुष्य प्रत्येक पदार्थापासून आणि व्यक्तीपासूनहि कणाकणानें ज्ञान संपादन करीत असतो. तसा ज्ञानसंचय करून व तो पचवून मनुष्य ज्ञानी होतो. उपनिषदामध्येंहि (केन)

'भुतेषुभूतेषु विचिंत्य धीराः प्रेत्यास्मांल्लोकादमृता भवंति।'

असें सांगितलें आहे. त्या दृष्टीनें पाहिल्यास ज्ञान संपादन करण्यास ग्रंथ, व्यक्ति, गुरु व स्वतःचें अवलोकन यांची जरूर असून श्रद्धा, संयम व दीर्घ प्रयत्न यांची जर त्यास जोड मिळाली तर तें ज्ञान मोक्षोपयोगी होतें असें दिसतें. केव्हांहि ज्ञान हें बुद्धीचा विषय असल्यामुळें व तें वस्तुतंत्र असल्यामुळें तेथें गुरुकृपेपेक्षां कुशाग्र बुद्धीचा योग अधिक इष्ट आहे. तात्पर्य कृपेनें ज्ञान होणार नाहीं, कृपेनें कांहीं मिळणार नाहीं, तर जें कांहीं मिळावयाचें तें कर्मानें व यत्नानें मिळतें असाच सिद्धांत आहे.

उपनिषदामध्यें गुरुसेवा व गुरुकृपा यांना महत्त्व दिलेलें नसून कुशाग्रता, बुद्धिमत्ता आणि परिश्रम यांना महत्त्व दिलेलें आहे. प्रणिपात व सेवा हीं परिप्रश्नांचीं अंगें होत. कारण कोणाकडेही गेल्यावर (नम्रतेनें वागून) आपलेपणा उत्पन्न झाल्याशिवाय कोण कोणाशीं मनमोकळेपणानें बोलणार आहे? प्रश्नोपनिषदामध्यें पुढील वाक्य आहे.

"तान्ह स ऋषिरुवाच। भूय एव तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ। यथाकामं प्रश्नानपृच्छत। यदि विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति"

अर्थ— ब्रह्मज्ञान संपादन करण्याकरितां आलेल्या शिष्यांना पिप्पलादि ऋषि म्हणतात, 'पुन्हां एक वर्षपर्यंत तप, ब्रह्मचर्य आणि श्रद्धा यांनीं युक्त होऊन तुम्ही असेच राहा. जसे सुचतील तसे प्रश्न विचारा व आम्हांला कळेल तसें आम्हीं तुम्हांस सांगू.

याहि वाक्यावरून श्रद्धा, तप, जिज्ञासा व ब्रह्मचर्य हींच ज्ञानसाधनें होत असें ठरतें.

छांदोग्योपनिषदामध्यें याहिपेक्षां जास्त स्पष्ट असा ज्ञानप्राप्तीचा मार्ग सांगितलेला असून तेथें गुरुकृपेचा मुळींच संबंध नाहीं हें वाचकांना पुढील विवेचनावरून कळून येईल.

"यथा सोम्य पुरुषं गंधारेभ्योऽभिनद्धाक्षमानीय तं ततोऽतिजने विसृजेत्स यथा तत्र प्राङ्वोदङ्वाऽधराङ्वा प्रत्यङ्वा प्रध्मायीता भिनद्धाक्ष आनीतोऽभिनद्धाक्षो विसृष्टः (६-१४-१) तस्य यथाभिनहनं प्रमुच्य प्रब्रूयादेतां दिशं गंधारा एतां दिशं व्रजेति संग्रामाद्ग्रामं पृच्छन् पंडितो मेधावी गन्धारानेवोपसंपद्येतेवमेवेहाचार्यवान् पुरुषो वेद।"
(६-१४-२)

अर्थ—वत्सा! ज्याचे डोळे बांधले आहेत असा मनुष्य कंदाहार देशांतून आणन पुढें त्याला ओसाड प्रदेशांत सोडावा. मग तो ज्याप्रमाणें त्या ओसाड जागीं पूर्व, उत्तर, दक्षिण किंवा पश्चिम या दिशेकडे तोंड करून 'डोळे बांधलेल्या स्थितींत आणलेला आणि डोळे बांधलेल्या स्थितींतच सोडलेला असा मी आहें; कोणी तरी साह्य करा' असें मोठ्यानें ओरडतो, व ज्याप्रमाणें त्याचें बंधन सोडून, या दिशेकडे गांधार देश आहे त्या दिशेकडे जा असें कोणी तरी त्यास सांगितलें म्हणजे तो चतुर, बुद्धिमान् मनुष्य या गांवाहून त्या गांवास विचारीत विचारीत नेमका जसा कंदाहार प्रांताला जातो, त्याच रीतीनें गुरूचें साह्य घेणारा मनुष्य ब्रह्मज्ञान संपादन करतो.

येथें या गांवाहून त्या गांवास जाणारा मनुष्य जसा विचारीत विचारीत आपलें स्थान गांठतो त्याप्रमाणेंच जिज्ञासु मनुष्य ज्ञानवानाच्या साह्य्यानें ज्ञान प्राप्त करून घेतो असें म्हटलेलें आहे. यांत गुरुसेवा व गुरुकृपा यांचा मागमूसहि नसून अनेकांच्या साह्यानें मुख्यतः स्वतःच्या प्रयत्नानें साधकाला संपादितां येतें असेंच उघड दिसतें.

आतां "तत्त्वमसि" या महावाक्याचें श्रवण गुरूमुखांतूनच घडलें

पाहिजे व तसें झालें कीं लगेच ब्रह्मज्ञान होतें असें जे ग्रहणतात त्या समजुतीचाहि थोडा विचार करूं.

तत्त्वमसि हें महावाक्य छांदोग्योपनिषदामध्यें आलेलें आहे. तेथें पितापुत्राचा संवाद आहे. सहाव्या अध्यायांतील आठव्या खंडापासून तों सोळाव्या खंडाच्या अखेरपर्यन्त प्रत्येक खंडाचे शेवटीं दृष्टांत व द्राष्टांत यांचा समन्वय करून तत्त्वमसि हें वाक्य शेवटीं उच्चारलेलें आहे. हें महावाक्य गुरूनें सांगितल्याबरोबर प्रकाश पडतो व शिष्य कृतार्थ होतो असें येथें मुळींच दिसत नाहीं. कारण श्वेतकेतूनें मला पुन्हां हें महावाक्य निराळ्या तऱ्हेनें समजावून द्या, अशी प्रार्थना केली असून गुरूनें म्हणजे पित्यानें प्रत्येक वेळीं निरनिराळें उदाहरण देऊन तेंच तेंच तत्त्व वेगवेगळ्या रीतीनें समजावून दिलेलें आहे; म्हणजे महावाक्य उपदेशरूपानें ग्रहण केल्यावरसुद्धां परिप्रश्न संभवतात हें येथें सिद्ध आहे.

आतां या महावाक्याचा थोडा निराळ्या दृष्टीनें विचार केल्यास असें दिसतें कीं या महावाक्याचे अर्थ किती तरी वेगवेगळे केलेले आहेत. सांप्रदायिक आचार्यांनीं या वाक्याची ओढाताण अनेक तऱ्हांनीं करून त्यांतून अनेक सिद्धांत काढलेले आहेत. शिवाय हें वाक्यहि हल्लीं सामान्य अधिकाऱ्यांनासुद्धां इतकें परिचित झालेलें आहे कीं त्यांतील गूढ असें मुळीच शिल्लक राहिलेलें नाहीं. सामान्य जनतेंत ब्रह्मविद्येचा सुकाळ झाल्यामुळें आणि या महावाक्याचें कुतूहलहि पूर्वीसारखें राहिलेलें नसल्यामुळें त्या वाक्याचा उपदेश होतांच यक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणें शिष्याच्या अंतःकरणांत ब्रह्मज्ञान ठसतें हें म्हणणें सर्वस्वी चुकीचें आहे. अर्थात् महावाक्याचें श्रवण, मनन, निदिध्यास या साधनांनींच साधकानें ज्ञानसंपन्न व्हावयाचें असतें गीतेंतहि या स्वतःच्या प्रयत्नालाच प्राधान्य दिलेलें आहे.

श्रीमत् भगवद्गीतेमध्यें भगवंतांनीं अर्जुनाला त्याच्या डोक्यावर हात ठेवून मुळींच कृतार्थ केलेलें नाहीं. किंवा 'मी सांगतों तें तूं ऐक' असेंहि म्हटलेलें नाहीं. तर मीं जें सर्व सांगितलें तें ऐक, त्याचा नीट विचार कर, तुला पटेल त्याप्रमाणें वाग, असेंच शेवटीं सांगितलें आहे.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया
उपदेक्ष्यंति तं ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ गीता अ. ४ श्लो. ३४

येथें ज्ञान हें प्रणिपाताने, परिप्रश्नानें व सेवेनें मिळतें असें सांगितलेलें आहे. प्राचीन काळीं गुरूला शिष्याच्या सेवेची अपेक्षा हल्लींपेक्षां जास्त होती आणि गुरूची मर्जी प्रसन्न राहून त्यानें प्रसन्नतेनें उत्तरें द्यावींत म्हणून शिष्य हे सेवाहि करीत असत. हल्लीं पूर्वीसारख्या सेवेची जरूरी नाहीं व अपेक्षाहि नाहीं. तथापि विनय, नम्रता, दक्षपणा यांची जरूर आहे. श्रीसमर्थहि दासबोधामध्यें केवळ सेवा करणाऱ्या शिष्यापेक्षां सावध, साक्षेपी, दक्ष आणि प्रज्ञावंत शिष्यालाच महत्त्व देतात. शिष्य प्रज्ञावंत पाहिजे, अनन्य पाहिजे म्हणजेच त्याला ज्ञानप्राप्ति होते.

सावध साक्षेपी विशेष । प्रज्ञावंत आणि विश्वास ।
तयास साधनीं सायास । करणेंचि नलगे ।। दा. वो. ६।८।४९

ज्ञान हा विषय बुद्धीचा आहे. प्रज्ञा हीच येथें मुख्य आहे. प्रज्ञाहीन व भावनाप्रधान शिष्यच सेवेला विशेष तत्पर राहातात. बुद्धिमान मनुष्य विशेषतः शारीरसेवातत्पर नसतो. तात्पर्य, सेवा ही गौण असून नम्रता, बद्धिमत्ता आणि जिज्ञासा यांमुळेंच ज्ञान प्राप्त होतें. आणि तें ज्ञान गुरूकडून म्हणजे ज्ञात्याकडून एकदां समजून घेतल्यानंतर

तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति । गीता अ. ४ श्लो. ३८

तें ज्ञान योगसंसिद्ध पुरुष स्वतः आपल्या ठायीं कालेंकरून अभ्यासाच्या योगानें प्राप्त करून घेतो. म्हणजे ज्ञानाची परिपक्वता ही स्वतःचा यत्न, अभ्यास आणि परिश्रम यांवरच अवलंबून असते. गुरुकृपेचा व वरदहस्ताचा कांहीं संबंध नाहीं असें गीतेवरूनहि सिद्ध होतें.

श्रीमत् भागवतामध्येंसुद्धां गुरूला शरण जावें असें लिहिलेलें आहे व त्याचाच अनुवाद पुष्कळ प्राकृत ग्रंथांमध्यें साधुसंतांनींहि केलेला आहे. तेव्हां त्याचाहि विचार करणें योग्य होय. त्यामुळें गुरूचीं लक्षणें कोणतीं हें समजून येईल.

तस्मात् गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् ।
शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयं ।।
—भा. स्कंद ११ अ. ३ श्लो. २१

निरपेक्षं मुनिं शान्तं निर्वैरं समदर्शनं ।
अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ॥
—भा. स्कंद ११ अ. १४ श्लो. १६

वरील दोन श्लोकांवर श्रीएकनाथांनीं चांगलें निरूपण केलेलें आहे. ते म्हणतात, 'उसाचा घाणा जसा करकर वाजतो परंतु स्वतः तो कोरडा असतो, तसा जो गुरु वक्तृत्वानें कितीहि ज्ञान दाखवूं लागला तरी तें कोरड्या पाषाणासारखेंच होय ! त्या वडबडीनें योगक्षेम चालेल, प्रतिष्ठा मिळेल, पण ब्रह्मज्ञानाचा गंधहि असणार नाहीं. असला गुरु हा अगदीं निरुपयोगी होय ! जो तटस्थ, इंद्रियनिग्रही आणि द्वैतभावानें शून्य असेल तोच खरोखरी अधिकारी होय. खऱ्या सद्गुरूबद्दलचें मत त्यांच्याच शब्दांत देतों.

एका अनुभवा आलें ब्रह्म । फिटला बाध्यबाधकतेचा भ्रम ।
मोडलें द्वैत भावाचें कर्म । जगीं विषम असेना । अ. ३ श्लो. ९२
तरी तो कायावाचामनें । अति कृपाळू दीनाकारणें ।
तोडी शिष्याचीं भवबंधनें । उठवी ठाणें अहंकाराचें ॥ ९७ ॥
जो शब्दज्ञानें पारंगतू । ब्रह्मानंदें सदा डुल्लतू ।
शिष्यप्रबोधनीं समर्थू । यथोचित् निजभावें ॥ ९८ ॥
आपुल्या योगक्षेमाचें सांकडें । स्वप्नींहि न घाली शिष्याकडे ।
शिष्यसंकट अतिगाढें । निवारी रोकडें निजांगें जो ॥ १०४ ॥
मी एक अकर्ता निजात्मयोगी । म्हणौनि विषयांतें न भोगी ।
अथवा विषयो निःशेष त्यागी । हाहि आग्रहो अंगीं असेना ॥ १०५ ॥
तो विषय भोगी ना स्वयें त्यागी । तो अदृष्टाच्या निजविभागी ।
लावूनियां देहाच्या अंगीं । परब्रह्म योगीं विवरत ॥ १०६ ॥

आतां 'निरपेक्षं मुनिं शांतं' या श्लोकावर जी त्यांची विस्तृत टीका आहे त्यांतील केवळ निरपेक्षता या पदावरील टीका वाचकांपुढें ठेवतों.

आटाटीवीण न प्रार्थितां । अधाचित अर्थ प्राप्त होतां ।
तोहि हातीं घेवो जातां । निरपेक्षता बुडाली ॥ १६३ ॥

अर्थ देखोनि लविन्नला । तो जाण लोभें वोणवा केला ।
तोहि उपेक्षूनि जो निघाला । तो म्या वंदिला सर्वस्वें ॥ १६४ ॥
मार्गी अर्थ पडतां । कोणी माझा नाहीं म्हणतां ।
तोहि स्वयें हातीं घेतां । निरपेक्षता वुडाली ॥ १६५ ॥
वृत्तिशून्य जे अवस्था । ती नांव जाणा निरपेक्षता ।
ते काळीची जे मननता । ऐक तत्त्वतां सांगेन ॥ १६६ ॥
निरपेक्षता आणि माझें मनन । शांति आणि समदर्शन ।
पांचवें तें निर्वैर जाण । पांच लक्षण हें मुख्यत्वें ॥ १८० ॥
असो पंचलक्षण कथा । एक निरपेक्षता आल्या हाता ।
पायां लागे सायुज्यता । पूर्ण ब्रह्मता ठसावे ॥ १८१ ॥

वर ज्या श्रीएकनाथांच्या ओंव्या दिलेल्या आहेत त्यांवरून अगदीं प्राकृत माणसालासुद्धां ब्रह्मज्ञानी गुरु कसा असावयाला पाहिजे हें समजून येईल. जो शिष्याचें भवबंधन तोडतो, त्याचा अहंकार नष्ट करतो, प्रबोध-शक्तीनें जो शिष्याचे संशय निवारतो, ब्रह्मानंदांत स्वतः सदा निमग्न असतो, आपल्या योगक्षेमाचें संकट जो दुसऱ्यावर घालीत नाहीं आणि जो इतका निस्पृह व निरपेक्ष असतो कीं कांहीं न मागतां जरी कोणी द्रव्य आणून दिलें तरी तो त्याला शिवतहि नाहीं, तोच खरा ब्रह्मनिष्ठ गुरु होय ! निरपेक्षता हेंच मुख्य लक्षण असें नाथांनीं अट्टाहासानें सांगितलें असून अन्यत्रहि निरपेक्षता हेंच परमार्थाचें नाक होय असें म्हटलेलें आहे.

परमार्थी मुख्य बिक । निरपेक्षता हेंचि नाक ।
तेणेंविण निर्नासिक । कैंचें सुख परमार्थिया ॥

परंतु इतकें स्पष्ट विवेचन असूनसुद्धां लोकांची दृष्टी व जेथें विघडलेली आहे, तेथें कोण काय करणार ?

आजकाल लोक ज्याच्या नादीं ब्रह्मनिष्ठ म्हणून अगर सद्गुरु म्हणून लागतात, त्याच्या ठिकाणीं खऱ्या ज्ञान्याचीं लक्षणें आहेत किंवा नाहींत याचा पडताळा पुष्कळ प्राकृत ग्रंथांवरूनहि घेतां येण्याजोगा आहे. श्रीमत् दासबोधामध्यें दशक पांच, दशक आठ व पंधरा अशा अनेक ठिकाणीं गुरुलक्षण, शिष्यलक्षण, गुरुनिश्चय यासंबंधीं पुष्कळ विचार केलेला आहे.

तो सगळा येथें देणें अशक्य आहे. कल्पना येण्यापुरतें येथें दिग्दर्शन केलेलें आहे. वाचकांनीं ह्याचें मनन केलें तरी सुद्धां कार्य होईल.

महाराष्ट्रभाषेमध्यें गुरुभक्तीचें आणि गुरुकृपेचें अतिशय वर्णन गुरुचरित्र व ज्ञानेश्वरी या ग्रंथांत केलेलें आहे. गुरुचरित्रांतील सर्वच विवेचन (आख्यानें, गोष्टी आणि सकाम भक्ति) प्रज्ञाहत करणारें असल्यामुळें तो ग्रंथ तर्कदृष्टचा विचारांतच घेण्याजोगा नाहीं. पण ज्ञानेश्वरीसारखा उत्कृष्ट व आद्य मराठी वेदांतग्रंथ त्याचा विचार केल्यावाचून भागणारच नाहीं. कारण मराठी भाषेमध्यें जितके कांहीं गुरुस्तुतिपर ग्रंथ आहेत त्यांचा उगम ज्ञानेश्वरीपासूनच आहे. तेव्हां ज्या ज्ञानेश्वरांनीं एवढी गुरुमहती गायिली त्यांनीं केवळ गुरुकृपेमुळें व वरदहस्तामुळेंच कृतार्थता येते असें म्हटलें आहे कां साधकाला अंतरंग साधनें व स्वतःचा अभ्यास या स्वावलंबनाच्या मार्गानेंच ज्ञानप्राप्ति होते असें लिहिलें आहे, याचा थोडया विस्तारानें विचार करून हें प्रकरण आटोपतों.

श्रीज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरींत, अमृतानुभवांत आणि आपल्या स्फुट अभंगांमध्येंहि गुरुभक्तीचें व गुरुकृपेचें वर्णन अतोनात केलेलें आहे. जणूं कांहीं सर्व भूतविषयक लीनता म्हणजे गुरुभक्ति होय असें त्या विवेचनाचें स्वरूप आहे. ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति अलौकिक व प्राकृत पुरुषाच्या आकलनशक्तीच्या बाहेरची दिसते. प्रचलित असलेल्या सर्व पारमार्थिक संप्रदायांत जें गुरुभक्तीचें वरेंच स्तोम आहे, त्यास अंशतः ज्ञानेश्वरांनीं प्रगट केलेली गुरुभक्ति ही कारणीभूत झालेली असावी असें दिसतें.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।। गुरुगीता

या गुरुगीतेंतील श्लोकाप्रमाणें ज्ञानेश्वरांची गुरुभक्ति होती. पुनःपुन्हां गुरूचें अभिवादन त्यांनीं किती तरी ठिकाणीं केलें आहे. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाचे शेवटीं ज्ञानेश्वरांनीं एका सुंदर रूपकानें गुरुस्तुति केली आहे. दहाव्या अध्यायाच्या प्रारंभीं गुरूचा अनुग्रह हाच कोणी गणेश असें समजून त्याची स्तुति केली आहे. अध्याय बारामध्यें सद्गुरूच्या कृपादृष्टीचें स्तवन आहे. अध्याय तेरामध्यें आत्मरूप गणेशाचें नमन करून अध्याय

चौदामध्यें आचार्यनमन व प्रसादयाचना केली आहे. अध्याय पंधरामध्यें श्रीगुरुचरणाची मानसपूजा करून सोळाव्याचे प्रारंभीं सद्गुरु हाच कोणी चित्सूर्य असें समजून स्तुति केली आहे. अध्याय सतरा व अठरामध्येंहि गुरुस्तुतीचा अगदीं वर्षाव केला आहे, तथापि माझ्या वाणीनें सत्य बोलण्याचें तप पुष्कळ कल्पें केलें म्हणूनच हा ग्रंथ माझ्या हातून बाहेर पडला असेंहि त्यांनीं म्हटलेलें आहे.

गीतेचा उपसंहाररूप जो अठरावा अध्याय त्यावर टीका करतांना श्लोक ४६ ते ५६ पर्यंत श्रीज्ञानेश्वरांनीं साधकास योग्य आणि शास्त्रसिद्धांताशीं सुसंगत असेंच विवेचन केलेलें आहे. तें चिकित्सक जिज्ञासूंकरितां येथें संक्षेपतः देतों.

अध्याय अठरा श्लोक ४२ ते ४५ अखेर चार वर्णांचीं स्वभावज कर्में सांगितलीं; व तीं कर्में करीत असतांनाच (ईश्वरार्पण बुद्धीनेंच तीं केल्यास) वैराग्यरूपी सिद्धि कशी प्राप्त होते, हें सांगितलें. निष्कामतेनें आपापलें कर्म करणारा मनुष्य वैराग्याच्या क्षेत्रांत पदार्पण करतो.

मोक्षफळें दिधलीं वोल । जें सुकृत तरूंचें फूल ।
तयें वैरागीं ठेवीं पाऊल । भवरूं जैसा ॥९०२॥
अगा जयाचें विहित । तें ईश्वराचें मनोगत ।
म्हणोनि केलिया निर्भ्रांत । सांपडेचि तो ॥९११॥

प्रत्येकानें आपापलें कर्म करून ज्यापासून हें जग उत्पन्न झालें, त्याला तें अर्पण करावें हीच ईश्वराची पूजा होय! ईश्वराची पूजा गंधपुष्पादिकांनीं न करतां स्वकर्मकुसुमानेंच ती करावी असें गीतार्थाला धरून ज्ञानेश्वर सांगतात.

तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमाची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोपालागीं ॥९१७॥

यापुढें परधर्मापेक्षां स्वधर्मच श्रेष्ठ कसा व स्वभावनियत कर्म करण्यांत दोष कसा नाहीं, कोणतेंहि कर्म करण्यांत दोष दिसला, तरी तिकडे लक्ष कां देऊं नये, इत्यादि विवेचन झाल्यावर पुढें ४९ श्लोकावरील टीकेंत ज्ञानेश्वरांनीं फार सुंदर सिद्धांत सांगितला आहे. देह, स्त्री, पुत्र यांवद्दल

अनासक्ति उत्पन्न झाली, मन व इंद्रियें स्वाधीन झालीं म्हणजे नैष्कर्म्यसिद्धि कशी प्राप्त होते याचा क्रम येथें सांगितला आहे.

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥ गी. अ. १८ श्लो. ४९

तैसे ऐक्याचिये मुठी । माजिवडें चित्त किरीटी ।
करूनी वेधीं नेहटीं । आत्मयाच्या ॥ ९६१ ॥
तेव्हां दृष्टादृष्ट स्पृहे । निमणें जालेंचि आहे ।
आगीं दडपलियां धुयें। राहिजे जैसें ॥ ९६२ ॥
म्हणौनि नियमिलिया मानसीं । स्पृहा नासोनि जाय आपैसी ।
किंवहुना तो ऐसी । भूमिका पावे ॥ ९६३ ॥
पै अन्यथा बोध आघवा । मावळोनी तया पांडवा ।
वोधमात्रीची जीवा । ठाव होय ॥ ९६४ ॥
धरवणी वेचें सरे । तैसें भोगें प्राचीन पुरे ।
नवें तंव नुपकरे । कांहींचि करूं ॥ ९६५ ॥
ऐशी कर्में साम्य दशा । होय तेथें वीरेशा ।
मग श्रीगुरु आपैसा । भेटेजि गा ॥ ९६६ ॥
रात्रीची चौपाहरी । वेचलिया अवधारीं ।
डोळिया तमारी । मिळे जैसा ॥ ९६७ ॥
का येऊनि फळाचा घड । पारुषवि केळीची वाढ ।
श्रीगुरु भेटोनि करी पाड । मुमुक्षु तैसा ॥ ९६८ ॥
मग आलिंगिला पूर्णिमा । जैसा उणीव सांडी चंद्रमा ।
तैसे होय वीरोत्तमा । गुरुकृपा तया ॥ ९६९ ॥
तेव्हां अबोधमात्र असे । तो तंव तया कृपा नाशे ।
तेथें निशिसवें जैसें । आंधारें जाय ॥ ९७० ॥

ओव्यांचा भावार्थ

अंतःकरण अन्तर्मुख करून मी ब्रह्म आहें या सिद्धांतावर चित्ताला रोखून म्हणजे माजवून, आत्म्याचाच वेध जो चित्ताला लावतो, आणि दृष्ट व अदृष्ट विषयाकडे जो ढुंकून पाहात नाहीं; अशा साधकाचा अन्यथा बोध

म्हणजे माझा देह आहे हा बोध नष्ट होतो, आणि मी ब्रह्म आहें एवढें भान राहातें. त्या स्थितींत क्रियमाण उपद्रव देत नाहीं, संचयाचा नाश होतो व प्रारब्ध भोगून संपवावें लागतें. याप्रमाणें ईश्वरार्पण बुद्धीनें कर्म करीत करीत निष्कामतेनें जेव्हां साम्यबुद्धि प्रगट होते, **त्या वेळीं सद्गुरु आपोआप भेटतात.** गुरु हा शोधावा किंवा धुंडाळावा लागत नाहीं; तर अधिकार प्राप्त झाल्यावर गुरु आपोआपच भेटतो. रात्रीचे चार प्रहर संपले कीं, सूर्योदय जसा आपोआप होतो, किंवा केळीला घड पडल्यावर केळीची वाढ जशी आपोआप खुटते, अथवा चंद्राला पूर्णिमेनें आलिंगन दिल्यावर जशी त्यांतील उणीव नष्ट होते, त्याप्रमाणेंच अधिकारसंपन्न असा साधक झाला कीं गुरु त्याला कृतार्थ करतो. अनासक्तीनें कर्में करण्याची संवय झाली म्हणजे वृत्तींत समत्व येतें आणि साम्य स्थिति पावली कीं सद्गुरु आपोआप भेटतात, असें ज्ञानेश्वरांनीं अन्यत्र स्फुट अभंगांमध्येंहि म्हटलेलें आहे. आवटेमुद्रित गाथा पंचकांतून येथें तीन स्थळें देतों.

(क्र.७४६) **अवचित** दैवयोगें सद्गुरु **भेटला** कृपाळु ।
(७४८) तेणें मी जात होतों मग सहज **भेटला** सद्गुरु ।
(७५०) करचरण विठ्ठल गेले **तंव भेटले** निवृत्ति ।

तुकारामानीं सुद्धां अधिकार प्राप्त झाल्यावर गुरु आपोआप भेटतात असें म्हटलें आहे. (पुढें प्रकरण १२ पाहा.)

स्वकर्तव्य सोडून म्हणजे कर्तव्याशीं बेइमान होऊन जे लोक आज हा बुवा तर उद्यां तो बुवा, आज हा महाराज तर उद्यां तो महाराज असें शोधत हिंडतात त्यांनीं ज्ञानेश्वरांचें वरील मत पुन्हापुन्हा अभ्यासावें. स्वत:चा अधिकार वाढवून स्वत:च्या यत्नानें मिळणारी गोष्ट म्हणजे ज्ञान ही होय ! गुरु उद्धार करतो हें खोटें आहे. तर ' उद्धरेदात्मनात्मानं ' हेंच खरें आहे. गुरु म्हणजे देशिक—दिशा दाखवितो तो. दिशा दाखविणें हें काम गुरूचें, पण त्याप्रमाणें वागन पुढील मार्ग आक्रमिणें हें काम शिष्याचें आहे. **गुरु डोक्यावर हात ठेवतो व शिष्याला ब्रह्म दाखवितो हें अगदी झूट आहे.** गुरु तर राहोच पण परमेश्वर जरी प्रसन्न झाला तरी तोसुद्धां मोक्षाचें गाठोडें आणून देत नाहीं. जें कांहीं मिळतें तें यत्नानेंच मिळतें हा

सिद्धांत परमार्थांतहि निष्ठुरतेनें सांगितला आहे. म्हणून प्रथम अधिकार प्राप्त करून घ्यावा म्हणजे मग तीव्र जिज्ञासेमुळें कोणी तरी तज्ज्ञ आपोआप भेटतो. तो भेटल्यानंतर शंका विचारून समाधान करून घ्यावें व पुढील मार्ग आक्रमावा असें ज्ञानेश्वर म्हणतात.

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोप्ति निबोध मे ।
समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ गी. अ. १८ श्लो.५० ॥

तैसें जया कोण्हासि दैवें । गुरुवाक्य श्रवणाचिसवें ।
द्वैत गिळोनि विसंबे । आपणया वृत्ति ॥ ९८८ ॥
तयासी मग कर्म करणें । हें वोलिजेलचि कवणें ।
आकाशा येणें जाणें । आहे काई ॥ ८९ ॥
म्हणौनि तयासि कांहीं । विशुद्धि करणें नाहीं ।
परी ऐसें जरी हें कांहीं । नव्हे, जया ॥ ९० ॥
कानांवचनाचिये भेटी । सरिसाची पैं किरिटी ।
वस्तु होऊन उठी । कवणी एक जो ॥ ९१ ॥
येऱ्हवीं स्वकर्मचिनि यन्हीं । काम्यनिषिद्धाचिया इंधनीं ।
रज तम कीर दोन्हीं । जाळिली आधीं ॥ ९२ ॥
पुत्र वित्त परलोक । यया तिहींचा अभिलाख ।
घरीं होय पाईक । हेंहि जालें ॥ ९३ ॥
इंद्रियें सैरा पदार्थीं । रिगतां विटाळलीं होतीं ।
तिये प्रत्याहारातीर्थीं । न्हाणिलीं कीर ॥ ९४ ॥
आणि स्वधर्माचें फळ । ईश्वरीं अर्पूनि सकळ ।
घेऊनि केलें अढळ । वैराग्यपद ॥ ९५ ॥
ऐसी आत्मसाक्षात्कारीं । लाभे ज्ञानाची उजरी ।
ते सामग्री कीर पुरी । मेळविली ॥ ९६ ॥
आणि तेचि समयीं । सद्गुरु भेटले पाहीं ।
तेवींचि तिहीं कांहीं । वंचिजेना ॥ ९७ ॥
परी वोखद घेतखेंवो । काय लाभो आपला ठावो ।
का उदयजितांचि दिवो । मध्यान्ह होय ॥ ९८ ॥

सुक्षेत्रीं आणि वोलटें । बीजही पेरिलें गोमटें ।
तरी आलोट फळ भेटे । परी वेळें कीं गा ।। ९९ ।।
जोडला मार्ग प्रांजळ । मीनला सुसंगाचाही मेळ ।
तरी पाविजे वांचूनि वेळ । लागेचि कीं ।। १००० ।।
तैसा वैराग्य–लाभ झाला । वरी सद्गुरूही भेटला ।
जीवीं अंकुर फुटला । विवेकाचा ।। १ ।।
तेणें ब्रह्म एक आथी । येर आघवीचि भ्रांति ।
देहीं कीर प्रतीती । गाढ केली ।। २ ।।
परी तेंचि जें परब्रह्म । सर्वात्मक सर्वोत्तम ।
मोक्षाचेंही काम । सरे जेथ ।। ३ ।।

गुरुमुखांतून तत्त्वमसि या वाक्याचें श्रवण होतांच जो द्वैत गिळून टाकतो व वस्तुरूप होऊन जातो त्याची गोष्ट निराळी. असा तीव्र अधिकारी फारच विरळा. म्हणजे अब्जामध्यें एखादा. बाकीच्यांनीं क्रमानेंच काम्य-निषिद्ध कर्में सोडून, स्त्री, पुत्र व गृह यांची आसक्ति सोडून, स्वधर्माचरणाचें फळ ईश्वराला अर्पण करून वैराग्यसंपन्न झालें पाहिजे. अशा स्थितींत सद्गुरु आपोआप भेटतात. पण ते `टल्याबरोबर कृतार्थता येते असें मात्र नव्हे. सद्गुरु म्हणजे वाट दाखविणारा. वाट दाखविल्याबरोबर मार्गाचें आक्रमण होतें असें नाहीं; मार्ग हा ज्याचा त्यानेंच आक्रमिला पाहिजे, आणि इष्ट स्थळ गांठलें पाहिजे. औषध घेतल्याबरोबर आरोग्यप्राप्ति होत नाहीं. सूर्य उगवल्याबरोबर जसा माध्यान्हकाळ होत नाहीं. उत्कृष्ट बी उत्कृष्ट जमिनींत पेरल्याबरोबर जसें लगेच पीक येत नाहीं, तर कालानें या गोष्टी जशा घडतात, तसाच यत्न व दृढाभ्यास यांनींच साधक सर्वात्मक स्थितीला पोंचतो.

ज्या ज्ञानेश्वरांनीं एवढें गुरूचें महत्त्व गायिलें, तेच ज्ञानेश्वर वर काय म्हणतात हें पाहिलें कीं समाधानामुळें वाचकांचे संशय नाहींसे होतील. ज्ञानेश्वरांचें सांगणें जरी काव्ययुक्त, भावनामिश्रित असें असलें तरी तें तर्कशुद्ध व शास्त्रशुद्ध आहे. आतां ज्याला सिद्ध समजतात म्हणजे पूर्ण ब्रह्मनिष्ठ समजतात त्याचीं लक्षणें कोणतीं हें ज्ञानेश्वरांनीं पुष्कळ ठिकाणीं

सांगितलेलें आहे. तथापि येथेंहि जातां जातां त्यांचा निर्देश करून हें करण आटोपतों.

साधकाचा अधिकार वाढला व त्याला सर्वात्मकता आली म्हणजे त्याची स्थिति कशी होते हें पाहा.

जे प्रज्ञा आंतुलीकडें । न समाती बाहेरी वोसंडे ।
वसंतीं पद्मखंडे । द्रुती जैसी ॥ ज्ञा. अ. १४–२०६
सर्वेंद्रियांच्या आंगणीं । विवेक करी राबणी ।
साचचि करचरणीं । होती डोळे ॥ २०७ ॥
राजहंसापुढें । चांचूचें आगरडें ।
तोडी जेवीं झगडें । क्षीरनीरांचे ॥ २०८ ॥
तेवीं दोषादोष विवेकीं । इंद्रियेंचि होती पारखी ।
नियम वा रे पायिकी । वोळगे तें ॥ २०९ ॥
नायिकणें तें कानचि वाळी । न पाहणे तें दिठीचि गाळी ।
अवाच्य तें टाळी । जीभचि गा ॥ २१० ॥
वातीपुढां जैसें । पळो लागे काळवखें ।
निषिद्ध इंद्रियां तैसें । समोर नोहे ॥ २११ ॥
धाराधर काळें । महानदी उचंवळे ।
तैसी बुद्धि पघळे । शास्त्रजातीं ॥ २१२ ॥
अगा पुनवेच्या दिवशीं । चंद्रप्रभा धांवे आकाशीं ।
ज्ञानीं वृत्ति तैसी । फांके सैंघ ॥ २१३ ॥
वासना एकवटे । प्रवृत्ति वोहटे ।
मानस विटे । विषयांवरी ॥ २१४ ॥

ज्ञान होण्याला साधकाच्या ठिकाणीं सत्त्वशुद्धि व्हावी लागते. ती सत्त्वशुद्धि झाली म्हणजे सर्व इंद्रियांच्या ठिकाणीं विवेक येतो. गुण कोणता दोष कोणता, काय ऐकावें काय न ऐकावें, काय खावें काय न खावें, हें सर्व त्या त्या इंद्रियांना स्वाभाविक कळतें. बुद्धि अत्यंत शुद्ध होते व ती पाहिजे त्या विषयांत प्रविष्ट होते. प्रकाशापुढें जसा अंधार राहात नाहीं त्याप्रमाणें

या साधकाच्या वृत्तीपुढें 'अशक्य असें कांहीं नसतें.' अमानित्वादि लक्षणें त्याचे ठिकाणीं दिसतात. संभावितपणाचें ओझें होतें, मोठेपणाचें संकट वाटतें, लोकांचे नमस्कार घेणें जिवावर येतें, आपला मान व कीर्ति यांचा कंटाळा येतो. विद्वत्तेचा बडेजाव नको व लौकिकाचें नांव नको, असें त्याला होतें. परोपकार, दान, पुण्य यांचा उच्चारहि करवत नाहीं, शेतकरी जसें पेरल्या-बरोवर झांकतो, कुलवधु नम्रता व लज्जा यांमुळें आंग झांकून चालते. तसा हा अधिकारी पुरुष अत्यंत संकोचानें वागतो. देहाविषयीं उदासीनता, कार्या-विषयीं अत्यंत हौस, शरीरभोगाकडे दुर्लक्ष पण इतरांना सुख व्हावें म्हणून अत्यंत यत्न; एवंगुण विशिष्ट लक्षणें आपोआपच येऊं लागतात. साधक दशेंत योग्य मार्गानें जाणाऱ्या मुमुक्षूला क्रमानें ज्ञानप्राप्ति होते. अर्थात् सिद्धा-वस्थेमध्यें त्याचें वर्तन इतरांना उदाहरणीयच असतें. पाहिजे तसें वागणें, अनाचार करणें, दुराचार वाढविणें हे चाळे त्याचेकडून होत नसतात. ज्ञानेश्वर म्हणतात,

मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ॥ अलौकिक नोहावे । लोकाप्रति ॥ अ. ३–७१ ॥ तेथें सत्क्रियाची लावावी । तेचि एकी प्रशंसावी ॥ नैष्कर्म्यहि दावावी । आचरोनी ॥ ज्ञा. अ. ३–७४

सिद्ध पुरुषानें, अलौकिक, विक्षिप्त, चमत्कारिक असें वागूं नये; तर लोकांनीं मार्गाला लागावें म्हणून स्वत. सदाचारानें वागून लोकांना तोच आचार शिकवावा. यावरून सत्पुरुष व दुराचार हा संबंध सर्वस्वी अशक्य होय; जेथें हे दोन शब्द असतील तेथें सत्पुरुषत्व नाहीं, असें खास समजावें. कारण,

जया निजेल्याते उपासी । वैराग्य गा ॥ ज्ञा. अ. ९–१८८
जयाचे लीलेमाजी नीति । जियाली दिसे ॥ ज्ञा. अ. ९–१९२

जे निजले असतांना त्यांची सेवा वैराग्य हें नोकराप्रमाणें करतें व ज्यांच्या लीलेमध्येंसुद्धां नतिक सिद्धांत आढळतात तेथें अनीतीचा संबंध येईल तरी कसा ?

सिद्ध पुरुष प्राकृतासारखें वोलत नसतो. तो नेहमीं थोडक्यांत सिद्धांत वोलत असतो. त्याची सिद्धांत वाणी ही त्याच्या स्थितप्रज्ञतेची दर्शक असते. श्रीज्ञानेश्वर म्हणतात:—

ग्रंथ प्रत नं. ५४९

तैसी दशेची वाट न पाहतां । वयासेचिया गांवा न येतां ।
वाळपणींच सर्वज्ञता । वरी तेथें ॥ ज्ञा. अ. ६–५३
तियें सिद्धप्रज्ञेचेनि लाभे । मनचि साखस्वतें दुभें ।
मग सकल शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ज्ञा. अ. ६–५४
तैसे दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय ।
तेथ संसरेवीण जाय । बुद्धि तयाची ॥ ज्ञा. अ. ६–५९

प्रकरण ९ वें. : :

श्रद्धा, भावना व अर्थवाद

गेल्या प्रकरणांत ज्ञानानेंच मोक्ष मिळतो, तें ज्ञान जिज्ञासा, चिकाटी, श्रम, बुद्धिमत्ता व स्वावलंबन या साधनांनीं मिळवावयाचें असतें, ज्ञानाचा व गुरुकृपेचा संबंध लोक समजतात तसा नाहीं, इत्यादि विवेचन केलें. तसेंच गुरुमहति जी कांहीं ठिकाणीं अवास्तव वर्णिली आहे ती अर्थवादात्मक म्हणजे केवळ स्तुतिपर मानावी लागते, असेंहि सांगितलें. तथापि गुरूवर (मग तो कसाही असो) श्रद्धा असली म्हणजे ती श्रद्धाच तारक होते, भावाशिवाय कांहीं नाहीं. गुरूवर दृढ विश्वास ठेवावा म्हणजे त्या श्रद्धेमुळेंच आपण तरून जातों, असा एक समाजांत लोकभ्रम आहे; म्हणून प्रस्तुत प्रकरणांत श्रद्धा, भावना आणि अर्थवाद यांचा थोडासा विचार करतों.

"शास्त्रेपु गुरुवाक्येषु विश्वासः" = श्रद्धा. अशी श्रद्धेची व्याख्या केली आहे, म्हणजे शास्त्रसिद्धांत आणि गुरूनें सांगितलेलें 'तत्त्वमसि' इत्यादि वाक्य यांतील सिद्धांतावर तो पटत असेल तर श्रद्धा ठेवावी, असा याचा अर्थ आहे. शास्त्रावर विश्वास म्हणजे पोथ्यापुस्तकावर नव्हे किंवा गुरूवर विश्वास म्हणजे माणसावर विश्वास नव्हे! तर शास्त्रप्रतिपादित जो सिद्धांत आणि गुरु म्हणजे अधिकारी माणसानें कथन केलेलें जें प्रमेय तें जर सत्य असेल आणि तें युक्तीला व बुद्धीला पटत असेल तर त्यावर

विश्वास ठेवणें असाच या श्रद्धा शब्दाचा अर्थ आहे. संशय, विपर्यय, शंका, आशंका, तर्क आणि अनुमान यांनीं सिद्ध केलेलें जें तत्त्व अथवा प्रमेय त्यावर श्रद्धा ठेवावी व तसें वागावें यांत कांहींच गैर नाहीं. अग्नीचे ठिकाणीं उष्णता आहे, सूर्यचे ठिकाणीं प्रकाश आहे, आकाशाचे ठिकाणीं शब्द-वाहक शक्ति आहे, इत्यादि सिद्धांत खरे मानून, माणसानें चालावें आणि असेच शोध करून आणखी कांहीं प्रमेयें शोधून काढावींत. परंतु असें कांही न करतां केवळ गुरुमहाराज सांगतात म्हणून पुत्रप्राप्तीकरितां कांहीं तरी मंत्रतंत्र व जादुटोणे करणें किंवा उद्योग न करतां द्रव्यप्राप्त्यर्थ अनुष्ठानें करीत बसणें, हें असमंजस होय! चमत्कारांवर जे लोक फाजील विश्वास ठेवतात तेच लोक असल्या गुरुवाक्यावरहि विश्वास ठेवीत असतात. गुरूमध्यें कांहीं अद्‌भुत सामर्थ्य आहे ही समजूतच जेथें चुकीची तेथें श्रद्धा काय करणार? गुरूचा मूर्खपणा, आचकट विचकट बोलणें आणि वेडेवाकडे आचार या सर्वांचें समर्थन पुष्कळ लोक अनेक प्रकारें करतात. परंतु मुळांत जेथें सामर्थ्याचाच अभाव आहे, तेथें कितीहि श्रद्धेचा अतिरेक केला तरी काय होणार आहे? व्यसनी, दुर्गुणी, धूर्त, अविद्य अशा माणसांत मोठें सामर्थ्य असतें असें जर समजावयाचें असेल, तर दगड, धोंडे, झाडें व जनावरें यांमध्येंहि तें सामर्थ्य आहे असें समजून त्यांवर श्रद्धा कां ठेवूं नये? पण मनुष्याच्या बुद्धीला दगड, धोंडा, झाड व जनावर यांतील सामर्थ्य बिलकुल पटत नाहीं, म्हणून तो त्यांवर श्रद्धा ठेवीत नाहीं. गुरूबद्दलहि खरोखरी ही बुद्धि असावयास पाहिजे. त्याच्या ठिकाणीं मोठें सामर्थ्य आहे, तो आपल्याला उद्धरून नेतो, तो कसाहि असला तरी त्याचेकडे पाहूं नये, त्याचे दोष लक्षांत घेऊं नयेत, या समजुती सर्वथैव चुकीच्याच होत. आपल्यासारख्या माणसांतच जर सामर्थ्य आहे, आणि तें दगडाधोंड्यांतहि जर आहे; तर तेंच सामर्थ्य स्वतःमध्यें कां नसावें? हाहि विचार करून. आत्मविश्वासयुक्त होणें हेंच इष्ट नाहीं काय?

मनुष्य प्राणी श्रद्धावान् आहे, तसाच विचारीहि आहे. श्रद्धेचा प्रतियोगी तर्क व संशय, कां व कसें ही पृच्छा मनुष्य जन्मभर नव्हे

जगाच्या अंतापर्यंत करणार ! आजपर्यंत मानव जातीच्या इतिहासांत असें दिसतें कीं, तर्कानें, विचारानें जें निश्चित केलें, तेंच टिकलें आहे. सत्य वस्तूवद्दल श्रद्धा व विश्वास अवश्य पाहिजे; पण असत्य वस्तूवद्दल मात्र श्रद्धा धरणें साफ चुकीचें आहे. शास्त्र हें गुरुवाक्य म्हणजे आप्तवाक्य व त्यावर विश्वास म्हणजे श्रद्धा ठेवा असें सांगतें. पण मनुष्य गुरुवाक्य व शास्त्रवाक्य यांचा विचार करून, बुद्धीला पटलें असें समजून जर विश्वास ठेवील तर उत्तम. केवळ अमक्यानें सांगितलें म्हणून मी विश्वास ठेवतों हें म्हणणें फक्त कांहीं काल टिकतें. विचारून व विवंचून जें घेतलें असतें, त्यावरील श्रद्धा अढळ राहाते. मी रोज अभ्यास करतों, रोजचा विषय मला कळतो, अर्थात् मी पास होणार असा विश्वास ऊर्फ श्रद्धा ठेवणें हें योग्य आहे. पण अभ्यास काळजीनें न करतां किंवहुना त्याकडे दुर्लक्ष्य करून कोणी शनिवारचे उपास अगर सत्यनारायणाचें व्रत परीक्षेकरितां श्रद्धेनें करूं लागेल तर ती श्रद्धा चुकीची आहे, यांत संशय नाहीं. कारण शनिवार व सत्यनारायणही न करतां केवळ अभ्यासानें परीक्षेंत पास झालेलीं अनेक मुलें जेव्हां त्याला दिसतील, तेव्हां त्याची श्रद्धा ढांसळेल. यत्नावर, कर्तृत्वावर, अचुक कार्यकारणावर माणसाची श्रद्धा पाहिजे. परंतु साध्य 'एक व त्याचें साधन भलतें असें असतांना त्यावर श्रद्धा न ठेवाल तर तुमचा श्रद्धाहीनपणा कार्यविघात करील असें जर कोणी म्हणूं लागेल तर तें असमंजसपणाचें होय !

चुकीची श्रद्धा काय कामाची ?

पट्टेवाल्याला मोठ्या श्रद्धेनें जर कोणी मामलेदार समजूं लागेल अगर पोलीस शिपायाला पोलीस सुपरिंटेंडेंट समजूं लागेल तर ती चुकी होय. केवळ गोड बोलून काम करून घेण्याच्या दृष्टीनें तो व्यवहार इष्ट असेल परंतु भलत्याला भलतें समजणें व तें अंधश्रद्धेनें समजणें हें सर्वस्वीं निंद्य होय ! आजवर जगांत अंधश्रद्धेनें जेवढे लाभ झाले असतील, त्यापेक्षां हानीच अधिक झालेली आहे, हें अनेक उदाहरणांनीं सिद्ध करतां येईल.

वेदांतशास्त्रांत तर श्रद्धेपेक्षां विचार व विवेक यालाच महत्त्व अधिक आहे, नित्यानित्य वस्तुविवेक हें अधिकाऱ्याचें पहिलें लक्षण आहे; विवेक,

वैराग्य, तीव्र मुमुक्षा व शमदमादि साधनें हीं अधिकाऱ्याचीं प्रमुख लक्षणें आहेत. तेथें उगाच कोणी तरी सांगतो आहे, म्हणून तूं ऐक, असें म्हटलेलें नाहीं. छांदोग्योपनिषदांत श्वेतकेतूला त्याचा पिता जरी प्रथम 'तत् श्रद्धत्व' असें सांगतो तथापि पुढें त्यानें पुत्राच्या विचारावरच सर्व सोंपविलें आहे.

वस्तुसिद्धि विचारेण न किंचित् कर्मकोटिभिः

—शंकराचार्य

वस्तूची सिद्धी म्हणजे ज्ञानप्राप्ति ही विचारानें होते; व 'ज्ञानादेवतु कैवल्यम्' असाच सिद्धांत आहे म्हणूनच भगवंतांनीं अर्जुनाला शेवटीं सर्व विषय सांगितल्यावर "मी सांगतों म्हणून तूं ऐक, श्रद्धा ठेव, असें कोठेंहि म्हटलें नसून 'विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु' म्हणजे या सर्वाचा विचार करून जें तुझ्या बुद्धीला पटेल त्यावर श्रद्धा ठेवून तूं तें कर असें स्पष्ट म्हटलें आहे. असो.

भावनेपेक्षां विवेकच श्रेष्ठ

श्रद्धा, भावना, विश्वास व भाव हा सर्व विषय जवळजवळच आहे. म्हणून थोडासा भावनेचाहि विचार करूं. जगामध्यें विचारप्रधान व भावना-प्रधान अशीं दोन प्रकारचीं माणसें असतात. प्रत्येक माणसांत विचार व भावना हीं थोडीं थोडीं असतातच. विचार जें ठरवितो त्याला भावनेचें पाठबळ असलें म्हणजे कार्य होतें. नुसती भावना म्हणजे एक प्रकारची हुक्की किंवा लहर होय! हुक्कीसरसे भरीं भरणारे लोक प्रसंगीं कांहीं कार्य करतात. पण कार्याला यश न आलें म्हणजे त्यांना आपलें करणें अविचाराचें अर्थात् अपूर्ण विचाराचें होतें असें मागून वाटतें. महाभारतांतील भीम व द्रौपदी या दोन व्यक्ति अत्यंत भावनाप्रधान दिसतात. त्यांची भावना आवरतां आवरतां धर्मराजाला पुरेवाट झाली. धर्म व श्रीकृष्ण हीं दोन विवेकाचीं दृश्यें तेथें साक्षात् होतीं, म्हणूनच भारत हा इतिहास झाला; नाहीं तर भीम व द्रौपदी यांचें ऐकून जर धर्मराजानें त्यांच्या कृतीला संमति दिली असती तर वन-पर्वापासून पुढचें भारत आटोपलेंच असतें! रामायणांतहि लक्ष्मणाच्या जळ-जळीत भावनेचे एकदोन प्रसंग आहेत. त्या ठिकाणीं रामचंद्राच्या विवेका-नेंच पुढील रामायण बनलेलें दिसतें. विवेक, विचार, विमेषणा यांनीं जें

टिकाऊ कार्य होतें, तें नुसत्या भावनेनें होत नाहीं. नुसती भावना व नुसता विचार हीं निरुपयोगी होत. विचाराला भावनेचें साहाय्य असावें हेंच उत्तम होय !

भावनेमध्यें सामर्थ्य आहे यांत शंका नाहीं. पण, ती भावना सत्य विचाराची अनुयोगी असावी. एका विद्यार्थ्याला एक मुंगळा डसला. त्याला वाटलें कीं विंचू डसला ! लगेच विंचू चावल्याप्रमाणें कळा येऊं लागल्या व तो ओरडूं लागला; पण शोधाअंतीं मुंगळा डसलेलाच जेव्हां साक्षात् दाखविला, तेव्हां कळा गेल्या व रडणेंहि थांवलें. या व अशा तऱ्हेच्या गोष्टी पुष्कळ देतां येतील. पण यावरून निगमन हेंच निघतें कीं, सत्य वस्तूबद्दल, सत्य विचारावद्दल भावना असणें हेंच योग्य ! भ्रमात्मक भावनेचे दुष्परिणामच होणार. क्वचित् सुपरिणाम दिसले, तरी ते टिकाऊ होणार नाहींत. मानसशास्त्रदृष्ट्या भावनेमध्यें पुष्कळ सामर्थ्य आहे. भावना म्हणजे मनाची सर्व शक्ति एकवटणें व ती एका केंद्राकडे लावणें होय. सूर्यनारायण हा आरोग्यदाता आहे, स्थावरजंगम जगताचा तो आत्मा आहे, अशा भावनेनें, विश्वासानें जर सूर्योपासना केली, नमस्कार घातले तर तें योग्य व इहपर कल्याणकारक होईल. परंतु चौरंगावर अग्नीला ठेवून त्याला थंड करण्याकरितां जर तुपाची धार मोठ्या श्रद्धेनें कोणी धरूं लागेल, तर त्याची ती भावना निरर्थक होईल. नामदेवाची भावना पंढरीच्या विठोबांतच काय तो देव आहे अशी होती. पण त्याची ती भावना विसोवा खेचरांनीं बदलली. तात्पर्य, मिथ्या व भ्रमात्मक भावना टाकाऊ होत; पण, सत्य व यथार्थ भावना उपयुक्त होत. विचार व भावना यांचें शुद्धिकरण सारखें चालूं आहे. शोध व शास्त्रेंहि तेंच कार्य करितात आजवर बुद्धिमान लोक तेंच करीत आहेत. म्हणूनच पूर्व कालच्या पुष्कळ भावना आज पालटल्या आहेत व आजच्याहि पुढें पालटतील.

भावनेचा अर्थ

भावनेचें वरील विवेचन आम्हीं रूढ कल्पनेप्रमाणेंच केलें आहे. मीमांसाशास्त्रदृष्टया भावनेचें पृथक्करण करूं लागल्यास सर्व भ्रम नाहींसा होईल. अर्थसंग्रह या ग्रंथामध्यें शाब्दी भावना व अर्थी भावना असे भेद

आहेत. भावनेची व्याख्या 'भावना नाम' भवितुर्भवनानुकूलो भावयितुर्व्यापारविशेषः । अशी आहे. शाब्दी भावनेमध्यें अंशत्रय आहेत. 'केन, किम्, कथम् भावयेत,' असे ते प्रकार आहेत 'यजेत' या वाक्याचा 'यागेन इष्टं भावयेत्' असा अर्थ मीमांसक करतात. 'सोमेन यजेत म्हणजे 'सोमवता यागेन इष्टं भावयेत्' सोम ज्यामध्यें आहे अशा प्रकारचा यज्ञ करून इष्ट प्राप्तीची इच्छा करावी, असा वाक्यार्थ आहे. मीमांसाशास्त्रांतील भावनेचा अर्थ व मानसशास्त्रांतील भावनेचा अर्थ हे परस्परभिन्न आहेत. Sentiment म्हणजे भावना असा अर्थ हल्लीं समजतात. त्या दृष्टीनेंसुद्धां भ्रमात्मक वस्तुविषयक ज्या भावना असतात त्या चुकीच्याच ठरतात.


येथवर श्रद्धा व भावना यांचा विचार करून आपण असें ठरविलें कीं सत्य वस्तूवर श्रद्धा असावी. म्हणजे सत्यत्व आणि श्रद्धा यांचा संबंध असावा. मिथ्या भ्रमात्मक अशा वस्तूविषयीं केवळ भावनावश होऊन श्रद्धा ठेवणें हें परिणामीं अत्यंत अहितकर होय ! असो.

आतां ठिकठिकाणीं एवढी जी गुरुमहती गायलेली आहे आणि गुरूचें वर्णन जें खूप फुगवून केलेलें आहे तें केवळ स्तावक आहे म्हणजे अर्थवादात्मक आहे असें जें म्हटलें त्याचें स्पष्टीकरण करण्याकरितां अर्थवाद म्हणजे काय आणि हा कोणच्या शास्त्राचा विषय आहे हें आपण पाहूं. कारण गुरूची जशी अर्थवादात्मक स्तुति पुष्कळ ठिकाणीं आलेली आहे; त्याचप्रमाणें प्रत्येक देव, व्रत, विधि व आचार यांची स्तुति अशीच भरमसाट आलेली आहे. अर्थवादात्मक फलश्रुत्या या जर खऱ्या ठरतील तरच गुरुमहात्म्यहि खरें ठरेल. ब्रह्माविष्णुमहेशापेक्षांसुद्धां गुरूचा अधिकार मोठा असतो असा जो कांहीं लोकांचा श्रद्धामूलक समज आहे तोहि कितपत खरा आहे, हें पुढील विवेचनावरून कळून येईल.

वेदांचा अर्थ लावणारें जें मीमांसाशास्त्र त्यामध्यें श्रुति, लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान व समाख्या असे मुख्यतः विषय आहेत. कोणताहि विधि श्रुति करते; ब्राह्मणमंत्र त्या विधीचें स्मरण करून देतात; त्या विधीविरुद्ध कांहीं न करावें, म्हणून निषेधवाक्यें असतात आणि त्या विधीचीं स्तावक वाक्यें जीं असतात, त्याला अर्थवाद म्हणतात. आळस वगैरे कारणांमुळें

मनुष्य वैदिक कर्माला प्रवृत्त होत नाहीं. त्या कर्माला त्यानें प्रवृत्त व्हावें म्हणून स्तुत्यात्मक अर्थवाद सांगितलेले असतात. श्रुतीचें विधिवाक्य हें पुरुषाला कर्म करण्यास सांगतें. पण तें कर्म चांगलें आहे, अमुक विधि केला तर अमुक होईल, अशी जी स्तुति असते, ती विधीकडे म्हणजे वैदिक कर्माकडे मनुष्याची प्रवृत्ति व्हावी म्हणूनच असते.

'रोचनार्था फलश्रुतिः' असा न्याय आहे. रोचना म्हणजे वरें वाटणें हा अर्थ ज्यामध्यें असतो, ती फलश्रुति होय. लहान मूल काढा घेत नाहीं. तेव्हां गुळवेलीचा काढा घेतलास तर तुझी शेंडी वाढेल असें रोचक बोलणें हा अर्थवाद अथवा सद्बुद्धीनें केलेली थापेवाजी होय. मुलानें कोणीकडून औषध घ्यावें व तो बरा व्हावा म्हणून ज्या गप्पा आपण त्या वेळीं मारतों, त्या गप्पांनाच शास्त्रीय भाषेंत अर्थवाद किंवा फलश्रुति असें म्हणतात. मीमांसकांनीं 'प्राशस्त्यनिन्दान्यतरपरं वाक्यमर्थवादः' अशी अर्थवादाची व्याख्या केली आहे. कर्माकडे प्रवर्तक वाक्य हा विधि होय. पुरुषाला निवृत्त करणारें जें वाक्य तो निषेध होय, आणि स्तुति व निंदा यांपैकीं एकाचा बोध ज्या वाक्यानें केला जातो, तें वाक्य अर्थवादात्मक होय. अर्थवादामध्यें विधिशेष व निषेधशेष असे भेद असून पुनः गुणवाद, अनुवाद, भूतार्थवाद असे अवांतर भेद आहेत. त्या सर्वांचें विवेचन येथें अप्रस्तुत आहे. वैदिक विधीला अर्थवादाची सुद्धां जरूरी आहे, म्हणून मीमांसकांच्या भाषेंत यज्ञ हाच धर्म कसा आहे हें येथें दाखवितों.



फलश्रुत्यांचें स्वरूप

वरील विवेचनावरून अर्थवाद म्हणजे स्तुति अर्थात् ती पोकळ स्तुति असून स्तोत्रें, व्रतें व गरुचरित्रादि प्राकृत ग्रंथांना जोडलेल्या ज्या फलश्रुत्या त्या सर्व अर्थवादात्मक होत, यांत मुळीच संशय नाहीं. हल्लींचे औषधांचे

जाहिरातदार लोकांनीं आपलेंच औषध वापरावें म्हणून भडक वर्णनात्मक जशा जाहिराती देतात त्याप्रमाणें पूर्वकालच्या फलश्रुत्या म्हणजे भडक जाहिराती होत. पूर्वी शिक्षण, साक्षरता ही अगदीं बेताची होती. मराठींतून लोकांना कांहीं तरी धर्मज्ञान व्हावें म्हणून प्राकृत ग्रंथ लिहिले गेले. ज्ञानेश्वरादिकांनीं मराठींत जरी ब्रह्मविद्येचा सुकाळ केला, तथापि ती ब्रह्मविद्या सर्वांना आकलन होण्याजोगी नव्हती. अशा लोकांना सकाम भक्तीची लालूच दाखवून ईश्वरप्रवण करावें, म्हणूनच पूर्वपरंपरेला अनुसरून अगडबंब फलश्रुत्यांचे ग्रंथ रचले गेले, याशिवाय कांहीं नाहीं !

मनुष्याला कर्म करावयास सांगितलें कीं, लगेच तो त्याचें फल काय असें विचारतो. कर्म व त्याचें फल यांसंबंधाचे नियम ठरलेले आहेत. परंतु ते नियम सामान्य माणसाला अगम्य असल्यामुळें, त्याला लहान कर्मापासून सुद्धां मोठें फळ मिळावें असें वाटतें व अशा प्राकृतांच्या समजुतीकरितांच अर्थवादात्मक फलश्रुत्या जोडलेल्या असतात. हीं स्तोस्त्रें, हीं व्रतें आणि हे प्राकृत ग्रंथ अगदीं यथाशास्त्र, यथासांग, अत्यंत श्रद्धेनें आणि आसनादिकांची सर्व पथ्यें संभाळून जरी आचरले व पठण केले तरी त्यांपासून फलश्रुतींत सांगितल्याप्रमाणें कार्यसिद्धि होईल असें कोणींही समजूं नये व लिहिणारांचाहि तसा उद्देश नाहीं. मनुष्य गोड खात असेल तर त्यानें देवाच्या नांवानें खावें, देवाचें नांव घेतच नसेल तर कांहीं आशेनें तरी घ्यावें, कांहीं वाचीत नसेल तर त्यानें कामनेच्या आमिषानें तरी वाचावें, असाच या ग्रंथांचा उद्देश आहे.

अनुष्ठान एकाग्रतेनें करीत असतांना जो मनःसमाधानाचा व एकाग्रतेचा आनंद लाभतो, तोच काय तो खरा असून फलाच्या आशेनें अनुष्ठान करूं नये, हेंच उत्तम होय. अर्थात् वरील प्रकारच्या ग्रंथांत सांगितलेल्या फलश्रुत्या म्हणजे कर्माकडे प्रवृत्त करणाऱ्या भडक जाहिराती अथवा संभावितपणानें दिलेल्या थापाच होत.आतां क्रमानें कांहीं फलश्रुत्यांचा विचार करूं:

गणपती अथर्वशीर्षांत गणपतीची स्तुति आहे. पण उत्तरार्ध फलश्रुतीचा आहे. हें अथर्वशीर्ष जो शिकतो तो ब्रह्मनिष्ठ होतो, त्याला विघ्नें बाधत नाहींत,त्याचीं पंचमहापातकें झडतात,चार पुरुषार्थ साधतात वगैरे वगैरे त्यांत

आहे. एका अथर्वशीर्षाच्या पठणानेंच जर सर्व कांहीं मिळतें तर अथर्वशीर्षाव्यतिरिक्त मंत्रब्राह्मणात्मक वेदाचा जो अफाट पसारा आहे, त्याची काय जरूर होती ? पण ज्या अर्थी मंत्र, ब्राह्मण व आरण्यक हीं शिल्लक ठेविलीं आहेत, त्या अर्थी ज्याची मुळींच प्रवृत्ति होत नाहीं, त्यानें निदान अनेक इच्छा तृप्त होतात म्हणून अथर्वशीर्ष तरी शिकावें व तें निष्ठेनें म्हणावें म्हणूनच ही फलश्रुति जोडली आहे, हेंच नितांत सत्य आहे. ज्ञानानेंच मोक्ष मिळतो, हा सिद्धांत खरा आहे ना ? मग अथर्वशीर्षाच्या पाठानें व पारायणानें चौथा पुरुषार्थ मिळतो आणि ब्रह्मनिष्ठता येते असें सांगणें हा अपसिद्धांत नव्हे काय ? पण हा अपसिद्धांत ज्या अर्थी जाणून बुजून सांगितला त्या अर्थी तो अर्थवादच होय !

शनिमहात्म्य व शिवलीलामृत हे ग्रंथ शनिवारीं व सोमवारीं श्रद्धेनें वाचणारे व ऐकणारे लोक पुष्कळ आहेत. त्यांचे शेवटींहि हा ग्रंथ श्रवण करतांच विघ्नें पळतात व ग्रहपीडा नष्ट होते, असें म्हटलें आहे. पण या फलश्रुतींचा अर्थ वाच्यर्थानें घेणें अशास्त्रीय व अयुक्त आहे. सगळीं विघ्नें नष्ट करण्याचें व ग्रहपीडानिरासाचें शनिमहात्म्य जर साधन असतें, तर जगांत इतर साधनें मुळींच उपलब्ध झालीं नसतीं.

भरमसाट फलश्रुत्यांची लालूच

दक्षिण महाराष्ट्रांत भक्तिप्रधान, रसाळ असें एक व्यंकटेशस्तोत्र पुष्कळ लोकांच्या पाठांत आहे. हें स्तोत्र भक्तिरसानें ओथंबलेलें आहे; व त्या दृष्टीनें तें अवश्य म्हणावें. पण या स्तोत्राची फलश्रुति खरी समजून जर कोणी तें पठण करूं लागेल तर तें चुकीचें होईल.

इच्छा धरुनि करील पठण । त्याचें सांगतों मी प्रमाण । सर्व कामनेसीं साधन । पठण एकमंडळ ॥९२॥ पुत्रार्थी यानें तीन मास । धनार्थी यानें एकवीस दिवस । कन्यार्थी यानें षण्मास । ग्रंथ आदरें वाचावा ॥९३॥ क्षय अपस्मार कुष्ठादिरोग । इत्यादि साधनें प्रयोग । त्यासी एक मंडळ सांग । पठणें करुनि कार्यसिद्धि ॥९४॥

एक मंडळ म्हणजे चाळीस आवृत्त्या केल्या म्हणजे सर्व सिद्धि प्राप्त

होते. पुत्रप्राप्तीस तीन महिने, कन्येकरितां सहा महिने, आणि द्रव्याकरितां एकवीस दिवस असें या ग्रंथाचें पठण करण्यास सांगितलें आहे.

अर्थवाद व मीमांसा

धर्मशास्त्रांतहि स्तुतिपर व निंदापर असा पुष्कळ अर्थवाद आहे. दुर्जनाकडे जेवलें कीं वानर होतो व निमंत्रण नसतांना जेवावयास गेल्यास तो मनुष्य कावळा होतो. व्याजबट्टा करणारा कासव होतो. शौचाला बसतांना अमुक इतके गोळे लावावे. स्नानानंतर लगेच वस्त्र धुतल्यास पितर निराशेनें पळून जातात. डाव्या मांडीवर हात ठेवून जेवलें कीं तें अन्न राक्षस खातात. चैत्री पूर्णिमेला अमक दान केल्यास उत्तम वायको मिळते व ज्येष्ठी पूर्णिमेला अमुक दान केल्यास उत्तम नवरा मिळतो इत्यादि वाक्यांचे अर्थ वाच्यर्थानें घ्यावयाचे नसतात. वाच्यर्थ हा यथार्थ आहे असें समजल्यास फसगत होते. म्हणूनच वाक्यार्थाकरितां पदवाक्यप्रमाण म्हणजे व्याकरण, न्याय व मीमांसा ही शास्त्रें झालेलीं आहेत.

गुरुचरित्र हा ग्रंथ सरस्वतीगंगाधरानें लिहिला असून, त्या ग्रंथांत केवळ गुरूवर श्रद्धा ठेवून तो वाचल्यानें व त्याची भक्ति केल्यानें सर्व कामना परिपूर्ण होतात, असें सर्वत्र म्हटलेलें आहे. पहिल्या अध्यायांतच ग्रंथकार म्हणतो,

ज्यास पुत्रपौत्रीं असे चाड ।। त्यासी कथा हे असे गोड ।। लक्ष्मी वसे अखंड ।। तया भुवनीं परियेसा ।।५४।। ऐसी कथा जयाचे घरीं ।। वाचिती नित्य प्रेमभरीं ।। श्रियायुक्त निरंतरीं ।। नांदती पुत्रकलत्रयुक्त ।।५५।। रोग नाहीं तया भुवनीं ।। सदा संतुष्ट गुरुकृपें करोनी ।। निःसंदेह सातां दिनीं ।। ऐकतां बंधन तुटे जाणा ।।५६।। ऐसी पुण्य पावन कथा ।। सांगेन ऐक विस्तारता ।। सायासाविण होय साध्यता ।। सद्यः फल प्राप्त होय ।।५७।। अध्याय १.

ही फलश्रुति ऐकून जे पारायणें करितात ते बहुधा निपुत्रिक, रोगी, दरिद्री असे असतात. ज्यांना त्यांच्या अद्यतन व प्राक्तन कर्मामुळें पुत्र, पौत्र, द्रव्य, आरोग्य, आयुष्य यांचा लाभ आहे, अशीं माणसें बहुतेक गुरुचरित्रासारख्या ग्रंथांच्या नादीं लागत नाहींत. जीं बहुतेक माणसें नादीं

लागतात तीं आर्त असतात. आर्तांची स्थिति अशी असते कीं त्या वेळीं त्याला कांहीं सांगितलें तरी तें खरें वाटतें अर्थात् केव्हां तरी चुकून बोला-फुलाला गांठ पडावी तशी पडून एकादी गोष्ट घडली कीं त्या आर्त माणसाला वाटतें कीं, माझ्या अनुष्ठानामुळेंच हें होतें. परंतु हा त्याचा भ्रम असतो. कार्य म्हटलें कीं कारण असलेंच पाहिजे. कारण अज्ञात असलें व समजत नसलें म्हणजे मनुष्य ती गोष्ट चमत्कार अथवा ईश्वरी सामर्थ्यावर ढकलतो. परंतु तें त्याचें मत विचारांतीं चुकीचेंच कसें असतें हें समजावें म्हणून चमत्कारांचा विचार पुढील प्रकरणांत करितों.

प्रकरण १० वें. : :

महाराज व चमत्कार

जग हें असें आहे कीं तें चमत्काराला भुलतें. नित्य जें डोळ्यांपुढें असतें त्यापेक्षां अनित्य असें कांहीं दिसलें कीं जग त्याला आश्चर्यानें मान देतें व तो चमत्कार समजतें. 'चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं' या म्हणींत बरेंच तथ्य आहे. त्यामुळें लोकहि चमत्कारांचा व बुवांचा संबंध सदैव जोडतात. बहुतेक बुवांच्या मागें चमत्कारांचें लफडें असतेंच. म्हणून प्रस्तुत प्रकरणांत त्यांचा विचार करण्याचें योजिलें आहे.

जी गोष्ट घडलेली आपण पाहातों, पण जिच्या कार्यकारण भावाची उपपत्ति आपणास समजत नाहीं अगर सांगतां येत नाहीं, तिलाच आपण चमत्कार समजतों. चमत्कारामध्यें एक अद्भुतपणा असतो. असे अद्भुत चमत्कार सृष्टीमध्यें असंख्य चाललेले आहेत. निसर्गाच्या अनंत शक्ति आहेत त्या सर्व शक्तींचें आकलन मनुष्याला अद्याप झालेलें नाहीं. निसर्गाच्या ज्या शक्तींचें ज्ञान मानवाला होतें व त्यावरून त्याला जो कार्यकारणभाव सुचतो त्यामुळें त्या चमत्कारांतील अद्भुतपणा नष्ट होतो. कांहीं

चमत्कार, नि कांहीं अद्‌भुतपणा दाखवून हे बुवा आणि हे महाराज समाजाच्या बुद्धीची हत्या करीत असतात ! ही आश्चर्यवृत्ति मानवी मनांतील जिज्ञासा मारते व जिज्ञासा मेली कीं उन्नतीची आशाच सुटते.

मनुष्यस्वभावांत आळस हा एक दोष आहे. त्यावरोवरच श्रम न करतां ऐतें मिळावें व तें उपभोगावें असेंहि त्याला वाटतें. वास्तविक माझ्या श्रमाचें म्हणजे कर्माचें फल मला मिळालें पाहिजे व तेवढेंच मिळेल असेंच मनुष्यानें समजलें पाहिजे. परंतु चांगले चांगले विद्वान् लोकसुद्धां हा सिद्धांत विसरतात व एखाद्या अद्‌भुत शक्तीच्या साहयानें आपले मनोरथ पूर्ण होतील, अशा कल्पनेनें बुद्धिवादाचा त्याग करून एखाद्या बुवाच्या नादीं लागतात. हिंदु समाजाच्या या भाविकपणाचा दुष्परिणाम ढळढळीत दिसत असतांना शिकलेल्या लोकांनीं चमत्कारांच्या नादानें भावनेच्या भोंवऱ्यांत स्वत: उडी टाकावी हा प्रकार खरोखरीच निंद्य होय !

ज्याचा कार्यकारणभाव कळत नाहीं तें आश्चर्य अगर तो चमत्कार होय ! मानव समाजाचा इतिहास पाहिला तर असे अनेक चमत्कार दिसतात. ज्याच्या डोक्यांत कांबटाला दोरी बांधून धनुष्य करण्याची कल्पना आली, तो खरोखरच पहिला चमत्कार आणि बाणाचा शोध हा दुसरा चमत्कार. पुष्कळ दिवस मानव समाज हा कच्च्या अन्नावरच राहात होता. पुढें अग्नीचा शोध लागला, तो त्या कालांतील खरोखरीच तिसरा अद्‌भुत चमत्कार होय ! अग्नीचा उपयोग करणें व अन्न शिजवून खाणें यामुळें मानवजातीवर फारच उपकार झालेले आहेत. चंद्र, सूर्य, नक्षत्रें यांचे शोध व त्यांचीं आकर्षणें हेहि चमत्कारच होत.

प्राचीन काळीं संवत्सर चक्राचा जेव्हां शोध लागला, तेव्हां तो शोध मोठा अद्‌भुतच नव्हे काय ? ग्रहणें, शेंडे नक्षत्र, ग्रहांच्या गती हे सर्व पूर्वी चमत्कार होते. परंतु आधुनिक शास्त्रज्ञांनीं त्यांचे नियम सप्रमाण बसविल्यामुळें त्यांचा अद्‌भुतपणा नष्ट झाला आहे. वाफेचें यंत्र, बंदुकीची दारू, तोफेचा गोळा हे सर्व चमत्कारच होते. आज तर वीज, अग्नि व वाफ यांमुळें चमत्कारिक अशा किती तरी क्रांत्या घडत आहेत. त्या सर्व पाहात असतांना एखाद्या महाराजानें चमत्काराच्या जोरावर दुनिया झुलविणें व तो झुलवील तसें दुनियेनें झुलणें हा खरोखरीच अधमपणा होय ! कारण

चमत्कारामुळें लोक अधिक भाविक वनतात, प्रज्ञाहत होतात आणि जिज्ञासा-शून्य वनतात. अर्थात् असे लोक ज्या समाजांत फार आहेत त्याच्या कपाळीं परदास्य आहे यांत शंकाच नाहीं.

ब्रह्मवेत्ता व चमत्कार यांचा खरोखर कांहीं संवंध नाहीं. पातञ्जल योगशास्त्रामध्यें मणी, मंत्र, औषधी व समाधी यांच्या साह्यानें कांहीं सिद्धि म्हणजे चमत्कार दाखवितां येतात असें म्हटलेलें आहे. पण खरा हटयोगी साधक या सिद्धींच्या उपयोगाच्या भानगडींत मुळींच पडत नाहीं. त्याला उच्च असें ध्येय गांठावयाचें असल्यामुळें तो सिद्धीच्या उपयोगाचीच इच्छा करीत नाहीं, मग चमत्कार कसले करतो ! योगशास्त्राप्रमाणें प्रत्येक योगी हा आपल्या विशिष्ट अभ्यासानें दोषांचा क्षय करतो, अन्तःकरण शुद्ध ठेवतो आणि एकाग्रता साधून समाधि लावतो. पण आजचे हे वुवा आणि महाराज हे कांहींच न करतां राजयोगी म्हणून राजविलासी वनतात आणि केवळ चैनींत राहण्याचा मात्र चमत्कार दाखवितात एवढें खरें.

वास्तविक सत्पुरुषाचा आणि चमत्कारांचा कांहीं संवंध नाहीं. परंतु भक्तिविजय, गुरुचरित्र अशा ग्रंथांमध्यें अनेक चमत्कार वर्णन केले असल्या-मुळें लोकांना चमत्कारांचें खूळच लागलेलें आहे, असें दिसतें. पूर्वसंतांचे चमत्कारहि अर्थवादाप्रमाणें वाजवीपेक्षां फुगवूनच लिहिलेले आहेत. 'ज्ञाने-श्वरांनीं रेड्यामुखीं वेद वदविले' असें भक्तिविजयांत लिहिलें आहे. पण रेडे या आडनांवाचें घराणें तळेगांवच्या (दाभाड्याचे) आसपास अद्याप असावें. त्या घराण्यांतील एखाद्या पुरुषाला ज्ञानेश्वरांनीं वेद शिकण्यास प्रवृत्त केलें असावें इतकेंच !! दामाजीपंताकरितां परमेश्वरानें रसद भरली अशी समजूत आहे. पण विठू या नांवाचा धनिक महार होता आणि त्यानें,—दामाजीपंतानें सर्वांना अन्न देऊन जगविलें असें पाहून—अत्यंत सहानुभूतीनें वादशहाकडे सर्व पैसे भरल्याचे, जुने कागदच आज सांपडले आहेत. भक्ति-विजयांतील पूर्व संतांच्या चमत्काराबद्दल चिकित्सादृष्टीचा शोधच करूं लागल्यास पुष्कळ माहिती मिळेल व तीवरून हे सर्व चमत्कार वहुतेक खोटे होते असें सिद्ध होईल. श्रीगुरुचरित्रांतील चमत्कारहि असेच प्रज्ञाहत करणारे आहेत. साठ वर्षांच्या वांझ स्त्रियेला म्हणे गुरुकृपेनें पुत्र झाला ! साठ वर्षांची

स्त्री झाली व ती वांझ असली तरी तिला पुत्र होणार नाहीं असें नाहीं. तिचा विटाळ थांबला नव्हता, तिचा नवरा जिवंत होता आणि त्या उभयतांमधील प्रजननशक्ति प्रबळ असल्यामुळें साठ वर्षांनंतरसुद्धां मूल होणें मुळींच अशक्य नव्हतें. बोलाफुलाला गांठ पडली म्हणजे भोळ्या माणसांना ते चमत्कार वाटतात, तसाच तो गुरुचरित्रांतील चमत्कार होय! आज जे बुवा आणि महाराज उपलब्ध आहेत, त्यांच्या नांवांवर जेवढे म्हणून चमत्कार लोक सांगतात ते सर्व भोंवतालच्या टग्यांनीं आणि भाविकांनीं उठविलेले होत. जटेंतून गंगा काढणें, राखेची खडीसाखर करणें, वत्तासे काढणें, पेढे, तांदूळ, चुरमुरे यांचीं ताटेंच्या ताटें काढणें, वगैरे जे चमत्कार आज लोक सांगतात ते सर्व खोटेच असतात. एकानें एक चमत्कार उठविला कीं दुसरा दुसराच उठवितो. सोलापुरचे लोक कोल्हापुरचा चमत्कार सांगतात आणि कोल्हापुरचे लोक कानपुरचा चमत्कार सांगतात; मग कानपुरचे भक्त खरगपुरचा चमत्कार कां सांगणार नाहींत? कांहीं लोक असें म्हणतात कीं अमक्या अमक्या महाराजांचे चमत्कार आम्हीं प्रत्यक्ष पाहिले आहेत. कोणी म्हणतो नारळांतून नथ काढून दाखविली, तर दुसरा म्हणतो गंगेंतून कुंकू काढलें! आम्ही असें स्वच्छ विचारतों कीं खरोखरीच तुम्ही तुमच्या महाराजांचे चमत्कार कांहीं प्रत्यक्ष पाहिले आहेत काय? जर पाहिले असतील तर त्या तुमच्या सर्वज्ञ व सर्वसमर्थ महाराजांचा दुसऱ्याच्या द्रव्यावर डोळा कां असतो? ज्यांच्या जवळ ऋद्धिसिद्धीसारख्या दासी सज्ज आहेत, असे महाराज शिष्याकडून पैसे कां उपटतात? भोळ्याबापड्या स्त्रियांच्या मनिऑर्डरी कां स्वीकारतात? शिष्याच्या एका पैलाहि स्पर्श न करतां एका तरी महाराजानें घाट, मठ, कूप, आराम, देवालय, धर्मशाळा, बांधली आहे काय? असें एक तरी उदाहरण महाराजांचे प्रज्ञाहत भक्त दाखवूं शकतील काय? तसें जोंवर दिसत नाहीं तोंवर या लोकांची ही बुवाशाही म्हणजे ब्रह्मज्ञानाच्या नांवाखर दुसऱ्याचें द्रव्य साखसुरतपणें लुटण्याचा धंदा होय! किंवा दुसऱ्याची सधवा किंवा विधवा सुंदर स्त्री कुमार्गास लावण्याचा संभावितपणाचा व्यवसाय होय फार काय पण दुसऱ्यास प्रज्ञाहत करून त्यांचें स्वत्व नष्ट कर-

ण्याचा निर्बंधाच्या कचाटींत न सांपडणारा तो एक मोठा अपराधच होय !

जो महाराज राखेची साखर करतो, त्याला साखरेचा कारखाना काढणें अशक्य आहे काय? जो अंगठ्यांतून गंगा काढतो त्याला दुर्जल ग्रामें सजल करून टाकणें कांहीं अशक्य आहे काय? पण महाराज असल्या उपयुक्त गोष्टी करील तर शपथ ! हे असले अवतारी महाराज इंग्रजांना आपलें सामर्थ्य कां बरें दाखवीत नाहींत ? स्वराज्य देण्याची वृत्ति कां बरें उत्पन्न करीत नाहींत ? पण असें विचारावयाची सोय नाहीं. त्यांचे भक्तगण म्हणतात कीं " अहो, पापाचा घडा भरला पाहिजे " म्हणूनच आम्ही विचारतों कीं हें सांगावयास महाराज कशाला पाहिजे ? हें आम्हांलाहि कळतें. केवळ भोळ्या बापड्यांचें द्रव्य लुटण्याचा धंदा या महाराजांना करावयाचा असतो व त्याकरितांच हे चमत्कार करतात. ना विद्वत्ता, ना तपस्या, ना माणुसकी, ना गुण असे हे महाराज समाजांतील लोकांच्या पैशावर केवळ राजयोगी म्हणून जगत असतात आणि आपल्या जाहिराती फडकावतात, याशिवाय कांहीं नाहीं.

कोणताहि महाराज हजारों लोकांसमक्ष मी अमुक एक चमत्कार करून दाखवितों असें आव्हानपूर्वक कधीं तरी सांगतो काय ? पण गारुडीसुद्धां 'चल', 'चल','चल' 'चल' म्हणून गंमत करतो, राखेची साखर करतो आणि दगडाचे पेढे करून लोकांच्या अंगावर फेंकतो; पण स्वतः शेवटीं भीकच मागतो! हल्लींच्या या महाराजाचे चमत्कार या गारुड्यासारखेच होत. गारुडी चमत्कार दाखवून भीक मागतो, महाराज भीक मागत नाहीं, पण त्या निमित्तानें पैसे मागण्याचा यत्न करतो. अलीकडे गारुडीविद्येंतील कांहीं प्रोफेसर सुद्धां जाहीरपणें तिकिटें लावून चमत्कार दाखवीत असतात. दोनदोन घागरी पाणी पिणें, कांचा खाणें, साप खाणें, असले आर्ष व किळसवाणे प्रयोग ते करितात. इंद्रजालविद्या, गारुडीविद्या या विद्या असून त्या शिकविण्याकरितां हल्लीं विद्यालयेंहि निघालीं आहेत. एखादा महाराज असली कुश्चीळ विद्या संपादन करीत असेल, पण तेवढ्यामुळें तो ब्रह्मनिष्ठ असतो असें नव्हे. ब्रह्मवेत्ता व चमत्कार यांचा वेदांतशास्त्रदृष्ट्या बिलकुल संबंध नसतो. म्हणून चम-

त्कारांचा व सत्पुरुषांचा संबंध लोकांनीं मुळींच जोडूं नये. सत्पुरुषाच्या ठिकाणीं मान, व दंभ हीं नसतात. लोकांची उपाधि, लोकांचा उपद्रव त्यांना नको असतो म्हणन ते चमत्कारांच्या भानगडींतच मुळीं पडत नाहींत.

हिंदुस्थान देश हा दरिद्री आहे, पण या अशा दरिद्री देशांत पुष्कळ महाराज श्रीमंतीनें चरतात ! या दरिद्री देशाच्या उद्धाराकरितां हजारों संस्था धडपडत आहेत. ज्यांच्या दासी ऋद्धिसिद्धि आहेत असे हे महाराज या संस्थांना, या लोकोपयुक्त कार्यांना सिद्धीच्या जोरावर संपन्न कां करीत नाहींत ? तसें जर ते करतील तर राष्ट्रावर उपकार होणार नाहीं काय ?

एखादा महाराज हजारो लोकांसमक्ष आव्हान देऊन चमत्कार करतो असें म्हणतो. पण ते त्याच्या कसे अंगलट येतात याचें प्रसिद्ध उदाहरण श्री पांचलेगांवकर महाराज यांचें आहे.

या महाराजांनीं प्रथम प्रथम आपल्या सर्पसिद्धीचें व अग्निसिद्धीचें बरेंच स्तोम माजविलें ! हिंदुसंघटणाविषयीं कार्य करणारे म्हणून प्रथम लोकांनीं त्यांच्याकडे कौतुकानें पाहिलें. आम्हीहि त्यांचेकडे आदरानेंच पाहातों. पण, पुढें महाराजांच्या चमत्कारांची चिकित्सा होऊं लागल्यावर साप धरणारेही पुष्कळ निघाले. कांहीं लोक तर साप धरतां धरतां मेले व पुष्कळ सर्प निर्विष असतात असा सिद्धांत निघाला ! नागसर्पावर खरोखर कसलेंहि औषध चालत नाहीं पण कोणताही सर्प चावला तरी "चोवीस तासांत त्याचा बंदोबस्त करतों. मला तारेनें कळवा" असें जें पांचलेगांवकर म्हणतात तें सर्वस्वी खोटें आहे हें सुद्धां आतां कळून चुकलें आहे. वाई प्रा. पा. शाळेंतील एका शिक्षकाला नागसर्प चावला व अवघ्या दोन तासांत तो गृहस्थ उडाला! त्या वेळीं श्रीपांचलेगांवकरांना सतरा रुपये खर्चून तारा केल्या; पण ते पैसे फुकट गेले ! सर्पविद्येबद्दल जेवढें ते सांगतात तें तितकें खरें नाहीं व त्यांच्या या चमत्कारांत कांहीं अर्थ नाहीं हें चिकित्सक लोकांना आतां समजलें आहे.

पांचलेगांवकरांच्या चळवळीमुळें पुष्कळ सर्प निर्विष असतात एवढेंच सिद्ध झालें. परेळच्या लॅबोरेटरीमध्यें त्यांच्या सिद्धीचा अनुभव घेण्याकरितां पाचारण केलें होतें, पण त्यांनीं तें स्वीकारलें नाहीं; यावरून

नागसर्पाच्या विषावर औषध नाहीं हेंच खरें होय. सर्पसिद्धीप्रमाणें त्यांच्या अग्निसिद्धीचाही अनुभव लोकांना आला असून पुष्कळ लोक पेटलेल्या खाईंतून चालूं शकतात असेंहि सिद्ध झालें आहे.


सर्वांत धूर्त व वस्ताद महाराज तोच कीं जो उघडपणें चमत्कार तर राहोच पण फारसा बोलतहि नाहीं. कारण महाराज बोलूं लागला कीं विद्वान् लोक त्याच्या भाषणाची छाननी करूं लागतात व चमत्कार दाखवूं लागला तर चिकित्सक व शोधक लोक त्याचा पिच्छा पुरवितात. त्या हिसकाहिसकींत महाराज टिकत नाहीं. म्हणून सर्वांत धूर्त महाराज चमत्कार दाखविणार नाहीं, फारसें बोलणार नाहीं, ग्रंथ लिहिणार नाहीं, किंवा मासिकहि काढणार नाहीं; तर तो नुसता आशीर्वाद देत बसेल !!

पुष्कळ बुवांच्याजवळ बुवाशाहींतील चमत्कार नसतात, पण चमत्कारिक वर्तन मात्र असतें. त्यामुळें ते लोकांवर छाप ठेवूं इच्छितात. पळत पळत मधुकरी मागणें, मधुकरीच्या अन्नाचा काला एकत्र करून खाणें, प्रश्नांचीं उत्तरें न देणें, उगाच एखाद्याच्या आईबाईचा उद्धार करणें, दर्शनास कोणी मातवर मनुष्य आला तर पळापळी करून त्यास झुकांडी देणें, असल्या चमत्कारिक स्वभावानें जरी प्रथम लोक झुलत असले तथापि शेवटीं भ्रमाचा भोपळा फुटतो ! रामदासी सांप्रदायांतील कित्येक महाराजांच्याजवळ हा असला चमत्कारिक स्वभाव असतो व त्याचें समर्थन ते समर्थांच्या ओंव्या म्हणून करीत असतात.

आम्हीसुद्धां चमत्कार करतों

चमत्काराचा व ब्रह्मवेत्त्याचा कांहीं संबंध नाहीं. ब्रह्मज्ञानी नसतांना सुद्धां काकतालीय न्यायानें कांहीं गोष्टी घडतात व त्या चमत्काराच्या सदरांत घालतां येतात. वाई सोडून मिरजेस आल्यापासून येथें पुष्कळ पाऊस पडत आहे. याचें कारण गेलीं ५–६ वर्षें सर्वत्रच पाऊस अधिक पडत आहे. पण हा चमत्कार **लेखक मिरजेस आल्यामुळें** झाला असें समजणें चुकीचें आहे. गतवर्षीं आम्ही जमखिंडीस गेलों होतों. तेथें गेल्या ७।८ वर्षांत पडला नाहीं असा भीज पाऊस तीन दिवस सारखा पडला. प्रवचन संपल्यावर रात्रीं ११ वाजतां पावसास प्रारंभ होई व तो बरोबर प्रवचनाच्या पूर्वीं

सायंकाळीं ८ वाजतां हुकूम दिल्याप्रमाणें थांबे. भोळ्या लोकांना या यदृच्छेनें घडलेल्या गोष्टी चमत्काराप्रमाणें वाटतात व महाराजांचें दोंद वाढतें. गतवर्षीं गणपति उत्सवानिमित्त ओगलेवाडीस गेलों असतां तेथें ज्यांचे घरीं उतरलों होतों त्यांच्या एका नातलगाचा खोकला पार नाहींसा झाला. त्या गृहस्थाला तो खोकला ३।४ महिने दमवीत होता. लेखकाच्या पायगुणानें जर तो खोकला गेला असेल तर खोकल्यावर तें एक औषधच होईल. मग जेथें जेथें खोकले आहेत तेथें जर लेखकाला हिंडविलें तर ते खोकले जातील काय ? किंवा जेथें बिलकुल पाऊस नाहीं तेथें लेखक गेल्यानें पाऊस पडेल काय ? या सर्व यदृच्छेनें व काकतालीय न्यायानें गोष्टी घडतात. लुच्चे लोक यांचा संग्रह करून त्या सांगत सुटतात व त्यावर जगतात. गारुड्याप्रमाणें चमत्कार करणें किंवा यदृच्छेनें घडलेल्या गोष्टींचें चमत्कारतुल्य वर्णन करणें हें कोणालाहि शक्य आहे. पण तें ज्ञान्याचें वा सत्पुरुषाचें लक्षण नव्हे ! खरा ज्ञानी अलौकिक न होतां, चमत्कार न दाखवितां, लोकांना न दिपवितां सभ्यपणानें व शांतपणानें अगदीं सामान्य माणसासारखा राहून समाजाची अखंड सेवा करीत असतो. परमार्थाचा साधक चमत्कार व लौकिक यांच्या जाळ्यांत सांपडला म्हणजे तो कसा भ्रष्ट होतो याचें मजेदार वर्णन पुढील प्रकरणांत येईल.



प्रकरण ११ वें. : :

श्री एकनाथ व साधकाचें पतन

परमार्थ साधणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं, ती फारच कठिण आहे. पुष्कळ साधक या मार्गाकडे प्रवृत्त होतात पण अखेर गांठणारा खरोखरीच विरळा असतो.

विरळा ऐसा कोणी । तुका त्यासी लोटांगणी ॥

ही तुकारामाची उक्ति या दृष्टीनें बरोबर आहे. साधक परमार्थाकडे प्रथम सद्बुद्धीनें कसा प्रवृत्त होतो, अत्यंत विरक्त असतांना सुद्धां हळुहळु पंचविषयांच्या तावडींत कसा सांपडतो, स्त्री आणि वित्त यांपासून अलिप्त राहण्याचा यत्न करितां करितां त्यांतच तो कसा गुरफटून जातो, याचें सुंदर चित्र श्री एकनाथांनीं आपल्या चिरंजीव पदामध्यें रेखाटलेलें आहे. तसेंच त्यांनीं भागवतामध्येंहि प्रसंगानें व ओघानें हेच विचार मांडलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणांत साधक हा कसा खालीं खालीं जात असतो हें श्री एकनाथांच्या वचनाधारें सांगण्याचें योजिलें आहे.

श्री एकनाथ म्हणतात:—

विषय पांच आहाती । ते साधका अवश्य नाडिती
म्हणोनि लागो न द्यावी प्रीती । कवणे रीतीं ते ऐका ॥१३॥
जेणें धरिला शुद्ध परमार्थ । त्यासी जनमान हा अनर्थ ।
तेणें वाढे विषय स्वार्थ । ऐका नेमस्त विचार ॥१४॥

पंच विषय हे या जगांत जगण्याकरितां लागतातच. पण साधक हे विषय जों टाळायला जातो तों तेंच त्याच्या बोकांडीं बसतात. प्रथम कोणीहि मनुष्य प्रापंचिक लोकांपेक्षां थोडें देवधर्माकडचें अधिक आचरण करूं लागला म्हणजे लोक त्याची उगाचच स्तुति करूं लागतात. एखादा ग्रॅज्युएट मनुष्य दाढी वाढवून विवाह वगैरे न करतां स्नानसंध्या थोडी लांबलचक

करूं लागला कीं लोक म्हणतात कीं "काय हें वैराग्य, काय ही धर्मनिष्ठा, सर्वच अपूर्व व अलौकिक!" तो तरुण असेल तर तारुण्याचें तेज स्वाभाविक असतेंच, तें पाहून लोक म्हणतात कीं "वाः!! काय हें सात्त्विक तेज! ईश्वरी अंश आहे बुवा!" अशी स्थिति होऊं लागली कीं साधक निम्माशिम्मा मरतो. लोक अशी एखाद्याची बेसुमार स्तुति करून त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवितात व पुढें विचारा तो खालीं पडतो.

समजा, एका गांवांतील सुखवस्तु तरुण यात्रेला निघाला आणि यात्रा करून नर्मदातटाकीं राहून, गायत्री पुरश्चरणें करून जर तो परत आला तर लोक त्याची वाटेल तशी स्तुति करूं लागतात. बाहेरच्या लोकांच्या स्तुतीला गांवच्यांनीं व घरच्यांनीं मदत केली म्हणजे मग विचारावयासच नको! शिवाय अशा माणसामध्यें खरोखरीच जर सद्बुद्धीचा आणि वैराग्याचा अंश असेल तर तें त्याचें नैराश्य पाहून आणि ती निस्पृहता देखून लोक त्याची फारच वाखाणणी करतात व सन्मानानें बोलावून पूजाअर्चाहि करूं लागतात.

नैराश्य पुरुष देखोनी । त्याची स्तुति करिति जनीं ।
एक सन्मानें करूनि । पूजे लागूनि पैं नेती ॥ १५ ॥
तंव त्याचें वैराग्य कोमल कंटक । नेट न धरीच निष्टंक ।
देखोनि मान स्तुति अलौकिक । भुलला देख पै तेथें ॥ १६ ॥

लोक असें सन्मानानें बोलावूं लागले म्हणजे तो साधक मान व स्तुति यांस भुलतो. अशा गृहस्थानें बोलतांना एखादी कोटी केली कीं लगेच 'काय हो ही मार्मिकता' असें लोक म्हणतात. विद्या नसतां आणि वक्तृत्वहि नसतांना जर लोक अवास्तव स्तुति करून 'काय ही विद्या, काय हें वक्तृत्व' काय हें सामर्थ्य' असें बडवडूं लागले म्हणजे याच्याहि अंगावर मूठभर मांस येतें. संस्थानिकांच्या भोंवतीं (किंवा पूर्वीच्या बादशहाच्या भोंवतीं) जसे खुषमस्करे असतात, तसेंच बिनपगारी खुषमस्करे या पारमार्थिक साधकाच्या भोंवतालीं जमतात. गोड बोलून कार्य साधणें व महाराजांची मर्जी प्रसन्नकरून घेणें एवढेंच या खुषमस्कऱ्यांचें काम असतें. साधकाभोंवतीं असा हा सामान्य

जनांचा गराडा पडूं लागला म्हणजे हळुहळू सुशिक्षितहि येतात आणि त्यांतील कांहीं तर महाराज हे ईश्वराचा साक्षात् अवतार आहे असेंहि बोलूं लागतात

जनस्तुति लागे मधुर । म्हणती हा उद्धरावया हरीचा अवतार ।।
आग्हालागी जाहला स्थिर । धरी अपार शब्द गोडी ।। १७ ।।

साधकालाहि या भापेमुळें आपण अवतार आहों, आपल्या वाणींत व शरीरांत कांहीं सामर्थ्य आहे असें उगाचच्या उगाच वाटूं लागतें. मानसशास्त्र-दृष्टचा अशा गोष्टी घडतात कीं एखाद्याला १०।२० मंडळींनीं ' काय हो, तुम्ही आजारी दिसतां ' ' काय हो तुमची प्रकृति जरा नादुरुस्त दिसते ' असें वारंवार म्हटलें तर सतत एकच गोष्ट ऐकल्यामुळें आजारी नसतांनासुद्धां माणसाला आजारी आहोंत असें वाटतें. तोच प्रकार येथेंही होतो. सारखी स्तुति, सारखा मान आणि आपण ईश्वरांश आहोंत या कल्पनेचे आघात होऊं लागले म्हणजे साधक शब्दविषयाच्या मगरमिठींत चांगलाच सांपडतो! मग त्याला कुणी उलट बोललेलें सहन होत नाहीं, कुणी निंदा केली तर तो गुरगुरूं लागतो, कोणी सद्बुद्धीनें महाराज हें चुकतें आहे बरें नव्हे, असें सांगूं लागला तर तो डोळे वटारूं लागतो व स्वतःला कांहीं तरी अद्वितीय समजतो ! !

झालें ! एकदां शब्दविषयानें अशी कुर्रघोडी केल्यावर मग ' चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः' या न्यायानें इतर सर्व विषय त्याला झोंबूं लागतात. गोड भाषा, गोड शब्द, याप्रमाणेंच लोक त्याला मग मऊ मऊ स्पर्शांनीं गांजून टाकतात. त्याबद्दल नाथांचे पुढील उद्गार विचारार्ह आहेत.

हा पांच विषयांमाजी प्रथम । शब्द विषय उपक्रम ।।
मग स्पर्श विषय संभ्रम । झोंबे परम त्या कैसा ।।१८।।
नाना मृदु आसनें घालिती । विचित्र पर्यंक निद्रेप्रती ।
नरनारी आंग शुश्रूषा करिती । तेणें धरी प्रीति स्पर्शाची ।।१९।।

परमार्थमार्गाकडे प्रवृत्त झालेल्या साधकाची लोक प्रथम अवास्तव स्तुति करतात व मग हळुहळू आपल्या घराकडे पायधूळ झाडावी म्हणून बोलावतात. हा साधक लोकांचे घरीं जाऊं येऊं लागला म्हणजे लोकांशीं त्याचा अधिक संबंध येतो. कांहीं वेळां असें होतें कीं हे अमके महाराज बिलकुल

जेवत नाहींत, कांहीं खात नाहींत, उपास करतात, असें लोक म्हणतात. कांहीं बावतींत हें खरेंहि असतें. पण खात नाहीं, जेवत नाहीं, कांहीं घेत नाहीं, असें कोणी म्हणूं लागला कीं लोक त्याच्या शरीराची सेवा करण्याकरितां धडपडूं लागतात. लोकांना बुवांच्या नादीं लागण्याचें वेड असतें, स्वतःचा उद्योग नसतो किंवा बुवांच्या नादानें आपलें कल्याण होईल अशी खुळी समजूत असते म्हणून कोणीकडून तरी चरणस्पर्श अथवा पादसंवाहन, निदान कांहीं तरी सेवा घडावी अशा भावनेनें लोक त्यांच्या मागें लागतात. कोणी मऊमऊ आसनें, कृष्णाजिनें, व्याघ्रांबरें महाराजांना देतात, तर कोणी हातपाय रगडण्याची इच्छा दर्शवितात. कोणी महाराजांकरितां गाद्या, गिरद्या, पलंग यांची व्यवस्था करूं लागतात. याप्रमाणें शब्दानंतर स्पर्श व स्पर्शानंतर रूप व रस हे विषय साधकाला गिळून टाकतात.

पायावर स्त्रियांनीं पाणी घालावयाचें, पाय स्त्रियांनींच पुसावयाचे, विडा स्त्रियांनींच कुटून द्यावयाचा, अंगाला उटी स्त्रियांनींच लावावयाची असा सर्वत्र **स्त्रियांचा गराडा पडला** म्हणजे त्याच्या डोळ्यालाहि सुंदर सुंदर स्त्रिया नेहमीं पाहण्याची संवय लागते; व त्या न दिसल्या म्हणजे तो कावरावावर होतो. भोंवताली स्तुतीचें वातावरण, खाण्याला घृतकुल्या-मधुकुल्या, शरीरसेवेकरितां बहुतेक स्त्रिया व क्वचित् पुरुष असें क्रमानें होऊं लागलें कीं अधःपतनाला अवकाशच नसतो. स्त्री, वित्त व लौकिक हीं आपोआप त्याच्या मागें लागतात व परमार्थ बाजूला राहून साधकाला तेंच बरें वाटतें.

रूप विषय तरी गोवीं । वस्त्रें भूषणें देती बरवीं ।
तेणें सौंदर्यें करी जीवीं । देहभावें श्लाघ्यता ॥ २० ॥
रूपविषय ऐसा जडला । मग रसविषय कैसा झोंबला ।
जें जें आवडे तें तयाला । गोड गोड अर्पिती ॥ २१ ॥

जगांत चमत्कार असा आहे कीं जो मला स्त्री नको, वित्त नको असें म्हणतो आणि वैराग्यामुळें जो प्रपंचहि नको म्हणतो, त्याच्या मागें लोक संसार लावतात ! जो म्हणतो कीं मला परमार्थ साधावयाचा आहे, त्याला तो साधूं देत नाहींत. ज्याची इच्छा जगापासून अलिप्त राहून अत्यंत



वैराग्यानें ईशचिंतनांत काळ घालवावा, ही त्याची इच्छा लोक पुरी करूं देत नाहींत. कोणी मिष्टान्नें खावया ग्रा घालून, तर कोणी सेवा करून, तर कोगी चंदनाच्या उटचा, केशर, बुक्का यांचें विलेपन करून त्याला बिघडवितात. त्याचा परिणाम पुढें असा होतो कीं जे लोक प्रथम प्रथम त्याची स्तुति करतात, तेच पुढें त्याची निंदाहि करूं लागतात व म्हणतात कीं हे महाराज पूर्वी फार विरक्त होते, पण आतां मात्र पूर्ण बिघडले ! पूर्वपरिचिता-कडून अशी तोंडावर निंदा होऊं लागली तरी त्याला कांहीं अनुताप उत्पन्न होत नाहीं व मग केवळ निर्लज्जपणें आपला डामडौल कसा राहील एवढेंच तो पाहूं लागतो. याविषयीं नाथ पुढीलप्रमाणें म्हणतात

आवडे सुमन चंदन । बुक्का केशर विलेपन ॥
ऐसे पांचहि विषय पूर्ण । जडले जाण सन्मानें ॥ २३ ॥
मग जे जे जन वंदिती । तेचि त्याची निंदा करिती ।
परि अनुताप नुपजे चित्तीं । ममता निश्चिती पूजकाची ॥ २४ ॥

याप्रमाणें साधकाचा परमार्थ तर बिघडतोच पण जे लोक त्याच्या नादीं लागलेले असतात त्यांचा प्रपंचहि बिघडतो. वैराग्याचा जोर कमी झाल्यामुळें विषय, वित्त आणि लौकिक यांच्या पाशांत साधक सांपडतो. म्हणजे प्रापंचिक लोक साधकाला प्रापंचिक बनवून 'आपणासारिखे तात्काळ करिती' असें करतात. तसा तो प्रापंचिक बनला म्हणजे धंदेवाईकपणें प्रतिष्ठा वाढेल कशी व पैसा मिळेल कसा हें तो पाहातो. मग पिशाच्चें काढणें, अंगारे देणें, गंडेदोरे, मंत्रतंत्र, छाछू हें सर्व सुरू ठेवतो. त्यामुळेंहि वराचसा स्त्रीपुरुष समाज नादीं लागत असतो.

अलीकडे सत्पुरुषांच्या भोंवतीं नेहमीं स्त्रियांचा घोळका असतो. आणि कित्येक लोक असेंहि म्हणतात कीं आहो, महाराजांची दृष्टि सर्वत्र सम आहे, तेव्हां त्यांना स्त्रिया काय व पुरुष काय सर्व सारखेच ! पण स्त्रियांचें स्मरण, त्यांच्याशीं गोष्टी बोलणें, विनोद करणें, टक लावून पाहाणें हे सगळे परंपरेनें मैथुनाचेच आठ प्रकार आहेत, असें शास्त्रकार म्हणतात.

स्मरणं कीर्तनं केलिः प्रेक्षणं गुह्य भाषणं ।
संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिष्पत्तिरेवच ॥

शिवाय परमार्थ साधणाऱ्या साधकाला (धंदेवाईकाला नव्हे) एकंदरींत सर्वच विषय विशेषतः स्त्रीविषय किती बाधक असतो, याचें विवेचन श्री एकनाथांनीं आपल्या भागवतामध्यें ठिकठिकाणीं केलेलें आहे. तेव्हां त्यांतील कांहीं उतारे येथें देतों.

नाथभागवत अ. १७ श्लो. ३३

स्त्री ते अग्निकुंडासमान । पुरुष तो घृतकुंभ जाण ।
तेथ द्रवतां अंतःकरण । अर्धक्षण लागेना ।३४६।।
घृत वेचलियापाठीं । घटासी जाहल्या **वर्षें साठी** ।
तरी अग्निशीं जाहल्या भेटी । द्रवतां पोटीं तोहि धरी ।।३४७।।
तेवीं **वार्धक्य वयसेंसीं । एकांत जाहलिया स्त्रियेशीं ।**
गोष्टी मात विनोदेंसीं । कामाचा त्यासी घाला पडे ।।३४८।।

ना. भा. अ. २६ श्लो. २२

अग्निमाजी घृताची वस्ती । जरी बहुकाल निर्वाहती ।
तरी स्त्रीसंगें परमार्थी । निजात्मस्थिति पावते ।।२४३।।
घृत वेंचल्या वर्षें झालीं साठीं । तरी अग्निसंगें द्रव उपजे घटीं ।
तेवीं प्रमदासंगपरिपाठीं । **वार्धकींही उठी अति कामू** ।।२४४।।
जरी कापूर अग्नी आंत । नांदो लाहतां न पोळत ।
तरी स्त्रीसंगें परमार्थ । पावतें समस्त परब्रह्म ।।२४५।।
अग्निपोळा धरिली हातीं । तैसी स्त्रियांची संगती ।
संगें वाढवी आसक्ति । पाडी अनर्थीं पुरुषातें ।।२४६।।

वरील ओंव्यांचा अर्थ लक्षांत घेतां स्त्रियांचा घोळका हा परमार्थाच्या दृष्टीनें किती घातक आहे याची कल्पना येईल. शिवाय,

तैसें सेवितां विषयासी । कोण गोडी मुमुक्षूंसी ।
प्रतिपदीं आत्मघातासी । अहर्निशी देखती ।।८६।। अ. ७ श्लो. ९
ज्ञात्यासी स्वेच्छा विषयाचरण । सर्वथा न घडे गा जाण ।
तेही विषयीचें लक्षण । सावधान परियेसी ।। ११५।। अ. ७ श्लो. ११
कनक आणि कामिनी । ज्यांसी नावडे मनींहुनी ।
तोचि जनार्दनु जनीं । भरवसेंनी ओळख पां ।।१२०।। अ. ८ श्लो. ३९

त्यागावी कामिनी संगती । हा मुख्य त्याग परमार्थी ।
हेंचि स्वमुखें श्रीपती । उद्धवाप्रती बोलिजेला ॥ ३४९ ॥ अ. १७ श्लो. ३३

वरील ओव्यांचा बारकाईनें विचार केला म्हणजे खरा परमार्थ हा फारच कठिण आहे आणि परमार्थाचा धंदा करून जगणें फार सोपें आहे असें वाटतें. कांहीं अधिकार नसतांना, वैराग्य नसतांना जीं माणसें केवळ परमार्थाच्या नांवाखालीं महाराज किंवा बुवा बनतात आणि आम्ही राजयोगी आहोंत म्हणून वाटेल तसें वागून अनाचार माजवितात त्यांचा धिःकार करावा तेवढा थोडाच आहे.

ना. भा. अ. २८ श्लोक २८

आम्ही राजयोगी अतिश्रेष्ठ । म्हणोनि विषय भोगी यथेष्ट ।
वोस पडली वैराग्य पेठ । कुयोग चोखट या नांव ॥ ४१२ ॥
आपली चोरूनि विषयासक्ति । वाहय मिरवी मिथ्या विरक्ति ।
हेचि कुयोगाची स्थिति । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४१३ ॥

अ. २९ श्लोक २

वदूनियां ब्रह्मज्ञान । होती शिश्नोदरपरायण ।
जिव्हा शिश्न जो आवरी जाण । तया ब्रह्मज्ञान कलियुगीं ॥९२४॥

पण लोकांत धर्मभोळेपणा फार, मूर्खपणाहि फार; यामुळें मूर्खांच्या पैशावर लुच्चे लोक जगतात; ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. **ईश्वरभक्ति व परमार्थ हे धंदे नव्हेत**, यांवर जगणारे लोक लुच्चे आहेत, ते परमार्थाच्या मार्गावरून पतित झालेले आहेत, अर्थात् त्यांचा प्रतिकार करणें हें एक आपलें कर्तव्य असेंच समाजानें समजलें पाहिजे. ढोंगी संताची फटफजिती करण्यांत मुळींच अधर्म नाहीं. उलट स्वस्थ बसण्यांतच कसा अधर्म आहे, हें श्री तुकाराम महाराज यांच्या अभंग वाणीनेंच पुढील प्रकरणांत सांगतों.



तरुण राजयोगी महाराजांची आरती चालूं आहे. (पृ. १०८)

प्रकरण १२ वें : :

तुकाराम व ढोंग्यांचा परामर्ष

श्री तुकाराम हे संतहि होते व कवीहि होते. त्यांना अर्वाचीन काळांतील एक मोठे सत्पुरुष असें लोक समजतात. तुकाराम महाराजांच्या अभंगांना चांगलाच मान आहे आणि वारकरी सांप्रदायांत तर त्यांचे अभंग वेद-तुल्य मानतात, म्हणून त्यांच्या अभंगवाणीच्या आधारें सत्पुरुषांची पूर्वस्थिति कशी असते, ते साधकदशेमध्यें कसे वागतात, सिद्धावस्थेंत ते कसा व्यवहार करतात, भोंदू गुरूवद्दल ते काय म्हणतात व त्यांचीं लक्षणें कोणतीं हें सर्व येथें सांगावयाचें आहे.

तुकारामाचे अभंग* म्हणजे शास्त्रीय ग्रंथ नव्हे किंवा सुसंबद्ध असें काव्यहि नव्हे. त्यांचे अभंग म्हणजे हजारो प्रसंगीं अन्तःकरणामध्यें उचंबळलेल्या व उसळलेल्या वृत्ति! त्या वृत्तींचें तें शाब्दिक प्रतिबिंब होय. तथापि त्यांतहि हृदयांतील तळमळ व ठाशीव सिद्धांत असल्यामुळें त्यांचें महत्त्व फार आहे.

(२४६७) साधकाची दशा उदास असावी। उपाधी नसावी अंतर्बाह्य ॥१॥
लोलुपता काय निद्रेसी जिंकावें। भोजन करावें परिमित ॥२॥
एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं भाषण। प्राण गेल्या जाण करूं नये ॥३॥
तुका म्हणे ऐशा साधनीं जो राहे। तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥४॥

(२४६८) निर्वाहापुरतें अन्न आच्छादन। आश्रमासी स्थान कोऽपी गुहा ॥१॥
कोठेंहि चित्तासी नसावें बंधन। हृदयीं नारायण सांठवावा ॥२॥
नये बोलों फार बैसों जनामधीं। सावधान बुद्धि इंद्रियें दमी ॥३॥

---

* टीप—अभंगांचे आंकडे निर्णयसागरची गाथा आवृत्ति दुसरी यांतील आहेत.

तुका म्हणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ।।४।।
(२४७०) आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें।।१।।
नाहीं तरी सुखें असावें संसारीं । फजीती दुसरी करूं नये ।।२।।
आशा मारुनियां जयवंत व्हावें । तेव्हांचि निघावें सर्वांतूनि ।।३।।
तुका म्हणे जरी योगाची तांतडी । आशेची विवुडी करी आधीं ।।४।।
(२५०८) साहोनियां टांकी घाये । पाषाण देवचि झाला पाहे ।।१।।
(२५५३) देखीचें तें ज्ञान करावें तें काई । अनुभव नाहीं आपणासी ।।१।।
इंद्रियांचे गोडी ठकलीं बहुतें । सोडितां मागुतें आवरेना ।।२।।
युक्तीचा आदर नीतीचा वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ।।३।।
नाव नावलितां घाला घाली वारा । तैसा तो पसारा अहंतेचा ।।४।।
तुका म्हणे वुद्धी आपुले अधीन । करी नारायण आतुडे तो ।।५।।

वरील पांच अभंगांमध्यें तुकारामांनीं साधक स्थितीमध्यें वागण्याचे नियम सांगितले आहेत. त्यानें उदास असावें, उपाधिविवर्जित असावें, युक्ताहारविहारी असावें आणि स्त्रियांशीं एकांतांत व उघडही शक्य तेवढा संबंध आणूं नये, जगायला अन्न हें पाहिजेच व राहायला स्थान हें पाहिजेच ! परंतु त्याविषयींही फार आसक्ति नसावी. इंद्रियदमन व चित्तैकाग्र्य इकडे लक्ष असावें. साधकानें आशापाशांत गुंतूं नये. आशेवर जो जय मिळवील तोच योगी होईल. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवकळा येत नाहीं. इंद्रियांच्या मोहानें आजवर फार लोक फसले आहेत म्हणून साधकानें वैराग्यसंपन्न असावें. नांव जशी वाऱ्यांत सांपडली कीं वुडते तसाच अहंतेचा घाला केव्हां येईल याचा नेम नसतो. ममकार व अहंकार हे साधकाचे शत्रु होत. त्यांच्या तावडींत न सांपडतां जो बुद्धि जतन करून ठेवतो त्यालाच ईश्वर भेटतो.

पुढील कांहीं अभंगांमध्यें त्यांनीं आणखीहि साधकाच्या स्थितीविषयीं नियम सांगितलेले आहेत. ते अभंग असे:—

(५०१) पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आम्हां नारायण तैशापरी ।।१।।
सर्व भावें लोभ्या आवडे हें धन । आम्हां नारायण तैशापरी ।।२।।
तुका म्हणे एकविध झालें मन । विठ्ठलावांचून नेणें दुजे ।।३।।

(५५४) एक धरिला चित्तीं । आम्ही रखुमाईचा पती ॥१॥
तेणें जालें अवघें काम । निवारला भवश्रम ॥२॥
परद्रव्य परनारी । जाली विषाचिया परी ॥३॥

(६३६) परनारी मज रखुमाईसमान । वमनाहुनी धन नीच मानी ॥२॥

(१२९४) शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥३॥
विवेकासहि वैराग्याचें बळ । धगधगितो ज्वाळ अग्नि जैसा ॥४॥

(१६७०) माझें मन पाहे कसून । चित्त न ढळे तुजपासून ॥१॥
कापूनि देईन शिर । पहा कृपण कीं उदार ॥२॥
मजवरी घाली घण । परि मी न सोडी चरण ॥३॥
तुका म्हणे अंतीं । तुजवांचूनि नाहीं गती ॥४॥

(१६७६) रात्रीदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥१॥

(१८६८) कामक्रोध वंदिखाणीं । तुका म्हणे दिले दोन्ही ।
इंद्रियांचे धणी । आम्ही झालों गोसावी ॥४॥

(१८७७) सोनें रुपें आम्हां मृत्तिकेसमान । माणिकें पाषाण खडे तैसे ॥३॥
तुका म्हणे तैशा दिसतील नारी । रिसाचियेपरी आम्हापुढें ॥४॥

(१९२१) न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥१॥
ऐसी माझी वाणी मज उपदेशी । आणिका लोकांसी हेंचि सांगे ॥२॥
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ॥३॥

वरील अभंगांवरून असें दिसतें कीं साधकाचें मन एकविध असतें. त्याच्या मनाला परमेश्वरावाचून दुसरा विषय शिवत नाहीं. मग परस्त्री व परद्रव्य यांच्या अभिलाषाची तेथें वार्ता कशाला ? साधकाच्या ठिकाणीं धगधगीत अग्नीप्रमाणें सविवेक वैराग्य असतें, त्यामुळें त्याचें मन कामादिकांचा संगच करीत नाहीं. शांति, क्षमा, दया हे अलंकार त्याचे अंगावर मूर्तिमंत दिसतात. त्यामुळें साधकाच्या चित्ताची कितीहि कसून परीक्षा घेतली तरी तेथें ईश्वराशिवाय विषयच आढळत नाहीं.

खरा साधक बाह्य जग व आंतील षड्रिपु यांच्याशीं झगडून तो इंद्रियांचा स्वामी बनतो. खऱ्या साधकाला स्त्रीची, वित्ताची व द्रव्याची कसलीच अपेक्षा नसते; तर त्याला एका नारायणाशिवाय कांहीं नको

असतें. अनेक मोह आले व ते चित्तविक्षेप करूं लागले तरी त्याचें धैर्य इतकें अचल व अभंग असतें कीं हा साधक आपल्या ध्येयापासून कधींहि च्युत होत नाहीं.

आतां पुढील कांहीं अभंगांत अशा साधक स्थितींतून जो क्रमानें सिद्ध सत्पुरुष होतो तो कसा असतो, याचें वर्णन श्री तुकारामांनीं केलेलें आहे.

(३१३०) **कांहीं न मागें कोणासी । तोचि आवडे देवासी ॥१॥**

देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥ २ ॥
भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥ ३ ॥
नाहीं नाहीं त्यासमान । तुका म्हणे मी जमान ॥ ४ ॥

जो कोणाजवळ कांहीं मागत नाहीं हें पहिलें सत्पुरुषाचें लक्षण होय! ज्याच्या ठिकाणीं निरपेक्षता बाणलेली आहे तोच देव होय ! अर्थात् त्याच्याच मनामध्यें भूतदया असते. जो स्वतःच अपूर्ण, अतृप्त व आशाळभूत असतो तो दुसऱ्याचें कल्याण कसचा करतो ?

आजकाल संतांचा फार सुळसुळाट झाला आहे. प्रत्येक गांवांत एकादा तरी निरुद्योगी संत असतोच. लोक मूर्ख असल्यामुळें अशाच्या नादीं लागतात व त्या संताचें प्रस्थ माजतें. श्रीतुकाराम म्हणतात--

(१९३४) अभंकाचे साठीं । पंतें हातीं धरिली पाटी ॥ १ ॥
तैसे संत जगीं । क्रिया करूनी दाविती अंगीं ॥ २ ॥

खरें संत नुसत्या ब्रह्मज्ञानाच्या व देवाच्या गप्पा मारणारे नसतात, तर ते स्वतःच्या क्रियेनें लोकांना शिकवितात. स्वतः कांहीं न करतां बडबडणें व कुत्र्याचें भुंकणें हीं दोन्हीं सारखींच होत !

(१९४७) **ऐसा ज्याचा अनुभव । विश्वीं देव सत्यत्वें ॥ १ ॥**

देव तया जवळी असे । पाप नासे दर्शनें ॥ २ ॥
कामक्रोधा नाहीं चाली । भूतीं जाली समता ॥ ३ ॥
तुका म्हणे भेदाभेद । गेले वाद खंडोनी ॥ ४ ॥

(१९५४) जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥३॥
भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥४॥

(१९५५) काय सांगों आतां संतांचे उपकार । मज निरंतर जागवितां ॥१॥
काय द्यावें त्यांसी व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥२॥
सहज बोलणें हित उपदेश । करूनि सायास शिकविती ॥३॥
तुका म्हणे वत्स धेनुचिया रीतीं । तैसे मज येती सांभाळीत ॥४॥

(१९६९) जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥
मृदु सवाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ ३ ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करणें जे पुत्रासी । तेचि दासां आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

(१९८३) धन्य ते संसारी । दयावंत जे अंतरीं ॥ १ ॥
येथें उपकारासाठीं । आले घर ज्यां वैकुंठीं ॥ २ ॥
लटिकें वचन । नाहीं देहीं उदासीन ॥ ३ ॥
मधुरा वाणी वोठीं । तुका म्हणे वाव पोटीं ॥ ४ ॥

वरील पांच अभंगांत तुकारामांनीं सत्पुरुष लक्षणें मोठ्या मार्मिकपणें मांडिलीं आहेत. विश्वामध्यें देव आहे असा ज्याला अनुभव आला, सर्वत्र समत्व ज्याला बाणलें, स्वतःच्या देहावरचें ममत्व जाऊन भूतदया हेंच ज्याचें भांडवल ठरलें, ज्याचें सहज बोलणें उपदेशासारखें होऊं लागलें, तोच संत होय !

संत आपल्या रंजलेल्या व त्रस्त झालेल्या देशबंधूंची स्थिति नीट पाहतो, धान्य पिकवून त्यांना जेवावयाला कां मिळत नाहीं, हवापाणी चांगलें असून लोकांचें आरोग्य कां बिघडतें, यांचा तो बुद्धिपूर्वक अभ्यास करतो, आणि त्यांचें मूळ शोधून तें निवारण करण्याचा यत्न करतो. क्षुधितालां अन्न, आर्ताला औषध, नग्नाला वस्त्र देणें, यानेंहि त्रस्तांचें दुःख हरण होतें, पण ही सामान्य गोष्ट होय ! रंजल्या गांजलेल्यांचें खरें दुःख घालविण्यास दुःखाचें मूळच शोधावें लागतें. जे दयावंत या जगांत उद्योगाची पराकाष्टा करून लोकांवर उपकार करतात व मधुर वाणीनें लोकांना आकर्षून घेतात, तेच खरोखरी धन्य होत. अशा संतांचें बळ व बुद्धि हीं केवळ उपकारार्थच असत.त.

(१९८९) नाहीं संतपण मिळत हे हाटीं । पिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥१॥
नये मोल देतां धनाचिये राशी । नाहीं हें आकाशीं पाताळीं तें ॥२॥
तुका म्हणे मिळे जिवाचिये साठीं । नाहीं तरी गोष्टी बोलों नये ॥३॥

(२००४) भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनि ॥१॥
विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे धनजन माता पिता ॥२॥
निर्वाणीं गोविंद असे मागें पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥३॥
तुका म्हणे सत्य कर्मा व्हावें साह्य । घातलिया भय नको जाणें ॥४॥

(२०१६) बळबुद्धि त्यांची उपकारासाठीं । अमृत तें पोटीं साठविलें ॥४॥
दयावंत तरी देवाच सारिखीं । आपुलीं पारखीं नोळखती ॥५॥
तुका म्हणे त्यांचा जीव तोचि देव । वैकुंठ तो ठाव वसती ते ॥६॥

(२०२५) वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥१॥
नाहीं आणिक प्रमाण । तन धन तृण जन ॥२॥
पडता जड भारी । नेमा न टळे निर्धारी ॥३॥

(२०४१) संतासि तो नाहीं सन्मानाचि चाड । परि पडे द्वाड अव्हेरिते ॥१॥
तुका म्हणे जया संकोच दर्शनें । तया ठाया जाणें अनुचित ॥४॥

(२०५५) हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥१॥
तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥२॥
मोहरा तोचि अंगे । सूत न जळे ज्याच्या संगे ॥३॥
तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे अघात ॥ ४ ॥

(२०७७) बोल बोलतां वाटे सोपें । करणी करतां टीर कांपे ॥१॥
नव्हे वैराग्य सोपारें । मज बोलतां न वाटे खरें ॥२॥
विष खावें ग्रासोग्रासीं । धन्य तोचि एक सोसीं ॥३॥
तुका म्हणे करूनि दावि । त्याचे पाय माझे जीवो ॥४॥

(२०९४) चंदनाचे हात पाय ही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥१॥
दीपा नाहीं पाठी पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ॥२॥
तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहतां अवगुण मिळेचिना ॥३॥

(२१३०) तुका म्हणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेई ॥६॥

(२१४७) शुद्ध चर्या हेंचि संतांचें पूजन । लागतचि धन नाहीं वित्त ॥१॥
सद्गुणाचे सोई सगुण विश्रांती । आपणचि येति चोजवीत ॥२॥
तुका म्हणे वर्म सांगतों सवंगे । मन लावा लागे स्वहिताच्या ॥४॥

(२१५०) उपकारि असे आरोणि उरला । आपुले तयाला पर नाहीं ॥१॥
लाभावरी घ्यावें सांपडलें काम । आपला तो श्रम न विचारी ॥२॥
जीवा ऐसे देखे आणिकां जिवांसी । निखळचि राशि गुणांचीच ॥३॥
तुका म्हणे देव तयांचा पांगिला । न भंगे संचला धीर सदा ॥४॥

वरील सर्व अभंग पुन्हां पुन्हां विचार करण्याजोगे आहेत. संतपणा ही कांहीं बाजारांत मिळणारी वस्तु नव्हे. त्याच्या प्राप्तीकरितां जिवाचा मोवदला द्यावा लागतो. सर्व आशापाश नष्ट करून धनावर व लौकिकावर लाथ मारून केवळ सत्य कर्मामध्यें जेव्हां रंगून जावें त्याच वेळीं सर्वत्र असणारा गोविंद निर्वाणींहि धांवतो. खऱ्या संतांना, ज्यांना हरी मनापासून आवडतो, अशांच्याच सहवासाची इच्छा असते. त्यांना मान नको, सन्मान नको, त्यांचा सन्मान होऊं लागला तर त्यांना संकोच वाटतो. जगत् दुःख निवारण्याकरितां खरा सत्पुरुष अनेक आघात सोसतो आणि मोठ्या निश्चयानें अपमान, निंदा, दुःख, कष्ट हीं सर्व सहन करून दृढतर यत्नानें अ.पलें ध्येय गांठतो.

चंदनाला जसा सर्वत्र सुवास, साखरेमध्यें जशी सर्वत्र गोडी, तसेंच संत सज्जनांच्या ठिकाणीं सर्वत्र सद्गुणच आढळतात. सत्पुरुषांच्या अंगीं अवगुण औषधालाहि मिळत नाहीं. आत्मवत् सर्व भूतांचे ठिकाणीं पाहाण्याची दृष्टि ज्याला आलेली आहे, अशा संतांच्या भेटीकरितां यात्रा कराव्या लागत नाहींत, मठ धुंडाळावे लागत नाहींत व अनुग्रहहि घ्यावा लागत नाहीं तर आपल्या क्षेत्रांतच राहून कर्तव्य केलें व सदाचारानें वागलें म्हणजे खरे संत अशा माणसांना शोधतच येतात. खऱ्या संतांच्या भेटीला धन व वित्त हीं लागत नाहींत. सद्गुणसंपन्न होणें, शीलवान् बनणें हेंच सत्पुरुषाच्या भेटीचें साधन होय !

'समानशीलव्यसनेषु सख्यं' असा न्याय आहे. खरे संत हे समानशील अधिकाऱ्यांकरितां भुकेलेले असतात."

(२०१२) माझिया जातीचे मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ॥१॥
आवडे ज्या हरि अंतरापासुनि । ऐसियांचे मनीं आर्त माझें ॥२॥
तयालागीं जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ॥३॥

तेव्हां खरे संत भेटावे अशी जर इच्छा असेल तर आपली परिस्थिति, आपली बुद्धि व आपली शक्ति हीं ध्यानांत घेऊन धैर्यानें व उत्साहानें आपलें कर्तव्य करीत राहाणें हेंच योग्य होय !

जगामध्यें कष्टाशिवाय व उद्योगाशिवाय कांहीं मिळत नाहीं. टाकीचे घाव सोसल्याशिवाय जशी देवकळा येत नाहीं, त्याचप्रमाणें टक्के टोणपे खाऊन अपमान व दुःख हीं गिळून, दगदग सोसून जो आपलें ध्येय गांठतो तोच खरा मनुष्य होय ! अशा माणसालाच संत भेटतात. टिळेटोपी धारण करणें, माळा घालणें, भस्म लावणें, देव दाखवितों म्हणणें हीं संतलक्षणें नव्हेतच ! पुढील अभंगांत तुकाराम संताचें वर्णन करितात :

अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥१॥
आत्मानुभवीं चोखाळिल्या वाटा । त्याचे माथां जटा असो नसो ॥२॥
परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक । त्याचे अंगा राख असो नसो ॥३॥
परद्रव्या अंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा तुका म्हणे ॥४॥

या अभंगांतील प्रत्येक शब्द विचारार्ह आहे. यामध्यें ना भजन, ना टाळ कुटणें, ना उपदेश देणें, ना नामस्मरण करणें, कांहीं सांगितलेलें नाहीं. **केवळ सदाचारसंपन्नता हेंच सत्पुरुषलक्षण होय असें येथें म्हटलेलें** आहे. आणि खरे संत म्हणा किंवा सत्पुरुष म्हणा अत्यंत सदाचारानें राहून लोकांचें दन्य, पाप व ताप हीं नष्ट करीत असतात. आपल्या प्रबोधशक्तीनें समाजाचें हृदयदौर्बल्य व बुद्धिदौर्बल्य घालवून त्यांना प्रज्ञावान् करतात व समाजाला आत्मविश्वासी बनवितात. सत्पुरुष हे निर्भय, कर्तृत्ववान असे असल्यामुळें दगडालाहि पाझर फोडण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असतें. उद्योगानें व यत्नानेंच सर्व मिळतें असें ते समाजाला शिकवितात. त्यांच्या **तोंडून कोणाला द्रव्य मिळेल अगर मुलगा होईल अगर बढती मिळेल असले शब्द चुकून सुद्धां निघत नाहींत.** कारण असे जर उद्गार चुकून निघाले तर सत्पुरुष अधःपतित होतो व भोंवतालचा समाज आळशी, प्रज्ञाहत व निरुद्योगी होतो म्हणून तुकाराम म्हणतातः—

(१८७०) माझ्या मुखावाटा नयो हें वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणा ॥१॥
फुकाचा विभाग पतन दुःखासी । दोन्हीं मुळें त्यासी तेंचि साध्य ॥२॥

नाइकावी निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनिया ॥३॥
तुका म्हणे देव असाध्य यामुळें । आशा मोहजाळें गुंतलिया ॥४॥

ज्या कारणामुळें देव असाध्य होतो, सत्पुरुषहि पतित होतो व समाज प्रज्ञाहत होतो, तीं सर्व नाहींशीं करण्याबद्दल वरील अभंगांत इच्छा प्रगट केली आहे. अर्थात् अशा तऱ्हेचे अधिकारी संत विरळाच ! तथापि जगांत अशा विरळांचो भेट व्हावी असें जर कोणी इच्छित असेल तर त्याचेंहि साधन पुढील प्रमाणें आहे.

(१९४६) मन बुद्धि काया वाचा शुद्ध करी । रूप सर्वत्र देखोनी नमस्कारी ॥
लघुत्व सर्व भावें अंगिकारी । सांडी मांडी मी तूं पण ऐसी थोरी ॥
अर्थ काम चाड नाहीं चित्ता । मानामान मोह काय मिथ्या ॥
वर्ते समाधानी जाणोनि नेणता । साधु भेट देती तया अवचिता ॥

येथवर केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या हें लक्षांत येईल कीं सत्पुरुष हे साधकावस्थेंत व सिद्धावस्थेंतहि विवेक व वैराग्य यांनीं युक्त असतात, इंद्रियनिग्रही असतात, स्त्री, वित्त व लौकिक यांचा अभिलाष ते धरीत नाहींत, कामक्रोधावर ते जय मिळवितात. ते सच्छील व सदाचार-सपन्न असतात. स्वतःच्या कृतीनें लोकांना उदाहरण घालून देतात. रंजल्या-गांजलेल्यांच्या दुःखाचें मूळ शोधून तें नष्ट करण्याचा यत्न करतात. आपलें बल व आपली बुद्धि ही उपकाराकरितां खर्च करतात. ते दैवी संपत्तीचे पुतळे, निर्भयतेचे अचल, ध्येयनिष्ठ व ईश्वरावाचून कुणाचीहि पर्वा न करणारे असे असतात. समाजाचें दैन्य घालवून हृदयदौर्बल्य नष्ट करून त्यांना प्रज्ञावान् करतात. खरोखरीच वरील लक्षणांनीं युक्त असे संत दुर्मिळ नव्हेत काय ? आतां जे लुच्चे, भोंदु, ठक, दांभिक असे आहेत, व जे लोकांना प्रज्ञाहत करून कुमार्गाला लावून आपली तुम्बडी भरीत असतात त्यांचाहि धिःकार तुकारामांनीं कांहीं कमी केला नाहीं. तो कसा कडक केला आहे हें पुढील कांहीं अभंगांवरून दिसून येईल.

(२५६४) गाजराची पुंगी । तैसे नवे झाले जोगी ॥ १ ॥
काय करोनी पठण । केली अहंता जतन ॥ २ ॥
अल्प असें ज्ञान । अंगीं ताठा अभिमान ॥ ३ ॥
तुका म्हणे लंड । त्याचें हाणोनि फोडा तोंड ॥ ४ ॥

(२५६५) घालूनियां मध्यवर्ती । दाटुनि उपदेश देती ॥ १ ॥
ऐसे पोटभरे संत । तयां कैंचा भगवंत ॥ २ ॥
रांडा पोरांतें गोविती । वर्षासनें ते लाविती ॥ ३ ॥
जैसे बोलती निरोपणीं । तैसी न करिती करणी ॥ ४ ॥
तुका म्हणे तयां । तमोगुणियांची क्रिया ॥ ५ ॥

(२५६६) परद्रव्य परनारी । अभिलासूनि नाक धरी ॥ १ ॥
जळो तयांचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥ २ ॥

(२५८१) ऐसे संत झाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ॥ १ ॥
स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग वोडविली ॥ २ ॥
भांग भुर्का हें साधन । पचनीं पडे मद्यपान ॥ ३ ॥
तुका म्हणे अवघें सोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ ४ ॥

(२५८३) एक करिती गुरु । भोंवता भारु शिष्यांचा ॥ १ ॥
पुंस नाहीं पाय चारी । मनुष्य परी कुतरीं तीं ॥ २ ॥
परस्त्री मद्यपान । पेंड खाणें माजविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे निर्भर चित्तीं ॥ अधोगती जावया ॥ ४ ॥

वरील पांच अभंगांत ढोंगी बुवांचा समाचार तुकारामांनीं अगदीं खरपूसपणें घेतला आहे. ब्रह्मज्ञान झालें कीं जी सिद्धावस्था प्राप्त होते व जी आली असतांना अहंकार, अभिमान, दंभ, दर्प या वृत्ति मावळून जातात, त्या तत्कालिन धंदेवाईक सत्पुरुषांच्या ठिकाणीं दिसत होत्या म्हणून गाजराच्या पुंगीसारखे योगी झालेले आहेत, अहंतेनें पांडित्य प्रगट करीत आहेत; अल्पविद्या व गर्व फार, अशी यांची स्थिति आहे; ते छलबलानें दाटून उपदेश देतात, बायका पोरांना भोंदतात आणि वर्षासनें चालवितात! त्या पोटभरूंचे ठिकाणीं देवाचें अस्तित्व असंभवनीयच होय! ना आचार, ना स्नानसंध्या, ना सद्गुण; फक्त पुच्छ नाहीं व चार पाय नाहींत, असलीं हीं कुत्रीं जगाला उपद्रव देण्याकरितां आहेत, असें ते म्हणतात.

श्री तुकारामांचा मत्सर करणारे मंबाजीसारखे कांहीं थोडेथोडके बुवा नव्हते. त्यांना उद्देशून अगर त्याच तऱ्हेच्या भोंदूंना उद्देशून पुढील उद्गार काढलेले असावेत. ते म्हणतात लोकांत कीर्ति व्हावी व फुकट जेवतां यावें

म्हणून गोसावी झाला आहेस. चित्तांत अनुताप नाहीं, वागण्यांत सौजन्य नाहीं, असे लुच्चे लोक लोकांना व्यर्थ फसवितात. ब्रह्मज्ञानाची वडबड करून मोठीं, प्रवचनें झोडून चाळी खरेदी करणारे हे लोक नीचच होत. त्यांच्या महंतीला व त्यांच्या विद्वत्तेला आग लागो. कारण ते ब्रह्मविद्येला विकतात !

जगांत लुच्चांतला लुच्चा व अत्यंत डांबरट जर कोणी असेल तर जो " मी देव पाहिला आहे, मला देव दिसला " असें म्हणतो तो ! मी फक्त चार ईयत्ता शिकलों, माझ्या डोक्यांत आतां लख्ख प्रकाश पडला, माझ्या ठिकाणीं आतां सर्व ऋषी, मुनी, संत वगैरे येऊन बसले, अशा जो थापा मारतो व दुसऱ्यांना प्रज्ञाहत करतो त्या दुर्जनावर बहिष्कार घालावा, आणि त्याला फजीत करून त्याचें महत्त्व नष्ट करावें.

श्री तुकाराम पुढील एका अभंगांत असें स्वच्छ सांगतात कीं या असल्या राजविलासी, ढोंगी, दांभिक आणि ठक अशा साधूंच्या जवळ सुद्धां जाऊं नये. भोळ्या लोकांना साधु म्हटला कीं त्याचें दर्शन घ्यावें, त्याला भेटावें, सहवासास जावें असें वाटतें. पण या कुसंगतीनें एकादा दोष मात्र जडण्याचा संभव असतो आणि अवगुण तर खात्रीनें जडतोच ! तेव्हां अशांची संगति न धरितां त्यांच्यापासून चार पावलें लांबच असलेलें बरें !

(२५८८) जगीं कीर्ती व्हावी । म्हणोनि झालासी गोसावी ॥१॥
बहु केलें पाठांतर । वर्म राहिलेंसें दूर ॥३॥
चित्तीं नाहीं अनुताप । लटिकें भगवें स्वरूप ॥३॥
तुका म्हणे सिंदळीच्या । व्यर्थ श्रमविली वाचा ॥४॥

(२६१०) दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥२॥
तैसे खळां मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥२॥

(२६२१) वांझेनें दाविलें गरभारलक्षण । चिरगुटें घालून वाययाला ॥१॥
तेवीं शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकोनियां ॥२॥
वोलाचीच कढी वोलाचाची भात । जेवूनियां तृप्त कोण झाला ॥३॥
कागदीं लिहितां नामाची साकर । वाटितां मधुर गोडी नेदी ॥४॥
तुका म्हणे जळो जळोम ते हंती । नाहीं लाज चित्तीं आठवण ॥५॥

(२६८८) तोचि लटक्यामाजि भला । म्हणे देव म्यां देखिला ॥१॥
ऐशियाच्या उपदेशें । भववंधन कैसें नासे ।

बुडवि आपणासरिसे । अभिमानें आणिकास ।।३।।
(२८४१) दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥१॥
लात हाणोनियां वारी । गुंडा वाट शुद्ध करी ।।२।।
वहुतां पिडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥३॥
तुका म्हणे नखें । काढुनि टाकिजेती सुखें ।।४।।
(३३९९) संतसंगति न करावा वास । एखादे गुणदोष अंगा येती ॥ १।।
मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा ।।२।।
तुका म्हणे नमस्कारावें दुरून । अंतरीं धरूनि राहे रूप ।।३।।

ब्रह्मज्ञान व ईश्वरभक्ति यांच्या मिषानें लोकांना पीडा देणारे, स्त्री व द्रव्य हीं हरण करणारे, अनाचारानें वागणारे, राजयोगी म्हणून स्वतःची चैन करणारे असे जे असतील ते आमचे दावेदार होत, असें तुकाराम पुढें म्हणतात. दंभानें पोट भरेल, लुच्चेगिरीनें कांहीं काळ लोकहि फसतील, लटक्या पाल्हाळानें ब्रह्मज्ञान झालें आहे असेंहि भासवितां येईल, परंतु परमार्थाच्या दृष्टीनें हें सर्व घातक होय ! खरा परमार्थ हा दंभ, दर्प, अभिमान, द्रव्य, वित्त, यांच्यापासून लांव असतो इत्यादि विचार पुढील कांहीं अभंगांमध्यें स्पष्ट व सडेतोडपणें मांडलेले आहेत. जुन्या काळच्या शाळेचा पंतोजी जसा छमछम छडया मारून झणझणीतपणें शिकवीत असे, तसें पंतोजीचें काम तुकारामांनीं केलेलें आहे.

अंतःकरणाच्या तळमळीनें निघालेले हे स्पष्ट, कठोर व सत्य असे विचार पाहिले म्हणजे त्या कालांतील बुवाशाहीचीहि कल्पना येते. अशा लोकांना पाहून ते एके ठिकाणीं म्हणतात की "देवा तूं वाटेल तें कर पण या दुर्जनांना प्राण गेला तरी संत म्हणणार नाहीं व नमस्कारहि करणार नाहीं. ज्यांना दंभानें द्रव्य, स्त्री व इतर गोष्टी लाटावयाच्या आहेत त्यांना निर्भयपणें दंडच केला पाहिजे." असो !

(४९६) परपीडक तो आम्हां दावेदार । विश्वीं विश्वंभर म्हणऊनी ॥ १॥
दंडूं त्यागूं बळें नावलोकूं डोळां । राखूं तो चांडाळा ऐसा दुरी ।।२।।
अनाचार कांहीं न साहे अवगुण । बहु होय मन कासावीस ॥३॥
(६१६) दंभें कीर्ति पोट भरे मानी जन । स्वहित कारण नव्हे कांहीं ॥ १॥
अंतरती तुझे पाय मज दुरी । धरितां ये थोरी जाणिवेची ॥२॥

दुर्जनाचा मान। सुखें करावा खंडण(पृ. १२१)

पिंडाच्या पाळणें धांवती विकार । मज दावेदार मज माजी ॥३॥
(२४९२) निवडावे खडे । तरी दळण वोजे पडे ॥१॥
नाहीं तरि नासोनि जाये । कारण आळस उरे हाय ॥२॥
निवडावें तन । सेतीं करावें राखण ॥३॥
तुका म्हणे नीत । न विचारतां नव्हे हित ॥४॥
(२५५४) नव्हे ब्रह्मज्ञान बोलतां हें सिद्ध । जंव हा आत्मबोध नाहीं चित्तीं
काय करिसी वांया लटिकाची पाल्हाळ । श्रम तो केवळ जाणिवेचा॥२॥
मीच देव ऐसे सांगती या लोकां । विषयांच्या सुखा सोकोनियां
अमृताची गोडी पुढिला सांगसी । आपण उपवासी मरोनिया ॥४॥
तुका म्हणे जरि राहील तळमळ । ब्रह्म तें केवळ सदोदीत ॥५॥

प्रकरण १३ वें. : :

बुवाशाहीचे अनर्थ

गेल्या प्रकरणांत श्री तुकाराम यांच्या अभंगवाणीच्या आधारें दंभाचा स्फोट करणें, दुर्जनांचा प्रतिकार करणें व ढोंग्यांना उघडकीस आणणें हें कसें धर्म्य आहे न योग्य आहे हें दाखविलें. प्रस्तुत प्रकरणांत बुवाशाही कां नको, तिच्यामुळें कोणकोणते अनर्थ होतात याचें विवेचन करावयाचें आहे.

आजकालच्या जगांत सर्व शाहचा नष्ट करण्याचे उद्योग व यत्न चालू आहेत. याचें कारण हेंच कीं समाजांतील खालच्या थरांत अतिशय जागृति झालेली आहे. समाजांतील थोडीं माणसें सुबुद्ध, विचारी, सत्तावान् व इतर सर्व केवळ मेंढरें अशी स्थिति आज राहिलेली नाहीं. कां व कसें असें विचारण्याची प्रवृत्ति वाढत असल्यामुळें बादशाही, नोकरशाही, भिक्षुकशाही आणि नवरेशाहीसुद्धां नष्ट व्हावी असें हल्लीं वाटूं लागलें आहे.

वरील शाहयांप्रमाणेंच ब्रह्मज्ञानाच्या नांवावर जगणारी ही बुवाशाही आहे. या बुवाशाहीविध्वंसक संघाचे सभासदाच्या प्रवेशाचें पत्रक पुढील प्रमाणें आहे:—

सभासदाच्या प्रवेशपत्रकाचा नमुना

"आपल्या समाजांत बुवा व महाराज यांच्या नादीं लागणारे बुवाबाज स्त्री-पुरुष पुष्कळ आहेत. हे बुवाबाज लोकरच बुवाशाही उत्पन्न करतात. या बुवाशाहीमुळें मनुष्य प्रज्ञाहत होतो, आळशी बनतो व उद्योग न करितां बुवाच्या प्रसादानें सर्व प्राप्त व्हावें म्हणून बुवाच्या नादीं लागतो. आपल्या समाजाच्या व राष्ट्राच्या उत्कर्षास अडथळा उत्पन्न करणारी ही बुवाशाही आहे. ती पूर्ण नाहींशी व्हावा असें माझें मत असल्यामुळें या संघाचा मी सभासद होत आहें !"

संघाच्या वरील पत्रकांत बुवाशाहीचे अनर्थ अगदीं स्पष्ट आहेत. त्यांतील सर्वांत मोठा अनर्थ म्हणजे या बुवाशाहींतील मनुष्य आपल्या बुद्धीची हत्या करतो व प्रज्ञाहत बनतो हा होय ! मनुष्य व पशु यांत जर कोणतें अंतर असेल तर तें बुद्धीचेंच होय. आहार, निद्रा, भय, मैथुन हीं सर्वांस सारखींच आहेत. पशूपेक्षां मनुष्यामध्यें अधिक कांहीं असेल तर 'एको विवेको ह्यधिकोहि तेषाम्' एक विवेक म्हणजे बरें वाईट जाणण्याची शक्ति हाच काय तो विशेष आहे. बरें वाईट जाणण्याचें काम बुद्धीचें आहे. ही शक्ति जर मनुष्यानें घालविली तर तो पशूच होय !

जगांत सर्व गोष्टी बुद्धीनें चालल्या आहेत. जगांत जे बुद्धिमंतांमध्यें वरिष्ठ होऊन गेले त्यांनींच शोध लावले, शास्त्रें निर्माण केलीं, मानवी समाजांत सुधारणा केली, फार काय पण समाजाचें जीवन उच्चतर बनविलें. हें प्रत्यक्ष दिसत असतांना आपल्या समाजांतील माणसांनीं बुद्धि गहाण ठेवून वागणें यासारखें दुसरें हानिकारक काय आहे ?

आर्य चाणक्यानें मुद्राराक्षस नाटकामध्यें एका प्रसंगीं असें म्हटलें आहे कीं 'माझे आप्तेष्ट गेले, सगेसोयरे गेले, लोभाविष्ट होऊन आलेले लोक गेले, सैन्य गेलें, पैसा गेला तरी बेहेत्तर ! पण माझ्या बुद्धीनें मात्र मला दगा देऊं नये म्हणजे झालें.' तो म्हणतो.

एका केवलमेव साधनविधौ सेनाशतेभ्योधिका ।
नंदोन्मूलन-दृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मागान्मम ॥

एवढा बुद्धीचा महिमा आहे. या बुद्धि-महात्म्यालाच उद्देशून 'आधीं

वृद्धि जाते व मग भांडवल जातें' अशी म्हण पडलेली आहे. 'शीर सलामत तो पगडी पचास' या म्हणीचा अर्थहि एक मुख्य शीर सलामत राहिलें (म्हणजे बुद्धि सुरक्षित असली) कीं पाहिजे तें मिळतें असाच आहे.

कोणताहि मनुष्यसमाज अथवा राष्ट्र हें केवळ शरीरबलानें अर्थात् पाशवी शक्तीनें फार दिवस पारतंत्र्यांत राहूं शकत नाहीं. म्हणून जेतें लोक जिताची बुद्धि मारतात. शस्त्रानें वार केल्यास दुसरा मनुष्य बेहोष होऊन प्रतिकाराकरितां पुढें येतो, पण अन्नाचा मिंधा मनुष्य आश्रयदात्या-पुढें लवूनच असतो. हतबुद्ध झालेल्या माणसाची स्थिति याहीपेक्षां शोचनीय असते. म्हणूनच महाभारतांतील उद्योगपर्वामध्यें विदुराच्या तोंडी पुढील सुभाषित आहे.

शस्त्रैर्हतास्तु रिपवो न हता भवन्ति ।
प्रज्ञाहतास्तु नितरां सुहता भवन्ति ॥

इंग्रजी राज्यामुळें व शिक्षणामुळें आपल्या समाजांत प्रज्ञाहतपणा आला असें राजकीय पुढारी बोलतात व त्याचा विध्वंस करण्याचें काम त्यांनीं चालविलें आहेच. धर्म व समाज या क्षेत्रांतहि पुष्कळ बौद्धिक गुलामगिरी आहे. जें आहे तें उत्तम आहे, धार्मिक व सामाजिक बाबतींत कांहीं सुधारणा म्हणून करावयाला नको, तें सर्व ईश्वरी अवतारानें अगर विभूतीनें फार तर करावें, या कल्पनेमुळें हिंदु समाजांतील स्वतंत्र प्रज्ञेचा लोपच होत चाललेला आहे. मनुष्य प्राणी हा ईश्वराचा अंश आहे, तो नराचा नारायण होतो, मनुष्यानें आपल्या कर्तृत्वानें प्रज्ञा, पौरुष, पैसा व प्रजा हीं मिळवून समर्थ व्हावें असा सरळ मार्ग असतांना आपली बुद्धि न चालवितां पुष्कळ लोक वेड्यासारखे अवताराशिवाय जगांत कांहीं होत नाहीं असें म्हणतात आणि तप, त्याग, बुद्धि व कर्तृत्व यांच्या प्रभावा-मुळें जर कोणी पुढें आला तर त्याला अवतार कोटींत ढकलून लोक स्वस्थ बसतात! कोणाला तरी अवतार मानणें व त्याच्यावर भार घालून स्वस्थ बसणें अशी खोड हिंदु समाजाला लागली असल्यामुळें हे लोकच या बुवांच्या नादीं फार लागतात.

श्रीराम व श्रीकृष्ण हे ऐतिहासिक पुरुष असतांना तेहिं अवतार, वसिष्ठ, वाल्मिकी, व्यास, पाणिनी, हे बुद्धिमान ऋषि असतांना तेहि

अवतार; ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, मोरोपंत व तुळसीदास हे सत्पुरुष व कवी असतांना तेंहि अवतार; टिळक, गांधी हे पुढारीहि अवतार; अर्वाचीन कवी अवतार आणि मग कोंडिबा, धोंडिबा, नारायणबुवा व उपासनीबुवा हेहि सर्व अवतार मानून व ते सर्वसमर्थ आहेत असें कल्पून लोक त्यांच्या नादीं लागतात व स्वस्थ बसतात !

एकवार या बुवांना आपल्या नादीं लोक लागतात असें समजलें म्हणजे प्रथम ते बुवा या नादीं लागलेल्या लोकांची बुद्धि भ्रष्ट करतात. शहाणेसुरते असे समजले जाणारे लोकसुद्धां कोणी आर्त म्हणून, कोणी निपुत्रिक म्हणून, कोणी कशाकरितां तर कोणी कांहीं हेतूनें या बुवांचेकडे जातो. कांहीं दिवसांनीं त्याला असें वाटतें कीं " बस् एक गुरुकृपा झाली कीं मग कांहीं नको " व गुरुकृपेचा मार्ग म्हणजे तन, मन व धन हें गुरूला अर्पण करणें हा होय ! या बुवांची दृष्टि प्रथम बुद्धि हरण करून नंतर वित्त हरण करण्याकडे असल्यामुळें तेंहि स्वतंत्र प्रज्ञेचा व चिकित्सेचा उदय जितका न होईल तितका यत्न करतात. मनुष्य एकदां आपला उद्योग टाकून, कर्तव्य डावलून, राष्ट्र व समाज यांविषयीं उदासीन होऊन बुवा-भक्त बनला म्हणजे मग त्याची किती दुर्दशा होते हें सांगावयास नकोच.

परमेश्वर असें म्हणतो कीं मी भक्तांच्या बुद्धीचें सामर्थ्य वाढवितों व ती शाबूत ठेवतों,

' ददामि बुद्धियोगं तं '

म्हणजे त्यांना बुद्धियोग देतों, बुद्धि चालविण्याची शक्ति देतों. देव म्हणून ज्या कोणी शक्ति आहेत, त्या शक्ति सुद्धां आपल्या भक्ताचें रक्षण पशु-पालाप्रमाणें हातांत काठ्या घेऊन करीत नाहींत. तर ज्याचें रक्षण व्हावें असें या देवतांना वाटतें, त्या देवता आपल्या भक्ताच्या बुद्धीचेंच रक्षण करीत असतात, म्हणजे ती शाबूत ठेवितात !

यन्तु रक्षितुमिच्छंति बुद्ध्या संविभजन्ति तं । —महाभारत


पण या बुवांकडे पाहिलें तर हे आपल्या नादीं लागणाऱ्या लोकांची बुद्धि मात्र आधी भ्रष्ट करतात.

हे पारमार्थिक बुवा आपल्या धर्माचे मिशनरी असें मानल्यास ते काय अनर्थ करतात पाहा. ख्रिश्चन मिशनरी आपल्या देशांत येऊन

हाडार्चीं काडें करून आपल्या समाजांतील जो खालचा गाळ (अस्पृश्य वर्ग) त्यांतून हिरे व माणकें बाहेर काढीत आहेत. शिक्षण देऊन, स्वच्छता व सभ्यता शिकवून सुसंस्काराच्या वळावर हे लोक या कोळशांचीं माणकें बनवीत आहेत तर त्याच्या उलट हे आमचे बुवा आमच्या समाजांतील जे बुद्धिमंत चकाकणारे हिरे (वकील, बॅरिस्टर, डॉक्टर, पदवीधर वगैरे) यांचे **परमार्थाच्या मिषानें कोळसे बनवीत आहेत.** ही बुद्धिहत्या फार भयंकर आहे. चोराला शिक्षा होते, स्त्रीवर आक्रमण करणाऱ्याला दंडशासन होतें पण अशा या बुद्धिहत्या प्रत्यहीं करणाऱ्याला मात्र कांहीं होत नाहीं ही गोष्ट संतापजनकच होय! बुद्धिहत्या करणारा मनुष्य हा खुनी मनुष्यापेक्षां सहस्रपट गुन्हेगार समजला पाहिजे व त्याला समाजानेंच ताळ्यावर आणलें पाहिजे.

हिंदुस्थानांत हे बुवा व महाराज असंख्य असून त्यांचा हा बुद्धिहत्या करण्याचा कारखाना जोंवर चालूं आहे तोंवर हिंदुस्थानची उन्नति कशी होईल? महाराज महाराज, म्हणून लाळ घोटावी, त्यांचा तोंडपुजेपणा करावा, त्यांनीं केलेले अनाचार सहन करावेत हें लाजिरवाणें नाहीं काय? केवळ सत्त्व पाहण्याकरितां महाराज अमुक अनाचार करतात, त्यांच्या ठिकाणीं अद्भुत सामर्थ्य आहे असें लोकांना सांगणें म्हणजे बुद्धिहत्येचा कळस होय!

आतां बुवाशाहीच्या दुसऱ्या अनर्थाकडे वळूं. वास्तविक मनुष्य एकदां प्रज्ञाहत झाला कीं सर्व अनर्थ ओढवले म्हणून समजावेंच. अशा हतप्रज्ञांना हे बुवा व महाराज जगत् हें क्षणभंगुर आहे, हें मिथ्या आहे, हें जें सर्व दृश्य जगत् ती माया आहे असें सांगत सुटतात. त्यामुळें हे बुवाभक्त आळशी, अतएव प्रपंच, समाज आणि राष्ट्र यांविषयीं उदासीन होतात. बुवांच्या या शिकवणीमुळें समाजाची जिज्ञासा मरते निवृत्ति वाढते व पुरुषार्थाचा जोम उरत नाहीं. दैववाद, देववाद, अंध विश्वास, हीं बोकाळतात आणि 'स्वस्थ बसावें। हरि ठेविल तैसें राहावें' अशी वृत्ति उत्पन्न होते. अन्यायाची चीड, प्रतिकाराविषयीं तळमळ आणि समाजाच्या जीवनाला आवश्यक अशा द्वेष व संताप या वृत्ति निर्बीज करण्याचा यत्न हे बुवा करितात! जग अनादि असतांना तें म्हणे मिथ्या, पैसा हा पुरुषार्थ असतांना तोहि म्हणे अनर्थ, असें सांगून दुसऱ्याची स्त्री व वित्त लुबाडण्याचा धंदा हे बुवा करितात!!



प्रज्ञावंत हिऱ्यांचे कोळसे करण्याचा कारखाना (पृ. १२७)

गेल्या दोन तीन हजार वर्षांत निवृत्तिपर तत्त्वज्ञानाचे अनेक पंथ, अनेक आचार व अनेक संप्रदाय राष्ट्रांत निर्माण झाल्यामुळें या निवृत्तिपर वेदांताचा संस्कार आपल्या समाजावर इतका झाला आहे कीं प्रपंच करणारा, प्रज्ञावान्, पौरुषवान् व पैसावान् मनुष्य मूर्ख व बायको सोडून, मिळकतीचा त्याग करून, गुहेंत वसणारा हाच काय तो शहाणा; अशी समजूत झाली आहे, जग हें दुःखमय आहे, क्षणभंगुर आहे, आपण जन्माला आलों, ही पहिली चूक केली व बायको करून घेतली ही दुसरी चूक केली. आतां या चुका निस्तरण्याकरितां प्रपंच सोडून 'हरि हरि' म्हणत बसलें पाहिजे, अशी जी एक निवृत्तिवाद्यांची विचारसरणी आहे, तीमुळें ज्ञानी हा सदा आत्मानंदांत डुलत असतो, तो कोणतेंही कर्म करीत नाहीं व कर्म करणें ही फार कमी प्रतीची गोष्ट आहे, असें हे सांप्रदायी मानतात. लेखक या तत्त्वज्ञानाला मुमूर्षु तत्त्वज्ञान असें समजतो. आणि गीता, उपनिषदें आणि वैदिक संहिता यांतील तत्त्वज्ञानाला विजिगीषु तत्त्वज्ञान असें नांव देतो.

गेल्या तीन हजार वर्षांत या मुमूर्षु तत्त्वज्ञानाचे प्रवाहच जोरानें वाहात आहेत. कोणत्या वृत्तीनें मरावें, अखेर कशी साधावी, मरतांना कसें समाधानानें मरावें, असा विचारच प्रामुख्यानें या संप्रदायांत केला आहे. उदाहरणार्थ, भागवताचा उपक्रमच पहा. भागवत ग्रंथ हा भक्तिप्रधान आहे व त्यांत ईश्वराची नवविधा भक्ति सांगितली आहे, हें सर्वश्रुत आहे. या मुमूर्षु तत्त्वज्ञानाचा उपक्रम पुढीलप्रमाणें आहे.

उपक्रम

अतः पृच्छामि संसिद्धिं योगिनां परमं गुरुम् ॥
पुरुषस्येह यत्कार्यं म्रियमाणस्य सर्वथा ॥३८॥
यच्छ्रोतव्यमथो जाप्यं यत्कर्तव्यं नृभिः प्रभो ॥
स्मर्तव्यं भजनीयं वा ब्रूहि यद्वा विपर्ययम् ॥३९॥ स्कं. १ अ. १९

उपसंहार

अनुजानीहि मां ब्रह्मन्वाचं यच्छाम्यधोक्षजे ॥
मुक्तकामाशयं चेतः प्रवेश्य विसृजाम्यसून् ॥६॥
अज्ञानं च निरस्तं मे ज्ञानविज्ञाननिष्ठया ।
भवता दर्शितं क्षेमं परं भगवतः पदम् ॥७॥ स्कं. १२ अ. ६ ब्र. ९

परीक्षितीनें शुकाचार्यांना प्रश्नच असा केला आहे कीं, सर्वथा मरावयास टेकलेल्या माणसानें काय ऐकावें, काय जपावें, काय स्मरावें कशाचें भजन करावें ? अर्थात् या प्रश्नाला 'ममूर्षु माणसानें देवाचें नांव घेत सुखानें मरावें' असेंच उत्तर शुकाचार्यांनीं दिलें व त्याप्रमाणेंच परीक्षितीनें केलें !

आमच्या समाजामध्यें हें मुमूर्षु तत्त्वज्ञान प्रसार पावलेलें आहे. परीक्षितीला मरावयाचेंच होतें म्हणून 'आतां मी काय करूं ?' असें त्यानें विचारलें. पण समाजाला आणि राष्ट्राला जगावयाचें असल्यामुळें हें निवृत्तीचें तत्त्वज्ञान कसें उपयोगी पडेल ?

उपनिषत्कालापासून तत्त्वज्ञानाच्या वाढीस जोरानें सुरुवात झाली, पुढें बुद्धोत्तर कालांत विविध आचार्यांनीं या निवृत्तिपर तत्त्वज्ञानवृक्षालाच जलसिंचनानें विपुल फुलें व फळें आणलीं; मनोवृत्तीमध्यें निवृत्तीचेच संस्कार वाढले व ज्ञानी म्हणजे कांहीं न करणारा, स्वस्थ बसणारा, ध्यानस्थ असणारा असे विचार पुढें आले !

पण हे मुमूर्षुविचार विजिगीषु समाजाला उपयोगी नाहींत. आजच्या आपल्या समाजाला गीतेंत सांगितल्याप्रमाणें जनकासारखे व श्रीकृष्णासारखे कर्मयोगी ज्ञानीच पाहिजेत, अर्थात् हे ज्ञानी जग दुःखमय आहे, तें असार आहे असें न सांगतां, जगत् हें आनंदमय असून तें चिरकाल टिकणारें आहे असें सांगून जगावें कसें हे शिकवितात. मरावें कसें हें सांगावयास नको, तर कंणत्या वृत्तीनें जगावें, जीवनकलहांत कसें विजयी व्हावें, हेंच हे ज्ञानी समाजाला शिकवितात. गीतेंत भगवंतांनीं अर्जुनाला हेंच सांगितलें आहे.

तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध्य च । गी. अ. ८

या जीवनयात्रेंत सदैव झगडत राहा व तें करतांना माझें स्मरण ठेव. सारखें युद्ध कर, म्हणजे सारखी धडपड कर असें ज्ञान्यांनीं नुसतें न सांगतां स्वतःच्या वर्तनानें तें दाखविलें पाहिजे.

आजच्या कालांत जो खरोखर सत्पुरुष असेल तो आपला उद्योग सभ्यपणें व प्रामाणिकपणें करून लोकांचें अज्ञान घालवील, आळस नष्ट करील, त्यांची माणुसकी वाढवील, निरक्षरांना साक्षर व साक्षरांना सुबुद्ध करील,

अस्पृश्यांना स्पृश्य करील व हें सर्व त्याग, निष्ठा, अनहंकार, जाणीव व आत्मसंतोष या गुणांनीं युक्त होऊन करील !

बुवाशाहीपासून होणारा तिसरा अनर्थ म्हणजे आळस, अनाचार, दौर्बल्य इ. खुळचट प्रकार हा होय ! सर्व कांहीं बुवाच्या प्रसादानें मिळतें ही अत्यंत चुकीची समजूत होय. वास्तविक कर्मानेंच सर्व कांहीं मिळतें. पण पुत्रप्राप्ति, अर्थप्राप्ति व इतर सर्व सुखें हीं केवळ महाराजांच्या कृपेनें होतात असें समजून हे बुवाभक्त खुळचटासारखें काय पाहिजे तें करूं लागतात. मुलें होण्याकरितां शौचकूपाला प्रदक्षिणा घालणें, निवडुंगाभोंवतीं फिरणें, गटार-गंगेंत स्नान करणें इत्यादि किळसवाणे प्रकार गुरुआज्ञेमुळें करितात ! कांहीं बुवाभक्त तर अट्टल दुर्व्यसनी आणि क्षुद्र वृत्तीचे बनून सर्व ब्रह्म आहे, असें नुसतें बडबडून वाटेल तो अनाचार व अत्याचारहि करतात ! त्याचें वर्णन विशेष न करणें बरें ! कांहीं लोकांनीं प्रस्तुत लेखकास 'तुम्ही बुवा कां झालां नाहीं' असें विचारलें. त्या प्रश्नाचें जें उत्तर लेखकानें किर्लोस्कर मासिकांतून दिलें तेंच येथें अतिसंक्षेपानें देतों.

बुवागिरींत जी लफंगेगिरी, जो निर्लज्जपणा व जो अनाचार असतो तो मला पसंत नाहीं, आणि असल्या माणुसकीच्या ऱ्हासाच्या संप्रदायांत न राहतां, आपली बुद्धि चालवून, समाजाची योग्य ती सेवा करीत राहावें व ती करीत असतांना मिळेल त्यावर जगावें, हेंच मला प्रशस्त वाटतें.

स्त्री, पैसा व मान यांचा धर्मशास्त्रदृष्ट्या यथायोग्य उपभोग घेण्या-करितां गृहस्थाश्रम ही संस्था आहे. त्या पद्धतीनें विवाह करून संतति निर्माण करावी, पैसा मिळवून त्याचा उपभोग घ्यावा, हें सर्व सरळ शक्य असतां परमार्थांत शिरून, वाममार्गानें या सर्वांचा उपभोग घ्यावयाचा, हें शास्त्र-दृष्ट्या व युक्तिदृष्ट्या अयोग्य होय. सर्व बुवा हेंच करितात म्हणून मला बुवा व्हावेंसें वाटलें नाहीं.

माजी समर्थ विद्यालय बुडाल्यानंतर मी अज्ञातवासांत ज्या घरीं होतों तेथेंच कै. कृष्णाबुवा गारुडेकर यांचें प्रस्थ फार होतें. त्या घरांतील तरुण मंडळी या बुवाविषयीं कांहीं निराळें सांगत ! या बुवांनीं मला दीक्षा घेण्या-बद्दल अगदीं गळ घातली. कारण त्यांनीं माझीं कांहीं भाषणें ऐकिलीं होतीं. व अविवाहित, गोरागोमटा, सुसंस्कृत तरुण, असा शिष्य करून घेण्याचा

त्यांना मोह झालेला होता. त्यांनीं मला असें सांगितलें कीं, " तुम्ही निरूपण करा, ज्ञानेश्वरी वाचा, त्यांत मी कांहीं तुम्हांला सांगूं शकत नाहीं. पण-शिष्यपरंपरा वाढवितांना तुम्ही अविवाहित असल्यामुळें जर कांहीं वेडें-वांकडें झालें तर मी तुम्हाला सांवरून घ्यावयाला तयार आहें; कारण मी त्यांतलाच आहें. पैसेहि रगड मिळतील, मानहि मिळेल आणि सर्व कांहीं मिळेल. अहो, हे श्रीमंत लोक बैलोबा असतात; माझे अमुक अमुक श्रीमंत शिष्य आहेत. " इत्यादि.

उपरोक्त कृष्णाबुवा गारुडेकर हे म्हणे भजन करूं लागले कीं, त्यांच्या अंगांत बाळकृष्णाचा संचार होई ! आणि मग हा वीस पंचवीस पेक्षांहि अधिक वयाचा तरुण बाळकृष्ण नेमक्या गोऱ्यागोमट्या आणि पुष्टावयवी अशा स्त्रियांचें अर्थात् गोपींचें स्तनपान करण्यास भर निरूपणामध्यें प्रवृत्त होई व श्रोतृवर्गांतील स्त्रिया त्या कृष्णाला त्या वेळीं स्तनपान करूं देत !! तसेंच हे बुवा म्हणे परस्त्रीला मांडीवर घेऊन इंद्रियजयाचा अभ्यास करीत असत व त्यांना त्याहि अभ्यासास साधनें मिळत ! हें मला सर्वस्वी नापसंत म्हणून मी बुवा झालों नाहीं.

जग हें ' मिथ्या व माया ' आहे अशी सारखी बडबड करणारे कांहीं बुवा हे उलट्या काळजानें प्रसंगीं खुनी, दरवडेखोर, मांग यांच्यापेक्षांहि फार वाईट कृत्यें करीत असतात, अशा बुवांना कधींहि अनुताप होतच नाहीं. हें ऐकूनच मी बुवा झालों नाहीं.

एवंगुणविशिष्ट अशी ही बुवाशाही असल्यामुळें बुद्धिमान्, कर्तृत्ववान्, महत्त्वाकांक्षी असा मनुष्य यांत शिरत नाहीं; आणि म्हणूनच वाचकहो, मी बुवा झालों नाहीं. अनधिकाऱ्यानें साधु म्हणून मिरवण्यांत शीलभ्रष्टता आहे, माणुसकीचा ऱ्हास आहे आणि परलोकदृष्ट्या नरक आहे.

बुवाशाहीच्या राजवटींत जाण्यानें जेवढें समाजाचें कल्याण होत असेल त्यापेक्षां तिकडे न जाण्यानेंच अधिक कल्याण होणार आहे असें मला वाटतें. विशेषतः समाजांत जें मनोदौर्बल्य आहे तें नष्ट करावयाचें असल्यास या मानसिक गुलामगिरीच्या जेवढ्या म्हणून संस्था असतील त्या नष्ट झाल्यास राष्ट्राचें अधिक कल्याण आहे.

एकाद्याला त्याच्या द्रव्यापासून, स्त्रीपासून, वैभवापासून भ्रष्ट करणें हीं

पातकें अाहेतच; परंतु सर्वांत मोठें पाप म्हणजे एखाद्याची बुद्धि भ्रष्ट करून त्याला हतप्रज्ञ करणें हें होय. शिष्यांना हतप्रज्ञ केल्याशिवाय बुवांचें चालत नाहीं व त्या पापाचा मला शिसारी म्हणूनच "मी बुवा झालों नाहीं."

बुवाशाहीमुळें बुद्धिहत्या होते, निवृत्तिपरता येते व अनाचार माजतो हें येथवर सांगितलें. आतां या बुवाबाजीचा म्हणजे बुवांच्या नादीं लागण्याचा जो प्रकार आढळतो त्याचा उगम कशांत आहे हें सांगून हें प्रकरण आटोपतों.

बुवाबाजीचा उगम बौद्धिक गुलामगिरींत आहे

बुवाबाजीचा उगम कशांत आहे हा प्रश्न शोधपूर्वक सोडविण्याजोगा आहे. शिकलींसवरलेलीं, चिकित्सक, विचारी, बॅरिस्टर, डॉक्टर, पंडित व शास्त्री अशीं माणसेंसुद्धां बुवांच्या तडाख्यांत कशीं सांपडतात आणि स्वत्व सोडून गुरुमाउलीच्या चरणीं भ्रमरवत् मिलिंदायमान कशीं होतात हा खरोखरीच चिंत्य प्रश्न आहे. एखाद्याच्या नादीं जे हजारों लोक लागतात ते उगाच काय? केवळ लुच्चेगिरीनेंच एखादा मनुष्य अखंड दुनिया झुकवं शकतो काय? कांहीं तरी अद्भुत असल्याशिवाय असें होणें शक्य आहे काय? इत्यादि प्रश्नहि विचारांत घेण्याजोगे आहेत.

हिंदुस्थान देशांत एकंदरींत धर्माचें पीक मोठें येतें. अनेक धर्मपंथ या ठिकाणीं उत्पन्न झालेले आहेत. त्या परंपरेमुळें धर्माच्या बाबतींत हिंदुस्थानांत भोळेपणा अतिशय आहे. देव व धर्म या विषयांत स्वतंत्र विचार करण्याची संवय फारच थोडी आहे; किंवहुना ती नाहीं म्हटलें तरी चालेल. त्यामुळें देव व धर्म या विषयांत जो कोणी बोलेल, प्रवचन करील तो श्रेष्ठ आहे असें समजण्याचा प्रघात आहे. "मला ईश्वरी प्रेरणा होते" 'मला ईश्वर सांगतो' अशी भाषा कोणी बोलूं लागला कीं त्या व्यक्तीवद्दल एक विलक्षण भावना उत्पन्न होते. हल्लीं सुद्धां पुष्कळांच्या अंगांत केव्हां मारुती तर केव्हां महालक्ष्मी तर केव्हां दत्तात्रय येत असतो. त्या वेळीं पुष्कळांना तें सर्व खरेंच वाटतें. शिकलेसवरलेले लोक जरी असले तथापि पूर्वपरंपरा भोळीभाबडी असल्यामुळें व मागील आनु-

वंशिक संस्कार एका पिढींत जाणें शक्य नसल्यामुळें भोळेपणा व बौद्धिक दौर्बल्य यांमुळेंच ही बुवाबाजी वाढते असें म्हणावें लागतें.

महात्मा गांधी हे 'मला ईश्वरी प्रेरणा होते' असें गेलीं बारा चौदा वर्षें म्हणत आहेत. ही जी ईश्वरी प्रेरणा होते, ती जर खरोखरीच ईश्वरी असेल तर ती सत्य ठरली पाहिजे व जर सत्य न ठरेल तर ईश्वरी प्रेरणा होते असें म्हणणें हाहि एक बुवाशाहींतील सुधारलेला प्रकार आहे. अत्यंत शुद्ध, पवित्र, उदात्त व वैराग्यसंपन्न मनुष्याचें अंतःकरण अत्यंत शुद्ध असतें. त्या ठिकाणीं जी आत्मप्रेरणा होते ती सामान्य माणसाच्या प्रेरणेपेक्षां पुष्कळच मोठ्या योग्यतेची प्रेरणा असते यांत शंका नाहीं; पण ही प्रेरणा अतिमानुष असते किंवा ईश्वरी असते असें जर कोणी म्हणेल तर आक्षेपास खास जागा आहे.

ईश्वरी प्रेरणेच्या आख्यायिका या अनादि आहेत; त्या कांहीं आजकालच्या नाहींत. वैदिक ऋषींना ईश्वरी प्रेरणा होऊन वेद स्फुरले. महंमद पैगंबरालाहि कुराणशरीफ ईश्वरी प्रेरणेनेंच स्फुरलें. येशु ख्रिस्ताचें बायबलहि ईश्वरी साक्षात्कारामुळेंच स्फुरलेलें आहे. तात्पर्य, हीच परंपरा जितकी लांबवितां येईल तितकी लांबविली म्हणजे ईश्वरी प्रेरणेचा तुटवडा कोठेंच पडत नाहीं.

बायबल, चर्च व पोप इत्यादि सर्व पूर्वीं ईश्वराधिष्ठितच होतीं. परंतु ग्रीक तत्त्ववेत्त्यांनीं त्यांना धक्का दिला. कोपरनिकस, ब्रूनो इत्यादिकांनीं बायबल हें जगावद्दल व मनुष्यावद्दल सत्य ज्ञान देणारें एकच एक पुस्तक आहे असा जो भ्रम होता तो घालवून लोकांना सृष्टीचें पुस्तक वाचावयास शिकविलें. पृथ्वी चौकोनी नसून ती वाटोळी आहे व तिचा जन्म होऊन कोट्यवधि वर्षें झालीं, इत्यादि तत्त्वें पुढें मांडल्यावर ईश्वरी प्रेरणामूलक बायबलच्या भ्रमाचा भोपळा फुटला. कुराणाचीसुद्धां तीच स्थिति आहे. तात्पर्य, शोध, शास्त्र व तर्क हीं तीक्ष्ण हत्यारें वापरूं लागल्यावर भ्रममूलक ज्या ईश्वरी प्रेरणा असतात, त्यांचा बोजवारा उडतो. याच पद्धतीनें बुवाशाहींतील प्रेरणा व चमत्कार यांचीहि वासलात लागते.

काय हो! अमके अमके बॅरिस्टर म्हणे उपासनी महाराजांच्यापुढें लोटांगणें घालतात, दुसरे एक मुंबईचे बॅरिस्टर म्हणे सातारच्या नापित

घोंडीबुवापुढें गडबडा लोळतात, तेव्हां हें कसें होतें ? असे प्रश्न आम्हाला कांहीं विचारतात. त्याचें खरें उत्तर हेंच कीं, बॅरिस्टर, डॉक्टर व इतर श्रीमंत लोक यांच्याहि बुद्धीचा एखादा पेंच ढिला असतो किंवा कधीं कधीं तो ढिला होतो म्हणूनच हे लोक बुवांच्यापुढें गडबडा लोळतात. अशा लोकांना देव, धर्म, शास्त्र व वेदांत यांतील तत्त्व कांहीं माहित्त नसतें; व केव्हां तरी वक्तृत्वपूर्ण भाषेंत यासंबंधींचें विवेचन ऐकलें म्हणजे या लोकांची त्यावर लगेच श्रद्धा वसते. मध्यम स्थितींतील समाजाला ज्या द्वारानें देव, धर्म व वेदांत यांचा परिचय होत असतो, तिकडे हे लोक कधीं जात नाहींत; त्यामुळें हे कोरे करकरीत असतात. मग केव्हां तरी भयंकर आपत्ति, कष्ट-साध्य रोग अगर असाच आणिबाणीचा प्रसंग आला कीं त्या वेळीं अशा लोकांची चिकित्साबुद्धि डळमळते व भोळेपणा एकदम उद्भूत होतो.

अध्यात्मशास्त्रांत व मानसशास्त्रांत संस्कारांचें प्राबल्य फार आहे. संस्कार दोन तऱ्हेचे असतात. कांहीं स्पष्ट असतात व कांहीं अस्पष्ट असतात. कोणत्याही व्यक्तींतील सर्व संस्कार प्रगट होत नसून प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं उद्भव न पावलेले असे सुप्त व गुप्त संस्कार असतात. नास्तिक, चिकित्सक, सुधारक अशा तऱ्हेचा मनुष्य जेव्हां बुवाबाज बनतो; तेव्हां असें खास समजावें कीं, याचा श्रद्धेचा जो संस्कार आजवर उद्भवला नव्हता तो आतां उद्भवला आहे. धारवाडकडील एक मोठे शास्त्री गुरूचें उच्छिष्ट-प्रसादग्रहण हा एक विधि आहे असें सांगतात. अशा ठिकाणीं खास समजावें कीं, शास्त्रीबुवांच्या बुद्धीचा एक पेंच थोडा ढिला होऊं लागला आहे! एक मोठे सरदार म्हणे एकदां सरदारगृहामध्यें आले व भागवताचा उपसंहार लिहिणाऱ्या ग्रंथ-काराच्या साष्टांग पाया पडले. हे ग्रंथकार जात्या बुवाबाजीच्या ढंगांतले नसल्यामुळें त्यांनीं त्या सरदारांना 'आपण असें करूं नये, व्यासंग ठेवला म्हणजे कुणालाही लिहितां येतें व बोलतां येतें, त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें व साष्टांग नमस्कार घालण्याजोगें कांहीं नाहीं' असें म्हणून सरदारांची समजूत घातली! पण एखादा सरदार अगर श्रीमंत गृहस्थ जर एखाद्या ग्रं कारास त्यानें जें जें लिहिलें आहे, तें अगदीं अंगीं बाणवून लिहिलें आहे अर्थात् तो मोठा आहे असें समजेल तर समजावें कीं, हे गृहस्थ या बाबतींत

वेडे आहेत; आणि खरोखरीच, देव, धर्म, गुरु व वेदांत या बाबतींत पुष्कळ चांगलीं माणसें अगदीं वेड्यासारखींच वागतात!

मनुष्य बुद्धिमान् आणि चिकित्सक असला तरी तो सर्व बाबतींत तसा असतो, असें नाहीं. कुठें तरी त्याचें एखादें मर्म असें असतें कीं, तेथें तो वेडा होतो! ब्राह्मण या नात्यानें संध्या, ब्रह्मयज्ञ हीं न करतां अगर स्वाध्याय न म्हणतां केवळ गुरुचरित्राच्या दहापांच ओव्या वाचून अगर हरिपाठांतील चारदोन अभंग म्हणून ब्रह्मकर्म संपविणारे चांगले ब्राह्मण आढळतात!! अशा लोकांना कोणी तरी व कांहीं तरी सांगावयास पाहिजे असतें व त्यानीं एकदां तें पत्करलें म्हणजे हे लोक भोळेपणानें त्या आचाराच्या समर्थनार्थ फलश्रुत्याहि सांगतात. गुरुचरित्रांत बुद्धीला समाधान देण्याजोगें असें काय आहे? त्यांत केवळ सकाम गुरुभक्ति आहे. व्यंकटेश स्तोत्र, शनिमहात्म्य, शिवलीलामृत हे ग्रंथ अगदीं भक्तीनें अनुक्रमें शनिवारीं व सोमवारीं न चुकतां वाचणारे किती तरी लोक आहेत! या ग्रंथांच्या शेवटीं अर्थवादात्मक फलश्रुत्या आहेत, त्या खऱ्या मानूनच हे भोळे लोक भ्रमानें या ग्रंथांचीं पारायणें करतात. व्यंकटेश-स्तोत्राच्या हजार आवृत्त्या झाल्या व शनिमहात्म्याचीं अष्टोदशें पारायणें झालीं म्हणजे इष्ट कामना सिद्ध होतात आणि सर्व अरिष्टें टळतात अशी या बिचाऱ्यांची समजूत असते! चिकित्सक लोकांचा सुद्धां या गोष्टीवर विश्वास बसतो, याचें कारण बुद्धिदौर्बल्य हेंच होय! योग्य वेळीं योग्य यत्न न करतां झालेल्या चुका, ग्रंथांचीं पारायणें व सूक्तांचीं आवर्तनें करून निस्तरण्याचा यत्न करणें म्हणजे बौद्धिक दौर्बल्यच होय! ही बौद्धिक गुलामगिरीची वृत्ति समाजांत जोंवर आहे तोंवर बुवाबाजी चालणार व तिचे दुष्परिणाम समाजाला भोंवणार!

बुवांच्या नादीं लागणें व त्यांचा अनुग्रह घेणें ही एक आजच्या कालांतील रूढि होऊं लागलेली आहे. मनुष्याला व्यावहारिक व राजकीय मोठेपणा जसा पाहिजे तसा धार्मिक मोठेपणाही पाहिजे असतो. प्रातःस्नान, नमस्कार इत्यादि आचार हे सुशिक्षित व मोठ्या अशा लोकांना अवघड वाटतात; मग सर्वांत सोपा व धार्मिक म्हणवून घेण्याचा राजमार्ग म्हणजे एखाद्या महाराजांचा अनुग्रह घेणें व वरचेवर त्यांच्या सहवासाचा लाभ घेणें हा होय! हें अनुग्रहाचें कार्य तरी मोठें विचारपूर्वक होतें असेंही

नाहीं. कोणी मनुष्य आपल्या मित्राच्या भिडेमुळें अनुग्रह घेतो, तर कांहीं गृहस्थ आपल्या आईच्या किंवा बहिणीच्या सांगण्यावरूनच अनुग्रह घेतात! कांहीं जामात आपल्या सासऱ्यांना बरें वाटावें व आपणावरील धर्मभ्रष्टतेचा आरोप जावा म्हणून अनुग्रह घेतात तर कांहीं सासरेही आपल्या वडच्या जामाताला खूष करण्याकरितां अनुग्रह घेतात !

एखाद्या संस्थेचा अध्यक्ष अगर प्रमुख मनुष्य बुवांचा अनुग्रहित असला कीं त्याच्या भिडेमुळें संस्थेंतील माणसें हळुहळू तसेंच करतात. वरिष्ठ अधिकाऱ्याला काय आवडतें हें नेहमीं कनिष्ठ अधिकारी पाहात असतात. जे उमेदवार नोकऱ्यांकरितां हिंडत असतात त्यांना वरिष्ठांच्या या आवडीनिवडी चांगल्या अवगत असल्या तर त्यांचें काम सहज होऊन जातें ! कित्येक मोठ्या साहेबांच्या कचेरींतील शिरस्तेदार हे बुवांचे अनुग्रहित असल्यामुळें तेथील सर्व लोकांना महाराजांचा अनुग्रह घेण्याची बुद्धि होते. सारांश, अनुग्रह घेणें ही आजच्या कालांतील एक रूढि होत आहे ! दाढी करणें, टोपी वापरणें अगर बोडकें असणें, मनगटांत घड्याळ बांधणें या जशा आजच्या रूढी आहेत, तशीच अनुग्रह घेणें हीहि एक रूढि आहे. कोणी संस्थानिक मळणगांवकर महाराजांपुढें शीर नमवितात तर दुसरे कळणगांवकरांचें प्रस्थ माजवितात, कोणी साताऱ्याच्या घोंडीबुवांच्या मागें लागतात तर कोणी नारायणबुवांचेंच स्तुतिस्तोत्र गातात ! यांत कांहीं अज्ञानाचा अंश आहे, कांहीं बुद्धिदौर्बल्य आहे, कांहीं अनुकरण आहे व थोडी धार्मिक म्हणवून घेण्याची इच्छाही आहे, यांत शंका नाहीं.

अनुग्रह ही एक प्रतिष्ठित जाहिरातहि आहे हल्लीं सर्व जग धंदेवाईक बनलें आहे. तसाच धर्म हा सुद्धां धंदा झाला आहे. निदान धंद्याला साहय व्हावें म्हणून कांहीं लोक धर्माचा पसारा करीत असतात. मोठी थोरली, लांबलचक देवपूजा पुष्कळ देव मांडून सावकार करतो तेव्हां कुळांना वाटतें कीं, सावकार मोठा देवमनुष्य आहे. व्यापारीहि गिऱ्हाइकापुढें आपल्या धर्मनिष्ठेचें प्रदर्शन करतो व त्यामुळें गिऱ्हाइकाला हा व्यापारी अगदीं खरा आहे असा भास होतो. घरांतील कर्ता पुरुष, संस्थानांतील संस्थानिक, प्रत्येक पक्षाचा पुढारी हे सर्व जरूरीप्रमाणें इतरांवर छाप पडावी म्हणून धर्माचा उपयोग करतात !

कारण यांत प्रतिष्ठित जाहिरात असते. श्राद्धपक्ष करून वरीच दक्षणा दिली, पूजेला ब्राह्मण असला, बाईसाहेबांना पुराण सांगण्याला शास्त्री असला कीं मग अशा गृहस्थांना अधार्मिक किंवा नास्तिक म्हणण्याची काय बिशाद आहे ! कारण हे सगळे भटजी, शास्त्री, पुरोहित वगैरे त्या गृहस्थांच्या जिवंत जाहिराती असतात ! या सर्वापेक्षां मोठी जाहिरात म्हणजे बुवांचा अनुग्रह घेणें ही होय. विशेषतः बुवा विद्वान् व वक्ता असला व त्यांनीं भर निरूपणांत रावसाहेबांची स्तुति केली किंवा यथार्थ गुणवर्णन केलें कीं सर्वांग कसें आनंदानें पुलकित होतें ! धंदेवाईक महाराज येवढ्या व्यवहारांत फारच तरबेज असतात. प्रवचनोत्तर राव-साहेबांनीं महाराजांची स्तुति करावी व महाराजांनीं रावसाहेबांची स्तुति भर प्रवचनांत करावी असा हा एक प्रतिष्ठित, जिवंत व परस्परसहकारी जाहिरातीचा मार्ग आहे !

आमच्या यत्नानें निष्ठावंत शिष्यांच्या अंतःकरणांत कांहीं फरक होणार नाहीं हें अगदीं खरें आहे ! जे एकदां प्रज्ञाहत झाले व ज्यांनीं आपली बुद्धि गहाण टाकली, त्यांच्याकरितां हा यत्न नाहींच ! हा यत्न भविष्य-कालीन तरुण पिढीकरतां आहे. भावी राष्ट्र हें तरुणांचें आहे, तें जीर्णांचें नाहीं. स्वदेशी उद्योगधंदे वाढवून परदेशीं गेलेली संपत्ति परत आणितां न आली तथापि अधिक जाणाऱ्या संपत्तीच्या प्रवाहाला मात्र प्रतिबंध करतां यतो ! स्वदेशीचें महत्त्व राष्ट्र या दृष्टीनें जसें पुढील पिढीकरितां आहे, तसेंच या यत्नाचें महत्त्व पुढील पिढीकरितांच आहे. म्हणून भवभूतीनें म्हटल्या-प्रमाणें 'तान्प्रति नैष यत्नः' त्यांच्याकरितां हा यत्न नाहीं हें उघड आहे. सांथीच्या रोगानें, प्लेगानें व महामारीनें पुष्कळ लोक मरतात ! ते मेलेले लोक पुन्हां जिवंत होत नाहींत. तथापि जिवंत राहणाऱ्यांकरितां जसें प्रतिबंधक उपाय करणें प्राप्त असतें तसाच हाही विषय आहे. बुवांचीं संस्थानें, त्यांचे ऐषआराम, त्यांचे भक्तगण यांत आज एकदम फरक दिसणार नाहीं; क्वचित् क्रियेला प्रतिक्रिया होईल परंतु असें असणें हें बरें का वाईट 'याची चर्चा व चिकित्सा होऊं लागली म्हणजे जें इष्ट तें आपोआप घडतें.

पाश्चात्य राष्ट्रांत सुद्धां हें बुवाशाहीचें खूळ आहे व ते लोकही चमत्कार, हस्तसामुद्रिक अशा नादांत असतात असें म्हणतात. शकुन,

चमत्कार, चेटुक, हस्तसामुद्रिक, मंत्रतंत्र, जादू, गंडे, दोरे इत्यादि कल्पनांवर उभारलेला धर्म हा मिथ्या धर्मच होय ! हा मिथ्याचार जगांत कोठेंही असला तथापि तो समर्थनीय नाहीं. पाश्चात्य देशांतील लोक बुवाबाज होऊं लागले आहेत; आणि आपल्याकडील कांहीं बुवा परदेशांत जाऊन प्रस्थ माजवूं लागले आहेत हें दिसतच आहे. कदाचित् कांहीं दिवसांनीं परदेशागत डॉक्टर, इंजिनीअर, प्रोफेसर यांप्रमाणें **परदेशांतून आलेल्या बुवांची बाजारांत किंमतही जास्त वाढेल** ! पण असें झालें तरी तें अयोग्यच समजलें पाहिजे. युरोपियन व अमेरिकन लोक हे आधिभौतिक शास्त्रापलीकडे कांहीं अध्यात्म आहे कीं काय व तें असल्यास त्याचा मार्ग हिंदुस्थानांतून कांहीं कळेल कीं काय, अशा शोधांत कदाचित् असतील; जिज्ञासेच्या दृष्टीनें हें योग्यहि आहे; पण कांहींची जिज्ञासा, कांहींचा भोळेपणा, कांहींचा धूर्तपणा यामुळें जर तिकडे बुवाशाही माजत असेल तर त्यांचेंही अधःपतन होऊं लागलें आहे असें खास समजावें.

बुवाचें खरें बळ बोवाभोंवतालच्या लोकांना माहित असतें. कारण भोंवतालचे लोक ' बुवा निर्मिते' असतात आणि त्या लोकांत जाऊन राहिलें म्हणजे बुवाचें सर्व 'इंगित' कळतें. बुवा व महाराज हे प्रस्थापित व्हावे म्हणून व लोकांत चांगली प्रतिष्ठा राहावी म्हणून अनेक कल्प्त्या काढतात. महाराजांचे तीन त्रिकाळचे फोटो काढून महाराज प्रत्येक वेळीं कसे विलक्षण दिसतात असें सांगणारे फिरते दलाल असतात; तर कांहींना स्वतःचे चमत्कार वर्णन करण्याकरितांच गांवोगांव पाठवितात. प्रतिष्ठित लोकांकडे एकादा पेन्शनर, इंजिनीअर, मुन्सफ, डॉक्टर असा जातो व महाराजांचें गुणवर्णन करून मोठमोठ्या लोकांना भुरळ घालतो. सुशिक्षित समाजाला आकर्षण करण्याकरितां भीड घालून महाराजांचीं चरित्रेंहि लिहविलीं जातात. अशाच तऱ्हेचें एका महाराजांचें चरित्रहि एका मोठ्या पत्राच्या भिडस्त संपादकानें लिहिलें आहे.

तात्पर्य, बुवाबाजीचें मूळ बुद्धिदौर्बल्यांत आहे; परंपरागत भोळेपणांत आहे आणि विचारशक्तीच्या ऱ्हासांत आहे. अज्ञानध्वंसनाचें कार्य जितकें झपाट्यानें होईल व अचुक कार्यकारणपरंपरा शोधण्याची संवय जितकी समाजास लागेल तितक्या अशा गोष्टी आपोआप बंद पडतील.

परमार्थाविषयींच्या खऱ्या कल्पना लोकांना नाहींत; वेदांतांतील कर्म, ईश्वर, कर्मफल, पुनर्जन्म इत्यादि सिद्धान्त तर्काला बरेचसे पटणारे आहेत, त्यांत या बुवाबाजीचा बिलकुल संबंध नाहीं हें सर्व लोकांना माहित नसल्यामुळें परमार्थ हा एक पोटाचा धंदा झाला आहे.

मनुष्यस्वभाव असा आहे कीं, प्रत्येकाला स्वत:च्या वास्तविक किंमतीपेक्षां अधिक मोठेपणा आवडतो ! साधकावस्थेंतील अभ्यासी साधकाला सुद्धां 'महाराज, सर्वज्ञ' वगैरे लोकांनीं म्हटलें कीं त्याला वरें वाटतें. जनस्तुति मधुर लागूं लागली कीं, खरा साधक त्या उपाधींतून मोकळा होतो व लुच्चा साधक मूर्ख लोक नादीं लागत आहेत असें पाहून आपलेंच स्तोम अधिकाधिक माजवितो. लोक आपल्या नादीं लागतात, आपल्या शब्दावर झुलंतात, असें साधकाला वाटूं लागलें कीं तो एकदम महाराज या सदरामध्यें सरकतो. हरिदास-पुराणिकांतून या पद्धतीनें जसे महाराज होतात, तसेंच बी. ए. झालेले, संत-वाङ्मयाचा अभ्यास केलेले साहित्यभक्तही 'महाराज' होऊं घातलेले आहेत.

शहाण्यानें बुवांच्या नादीं लागूं नये हाच उत्तम मार्ग ! एकदां महाराजाला बुद्धीचा पेंच ढिला आहे असें दिसलें, कीं महाराज लगेच पगडा बसवितो. सांख्यशास्त्रांतील प्रकृति ही पुरुषानें तिजकडे पाहातांच जसा संस्कृतीचा पिंगा घालते, किंवा किडविड्या जोशी हा जसा वाईसाव आपलें वक्तव्य आस्थेनें ऐकतात असें पाहून पुराण लांबवितो, तसेंच हे महाराजहि करतात.

या बुवाशाहीचे अनर्थ कोठवर वर्णावे ? या बुवाशाहीनें अत्युत्कृष्ट अशा आपल्या तत्त्वज्ञानाची आणि परमार्थाची विटंबना चालविली आहे. त्या विटंबनेचें स्वरूप चिळस यावी म्हणून पुढच्या प्रकरणांत सांगणें भाग आहे.

प्रकरण १४ वें.

ब्रह्मविद्येची विटंबना

आर्य संस्कृतीच्या परंपरेमध्यें ब्रह्मविद्या ही सर्वश्रेष्ठ विद्या समजली जाते. पारमार्थिक दृष्टया ही विद्या म्हणजे माताच होय. मातेविषयीं अवज्ञा जशी त्याज्य तशीच कामनाहि त्याज्य होय. परंतु या भरत खंडांत कांहीं अडाण्यांनीं या मातेची अवज्ञा केली असून ते तत्त्वज्ञानाविषयीं उदासीन आहेत. याच्या उलट कांहीं लुच्च्यांनीं या मातेविषयीं कामना धरून धंद्याच्या रूपानें तिजवर जगण्याचा उद्योग सुरू करून तिची विटंबना चालविली आहे. या जगांत सर्वश्रेष्ठ जर कोणतें ज्ञान असेल तर तें ब्रह्मज्ञान होय. ब्रह्मज्ञान म्हणजे आत्मज्ञान होय. सर्वांना शरीर काय आहे हें दिसतें व स्थूल शरीरापलीकडे सूक्ष्म शरीर आणि सूक्ष्म शरीरांतील मन व बुद्धि हीं तत्त्वें काय आहेत यांचें सामान्य ज्ञानहि असतें. मनाचा व बुद्धीचा यथार्थ अभ्यास व त्यांच्या सामर्थ्याचें आकलन हें तरी किती माणसांना असूं शकतें याचा विचार केल्यास मन व बुद्धि यांच्या पलीकडे असणारें जें आत्मतत्त्व त्याचें ज्ञान करून घेण्याची पात्रता प्रत्येकांत असेल अशी कल्पनाहि करवत नाहीं. कारण इतर ज्ञानाप्रमाणें आत्मज्ञानाचा विषय नाहीं. इतर ज्ञानें हीं इंद्रियांनीं होतात तर हें ज्ञान अतीद्रिय आहे. इतर ज्ञानाला वृत्ति ही अंतर्मुख करावी लागत नाहीं, पण आत्मज्ञान हें बहिर्मुख वृत्तीनें मुळींच शक्य नाहीं. इंद्रियें हीं नेहमीं बाहेर पाहातात, पण आत्मज्ञानार्थ त्यांना आंत म्हणजे त्यांच्या स्वतःच्या उगमाकडे पाहावयास लावावयाचें असतें. अशी स्थिति असतांना आज पाहावें तों मुलगी कोणी देत नाहीं म्हणून ब्रह्मचारी, कवडीही मिळवण्याची अक्कल नाहीं (उद्योग करून) म्हणून अत्यंत विरागी आणि बुद्धि कुठेंही प्रविष्ट होत नाहीं म्हणून महंती; अशा अनधिकाऱ्यांनीं खरें सत्पुरुषत्व व ज्ञानांतील श्रेष्ठपणा हा भ्रष्ट करून सोडला आहे. हिंदुस्थानांत

दैवी संपत्ति व निसर्गमनोहारिता ही कांहीं कमी नाहीं. पण तिला जें अमांगल्य आलें आहे तें या बुवा, वैरागी आणि महाराज यांच्या पराक्रमांचें फळ आहे.

आत्मविद्या ही श्रेष्ठ होय यांत शंका नाहीं, परंतु ती श्रेष्ठ कोणाला? तिचा अधिकार कोणाला? याचा विचार करावयास नको काय? दूध उत्तम, पौष्टिक व वीर्यकर हें सर्वथैव खरें असलें, तरी जो दूध पिऊन तें पचवील त्यालाच तें गुणकारक आहे ना? पक्वान्न चांगलें, पेढाहि मोठा पौष्टिक; पण तो ज्या मुलाच्या वारशास वाटण्यांत येतो त्याच्या तोंडांत घालावयाचा नसतो! ज्याला सायासानें स्तनपानहि करितां येत नाहीं त्याच्या तोंडांत जिलबी व पेढे कोंबले तर तें अर्भक व्याकूळच होईल! अधिकारभेदानें शिक्षण दिलें जातें व अधिकारभेदानेंच वैद्य व डॉक्टर औषधयोजना करितात. "सबको सोनामुखी" असें जर वैद्य करूं लागला तर अतिसार, हगवण इत्यादि विकार ज्यांना आहेत त्यांना मृत्युपंथासच जावें लागेल.

अधिकारभेदानें इतर सर्व कार्यें जशीं चालतात त्याचप्रमाणें ब्रह्मज्ञानाचेंहि आहे. ब्रह्मज्ञान हें सामान्य माणसांचा विषयच होऊं शकत नाहीं. ज्यानें पुरुषार्थ साधले, जगांतील सर्व लौकिक आकांक्षा तृप्त करून घेतल्या व भोगल्या तोच मनुष्य जगापलीकडे काय आहे याचा शोध घेण्यास प्रवृत्त होतो. हाच सूक्ष्म बुद्धिवान्, साक्षेपी व विरक्त मनुष्य ब्रह्मज्ञानाचा अधिकारी होय. यालाच साधनचतुष्टयसंपन्न असें म्हणतात. नित्य व अनित्य यांचा विवेक, या जगांत व परलोकांत विषयसुखाची अरुचि, शम, दम, तितिक्षा, संतोष, शांति व सरलत्व इत्यादि षट् साधनांची संपन्नता आणि शरार व मन यांच्या बंधपाशांतून मुक्त होण्याची उत्कटता, इतक्या साधनांनीं जो संपन्न असेल तोच या विद्येचा अधिकारी समजावा. 'येरा गव्हारांचें' येथें काम नाहीं हें मुद्दाम ध्यानांत ठेविलें पाहिजे.

हा अधिकार व ही योग्यता लक्षांत न घेतां हिंदुस्थानांत असा चमत्कार होत आहे कीं जो उठतो तो ब्रह्मज्ञान बोलूं लागतो. ब्रह्मविद्येच्या नादीं लागणाऱ्याला धार्मिक व आचारसंपन्न समजतात व जो तें ज्ञान बोलतो त्याला सिद्ध पुरुष समजतात! ज्यांना विद्या, कला, शास्त्र,

व्यवहार यांचा संपर्क नाहीं, साक्षरता नाहीं, सुबुद्धता व सुसंस्कृतता नाहींच नाहीं, अशा माणसांना ब्रह्मविद्येचे पाठ दिले जातात; व जग 'असार' आहे असें शिकविलें जातें. ज्यांना मनुष्य कशाला म्हणतात हें कळत नाहीं, माणुसकीमध्यें कोणते गुण येतात यांची माहितीहि नसते आणि ज्यांना मानवी हक्क, मानवी जीवित, मानवी समाजसंस्था यांची कल्पनाहि नसते अशा माणंसांना ' जग मिथ्या,' आहे असें सांगणें हा अन्याय नव्हे काय? पण हा अन्याय ऊर्फ अधर्म हिंदुस्थानांत राजरोस चालू आहे. त्याला प्रतिबंध नाहीं, नियंत्रण नाहीं, इतकेंच नव्हे तर या ब्रह्मविद्येच्या नांवाखालीं बुवाशाही करून जे लाखो लोक समाजावर अगदीं फुकट जगत आहेत व वाटेल तीं अनीतीचीं कृत्यें करीत आहेत, त्यांनाहि कोणी विचारीत नाहीं व पुशीतहि नाहीं.

मनुष्याला मरण हें काय आहे हें जरी कळलें तथापि तें मरण त्वरित कां येतें हें कळत नाहीं. ' किं मरणं मूर्खत्वं ' मूर्खपणा, अज्ञान, अडाणीपणा, प्रमाद, चुका करणें हेंच मरण होय. अर्थात् यांमुळें माणसें जितकीं त्वरित मरत आहेत तितकीं सांथीनें व प्लेगनेंहि मरत नाहींत. हिंदुस्थानांत मूर्खपणानें, चुकीच्या मार्गानें जाणारी दैत्यप्रजाच फार आहे. समर्थ म्हणतात कीं, " चुकणें दैत्य जाणिजे " आणि अशा चुकांचें आगर म्हणजे ब्रह्मज्ञानाच्या भ्रमांतील हिंदुसमाज हें होय.

आजच्या या विसाव्या शतकांत म्हणजे शास्त्रीय व प्रयोगसिद्ध अशा युगांत समाजानें शास्त्र, शोध, शिस्त व संघटना यांचाच अवलंब करावयास पाहिजे तरच हें अज्ञान नष्ट होण्याची आशा आहे.


हिंदुस्थानांतील नोकरशाही नष्ट व्हावी व लोकशाही स्थापन व्हावी असा प्रयत्न चालू आहे. लोकांच्या पैशावर पोसलेली नोकरशाही हल्लीं लोकांना मुळींच जवाबदार नाहीं. म्हणून लोकांच्या हिताहिताची तिला मुळींच पर्वा नाहीं. नोकरशाहीची शेंडी लोकांच्या हातीं कधीं येईल; आणि ही बुवाशाही तरी लोकांना कधीं जबाबदार होणार हा मोठा प्रश्न आहे. नोकरशाहीप्रमाणें बुवाशाहीनेंहि आम्हांला गुलाम बनविलें आहे व हतप्रज्ञ केलें आहे. बुवाशाहीनें आमची बुद्धि फारच भ्रष्टविली आहे असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. बुवा म्हणून एकदां जाहिरात फडकली रे फडकली

कीं मग त्यापुढें कांहीं बोलावयाचें नाहीं, विचार करावयाचा नाहीं, फार काय पण प्रश्नहि करावयाचा नाहीं असाच दंडक पडलेला आहे. बुवा-साहेब म्हणजे महाराज, बुवा म्हणजे संत व सत्पुरुष, ते म्हणतील तें वेदवाक्य व करतील ती आज्ञा शिरसा प्रमाण ! अशीच समजूत साक्षर, निरक्षर, सुधारक व शास्त्री यांचीहि आहे. साधुमहाराज म्हणजे आहे तरी काय ? त्याची विद्या, तप, अधिकार, दानत यांची चौकशी कुणीहि करीत नाहींत. तर केवळ एकानें गुरूपदेश घेतला कीं दुसऱ्यानें घ्यावयाचा व दुसऱ्यानें घेतला कीं तिसऱ्यानें त्याचा कित्ता गिरवावयाचा असा अंधपरंपरान्याय हिंदुस्थानांत चालू आहे.

राष्ट्रांत आज बेकारी वाढली आहे, द्रव्य नाहीं, उद्योग नाहीं व अन्नाची पंचाईत पडली आहे असें म्हणणारे म्हणोत; परंतु या बुवा-शाहीकडे पाहिलें तर त्यांची चंदी यथेच्छ चालली असून त्यांच्या चैनींत कांहीं कमी नाहीं असेंच प्रत्ययास येतें. बुवांना गुरुदक्षिणा मिळते, शिष्य-शिष्यिणी त्यांच्या सेवेस तत्पर असतात.

बुवा मठांच्या इमारती मोठ्या टोलेजंग उठवितात. बुवांच्या मिळ-कतीहि मोठ्या असतात. सावकारीचा धंदा महाराज करीत असतात, आणि भोळ्या शिष्यांच्या ठेवी संभाळतात ! अंगाला केशराची उटी, जटांना कामि-निया तेलें, नेसावयास उंची रेशमी भगवीं वस्त्रें व खावयास शिरा, पुरी, घृतकुल्या व मधुकुल्या; असा यांचा अगदीं साधा व वैराग्यदर्शक थाट असतो. हिंदुस्थानांत असले फुकटखाऊ व चैनीनें राहणारे रंगेल साधु कांहीं कमी नाहींत, त्यांची संख्या वरीच आहे.

श्री. प. प. केवलानंद स्वामीमहाराज (पं. नारायणशास्त्री मराठे) हे बद्रीनारायणास गेले होते. येतां जातां त्यांनीं उत्तरेकडील बुवा, गोसावी, महंत, साधु, संन्यासी इत्यादींमध्यें समाविष्ट होऊन जो अनुभव घेतला तो येथें देण्याजोगा आहे. उत्तर हिंदुस्थानामध्यें बुवाजींचें प्रस्थ या भागापेक्षां फारच अधिक आहे. काळा कंवळीवाले यांनीं जीं अन्नछत्रें व ज्या धर्मशाळा बांधल्या आहेत, त्यांचा पूर्ण उपभोग उत्तरेकडील हे साधुच घेत असतात. हरिद्वार व हृषीकेशापासून गंगेच्या कांठावर साधूंचे आश्रम लागतात. त्यांत कांहीं संन्यासी, कांही बैरागी तर कांहीं प्रापंचिकसुद्धां असतात. विद्या,



भोळ्या शिष्यांनीं आणून दिलेल्या ठेवी महाराज संभाळतात व पुढें ते त्या आत्मसात करितात. (पृ. १४४)

विचार, विवेक, चातुर्य यांचें व बुवाजींचें बहुतेक वांकडेंच असतें. ना विद्या ना विवेक, ना कला ना चातुर्य, अशींच माणसें या बुवापंथांत शिरतात. कांहीं न करतां फक्त बुवाच्या वेषावर जगणें हेंच त्यांना इतिकर्तव्य वाटतें. आलेल्या यात्रेकरूंनीं धार्मिक भावनेनें यांना वंदन करावें, कांहीं द्यावें व आपला परामर्श घ्यावा अशी ह्यांची इच्छा असते व तसें न झाल्यास

यांची साधुवृत्ति क्षणांत मावळून याचेकरूंवर शिव्याशापांचा वर्षाव होण्यास मुळींच वेळ लागत नाहीं. दुसरा उद्योग न करतां केवळ 'जय गंगाजी', 'जय यमुनाजी', 'जय राम', 'जय गोपाळ' अशा घोषावर जगण्याचा आपला हक्क आहे; फार काय पण आपण असें करतों म्हणजे मोठें शतकृत्य करतों अशीच यांची समजूत असते. गांजा, चिलीम, धुमी, शेकोटी, गहूका आटा, घी व शक्कर यांत कांहीं कमी पडतां उपयोगी नहीं व हया अवश्य गरजा सदोदित पूर्ण व्हाव्या म्हणून हे महंत लोक काय वाटेल तें खोटेंनाटें बोलतात, थापा मारतात, लोकांना फसवतात; कित्येक बुवा तर श्रीमंत अशा अर्धवटांना चांगली मोहनी पाडतात व त्यांच्याजवळचें सर्व लुवाडून घेतात.

गोसाव्यांमध्यें आपसांतील आखाड्यांची व तेथील मठपति होण्याची स्पर्धा असते. त्यानिमित्त त्या लोकांत मारामाऱ्या व खूनहि होतात. कांहीं बैरागी व साधु हे तर बायका व मुलें या परिवारांसह परमार्थी बनलेले असतात. कांहीं निमित्तानें भिक्षा मागून जगणें व लोकांना आपला मोठेपणा पटविणें येवढाच उद्योग अशा लोकांना असतो. बुवा, वैरागी व संन्यासी यांच्या दर्शनास लोक आदरानें जातात व कांहीं अधिक श्रद्धाळु "बुवाजी क्या होना ?" असें विचारतात. बुवाजींचीं उत्तरें ठरलेलीं असतात ! कोणी गीता मागतो, कुणी माळ मागतो, कुणी खडावा मागतो तर कुणी घोंगडी मागतो ! भाविकाला शक्तीप्रमाणें एकदोन आण्यांची माळ अगर कांहीं तरी बुवाला द्यावें असें वाटतें. पुढें तशी माळ बुवाजींना दिल्यानंतर ती फक्त दहा मिनिटांच्या आंत मागच्या दारानें विकली जाते. तात्पर्य, बुवाजींना दिलेल्या सर्व वस्तूंचा बाजार होऊन बुवाजी सहजच चारदोन हजारांचे मालक होतात !

काशीस जा, रामेश्वर पाहा, हरिद्वाराच्या गंगेच्या घाटावर जाऊन बसा व नीट पाहा म्हणजे असें दिसेल कीं पुजारी, पंडे, बुवा व व्यापारी यांच्यामध्यें धर्माचा, श्रद्धेचा व आस्तिक बुद्धीचा लेशही नसतो ! धार्मिक श्रद्धा ही फक्त बाहेरचे यात्रेकरू घेऊन येतात व तिच्यावर वरील लोकांचा व्यापार चालतो. तीर्थक्षेत्रांतील ते व्यापारी, बुवा व पंडे यांचे ते धंदे पाहिले म्हणजे या पुण्यक्षेत्रांतील पुण्यत्व नष्ट झालें असून शहाण्यानें या फंदांत पडूं नये असें

वाटतें. खरोखर धर्माच्या व दे[illegible] मागति आस्थेनें व जिज्ञासेनें कोणीहि पडलेला नसून जे धार्मिक व देवभक्त म्हणून मिरवितात त्यांचा तो एक प्रतिष्ठितपणाचा व लोकांवर जगण्याचा धंदाच आहे असें दिसूं लागतें. संन्यासी व यति हेहि हाच धंदा करतात. भिक्षेच्या गोष्टी, पुडींचीं पक्वान्नें व रुपायास्वरूपीं शाळिग्रामाच्या गप्पा असा त्यांचा परमार्थाचा नित्य कार्यक्रम असतो. 'रुपाया आणा' असें न म्हणतां 'नारायण आणा', 'नारायण द्या' असें म्हणतात एवढेंच. हा काय संन्यास कां मिथ्याचार, कां ही आत्मवंचना का लोकवंचना! "या संन्यासाला" काय म्हणावें असें अमृतराय म्हणतात तें यथार्थ आहे.

हिंदु समाजाचें निरीक्षण केलें व त्यांतील सुबुद्ध निर्बुद्ध, साक्षर निरक्षर यांचें अज्ञान पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं काय हा धर्म व काय हचा कल्पना? ब्रह्मज्ञानी म्हणवून घेणारे बुवा कुठें शिष्यांना पशु बनवीत आहेत तर कुठें ईश्वरभक्तीच्या नांवाखालीं महंत व भक्तिणी यांच्या शृंगारचेष्टांचे विलास झडत आहेत. कांहीं लोक बुवाशाहीच्या पंथांत शिरत आहेत आणि गुरुकृपायुक्त गुरुप्रसाद झाला कीं सर्व सुखें मिळतात असें समजत आहेत; तर शहाणे सुरते, शिक्षित, सुधारक, वृद्ध व चिकित्सकसुद्धां कोणी चमत्काराच्या मोहानें, कोणी सिद्धीच्या आमिषानें, कोणी लौकिक प्रतिष्ठेच्या इच्छेनें तर कोणी म्हातारपणीं समाधान मिळावें या लालसेनें या बुवाशाहीच्या जाळ्यांत सांपडत आहेत! कांहीं लोक तर केवळ मजा व केवळ स्वार्थाची लुच्चेगिरी यांमुळेंच बुवांच्या प्रभावळींत असतात. हा सर्व प्रकार शहाणपणाचा आहे काय ?

ब्रह्मवेत्त्यांचीं लक्षणें जीं वेदांत ग्रंथांतून दिलीं आहेत त्यांतील एकहि लक्षण आजच्या या महाराजांच्या अंगीं आढळत नाहीं. निरपेक्षता, निर्भयता, मननशीलता, शांतता, समाहितता, निर्वैरता हीं व या तऱ्हेचीं लक्षणें साधूंच्या ठिकाणीं असावयास पाहिजेत. पण आजच्या साधूच्या ठिकाणची दैवी संपत्ति कशी पाहावयाची हेंही लोकांना कळत नसल्यामुळें ते बाह्य व लौकिक ऐश्वर्यावरून बुवांचे अनुक्रम लावीत असतात व श्रेष्ठ–कनिष्ठपणा ठरवीत असतात.

महाराजांच्या पश्चात् त्यांच्या शिष्यगणांमध्यें दहापांच लाखांचे दावे

लागले कीं "वाः वा केवढें ऐश्वर्य," म्हणून कांहीं लोक मृत महाराजांशीं पूर्वी-पेक्षां अधिक अनन्य होतात. कांहीं लोक महाराजांच्या पंक्तीला रोज किती पान बसतें यावरून त्यांच्या अनुग्रहाचा विचार करीत असतात. कांहीं तर महाराजांभोंवतालच्या सुस्वरूप तरुण शिष्यिणी, गाणारणी आणि इतर अशाच आकर्षक गोष्टींवर गुरुमहाराजांच्या गोटांत शिरतात.

परमार्थ परमार्थ म्हणून नुसती ओरड आहे. ज्यांना स्वार्थहि कसा साधावा ही अक्कल नाहीं, ते लोक परमार्थ कसा साधणार? मूर्खांना परमार्थ कळत नाहीं, म्हणून लुच्चे लोक मूर्खांच्या परमार्थावर जगतात! किंवा परमार्थ तरी कसला कपाळाचा! शिष्यांना फसवून, प्रसंगीं भोळ्या स्त्रियांच्या तोंडांत बोळे कोंबून त्यांचें डवोलेंहि हे बुवा उपटण्यास कमी करीत नाहींत.

पैसा हाच परमार्थ व त्याचे नांवावर लुच्च्यांनीं हा बिनभांडवली धंदा चालविला आहे, दुसरें काय? हिंदु समाजांत हा धंदा उत्तम चालतो येवढें मात्र खरें. विद्वान् होण्याची यातायात नको, वायका-पोरांचें लफडें नको, कलाकुशलता संपादन करण्याची दगदग नको! या सर्वांना जे पारखे अर्थात् नालायक तेच बहुतेक बुवा बनत असतात! अत्रि-स्मृतीमध्यें पुढील मजेदार श्लोक आहे—

वेदैर्विहीनाश्च पठन्ति शास्त्रम्। शास्त्रेण हीनाश्च पुराणपाठाः।
पुराणहीनाः कृषिणो भवन्ति। भ्रष्टास्ततो भागवता भवन्ति॥

हें स्मृति-वाक्य तत्कालीन परिस्थितीचा अनुवाद करणारें आहे. वेद, शास्त्र, पुराण यांनीं विहीन असलेले व कृषीलाहि निरुपयोगी असलेले लोक भागवत म्हणजे बुवा बनतात. दुसरा पाठ 'ब्रुवंति' असाहि आहे. त्या धंद्यामध्यें कांहीं दिवस गेल्यावर मनुष्य-स्वभावाचें ज्ञान, गिऱ्हाईक पटविण्याचें ज्ञान, कुणाला काय पाहिजे हें ताडावयाचें ज्ञान येतें आणि पुढें बस्तान बसूं शकतें. जे लोक बुवाबाजीवर मोठमोठ्या मिळकती संपादन करतात, ते इतर धंदे करून तसें कां करीत नाहींत? असा कुणीहि प्रश्न विचारतील तर त्याचें उत्तर एवढेंच कीं, एखादा हुषार बुवा निराळ्या धंद्यावर पैसे मिळवील खरा; परंतु इतकी प्रतिष्ठा, इतकी मान-मान्यता, हजारों लोकांनीं पायावर लोटांगण घालणें, रोज झोडावयास विविध



चाईच्या तोंडांत बोळा देऊन बुवानें डबोलें पळविलें. (पृ. १४८)

मिष्टान्नें, हें सर्व कसें मिळेल ? प्रापंचिक स्थितीमध्ये हें शक्य असत नाहीं. इतर जबाबदाऱ्या व काळज्या प्रपंचामध्यें संपन्न माणसांच्या मागेंहि असतात. अर्थात् प्रापंचिक, व्यावहारिक व इतर सर्व जबाबदाऱ्या टाळून जगांतील सर्व उपभोग भोगण्याची ही एक कला आहे यांत संशय नाहीं.

संस्थानिक व महाराज

पुष्कळ महाराजांच्या खाजगी व संस्थानच्या अशा दुहेरी मिळकती आहेत. महाराज प्रथम देवालय बांधून त्यांतून पुढें संस्थान उत्पन्न करतात. देवाची पूजा, अर्चा, नैवेद्य व इतर जें कांहीं देवापुढें येईल तें सर्व महाराजांचें खाजगी असतें. देवाला उत्पन्न, उत्सवाकरितां नेमणुकी व आल्यागेल्याकरितां खर्च हा सर्व संस्थानचा होय.

व्यवस्था, देखरेख ही सर्व महाराजांचीच, अर्थात् त्याकरितांहि महाराजांना कांहीं तरी मिळतच असतें. देवाकरितां व देवाच्या नांवावर अनेक खातीं काढून मिळवावयाचें व अनेक कारणांनीं तें खाजगीकडे अनेक कार्यें दाखवून वळतें करावयाचें, असा हा मठपतींचा धंदा असतो. संस्थानिक जसें हल्लीं खाजगी द्रव्यसंग्रह वाढविण्यामध्यें निमग्न आहेत, तसेंच महाराजहि करीत असतात. इंग्रजी राज्यांत नोकरशाही, संस्थानांत राजशाही व ही समाजांत बुवाशाही आहे. तिहींचें ध्येय व स्वरूप एकच.

हरिदासाचा बुवा महाराज, त्यापुढें सत्पुरुष व पुढें महाराज अशी वढती कशानें मिळते ? तर ती केवळ लोकांच्या मूर्खपणानें मिळते, हरिदासांतून बुवा महाराजांच्या वर्गांत प्रविष्ट झालेले पुष्कळ आहेत. पुष्कळ हरिदासांना धंदा ठाकठीक चालावा म्हणून अनुग्रहाचें यंत्रहि जवळ बाळगावें लागतें. त्यामुळें वार्षिक खंडणी मान्यतेनें व निश्चित अशी वसूल होत असते. अमके हरिदास अमक्या भागांत जास्त लोकप्रिय याचा अर्थ त्यांची अनुग्रहीत शिष्यपरंपरा तिकडे असते व एकदां दीक्षा घेतल्यावर गुरूचें वाईट आचरण पाहूनहि निंदा करण्याची सोय नसते. कारण " गुरुः साक्षात् परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नमः " असा या सांप्रदायाचा सिद्धांत असतो. स्त्रियांना जसें पति हें दैवत, तसें या अनुग्रहितांना गुरु हें दैवत असतें. त्याविरुद्ध ब्र काढण्याची सोय नसते. अर्थात् अशा मूर्ख लोकांवर बुवांनीं चंगळ कां न करून घ्यावी ?



मी पूर्वजन्मींचा पति आहें. (पृ. १५२)

शिष्यिणीसमवेत अधःपतित झालेले बुवा नंतर असें म्हणतात कीं या बाईचा मी पूर्वजन्मीचा पति आहें. पण त्या बाईचा नवरा हातांत जोडा घेऊन असें विचारीत नाहीं कीं, " गाढवा तूं तीन नाहीं दहा जन्मांचा पति असलास तरी हा तुझा बाप या जन्मीचा तिचा पति आहे. तेव्हां तुला यथ हजार जोडे मारतों व एक म्हणतों. " वाचकहो, असे जोरदार पति असले तर बायका जातील तरी कशाला गुरूकडे ? तेंच नाहीं म्हणून तर हें असें होतें. रमाबाई गेली म्हणून ठमाबाई जाते व शंकरराव जातात म्हणून माधवरावहि गुरूपदेश घेत असतात. रामभटजी व शामभटजी यांना काय, पूजा व अनुष्ठानें मिळालीं कीं ते म्हणतात महाराज उत्तम आहेत व कृष्णशास्त्री त महादेवशास्त्रीहीं म्हणतात कीं " कोणता लेक शंभर रुपये दक्षणा व शालजोडी अशी संभावना करितो आहे ? तेव्हां बुवांचा गोंधळ कांहीं असला तरी आम्हांस काय त्याचें ? "

एकदां आप्पय्या दीक्षित गंगेवर स्नानाला गेले. गर्दी होती म्हणून धावळी व पंचपात्री कोठें ठेवावी असा त्यांना विचार पडला. त्यांनीं वाळवंटांत एक खड्डा खणून त्यांत ते पदार्थ ठेविले व ओळख पटावी म्हणून वर वाळूचें लिंग करून स्वारी स्नानास गेली. स्नान करून अर्ध्या घटकेनें परत येतात तों त्यांना वाळूचें लिंग ओळखेना ! कारण त्यांनीं केलेल्या लिंगाच्या आसपास शेंकडों वाळूचीं लिंगें दिसूं लागलीं ! हा चमत्कार काय होता बरें ? दीक्षित लिंग करून स्नानास गेले हें जवळच्या राम दीक्षितांनीं व कृष्ण दीक्षितांनीं पाहिलें. त्यांना वाटलें कीं, आजच्या एकादशीचें महात्म्य लिंग करून स्नान करणेचें असावें. तेव्हां त्यांनींही वालुका लिंगें केलीं. हरभटजी व नरभटजीनींहि त्यांचें अनुकरण केलें व रमाबाई व भामाबाईंनींहि आपल्या मनाशीं पुण्यभावनेचा विशेष समजून पुरुषांचें अनुकरण केलें ! झालें. शेंदोनशें लिंगें तेथें झाल्यावर जो जो आला तो तो प्रथम लिंगच करूं लागला ! आप्पय्या दीक्षित स्नान करून आल्यावर मनांत हंसले व म्हणाले, " पंचपात्री हरवूं नये म्हणून करावयास गेलों एक तों झालें भलतेंच ! " ते म्हणतात—

गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ।
वालुका लिंगमात्रेण नष्टं मे ताम्रभाजनं ॥



वालुकालिंग मात्रेण नष्टं मे ताम्रभाजनं । (पृ. १५२)

जग हें असें आंधळें आहे. तें कोणाच्याही मागें लागतें. कोणालाहि तें ब्रह्मज्ञानी करितें व वेड्यालाहि तें सत्पुरुष बनवितें. जगाची ही आंधळी प्रवृत्ति पाहून " तुका म्हणे कैसे आंधळे हे जन । गेले विसरून खऱ्या देवा ।। " या वाक्याची यथार्थता पटते.

कित्येक सत्पुरुषांना 'तुम्ही स्त्रियांना कां उपदेश देतां ?' असें विचारल्यास ते निर्लज्जपणें असें म्हणतात कीं, त्यांचे नवरे त्यांना आमच्याकडे कां पाठवितात ? नवऱ्यांनीं आपल्या बायका व आईबापांनीं आपल्या तरुण मुली महाराजांच्याकडे अनुग्रहार्थ वेळीं–अवेळीं कां पाठवाव्या हेंच गूढ आहे. असें एक गांव आढळत नाहीं किंवा असा एक बुवा आढळत नाहीं कीं ज्यानें स्त्रियांना अनुग्रह देतांना कांहीं बरें–वाईट केलेलें नाहीं ! ! अविवाहित स्त्री–पुरुषांचें सान्निध्य हें परमार्थामध्यें तर फारच घातक, असें असतां बुवामहाराजांच्या मठांत व संस्थानांत वर्चस्व शिष्यिणीचें दिसत असतें ! ! !

'पचतें तर कां खाऊं नये, खपतें तर कां विकूं नये आणि चालतें तर कां चालवूं नये ?' हाहि एक महाराजांचा प्रश्न आहे. बुवांच्याकडे बाया जातात, विधवा स्त्रिया त्यांना डोलें अर्पण करतात, कित्येक त्यांजवर भाळतात ! !

वृक्ष तेथें छाया । ब्रह्म तेथें माया ।। बुवा तेथें बाया । असणेंची ।।

हा नैसर्गिक व्यवहार सर्वत्र आढळतो. सर्वांचें हित साधतें, पुष्कळांचीं तोंडें साधु बंद करितात; या स्वार्थी आशेनेंच लोक बुवांच्या मागें लागतात. त्यांत श्रीमंत, गरीब, विद्वान्, अविद्वान्, साक्षर व निरक्षर अशा बहुविध वृत्तींच्या लोकांना विविध आमिषें असतात. म्हणून सर्वांचें केंद्र बुवाचें संस्थान होत असतें.

हिंदु समाजांत, देव, धर्म, परमार्थ यांच्याविषयीं अशास्त्रीय कल्पना इतक्या आहेत, कीं त्यांवर लुच्चे लोक साधुपणाचें ढोंग करून फुकट जगत आहेत. ईश्वर व मनुष्य यांची भेट करून देणारा हा गुरु अगर महाराज अगर बुवा आहे अशी, शिकलेल्या शहाण्या बॅरिस्टर, डॉक्टरांचीहि समजूत असते ! त्या बुवाला खरोखर देव किती कळला आहे व आपला अधिकार किती

आहे याचा विचार न करतां लोक आपले भराभर गुरु करतात, दीक्षा घेतात, भजनीं लागतात व इतरहि पाहिजे त्या गमती करितात !

परमार्थ, बुवा व ब्रह्मज्ञान म्हटलें कीं, कांहीं लोक अगदीं कान टवकारून ऐकतात. त्यांत बुवा बोलत नाहींत, खात नाहींत, शिव्या देतात असें ऐकलें कीं, मग त्या बुवासागें अगदीं झुंडीच्या झुंडी !! बुवा तीन दिवस झाडावर उपाशी बसला कीं चौथे दिवशीं पेढ्यांचीं ताटें, श्रीखंडाच्या वाटचा व शिऱ्याच्या वेळण्या भरून पुढें येतात. अजागळ लोक हें अन्न आणून देतात, पण टगे लोक बुवांचें सिद्धिसामर्थ्य कसें आहे असें म्हणून अद्‌भुतपणा उत्पन्न करितात.

अर्धवटपणा व धर्मभोळेपणा हा शास्त्री, पंडित, वकील, डॉक्टर अशा सर्वांत आहे. शिवाय वकील, डॉक्टर वगैरेंना आपापल्या व्यवसायांतलें जरी कळत असलें, तथापि वेदान्त, अध्यात्म व परमार्थ यांतील सर्व कांहीं कळतें असें नाहीं. मग केव्हां तरी असे लोक जेव्हां एखाद्या बुवाकडे जातात, तेव्हां त्याच्या भाषेची व माहितीची भुरळ त्यांच्यावर पडते व ते त्यांच्या नादीं लागतात. पुढें बोलाफुलाला केव्हां तरी गांठ पडली म्हणजे अगदी अंधभक्त होतात. श्रीमंत व सधन माणसांना तर ते मध्यम समाजांत मिसळत नसल्यामुळें कीर्तन, पुराण, प्रवचनद्वारां जे विचार सहज ऐकावयास मिळावयाचे ते त्यांना मिळत नाहींत आणि मग हे केव्हां तरी एखाद्या बुवाकडे गेले, म्हणजे तेथें भारले जातात व सांगतात कीं, " काय हो, तो अमका कोष्टी आहे, शिंपी आहे, न्हावी आहे, काय बृहस्पती-सारखा ज्ञानेश्वरी सांगतो ! तो ज्ञानी आहे खरा !" अशा तऱ्हेनें हे लोक हुरळून जातात. बुवाहि अशींच साधनें पाहात असतो. त्यामुळे सामान्य लोकांना तेथें कांही तरी असलें पाहिजे असें वाटतें.

ज्याअर्थी इतके मोठेमोठे लोक बुवांच्या नादीं लागतात त्याअर्थी तेथें 'कांहींतरी' असलेंच पाहिजे असें एक सर्वांत मोठें व भ्रमोत्पादक म्हणणें असतें! पण जे लोक नादीं लागतात, ते अडाणी म्हणून लागतात, उद्योग नाहीं म्हणून लागतात. कोणी मतलबानें, तर कोणी स्वार्थानें, तर कोणी मजेनें बुवांच्या नादीं लागतात. त्यांत कांहीं शिकलेले, शास्त्री, पंडित, वकील, डॉक्टर, बॅरिस्टर, सॉलिसिटर असेहि असतात. पण हे सर्व धर्म--

श्रद्धेच्या दृष्टीनें नरम असतात. या लोकांना यांतील कांहीं कळत नसतें म्हणून ते कांहीं तरी समजतात. अशांच्या मेंदूचा एक पेंच ढिला असतो!

या "कांहींतरीचें" पृथःकरण केलें तर त्यांत कांहींचें अज्ञान, कांहींचा धर्मभोळेपणा व कांहींचा धूर्तपणा यांचें मिश्रण असतें इतकेंच. बुवांचा धूर्तपणा व बेरकीपणा, बुवाभोंवतालच्या टग्यांची कारवाई आणि कांहीं शिष्यांचा धर्मभोळेपणा व अज्ञान यांतून या **कांहींतरीचा** उगम होतो.

कांहीं बुवा प्रथम वैराग्य दाखवून नंतर सार्वजनिक कार्ये काढतात. घाट, देवालय, जीर्णोद्धार, यांच्या नांवांवर पैसे जमवितां-जमवितां खाजगी मिळकतीहि करितात व त्यास साखसुरतपणा यावा म्हणून शिकलेले लोकहि मंडळामध्यें समाविष्ट करितात. प्रथम पारमार्थिक वैराग्य, नंतर सार्वजनिक कार्याची हौस आणि शेवटीं पक्के विलंदर स्वार्थी अशा क्रमानेंच वाढलेले पुष्कळ बुवा आढळतात !!!

तरुणांनो, तुम्हाला प्रपंच करावयाचा आहे ना ? कीर्ति व पैसा हीं पाहिजेत ना ? म्हणजे धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थच जर पाहिजेत, तर तुम्ही नसती उठाठेव कशाला करतां ? संस्कृत पुस्तक पाहिजे असल्यास तें जसें चांभाराच्या दुकानांत मिळत नाहीं, सोनें पाहिजे असल्यास तें जसें लाकडाच्या वखारींत मिळत नाहीं तसेंच प्रापंचिकांना जें कांहीं पाहिजे तें त्यांनीं प्रपंच करणाऱ्या तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच मिळविलें पाहिजे. जो नुसत्या जटा वाढवून बसला आहे, टिळेटोपी धारण करितो, ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी नुसत्या पोपटासारख्या बोलतो व दुसऱ्याच्या पैशांवर आयतोबासारखा जगतो अशाकडे जाऊन काय बरें मिळणार आहे ?

राष्ट्रांतील तरुणांनो, तुम्ही बुवांच्या मागें न लागतां आधुनिक शास्त्रांच्या मागें लागा. गुरुमहाराजांच्या चमत्कारांचा धिःकार करून जगांत पंचमहाभूतांतील शास्त्रीय शक्तींनीं काय चमत्कार चालवले आहेत, ते चांगले डोळे उघडून पाहा. ईश्वरभजनार्थ दिंड्यापताकांत दंग न होतां जगांत ईश्वरी शक्तीचे जे अनेक प्रवाह पंचभूतांमध्यें वावरत आहेत त्यांचा शोध करण्यांत देहभान विसरा. राखेची खडीसाखर करण्यापेक्षां राष्ट्रांत मोठमोठे साखरेचे कारखाने काढा आणि अंगठ्यांतून निघालेली

गंगा न पाहतां जगांत ज्ञानगंगा कशी धो धो वाहात आहे ती पाहा व तीमध्ये मनमुराद अवगाहन करा.

परमेश्वर तुमचा उद्धार करणार नाहीं व बुवा महाराज तर कधीं करणारच नाहीं. परमेश्वर म्हणतो कीं "उद्धरेत् आत्मनात्मानम्" स्वतः आपला उद्धार करून घेतला पाहिजे.जो यत्न करतो, उद्धाराकरतां धडपड करतो त्यालाच ईश्वर साह्य करतो. ईश्वर कर्माचेंच फळ देतो, तो अगदीं नयनिष्ठुर आहे; आपल्या पदरचें तो कांहीं देत नाहीं. मनुष्यानें दीर्घोद्योगानें आपला अधिकार वाढविला पाहिजे व जें पाहिजे तें यत्नानेंच मिळविलें पाहिजे. ईश्वर कार्यसिद्धीचें किंवा मोक्षाचें गांठोडें कधींच आणून देत नाहीं. कारण तें त्याच्याजवळ नाहीं. हा जेथें प्रत्यक्ष ईश्वराचा न्याय, तेथें येरा पामराची कथा काय !

कोणत्याहि व्यक्तीचा व समाजाचा जो उत्कर्ष होतो तो अचुक यत्नानें होतो. कार्य व कारणसंबंध कळल्याशिवाय विनचुक यत्न होत नाहीं. अज्ञानानें भलत्या गोष्टी करावयाच्या व त्यांचे दुष्परिणाम दिसूं लागले कीं देव, दैव, गुरु, कली यांच्यावर टेकावयाचें हा व्यवहार सर्वस्वी दुबळचांचाच आहे. सबलानें आपली बुद्धि चालविली पाहिजे, कार्यकारणसंबंध शोधून अचुक यत्न केला पाहिजे; मग उत्कर्ष हा त्याच्या मागोमाग धांवून येत असतो.

उत्कर्षाचा वा अभ्युदयाचा लाभ करून घेण्याकरितां तरुणांनीं षड्रिपु-दमन कसें करावें, व आजच्या परिस्थितीस अनुसरून ईश्वरप्राप्तीचा कोणता राजमार्ग चोखाळावा हें पुढील दोन प्रकरणांत सांगतों.

प्रकरण १५ वें. : :

रिपुदमन का रिपुत्याग ?

आजवर पुष्कळ वेळां कीर्तनांमध्यें व पुराणांमध्यें षड्रिपूंचा त्याग केला पाहिजे, काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे षड्रिपु सोडल्याशिवाय परमार्थ साधत नाहीं, हे षड्रिपु जोंवर आहेत तोंवर मनुष्याचा अधःपात होतच असतो, अशा प्रकारचा विषय ऐकला असेलच. फार काय पण भगवद्गीतेमध्यें सुद्धां कामक्रोधादि रिपूंना 'नरक–द्वारें' म्हटलें असून त्यांचा त्याग करावा असें भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलेलें आहे.

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ अ. १६–२१

प्रस्तुत प्रकरणामध्यें या रिपूंचा त्याग करावा का त्यांचें दमन करावें, याचा विचार कर्तव्य आहे. वरील श्लोकांत " एतत्त्रयं त्यजेत् " असा पाठ आहे तो " एतत्त्रयं जयेत् " असा असावा का काय असा प्रश्न आहे.

प्रथमतः असा विचार करूं कीं हें शरीर कोणकोणत्या घटक द्रव्यांनीं बनलेलें आहे ? शरीरामध्यें पंचमहाभूतें आहेत. अहंकार आहे, बुद्धि आहे, इंद्रियें आहेत, मन आहे, विषय आहेत. त्याचप्रमाणें इच्छा, द्वेष, सुख-दुःख, संघात, चेतना, धृति इत्यादि सर्व आहेत. शरीर जोंपर्यन्त आहे तोंवर हीं सर्व असणार हें सिद्ध आहे. अग्नींतील दाहकत्व, जलांतील शीतत्व, पृथ्वींतील गंधत्व हीं जशीं त्यांना सोडून असणें शक्य नाहीं, त्याच-प्रमाणें इच्छा, द्वेषादि विकार शरीराला सोडून असणार नाहींत. अर्थात् त्यांचा सर्वथैव त्याग अशक्य आहे. गीतेच्या तेराव्या अध्यायांत या शरी-राला क्षेत्र म्हटलेलें आहे. त्या क्षेत्रांत छत्तीस तत्त्वें आहेत. त्या छत्तीसांपैकीं

इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः । अ. १३–६

इच्छेमध्यें कामाचा, व द्वेषामध्यें क्रोधाचा अंतर्भाव झालेला आहे. म्हणून जिवंत मनुष्य प्राण्याला यांचा त्याग करणें कसें संभवेल ?

काम, क्रोध, व लोभ म्हणजे तरी काय ? काम म्हणजे इच्छा, आशा, वासना, तृष्णा असे अनेक पर्याय याविषयीं सांगतां येतील. प्रत्येक शब्दाच्या अर्थांत थोडा फार फरक आहे हेंहि खरेंच. तथापि अमुक हवेंसें वाटणें म्हणजे काम व इच्छिलेली वस्तु मिळाली कीं तिच्या संरक्षणाचा किंवा उपभोगाचा जो विकार उत्पन्न होतो त्याला लोभ म्हणतात. इच्छिलेली वस्तु न मिळाली कीं ज्यायोगानें ती न मिळाली त्याबद्दल द्वेष उत्पन्न होतो; इंद्रिय व विषय यांचा संयोग होतांच जी इच्छा उत्पन्न होते तिला काम म्हणतात व त्या इच्छेची पूर्ति न झाल्यास तेथें द्वेष तत्काल उभा राहातो.

आणि इच्छिलिया सांगडें । इंद्रिय आसिष न जोडे
ऐसा जो डाव पडे । तोचि द्वेष ॥ —ज्ञा. अ. १३–१२६

याप्रमाणें काम, क्रोध व लोभ या शब्दांचे अर्थ आहेत. मोह, मद व मत्सर यांचे अर्थ तर स्पष्टच आहेत. प्रथम षड्रिपूंचा त्याग व्यावहारिक माणसांनीं करावा काय ? करणें शक्य आहे काय ? हें पाहूं !

समजा, आपण एखाद्या गांवीं आहोंत. तेथें कांहीं आपले शत्रु आहेत, त्या शत्रूंचा त्याग गांवांत राहून करतां येईल काय ? त्यांच्याशीं फार झालें तर असहकारिता करतां येईल, पण तीहि सर्वस्वीं शक्य नाहीं. दररोज उठून त्यांचें तोंड पाहण्याचा प्रसंग येणारच. अशा वेळीं त्यांचा त्याग करण्यापेक्षां त्यांचें दमन करून त्यांना मऊ करणें हेंच व्यवहार्य नाहीं काय ? कोणत्याहि समाजामध्यें गुन्हेगार लोक असतातच, त्या गुन्हेगारांचा त्याग सर्वस्वी करतां येतच नाहीं. गुन्हेगार माणसें हीं वानराप्रमाणें पकडून जरा लांब नेऊन सोडलीं तरी तीं पुन्हां येणारच. म्हणून कोणतेंही सरकार अशा लोकांचें दमनच करितें. गुन्हा केला कीं सश्रम कारावासाची शिक्षा देणें, कारागृहांत त्या लोकांकडून अनेक कष्टाचीं कामें करून घेणें व त्यांना गरीब करणें हीच रीति सरकार स्वीकारतें. कांहीं रिपूंचें दमन जसें दंडानें होतें तसेंच कांहींचें शब्दानें, शिक्षणानें व सामानें होतें हेंहि येथें लक्षांत ठेविलें पाहिजे !

समजा, घरामध्यें खोडकर, व्रात्य व उच्छृंखल मुलें आहेत. त्यांचा

त्याग करावयाचा म्हणजे त्यांना घरांतून हाकलून द्यावयाचें कीं काय ? नाहीं, तें शक्यच नाहीं ! मग त्यांचा सर्व व्रात्यपणा सहन करावयाचा काय ? तर तसेंही नाहीं. केव्हां चोपून, केव्हां धाक दाखवून केव्हां समजुतीनें सुज्ञ बाप मुलांना ताळ्यावर आणण्याचा अखंड यत्न करीत असतो. तसाच यत्न या षड्रिपूंच्या बाबतींत केला पाहिजे. खोडकर, व्रात्य मुलें कांहीं झालें तरी तीं आपलींच आहेत. त्यांना एकसारखें मारणें किंवा दुरुत्तरें बोलणें हें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं. कामक्रोधादि रिपु हे आपल्या शरीरांतीलच आहेत, शरीरावरोबरचेच आहेत, त्यांची मगरमिठी सुटणें शक्य नाहीं, अतएव त्यांना हळुहळूं गरीब करून उपयुक्त केलें पाहिजे. श्री तुकाराम एके ठिकाणीं म्हणतात:--

कामक्रोध बंदीखाणी । तुका म्हणे दिले दोन्ही ॥
इंद्रियांचे धणी । आम्हीं झालों गोसावी ।

तसेंच:--

कामक्रोधा न सुटे मिठी । गिऱ्हे तरी वेठी रावविती ॥

म्हणजे कामक्रोधांची मिठी सुटत नाहीं पण त्यांना गरीब केल्यावर वेठीच्या बैलाप्रमाणें त्यांना रावतां येतें ! जोंवर इंद्रियें आहेत तोंवर इंद्रियांचे अर्थ म्हणजे विषय हे आहेतच. इंद्रियें हीं विषयाकडे धांव घेणारच. विषयप्राप्तींत प्रेम व अप्राप्तींत द्वेष हेंहि ठरलेलेंच आहे. पण मनुष्यानें विचारून व विवंचून वागून त्यांच्या आधीन होतां कामा नये असेंच गीतेचें सांगणें आहे.

इंद्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥ गी. अ. ३-३४

जरा दूरदृष्टीनें विचार केल्यास असें आढळतें कीं, मित्र व शत्रु हे शब्द सापेक्ष आहेत. कुणी कुणाचा मित्रही नाहीं व कुणी कुणाच शत्रूहि नाहीं. ज्या जातीचें कार्य इष्ट असेल त्याला अनुकूल तो मित्र व प्रतिकूल तो शत्रु असाच सिद्धांत निघतो. जगांत टाकाऊ असें कांहींच नाही. पण प्रत्येक पदार्थाची योजना करणारा मात्र दुर्लभ आहे. षड्रिपुसुद्धां टाकाऊ नाहींत पण त्यांची योजना चांगली केली पाहिजे.

कामक्रोधादि विकार हे शस्त्रासारखे तिखट आहेत व कापराच्या दागिन्यासारखे नाजुकहि आहेत. शस्त्राचा उपयोग ज्याला करितां येईल त्याला तें संरक्षण देतें व ज्याला तो करितां येणार नाहीं त्याला तेंच शस्त्र मरणहि देतें. बापानें मुलाला शत्रूहननाकरितां तीक्ष्ण शस्त्र दिलें, परंतु मुलानें त्याच्या धारेची पारख करण्याकरितां तें प्रथम प्रयोगादाखल आपल्याच मनगटावर जर चालविलें तर त्याचा दोष बापाकडे येईल काय ? श्रीमंतांच्या स्त्रिया उन्हाळ्यामध्यें कापराचे हलके व सुवासिक दागिनें जपानामध्यें वापरीत असतात, असें ऐकून एका मधुभटजींच्या खुळखुळा-बाईनें जर ते आणविले व शृंगारसाज करून बाई चूलखंड फुंकू लागली तर त्याला कोण काय करणार ? चुलींतील लांकडावरोबर बाईचे दागिने पेट घेतील व तोंड भाजण्याशिवाय कांहीं लाभ होणार नाहीं. तीक्ष्ण शस्त्र काय किंवा नाजुक कर्पूरालंकार काय दोन्ही मारक नाहींत; फक्त उपयोग करून घेण्याचें तारतम्य ज्ञान पाहिजे.

येथवर कामक्रोधादि विकार शरीरसंबद्ध आहेत ते शरीराचे, घटक आहेत, शरीर आहे तोंवर सर्वथैव त्याग अशक्य आहे, विषय पाहिला कीं हे विकार उद्भूत होणारच, मनुष्यानें यांच्या स्वाधीन न होतां त्यांचा योग्य उपयोग करून घेतला पाहिजे इ. विवेचन झालें. आतां यांची योजना कसकशी करावा व त्यांचें दमन कसें करावें या विवेचनाकडे वळतों.

गेलीं कांहीं शतकें आपल्या समाजावर निवृत्तिपर वेदांताचीं सारखी पुटांवर पुटें चढल्यामुळें आपल्याला षड्-विकारांचा योग्य उपयोग करण्याचें शिक्षणच मिळालेलें नाहीं. काम नको, इच्छा नको, राग नको, संताप नको, अगदीं कांहीं नको ! ! ! अल्पसंतुष्ट अजागळासारखें आपलें जिणें झालेलें आहे. परंतु पुरुषार्थ व उद्योगप्राप्तीस्तव या षड्विकारांचा उपयोग व्यवस्थितपणें करावा, असले विचारहि पूर्वीच्या वाङ्मयांत आहेत. उदा., अलीकडील मुक्तेश्वरी भारतांतील पुढील ओंव्या पहा:-

काम असावा ईश्वरभजनीं । क्रोध असावा इंद्रियदमनीं ।
तीर्थप्रसाद-शेष-ग्रहणीं । लोभ अपार असावा ॥
मोह असावा सज्जनासीं । मद असावा दुर्जनाशीं ।
मत्सर सदा संसाराशीं । असावा तो असे कीं ? ॥

भारतांतील सभापर्वामध्यें धर्मराजाला नारदांनीं कांहीं प्रश्न विचारले आहेत. त्यांना " कच्चित् " प्रश्न असें म्हणतात. त्याचें रूपांतर करतांना मुक्तेश्वरांनीं वरील ओव्या स्वतंत्र विचारानें लिहिल्या आहेत.

जगांत काम म्हणजे इच्छा असावी, कां नसावी ? विषयेच्छा आहे म्हणून जगाचें संवर्धन होत आहे. काम तरी कोणता असावा तर धर्माला अविरुद्ध असा असावा. गीतेंत भगवान सांगतात—

धर्माऽविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ गी. अ. ७–११

स्वोन्नति, स्वोत्कर्ष, स्वधर्मपोषक असा काम म्हणजे इच्छा अवश्य असली पाहिजे. मी मोठा होणार, आपलें कर्तव्य उत्तम करणार, पुरुषार्थी होणार, उद्योग अविरत करणार इ. इच्छा वा महत्त्वाकांक्षा मनुष्यामध्यें अवश्य पाहिजेत. परंतु ही इच्छा जर अनावर होऊन दुसऱ्याची स्त्री, वित्त, अब्रू व राष्ट्र यांचें हरण करण्याकडे ती प्रवृत्त होईल तर तिचें दमन केलेंच पाहिजे व तिला योग्य ध्येयाकडे लाविलें पाहिजे. दुसऱ्याचें वाईट चिंतणें, त्याच्या कार्यांत विघ्नें आणणें, त्याला लुबाडण्याचा यत्न करणें असला जो काम आहे तो वाईट समजावा व त्याचा त्याग करावा. परंतु सदाचार, सद्वर्तन, सद्भिरुचि, सदुद्योग यांचा हव्यास अवश्य असावा. स्वोन्नति म्हणजे तरी काय, तिची इच्छा म्हणजे काय हें ज्याचें त्यानेंच टरविलें पाहिजे. ज्या इच्छेच्या मागें लागल्यानें उद्योग व उत्साह हीं सारखीं वाढतील अशीच ती असावी. नाहीं तर अशक्य, अव्यवहार्य व असंभाव्य इच्छेच्या मागें लागण्यानें जन्माची वणवण व रुखरुख संपत नाहीं व चित्ताला समाधान नि शरीराला स्वास्थ्य असें कधींच मिळत नाहीं. तात्पर्य, ज्या कामाचें पर्यवसान शेवटीं समाज-सेवेंत व ईश्वरप्राप्तीमध्यें होईल असा कामविचार मनुष्यानें सदैव बाळगावा.

कामविकाराप्रमाणें क्रोधहि जगताच्या धारणपोषणास अवश्य आहे. क्रोध हा प्रतिकार करणारा आहे. आत्मसंरक्षणाचा अधिकार प्रत्येकास आहे. आपल्यावर दुसऱ्याकडून जेव्हां अनेक प्रकारचे आघात होतात, तेव्हां स्वसंरक्षणार्थ प्रतिकारपोषक क्रोध अवश्य पाहिजे. शांतीनें क्रोधाला जिंकावें हा संन्यासधर्म आहे. परंतु क्रोधानेंच क्रोधाचा प्रतिकार करणें हा व्यवहारधर्म आहे. एकसारखा राग किंवा संताप उपयोगी नाहीं. परंतु कोणीं

कांहीं केलें तरी अगदीं मोंडपणाची शांति हो उपयोगी नाहीं. मुक्तेश्वर म्हणतात—

व्यवहारी शांति नये कामा । परमार्थी क्रोध नाशी धर्मा ॥

महाभारतांतील वनपर्वामध्यें क्रोध व शांति यांचा विचार फार मार्मिकपणें केलेला आहे व शेवटीं सिद्धांत पुढीलप्रमाणें सांगितला आहे.

न श्रेयः सततं तेजः न नित्यं श्रेयसी क्षमा।

तेज म्हणजे क्रोध हा नेहमी श्रेयस्कर नाहीं. तशीच क्षमाहि सदैव श्रेयस्कर नाहीं. अति थंड मनुष्याची वायको उपटण्याचा यत्न दुष्ट करीत असतात (अथास्य दारान् इच्छन्ति) हा प्रत्यक्ष अनुभव आहे. पांडव वनवासाला गेले पण त्यांमध्यें भीम व द्रौपदी यांचींच अंतःकरणें क्रोधानें जळत होतीं. दुष्ट दुर्योधनाशीं धर्मानें जें शांत वर्तन केलें तें त्यांना मुळींच खपलें नाहीं. कवि मोरोपंत यांनीं या संवादावर सुंदर आर्या केल्या आहेत. द्रौपदी म्हणते—

सर्वत्र क्रोध जसा तैशी सर्वत्र न क्षमा साजे।
ते कैसे न वधावे तोडिति परघातदक्ष मासा जे ॥
येऊं द्या कोप मनीं एकिकडे संप्रति क्षमा राहो ॥
क्रोध असावा समयीं केवळ वश चित्त न क्षमेला हो ॥

भीम म्हणतो—तूं क्षत्रिय आहेस हें विसरलास ! !

काय म्हणो तुज आर्या ! ब्राह्मण वृत्तीस काय अनुसरसी ॥
भणगा परी न वस वनीं म्हण गा बापा मनुष्यदेवा हूं ।
दे बाहूंस यश रणीं खळखळ खळ रक्तपूर दे वाहूं ॥

ब्राह्मण वृत्तीचा स्वीकार करून भिकाऱ्यासारखे वनांत राहण्यांत काय अर्थ आहे ? या बाहूंना यश दे. त्यांचेकडून रक्ताचे पूर खळखळ वाहूं देत. दुष्टांनीं जर राज्य घेतलें, स्त्री पळविली तर तीं शांतीनें परत मिळत नसतात. त्वेष, संताप, चीड याच वृत्ति तेव्हां पाहिजेत. धर्मानें भीमाला त्या वेळीं जरी शांतीचा उपदेश केला तथापि शेवटीं भारतीय युद्ध अपरिहार्यच ठरलें ! ! !

भीम व द्रौपदी यांनीं धर्माशीं जें संभाषण केलें त्यावरून व पुढें कुंतीनें वेळोवेळीं जें प्रोत्साहन दिलें त्यावरूनहि क्षमाशांतीप्रमाणें काम व

क्रोध या विकारांची आवश्यकता आहे असें ठरतें.फक्त तारतम्यानें योग्य वेळीं योग्य स्थळीं उपयोग केला पाहिजे. समजा एक डॉक्टर मोठा तज्ञ आहे, त्याची रुग्णालय व तुरुंगावर नेमणूक झालेली आहे. हा जर अति रागीट असेल तर रोग्यांची सेवा त्याच्याकडून नीट होणार नाहीं व अतिशय थंड असेल तर कारागृहांतील कडक शिस्तीचें काम त्याजकडून होणार नाहीं. तुरुंगांत गेल्यावर त्यानें शंकराचा अवतारच धारण केला पाहिजे व रुग्णालयांत गेल्यावर पालनकर्त्या विष्णूची शांत वृत्ति धारण केली पाहिजे !

तुकारामासारखे संत सुद्धां म्हणतात कीं 'तुका ह्मणे राग। संत शिवों नेदिती आंगा' म्हणजे संत हे क्रोधाचा स्पर्शहि होऊं देत नाहींत. पण हेच तुकाराम दुसरीकडे असें म्हणतात कीं '**न यावा तो कैसा राग। खोटें मग देखोनी !**' ॥ म्हणजे असत्य, अन्याय्य व चीड आणण्याजोगें एखादें कृत्य आपल्या डोळ्यासमोर घडल्यास राग आलाच पाहिजे व तें कृत्य करणारास शासन झालेंच पाहिजे ! संत झाले म्हणून काय झालें ? सत्य, नीति, न्याय, दया व परोपकार अशा नीतिधर्माविरुद्ध जेथें वर्तन होत असेल तेथें प्रतिकार केला पाहिजे. समजा, आपण रेल्वेच्या प्रवासाला निघालों, तिकिटें आगाऊ पंचेचाळीस मिनिटें द्यावींत असा रेल्वेचा नियम असतांना खिडकीजवळ जातांच जर मास्तर 'अवकाश आहे' म्हणून दरडावूं लागला तर क्रोधानें प्रतिकार केला पाहिजे. तिकिटकलेक्टर, रेल्वेगार्ड यांना हिंदुस्थानांतील उतारूंशीं असभ्यपणें वागण्याची जणूं संवयच जडली आहे. तिकिटकलेक्टर दार कधींहि वेळेवर उघडत नाहीं किंवा अर्धवट उघडून माणसामाणसांमध्यें धक्काबुक्कीचा प्रसंग सदैव आणतो. तेव्हां तत्काळ त्याविरुद्ध वरिष्ठाकडे तक्रार केलीच पाहिजे. रेल्वेच्या डब्यांत वाजवीपेक्षां जास्त माणसें कोंबण्याची रेल्वेनोकरांना अगदीं पिढिजात संवयच जडली आहे. आपल्या डब्यांत तशी खेंचाखेंच असेल तर आपण गार्ड व स्टेशनमास्तर यांना कळविलें पाहिजे व त्यांनीं तें ऐकलें नाहीं तर वरहि कळविलें पाहिजे. मोटारचे एजंटहि पुष्कळ वेळां उतारूंना फार छळतात-ड्रायव्हर तर नेहमीं नियमापेक्षां माणसें अधिक वसवीत असतो. अशा सर्व

प्रसंगीं "जाऊं द्या कीं हो ! तो मूर्ख आहे ! मला काय त्याचें ! " असें न म्हणतां 'मी मनुष्य आहें ! ' 'मी उतारू आहें ! ' 'मला स्वाभिमानानें व योग्य रीतीनें प्रवास करावयाचा हक्क आहे' हें लक्षांत ठेवून क्रोधाचा आविर्भाव आणला पाहिजे व काम करून घेतलेंच पाहिजे !

हिंदुस्थानांतल्या लोकांना क्रोध येत नाहीं असें नाहीं; पण येतो तेव्हां तो वाजवीपेक्षां जास्त येतो व तोंडाच्या वल्गनेबरोवरच निघून जातो. प्रवासांत किंवा अन्यत्र हरठिकाणीं असे अपमानाचे प्रसंग येतात. त्या वेळीं संतापानें डोकें भडकूं न देतां, संतापांतही शांति ठेवून झालेल्या आगळिकीचें परिमार्जन कसें होईल इकडे लक्ष दिलें पाहिजे. भांड्यांत पाणी घालून तें खूप तापवलें म्हणजे त्याची वाफ होते. पण खालचा जाळ जर लगेच कमी केला तर पाणी थंड होण्यास उशीर लागत नाहीं. आमच्या रागाचा प्रकार या भांड्याप्रमाणें होतो ! वाष्पयंत्रामध्यें वाफ सारखी उत्पन्न होत असते व ती पुरवून पुरवून तिजकडून काम करवून घेण्यांत येतें; हेंच धोरण क्रोधाविषयीं ठेवलें पाहिजे. अगदीं थंडपणा व अगदीं डोकें भडकणें हीं टाकून योग्य ठिकाणीं आत्मसंरक्षणार्थ व हितार्थ रागावलें हें पाहिजेच.

रामकृष्ण परमहंसांनीं विवेकानंदांना सांगितलेली एक प्रसिद्ध गोष्ट आहे. तिचा सारांश असा. एका अरण्यांत एक मोठा भुजंग होता. भगवान् नारदांची स्वारी त्या अरण्यांत प्राप्त झाली असतां त्या सर्पानें त्यांना दंश करण्याकरतां पादस्पर्श केला. पण लगेच त्याला उपरति झाली ! तो मनुष्य वाणीनें करुणा भाकूं लागला. नारद म्हणाले, "मी येईपर्यंत कुणाला दंश करूं नकोस." सर्पानें ती आज्ञा शिरसावंद्य केली आणि दंश करणें व त्यावरोबर फूत्कार करणें हेंही सोडून दिलें. सर्पाच्या फूत्कारामुळें व दंशाच्या दराऱ्यांमुळें त्या वनांत पूर्वी कोणी फिरकत नसे, पण सर्पानें वरील दोन्ही गोष्टी सोडल्याबरोबर गोवारी मुलें त्या वनांत निर्भयतेनें संचार करूं लागलीं व कांहीं तर निर्भयपणें त्याच्या जवळहि गेलीं. कांहीं वात्रटांनीं आपल्या काठ्यांनीं त्या सर्पाला डिवचलें व ढोंसलेंहि ! एका दोघांनीं हें केल्यावर त्यांचें अनुकरण इतरांनीं केलें त्यामुळें सर्पाची पंचप्राणावर वेतली. नारद ऋषी पुन्हां आले व त्यांनीं आपला

शिष्य आसन्न-मरण झालेला पाहून "अरे तुला काय झालें!" असें विचारलें. तो वनभुजंग म्हणाला "महाराज! कांहीं झालें नाहीं पण आपली आज्ञा पाळल्यामुळें मी अर्धमेला झालों आहें." नारद म्हणाले, "अरे! तूं अगदींच वेअकली दिसतोस! तुला मीं डसूं नको असें म्हटलें खरें! पण तुला मारावयाला कोणी आला तर फूत्कारहि करूं नकोस असें म्हटलें होतें काय?" भुजंग म्हणाला "ठीक आहे तसेंच करतों." दुसरे दिवशीं नित्याप्रमाणें गोवारी मुलें व इतर लोक सर्पाला डिवचण्यास व ढोंसण्यास आले! पण त्या भुजंगानें एकदम फूत्कार टाकून फणा उभारल्या-बरोबर सर्वांची दाणादाण झाली. तात्पर्य हेंच कीं, फूत्काराप्रमाणें आत्म-संरक्षणार्थ क्रोधविकाराची जरूरी आहे. त्यांतील तारतम्य सोडलें तर सर्पाप्रमाणें मरण्याचा प्रसंग येईल.

योग्य ठिकाणीं जसें रागावलेंच पाहिजे तसेंच भलत्या ठिकाणीं रागाला दावलेंच पाहिजे. भारतीय युद्धप्रसंगीं दोहों पक्षांतले वीर युद्ध थांबल्यानंतर रात्रीं एकमेकांचा परामर्श घेत व शांतपणें गप्पागोष्टी करीत. पण युद्धाचा दुंदुभी गर्जू लागल्यानंतर सर्वांची शांतता उडून जाई व सर्वांना वीरश्रीचें स्फुरण चढे. भीष्म व अर्जुन हे एकमेकांसमोर युद्धाला उभे राहिले व दांतओठ खाऊन एकमेकांवर शस्त्रप्रहार करूं लागले. भीष्माचें शांतनव असें एक नांव होतें. पण त्या नांवांतील वृत्ति युद्धाच्या ठिकाणीं दिसेल काय? मोरोपंत म्हणतात:—

भीष्म म्हणे नर दावा पार्थ म्हणे तेंवि शांतनव दावा।
अन्यत्र शांत परि ते कोणीहि रणांत शांत न वदावा॥

रणांगणांत आलेले वीर हे अन्यत्र शांत असतील, क्षमाशील असतील पण रणांत युद्धाला उभे राहिल्यावर शांतता राहील काय? शांततेनें युद्ध होईल काय?

हिंदु समाजामध्यें शिवाशिव व विटाळ यांचें बंड फार मोठें आहे. आजच्या कालांत एखादा पूर्वास्पृश्य जवळून गेल्यास व चुकून स्पर्शहि झाल्यास "ए! म्हारड्या!" असें म्हणून त्याजवर रागावणें योग्य होईल काय? स्पर्शदोषास्तव या वर्गावर रागावणें आज अयोग्य नाहीं काय?

पुष्कळ वेळां मनुष्याच्या हातून संतापाच्या भरांत वाईट गोष्टी घडतात. म्हणून राग आला तर "सहसा विदधीत न क्रियाम् ! " एकदम कोणतीहि गोष्ट करूं नये असें म्हणतात तें खरें आहे. राग आला कीं दहा अंक मोजा असें म्हणतात, याचा अर्थहि थोडा दम धर, विचार कर असाच आहे. कामक्रोधादि विकार हे मनुष्यामध्यें उपजतच आहेत, त्यांना भलतीकडे न जाऊं देतां त्यांचें दमन केल्यास त्यांचा मित्रासारखा उपयोग होतो व तसें न केल्यास ते शत्रु होतात, हें वाचकांच्या ध्यानी येईल.

आतां लोभ, मोहादि अवशिष्ट विकारांचा विचार करूं—

तीर्थप्रसाद शेष-ग्रहणीं । लोभ अपार असावा ॥ —मुक्तेश्वर

परमेश्वराच्या तीर्थप्रसादाचा लोभ असावा, या वाक्याचा जरा व्यापक दृष्टीनें विचार केल्यास विद्येचा, शीलाचा, सत्कर्माचा, व सदुद्योगाचाहि लोभ असावा हें कोणीहि मान्य करील. '**लोभमूलानि पापानि**' व '**अति तृष्णा न कर्तव्या**' हीं दोन्हीं टोकें सोडून सामान्य सात्त्विक लोभ व तो सात्त्विक विषयावद्दल असावयासच पाहिजे. लोभ म्हणजे प्राप्त झालेल्या विषयाच्या संरक्षणाची बुद्धि. ही बुद्धि असल्यावाचून ममत्व उत्पन्न होत नाहीं व ममत्वाशिवाय संरक्षण नाहीं. मुलांचें संगोपन, संवर्धन हें ममत्वानेंच होतें. आज जगाला जें सौंदर्य आलेलें आहे तें ममत्वामुळेंच आलेलें आहे. ममत्वामुळें आसक्ति उत्पन्न होते व आसक्तीमुळेंच मनुष्य एखाद्या ध्येयावद्दल जिवापाड मेहनत करतो. तात्पर्य, संरक्षणाकरितां व संवर्धनाकरितां लोभ अत्यावश्यक असला तरी त्याचा अतिरेक झाला म्हणजे दुःखाशिवाय कांहीं फलप्राप्ति होत नाहीं. 'अति तेथें माती' ही म्हण प्रसिद्धच आहे.

अतिलोभ कसा वाईट असतो हें स्पष्ट कळण्याकरितां एकदोन उदाहरणें येथें देतों. प्रत्येक घरोघरीं सासवासुनांचे संबंध जे बिघडतात त्याचें कारण बव्हंशीं सासूची अधिकारलालसा हेंच असतें. कुणालाहि आपल्या हातांतील अधिकार देण्याचें जिवावर येतें. सासूला असें वाटतें कीं, सून कितीहि मोठी झाली, जाणती झाली, कर्ती झाली, तरी तिनें अगदीं आपल्या शब्दावाहेर जातां कामा नये. सुनेला असें वाटतें कीं, हा संसार माझा आहे, पोरेंबाळें माझींच आहेत, यासर्वां चें संगोपन करण्याची

आता मला पात्रताहि आली आहे. तेव्हां आतां जेथें तेथें सासुरवास कां ? जोंवर कळत नव्हतें व एकंदर आपली स्थिति काय आहे याचें ज्ञान नव्हतें, तोंवर सासूबाईंचें म्हणणें योग्य होतें व ऐकलेंहि.

वस्तुतः सूनबाई कर्ती झाल्यानंतर सासूनें सर्व कारभार तिजकडे सोंपवावयास नको काय ? सासूच्या गोंदऱ्या गंगेवर गेल्या तथापि तिचें लक्ष जर लोणचीं, सांडगे, पापड, मोरावळा व तुपाच्या वरण्या यांतून बाहेर निघतच नसेल तर सुनेनें ' सासूबाई स्वहित जोडा । मागील सर्व आशा सोडा । ' असें सांगणें अयोग्य होईल काय ?

मुलगा कर्ता झाला, मिळविता झाला, मोरोपंतांनीं केकावलींत म्हटल्याप्रमाणें ' सुविद्य, धन मेळवी ..... प्रपंचभार घे शिरीं ' असा झाल्यावर वृद्ध पित्यानें त्याला सर्वाधिकार द्यावयास नको काय ? मुलाच्या हातीं सर्व सत्ता गेल्यावर मला कोण विचारतो ? असें जर म्हाताऱ्याला वाटेल तर ती चुकी आहे. मुलगा आपलाच आहे, तो आपल्याला कांहींहि कमी पडूं देणार नाहीं, अशा आत्मप्रत्ययानेंच बापानें मुलाच्या स्वाधीन सर्व मिळकत केली पाहिजे. वृद्ध पिता असें जर न करील, किंवा वरील उदाहरणांतील सासू सुनेला अधिकारदान न करील तर या वृद्धाच्या अतिलोभामुळें घरामध्यें भांडणतंटे उत्पन्न होतील. घरांत, समाजांत व राष्ट्रा-राष्ट्रांतसुद्धां जें वैमनस्य उत्पन्न होतें तें या अतिलोभामुळेंच होय !

जित व जेते यांमध्येंहि अतिलोभमूलकच वैमनस्य उत्पन्न होतें. जेत्यांना असें वाटतें कीं, जित लोक हे निरंतरचे अगदीं मूर्ख राहणार व त्यांच्यावर यावच्चंद्रदिवाकरौ आपण राज्य करणार. जितांना असें वाटत असतें कीं जेत्यांच्या अंगीं कांहीं एका गुणसमुच्चयामुळें अधिक सामर्थ्य असलें तरी तें मिळवितां येण्याजोगें नाहीं, असें नाहीं. जेत्यांच्या गुणांचें अनुकरण जित लोक करीत असतात व विद्या, संघटना, शिस्त, चातुर्य इत्यादि गुणांनीं हळूहळू जेत्यांच्या बरोबरीचे ते होत असतात. जित व जेते यांमध्यें अंतर जोंवर फार असतें, तोंवर जितांना स्वतंत्र होण्याची इच्छाच होत नाहीं. परंतु हें अंतर जसजसें तुटूं लागतें, तसतसें जितांच्या मनामध्यें स्वातंत्र्याचें वारें संचार करूं लागतें. जेता आपल्या घमेंडींतच असतो, त्याला ही अंतर तुटण्याची क्रिया किती झपाट्यानें चालली आहे याची कल्पनाहि नसते.

जितांमध्यें स्वातंत्र्यलालसा उत्पन्न झाली कीं जेत्यांनीं हळूहळू सर्व अधिकाराचें दान त्यांना केलें पाहिजे. जर जेते लोक अधिकारमदानें व अतिलोभानें जितांना स्वायत्ततेचे हक्क देणार नाहींत तर त्यापासून उभयपक्षीं हानि होणार हें निःसंशय आहे. असा प्रसंग उत्पन्न झाल्यास जेत्यांनींच अतिलोभाचा त्याग करावा म्हणजे जगामध्यें शांतता उत्पन्न होते.

अतिलोभ न करतां व्यवहाराच्या धारणपोषणाला अवश्य तेवढा लोभ जसा पाहिजे तसाच मोहहि पाहिजे. सज्जनांचा मोह असावा. सुसंगतीचा मोह असावा. सत्कर्म कितीहि केलें तरी तृप्ति नसावी. हीं तत्त्वें सर्वसम्मत आहेत. अनेक सद्गुणसमुच्चयाला शील असें म्हणतात. या शीलाची जपणूक काळजीनें व्हावी असा वर मोरोपंतासारखे कवी देवाजवळ मागतात.

शीला जपो वहु जपति जैसे अत्र्याख्य साधु ते लिंगा ।

तसेंच:—

सुसंगति सदा घडो सुजन-वाक्य कानीं पडो ।
कळंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो ।

या केक धाप्रमाणें अनेक सात्त्विक लोभमोहांच्या मागण्या देवाजवळ भक्तांनीं मागितलेल्या आहेत.

षड्विकारांपैकीं आतां मद व मत्सर यांच्या विकाराकडे वळूं. मद म्हणजे मस्ती, गर्व, ताठा, अभिमान इत्यादि. गर्व किंवा ताठा नसावा, निरहंकार वृत्ति असावी हें खरें. पण ही वृत्ति सज्जनांशीं वागतांना असावी दुर्जनांशी असूं नये.

मुक्तेश्वर:—" **मद असावा दुर्जनाशीं** " म्हणजे जगांत दुर्जनाशीं वागतांना जशास तसें अवश्य वागलें पाहिजे. समाजाचें सूक्ष्म निरीक्षण केलें तर दुर्जनांची संख्या अधिक असणार! निदान सज्जनापेक्षां यांची संख्या कधींच कमी असत नाहीं ! ! व्यावहारिक मनुष्याचा व्यवहार अशा लोकांशींच सदैव येतो. त्या वेळीं जशास तसें वर्तन न केल्यास स्वत:लाच अपाय होण्याचा संभव असतो.

व्रजंति ते मूढधियः पराभवं। भवंति मायाविषु ये न मायिनः ।। किरात ,

मायाव्यांबरोबर जे मायावी होत नाहींत ते नाश पावतात. महाभारतामध्येंहि जशास तसें वागल्यानें अधर्म होत नाहीं, किंवा अनीति घडत नाही असें म्हटलें आहे.

यो यथा वर्तते यस्मिन् तस्मिनेवं प्रवर्तयन् ।
नाऽधर्मं समवाप्नोति न चाश्रेयश्च निंदति ।।—भारत

व्यवहारांत शेरास सवाशेर किंवा ठकास महाठक भेटला पाहिजे अमेंच आपण म्हणतों. दुर्जनाशीं जर आपण सौम्यपणानें वागलों व सौजन्य दाखवलें तर त्याचा दुरुपयोग होतो. मोरोपंत म्हणतात:—

म्हणती क्षमितां दुर्बळ न क्षमितां करिति दुर्जन प्रणति ।

दुर्जनाला क्षमा केली तर तो समर्थाला दुर्बल समजतो, व क्षमा न करतां चोप दिला तर लोटांगणें घालूं लागतो ! पृथ्विराज चव्हाण व महंमद घोरी यांच्यामध्यें जीं इतिहासप्रसिद्ध युद्धें झालीं त्या वेळीं पृथ्विराज हा जखम तसें न वागल्यामुळें उगाच मृत्यु पावला! पहिल्या दोन तीन युद्धांमध्यें महंमद घोरी हा पृथ्विराजाच्या हातांत सांपडला होता. त्या वेळीं त्या धूर्तानें पृथ्विराजाजवळ दयेची याचना केली व आपली सुटका करून घेतली! पण शेवटच्या युद्धांत जेव्हां पृथ्विराजच त्याच्या तावडींत सांपडला, तेव्हां त्यानें पृथ्विराजाची दया माया न करितां त्याचा (काफराचा) वध करून आपल्या कृतघ्नतेचें प्रदर्शन केलें! दुष्ट दुर्जनाशीं सरळपणानें वागल्यानें उपायापेक्षां अपायच होत असतो असा हा इतिहासाचा व व्यवहाराचाहि अनुभव आहे.

प्रत्यक्ष भगवंतांनींसुद्धां गीतेमध्यें,

ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।

म्हणजे मला जे भक्त ज्या भावानें शरण येत असतात. त्याच भावानें मी त्यांच्याशीं वागतों, किंवा अनुग्रह करतों, असें म्हटलें आहे. परमेश्वर अवतार धारण करून वेळोवेळीं दुष्टदंडण व सुष्टरक्षण करीत असतो. दुष्ट दुर्जनांचीं जीं अघोर कृत्यें घडलेलीं असतात त्यांचें फल देण्याकरितां दुष्टांना शिक्षाच करावी लागते आणि सज्जनांनीं जीं सत्कृत्यें केलेलीं असतात त्यांचीं फलें ईश्वर सज्जनांना दैवी संपत्तीच्या रूपानें देतो.* दैवी-संपत्ति ही मोक्षाला साधक व आसुरी संपत्ति ही मोक्षाला बाधक असते. दुष्टांच्या वाट्यास आसुरी संपत्ति, नरक व तापत्रय हीं येतात. आणि सज्जनांच्या वाट्यास दैवी संपत्ति, स्वर्ग व सुख हों येतात.

---

* टीप—ईश्वरविषयक विवेचन आमच्या गीता-प्रदीपांतील ज्ञान प्रदीपांत पाहा.

ईश्वराला दुष्टदंडण व सुष्टसंरक्षण हीं कर्मे करावीं लागतात. परंतु त्याच्या वर (वैषम्यनैर्घृण्ये न सापेक्षत्वात् । –ब्रह्मसूत्र.) वैषम्य व नैर्घृण्य हे दोष येत नाहींत. ईश्वराला जर जगांत जशास तसें (कर्माप्रमाणें फलें देणे वागावें लागतें तर त्याचेंच अनुकरण व्यावहारिक माणसानें करावयास नको काय ? तुकाराम महाराजांसारखे सर्वांभूतीं भगवद्भाव पाहणारे सत्पुरुष सुद्धां जशास तसें वागण्याचाच उपदेश करतात.

सर्प विंचू नारायण । परि ते वंदावे दुरून ॥

सर्प, विंचू हे सर्व नारायण समजून जर त्यांच्याजवळ जाऊन आपण त्यांना वंदन केलें तर सर्प, विंचू हे दंश केल्याशिवाय कधीहि राहणार नाहींत. पोपट पाहिल्याबरोबर त्याला वाळगण्याची इच्छा होते, पण विंचू पाहिल्याबरोबर आधीं पादत्राणाकडे लक्ष जातें; यांत कुणाचाच दोष नाहीं. अधमाशीं अधम–अनिच्छेनें कां होईना– व्हावें लागतें. विश्वामध्यें विश्वंभर असला तरी परपीडक मनुष्य हा आमचा वैरी आहे असें तुकारामच म्हणतात.

परपीडक तो आम्हां दावेदार। विश्वीं विश्वंभर म्हणसुनी ॥
तुका म्हणे सर्वांभूतीं नारायण । अवगुणीं दंडण गुणीं पूजा ॥

म्हणजे सर्वांभूतीं नारायण असला तरी अवगुणी व अन्यायी दुर्जनांची पूजा करणें अयोग्य होय. जेथें गुण असतील तेथें पूजा (गुणाः पूजास्थानं) व जेथें अवगुण असतील तेथें दंडण, हाच सिद्धांत वरोवर आहे. पायाला नाख झाला तर तो कापूर वांधून जाईल काय ? पूजा करीत असतां देव्हाऱ्यावर विंचू आला तर त्याच्यावर गंधपुष्प घालावयाचें कीं काय ?

पाया झाला नारु । तेथें बांधिला कापूरु ॥
तेथें बिभव्याचें काम । अधमाशीं तो अधम ।
देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।
तेथें पैंजाऱ्याचें काम । अधमाशीं तो अधम ।

निसर्गाचा स्वभावसुद्धां कसा आहे हें पाहा ! या धरणामातेवर आपण जेवढ्या जोरानें आघात करूं तेवढ्याच जोरानें उलट प्रत्याघात होत असतो. ध्वनीचा सुद्धां हाच नियम आहे. एखाद्या खोल व शांत जागीं जाऊन मोठ्यानें ध्वनी केल्यास लगेच तेथें प्रतिध्वनीहि तितक्याच मोठ्या प्रमाणांत

ऐकूं येतो. 'अरेस कां रे' 'अहोस कां हो' अशी प्रतिक्रिया आपण व्यवहारांत दररोज पाहातों. म्हणून मद हा जो विकार आहे त्याचा उपयोग दुर्जनांशीं जशास तसें वर्तन करण्याकडे अवश्य केला पाहिजे, त्यांत अधर्म नाहीं. श्रीसमर्थ म्हणतात:—

हुंड्यास हुंडा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ॥
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ।
धटासि आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ॥
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥

समर्थांच्या वरील वचनाप्रमाणें हाच सिद्धांत कीं जशास तसें भेटल्याखेरीज गत्यंतर नाहीं. समजा, एकादा लुच्चा चोर मनुष्य आपल्याकडे आला व चार दिवस अगदीं संभावितपणाचें वर्तन करून पुढें आपल्या द्रव्याची तो चौकशी करूं लागला, अशा वेळीं सत्यप्रतिज्ञ माणसांनीं त्या चोराला आपलें द्रव्य किती आहे, कोठें आहे हें सांगावें काय? एकादा कसाई पळून गेलेल्या गाईंचा शोध करीत जर आपल्याकडे आला व 'इकडे गाय गेली कां हो?' असें विचारूं लागला तर खरें बोलावें काय? भगवान् मनु अशा ठिकाणीं कांहीं बोलूं नये, नुसतें हूं! हूं! करावें असें सांगतो.

जानन्नपिहि मेधावी जडवल्लोक आचरेत् ॥

चोराच्या हातीं एकादा मनुष्य सांपडला तर त्याची सुटका करण्याकरितां पाहिजे त्या थापा द्याव्यात असें महाभारतांत म्हटलें आहे. सत्य बोलण्याचा नियम हा दुसऱ्या सत्यवादी मनुष्याशींच जेव्हां प्रसंग असेल तेव्हां योग्य आहे. पण लबाडाशीं प्रसंग असेल तेव्हां सापेक्ष वर्तनच करावयास पाहिजे.

हिंसा करूं नये हें तत्त्व अहिंसक समाजांत योग्य आहे. परंतु जेथें हिंसकांचाच बाजार भरलेला आहे, व जेथें आततायीपणाला महत्त्व आलें आहे, तेथें अहिंसेचा नियम कसा चालेल? विष देणारा, घर पेटवणारा, शस्त्र घेऊन मारण्यास येणारा, घर, स्त्री व वित्त लुबाडणारा, आततायी जर चालून आला तर

आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ॥—महाभारत

केवळ प्रतिकार न करतां वध करावा याच शास्त्राचा अवलंब केला पाहिजे.

दुर्जनाशी वागतांना मद व मत्सर या दोन्ही वृत्ति अवश्य आहेत. मत्सर, स्पर्धा, ईर्ष्या, असूया इत्यादि वृत्ति समाजाच्या धारण पोषणाला अनवश्यक आहेत असें म्हणतां येणार नाहीं. तारतम्यानें योग्य उपयोग करून घेतला पाहिजे, हेंच या विषयाचें सार आहे.

प्रस्तुत विषयाशीं संबद्ध असा नवीन प्रसिद्ध शब्दप्रयोग आपणापुढें आहे. त्याचा विचार करून हें प्रकरण संपवितों.

'अनत्याचार' हा शब्द आज सर्व प्रसिद्धच आहे. अनत्याचार म्हणजे अत्याचाराचा अभाव व अत्याचार म्हणजे अति-आचार जास्त आचार (वागणूक) असा अर्थ आहे. आचार म्हणजे वर्तन किंवा वागणूक, अनाचार म्हणजे आचाराचा अभाव अर्थात् मालिन्य असें म्हणतां येईल.

अनाचारस्तु मालिन्यं । अत्याचारस्तु मूर्खता ॥

हीं अगदी दोन टोकें आहेत. हीं सोडून मनुष्यानें योग्याचार म्हणजे जशास तसें वागावें. समजा शरीराला कांहीं रोग जडला आहे त्याकडे अगदीं दुर्लक्ष करणें हा अनाचार होय व व्याधिग्रस्त शरीर ठेवून काय करावयाचें अशा विचारानें आत्महत्या करावयास सिद्ध होणें म्हणजे अत्याचार होय. यास्तव जपून पथ्यानें वागणें व कांहीं तरी औषधोपचार करीत ईश्वरावर भरंवसा ठेवून राहाणें हाच योग्याचार होय. आत्महत्या करणें हा अत्याचारच आहे असें वर म्हटलेंच आहे. परंतु या ठिकाणीं अनत्याचारी वर्तणूक केल्यास म्हणजे आत्महत्या न केल्यास योग्य वर्तन झालें असें मात्र नव्हे. अनत्याचार म्हणजे अत्याचाराचा अभाव हा शास्त्रीय अर्थ झाला. परंतु त्या अभावांतून योग्याचाराचा भाव उत्पन्न होत नाहीं. लहान मुलाशीं ममतेनें वागणें हा योग्याचार होय. मुलानें अति खोड्या केल्या किंवा कसला तरी त्रासदायक हट्ट धरिला तर त्याला दटावणें, चूप बैस म्हणणें हा अत्याचार नव्हे मुलानें कांहीं केलें तरी सहन करणें हा अनाचारच ठरेल. देवाच्या नैवेद्याकरितां ठेवलेला गूळ मुलानें नैवेद्याआधीं खाल्ला म्हणून दोन थपडा देणें हा अत्याचार होय. पण मुलगा गूळ चोरून खाऊं लागला व खोटें बोलूं लागला तर दोन थपडा देणें हा अत्याचार ठरत नाहीं. उलट तसें न करणें हाच अनाचार ठरेल.

पाय किंवा हात मुरगळला किंवा अंगावर पडून शरीर ठेंचलें गेलें तर

तेथील ठणक कमी व्हावी म्हणून विवा घातला तर तो उतत नाही. जेथें दुःख असेल त्या अवयवावर विवा घालणें हा अत्याचार नव्हे; कारण तेथें तो उतत नाहीं. पण शरीराच्या ज्या भागाला कसलेंच दुःख झालेलें नाहीं तेथें विवा घालणें हा अत्याचार होय !

विवा घालून तो उतला कीं अत्याचार म्हणतां येईल आणि न उतला तर योग्याचारच म्हटला पाहिजे. अत्याचार व अनत्याचार या शब्दांची अशी मीमांसा आहे. अनत्याचार म्हणजे अप्रतिकार असा अर्थ हल्लीं रूढ होऊं लागला आहे, पण तो व्यवहार्य नाहीं.

सहनं सर्वदुःखानां अप्रतिकारपूर्वकम् ।

हें तितिक्षेचें लक्षण मुमुक्षूला व संन्याशाला श्रीमत् आचार्यानीं सांगितलेलें आहे. पण मुमुक्षूपेक्षां जे अन्य लोक आहेत त्यांना हें तितिक्षेचें शिक्षण काय कामाचें ? त्यांना प्रतिकारक्षमताच पाहिजे.

अत्याचार म्हणजे वाजवीपेक्षां अधिक आचार करूं नये हें वरोवर होईल, पण योग्याचार ऊर्फ योग्य प्रतिकार करूं नये हें तत्त्व कुठलें ? हिंसा म्हणजे मारणें, ठार करणें असें लोक समजतात. अहिंसा म्हणजे ठार न करणें हा अर्थ ठीक आहे. दुष्ट अंगावर चालून आल्यावर त्याची हिंसा करूं नये म्हणजे त्याला ठार मारूं नये हें क्षणभर मान्य केलें तरी **जीव न जाईल अशा बेतानें** त्याला यथेच्छ चोपणें हा **आचार हिंसेमध्यें येईल काय?** व तो अत्याचार होईल काय ? पाण्यांत वुडणें हा अत्याचार ठरला तर पाण्यांत पाऊलहि न टाकणें हा अनाचार ठरेल. पग पाण्यांत प्रवेश करून न बुडतां तरणें म्हणजे पोहणें हा योग्याचार नव्हे काय ?

अहिंसा शब्दाचा खोल अर्थ पाहिला तर शरीरानें, मनानें, वाणीनें कसलीहि हिंसा न करणें, कोणाचेंहि वाईट न चिंतणें, कुणावद्दलहि कुशब्द न वोलणें इतका तो व्यापक आहे. हा वेदांतशास्त्रांतील अर्थ फक्त ज्ञान्यांना व संन्याशांना लागूं होण्याजोगा आहे. अहिंसा धारण करणें किंवा अहिंसा वृत्ति ठेवणें म्हणजे अप्रतिकारी बनणें असें मात्र नव्हे. प्रतिकारामध्यें संरक्षण आहे. शरीर हें प्रतिकारक्षम असलें तर निरनिराळ्या ऋतूंतील हवा-

मानाचे आघात तें सहन करतें. म्हणजे आधीं प्रतिकार व मागून सहनशीलता असा क्रम लागतो. समाजाचें किंवा राष्ट्राचें संरक्षण हें प्रतिकारानेंच होतें. निःशस्त्र राष्ट्रानें अगतिक म्हणून निःशस्त्र प्रतिकार (Passive Resistance) केला पाहिजे. पण हा आपत्धर्म आहे. कोणतेंहि राष्ट्र जर सदैव निःशस्त्र प्रतिकारीच राहील तर त्या राष्ट्रांतील लोकांनीं संन्यासच घेतला पाहिजे. वाघाच्या शिकारीची तयारी करावी तेव्हां ससा सांपडतो असें म्हणतात. या म्हणीप्रमाणें समाजानें जयिष्णु नत्तीच धरावयास पाहिजे. चढाई नाहीं तर नाहीं, निदान प्रतिकारक्षमता तरी त्यामध्यें अवश्य पाहिजे. तात्पर्य, अप्रतिकार हा अनाचार होईल कीं काय याचा विचार केला पाहिजे.

कामक्रोधादि विकारांचा तारतम्यानें उपयोग केल्यास ते रिपु नसून मित्रच आहेत. देहधारीला त्यांचा सर्वथैव त्याग अशक्य आहे. यास्तव 'तस्मात् एतत्त्रयं त्यजेत्' या पाठाऐवजीं 'तस्मात् एतत्त्रयं जयेत्' हा पाठ असावा कीं काय? असा संशय येतो. श्रीकृष्णानें कर्मयोग शास्त्राची गीतेमध्यें जी चिकित्सा केलेली आहे त्या चिकित्सेला वरील पाठच पोषक आहे.

प्रकरण १६ वें. : :

ईश्वरप्राप्तीचा राजमार्ग

जगांतील सर्व धर्मांमध्यें ईश्वराच्या भक्तीची कल्पना या ना त्या स्वरूपांत आहे व ती असण्याचें कारण प्रत्येक धर्मांत ईश्वरविषयक कांहीं कल्पना आहेत हें होय! मनुष्य समाजाच्या निरनिराळ्या अवस्था दिसतात. कोणत्याहि अवस्थेमध्यें मनुष्याचें लक्ष सहज निसर्गाकडेच वेधतें. विजांचा लखलखाट, पावसाचे काळेकुट्ट ढग, मुसळधार पाऊस, सूर्यचंद्रांचे उदयास्त अशा या नित्याच्या चमत्कारांमुळें मनुष्याला प्रथम सहज असें वाटतें कीं या सर्वांचा नियंता कोणी तरी असला पाहिजे

अर्थात् एक सर्वनियामक शक्ति कल्पून तिच्या संबंधानें आदर व्यक्त करणे व आपणास त्रास न होईल या हेतूनें तिची करुणा भाकणें हें ओघानेंच येतें.

कोणत्याहि काळीं मनुष्य हा सापेक्ष विचारच करतो. समाजाच्या प्राथमिक स्थितींत मनुष्यामध्यें जो आडदांड, राकट, क्रूर व शरीरानें धिप्पाड असे तोच मोठा समजला जाई. तेव्हां मोठ्यांत मोठा जो मनुष्य त्याच्यापेक्षां, किती तरी मोठा ईश्वर असला पाहिजे असा तर्क सहजच होई. म्हणून प्राथमिक स्थितीमध्यें ईश्वर हा भयंकर क्रूर आहे, तो जुलुमी आहे, तो रागीट आहे, तो फार मोठा आहे अशा समजुती होत्या. कारण त्या काळांत ' बळी तो कान पिळी ' असाच न्याय असे. तो न्याय मनुष्यानें देवावर लादला इतकेंच ! (अद्यापहि तो न्याय नाहीं असें नाहीं!)

ऋग्वेद संहितेमध्यें केवळ स्तुतिपर अशीं अनेक सूक्तें आहेत. इंद्र, वरुण, मातरिश्वा, सविता, सूर्य इत्यादि देवतांपुढें त्या सूक्तकर्त्यांनीं सारखी करुणा भाकलेली आहे. हे देव हो, "तुम्ही असुरांचा नाश करा, आमच्या गायी, बैल व पशु हे ते पळवितात त्यांना अडथळा करा, हिमप्रलय व जळप्रलय अशा आपत्ति आमचेवर आणूं नका." अशा प्रकारच्या प्रार्थना वेदमंत्रांत आहेत. वेदकालीन भक्ति म्हणजे यज्ञयाग होत. अग्नि हा सर्व देवांचें मुख, तेव्हां अग्नि पेटवून तेथें सर्व देवांना बोलावून त्यांना कांहीं हविर्भाग देऊन तुष्ट करणें, एवढाच भक्तीचा मार्ग त्या काळीं होता. इतर धर्मांतहि ईश्वरानें आपल्याला त्रास देऊं नये, आपल्या शत्रूचा संहार करावा म्हणून अत्यंत प्रिय पदार्थ त्याला अर्पण करण्याची व बळि देण्याची चालहि पडलेली आहे.

आपल्याकडील मीमांसक हे मंत्रमय देवता मानतात. देव हे आकृति विशेषानें म्हणजे सगुण विग्रहानें युक्त असतात, असें मीमांसक मंत्रांवरूनच ठरवितात. आदित्य मंडळांत तेज आहे, वायुमंडळांत शक्ति आहे, या वैदिक प्रयोगांवरून मीमांसकांनीं त्या देवता शरीरधारी असाव्यात असें कल्पिलेलें आहे. पण त्याउलट इंद्र हा शब्द व्यक्तिवाचक नसून अधिकारवाचक आहे असें वेदांती समजतात. **इंद्र म्हणजे स्थानविशेषाच्या निमित्तामुळें असलेला एक अधिकारी होय!** त्या स्थानावर जोंवर तो अधिकारी आहे तोंवरच तो इंद्र ! स्थानभ्रष्ट झाल्यावर इंद्र नव्हे. उदाहरणार्थ, सेनापति

हा शब्द जसा अधिकारवाचक आहे तसाच इंद्र शब्दहि आहे. (शांकर भाष्य १–२–२८)

इंद्रो नाम कश्चित् विग्रहवान् देवता विशेषः असें मीमांसकांचें म्हणणें. इंद्र ही बळाची देवता आहे. अपाचा अधिपति म्हणजे वरुण होय; परमात्मा म्हणजे वैश्वानर होय; जठराग्नि म्हणजे विश्वात्मा होय; इत्यादि देवता-विषयक मीमांसकांचे विचार पाहिले म्हणजे असें दिसतें कीं त्यांना या निसर्गाच्या शक्तीचें यथातथ्य आकलन झालेलें नव्हतें. (त्या शक्तीचें आकलन अद्यापि जगांत कोणाला झालें आहे असें नाहीं) तथापि कांहीं शक्ति आहेत असें त्यांनीं ठरविलें व त्यांची कृपा व्हावी म्हणून यज्ञयागादि कृत्यांचा त्यांनीं पुरस्कार केला.

ईश्वर हा करुणामय आहे, दयाघन आहे, तो दीनोद्धारक आहे या कल्पना मनुष्यसमाजाच्या वाढीबरोबरच आलेल्या दिसतात. मनुष्य समाजाची रानटी अवस्था जाऊन त्याला जशी नागर अवस्था येंत चालली तशा प्रेम, कारुण्य, वात्सल्य इत्यादि वृत्ति समाजांत आल्या व इतर सुसंस्कृतता आली. अर्थात् त्या सर्व गुणांचा आरोप ईश्वरावर केला गेला व ईश्वराचें स्वरूप पूर्वापेक्षां बदललें गेलें.

ईश्वर निर्गुण मानावा ही कल्पना बऱ्याच उशीरानें उद्भूत झाली त्यापूर्वी ईश्वर सगुणच आहे, तो मोठ्यांत मोठा आहे, तो मनुष्यासारखा आहे, त्यालाहि हस्तादि अवयव, बुद्ध्यादि इंद्रियें आहेत असें मानून तत्कालीन मनुष्य समाजांतील जो मोठ्यांत मोठा मनुष्य असे, त्याला अवतार मानण्यापर्यन्त कल्पनेचा विकास झाला. मनुष्यांना ईश्वर पाहिजे होता व तो आहे असें वाटत होतें, पण तो त्यांना दिसत नव्हता. म्हणून राम व कृष्ण इत्यादि ऐतिहासिक वीर पुरुषांना अवतार मानण्यांत आलें. महावीर जिन व शाक्यमुनि बौद्ध हीं त्या कालांतील मोठीं माणसें, पण तेहि अवतार समजले गेले व त्या अवतारांनीं धर्मस्थापनाहि केली. अवतारप्रणित धर्म, प्रेषितकथित धर्म हे यामुळेंच पुढें उदयास आले, त्यांपूर्वी फक्त ईश्वरप्रणित धर्म म्हणजे वैदिक धर्मच होता.

निसर्गाचे व्यापार सुसंबद्धपणें चालविणारी एक शक्ति आहे, ती मनुष्यरूपानें कधींकधीं येते, एवढी कल्पना समाजानें बळकट धरल्यानंतर

स्वाभाविकच ईश्वराच्या सगुणत्वाची कल्पना पसंत पडूं लागली. या सगुण कल्पनेंतूनच मूर्तिपूजा निघाली. मूर्तिपूजेचा अतिरेक मध्ययुगांत हिंदुस्थानांतच झाला असें नसून तो त्या कालीं सर्वत्र झालेला होता म्हणूनच क्रियेला प्रतिक्रिया या न्यायानें मूर्तीच्या विध्वंसाचा सपाटा चालविला गेला. ईश्वर सगुण आहे, पण दिसत नाहीं. मग सोयीचा देव म्हणजे काष्ठ, धातु व पाषाण यांच्या प्रतिमा पूजणें हा होय ! सगुण कल्पनेमुळेंच नवविधा भक्ति आली व मध्य कालामध्यें देव, देवळें, मूर्ति, पूजा, अर्चा यांची मोठी गर्दी उडाली. ईश्वराला सगुण मानणें हें समाजाला प्रथम सोयीचें वाटलें. पण पुढें त्यामुळें ईश्वरहि अनेक होऊं लागले, त्यांचीं स्वरूपेंहि भिन्नभिन्न होऊं लागलीं त्याप्रमाणें अनेक सांप्रदाय उत्पन्न झाले व सांप्रदायांतील विग्रहामुळें देवाच्या नांवावर समाजांत फारच अस्वस्थता माजली !

सामान्य माणसांना ईश्वर सगुण आहे असें मानणें सोयीचें वाटलें. पण बुद्धिमंतांना ईश्वराच्या सगुणत्वांतील दोष उपनिषद्कालींच दिसूं लागले. ईश्वर हा सगुण मानला तर तो लहानांत लहान मानावा कां मोठ्यांत मोठा मानावा ? त्याचे अवयव मनुष्याइतकेच मानावेत कां अधिक मानावेत, अशाहि शंका आल्या असतीलच. शेवटीं या बुद्धिमंतांना ईश्वर निर्गुण आहे, निराकार आहे, तो सर्वत्र आहे, सारखा आहे, सम आहे असें सांगणें हेंच सयुक्तिक वाटलें. तात्पर्य, ईश्वराच्या कल्पनेचा उदय मनुष्यबुद्धींतूनच झाला, प्रथम तो क्रूर व जुलुमी होता. नंतर तो करुणा-घन झाला. प्रथम तो सगुण असल्यामुळें अवताररूपानें येत असे पण पुढें वेदांत्यांनीं ईश्वराला निर्गुण निराकार ठरविलें असा हा येथवर केलेल्या विवेचनाचा निष्कर्ष आहे.

वेदकालांतील भक्तीचा प्रकार यज्ञ हा होता, पुढें तो बदलला व त्याच्या ठिकाणीं देव, देवळें व मूर्ति येऊन त्यांची भक्ति सुरूं झाली. म्हणजे मंत्रकाल व तंत्रकाल या कालांतील ईश्वरप्राप्तीचे हे मार्ग होते. आतां या यंत्रकालांत तेच मार्ग चोखाळावयाचे कां परिस्थितिसापेक्ष भक्तीचा नवा सांप्रदाय सुरूं करावयाचा असा आपणांपुढें प्रश्न आहे.

कोणत्याहि काळीं जशी भूक उत्पन्न होते त्याप्रमाणें विचाररूपी अन्नाचा पुरवठा केला जातो, परंतु एकच अन्न कोणत्याहि काळीं पुष्टि देतें

असें मात्र नव्हे. तोच न्याय येथेंहि आहे. यज्ञयागादिकांनीं एका काळीं फार मोठें काम केलें. पण आज ते यज्ञ तितके उपयोगी वाटत नाहींत. मूर्ति व देवळें यांनींहि आपल्या कालीं मोठें काम केलें पण यज्ञमार्गाप्रमाणें हाहि मार्ग आज उपयोगी नाहीं. यज्ञांतील दोष, यज्ञांतील हत्या, यज्ञांतील अपूर्व हीं जशीं बुद्धीला पटत नाहींत त्याचप्रमाणें दगडांत देव आहे, तो सर्व समर्थ आहे, तो पाहिजे तें करतो, हेंहि सर्व झूट आहे असें इतिहासानें आतां सिद्ध केलें आहे. जागृत स्थानांतील हजारो मूर्तीचे विध्वंस झाले, त्या वेळीं एकाहि मूर्तीनें सामर्थ्य अगर चमत्कार दाखविला नाहीं, उलट ते सर्व देव विध्वंसकांना शरण गेले. यावरून दगडांत देव नाहीं म्हणजे सामर्थ्य नाहीं; मूर्तीमध्यें अद्‌भुतपणा नाहीं हे अनुभवास आलें. कोणाचें तरी नांव घ्यावयास पाहिजे व कांहीं तरी पूजिलें पाहिजे असा जो मनुष्याचा स्वभाव तदनुरूप त्या काळीं तें योग्य होतें, पण आज मात्र हा मार्ग उपयुक्त नाहीं हें खास !

अवतारावद्दलहि पुष्कळ विचारांतीं व शोधाअंतीं असें वाटूं लागलें कीं हा अवतार एकटा कांहीं करूं शकत नाहीं. या अवतारांची पार्श्वभूमिका लक्षांत घेतली तर असें दिसतें कीं पुष्कळ सामान्य माणसांचे श्रम अवतारकार्यास सहाय्यभूत झाले म्हणूनच त्यांनीं तीं मोठीं कार्यें केलीं. श्रीशिवाजी महाराज यांच्या संबंधाच्या संशोधनावरून तत्कालीन परिस्थितीचें जें ज्ञान होतें व त्यावरून त्या कालांतील लोकांची जी मन:स्थिति, उत्कटता व त्यागादि वृत्ति दिसून येते ती पाहिली म्हणजे शिवछत्रपतीप्रमाणेंच इतर सामान्य माणसांच्या कर्तृत्वाबद्दलहि आदर उत्पन्न होतो. ही सर्व घटना घडविणारे जर हे सामान्य लोक नसते तर शिवछत्रपतींना अपेशच आलें असतें असें निश्चित वाटतें. याप्रमाणेंच राम, कृष्ण, महावीर, बुद्ध इत्यादि अवतारांच्या पार्श्वभूमिकेचा शोध केला तर हेंच दिसेल कीं हे अवतारी पुरुष तत्कालीन समाजांत मोठे होते खरे, पण त्यांच्या कार्याला इतर पुष्कळांच्या श्रमांचें साहय्य झालें आहे, यांत शंका नाहीं. एवंच यज्ञ, अवतारपूजा, विभूतिपूजा व मूर्तिपूजा हे सर्व ईश्वरप्राप्तीचे प्रयोग आजवर झाले. त्या प्रयोगांनीं आपापल्या कालांत अंशत: कार्य केलें. प्रस्तुत

कालाला उचित असा ईश्वरसेवेचा मार्ग शोधलाच पाहिजे म्हणून प्रचलित स्थितीचा थोडा विचार करूं.

सांप्रत सांख्य, योग, भक्ति, कर्म, ज्ञान असे ईश्वराच्या प्राप्तीचे निरनिराळे मार्ग समजले जातात. सांख्यशास्त्र हें हल्लीं शिल्लक राहिलें नसून पातंजल योगशास्त्राचे अभ्यासीहि क्वचितच आढळतात. अर्थात् कर्म-मार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग हेच ईश्वराच्या प्राप्तीचे उपाय म्हणून शिल्लक राहातात. त्यांतल्या त्यांत आजच्या या कालांत भक्तिमार्ग हा एकच ईश्वरप्राप्तीचा राजमार्ग म्हणून प्रसिद्ध आहे.

आजपर्यंत मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांनीं पुष्कळ यत्न करून पूर्णपणें न सोडविलेला असा जर कोणता वादग्रस्त प्रश्न असेल तर तो ईश्वराच्या अस्तित्वाचा होय! ईश्वर आहे असें मानणारे ते आस्तिक व तो नाहीं असें मानणारे ते नास्तिक अशी समजूत आहे. यासंबंधानें मोठमोठे ग्रंथ झाले असून ते आस्तिकदर्शनें व नास्तिकदर्शनें या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. प्रत्येक दर्शनामध्यें सेश्वरवादी व निरीश्वरवादी असे भेद असून मीमांसक तर पक्के निरीश्वरवादी दिसतात. सांख्यांमध्येंहि निरीश्वर सांख्य आहेत. तात्पर्य, आज जशीं सुसंस्कृत व विचारी माणसांमध्यें ईश्वराबद्दल दोन मतें दिसतात तशींच तीं प्राचीन काळींहि होतीं. आस्तिकांचा वर्ग जसा जुना आहे तसाच नास्तिकांचाहि जुना आहे. अर्थात् आजच लोक फार नास्तिक होऊं लागले व धर्म बुडत चालला अशी जी हाकाटी ऐकूं येते, ती व्यर्थ होय! ईश्वराची सिद्धि प्रत्यक्ष जोंवर करतां येत नाहीं तोंवर आस्तिक व नास्तिक हे भेद राहाणें अपरिहार्य आहे.

ईश्वर एक आहे कां ते अनेक आहेत असाहि एक प्रश्न आहे. ईश्वर अनेक मानणें हें फार गैरसोयीचें आहे. कारण अनेक ईश्वर मानल्यास त्यां-मध्यें अधिकाराबद्दल परस्पर तंटेबखेडे होणें संभवनीय आहे. कारण एक ईश्वर दुसऱ्या ईश्वराच्या अधिकाराचें अतिक्रमण करूं लागल्यास त्यामुळें विग्रह उत्पन्न होईल. आणि असे जर ईश्वरा-ईश्वरांत सारखे तंटे अगर लढाया उत्पन्न झाल्या तर जगांत अव्यवस्था व अनवस्था माजेल व जगांत राहणाऱ्या लोकांना मुळींच सुख होणार नाहीं. यास्तव ईश्वर एकच आहे असें मानणें योग्य आहे व तेंच सयुक्तिक आहे.

ईश्वर निर्गुण आहे की सगुण आहे याचा निश्चय अद्याप झालेला नाहीं. ईश्वर जर निर्गुण, निराकार, निर्वयव, अचक्षुपाणिपाद असा असेल तर त्याची भक्ति कशी करावयाची हा मोठा प्रश्न आहे. किंबहुना अशा ईश्वराची भक्ति मुळीं अशक्यच आहे. भक्ति करण्याला कांहीं तरी सगुणता पाहिजे आणि त्या सगुणतेच्या ठिकाणीं सत्यसंकल्प, सकलैश्वर्यसंपन्नता, दया, भक्तवात्सल्य, औदार्य, पावित्र्य, कारुण्य, पूज्यता, सुन्दरता इत्यादि सर्व गुणांचा संग्रह असावयास पाहिजे. ईश्वराचें अशा प्रकारचें स्वरूप असल्याशिवाय त्याची भक्ति मुळीच होणें शक्य नाहीं. तो अनादि, अनंत, सर्वकर्तृ, सर्वज्ञ, स्वतंत्र, पूर्णचैतन्यरूप असा आहे, एवढें म्हटल्यानेंहि कार्यभाग होत नाहीं. मानवी बुद्धीला ईश्वराचें स्वरूप कांहीं तरी आकलन होण्याजोगें असेल तरच तेथें भक्ति संभवते. ज्या ठिकाणीं बुद्धि चालतच नाहीं किंवा चालूनहि विषयाचा निश्चय करूं शकत नाही, अशा ठिकाणीं 'अचिंत्याः खलु ये भावाः न तांस्तर्केण चिंतयेत्' हाच कोटिक्रम वरोबर आहे.

श्रीमत् शंकराचार्य यांचें परापूजा या नांवाचें एक स्तोत्र आहे. त्यांत पुढील आशयाचे श्लोक आहेत.

" जो पूर्ण आहे त्याचें आवाहन कसें करावयाचें ? जो सर्वाधार आहे त्याला आसन कोणतें द्यायचें ? जो शुद्ध, स्वच्छ व निर्मल आहे त्याला अर्घ्य, आचमन व स्नान यांची जरूरी तरी काय ? जो नित्य तृप्त आहे त्याला नैवेद्य कशाला दाखवावयाचा ? जो अनंत आहे, त्याला प्रदक्षणा घालणें शक्य आहे काय ? जो स्वयंप्रकाश आहे, त्याला नीरांजन कां ओंवाळावयाचें ? तात्पर्य, असा जो पूर्ण, परिपूर्ण, सर्वव्यापी व सर्वांतर्यामी आहे, त्याची पूजाअर्चा किंवा इतर कसलीहि भक्ति केवळ चिंतनावाचून मुळींच शक्य नाहीं. "

ईश्वराच्या निर्गुण स्वरूपानें त्याची भक्ति होत नाहीं आणि माणसांचा स्वभाव तर असा कीं, ईश्वर म्हणन कांहीं तरी मानून त्याची भक्ति करावयाची !! या स्वभावामुळें अनेक धर्मांत व अनेक पंथांत ईश्वराचीं सगुण स्वरूपें पाहिजे तितकीं व पाहिजे तशीं मानलेलीं आहेत. कोणी आपल्या ईश्वराला आकाशांत कायमचा बसवितो व 'आकाशांतला बाप.

असें म्हणून त्याची प्रार्थना करतो. कोणी आपल्या ईश्वराला सात समुद्रांपलीकडे क्षीरसमुद्रांत झोंपावयास सांगतो; आणि जगांत कांहीं गडबड झाली तरच त्या देवाला उठावयाची आज्ञा देतो. कुणाचा ईश्वर आठवड्यांतून एक दिवस विश्रांति घेतो, तर कोणाचा ईश्वर एका विशिष्ट वेळीं सर्वांच्या पापपुण्याचा झाडा घेतो ! कुणी ईश्वर हा मोठ्यांत मोठा, अत्यंत कडक अंमल गाजविणारा असें समजतो व त्याच्यापुढें दास व गुलाम वृत्तीनें विनम्र होऊन त्याची करुणा भाकतो. कोणी त्या ईश्वराला आपल्यासारखाच मनुष्य समजून त्याच्याशीं लडिवाळपणानें वागतो. तत्त्वतः व युक्तितः ईश्वराला हें अशा प्रकारचें सगुण समजणें चुकीचेंच असून अव्यक्त अशा परमेश्वराला व्यक्त म्हणजे सगुण मानणें हा मूर्खपणाच होय, असें भगवान् गीतेंत म्हणतात.

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः।
परं भावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥ अ. ७ श्लो. २४

' मी अव्यक्त असतां मला मूर्ख लोक मनुष्यदेहधारी मानतात. परंतु तें खरें नसून माझें अव्यक्त स्वरूपच सत्य होय. ' असा या श्लोकाचा आशय आहे. त्यावरून निर्गुण ईश्वराला सगुण मानणें, अव्यक्ताला व्यक्त समजणें, ज्याच्या ठिकाणीं कोणताहि मनुष्यधर्म नाहीं त्याजवर त्या धर्माचा आरोप करणें हें सर्व वेडेपणाचें आहे यांत संशय नाहीं.

ईश्वराला सगुण समजणें हें कसें अज्ञान आहे हें श्रीज्ञानेश्वरांच्याच शब्दांत सांगतों--

नातरी ज्वरें विटाळलें मुख । तें दुधातें म्हणे कडू विख ।
तेविं अमानुष मानुष । मानिती मातें । ज्ञा. अ. ९--१४२
पै स्थूल दृष्टी देखती मातें । तेंचि न देखणें जाण निरुतें ।
जैसें स्वप्नींचेनि अमृतें । अमर नोहिजे ॥ ज्ञा. अ. ९--१४४

श्रीज्ञानेश्वर म्हणतात कीं, रोगग्रस्त मनुष्य जसा दुधाला कडू समजतो तशींच अडाणी माणसें मला मनुष्यदेहधारी समजतात. हे स्थूल दृष्टीचे लोक मला जसें समजतात तसा मी नाहीं.

ईश्वराला सगुण समजणें हें जसें वेडेपणाचें आहे, तसेंच अनेक देव मानून आज याची तर उद्यां त्याची पूजा करणें, आज याला भजणें तर उद्यां

त्याला भजणें, हेंहि खुळेपणाचें आहे. मनुष्य स्वत:च्या आवडीनिवडी, सोयीगैरसोयी आणि समजुतीप्रमाणें पाहिजे तसा नवा देव पत्करीत असतो. श्रीज्ञानेश्वर म्हणतात आज तो नागोबाच्यापुढें उभा राहून ' जय नागोबा ' म्हणतो तर लगेच पुढच्या महिन्यांत नागोबाला विसरून गणोबाकडे धांव घेतो; घरांत एक मोठा देव ठेवला तरी त्याचें समाधान होत नाहीं. पुन्हां देवशोधनार्थ व देवीच्या दर्शनार्थ तीर्थयात्रादि करावयास लागतो. घरच्या देवावर स्वारी करण्याकरितां केव्हां केव्हां कुलदेवताहि येतात व त्या दिवशीं त्यांनाच मान मिळतो. एकादशीचे दिवशीं जेवढें महत्त्व विठोबाला असतें, तेवढेंच महत्त्व शिवरात्रीचे दिवशीं शंकराला असतें. नवरात्रांत जगदंबेचें महत्त्व तर मार्गशीर्षात सटीचें महत्त्व असें समजून आराधना चालूं होते. आज रामजयंती तर श्रावणांत कृष्णजयंती असे जयंत्यांचे उत्सव अनेक देवांच्या कल्पनेमुळेंच उत्पन्न होतात.

हिंदुस्थानांतील अगदीं खालच्या थरांतील देव मधल्या थरांत नाहींत व मधल्या समाजांतील देव वरच्या समाजांत नाहींत. हिंदूंतील देव मुसलमानांत नाहींत, मुसलमानांतील देव ख्रिश्चनांत नाहींत व पारशांचे देव यांहूनहि निराळेच आहेत. हे सर्व देव साक्षात् ईश्वर समजण्यांत येतात व या सर्व देवांचा उद्भवही ईश्वराच्या सगुण कल्पनेपासून झाला आहे. तात्पर्य, ईश्वराला सगुण मानणें व त्याचीं अनेक स्वरूपें समजणें हें तत्त्वच मुळीं सयुक्तिक नाहीं.

दगडाचे देव तारतात काय ?

हिंदु समाजाप्रमाणें इतर समाजांतहि या ना त्या स्वरूपांत ही मूर्तिपूजा आहे. कोणी थडग्याला पूजितो, कोणी डोल्यांची पूजा करतो, तर कोणी क्रॉसलाहि भक्तिभावानें प्रणाम करतो. या ज्या देवांच्या अस्तित्वाच्या खुणा म्हणून लोक समजत असतात, त्यांत खरोखर कांहीं सामर्थ्य आहे काय ? असा प्रश्न केल्यास त्याचें उत्तर नकारार्थीच द्यावें लागतें ! आजपर्यंत कोणत्याहि दगडाच्या, धातूच्या अगर काष्ठाच्या मूर्तीनें दैवी सामर्थ्य कधींहि दाखविलें नाहीं आणि तसें दाखविणें शक्य नाहीं. मनुष्य आपल्या अज्ञानामुळें, फार तर भावनेमुळें, मशिदींत

अगर चर्चमध्यें देव आहे असें समजतो. तसेंच तो शाळिग्राम व नर्मदा गणपति या काळ्या व तांबड्या दगडांत वसलेला आहे असें समजतो व मोठ्या श्रद्धेनें व भावनेनें त्यांची पूजाअर्चा करूं लागतो, इतकेंच !

भाव तसा देव आणि मानला तर देव नाहीं तर धोंडा, या म्हणींतहि हाच अर्थ आहे. घरामध्यें लहान मुलें काठीचा घोडा करतात आणि आगपेटीची आगगाडी करून कांहीं वेळ गमतीनें खेळतात. त्या मुलांना कांहीं वेळ त्या कल्पनेंत आनंद वाटतो. पुढें तीं लगेच कंटाळून ती काठी व ती पेटी फेंकून देतात. दगडाधोंड्यांत देव आहे असें मानून जे पूजाअर्चा करीत बसतात त्यांची स्थिति लहान मुलांप्रमाणेंच असते. एक सुपारी ठेवून त्याला गणपति म्हणून त्याची पूजाअर्चा करावयाची व ती झाली कीं त्याचें लगेच विसर्जन करावयाचें ! शाडूचा गणपति अगर मातीचें पार्थिव लिंग करून त्याजवर आपल्या भावनेनें देवत्वाचा आरोप करावयाचा व पूजा झाली कीं अक्षता टाकून विसर्जन करून मोकळें व्हावयाचें हाहि एक लहान पोरांप्रमाणेंच खेळ आहे.

लहान मुलाला कांहीं तरी अल्प वस्तूवर मोठी कल्पना करून वागण्यांत गंमत व आनंद वाटतो, तशीच येथें अल्प अशा दगडाधोंड्यावर देवाच्या महत्त्वाची भावना करून कांहीं काल गमतीनें आनंद भोगण्याची स्थिति असते. पण तत्त्वतः आणि शास्त्रतः हें खरें आहे काय व योग्य आहे काय ? भागवतासारख्या भक्तिप्रधान ग्रंथांतसुद्धां कांहीं स्थलीं या मूर्तिपूजेचा म्हणजे प्रतीकांतच देव असतो या कल्पनेचा निषेध केलेला आहे. (भा. स्कंद ३ –अ. २९)

अहं सर्वेषु भूतेषु भूतात्मावस्थितः सदा ।
तमवज्ञाय मां मर्त्यः कुरुतेऽर्चाविडम्बनम् ॥ २१ ॥
यो मां सर्वेषु भूतेषु सन्तमात्मानमीश्वरम् ।
हित्वार्चां भजते मौढ्याद्भस्मन्येव जुहोति सः ॥ २२ ॥

मी सर्व भूतांमध्यें असतांना माझी अवज्ञा करून जो मूर्तीची पूजा-अर्चा करून थट्टा करतो तो सर्वभूतस्थ जो मी त्याचा अवमान करून भस्मांतच जणु हवन करतो. गंधपुष्पादिकांनीं माझी पूजा केली असतां

मी तुष्ट होत नाहीं. म्हणून सर्वभूतस्थ जो मी त्या माझी पुढीलप्रमाणें पूजा करावी--

अथ मां सर्वभूतेषु भूतात्मानं कृतालयम् ।
अर्हयेद्दानमानाभ्यां मैत्र्याभिन्नेन चक्षुषा ॥२७॥

सर्व भूतांच्या ठिकाणीं ज्यानें आपलें वसतिस्थान केलें आहे अशा त्या परमेश्वराची अभिन्न दृष्टीनें दान, मान आणि इतर अनेक प्रकारांनीं सेवा करावी. मोठ्याचा बहुमान करावा, दीनावर अनुकंपा करावी, बरोबरीच्याशीं मैत्री करावी, यमनियम पाळावे, सरळपणानें वागावें. आणि हें सर्व आत्यंतिक अशाच भक्तियोगांत येतें, असें भागवतांत सांगितलें आहे, हें समजलें म्हणजे वाचकांना खरोखरीच आश्चर्य वाटेल.

महतां बहुमानेन दीनानामनुकंपया ।
मैत्र्या चैवात्मतुल्येषु यमेन नियमेन च ॥ १७ ॥

तात्पर्य, भागवतासारख्या भक्तिप्रधान ग्रंथांतसुद्धां सर्व भूतमात्राच्या ठिकाणी जागृत असणाऱ्या परमेश्वराची सेवा विविध प्रकारांनीं करावी केवळ दगडांतच देव आहे, तो मूर्तींत बसलेला आहे, असें समजून स्वस्थ बसूं नये, अशा आशयाचे विचार ठिकठिकाणीं आलेले आहेत.

आपल्या समाजांत तर निर्गुण, निराकार परमेश्वर बाजूला राहातो आणि ईश्वराच्या सगुण स्वरूपाचा संक्षेप करितां करितां तो ईश्वर एक लहानशा मूर्तीत येऊन बसतो !

या असल्या कल्पनांनींच मुसलमानांच्या स्वाऱ्यांच्या वेळीं लोक स्वस्थ बसले व प्रतिकार न करतां 'मूर्तीतील देव पाहून घेईल' म्हणून निर्धास्त राहिले. त्याचा फायदा मुसलमानांनी कसकसा घेतला हें येथें सांगावयाचें कारण नाहीं. त्यांनीं मूर्ती फोडल्या, देव उध्वस्त केले, संपत्ति गडगंज लुटली आणि अनन्वित प्रकार करून, दगडांत देव नाहीं व दगडांत सामर्थ्य नाहीं असें सिद्ध केलें ! तरी पुन्हां दगडांत देव आहे व तो सर्व करतो ही आमची कल्पना कांही पालटत नाहीं !"

प्रतीक, प्रतिनिधि आणि मूर्ति यांमध्यें आपल्या भावनेनें आपण देव उत्पन्न करतों. वास्तविक तो तेथें मुळींच नसतो. भावना ही फक्त अल्प कालपर्यंतच कार्यकारी होते. पण विचार जागृत झाला कीं भावना नष्ट होते.

एखाद्या क्षयरोग्याला कितीहि जरी उत्कट भावनेनें 'तूं निरोगी आहेस' असें शिकविलें तरी तो कांहीं निरोगी होणार नाहीं; अगर अठरा विश्वे दारिद्र्यानें पीडलेला मनुष्य आपल्या प्रबळ इच्छाशक्तीनें मी श्रीमंत आहें असें समजूं लागला तर तो श्रीमंत होऊं शकणार नाहीं ! केवळ भावनेनें अविद्वान् विद्वान् होऊं शकत नाहीं, निर्धन धनसंपन्न होऊं शकत नाहीं आणि दुबळा बलवान् होऊं शकत नाहीं. हाच प्रकार ईश्वरभक्तीचा आहे. दगडांत देव आहे, मूर्तीत देव आहे, सुपारींत देव आहे ही कल्पना कांहीं काळ मनुष्याला सुख देईल, पण विचार जागृत झाल्यानंतर या कल्पना व हे सर्व देव मिथ्या आहेत असें वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

भावनेला कांहीं महत्त्व आहे, ती एक मनाची शक्ति आहे व मानसशास्त्राप्रमाणें मानवी मनांत कांहीं एक सामर्थ्य आहे, हें सर्व खरें आहे. म्हणूनच 'जसे लोक तसे त्यांचे देव' अशी म्हण पडली आहे. तेजस्वी लोकांचे देव तेजस्वी असतात, समर्थांचे देव समर्थ असतात आणि गुलाम लोक आपल्या देवांना गुलाम बनवितात. देव तर विचारा असा आहे कीं जसे त्याचे भक्त त्याला बनवितील तसा तो बनतो. 'मला स्वातंत्र्य नाही, **मी भक्तपराधीन आहें**' असें देवानें पुष्कळ वेळां सांगितलें आहे. भक्त जर तरवारी घेऊन धावूं लागले, गदा घेऊन युद्ध करूं लागले अगर तोफा व बंदुका यांच्या साहाय्यानें जग आक्रमण्याची इच्छा करूं लागले तर त्या भक्तांच्या भावनेप्रमाणें हें सर्व देव करतो असें वाटतें. वास्तविक तो कांहीं करीत नाहीं. तो कूटस्थ आहे, साक्षी आहे, सर्वव्यापी आहे आणि विभु आहे. प्रकाशमान दिवा हा जसा गृहव्यापाराला निमित्तभूत असून कोणाचें नियमन किंवा निवारण करीत नाहीं, तसाच वस्तुतः ईश्वर आहे. पण अज्ञ लोकांना हें समजत नसल्यामुळें ते मूर्तीत व दगडाधोंड्यांत देव आहे असें मानून त्याला भजतात व त्याच्या कृपेनें सर्व कांहीं मिळतें असें समजतात. हें कथन निष्ठुर असलें तरी तें सत्य आहे, हें पुनःपुन्हां सांगितलें पाहिजे.

येथपर्यंत निर्गुण परमेश्वराचें स्वरूप हें आकळण्यास कसें कठिण आहे व ईश्वराचें जें सगुण स्वरूप मूर्ति वगैरेच्या रूपानें मानण्यांत येतें तें अशास्त्रीय, चुकीचें व हानिकारक आहे असें सांगितलें. अर्थात् मग ईश्वराचें सत्यस्व प कोणतें ? तें सांगितलें पाहिजे.

ईश्वराचें स्वरूप कोणतें, तें तर्कदृष्टया शुद्ध कसें असावें हें पाहूं. अखिल चराचराच्या बुडाशीं एक तत्त्व आहे व तें प्रत्येक अणुरेणूमध्येंहि भरलें आहे, हें मान्य करावें लागेल. प्रत्येक अणूंत जी गति, (Motion) जो वेग (Force) दिसतो तीच ती शक्ति होय! ईश् धातूचा मूळ धात्वर्थहि ईश–सत्तायां व ईश = ऐश्वर्ये असा आहे. या निसर्गातील सर्व व्यापार सुसंबद्ध, सुसंगत व कार्यकारणयुक्त असे जे चाललेले आहेत ते एका शक्तीच्या नियमनानेंच चालले असले पाहिजेत. ती शक्ति म्हणजेच ईश्वर होय! ईश्वराच्या विशुद्ध स्वरूपाची कल्पना गीता व उपनिषदें यांमध्येंच आहे. तो सम आहे, पक्षपाती व निर्दय नाहीं, त्याला कोणी प्रिय नाहीं, द्वेष्य नाहीं. तो कुणाचें पुण्य घेत नाहीं व कुणाचें पाप नष्ट करीत नाहीं. तो साक्षी, चेतन, नित्य असा आहे. ही ईशशक्ति दिव्याप्रमाणें साक्षीभूत व प्रवर्तक असते. दिवा जसा सर्वांना प्रकाश देतो, पण तो कोणाचें नियमनहि करीत नाहीं, तसाच ईश्वर आहे.

अथवा ईश्वर हा पावसासारखा किंवहुना जलासारखा आहे. जल हें प्रत्येक बीजाला जीवन देतें व त्या त्या बीजांत जी शक्ति असेल, तिचें विकसन करण्यास साहाय्य करतें. ऊंस, कारलें व मिरची यांच्या बीजांशीं जलाचा संयोग झाला कीं तें जल बीजस्थ शक्तीचा विकास करतें. पाणी स्वत: गोड, कडू अगर तिखट असतच नाहीं. पण उसांत गेलें कीं गोड, कारल्यांत गेलें कीं तें कडू आणि मिरचीत गेलें कीं तिखट असें होतें. पाणी स्वत: मिरचींतील तिखटपणा नष्ट करीत नाहीं किंवा कारल्यांत गोडीहि घालीत नाहीं. बीजांत जो संस्कार असेल त्याचें विकसन करणें एवढेंच जलाचें कार्य होय!

त्याप्रमाणेंच अनेक प्राण्यांचीं जीं कर्मे, त्यांचे झालेले जे संस्कार म्हणजे कर्मांचे जे 'बीजशेष' असतात त्यांचें विकसन करून प्रत्येक प्राण्याला त्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें फल देणें व तें त्याला भोगावयाला लावणें हेंच नियंतीचें कार्य आहे. कर्माचा कर्ता आणि त्याचें फल यांची सांगड घालणारी जी एक शक्ति तोच ईश्वर होय. ती शक्ति निर्गुण, निराकार, नामरूपातीत आहे व मनुष्यप्राणीहि या शक्तीचाच एक अंश आहे इतकेंच ईश्वराविषयीं बोलतां येतें.

ईश्वराच्या स्वरूपाचा कितीहि ऊहापोह केला तथापि तो अपुरा व अनिश्चित अशा स्थितींत राहणार, म्हणन दृश्य जें जगत् तेंच ईश्वराचें सगुण स्वरूप आहे व या जगताला नियामक अशी एक शक्ति आहे तीच ईश्वर असें समजून आपण पुढें जाऊं. मनुष्यप्राणी ईश्वराचा अंश आहे, हें सर्व विश्व ईश्वरानें उत्पन्न केलें, अर्थात् या विश्वांत तो सर्वत्र भरला आहे. हें जगत् म्हणजे ईश्वराचें स्वरूपच आहे असें समजण्यांत कांहीं दोष नाहीं. साखर व तिची गोडी, रत्न व त्याचें तेज, अग्नि व त्याच्या ज्वाळा, कमळ व त्याच्या पाकळ्या, जल व त्याची आर्द्रता हीं जशीं वेगवेगळीं काढतां येत नाहींत, तसेंच ईश्वर व जग यांचाहि भेद करणें व त्यांना भिन्न मानणें शक्य नाहीं. ईश्वर व जगत् हीं एकरूप आहेत असेंच समजलें पाहिजे व जगताच्या सगुण स्वरूपानें असणाऱ्या या ईश्वराची भक्ति कशी करावी हें पाहिलें पाहिजे. **ईश्वराविषयींचें जें उत्कट प्रेम ती भक्ति होय! पण सगुण ईश्वर म्हणजेच हें जगत् असल्यामुळें जगतावर प्रेम करणें, आपल्या समाजावर व राष्ट्रावर प्रेम करणें आणि आपल्या हातून होईल तितकी त्याची प्रेमानें सेवा करणें म्हणजेच ईश्वराची भक्ति होय.**

आज समाजामध्यें ईश्वराचें नामस्मरण करणें, त्याची पूजाअर्चा करणें, त्याच्या कथा सांगणें व ऐकणें, त्याला वंदन करणें, तीर्थयात्रा करणें, देवस्थानच्या वाऱ्या करणें म्हणजे ईश्वराची भक्ति करणें असें समजतात. पण हा ईश्वरभक्तीचा प्रकार बरोबर आहे काय? राम, राम, राम, अशा केवळ नामोच्चारानें ईश्वराची भक्ति होईल कां त्याबरोबरच राम हा मोठा क्षत्रिय वीर होता, त्यानें दक्षिण दिग्विजय केला, आर्य संस्कृतीचा झेंडा लंकेंत नेऊन रोंवला, तो मोठा पितृभक्त, एकवचनी, एकपत्नी असा शीलसंपन्न वीरपुरुष होता असें समजून ते गुण आपल्या अंगीं व समाजाच्या अंगीं आणण्याचा यत्न करणें ही खरी भक्ति होईल? भगवान् श्रीकृष्णाच्या केवळ नामोच्चारानें भक्ति होईल, कां तो तत्त्वज्ञ व मुत्सद्दी कसा होता, भारतीय युद्धांत त्यानें पांडवांना कसें साहाय्य केलें, कोणते डाव लढविले, कोणत्या युक्त्या योजल्या हें सर्व समजून घेऊन ते गुण आपल्या राष्ट्राच्या अंगीं आणण्याचा प्रयत्न केल्यास ही खरी भक्ति होईल हें पाहिलें पाहिजे.

जगत् हा कर्माचा परिपाक आहे; मनुष्यप्राणी कर्मामुळें व कर्म करण्याकरितांच जन्माला आला आहे. मनुष्यजन्म ही कर्मभूमि आहे. येथें ज्ञान व कर्म यांच्या साह्याय्यानेंच वागावें लागतें. समाजांत जन्मलेल्या मनुष्याला मागील पिढ्यांच्या यत्नामुळें कित्येक सुखें सहज भोगतां येतात. मागील पिढ्यांप्रमाणें हल्लींच्या पिढीनेंही यत्न करून मनुष्यसमाजाच्या सुखांत कांहीं तरी भर टाकलीच पाहिजे. ही भर टाकणें म्हणजेच जुन्या समजुतीप्रमाणें देव, ऋषी व पितर यांचीं ऋणें फेडणें आणि नव्या समजुतीप्रमाणें कुल, समाज, धर्म व राष्ट्रसंबंधीं जीं अनेक कर्तव्यें आहेत तीं पार पाडणें होय. प्रत्येक मनुष्यानें या जगांत आपापलें कर्तव्य सारखें करीत राहावें व तें करीत असतांना ईश्वराचें स्मरणहि ठेवावें. समाज हा विराटस्वरूपी असून मनुष्य हा त्याचा लहान घटक ही जाणीव ठेवून निमित्तमात्र या भावनेनें सारखें कर्तव्य करीत राहाणें हेंच इष्ट होय ! स्वकर्तव्य सोडून अगर त्याकडे दुर्लक्ष करून **नुसतें ईश्वराचें नामस्मरण करणें**, ही ईश्वरभक्ति नसून ईश्वराचा द्रोह आहे.

अपहाय निजं कर्म कृष्ण कृष्णेति वादिनः ।
ते हरेर्द्वेषिणः पापाः धर्मार्थं जन्म यद्धरेः ॥ विष्णुपुराण

स्वकर्तव्य सोडून हरिहरि म्हणत बसणारे लोक हे हरीचे द्वेष्टे व पापीच होत. कारण हरीचा जन्म म्हणजे ईश्वराचा जन्म हा धर्मरक्षणाकरितां म्हणजे एका दृष्टीनें कर्माकरितांच असतो !

ईश्वरविषयक प्रेम म्हणजे भक्ति, अशी भक्तीची व्याख्या आहे खरी, पण ती भक्ति तरी कर्तव्याशिवाय होते कशी व त्या भक्तीचा खरा प्रकार कोणता हा प्रश्न शिल्लक राहातोच. व्यवहारांत प्रेमाचें पर्यवसान कृतीमध्यें होतें, असें आपण पाहातों. दोघां मित्रांचें उत्कट प्रेम असलें तर ते जीवास जीव देण्यास तयार होतात! म्हणजे त्यांच्या प्रेमाचें पर्यवसान एकमेकांस साहाय्य करण्यांत होतें. आईचें मुलावर प्रेम असतें म्हणून ती त्याकरितां अनेक खस्ता खाते. पत्नी पतीकरितां काय पाहिजे तें करते. लोभी द्रव्याकरितां; व्यसनी व्यसनाकरितां काय पाहिजे तें सोसतो, म्हणजे जो तो आपापल्या इष्ट वस्तूकरितां प्रेमानें कृतीच करतो. कृतीशिवाय निष्क्रिय प्रेम व्यर्थच होय. सक्रिय दया व निष्क्रिय दया असे दयेचेहि दोन प्रकार

होतात. ज्या दयेमुळें कृति होऊन दुःख नष्ट केलें जातें, तीच खरी दया होय ! ज्या दयेंत कृति नाहीं, ज्या प्रेमाचें पर्यवसान क्रियेंत होत नाहीं, तें प्रेम पंढच म्हटलें पाहिजे. याच दृष्टीनें ईश्वरविषयक प्रेमाचें पर्यवसान कृतींत न होतां तें नुसतें स्मरण व स्तवनरूपानेंच राहूं लागलें तर त्या प्रेमाला ईश्वरभक्ति असें म्हणतां येईल काय ? मुळींच नाहीं.

एक मुलगा मातृभक्त आहे असें आपण समजूं. मातृभक्तीचें लक्षण हेंच कीं, माता सांगेल त्याप्रमाणें वागणें व तिच्या सेवा-शुश्रूषेंत कांहींहि कमी न पडेल असें करणें. मुलानें आईच्या सांगण्याप्रमाणें वागलें पाहिजे, पण तसें कांहीं न करतां एखादा मातृभक्त मुलगा 'थोर तुझे उपकार, आई थोर तुझे उपकार' अशा पदांनीं तिला आळवूं लागला तर तें कर्म आईला पसंत पडेल काय ? ती सरळ म्हणेल, कीं 'मेल्या, होय ! मी अशी आहें खरी. आईची योग्यता मोठी आहे; पण तूं माझ्यापुढें मूर्खासारखा स्तुति करीत कशाला बसतोस ? येथून चालता हो व मीं सांगितलेलें काम आधीं कर पाहूं.' आईनें सांगितलेलें काम करणें, तिच्या मनाप्रमाणें वागणें व तिजवर प्रेम करणें हीच मातेची सेवा होय व तेंच मातृभक्तीचें द्योतक होय !

दोन राजे आहेत असें समजूं. एक राजा सैन्य, कोश, मंत्री व प्रजा या सर्वांकडे दुर्लक्ष करून सारखा ईश्वराचें स्मरण व भजन करीत आहे व ईश्वराचें म्हणजे मूर्तीचें डोकें धरून बसतो आहे. दुसरा राजा राजधर्मा-प्रमाणें सैन्य, कोश, दुर्ग व मंत्री या सर्वांकडे उत्तम तऱ्हेनें लक्ष देऊन ईश्वराचें स्मरणहि ' मामनुस्मर युध्य च ' याप्रमाणें प्रसंगीं ठेवीत आहे. तर या दोघांपैकीं ईश्वराला कोणता प्रिय होईल ? स्वकर्तव्य सोडून जो सारखी ईश्वराची स्तुति करीत असेल, तो ईश्वराला कधींहि प्रिय होणार नाहीं, फार काय, पण अशा राजावर पर-चक्र आलें तर ईश्वर त्याचें निवारण न करतां मंत्री, कोश, दुर्ग इत्या-दिकांकडे दुर्लक्ष केल्यामुळें त्याला पराभवाचेंच फळ दिल्याशिवाय कधींहि राहाणार नाहीं. कर्माप्रमाणें फल देणें हा ईश्वराघरचा सिद्धांत. सारखें ईशस्तवन करणाऱ्या राजाला ईश्वर म्हणेल कीं, स्तवनाचें फल सात्त्विक आनंद, हें मीं तुला दिलें आहे. त्याचप्रमाणें तुझ्या शत्रूलाहि युद्धांत जय मिळावा म्हणून त्यानें जी सिद्धता केली तिचेंहि जय हें फल दिलेंच पाहिजे.

युद्धविषयक समुग्री सिद्ध न ठेवणाऱ्या राजाला केवळ तो स्तुतिपाठकाचें काम करतो म्हणून ईश्वर जय कधींहि देणार नाहीं व दुसरा राजा आपली थोडी कमी स्तुति करतो म्हणून त्याच्या युद्धशास्त्रनिपुणत्वाचा लाभ कधीहि काढून घेणार नाहीं, असा हा ईश्वरी दंडक आहे.

शिक्षकानें आपला विषय मुलांना थोडक्यांत व कष्ट न पडतां कसा समजेल, इकडे लक्ष दिलें पाहिजे. पण तो जर कारटीं सगळीं 'ढ' आहेत अशा समजुतीनें अध्यापनाकडे दुर्लक्ष करून पंढरीच्या वाऱ्या करूं लागेल तर ती ईश्वराची भक्ति नसून तो एक भाजाकार आहे असेंच समजलें पाहिजे. पक्षकार वकीलाला खरीखुरी व योग्य माहिती देण्याचा यत्न करीत नाहीं व दिलेली माहिती वकीलहि मार्मिकपणें अवलोकनांत आणीत नाहीं, पण दोघेहि आपापलें कर्तव्य सोडून जर नामसप्ताहांत (खटल्यांत जय मिळावा म्हणून) नाचूं लागले तर ईश्वर त्यांना अपयशच देईल.

एक विद्यार्थी होता, त्याला थोडें संस्कृत येत होतें. त्यानें 'प्रणम्य शिरसा देवम्' हें महागणपतिस्तोत्र पहिलीं बारा नांवें व पुढची फलश्रुति यांसह पाठ केलें व अर्थहि समजून घेतला. स्तोत्रांतील फलश्रुति प्रमाणें स्वतः मोठें विद्वान् व्हावें म्हणून त्यानें गणपतिस्तोत्राच्या मोठ्या श्रद्धेनें हस्तलिखित वळणदार प्रती करण्यास प्रारंभ केला. दोन चार दिवस विद्यार्थी पाठाला कां येत नाहीं व चुकवाचुकवी कां करतो याची गुरुजींनीं चौकशी केल्यावर त्यानें सांगितलें कीं, 'गणपतीच्या प्रसादानें सर्व विद्या एकदम येण्याचा उपाय मी हल्लीं करीत आहें.' गुरुजी म्हणाले, असा उपाय आहे तरी कोणता तें मला सांग. त्यावर 'आठ ब्राह्मणांना स्वहस्तें लिहून जो कोणी हें स्तोत्र अर्पण करील

तस्य विद्या भवेत् सर्वा गणेशस्य प्रसादतः ।

त्याला सर्व विद्या प्राप्त होतात असा श्लोकार्ध त्यानें म्हटला ! त्यावर गुरुजी म्हणाले, 'अरे मूर्खा ! हा अर्थवाद आहे. कोणीकडून गणपतीचें नांव घ्यावें म्हणून ही फलश्रुति सांगितली आहे. तूं अभ्यास सोडून नुसत्या या स्तोत्राच्या नकला करीत बसलास व आठाच्या जागीं जरी त्या आठ हजार ब्राह्मणांना अर्पण केल्यास तथापि अक्षर सुधारण्याशिवाय कोण-

तीहि विद्या तुला येणार नाहीं. विद्या ही अभ्यासानें, दीर्घ परिश्रमानें व पद्धतशीर शिक्षणानेंच प्राप्त होते. तेव्हां तूं तुझा अभ्यास कर.'

समजा, खेड्यांतील एका घाणेरड्या विहिरींत लोक स्नानें करतात आणि धुणेंहि धुतात नि तिथलेंच पाणी पितात! या घाणेरड्या प्रकारामुळें जर लोकांना सारखे नारू होऊं लागले तर, ती ईश्वराची अवकृपा असें समजून नामसप्ताह सुरू करावयाचे कीं काय? आणि त्या नामसप्ताहानें ईश्वर प्रसन्न होऊन त्या नारूचे जंतु मरतील काय? मुलाला शाळेंत न पाठवितां, त्याजकडून अभ्यास करवून न घेतां तो केवळ स्तोत्रें म्हणत जर सारखा बसेल तर त्यामुळें त्याला परीक्षेंत खरोखर यश मिळेल काय? घरांत रोगी आसन्नमरण आहे अशा स्थितींत त्या रोग्याच्या औषधोपचाराचा विचार न करतां देवापुढें नुसतें ध्यानस्थ बसल्यानें घरांतील रोगी रोगमुक्त होईल काय? द्रव्य मिळविण्याकरतां जगांतील कोणताही उद्योग न करतां जर षोडषोपचार पूजेचा सारखा सपाटा चालविला तर कोणी कधीं तरी संपन्न होईल काय? देवाच्या भक्तीनें कोर्टांतील केस जर जिंकतां येत असेल तर वकील देणें आणि इतर व्यवहार करणेंच सोडून देऊन गोमुखींत हात घालून खुशाल जप करण्यास कोणती हरकत आहे?

ईश्वर मूर्तिमंत दयेच्या रूपानें असतो. ईश्वरानें हें जगत् निर्माण करून प्राण्यांना तें उपभोग्य असें केलें आहे. ईश्वराच्या न्यायनिष्ठुरतेमध्येंच त्याची दया सांठविली आहे. अशा ईश्वराचें मनोगत काय असावें हें काय सांगावयास पाहिजे? गीता अध्याय ३, श्लोक २२ ते २४ मध्यें तो भगवान् श्रीकृष्णमुखें सांगतो कीं 'मला कर्तव्य उरलेलें नाहीं. तथापि मी जगत्-चक्र चालावें म्हणून सारखा कर्म करीत आहें. जर मी आळस टाकून सारखा कर्म करीत राहीन तरच इतर लोक माझें अनुकरण करतील. मी जर कर्म-पराङ्मुख झालों तर जग उत्सन्न होईल.'

ईश्वर केवढ्या जबाबदारीनें वरील उद्‌गार काढीत आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे ईश्वराला प्रिय काय असावें व ईश्वराची सेवा किंवा भक्ति कशानें होईल याचा उलगडा होतो. जगच्चक्र चालविणाऱ्या ईश्वराला जगांतील प्रत्येक माणसानें आपआपलें कर्तव्य उत्साहानें, धैर्यानें, अनहं-

रानें व आसक्ति सोडून करावें हेंच तत्त्व इष्टतम आहे यांत शंका नाहीं स्वकर्तव्य उावलून जो केवळ ईश्वराची भाटाप्रमाणें स्तुति करीत बसेल त्याजवर ईश्वर प्रसन्न न होतां रुष्टच होईल.

ईश्वराचें सगुण प्रतीक हें जगत् असून त्यांतील समाज व राष्ट्र यांच्या अभ्युदयाकरितां प्रत्येकानें आपापलें कर्तव्य करीत राहणें हीच परमेश्वराची भक्ति असून ईश्वरप्राप्तीचा खरा मार्गहि तोच आहे. कर्तव्यानंदांत परमानंद आहे. अहर्निश कर्तव्यें करीत राहण्यांतच खरें सुख आहे. कर्म करीत राहण्यांत जें सुख आहे, तें कर्मफल भोगण्यांत नाहीं. म्हणूनच ईशोपनिषदामध्यें कर्में करीतच म्हणजे कर्तव्य करीतच शंभर वर्षें जगण्याची इच्छा करादी असें म्हटलें आहे. गीतेच्या द्वारानें श्रीकृष्णमुखांतून हाच संदेश बाहेर पडला असून,

स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानव : ॥ –अ. १८ श्लो. ४५ ॥

म्हणजे स्वकर्मकुसुमानें सर्वात्मक ईश्वराची स्मरणपूर्वक पूजा केली असतां मनुष्याला आत्मसंतोषरूप सिद्धि मिळते, असें म्हटलें आहे.

आतां व्रतादिकांच्या योगानें ईश्वर प्रसन्न होतो व सर्व कांहीं देतो अशी जो एक समजूत, तिचाहि परामर्श घेऊं. अमुक व्रत केल्यानें अमुक मिळतें हा सर्व अर्थवाद पोकळ स्तुतिपर असतो. कोणीकडून मनुष्यानें कर्मप्रवण व्हावें म्हणून या असल्या फलश्रुत्या सांगितलेल्या असतात. त्या खऱ्या मानून सकामतेनें जर कोणी कांहीं करूं लागेल तर तो भ्रम होय ! लोकप्रसिद्ध असलेल्या सत्यनारायणव्रताचेंच उदाहरण घेऊं.

एकदां म्हणे नारद परानुग्रहार्थ संचार करीत करीत मृत्युलोकाला आले. तेथें नाना क्लेशांनीं पीडलेले लोक त्यांनीं पाहिले. ते क्लेश कसे नष्ट. करावे हें विचारावें म्हणून नारद विष्णुलोकास गेले, अशी स्कंदपुराणांतर्गत रेवाखंडांतील या व्रताची प्रस्तावना आहे. नारदांनीं विष्णूपुढें मृत्युलोकांतील दुःखाचें रडगाणें गायलें व विनंति केली कीं, ' तत्कथं शमयेन्नाथ **लघूपायेन** तद्वद ' दुःखशमनाचा **सोपा उपाय** सांगा. त्यावर भगवंतांनीं हें सत्यनारायण व्रत सांगितलें व त्याचें महत्त्व वर्णन केलें:—

दुःखशोकादि शमनं धनधान्य प्रवर्धनम् ।
सौभाग्यसंततिकरं सर्वत्र विजयप्रदम् ॥

दुःख नष्ट करणारें, धनधान्य वाढविणारें, सौभाग्य व संतति देणारें, सर्वत्र जय देणारें असें हें व्रत आहे. या व्रताकरतां उत्तम प्रकारचा प्रसाद विशिष्ट प्रकारानें करावा, तो सत्यनारायणाला अर्पण करावा, ब्राह्मणांना द्यावा, नृत्यगान करावें, असें सांगून कलियुगांत हाच सोपा मार्ग आहे असें भगवान म्हणाले. भगवानांनीं प्रथम पूर्वीची एक कथा सांगितली, इतर कथा-पुढें सूतांनीं शौनकाला सांगितल्या आहेत व शेवटीं या व्रताची फलश्रुतीहि पुष्कळच दिली आहे.

हें व्रत सांगणारा खरोखरीच जर श्रीकृष्ण भगवान असेल तर हा भगवान गीतेंत एक बोलतो व स्कंदपुराणांत दुसरेंच बोलतो असें सिद्ध होतें. हें व्रत भगवानाच्या तोंडून ज्यानें वदविलें आहे, त्यानें त्या भगवानाची खास बदनामी केली आहे असें वाटतें. कारण याच भगवानानें अर्जुनाला युद्धाच्या वेळेला अनेक विषय सांगून अगदीं पुरे केलें व शेवटीं कर्तव्य कर, तेंच मला प्रिय आहे. असें म्हणून त्यास लढावयाला लावलें. अर्जुनाला कर्मयोगशास्त्र सांगणाऱ्या या भगवानाला विजयप्रद असें हें सत्यनारायणाचें व्रत माहीत नव्हतें काय ? कारण भारतीय युद्धकालींच कलियुगाला प्रारंभ झाला व कलियुगाकरितां नुकतेंच चालूं केलेलें व्रत भगवंताला विदित नव्हतें असें नाहीं. त्यानें असें सांगितलें असतें कीं, युद्धांत आप्त जनांना मारण्याचें पातक तुला लागेल ही काळजी कशाला ? हें सत्यनारायण व्रत कर. यथा-शास्त्र घृत, शर्करा, रंभाफळें घालून प्रसाद तयार कर, तो आपण सर्व मिळून खाऊं, मग पाहा विजय मिळतो कीं नाहीं ? ज्या व्रतांत केवळ तीर्थ-प्रसादाचेंच महत्त्व आहे असें व्रत गीता सांगणाऱ्या भगवंतांनीं तेव्हां सांगितलें नाहीं; त्याअर्थीं हा प्रसादखाऊ भगवान निराळा असला पाहिजे किंवा हें व्रत अगदींच खालच्या अधिकाऱ्यांकरितां सांगितलें आहे, असें तरी समजलें पाहिजे. गोडगोड खाण्याची ज्यांना चटक आहे अशा लोकांना फलश्रुतीच्या अर्थवादपर थापा देऊन देवाच्या निमित्तानें तरी ' गोड खा ' असें सांगण्या-करितांच हें व्रत आहे. एक हजार नाहीं दहा हजार सत्यनारायण केले तरी समाजांत सत्यरूपी नारायणावर निष्ठा वाढणार नाहीं, सत्याग्रह बाणणार

नाहीं व सत्याकरितां प्राण देण्याची वृत्ति तर उत्पन्न होणारच नाहीं, पण गोड खाण्याची चटक मात्र लागेल !

नाना क्लेश निवारण करणारें हें जर व्रत आहे व तें व्रत गेलीं कांहीं शतकें जर होत आहे, तर लोकांची निरक्षरता कां जात नाहीं ? स्वाभिमान-शून्यता कां कमी होत नाहीं ? आणि दैन्य, दारिद्र्य व मूर्खत्व यांचा नायनाट कां होत नाहीं, हें पाहावयास नको काय ? नारदांनीं विचारलेलें व भगवंतांनीं सांगितलेलें जर हें व्रत असेल तर या व्रतापासून नाना क्लेश नष्ट व्हावयास पाहिजे होते. परंतु ज्याअर्थीं तसें झालें नाहीं, त्याअर्थीं क्लेश निवारण्याचा मार्ग म्हणजे साक्षरतेचा प्रसार, जबाबदारीची जाणीव व कर्तव्य हीच भक्ति, या तत्त्वाचा प्रसार, हाच होय.

आतांपर्यंत आपण भक्तिमार्गाचें ऐतिहासिक अवलोकन केलें. ईश्वर एक आहे का अनेक आहेत, तो सगुण आहे का निर्गुण आहे याचा विचार करून मूर्तिपूजेंतील दोष पाहून ईश्वराचें स्वरूप केवळ तर्काला पटण्याजोगें कसें असूं शकेल हेंहि पाहिलें. नवविधा भक्तीनें ईश्वर प्रसन्न होत नाहीं, व्रतादि साधनांनीं तो भेटत नाहीं, पारायणें व स्तोत्रपाठ यांनीं तो प्रसन्न होत नाहीं तर केवळ कर्तव्यरूपी कुसुमानेंच तो संतुष्ट होतो असें आपणांस दिसलें; म्हणून आजच्या कालांतील ईश्वराचें सगुण प्रतीक जर कांहीं असेल **तर तें स्वसमाज व स्वराष्ट्र हेंच होय !**

'सा परा अनुरक्तिः ईश्वरे' या नारदसूत्राप्रमाणें स्वराष्ट्रविषयक उत्कट प्रेम म्हणजे ईश्वरभक्ति होय ! काष्ठपाषाणाचें प्रतीक घेऊन त्याची नवविधा भक्ति जशी पूर्वी करीत तशी आजच्या कालांत या प्रतीकाची म्हणजे राष्ट्राची भक्ति केली पाहिजे. उत्कट भक्ताचें लक्षण हेंच कीं तो आपल्या प्रतीकाकरितां सर्वस्व त्यागाची तयारी दाखवितो. तशी तयारी दाखविणारे देशभक्त आजच्या कालांत निघाले पाहिजेत. अर्थात् राष्ट्रसेवा हीच आजच्या कालची सगुण भक्ति आहे, असें समजून त्या मार्गानें ईश्वरप्राप्तीचा मार्ग आक्रमिला पाहिजे.

आज आपल्या राष्ट्रांत स्वयत्तेची, विज्ञानाची, ज्ञानाची, संघटनेची, शिस्तीची, स्वाभिमानाची अत्यंत वाण नाहीं काय ? शेतकऱ्यांची उन्नति,

कामकऱ्यांची उन्नति, स्त्रियांची उन्नति, उद्योगधंद्याची उन्नति अशी किती तरी प्रकारची उन्नति व्हावयास पाहिजेच ना? प्रत्येक नागरिकाला सर्व पाहिजे, प्रत्येक नागरिकाचा संबंध, कोर्टे, कचेऱ्या, पोस्टें, आगगाड्या, शाळा, म्युनिसिपालिटचा, तालीमसंस्था, व्यापार, उद्योगधंदे, पोलीसखातें, न्यायखातें अशा प्रकारच्या किती तरी विविध संस्थांशीं येत असतो. या सर्व संस्थांत दोष किती तरी भरलेले आहेत. हे सर्व दोष शोधून ते नष्ट करण्याचा उद्योग पुष्कळ लोकांनीं करावयास नको काय ? **समष्टिहितार्थ निःस्वार्थ बुद्धीनें उद्योग करणें ही खरोखर ईश्वराची भक्ति होय !**

दगडाच्या मूर्तीत देव मानून तिच्या पूजाअर्चेत काळ घालविण्यापेक्षां सभोंवारच्या अज्ञान माणसांना सुज्ञ करण्याचा यत्न करणें हीच खरी भक्ति होय. हजारों माणसें मारे देवालयांत येत आहेत व पूजाअर्चा करीत आहेत हें दृश्य पाहण्यापेक्षां शेंकडों तरुण ज्या व्यायामसंस्थेंत येत आहेत व बलाची उपासना करीत आहेत अशी संस्था पाहणें हें अधिक इष्ट होय ! नवीं देवळें बांधणें, देवाला विविध भाग देणें या भक्तीपेक्षां ज्यायोगें ज्ञानदान अखंड चालू राहील आणि ज्ञानवानांना आश्रय मिळेल अशी व्यवस्था करणें हेंच अत्यंत श्रेयस्कर होय ! देवाच्या नांवानें ब्राह्मणभोजनें घालण्यापेक्षां तें द्रव्य अर्थोत्पादक अगर आरोग्यहितवर्धक अशा संस्थांकडे योजणें हा आजच्या कालांतील भक्तीचा प्रकार आहे.

जगांत सर्वश्रेष्ठ प्राणी कोणी असेल तर, तो मनुष्यप्राणी असून मनुष्याचें शरीर हेंच देवाचें वसतिस्थान होय ! अर्थात् ईश्वर ज्या ठिकाणीं राहातो, किंवहुना मनुष्य जो ईश्वराचा अंश–त्याच्या उन्नतीकडे दुर्लक्ष करून ईश्वराची भक्ति कधींच होणार नाहीं. सर्व मनुष्यमात्रांत नारायण आहे, मनुष्याच्या उन्नतीकरितां झटणें ही देवपूजा आहे, अशा विचारानें व भावनेनें राष्ट्रांतील स्त्रीपुरुष जेव्हां अनेक कार्यक्षेत्रांमध्यें उडया घेतील तेव्हांच खऱ्या भक्तीचा उदय होऊन ईश्वरप्राप्ति होणार आहे.

वोकेशाही व उपासनी बाबा

गेल्या प्रकरणापर्यंत ब्रह्मज्ञान व बुवाशाही या ग्रंथाचा मार्ग आपण बराच आक्रमण केला. तेव्हां कोठून कोठवर आलों व पुढें कोठें जावयाचें आहे, याचें सिंहावलोकन थोडें अवश्य आहे.

पहिल्या प्रकरणांत आर्यसंस्कृतीचीं वैशिष्ट्यें कोणतीं, त्या वैशिष्ट्यांत तत्त्वज्ञानाचें स्थान कसें श्रेष्ठ आहे हें सांगून बुवाशाहीची व्याख्या केली. दुसऱ्या प्रकरणांत ज्या पायावर ही बुवाशाहीची इमारत उभी होते त्या पायाचें म्हणजे ब्रह्माचें व जगताचें स्वरूप निवेदन केलें. ब्रह्म हें सद्रूप व चिद्रूप असें असतां असत्, जड व दुःखरूप जगत् कसें उत्पन्न होतें व त्याकरितां अविद्या ही शक्ति व ईश्वर कां मानावा लागतो याचें विवेचन तिसऱ्या प्रकरणांत केलें. जगत् हें उपटसुळासारखें एकदम उत्पन्न होत नसून तें अनादि कसें आहे व कर्म हेंच या जगताच्या रूपानें कसें परिणत पावतें हें चौथ्या प्रकरणांत सांगितलें.

ब्रह्म, ईश्वर, अविद्या, जगत् व कर्म यांचा विचार झाल्यावर सहजच जीवस्वरूपाकडे लक्ष्य जातें म्हणून आत्मविचार, जीवाचें स्वरूप, पंचकोश व मरणोत्तर स्थिति हा भाग प्रकरण पांच व सहा मध्यें कथन केला. प्रस्तुत चर्चेतील जो वादग्रस्त मुद्दा कीं ब्रह्मवेत्ता हा कसा असतो, तें ध्यानांत यावें म्हणून मोक्ष म्हणजे काय, मोक्षाचें स्वरूप कसें असतें, मुक्त कसा वागतो, त्याचीं लक्षणें कोणतीं हें अनेक आधारांसह समजावण्याचा यत्न सातव्या प्रकरणांत केला आहे. गुरु कसा कां असेना त्याच्यावर श्रद्धा पाहिजे, गुरुकृपेनेंच मोक्ष मिळतो ही समजूत कशी धादांत खोटी आहे हें प्रकरण आठमध्यें कट्टे गुरुभक्त जे ज्ञानेश्वर त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या आधारें स्पष्ट केल्यानंतर श्रद्धेनें व भावनेनें कितपत कार्य होतें आणि श्रद्धा व भावना

या ज्यावर ठेवावयाच्या असतात त्यांची स्तुति ही वास्तविक नसून तो अर्थवाद कसा असतो, याचें समग्र समालोचन नवव्या प्रकरणांत केल्यानंतर अलीकडच्या महाराजांच्या भोंवती जें चमत्कारांचें वलय असतें तें किती बेगडी असतें व पूर्व संतांच्या नांवावरील चमत्कारसुद्धां कसे फुगविलेले असतात याबद्दलहि वाचकांशीं प्रकरण दहामध्यें हितगुज केलें. प्रकरणें अकरा व बारा हीं श्री एकनाथ व तुकाराम यांच्या वचनाधारें लिहिलेलीं आहेत. साधकाचें अधःपतन कसें होतें हें एकनाथांनीं व लुच्च्या संतांचा प्रतिकार कां केला पाहिजे हें श्री तुकारामांनीं मोठ्या सणसणीत भाषेंत सांगितलें आहे.

हिंदु समाजांत आज जी बुवाशाही बोकाळलेली आहे तिजपासून कोणकोणते अनर्थ होतात, या बुवाशाहीचा उगम बौद्धिक गुलामगिरींतच कसा आहे, हें प्रकरण तेरामध्यें निर्भीडपणें मांडलें असून प्रकरण चौदामध्यें ब्रह्मविद्येची जी आज विटंवना चाललेली आहे; तिचें स्वरूप दाखविल्यानंतर पुढच्या पिढीला उद्देशून संसार कां केला पाहिजे, षड्रिपु त्यागापेक्षां त्यांच्या दमनाचीच आवश्यकता कशी आहे, आणि आजच्या कालांतील ईश्वरप्राप्तीचा राजमार्ग जर कोणता असेल तर तो समाज व राष्ट्रसेवा हाच कसा आहे, हें सोळाव्या प्रकरणाच्या अंतापर्यंत सांगितलें. इतकें झाल्यावर ग्रंथाचें काम संपलें ! म्हणजे काय चुकत आहे, काय नको आहे हें सांगितल्यावर काय केलें पाहिजे व तें कसें पाहिजे हेंहि विधायक दृष्टीनें सांगितलें, अर्थात् ग्रंथाची पूर्तता झाली !

तथापि सांप्रत समाजांत जी बुवाशाही बोकेशाहीप्रमाणें गाजत आहे तिचीं कांहीं उदाहरणें दिल्यावांचून हा ग्रंथ पुरा होत नाहीं; म्हणून कांहींच्या लीला वर्णन करून हा ग्रंथ पुरा करतों.

प्राचीन काळीं ढोंगी व लुच्च्या माणसाला बैडालव्रती असें म्हणत असत. ब्राह्मणामध्यें जे असे दांभिक असत त्यांना श्राद्धाचा क्षण देऊं नये असें स्मृतिग्रंथांत सांगितलेलें आहे. कांहीं ठिकाणीं तरी या अशा लुच्च्यांशी बालूं सुद्धां नये तर त्याजवर बहिष्कार घालावा असें म्हटलें आहे.

बैडालव्रतिकान् शठान् वाङ्मात्रेणापि नार्चयेत् ।

या बैडाल व्रताचा बोध एक बोकोबाच्या गोष्टीवरून चांगला होतो. त्या गोष्टीवरून बुवाशाही व बोकेशाही यांमध्यें साम्य आहेसें दिसतें.

बोकोबा उंदरावर जसे जगतात तसेच बुवाहि प्रज्ञाहत मनुष्यांवर जगतात. बुवा लोक प्रज्ञाहत करण्याकरितां अनेक कारवाया करितात तसेच बोकेहि करीत असतात. एका बोक्यानें गंगातीरावर कसें गमन केलें, उंदरांचा विश्वास बसावा म्हणून खोटी तपश्चर्या कशी आरंभिली, व शेवटीं तें सर्व कसें उघडकीस आलें; यावद्दल एक मजेदार आख्यान महाभारतांतील उद्योग पर्वामध्यें आलेलें आहे तेंच आतां येथें देतों.

एकदां एका दुष्ट बोक्यानें विचार केला की आपल्या भागांत कांहीं पोट भरत नाहीं, तेव्हां दूर कोठें तरी जावें आणि तेथें असलेल्या उंदरांमध्यें विश्वास उत्पन्न करावा व जगतां आलें तर पाहावें. अशा विचारानें तो गंगातीरावर येऊन वसला. प्रथम तपश्चर्या करीत आहोंत व अहिंसा आपला धर्म आहे हें समजावें म्हणून त्यानें आपल्या गळ्यांत एक फुटक्या मडक्याचें कडें अडकविलें. पुढील दोन्ही पाय वर करून मागचे पाय वाळूंत पुरून घेऊन डोळे मिटून तो असा ताठ वाळवंटांत उभा राहिला. एक दोन दिवस गेल्यावर अद्याप आपल्याकडे कोणीच कसे येत नाहींत, अशी त्याला चिंता वाटली. परंतु लवकरच त्याचें तें तपस्वीरूप पाहून आसपासचा पक्षिगण त्याच्या भोंवती जमू लागला. कोणी जवळ वसत, कांहीं चिमण्या त्याच्या डोक्यावर वसत, तथापि त्या बोकोबानें मोठी शांति धरून आपण शांतिदेव आहोंत असें भासविलें. एकदां बरेचसे पक्षी पुढें आले व म्हणाले 'महाराज खरोखर आपण आलां, फार चांगली गोष्ट झाली. ईश्वरी कृपाच म्हणावयाची ! आम्हा सर्व पक्षिगणांना केव्हां तरी येऊन बसावयाला हें विश्रामस्थ:नच झालें. आपण ही कडक तपश्चर्या कां आरंभली आहे ? आपणास कांहीं फळें वगैरे आम्ही आणून देऊं कां ?'

सर्व पक्षिगण आपणावर विश्वास ठेवून वागतो आहे असें पाहिल्यावर, बोकोबाला तपाला फल आलें व आपलें कार्यहि झालें असें वाटूं लागलें.

आत्मकार्यं कृतं मेने चर्यायाञ्च कृतं फलम् । ११ ॥ अ. १६०

तथापि अद्याप आपल्याकडे मूषकगण का येत नाहीं बरें, अशी त्याला चिंता उत्पन्न झाली. आश्चर्य असें कीं पुढें ४।८ दिवसांत हळुहळू उंदीरहि बोकोबाकडे येऊं लागले. गंगाकाठीं काळ्या रंगाचे, भुऱ्या रंगाचे लठ्ठ अर्थात् संपन्न असे बरेच उंदीर होते.

एकदां उंदराचा घोळका जमला होता, तेव्हां एक उंदीर म्हणाला, ' गडयांनो आपल्या या वाळवंटांत एक मोठे तपस्वी आले आहेत, ते फार सात्त्विक दिसतात. अशांच्याकडून आपल्या समाजाला कांहीं तरी लाभ करून घेतला पाहिजे. ' सर्व उंदीर म्हणाले 'ठीक आहे, तसें जर असेल तर पाहूं चला !!'

नंतर ते सर्व त्या वाळवंटांत गेले व या तपस्वी बोकोबाला नमस्कार करून म्हणाले, 'अहो महाराज, काय सांगावें बरें; काय हें आपलें वैराग्य, काय ही आपली तपस्या व काय हा आपला अनुग्रह! खरोखरी ईश्वरी कृपेमुळेच आपलें आगमन झालें आहे. आपण कांहीं झालें तरी जगाच्याच कल्याणाकरितां आहांत. तेव्हां आमची आपणास अशी आग्रहाची विनंति आहे कीं कसेंहि करून आपले पाय आमच्या वास्तव्यस्थानाला लागावेत.'

बोकोबा म्हणले 'हें काय, हें काय, ही विनंति कशाला ? मी येथें तपाकरितां आलों आहें.'

उंदीर म्हणाले, ' महाराज आपण धर्मपर आहांत, धर्मनिष्ठ आहांत, भूतदया व अहिंसा हें तत्त्व पाळणारे आहांत, तेव्हां कसेंहि करून आम्हां पामरांचें रक्षण करावें. आम्हाला शत्रु फार ! विशेषत: आम्ही बाहेर गेलों म्हणजे आमच्यांतील बाल व तरुण यांना फारच उपद्रव होतो. तेव्हां कसेंहि करून दीनदुबळ्यांचें रक्षण करावें अशी हात जोडून प्रार्थना आहे '

उंदरांचें हें केविलवाणें भाषण ऐकून बोकोबाला बरें वाटलें व तो म्हणाला, ' गडयांनो ' तुम्ही सांगतां हेंहि धर्मकार्य आहे व तप हा माझा धर्माचार आहे. पण एकटयाला या गोष्टी कशा साधतील ! तप करूं लागलों तर तुमचें रक्षण होणार नाहीं व रक्षणांत गुंतलों तर तपश्चर्येत खंड पडेल!!

द्वयोर्योगं न पश्यामि तपसो रक्षणस्य च । २६ । अ. १६०

मित्रांनो, मी येथें केवळ तपाकरितां आलों आहें, तेव्हां हें लचांड माझ्यामागें कशाला लावतां ? आतां तुमचा आग्रहच असेल तर नाइलाज आहे. कारण शरीर आहे तोंवर लोकसंग्रह केलाच पाहिजे. पण लक्षांत ठेवा, हा मी तपामुळें असा कृश झालों आहें, मला शक्ति नाहीं चालवत नाहीं. तुम्ही उचलूनच नेत असाल तरच मला येणें शक्य आहे.'

उंदीर म्हणाले, ' महाराज आपण कांहीं श्रम करूं नका, आपण नुसते

वसून रहा. आपलें अधिष्ठान व भ्रूसंकेत यामुळेंच आमचें कार्य घडून येईल' हे शब्द ऐकून बोकोबा मनांत संतुष्ट झाले व मग 'मला उचला अमें म्हणाले.



श्रद्धाळू उंदरांनीं बोकोबांना आपल्या प्रांतांत नेलें व आपलीं बिळें दाखविलीं !!!

झालें ! तपावर भाळलेले, ढोंगावर मोहित झालेले उंदीर प्रज्ञाहत झाले व त्यांनीं या बुवांना वाजत गाजत आपल्या खांद्यावरून मोठ्या समाधानानें आपल्या प्रांतांत नेलें. तेथें गेल्यावर उंदरांनीं आपलीं सर्व बिळें व आपला वृद्ध, तरुण समाज दाखवून दिला आणि ते निर्धास्तपणें आपल्या भक्ष्याकरितां नित्याप्रमाणें जाऊं लागले.

पहिले चारदोन दिवस जाऊं दिल्यावर या बोकोवांनीं हळुहळू उंदराचीं पोरें आपल्याशीं बागडण्याकरितां आलीं कीं तीं आत्मस्वरूपीं नेण्याचा उद्योग सुरू केला. तपानें वाळलेल्या आंतड्यांना स्निग्धता पाहिजेच होती

ती यामुळें मिळूं लागली. रक्ताला चटावलेलें त्याचें तोंड हळुहळू अनेक उंदरांना गट्ट करूं लागलें.

ततः स पापो दुष्टात्मा मूषकानथ भक्षयन् ॥
पीवरश्च सुवर्णश्च दृढबंधश्च जायते ॥ ३१ ॥ अ. १६०

या बोके महाराजांच्या प्रतापामुळें त्या उंदरांची संख्या हळुहळू कमी होऊं लागली. त्यामुळें त्या उंदरांत मोठी खळबळ उडाली. काहीं उंदीर म्हणाले 'हा मामा लुच्चा आहे, हा तपस्वी नाहीं, हा ढोंगी आहे, हा आमच्या भक्षणाकरितां आला आहे'! पण कांहीं प्रज्ञाहत उंदीर जे होते ते म्हणत "छे! हें शक्य आहे काय? तपस्वी मामा असें करील काय! इतक्या लांबून जो मामा या गंगातीरावर आला आहे तो आम्हांला खाण्याकरितां कीं काय?"

शेवटीं डिंडिक व कोलिक या दोन मपकांनीं मामाच्या पाळतीवर राहावें असें ठरलें. त्यांतील कोलिक हा फार शहाणा होता. तो हा बोकोबा जेथें शौचास बसे तेथें जाऊन ती विष्टा तपासून येऊं लागला. व डिंडिक हा खंडपुच्छ असल्यामुळें घरीं टपून बसला.

दोन दिवसांनींच गंमत अशी झाली कीं वृद्ध व बाल उंदरांबरोबर त्या डिंडिकालाहि बोकोबानें गट्ट केलें. शेपूट तुटल्यामुळें डिंडिक चांगला ओळखण्याजोगा होता. कोलिकानें सर्व मूषकगणांना जमविलें व म्हणाला, गडयांनो, गेल्या आठ दिवसांत तो खंडपुच्छ डिंडिकहि दिसत नाहीं. आमची संख्या तर फारच कमी होत चालली आहे आणि हा मामा मात्र लठ्ठ, गाजरासारखा लाल आणि मजबूत होत आहे. तेव्हां हा आपला हितकर्ता आहे का शत्रु आहे याचा विचार करा! तुम्हाला मामाची विष्टा दाखवितों, चला' असें म्हणाला. या मानभावी मामाची अगदीं ताजी विष्टा त्यांनीं पाहिली, तों त्यांत उंदरांचे केस व हाडें आढळलीं. कोलिक म्हणाला 'गडयांनो, कंद, मुळें व फळें खाणाऱ्याची ही विष्टा केशयुक्त अशी कां असावी बरें?'

न मूलफलभक्षस्य विष्टा भवति लोमशा ॥ ३९ ॥
अद्य सप्ताष्ट दिवसान् डिंडिकोऽपि न दृश्यते ॥ ४० ॥ अ. १६०

गडयांनो, अहो हा मामा, ढोंगी, लुच्चा आहे. हा तपाच्या

नांवावर आम्हाला फसवितो आहे. यानें केवळ ढोंग म्हणून हें तप आरंभिलें होतें. इतकें म्हटल्यावर ते सर्व उंदीर सावध झाले व पळून गेले. मायावी वोकोवानें आतां येथें राहाण्यांत अर्थ नाहीं असें ठरवून पलायन केलें.

मूषकासारखा लहान प्राणि जर अनुभवानें शहाणा होतो तर माणसांनीं निदान त्याचें अनुकरण तरी करावयास नको काय ?

बुवाशाहीचें बडें प्रस्थ उपासनी बाबा

(अनेक सद्गृहस्थांच्या सूचनांनुसार बुवाशाही विध्वंसक संघ स्थापन केल्याचें फेब्रुवारी १९३४ च्या किर्लोस्कर अंकांत घोषित केलें. त्यानंतर अनेकांच्याकडून अनेक बुवांबद्दल माहिती येऊं लागली. त्यांत उपासनीबाबा हे प्रमुख असल्यामुळें त्यांच्या संबंधाची माहिती स्वतः कांहीं ठिकाणीं जाऊन व कांहींना किर्लोस्करवाडींत बोलावून जमा केली. पांच हजार पृष्ठें छापील वाङ्मय वाचावें लागलें ! व जवळजवळ तितकीच माहितीचीं भिंडोळीं उस्कटावी लागलीं. सारांश, आठ महिन्यांच्या परिश्रमानें तयार केलेला पुढील लेख किर्लोस्करच्या ऑगस्ट १९३४ च्या अंकांत छापला. या लेखांतील कु. प्रेमाबाई वर्दे यांचे संबंधाचा भाग त्या विवाहबद्ध होऊन संसारास लागल्यामुळें गाळला आहे.)

उपासनी महाराजांचे सर्व शिष्य त्यांना 'बाबा' असेंच म्हणतात, म्हणून प्रस्तुत लेखांतहि महाराजांना उद्देशून 'बाबा' हा शब्दप्रयोग केला आहे. या बाबांचें सातशें पानांचें 'उपासनी लीलामृत' रं. गो. वकील हैद्राबाद यांनीं लिहिलेलें प्रसिद्ध झालें आहे. तसेंच बाबा ज्या ज्या वेळीं जें जें बोलले तेंहि श्रद्धाळूपणानें तारीखवार टिपून घेऊन 'साई वाक्सुधा' या नांवानें १९२३ ते २५ अखेरीचीं मोठ्या पांच भागांत सर्व प्रवचनें छापलेलीं आहेत. याशिवाय इतरहि छापील वाङ्मय पुष्कळच आहे. हें वाङ्मय, बाबांविषयीं अनेकांकडून आलेली माहिती, बुवांच्या नादीं लागून पोळलेल्या व पश्चात्ताप पावलेल्या अशा कित्येक भक्तगणांकडून आम्हांस समक्ष कळलेला वृत्तांत आणि प्रत्यक्ष आमच्या प्रतिनिधीनें जें समक्ष जाऊन पाहिलें, त्या सर्वांच्या आधारेंच प्रस्तुत लेख लिहून आम्ही आमच्या वाचकांस सादर करीत आहों.

उपासनीबाबांचे वाडवडील नाशिक जिल्ह्यांतील सटाणें येथें राह-

णारे होत. बाबांचे पूर्वज सर्व विद्वान् दिसतात. परंतु गोविंदशास्त्र्यांचा हा मुलगा काशिनाथ त्याला अपवाद दिसतो. मास्तरांनीं चोप दिला म्हणून प्राथमिक शिक्षणास त्यानें रामराम ठोकला! आजोबांनीं याचें लवकर लग्न केलें! घरची गरिबी म्हणून वैतागून देहत्यागाचाहि यत्न यानें केला. अल्प वयांतच एकामागून एक दोन बायका मेल्यावर तिसरेंहि लग्न झालें. त्यानंतर सांगलीच्या पाठशाळेंत येऊन या काशिनाथानें वैद्यशास्त्र व व्याकरण यांचें अध्ययन केलें! उमरावतीस या काशिनाथपंतांनीं श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्या आश्रयानें एक दवाखाना काढला व 'भेषज् रत्नमाला' या नांवाचें मासिकहि कांहीं वर्षे चालविलें. आठ नऊ वर्षें उमरावतीस काढल्यावर शके १८३२ पासून रा. काशिनाथपंत हे महाराज होण्याच्या मार्गाला लागले असें दिसतें. ॐकारेश्वर व अशाच कांहीं ठिकाणीं संचार झाल्यावर काशिनाथपत हे शिरडीस आले. शिरडी येथें श्री सांईबाबा हे राहात असत. त्यांच्याजवळ यांचा कांहीं काल गेला. चार वर्षें तेथेंच राहिलें पाहिजे, अशी सांईबाबांची यांना आज्ञा होती. शिरडीस असतांना श्रीमंत दादासाहेब खापर्डे हे या उपासनीबाबांना पंचदशी सांगत असत. अत्यंत अवघड विषय सुबोध व रसाळ भाषेंत सांगणारा दादासाहेबांसारखा वक्ता असतांनाहि उपासनीबाबांच्या मठ्ठ डोक्यांत कांहीं प्रवेश होत नसे. यावद्दल त्यांना वाईट वाटे. शिरडीस असतांनाच यांचें तृतीय कुटुंब वारलें. साईबाबांनी एके दिवशीं 'तुला आतां कळतां कळतां कळेल. अरे, कळावयाचें काय? आपल्या उपयोगाचें एवढेंसें आहे.' असें म्हणून बोटाचें एक कांडें अंगठ्यावर ठेवून दाखविलें आणि मस्तकावर हात ठेवले! झालें! आणि तेथून हे वैद्य काशिनाथशास्त्री उपासनी हे उपासनी महाराज बनले!

बाबांनीं आरंभलें बुवाशाहीचें जाळें हळुहळू पसरण्यास प्रारंभ केला. लोकहि असे भोळसर व श्रद्धाळू असतात कीं, ते कुणाच्याही मागें एकदां लागले कीं त्याला 'महाराज' बनवितात. ज्योतिषी व सामुद्रिक यांनीं येऊन बाबांना सिद्धपुरुष ठरविलें. ईश सृष्टींतील गूढ अनुभव बाबांना आला; अशा वार्ता त्यांच्या शिष्यशिष्यिणी बोलूं लागल्या. बाबांच्या बुद्धींत, डोळ्यापुढें व स्वप्नांतहि सिनेमाच्या फिल्मप्रमाणें अनेक अद्भुत वर्तुळें

दिसू लागली [illegible] बाबा हे उन्मत्तावस्थेमध्यें गेले. कधीं कधी बाबा अहमदनगर या शब्दावर अह—[illegible] म्हणजे अहंकार, वासना हेंच कोणी विष अशा कोट्या करून शिष्यगणांवर छाप पाडूं लागले; तर कधीं कधीं आपल्या अंगीं स्त्रीत्वाचा संचार झाला असें दाखवून स्त्रीत्वाचे चाळे करून, कुंकू लावून, बांगड्या भरून, लुगडेंहि नेसूं लागले. असल्या सर्व गोष्टींचें कौतुक करणारे शिष्यगण भेटले म्हणजे मग कोणाचेंहि महात्म्य वाढावयाला उशीर लागत नाहीं, तसेंच यांचेंहि झालें. शिर्डी, नागपूर व खरगपूर या भागांत बाबांचें वास्तव्य साधुपणाच्या पहिल्या दशेंत झालें. तेथूनच त्यांच्या प्रसिद्धीला सुरुवात झाली, असें म्हटलें तरी चालेल. तिकडे गेल्यापासून बाबा नग्न राहूं लागले, आणि विष्टा सावडणें, चिवडणें, अंगाला फासणें, चाटणें, मोरींतील पाण्यानें चूळ भरणें, गटारांत जाऊन लोळणें व उभें राहणें असले प्रकार करूं लागले. बुवा ज्या खापरींत शौच करीत, त्यांतच भिक्षेचें अन्न घेत व खात. (पृ. ३१२). सत्पुरुष म्हणजे वेडा, पागल अगदीं मूर्खासारखा वागणारा, तोंडाला येतील तसल्या शिव्या देणारा, उघड्या नागड्यानें पाहिजे तसा वावरणारा, कुठेंहि कांहींहि, कसलेंहि खाणारा व तसेंच बोलणारा असा असतो, अशी या लेखकाची समजूत दिसते व त्याप्रमाणेंच त्यानें बाबांचें लीलामृत प्रकरण ९ ते १६ पर्यंत रंगविलेलें आहे. महारवाडा, भंगीवाडा येथेंहि बाबा जात, तेथेंहि लीला करीत आणि व्यापारी, पेन्शनर, रेल्वेंतील नोकर हे सर्व आपापल्या स्त्रियांसह यांना भजत. त्या नग्न बाबांना न्हाऊं घालीत (पृ. २७७) आणि प्रेमालिंगनेंहि देत असत (पृ. ३८९). बाबांना मुळव्याधीचा विकार असल्यामुळें रक्त पडणें आणि शौचाला न होणें, हें एक मोठेंच प्रकरण असल्यामुळें शौचविधीच्याहि बऱ्याच लीला ग्रंथामध्यें वर्णिल्या आहेत. बाबांचे पाय ज्या पायखान्याला लागत त्या पायखान्याची पूजा बायांनीं केली, व बाबांच्या सांगण्यावरून मोरी हेंच बाबांचें तोंड समजून मोरींत चहाच्या किटल्या ओतल्या; इतकेंच नव्हे तर चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशीं संक्रांतीचा सणहि बाबांनीं सांगितल्यावरूनच स्त्रीपुरुषांनीं पाळला! लिंब खाण्याचे ऐवजी तिळगूळ खाऊन सुगड्याचीं वाणें दिलीं आणि ध्वजावंदन न करितां तिलतर्पण करून संक्रांतीनिमित्त श्राद्धहि केलें. अंधश्रद्धेचा कडेलोट म्हणतात तो हाच

आणि सत्पुरुषाला प्रसन्न करून घ्यावयाचें म्हणजे आपली बुद्धि गहाण ठेवून अंध श्रद्धेनें सत्पुरुष जें वेडेंवांकडे सांगेल तें तें सर्व श्रद्धेनें ऐकावयाचें अशी जी लोकांची समजूत आहे तिचें प्रत्यंतर (पृ. ३९८) उपासनी लीला-मृतांतील प्रत्येक पानांत दृष्टीस पडतें.

एक बाई बाबांकडे पूजा करावयास आली. बाबा म्हणाले, 'पायाची पूजा न करतां माझ्या गुवाची पूजा कर; कारण जगांत सर्व गूच आहे, आणि गुवापासून जग झालें.' झालें! त्या बाईंनींहि म्हणे तसेंच केलें! धन्य ती बाई व धन्य तो बुवा! यांत ईश्वरप्राप्तीचा मार्ग कोणता हें कळणें कठिण आहे! (पृ. ३५७).

बाबांच्या प्रवचनामध्यें अनेक विषय आहेत. त्यांतल्या त्यांत कन्या-अर्पण, कुमारी पूजन, स्त्रीपुरुषांचीं जननेंद्रियें आणि मलमूत्रें यांची पुनरुक्ति फार झाली आहे आणि सर्वत्र ठराविक कोट्या केलेल्या आहेत, त्या कोट्या युक्ति व भाषाशास्त्र या दृष्टीनें किती योग्य आहेत हे वाचकांनींच पाहावें! 'न अरिः विद्यते सा नारी' शत्रु जिला नाहीं अशी, 'कम् नीयते सा कन्या' म्हणजे ब्रह्माप्रत नेणारी, भंग ज्याचा होत नाहीं तो भंगी, अर्थात् ईश्वर, 'गाम् ददाति' म्हणजे गांड, 'गुवम् ददाति' म्हणून गुद, असल्या अश्लील ग्राम्य कोटयांचा उल्लेख करणेंहि आमच्या मोठें जिवावर येतें; पण त्या-खेरीज बाबांच्या विद्वत्तेची खरी कल्पना येण्यासारखी नसल्यानें आम्हांस तसें करणें प्राप्त आहे.

बाबांच्या चरित्रांत त्यांच्या भक्तगणांनीं अनेक चमत्कार वर्णिले आहेत. बुवा आणि चमत्कार म्हटले कीं, कां व कसें हें विचारावयाचेंच नाहीं! म्हणून पाहिजे ते चमत्कार दडपून द्यावेत असा प्रघात पडलेला आहे. या प्रज्ञाहत भक्तांना एवढें कळावयास पाहिजे कीं, जो एवढें पाहिजे तसें अघटित करतो त्याला आपल्या मूळव्याधीची व्यथा कां घालवितां आली नाहीं? मूळव्याधीच्या शस्त्रक्रियेकरितां बाबांना मिरजेच्या वॉनलेसकडेच यावें लागलें! आणि तेथेंहि बाबांचा प्रभाव न पडल्यामुळें मिरजेच्या सरकारी दवाखान्यांत परें होण्याकरितां त्यांना पडावें लागलें. ही जर वस्तुस्थिति आहे तर बाबांच्या दर्शनानें व स्पर्शनें, उदीनें व प्रसादानें अनेकांचे अनेक रोग गेले, अनेकांना वरें वाटलें इत्यादि वर्णन करण्यांत काय हंशील आहे?

बाबांना जर स्वतःचा देहभोग टाळतां येत नहीं तर ते दुसऱ्याचा कसा टाळणार ?

पुरुषांचें हरतालिका पूजन !

उपासनीबाबांचें सर्वच कांहीं और ! हरतालिकेची पूजा स्त्रिया करतात, असें असतांना उपासनीबाबा हें व्रत पुरुषांचेंहि आहे असें म्हणतात, आणि पुरुषांना लुगडीं नेसावयास लावून स्वतः शंकर होऊन पूजा करून घेतात हा काय चमत्कार पहा ! ! (पा. ६३७). 'हरतालिकेच्या दिवशीं शेंकडों भक्तमंडळी साकोरीस होती, त्यांतील सर्व पुरुष लुगडीं, चोळ्या, बांगड्या, गळेसर, कपाळास कुंकूं असे स्त्रीवेष घेऊन आणि पूजा-साहित्य घेऊन दुपारच्या महाराजांच्या आरतीच्या वेळेस महाराजांच्या झोंपडींत सर्व जमले. महाराज स्वतः हरतालिका व प्रत्यक्ष शंकराची मूर्ति असें समजून त्या वेषधारी सर्व स्त्रियांनीं महाराजांची पूजा करून नेहमीप्रमाणें त्या दिवशीं आरती झाली. हा अपूर्व प्रसंग पाहून सर्वांस मोठी गंमत वाटली व ह्याचा परिणाम आपल्याला परमार्थ दृष्टीनें फारच चांगला होणार अ.हे असें ते मानूं लागले ! त्यावेळीं स्त्रीवेषांत बापूसाहेब जोग, वकीलमामा, दत्तोपंत पिसोळकर वगैरे मोठमोठी ब्राह्मण मंडळी शिवाय मोठमोठे अधिकारी, पारशी, गुजराथी, मद्रासी वगैरे सर्व पुरुष-मंडळी होती.' तात्पर्य, बाबांच्या चरित्रांत शास्त्र व तर्कविरुद्ध अशा गमती पुष्कळच आहेत !

पैसे काढण्याचे प्रकार

कोणतेहि महाराज स्वतः अगदीं विरक्त आहों असें दाखवितात व पैशाला शिवत देखील नाहींत ! बरोबरच आहे ! शिष्य व कारभारी यांनीं पैशाचे व्यवहार परस्पर ठरविले आणि देणेंघेणें केलें म्हणजे महाराजांना द्रव्याला स्पर्श करण्याची तरी काय जरुरी आहे ? द्रव्याला स्पर्श न करतां त्यावर मालकी स्थापितां आली आणि उपभोग घेतां आला म्हणजे बस्स आहे. पान ५९३ मध्यें लेखक लिहितात कीं, 'महाराज पुढें आलेल्याला हात. न लावतां उठून जातात. मग कोणी तरी ठरलेला मनुष्य (कारभारी) त्याची व्यवस्था पाहातो व त्याची व्यवस्था महाराजांच्या आज्ञेप्रमाणें होते.'

महाराजांच्या मठांत कांहींही न घेतांच तीनचार लाखांची मिळकत झाली आहे ! जमाखर्च, कोर्टें, कचेऱ्या वगैरे सर्व शिष्यगणच पाहातात. साकोरी येथें बाबांच्या दर्शनास शेंकडों लोक जात असतात. त्यांत धर्मभोळे, श्रद्धाळू व महाराज म्हणतील तें खरें असें समजणारे पुष्कळ लोक असतात, अशा येणाऱ्या-जाणाऱ्यांना चाचपून पाहून कोणाच्या मेंदूचा पेच किती ढिला आहे हें पाहण्याचें काम बाबांच्या भोंवतालचे शिष्य करतात.

गव्हर्नरांना भेटण्यास कोणी मनुष्य गेला तर त्याचा सर्व इतिहास जसा तेथें असतो व तो लाटसाहेबांच्या कानांवर जसा पूर्वी घातला जातो तसें येथें होतें. असले भक्त आल्यावर महाराज एकदम 'या शंकरराव, या गजाननराव, या माधवराव, काल स्वप्नांत मी आपणांस पाहिलेंच आहे, आपण अमुक अमुक सत्कर्में केलीं आहेत व ईश्वराची तुमच्यावर कृपा आहे.' असें म्हणून महाराज अशा लोकांना खूप चढवितात आणि ज्ञान, व्रत व अन्नसंतर्पण यांचें महत्त्व सांगून अनेक गोष्टी करावयास लावतात. त्याचा एक अगदीं घडलेला मासला येथें देतों.

वृद्ध बाई-महाराज, आपलें दर्शन झालें, मी कृतार्थ झालें. मला साक्षात् दत्तमहाराजच भेटले.

बाबा-अहो बाई, आलांत फार चांगलें झालें. मी दत्तमहाराज नव्हे; पण काल स्वप्नांत दत्तमहाराज आलेले मी पाहिलें. त्यांच्या शेजारीं अगदीं आपल्यासारखीच वृद्ध व काळी स्त्री होती. दत्तात्रय तिला म्हणाले कीं, आमची सेवा कर म्हणजे आम्ही तुझ्याजवळच आहोत.

वृद्ध बाई- (आश्चर्यानें) आपल्या स्वप्नांत माझ्यासारखी बाई व दत्तमहाराज ! मग आतां आपली आज्ञा तरी काय ?

बाबा-आज्ञा ती काय ! हजारबाराशें रुपये खर्चून श्रीदत्ताच्या पादुका येथें स्थापन करून त्यांची सेवा करीत बैस. तुला सेवा न करतां आली तर दरमहा दहा रुपये देऊन एक ब्राह्मण ठेव.

वृद्ध बाई-एवढी मोठी रक्कम मला शक्य नाहीं, तेव्हां काय करूं ?

बाबा-शक्य नसावयाला काय झालं ? तुह्मां बायकांच्या जवळ पैसे नसले तरी जिन्नसपान्नस असतात. तेव्हां एकदोन जिन्नस मोड व दे हजार रुपये माझ्याकडे.

शेवटीं बाबांनीं हजार रुपये तिजकडून काढले. दोनशें रुपये खर्चून पादुका वसविल्या असें सांगितलें व बाकीचे आठशे रुपये ब्रह्मस्वरूप झालेल्या या बाबांनीं ब्रह्मार्पण केले !

साजूक व घाऊक गिऱ्हाइकें पाहून, व्रतें सांगून, उद्यापनाकरितां आधी पैसे मागून घेण्याची सुन्दर हातोटी बाबांजवळ आहे. पतिनिधनानंतर धर्म-भोळ्या संपन्न विधवा स्त्रिया बाबांकडे येतात. पतिविरहानलांत जळत असल्यामुळें बाबांच्या प्रवचनांचा त्यांच्यावर परिणाम होतो. हळुहळू श्रद्धेमुळें बिचाऱ्या आपलें डबोलें बाबांच्या स्वाधीन करतात व पैसे संपल्या-वर स्वत:ची स्थिति मोलकरणीपेक्षांही वाईट करून घेतात. सर्वस्व गमाव-लेल्या,पश्चात्तापानें पोळलेल्या अशा किती तरी विधवा साकोरीचा आश्रम सोडून शिव्याशाप देत चालत्या होत असतात.

एकदां एक श्रीमंत भाविक गृहस्थ काशीयात्रेच्या तयारीला लागले.इत-क्यांत एकानें त्यांना एक उपासनी–चरित्र वाचावयास दिलें, तें वाचल्यानंतर काशीला जाण्यापूर्वी साकोरीस जावें असें त्यांनीं ठरवलें व ते गेले. या गृहस्थाची माहिती शिष्यांनीं आगाऊ जमवून महाराजांना सांगितली होती. हा गृहस्थ आल्यावर बाबांनीं काल रात्रीं मला स्वप्न पडलें अशी प्रस्ता-वना करून खडान्खडा माहिती अंतर्ज्ञानानें सांगितली ! त्या गृहस्थाचा विश्वास बसला व आतां काशीला कशास जाऊं, असें म्हणून त्यानें तेथेंच गुरुपदीं पिंड अर्पण केले! व१००१ रुपये दक्षणा दिली.तेव्हांपासून पिंड अर्पण करणें, श्राद्ध करणें हें साकोरीस सुरू झालें आहे. काशीयात्रेनिमित्त होणारा सर्व खर्च त्या गृहस्थानें बाबांच्या चरणीं अर्पण केला. हा गृहस्थ पुढें दरसाल तेथें वाऱ्या करूं लागला, धर्मशाळेकरितां यानें पुढें बाबांना सोळा हजार रु. दिले; पण त्यांनीं ती न बांधतांच बांधलेली धर्मशाळा तुमची आहे असें सांगितलें. असेच निरनिराळ्या रूपानें पन्नास हजार रुपये ह्या गृहस्थांकडून काढले आहेत, असें समजतें !

पिंजरा प्रकरण !

जितका विक्षिप्तपणा अधिक तितकें साधुत्वहि श्रेष्ठ दर्जाचें अशी लोकांत समजूत आहे. अर्थात् साकोरीस बाबांनींहि एकदां असा विक्षिप्त-

पणा केला कीं, एक वेळवाचा पिंजरा तयार करून त्यांत त्यांनीं स्वत:ला अडकवून घेतलें. महाराज पिंजऱ्यांत अडकले असें समजतांच भक्तगणांनीं मोठा उत्सव सुरूं केला, नामसप्ताह सुरू केले व पुढें त्याच पिंजऱ्यांत महाराजांच्या अंगांत स्त्रीत्वाचा संचार होऊं लागला. झालें! महाराज



स्त्रीवेषधारी बाबा

लुगडें नेसून, मळवट भरून, कांकणें घालून पिंजऱ्यांत बसल्यावर मग काय विचारतां! स्त्रियांनीं लुगडीं, खण, नारळ, सोन्यामोत्यांचे दागिने असें सर्व भराभर अर्पण केलें!

एका बाईनें सोन्याच्या बांगड्या बाबांच्या हातांत घातल्या. त्यावर ते म्हणाले, 'या बांगड्या आल्या! मी बायको असल्याचा अनुभव मला वरचेवर येतो. आज कृष्णजन्मानिमित्त या सोन्याच्या बांगड्या बाळंतविडा म्हणून आल्या आहेत. मला सौभाग्य वाहण्यांत वाहणारांचें सौभाग्य कायम राहण्याचा उपाय आहे. माझें सौभाग्य अखंड आहे. मी अखंड सौभाग्यवती आहें; म्हणून जिनें हें दिलें तिचेंही सौभाग्य कायम होऊन जाईल. बरें राहूं दे.' (वाक्सुधा, ऑगस्ट १९२४).

दुसऱ्याचें द्रव्य साळसूदपणें गट्ट करण्याच्या युक्त्या जगांत कशा आहेत याचा हा एक नमुना आहे.

एकदां एका बाईनें महाराजांना मंगळसूत्र अर्पण केलें. त्यावर महाराज म्हणाले, 'काय सांगावें व काय करावें ? लोक म्हणतील किडुक मिडुक बाबा काय जमवीत बसले ? परंतु न घ्यावें तर त्या गरीब बाईचा तरी उद्धार कोण करील ? ती गरीब आहे म्हणून तिचें मला घेतलेंच पाहिजे ! ' (वाक्सुधा, ऑगस्ट १९२४). कोण हा कनवाळूपणा व काय ही उद्धाराची तळमळ ! गरिबांचे पैसे व बायाबापड्यांची चीजवस्त उपटून त्यांचा उद्धार करण्याची ही कला मोठी और आहे ! कारण सर्वस्व हरण केल्याशिवाय अनुग्रह होत नाहीं ! स्त्रियांकडून दागिने उपट, गोरगरिबांकडून द्रव्य घे, असा क्रम चालतोच ! पण याशिवाय द्रव्य मिळविण्याच्या आणखी अनेक कला आहेत.

पुष्कळ आईबाप आपल्या ुलींसह तेथें आले म्हणजे बाबा व त्यांच्या भोंवतालचे गण मुली ठेवण्याबद्दल हळूच गोष्ट काढतात. नव्या अल्लड मुलींना त्या टिपऱ्या, तो नाच आणि एकंदर प्रकार प्रथम बरा वाटतो, व त्या तेथें राहूं इच्छितात. पुढें बाबा हे कांहीं दिवसांनीं प्रत्येक मुलीमागें खर्चाकरितां दहा रुपयांची मागणी करतात व कोणी भक्त आले म्हणजे कन्याकुमारीपूजनालाहि पैसे मागतात. तात्पर्य, पैसे मिळविण्याची ही एक चांगलीच बाब तेथें आहे. गोकुळ अष्टमी, संक्रांत व शिवरात्र हे तीन दिवस फारच प्राप्तीचे आहेत. गोकुळअष्टमीस बाबा कृष्ण होतात व अनेक स्त्रिया गोपीभावानें त्यांना सर्वस्व अर्पण करतात ! संक्रांतीच्या दिवशीं बाबा स्वतःच (संक्रांत होऊन) स्त्रीस्वरूपी बनतात. अर्थात् अनेक स्त्रिया त्यांच्या चरणीं आपलीं सौभाग्यचिन्हें अर्पण करतात. शिवरात्रीच्या दिवशीं बाबा साक्षात् दिगंबर शंकर बनतात व पार्वतीप्रमाणें स्त्रियांकडून पूजा करून घेतात.

स्थावर इस्टेटहि बाबांनीं बरीच केली असून कोपरगांवच्या कोळी लोकांनीं याबद्दल बाबांच्यावर एक दावा लावलेला होता; नुकताच हा दावा कोळ्यांना अनुकूल झाला.

बाबांच्या नांवावर अद्भुत कथा व चमत्कार लीलामृतांत व लोकवार्तेत पुष्कळच आहेत. पण बाबा स्वतः म्हणतात कीं मी कांहीं चमत्कार करीत नाहीं. लोक फक्त उगाचच्या उगाच चमत्कार उठवीत असतात. प्रत्यक्ष

चमत्कार कोणाहि भक्तानें पाहिलेला नाहीं! नागपूरच्या लोकांनीं जबलपुरचे चमत्कार सांगावे व कोल्हापूरच्या लोकांनीं नागपूरचे चमत्कार सांगावे आणि पुण्याच्या लोकांनीं बाबांचे मुंबईतील चमत्कार वर्णन करावे, असें हे खूळ आहे. खरी स्थिति ही कीं, एकहि चमत्कार कोणीहि पाहिलेला नाहीं. कारण तो मुळीं झालेलाच नसतो.

येथवर बाबांच्या सामान्य बुवाशाहीचें विवेचन झालें. त्यावरून बुवा, बाबा व त्यांचे शिष्य लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकून, त्यांना कसे लुबाडीत आहेत याची बरीचशी कल्पना वाचकास येऊं शकेल. समाजाच्या अंध श्रद्धेचा व भोळेपणाचा बुवा कसा फायदा घेतात, याचें हें एक ढळढळीत उदाहरण आहे. बाहेर लोकांना दाखविण्यापुरतें तरट नेसावयाचें, व एकीकडे आपण ऐहिक गोष्टींविषयीं अत्यंत निरिच्छ आहोंत अशी बतावणी करावयाची व दुसरीकडे बँकेशीं व्यवहार चालू ठेवून त्यांत लाखों रुपयांची ठेव जमवावयाची, यावरून हा बाह्य विरक्तपणा किती ढोंगीपणाचा आहे हें सहज दिसून येण्यासारखें आहे. पण समाजामध्यें कांहीं दुधखुळे हे नेहमीं असावयाचेच; व त्यांना लुबाडणारेहि सांपडावयाचेच; हा सर्वसाधारण नियम आहे. लोकांना नाना तऱ्हेच्या थापा मारून त्यांच्या कडून पैसे उकळण्याचें काम बुवांनीं व बाबांनीं केलें असतें तरीहि त्यांचें काम अत्यंत भयंकर आहे असें म्हणतां आलें नसतें. पण जेव्हां ते अशा जमलेल्या पैशाच्या जोरावर असहाय्य स्त्रियांना आपल्या जाळ्यांत पकडून त्यांच्या आयुष्याचें मातेरें करतात, तेव्हां समाजहिताच्या दृष्टीनें बाबांच्या कृत्याबद्दल कोणाहि विचारी मनुष्याला अत्यंत चीड आल्यावाचून राहणार नाहीं. बाबांनीं साकोरी येथें जो पिंजरा केला आहे, तो या दृष्टीनें पाहतां अजाण व भाबड्या तरुण स्त्रियांना आपल्या पाशांत पकडण्याचा खरोखरच भीषण पिंजरा आहे! त्यांत एकादी स्त्री अडकली म्हणजे ती जगाला कायमची मुकली असें मानण्यास हरकत नाहीं. अशा बिचाऱ्या किती तरुण स्त्रियांचा या पिंजऱ्यानें बळी घेतला असेल हें सांगतां येण्यासारखें नाहीं! तेव्हां बाबांनी परस्त्रिया आणि कुमारिका, यांना स्वतःला अर्पण करून घेऊन धर्माच्या नांवाखालीं जो राजरोस कुंटणखाना स्थापन केला आहे, त्याजबद्दल थोडीशी माहिती दिल्याखेरीज त्यांचें चरित्र पुरें होणार नाहीं.

उपासनी बाबा व स्त्रिया

या बाबतींत बुवांनी जी युक्ति काढली आहे ती सर्वांत अजब आहे. ब्राह्मण, मराठे, प्रभु, अशा सर्वांच्या मुली अर्पंग करून घेऊन त्यांनीं एक मोठीच क्रांति चालविलेली आहे. आपल्या पदरच्या एका नोकरास त्यांनीं प्रथम 'तुझी कन्या मला अर्पण कर' असें सांगून कांहीं द्रव्य देऊं केलें. त्यानें कन्या अर्पण केली व दोन हजार रुपये घेतले म्हणे ! सिद्धावस्थेंतील बाबांचें हें पहिलें लग्न होय ! अर्पणविधी होतांच बाबांनीं 'ही कन्या मोठी देवता होईल' वगैरे म्हणून तिची स्तुति केली; पण पुढें या मुलीला त्या म्हाताऱ्या नवऱ्याची किळस आली व तिनें तेथून पोबारा केला !

हल्लीं बाबांच्याजवळ ज्यांचें मोठें प्रस्थ आहे अशा **सती गोदावरीबाई** होत. तिला तिच्या नवऱ्यानें म्हणे अर्पण केलें ! बाबांचें ध्यान पुढीलप्रमाणें आहे.

सुंदर तें ध्यान शोभे पिंजऱ्यांत । अंगावरी तरट घेऊनीया ॥ धृ० ॥
गळां घालुनियां तरवडयांचा हार । मूर्ती दिगंबर शोभतसे ॥ १ ॥
पूर्ण परब्रह्म दिसे पिंजऱ्यांत । गोदावरीसहित सगुण तें ॥ २ ॥
ऐशा पिंजऱ्याचें घेतां दर्शन । पापाचें क्षालन होत असे ॥ ३ ॥

एकदां २५-२६ वर्षांचे अगदीं तरुण विरक्त गृहस्थ बाबांच्याकडे आले, व त्यांनीं सद्गुरुचरणीं आपल्या स्त्रीला कायमचा सहवास मिळावा असें म्हणून प्रार्थना केली. महाराजांनीं अनुमति देतांच त्यानें तुलसी-मिश्रित पाणी घेऊन व तिचें आपल्या हातानें घातलेलें मंगळसूत्र वगैरे सौभाग्य आपल्या हातांत घेऊन त्यासह स्वस्त्रीचें महाराजांच्या चरणावर पाणी सोडलें! पुढें हा अर्पणविधी सशास्त्र व्हावा म्हणून या गृहस्थानें त्र्यंबकेश्वरीं जाऊन पुन्हा तिचें अर्पण केलें! (पा. ६४६) तथापि चोकशीअंतीं जी माहिती मिळाली ती अशी:- गोदावरी ही मुंबईच्या एका वकिलाच्या कारकुनाची विवाहित स्त्री. चारदोन वेळां महाराजांकडे गेल्यावर या सुस्वरूप बाईचा तेथें बुद्धिभेद केला गेला, म्हणून ती पुढें नवऱ्याकडे जाईना. कारकुनानें 'बाबांना वायको फितविल्याबद्दल' नोटीस दिली व तिची मागणी केली. त्यानंतर बाबा घाबरले व "रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति" असें

करून त्या गृहस्थांना बरीच मोठी रक्कम पुढें बाबांनीं दिली, असें कांहीं भक्तगण सांगतात. हा गृहस्थ पुढें या बायकोशीं जमणार नाहीं असा विचार करून निघून गेला.



बाबा व त्यांच्या पारमार्थिक पत्नी गोदावरीबाई

याप्रमाणें ही बाई आपलीशी केल्यावर मग ती सती, योगिनी अशी झाली आहे. तिजबद्दल बाबांनीं हिला वाचासिद्धि प्राप्त होईल असें पुष्कळ भविष्य केलें होतें; पण अद्याप त्यांतील कांहींही खरें झालें नाहीं असें भक्तगण सांगत आहेत. ही खास गोदावरी असूनहि तिचें पावनत्व अद्याप जगाला दिसत नाहीं! ही दररोज निरनिराळीं जरीचीं पातळें नेसते, केव्हां कासोटा घालते केव्हां घालीत नाहीं. कानांत हिऱ्याच्या कुड्या, हातांत व गळ्यांत सोन्याचे दागिने, नाकांत चमकी अशा शृंगारानेंच ही बाई सारखी पांच मण चांदीच्या पिंजऱ्यांत बसलेली असते. पाय बाहेर काढल्यावर फुलें वाहून भक्त पूजा करतात. पिंजऱ्यांत बसून तिला कंटाळा आला कीं पेंग येतो. भक्तगण गोदावरीबाईंची समाधि लागली असें कौतुकानें म्हणतात! महाराज आल्यागेल्यांना हिचा महिमा सांगून सेवा करण्यास प्रवृत्त करतात. महाराजांचा बराचसा काळ या बाईच्या व या बाईशीं गप्पागोष्टी करण्यांत जातो.

अनेक श्रीमंत व धर्मभोळ्या लोकांच्या मुली अर्पण करून घेऊन, त्यांचे जांवई बनून, बरेंच द्रव्य संपादन करण्याचा हा धंदा दिसतो ! किंवा जोगत्या, मुरळ्या व देवदासी यांची चाल बंद व्हावी म्हणून कायदा व्हावा असा प्रयत्न चालूं असतांना त्याच्या उलट ही प्रतिक्रिया दिसते. परमेश्वराशीं लग्न लावणें काय व परमेश्वरस्वरूप झालेल्या ब्रह्मनिष्ठ म्हणवून घेणाऱ्याशीं लग्न लावलें काय दोहोंचा अर्थ एकच, कीं स्त्रियांनीं देवाच्या नांवाखालीं पाहिजे तसें वागावें. कार्तिक शुद्ध द्वादशीस प्रतिवर्षी हा कन्याअर्पणविधि होत असतो. महाराज हातांत बाळकृष्ण घेऊन सप्तपदी करून घेऊन कन्या अर्पण करून घेतात. पार्शी, गुजराथी, प्रभु, ब्राह्मण, अशा सर्वांच्या मुली त्यांना अर्पण झालेल्या आहेत.

महाराजांना जे इतके लोक मुली अर्पण करतात ते खरोखरी मूर्ख नसावेत, किंवा अर्पण होणाऱ्या मु ीहि वावळट नसाव्यात. साठ पासष्ट वर्षांच्या म्हाताऱ्याला आपल्या पोटचे गोळे परमार्थाकरतां उगाच कोण अर्पण करणार? अर्थात् या कन्यार्पणाबद्दल त्यांच्या पित्यांना कांहीं मोबदला मिळतो कीं काय असा संशय येतो. हल्लीं बेकारी व चैनीची वृत्ति माजल्यामुळें पैशाकरितां कन्येचा विक्रय करण्यास आईबाप तयार होणार नाहींत असें नाहीं. कांहींना रकमा मिळाल्या असाव्या, कांहींना मिळण्याचीं आश्वासनें असावीं. व जी जी नवी मुलगी अर्पण होण्यास येते तिला तर 'येथील सर्व तुझेंच आहे' असें निःसंशय सांगितलें जातें. महाराजांजवळ ज्या आज मुख्य मुख्य स्त्रिया आहेत त्या तेथें आलेल्या मुलींचा बुद्धिभेद करतात. त्या म्हणतात, 'सत्पुरुष हाच अखंड नवरा. इतर नवरे कशाला करतां? हा सत्पुरुष तुम्हाला दागिने देईल, मोटार देईल !' महाराजहि आईबापांना म्हणतात कीं 'अहो, सर्वच मुली पोरें काढण्याकरितां कशाला देतां ? एखादी तरी मुलगी ईश्वरभक्तीकडे द्या.' असल्या बोलण्याची भुरळ मूर्ख व मतलबी मुलींवर व आईबापांवर पडते व त्यामुळें पुष्कळ मुली तेथें येतात.

कित्येक मुली वयांत आल्यावर त्यांना तेथील किळसवाणे प्रकार न आवडून पळून गेलेल्या आहेत. कांहीं मुलींनीं तर आपले तेथील अनुभवहि सिद्ध केले आहेत व मुलींच्या शाळांतून तीं पत्रकें वाटलेलीं आहेत. कांहीं



महाराज हातांत बाळकृष्ण घेऊन सप्तपदी करीत आहेत. (पृ. २१५)

स्थळ प्रत
सं. ..... नं. .....
दा. ..... दा. ओ.

मुलींच्या आईबापांनीं पुनः त्यांचीं लग्नेंहि करून दिलीं आहेत. धर्मदृष्ट्या कन्याविक्रय करणें हें कर्म अधोगतीचें असतांना आणि आजच्या व्यवहाराच्या दृष्टीनें अज्ञान मुलीचें लग्न करणें हें गैरकायदा असतांना असले प्रकार होतात, हेंच मोठें आश्चर्य होय.

बाबांच्या दरबारांत पुरुषापेक्षां स्त्रीला व पुत्रापेक्षां कुमारीना महत्त्व फार आहे ! पुरुषांना दर्शनाला जाण्यास बंदी; पण स्त्रियांनीं दर्शनासच नव्हे तर सेवेसहि दिवसा अगर रात्रीं केव्हांहि जावें ! सेवेस आलेल्या सुंदर व तरुण स्त्रियांशी बाबा हितगुज करतात व म्हणतात कीं, 'कशाला संसार करतेस, मला अर्पण होऊन ईश्वरप्राप्ति करून घे ' कांहीं संभावित व स्वाभिमानी स्त्रियांना बाबांचीं हीं बोलणीं आवडलीं नाहींत व त्यांनीं तीं आपल्या पतींच्या कानांवर घातलीं. त्यासरशी एकीचा नवरा सुरा घेऊन बाबांना भोंसकण्यास आला व दुसरा असाच एक गृहस्थ याच कारणामुळें जोडा घेऊन अंगावर आला ! ! तिसरा एक मनुष्यहि असाच प्रकार ऐकून सोटाच घेऊन धांवला ! हीं प्रकरणें पैसे भरून मिटवितां मिटवितां पुरे वाट झाली असें कांहीं गृहस्थांनीं आम्हांस समक्ष सांगितलें आहे. असल्या वेडयावांकडया प्रकारामुळें कुटुंबवत्सल लोक बायकांसह म्हणे हल्लीं तेथें जात नाहींत.

'उपासनी नगरींत गोदान, वस्त्रदान, अश्वदान, कन्यादान यांचें महत्त्व फार आहे. बाबा दानाची महती फारच सांगतात. 'मनुष्याचे सर्व श्रम पैशाकरितां होतात, म्हणून पैसा हें सर्वस्व होय ! तो पैसा दान करणें हेंच महत् पुण्य होय ! सर्व दानांत गोदान श्रेष्ठ व गाईपेक्षां कन्यादानाचें फल विशेष होय ! कन्या अर्पण करणें म्हणजे मातापितरांनीं स्वतःला ईश्वरार्पण करणें होय ! म्हणून 'ब्रह्मस्वरूपिणे वराय' अशा अर्थाच्या भावनेनें ती समर्पण केली जाते.'

वाचकहो ! येथें तर या बुवानें अगदीं कळसच केला आहे. कित्येक हुना धर्मभोळ्या, भाविक अशा श्रीमंत व गरीब शिष्यांच्या मुली स्वतःला मिळाव्यात म्हणून त्यांनीं हें मतलबाचेंच शास्त्र सांगितलेलें आहे. कन्या अर्पण करणें म्हणजे स्वतःला ईश्वरार्पण करणें असें मुळींच नव्हे. 'ब्रह्मस्वरूपिणे वराय' असें कोणत्याहि विवाहप्रयोगांत कोणीहि म्हणत नाहींत

तर ' लक्ष्मीनारायणस्वरूपिणे वराय ' असें प्रयोगांत आहे व तसेंच म्हणतात. धर्मशास्त्रांत विवाह हा रति–सुख, पुत्र व धर्माचरणाकरितां सांगितला असून विरक्त, संन्यासी व ब्रह्मनिष्ठ यांना मुलगी देऊं नये असें स्पष्ट म्हटलेलें आहे. मुलगी देण्यांत तिचा वंशविस्तार व्हावा हा हेतु असतो, स्वतः ब्रह्मस्वरूप होण्याचा नसतो, हें वाचकांनीं विसरूं नये.

मनुष्याच्या भाषणावरून, बोलण्यावरून आणि भाषेवरून त्याची सस्कृति कोणच्या दर्जाची असावी याची कल्पना येते. फुलावरून झाड ओळखावें आणि बोलावरून मन ओळखावें अशी म्हण आहे. ती जर या बाबांना लागू केली तर हा मनुष्य मोठा भयंकर मनुष्य आहे असें म्हणावें लागतें !

हे 'बाबा' म्हणतात कीं 'स्त्रिया या भोग्य वस्तु ठरलेल्या आहेत. भोग्य जी स्त्री जाति तिचीं सत्कर्मे पतिकुळाला उपकारक होतात म्हणून स्त्रियांच्या सत्कर्माचें प्रारब्ध बनूं शकत नाहीं. स्त्री ही एक अज्ञानी व श्रेष्ठ भोग्य वस्तु असून तिच्या योंगे परमेश्वरप्राप्ति होण्यास साधन होतें.' (वाक्सुधा, पृ. १५९ फेब्रुवारी १९२५)

स्त्रियांना आत्मा नाहीं व गाईलाहि नाहीं अशा कल्पना पूर्वी होत्या. त्याच कल्पना हे 'बाबा' निराळ्या तऱ्हेनें सांगतात. स्त्री ही श्रेष्ठ भोग्य वस्तु आहे म्हणूनच या साधूनें स्वतःचीं तीन लग्नें झाल्यावर अनेक कन्या व स्त्रिया स्वतःला अर्पण करून घेतल्या आहेत कीं काय ? स्त्रियांच्या साधनांनीं ईश्वरप्राप्ति होते म्हणून जर स्त्रियांचा घोळका एखाद्या नंग्या साधूच्या भोंवतीं सारखा टिपऱ्या वाजवीत नाचूं लागला तर समाजावर ती एक आपत्तीच आली असें म्हटलें पाहिजे ! स्त्रियांना प्रारब्ध नाहीं, त्या उपभोग्य आहेत, सर्कशीमध्यें जसा पशुपक्ष्यांचा उपयोग त्यांस शिक्षण देऊन करुन घेतला जातो तसाच स्त्रियांचाहि त्यांना शिकवून उपयोग करून घ्यावा असें म्हणणाऱ्या साधूंचा परामर्श शिकलेल्या स्त्रियांनींच आतां घेतला पाहिजे.

साकोरीच्या उपासनी बाबांची लीला या प्रकारची आहे. कोळसा उगाळावा तितका काळाच, या न्यायानें यांजबद्दलची जास्त माहिती जितकी

द्यावी तितके आणखी असलेच उद्वेगजनक व बीभत्स प्रकार लिहावे लागतील. सुज्ञ वाचकांस त्यांची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे. तेव्हां थोडक्यांत समारोप करावयाचा तर उपासनी बाबांचें बंड हें केवळ प्रचंड थोतांडच आहे असें नसून तें समाजावरील एक अरिष्टच आहे! आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं, असे अनेक बाबा आमच्या समाजांत जिकडे तिकडे वांडगुळाप्रमाणें बोकाळले असतांहि त्यांचा प्रतिकार करण्यास लोक तयार होत नाहींत! हा नेभळटपणा व अंधभक्ति आणखी किती काल आम्ही अशीच उराशीं कवटाळून धरणार? किती दिवस या चुकीच्या मार्गानें जाऊन आम्ही खड्ड्यांत पडत राहाणार? जागें होण्याची वेळ अद्यापि आली नाहीं काय? बुवाशाही ही एक सामाजिक कीड आहे. ती दूर झाल्यानें समाजाचें तिळप्राय अहित न होतां अत्यंत फायदाच होईल. अशा या बुद्धीनें प्रेरित होऊनच आम्ही उपासनी बाबांची हकीकत येथें देत आहों. यापासून समाज सावध होईल अशी अंशतः तरी अपेक्षा बाळगावी काय?

प्रकरण १८ वें. : :

बाबा व भक्त यांच्या जबान्या

गेल्या प्रकरणांत दिलेला उपासनी बाबांवरील लेख प्रसिद्ध झाल्यावर कोपरगांवचे एक उपासनीभक्त श्री.भांगरे वकील यांनीं श्री. दिवेकर शास्त्री व किर्लोस्कर यांजवर बदनामीचा दावा कोपरगांव येथें दाखल केला. या दाव्याची इत्थंभूत हकीकत किर्लोस्कर मासिकांत व इतर वृत्तपत्रांत आली असल्यामुळें ती येथें न देतां,फक्त बाबांच्या जबानींतील महत्त्वाचा भाग येथें देतों. भांगरे यांचेतर्फे रा. वैद्य वकील (कोपरगांव) यांनीं बाबांची सर तपासणी ता. २६।१०।३४ रोजीं केली. नगर येथील सब डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट मे. देहेजिया आय्. सी. एस्. यांच्या कोर्टामध्यें शपथविधीनंतर उपासनी म्हणाले:—

उपासनी बाबांची जबानी

ता. २६।१०।३४

' माझें नांव उपासनी. मी बापाचें नांव लावीत नाहीं. जात स्वतःस नाहीं. धर्मबिर्म कांहीं नाहीं. वय ६६-६७, धंदा धर्मप्रवचन व सदुपदेश करण्याचा. राहाणार साकोरी. साकोरी येथें माझें मकान आहे. **मठ नाहीं.** मी स्वतःस पुष्कळ वर्षें पिंजऱ्यांत अडकवून घेतलें होतें. किर्लोस्कर मासिक मला ऐकून माहीत आहे. भक्त व शिष्य यांत मानला तर फरक आहे. सद्गुरूपासून जो **मंत्रोपदेश व गुरूपदेश घेतो** तो शिष्य.

पुरुषांना लुगडें नेसविणें, बांगड्या भरणें, कुंकू लावणें, स्त्रीवेष घेववणें हें सर्व माझ्या दृष्टीनें सशास्त्र आहे व हें फार दिवसांपूर्वी मी केलें आहे. ' बाबांचे पाय ज्या पायखान्यास लागत त्याची पूजा बायकांनी केली ' हा मजकूर खरा व योग्य आहे, व हें सर्व परमार्थाच्या दृष्टीनें

करावें लागतें. तुमची व्यावहारिकांची दृष्टि निराळी असते. मी जेथें वसतों त्या जागेची लोक पूजा करितात.

चहा मोरींत मी ओतला हें खरें आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशीं संक्रांतीचा सण पाळला हें खरें आहे. हरतालिकेच्या दिवशीं पुरुषांना स्त्री वेष देऊन मी पूजा करविली. ज्या गोष्टीची जरूर आहे त्या मीं करविल्या-

परमार्थाच्या दृष्टीनें असें करणें जरूर आहे. परमेश्वरप्राप्तीचा हा एक मार्ग आहे. शास्त्रदृष्टया ही गोष्ट योग्य झाली आहे. त्यांनीं तें मूर्ख म्हणून केलें नसून शहाणे म्हणूनच केलें. मी पिंजऱ्यांत अडकून बसतों व स्त्रीवेषहि पुष्कळ वेळां धारण करितों.

लोक मला आपण होऊन मुली देतात. अहो, माझें वय आतां संसार करण्याचें आहे काय ? मी मुलींशीं कशीं वरें लग्नें लावून घेईन ? व त्या तरी असल्या म्हाताऱ्याबरोबर कशा लग्न लावतील ? उपासनी लीलामृतांत जें कांहीं लिहिलें तें खरें आहे. लीलामृतांतील अर्पणविधीचा मजकूर खरा आहे.

मी आजारी असतांना गोदावरीच्या नवऱ्यानें तिचें दान केलें हें खरें आहे. त्यांना ब्रह्मस्वरूपिणे करावें असें मजविषयीं वाटलें असल्यास त्यांनीं तसें म्हणून उदक सोडलें असेल. लीलामृतांत यासंबंधानें जें लिहिलें आहे तें खरें आहे. बाळकृष्ण हातांत घेऊन मी मुलींचा संबंध **बाळकृष्णाशीं जोडून दिला आहे.** व तें करणें शास्त्राधारें योग्य आहे.

' स्त्री ही एक अज्ञानी व श्रेष्ठ भोग्य वस्तु आहे, हें खरें आहे. ब्रह्मार्पण नेणारी ती कन्या, भंग ज्याचा होत नाहीं तो भंगी; अर्थात ईश्वर इत्यादि कोटया मी केल्या हें खरें आहे. लिंगपूजा करून घेतों. माझी कृष्ण समजून गोकुळअष्टमीस, संक्रांत म्हणून संक्रांतीस व शिव म्हणून शिवरात्रीस लोक पूजा करतात, लिंग, पाय, आदींची पुरुष व त्याप्रमाणें स्त्रियाहि पूजा करतात.

' मी बायको असल्याचा अनुभव मला वरचेवर येतो. आज कृष्ण-जन्मानिमित्त या सोन्याच्या बांगडया बाळंतविडा म्हणून आल्या आहेत. मला सौभाग्य वाहण्यांतच वाहणारीचें सौभाग्य कायम राहील.

माझें सौभाग्य अखंड आहे.

मी अखंड सौभाग्यवती आहें. म्हणून जिनें हें दिलें तिचेंही सौभाग्य कायम होईल' इत्यादि मजकूर खरा आहे.

(सरतपासणींत बाबांनीं लेखांतील बहुतेक गोष्टी मान्य केल्या. त्यानंतर आरोपी दिवेकर शास्त्री व किर्लोस्कर यांचे वकील श्री. नानासाहेब सप्तर्षी व दादासाहेब कोन्हाळकर यांनीं उपासनींची उलट तपासणी केली. उलट तपासणींतील जवानीचा महत्त्वाना भाग पुढीलप्रमाणें आहे.)

उलट तपासणींतील जबानीचा सारांश

'मी धर्मशास्त्र वाचलें नाहीं. वेदांत वगैरे पढलों नाहीं. **तें वाचावें लागत नाहीं, सद्गुरुकृपेनें सर्व कांहीं समजतें.** जळगांव येथें १९१७ सालीं असतांना औपधासंबंधीं खटला होऊन चार महिने मला साधी कैद झाली. मी शिर्डीपासून साधूपणांत आहे. तेथें मला अद्भुत वर्तुळें गुरुकृपेनें दिसूं लागलीं. तदनंतर मी उन्मत्तावस्थेंत होतों. शिर्डीस असतांना स्त्रीअवस्था उत्पन्न झाली. साकोरीस लुगडें नेसणें, बांगड्या भरणें, कुंकू लावणें हें सुरूं झालें. त्या अवस्थेंत तसें होण्याची जरूरी असते. शिर्डीनंतर खडगपुरीं गेलों. तेथें एक वर्ष होतों. तेथें विष्टा चिवडणें, अंगास फासणें, मोरीचें पाणी पिणें, गटारांत लोळणें, इत्यादि प्रकार मजकडून झाले. ज्या खापराच्या भांड्यांत मी शौच करीत होतों, त्यांतच भिक्षा मागत असें. त्या वेळीं नग्न स्थितींत राहात होतों. तेथें स्त्री-पुरुषांनीं मला प्रेमालिंगनें दिलीं व न्हाऊं घातलें, हें खरें आहे. उपासनी लीलामृत मला माहीत आहे. त्यांत ज लिहिलें, तें खरेंच असेल. खडगपुरीं मामी नांवाची बाई होती. ती मला **नग्नावस्थेंत आलिंगनें देई व मिठ्या मारी.** अहो, पण ती बाई वृद्ध होती. त्या वेळीं मला भान नसे. मामींनीं चहा मोरींत ओतला. तिनें मजकरितां पक्वान्नांचें ताट भरून आणलें, व तें मी तिला **उकिरड्यावर टाकण्यास सांगितलें.** सद्गुरूवर किती श्रद्धा आहे, हें पाहण्याकरिता असें करावें लागतें. पाडव्याच्या दिवशीं संक्रांतीचा सण पाळला हें खरें. शास्त्राप्रमाणें हया दिवशीं लिंब खाण्याची वहिवाट आहे व संक्रांतीच्या दिवशीं तिळगूळ देण्याची व खाण्याची वहिवाट आहे. याला शास्त्राधार नसला तरी हया चांगल्या गोष्टी मी करण्यास सांगितल्या. स्मृतींना धर्मशास्त्र असें म्हणतात. पण

माझ्या भक्तांना मी जें सांगेन तेंच धर्मशास्त्र. ह्याशिवाय त्यांना शास्त्र नाहीं. विष्ठेची पूजा, पायखान्याची पूजा करण्यास मीं सांगितलें असेल. माझ्यावर त्यांची भक्ति म्हणूनच त्यांनीं केलें असेल.

स्त्रिया या भोग्य वस्तु आहेत. त्यांना प्रारब्ध व संचित नाहीं. 'ब्रह्मस्वरूपिणे वराय' असें म्हणून मुलगी अर्पण केल्यास आईबापांना मोक्ष मिळतो, असें मी प्रतिपादन केलें आहे. डॉक्टर, वकील, इस्टेटवाला यांना कन्या देणें म्हणजे आईबापांनीं खड्यांत (अधोगतींत) पडणें होय. स्मृतींत ब्रह्मस्वरूप झालेल्याला कन्या देण्याचा निषेध केलेला आहे कीं नाहीं हें मी पाहिलें नाहीं. 'लक्ष्मीनारायणस्वरूपिणे वराय' असा संकल्प आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. संन्यासी, विरक्त वगैरेंना मुली द्याव्यात कीं नाहीं हें मीं वाचलें नाहीं. मला धर्मशास्त्र येत नाहीं. मुलगी ही ब्रह्मवेत्त्याला द्यावयाची नाहीं तर द्यावयाची कुणाला? धर्मशास्त्रांत कांहीं असलें तरी **मी म्हणतों तेंच माझ्या भक्तांना धर्मशास्त्र** !! '

२७।१०।३४ रोजीं पुनः जवानी सुरू झाली तेव्हां बाबा म्हणाले, 'सती गोदावरी व इतर मुलींचीं लग्नें मी गोपालकृष्णाशीं तुलसी-विवाहपद्धतीनें लावलीं त्यांस शास्त्राधार आहे. परंतु तो आज मला सांगतां यणार नाहीं. अर्थात् यामध्यें मुलींचा व त्यांच्या वाड-वडिलांचा ईश्वराशीं संबंध जोडण्याकरितां ही कल्पना काढली. मोक्षप्राप्ती-करितां अन्य मार्ग आहेत. परंतु मला हाच मार्ग श्रेयस्कर वाटला. या पंचकन्या तुलसीप्रमाणें बालकृष्णाच्या विवाहित स्त्रिया आहेत. खंडोबास ज्याप्रमाणें मुली वाहतात, त्याप्रमाणें ही पद्धत समजली तरी चालेल. या सर्व मुलींचीं वयें १६ ते २१ च्या दरम्यान आहेत.

त्यांनीं जर पुन्हां लग्न केलें तर परमेश्वर व मनुष्य यांच्यांत जो फरक आहे, त्याप्रमाणें त्या होतील. परमेश्वराशीं ज्यांनीं लग्न लावलें त्या माणसाशीं कशा लग्नें लावतील? व जर त्यांनीं तसें केलें तर त्या ईश्व-राला सोडून खालीं आल्या असें होईल. त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था अद्याप केलेली नाहीं. पुढें ती आपोआप होईल. त्यांचे आईबाप अगर कोणीहि त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था करील. परमेश्वर सत् अवस्थेंत असल्यानें त्याला जी दिली ती सती. म्हणूनच ती सती अखंड सौभाग्यवती होते.

कन्याकुमारी म्हणजे ब्रह्मचारा अवस्थेंत राहागारी स्त्री. सांई वाक्सुधा वर्ष दुसरें, अंक १ ते १२ मधील २७-३-१९२५ च्या अंकांतील हा उतारा बरोबर आहे. तो उतारा असा : 'त्यांना तत्त्व समजून गेलें कीं, ती पतीपासून पुत्रापर्यंत सर्व एकरूप पाहूं लागली; मग त्यानें कितीहि स्त्रिया केल्या तरी तो ब्रह्मचारीच व ती कन्याच. त्यांचा संबंध व सहवास करणारे सर्व ब्रह्मस्वरूप होतात. त्या तशा स्त्रीनें इतर पुरुषांशीं संबंध ठेवला तरी ती ब्रह्मचारी (कन्या). परंतु ब्रह्मरूप झालेल्या स्त्रिया इतर व्यवहारी स्त्रियांप्रमाणें व्यवहार करीत नसतात. त्यांच्यांत इतकी शक्ति आलेली असते कीं, त्या कोणास नुसतें पाहातील तर त्याला ब्रह्मरूप करून टाकतील. त्यांना इतर प्राण्यांप्रमाणें सहवास करण्याचें कारण नाहीं.ती दुसऱ्याकडे पाहील किंवा दुसरा तिच्या पायावर डोकें ठेवील तरी तो ब्रह्मरूप होतो.'

'हे उद्‌गार मीं ब्रह्मावस्थेंत काढले आहेत. त्यांचा व्यावहारिक अर्थ करूं नये. ब्रह्मावस्थेंत असतांना असे उद्‌गार निघतात. त्याची कल्पना तुम्हांस कशी येणार?'

मॅजिस्ट्रेट यांच्या प्रश्नास 'ज्यांना मी हा उपदेश केला ते ब्रह्मावस्थेंत नव्हते. ते सामान्य संसारी श्रोते होते.'

'वीस बावीस वर्षांपासून मी साकोरीस आहें. जमिनीआदि स्थावर व जंगम सर्व माझ्या मालकीचें आहे. साकोरीस अंदाजें पांच सात नंबर आहेत. सर्व इस्टेटीची व्यवस्था माझ्यातर्फे वाघ पाहातो. इमारतीकरितां आतांपर्यंत एक लाखाच्या आंतबाहेर खर्च झाला. बनारस येथें नुकतीच दहा हजारांची जमीन बक्षीस मिळाली आहे. जसराज कस्तुरचंद मारवाडी को-हाळकर यांजकडून दहा हजारांची जमीन विकत घेतली आहे. रोकड होती ती संपली. पूर्वी पुष्कळ होती. नॅशनल बँकेंत ऐंशी हजार व बँक ऑफ इंडियामध्यें पन्नास हजार होते. आकोला कोर्टात तीस हजार रुपयांचा दावा मी लावलेला आहे.

'मूर्तिजापूर येथील कांहीं भाग मला व सती गोदावरीस दान दिला होता. दानपत्र व संकल्प झाल्यानंतर ती जमीन गहाणाची आहे असें (दान करणारा) सांगून रडूं लागला. म्हणून ती गहाण जमीन ताब्यांत घेण्याकरितां तीस हजार रुपये सावकारास दिले. त्या मिळकतीवर माझ्या

पश्चात् गोदावरीची मालकी प्रस्थापित करणार आहें. कोपरगांवीं कोळयांनीं दानपत्र रद्द करण्याबद्दल दावा लावला हें खरें आहे.

द्रव्यरूपी घाण टाकण्याची जागा– उपासनी लीलामृत पान ५९२ मध्यें द्रव्य हें पापरूप आहे, तें टाकण्यासाठीं तुम्ही हें ठिकाण समजतां. गू व घाण टाकण्यासाठीं जसा उकिरडा त्याप्रमाणें पापरूपी द्रव्य टाकण्याची ही जागा असें तुम्ही ठरवितां व मला त्याची व्यवस्था करण्यास सांगतां, हा मजकूर खरा आहे. पापरूप धन लोक मजकडे आणून टाकतात.लोकांचा उद्धार व्हावा म्हणूनच मी पैसा घेतों, मी चमत्कार केले नाहींत व करण्याचें कारण नाहीं.

लीलामृतांतील चमत्कार खरे–' खडगपुरला गुप्त होऊन मी नागपुरास प्रगट झालों. खडगपूर ते नागपूर दोन दिवसांचा प्रवास आहे. नागपुरांत मला नग्न जाऊं नये असें सांगितलें; परंतु मी त्यास चतुर्भुज पीतांबरधारी दिसलों. माझ्या हुकुमानें खडगपुरीं पाऊस थांबला' इत्यादि चमत्कार खरे आहेत. मीं एकदां हरतालिका पूजन स्त्रियांप्रमाणें पुरुषांकडून करवून घेतलें. हें व्रत पुरुषांचेंहि आहे. व्यवहारांत तशी पद्धत नाहीं. याला शास्त्राधार नाहीं, व तो लागतहि नाहीं. संक्रांतीच्या दिवशीं मला लुगडें नेसविलें पिंजऱ्याच्या फटींतून बांगड्या भरल्या, मळवट भरला व स्त्रीवेष दिला. त्या दिवशीं दागदागिनेसुद्धां अर्पण केले.

आश्रमांत कायमच्या अशा बाया असतात. टिपऱ्यांचा फेर धरला जातो, गोदावरीचे डोक्यावर टोपी घालून तिला कृष्ण समजून गोकुळ अष्टमीच्या दिवशीं लोक तिची व माझी पूजा करितात.मी झोंपाळ्यावर बसतों. माझ्या शेजारीं गोदावरीबाई कृष्णवेषांत असतात. शिवरात्रीच्या दिवशीं मीं मुद्दाम दिगंबर होऊन बसत नाहीं. मी नेहमींच नग्न असतों. त्या दिवशीं लोक डोक्यावर फुलें वाहतात. तशींच लिंगावर वाहून लिंगपूजा करतात. शिवरात्रीचा उत्सव कधीं कधीं करतात. गुदद्वार, स्त्रीपुरुषांचीं जननेंद्रियें यांत अश्लील असें काय आहे ? अश्लीलता मुळींं कशांतच नाहीं. '**गुदं वै गुरुपूजनम्**' हें उपनिषदांतील वाक्य (आठवून) हो, नव्हे गार्ग्य कल्पांतील हें वाक्य मला एका स्वामींनीं सांगितलें. मीं उपनिषदें व धर्मशास्त्र वाचलें नाहीं.



गोदावरीला कृष्ण समजून गोकुळअष्टमीच्या दिवशीं लोक तिची व माझी पूजा करतात. (पृ. २२५)

वेदाभ्यास केला नाहीं. मला स्वत:ला जो अनुभव येतो म्हणजे जें परमेश्वरी अंत:प्रेरणेनें बाहेर पडतें तें (सर्व) माझें धर्मशास्त्र. मी जें कांहीं आतांपर्यंत **शास्त्रांत सांगितलें असें** म्हटलें तें माझें अनुभवसिद्ध होय. जे लोक मजकडे येतात त्यांना मी माझे ग्रंथ घेण्यास सांगतों. त्यांतील लीलामृत हा मुख्य होय. त्यांतील मजकूर खरा आहे. वाक्सुधेमध्यें माझीं प्रवचनें आहेत. तीं मी लोकांना वाचण्यास सांगितलीं. लोक मला **अनंतकोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज** महाराज, श्री सच्चिदानंद सद्गुरु योगिराज असें म्हणतात, हें खरें आहे. स्वत:च्या इमारतीच्या आंत गेल्यावर सभामंडपांत वरील बाजूस अशीं अक्षरें भक्तांनीं लिहिलीं आहेत. मी त्यांना तसें लिहिण्यास हरकत घेतली नाहीं.

कोर्टाच्या प्रश्नास– कोणी इमारतींत राहूं लागला तर त्याला मी हरकत घेईन.

श्री. कोन्हाळकर वकील यांच्या प्रश्नास– सती गोदावरी वगैरे पंचकन्यांच्या अर्पणप्रसंगीं मी ब्रह्मस्वरूपांत होतों. त्यांच्याशीं संबंध झाल्यानें मला ब्रह्मस्वरूप प्राप्त झालें असें नाहीं. आधींच मला स्त्रीत्व आलें होतें, व स्त्रीत्व आल्याशिवाय ब्रह्मस्वरूपत्व प्राप्त होत नाहीं. माझ्या लग्नाच्या बायकोमुळें मला ब्रह्मस्वरूपत्व आलें. माझी शेवटची बायको शिर्डीस आल्यानंतर वारली.

(हा खटला नगर येथेंच जर चालला असता तर साक्षीदार कोर्टांत येण्यास तयार होते, पण तें न जमल्यामुळें त्यांच्या ज्या जबान्या जनता जनार्दनाच्या कोर्टापुढें मार्च १९३५ च्या किर्लोस्कर अंकांत प्रसिद्ध केल्या, त्यांतील प्रमुख साक्षिदारांच्या जवानींतील महत्त्वाचा भाग येथें देत आहे.

साक्षीदारांपैकीं श्रीमती दुर्गाबाई करमरकर यांचें वय ५५ वर्षांचें असून त्या उपासनींच्या सहवासांत पुष्कळ वर्षें होत्या व त्यांचे चिरंजीव रघुनाथ वीरेश्वर करमरकर (वय २९) हे उपासनीचे एका काळीं खाजगी कारभारी व मानसपुत्र असल्यामुळें या मातापुत्रांच्या जबानीला बरेंच महत्त्व आहे. श्रीमंत गजानन शांताराम रावते (वय २६) यांच्या वडिलांनीं बरेंचसें द्रव्य या बुवाबाजींत घालविल्यामुळें रा. गजाननराव यांनीं

पन्नास हजारांची प्रॉमिसरी नोट उपासनींच्या कारभाऱ्याकडून लिहून घेतली त्यांचेंहि म्हणणें विशेष लक्ष देण्याजोगें आहे. श्रीमती दत्तीबाई कामत (वय ४०) व त्यांचे चिरंजीव मोतिराम शांताराम कामत (वय२१) हे दोघे मातापुत्र बरींच वर्षे उपासनीच्या नादीं असल्यामुळें त्यांनीं दिलेले अनुभव विचारार्ह आहेत. श्रीमंत शेठ अमोलिकचंद चंद्रभान सांड हे स्वत: राहातें येथें वास्तव्य करणारे प्रमुख व्यापारी आहेत. अर्थात् त्यांच्या लेखांतील जो भाग पुढें देत आहों, तोहि वाचकांना विचार करावयासच लावील असा आहे.)

श्रीमती दुर्गाबाई करमरकर– मी शिर्डी येथें ८।१० वर्षे होतें. उमरावतीचे श्रीमंत खापर्डे व दीक्षित सॉलिसिटर वगैरे शिर्डीस येत असत. उपासनीला कांहीं येत नसे. श्री. खापर्डेच त्याला पंचदशी शिकवीत. काशी, प्रयाग, नागपूर, मिरज, कोल्हापूर वगैरे भागांत मीं उपासनीबरोबर प्रवास केला. साकोरीस जवळजवळ दहा बारा वर्षे होतें. प्रथमारंभीं उपासनीचें वर्तन वावगें नव्हतें. मनिऑर्डर आली कीं मीच सही करून घेत असे. पैसेहि माझ्या नांवेंच पाठविले जात व जास्त झाल्यावर बँकेंत जमा होत. मुंबईस मोटारींतून बँकेमध्यें ठेवण्याकरितां पैसे पाठवीत. मी आलेले पैसे उपासनीजवळ देई. नांव माझें व कारभार त्याचा, असें होत असे. मला वाटे कीं, देवधर्म, ब्राह्मणभोजन, यज्ञ अशा गोष्टीकडे जर उपासनी पैसे खर्च करतो असें म्हणतो तर तो पैसा मला तरी काय करावयाचा ? सुमारें तीन लाख रुपये जमल्यावर त्यानें एक दिवस मला सांगितलें कीं, 'आतां गांधींची चळवळ सुरू झालेली आहे, तो काय करील याचा नेम नाहीं, तेव्हां तुझ्या व तुझ्या मुलाच्या नांवानें जें मी करून दिलें आहे तें सर्व माझ्या नांवचें कर.'

श्रीमंत, सधन, निपुत्रिक अशा स्त्रियांशींच परमार्थाच्या गप्पा मारण्याचें ढोंग जेव्हां तो करूं लागला, तेव्हां मला त्याचा वहीम आला. तरूण निपुत्रिक स्त्रियांना तो म्हणे कीं, 'हें सर्व ईश्वराचें आहे. आतां परमार्थास लागा. नवऱ्याजवळ कशाला राहतां ? मुलगा नसला म्हणून काय झालें ? असें म्हणून तो माणूस पाहून कांहीं बायांच्या मांडयांवर निजत असे व लघळपणा करी. त्या बायांच्या नवऱ्यांनाहि सांगे कीं, 'मूलवाळ नाहीं हें चांगलेंच

आहे, तेव्हां तुम्ही तुमच्या बायका येथें परमार्थाकरितां ठेवा. त्यांनीं पुण्य केलें तर तुमच्या उपयोगी पडेल व इहपर कल्याण होईल.'

तेथें राहिलेल्या बाया मजकडे येत व मला विचारीत कीं, 'उपासनी हे आम्हांला रात्रींच सेवेला कां बोलावितात ?' तेव्हां मी त्यांना म्हणावें कीं 'सत्पुरुषाची सेवा रात्रंदिवस करावी.' प्रथम स्त्रियांना तसें करा म्हणून मीच सांगे. ज्या मुली त्याचे इच्छेप्रमाणें सेवेस जात नसत, त्यांना तो कांहींतरी निमित्त करून मरेपर्यंत मारी. मारण्यांत तो पशूसारखा वागे व नंतर म्हणें कीं, 'तुझें पाप वाढलें होतें म्हणून मला मारण्याची बुद्धि झाली.' उपासनीचा लोभ पाहून मी लोकांना "त्याला पैसे देऊं नका" असें पुढें पुढें जाणवूं लागलें पण उपासनीच्या टेहळणी करणाऱ्या मुली त्याला तें सांगूं लागल्या; म्हणून त्याचे व माझे खटके होऊं लागले.

गोदीला अर्पण करून घेण्याची गोष्ट, त्यानें प्रथम मजजवळ काढली. तिचें मन वळविण्याबद्दल तो मला सांगे. मी त्याचा धिक्कार केला. उपासनी म्हणे कीं, ' गोदीला अर्पण करून घेण्यांत (इतर मुलीहि) तिचें, तिच्या कुलाचें व जगाचें कल्याण आहे. मी जगाच्या कल्याणाकरितां हें सर्व करितों. केव्हां तर उपासनी हा निर्लज्जपणें असें म्हणे की, 'माझे वैराग्याचे दिवस गेले. माझ्या वासना आतां जागृत झाल्या आहेत. अनायासानें फुकट द्रव्य व स्त्रिया जर मिळत आहेत, तर त्यांचा उपभोग मी कां घेऊं नये ?'

थोरा मोठ्यांच्या अनेक सुंदर मुली उपासनीकडे असत. त्यांवर त्याची नजर असे. त्या अर्पण व्हाव्यात म्हणून तो माझ्या मध्यस्थीनें अनेक कारस्थानें करी. मला हीं सर्व कारस्थानेंच आहेत हें प्रथम कळत नसे, म्हणून मीहि मुलींना प्रथम बाबा सांगतील तसें वागावें व करतील तसें करून घ्यावें असें सांगे.

साकोरीला धर्मभोळ्या, सात्त्विक, सज्जन अशा स्त्रिया येत असत. त्यांतील कांहींच्या अब्रूचें मातेरें झालेलें मला ठाऊक आहे. उपासनीच्या सहवासांत मी दहा बारा वर्षें होतें. पण परमार्थाच्या दृष्टीनें मला कांडीचाहि लाभ झालेला नाहीं.

मी आतां वृद्ध आहें. बायाबापड्यांना माझें असें हात जोडून सांगणें आहे कीं, तुम्ही कोणाहि बुवाच्या अगर महाराजांच्या नादीं लागूं नका. हीं

सर्व विषयवासना तृप्त करण्याचीं दुकानें आहेत. जें सत्कृत्य करावयाचें असेल तें प्रपंचांत राहून करा, व त्या द्वारानें परमार्थ साधा.

* * *

श्री. र. वि. करमरकर--माझे वडील वारल्यावर माझी आई शिरडीस आली, माझी मुंज शिर्डीस झाली. प्राथमिक शिक्षण उमरावतीस श्रीमंत खापर्डे यांच्या आश्रयानें झालें. मी मॅट्रिक पास आहे. उपासनीबाबा सर्व खर्च देत असत. उपासनींच्या आज्ञेवरून मी कॉलेज कोर्स घेतला नाहीं. 'शिकून काय करावयाचें' असें ते म्हणत. सन १९२४ ते १९३० सालापर्यंत मी साकोरीस होतों. उपासनींनीं येथील सर्व कारभार पाहाण्यास मला सांगितले होतें आणि हें ' सर्व तुझेंच आहे ' असें ते म्हणत.

१९२४ ते ३० सालापर्यंत बाबांच्याकडे अंदाजें चार साडेचार लक्ष रुपये आले. याशिवाय गोट, पाटल्या, कुड्या, नथा, असले दागिने, मोत्यांचे कंठे व रत्नजडित मुकुट मिळून दीड दोन लाखांचा विषय महाराजांकडे आला. मी साकोरी सोडली तेव्हां बाबांच्या जवळ अडीच लाख रुपये रोकड होती. भाजीपाला, गुऱ्हाळ, शेती, देणें घेणें यामुळेंहि बाबांकडे बराच पैसा येई.

१९२७ सालापासून बाबांचे व माझे खटके उडूं लागले. त्यांच्या वर्तनांतील स्त्रिया, पैसा व लौकिक यांचा अभिलाष मला स्पष्ट दिसूं लागला. 'माझें चरित्र लिहा, माझे फोटो अमुक अमुक ठिकाणीं लावा. मी बोलतों तें टिपून घेऊन वाक्सुधा म्हणून प्रसिद्ध करा' असें ते सांगू लागले. साकोरीच्या आश्रमांत 'अनंतकोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज' हीं अक्षरें बाबांनीं सांगितलीं म्हणूनच लिहिलीं गेलीं. हैद्राबादचे रंगराव गोविंदराव वकील हे साकोरीस चार वर्षें होते. उपासनी लीलामृत व वाक्सुधा हे ग्रंथ आम्ही दोघांनीं बाबांनीं सांगितल्याप्रमाणें व त्यांनीं सांगितले म्हणूनच लिहिले आहेत. गोदावरीला अर्पण करून घेतल्यावर तिचें महत्त्व वाढावें म्हणून बाबांनीं राजाराम गोविंद चिरपुटकर या गृहस्थाला पैशाची लालूच दाखवून 'कन्याकुमारी सती गोदावरी उपासनीकी जय' असें म्हणावयास लावलें ! गांधी चळवळ सुरू झाल्यानंतर त्या निमित्तानें बाबांनीं आम्हांला काय वाटेल तें सांगितलें. व गांधींच्या राज्यांत काय वाटेल तें होईल असें सांगून ती इस्टेट प्रथम शेट गोविंददास यांच्या नांवें केली. पण तोहि बनियाच

व त्याचा तरी नेम काय, म्हणून या आपल्या नेहमीच्या संशयी स्वभावास अनुसरून त्यांनीं पुढें सहा महिन्यांतच ती इस्टेट गोदावरीच्या नांवें करून टाकली. केव्हां तर ते स्पष्ट म्हणत कीं, 'माझे वैराग्याचे दिवस गेले. मी आतां किती दिवस दुःखांत काढूं ? प्रभुकृपेनें जर द्रव्य व स्त्रिया येत आहेत तर मी त्याचा उपभोग कां घेऊं नये ? '

बाबांच्या दृष्टीनें माझें मुख्य दुर्वर्तन म्हणजे ते मला 'लग्न करून ती बायको स्वतःला अर्पण कर' असें म्हणाले, अर्थात् मीं त्यास अनुमति दिली नाहीं हें होय. बाबांच्याकडे अनेक भाविक लोक येत. त्यांत एक चित्पावन पेन्शनर फौजदार गृहस्थ होते. त्यांची एक सुस्वरूप मुलगी होती, ती मुलगी मला देण्याबद्दल बाबांनीं त्या गृहस्थास सांगितलें. ते म्हणाले, वाः! रघुनाथ-रावासारखा जांवई व बाबांची कृपा, मग काय, माझ्या मुलीचें भाग्यच उदयास आलें, असें मी समजेन ! इकडे बाबा मला असें म्हणाले कीं, **तूं तिच्याशीं लग्न लाव व ती मला अर्पण कर. तुला मी दुसरी मुलगी देतों, आणि असें पाहा, अरे, तूं वरचा आहेस. घरच्या एखाद्यानें असें केलें म्हणजे इतर माणसें तसें करतात व मग वहिवाट पडते.** तेव्हां ही वहिवाट तूं पाड.' या गोष्टीस मी विरुद्ध गेलों हेंच माझें दुर्वर्तन होय !

ते मजजवळ व माझे आईजवळ म्हणत कीं, 'एवढी संपत्ति घेऊन काय करावयाची आहे ? एवढ्या संपत्तीला जर सत्तेचें मनुष्य नसेल तर तिची शोभा ती काय ? हे दागिने मी आतां कोणाला घाल म्हणून सांगूं? माझें मन अगदीं उदास आहे.'

या पुढें बाबांनीं एक निराळाच घाट घातला. आपली दृष्टि त्यांनीं गोदावरीकडे वळविली व अनेक यत्न करून, तिला फितवून आजाराच्या मिषानें पंचवटीस जाऊन त्यांनीं तिला अर्पण करून घेतली.

गोदीशीं बोलण्यांत व गप्पा मारण्यांत बाबांचा बराच काल जाऊं लागला. **सुस्वरूप व तरुण स्त्रियांच्या घोळक्यांत बाबा सदैव बसत.** पुरुषांना बाबाकडे मज्जाव व स्त्रियांना मात्र सर्व द्वारें खुलीं असा प्रघात पडूं लागला. मी व इतर माणसांनीं बाबांना 'हें काय आरंभलें आहे, हें सत्पुरु-षाला शोभत नाहीं' असें म्हणावें. पण बाबा म्हणत कीं 'अरे, माझा उत्कर्ष



बाबा व सुस्वरूप तरुण स्त्रियांचा घोळका (पृ. २६१)

तुम्हांस सहन होत नाहीं. राजेरजवाडे येतात व पुष्कळ पैसाहि देतात; ते तुम्हांला देत नाहींत म्हणून तुम्ही माझा मत्सर करतां. पण लक्षांत ठेवा कीं, तुम्ही सगळे गेलांत तरी माझें कांहीं वाकडें होणार नाहीं. मी द्रव्याच्या साहचानें पाहिजे तें करीन. यापुढें लोकांनीं मला सत्पुरुष नाहीं म्हटलें तरी चालेल. पण ते श्रीमंत व जहागिरदार असें तरी म्हणतील ना? तेव्हां तुम्ही येथें राहणार असाल तर माझ्या आज्ञेप्रमाणेंच राहिलें पाहिजे, नाहीं तर चालते व्हा. मजकडे कोणी न आले तरी चालेल. कारण मला माझ्या माणसांशी (मुलींशीं व स्त्रियांशीं) बोलावयास वेळ पाहिजे.

'बाबा, आतां पुरे, आम्ही जातों' असें म्हणून आम्ही निघालों. त्या वेळीं बाबा माझ्या व आईच्या पायां पडले. 'क्षमा करा,मी लेंकरूं आहें, कृपा करून जाऊं नका' असें म्हणन त्यांनीं पदरहि पसरला. तुम्हीं येथें राहाण्यांत जगाचें कल्याण आहे' असेंहि त्यांनीं सांगितलें; पण अंतस्थ हेतु मी बाहेर जाऊन यांच्या सत्पुरुषपणाचा बभ्रा करूं नये हा होता. तात्पर्य, माझ्या दुर्वर्तनाने मी निघालों नसून बाबांचें दुर्वर्तन पाहूनच मी निघालों.

ग्वाल्हेरकडील एक मोठी जहागिरदारीणबाई बाबा व गोदी यांना प्रेमकलहांत असतांना पाहती झाली. तेव्हां बाबांनीं तिला वाटेल त्या अद्वातद्वा शिव्या दिल्या. ती बाई तेव्हांपासून परत आली नाहीं.

साकोरी आश्रमांत अनेक गुप्त कृत्यें चालत. त्यांची कुजबुज स्त्रियांत होई, ती शेवटीं आम्हांस कळे. 'अमकी ओकूं लागली, अमकीला डोहाळे लागले' असें बायका म्हणत. गोष्ट उघडकीस आली कीं बाबा त्या स्त्रियांना नवऱ्याकडे धाडीत.

XXXकडील एक सुशील व संपन्न आणि सुस्वरूप बाई तेथें आली. तिचा नवरा वेडा होता. तिला अर्पण करून घ्यावें असा बाबांचा हेतु होता. 'तूं माझीच होऊन येथें बैस' असें बाबा म्हणत. तिला पुढें मूल झालें. तो ईश्वराचा प्रसाद आहे, असें म्हणून बाबांनीं तिच्या नवऱ्याची समजूत घातली व मुलासह त्याच्या बायकोला परत पाठविलें.

इतक्या वर्षांच्या सहवासानें उपासनीचा स्वभाव कृतघ्न, कामसाधु; "गरज सरो व वैद्य मरो" अशा तऱ्हेचा आहे. उपासनी हा सत्पुरुष तर नाहींच, पण अत्यंत उलटचा काळजाचा व भयंकर असा मनुष्य

आहे. माझ्या हातीं जर सत्ता असती, तर आमच्या समाजांत बोकाळलेल्या बुवाशाहीला अंदमानांत रवाना करणें, हें मीं पहिलें कर्तव्य ठरविलें असतें, इतकी मला या बुवाशाहीची चीड आली आहे.

* * *

श्री. ग. शां. रावते–माझे वडील एकदां काशीयात्रेस जाणार होते,त्याच सुमारास उपासनींच्या एका भक्तानें उपासनीचें चरित्र आमच्या वडिलांना दिलें. तें वाचून सन १९२४ सालीं प्रथम वडील तेथें गेले व नंतर त्यांनीं आम्हां सर्वांना तेथें नेलें. उपासनी मला सांगत कीं, वडिलांच्या इस्टेटीकडे मुलानें दुर्लक्ष्य करावें; वडिलार्जित इस्टेट जर मुलानें घेतली तर मुलें नरकांत जातात. तसें न व्हावें म्हणून ती ईश्वरकारणीं लावावी. एकदां तर पांच हजार रुपये वडिलांनीं माझ्या हस्तेंच बाबांना देवविले. मी १९२४ ते १९३१ सालापर्यंत सुमारें तीस खेपा साकोरीस केल्या.

आम्ही वडीलमातोश्रींसह स्वतंत्र खोलींत राहात होतों. आमच्या सेवेस बाबांनीं सांगितल्यावरून गोदावरी येत असे. ती उष्टीं काढणें, व भांडीं घासणें हीं कामें करी. पुढें तिचें लग्न झालें त्या वेळीं मी तेथें होतों. माझ्या वडिलांनींच दागिने दिले व लग्नाचा खर्चहि केला.

'कन्या अर्पणाचा प्रकार आपण कां काढला?' असें विचारतां उपासनी म्हणाले कीं, 'हा ईश्वरी संकेत आहे. मी तर कोणास सांगत नाहीं. लोक आपण होऊनच मला बळजबरीनें मुली देतात.' मीं पुनः विचारलें, 'अहो, लोकांनीं आजवर मुली दिल्या नाहींत; पण त्या आतांच देत आहेत, याचें कारण मुली दिल्यानें ईश्वरप्राप्ति होते, बेचाळीस कुळें उद्धरतात, असें तुम्हींच सांगूं लागलां हें होय.' उपासनी पुन्हां म्हणाले, 'अरे, जरी मीं प्रवचनें दिलीं तरी त्यांना तशी बुद्धि कां व्हावी? तो ईश्वरी संकेतच आहे.' मीं म्हटलें, 'मी स्वतः तुम्हांस अर्पण होतों. तुम्ही मला अर्पण करून घ्या, म्हणजे तुमची इस्टेटहि नीट राहील.' तेव्हां बाबा म्हणाले, 'मुलगा अर्पण करून घेऊन ईश्वरप्राप्ति होत नाहीं. खंडोबाला मुलीच अर्पण करितात व पुरुष अर्पण करीत नाहींत. तेव्हां परमार्थांत मुलाचें काम नाहीं. मुलीची योग्यता अधिक असून त्याद्वारेंच मोक्ष मिळतो.'

माझे वडील वरचेवर जात व पुष्कळ पैसे देत असत. मीं चारदोन वेळां वडिलांना म्हटलें, 'असें काय तेथें विशेष आहे? उगाच कां पैसे देतां?

ते म्हणाले, 'तुला हें नसतें काय करावयाचें आहे ?' पुढें माझ्या वडिलांनीं सोळा हजार रुपये धर्मशाळेकरितां देण्याचें योजिलें. पण मीं म्हटलें कीं, 'तुम्ही स्वतः येथें राहून धर्मशाळा बांधा; नाहीं तर हा बाबा पूर्वीच्या बारा हजारांप्रमाणेंच हेहि सोळा हजार लाटील.'

वडील पैसे देत व त्यांचा विनियोग अनाठायीं होई. तें पाहून मी म्हटलें कीं, 'माझे भाऊबंद या वडिलार्जित इस्टेटीबद्दल तुम्हांवर दावा लावतील' या भीतीमुळेंच कारभारी रघुनाथराव करमरकर यांनीं बाबांच्या सल्ल्यानें मला प्रॉमिसरी नोटा लिहून दिल्या. ५०००० ची प्रॉमिसरी नोट, पैसेफेडींचे हप्ते व पैसे पोंचल्याची पावती (पोस्टाच्या तिकिटावर सही घेतलेली,) असे कागद मजजवळ आहेत.

रघुनाथरावानें उपासनी संस्थानाच्या वतीनें सही करून ही प्रॉ. नोट दिली आहे. ते कांहीं दिवस बाबांचे मानस पुत्र व कारभारी होते. कन्यार्पण विधीवरून त्यांचें बिनसलें. गांधी चळवळीबद्दल वाटेल तें सांगून उपासनींनीं सर्व इस्टेट आपल्या नांवें करून घेतली.

मी संकप्टी करीत असे. त्या व्रताचें उद्यापन करावें म्हणून मजकडून उपासनींनीं पुष्कळच पैसे काढले. ३१ तोळे सोन्याचा गणपती त्यांनीं मागितला आणि इतरहि वाटेल तें मागितलें. मी कसाबसा हजारअकराशें रुपये देऊन त्यांच्या तावडींतून निसटलों.

त्याच खेपेस मीं उपासनीचा एक घाणेरडा प्रकार पाहिला तो असा—

एकदां एका बाईबरोबर बाबांनीं मला 'दुपारीं चार वाजतां दर्शनास ये' असा निरोप पाठवला. त्या वेळीं मी माझ्या इच्छेविरुद्ध व त्या बाईच्या सांगण्यावरूनच दर्शनास निघालों. पण वाटेंत पहारेकरी दांडेकर व द्वारपाल मीना टूथ पारशी यांनीं मला आडविलें. मी त्यांना धुडकावून आंत जातों तोंच पिंजऱ्याबाहेर बाबा गोदावरीस मांडीवर घेऊन मोठ्या रंगांत आलेले दिसले. मी आंत जातांच त्यांचा विरस झाला व बाबा मला आईबापावरून शिव्या देऊन मारावयास धावले.

कांहीं भोळीं व श्रद्धाळु जोडपीं साकोरीस येत. त्यांतील बाईचा हे बाबा बुद्धिभेद करीत. 'नवरा नोकरीस जाऊं द्या, तूं येथेंच राहा' असें ते सांगत. नवऱ्यास म्हणत कीं, 'तुजवर गंडांतर आहे, अरिष्ट आहे, तुझ्या

वायकोनें येथें राहून कांहीं पुण्य केलें तर तें गंडांतर टळेल. नाहीं तर तिला वैधव्य येईल.

पहाटेस काकडआरती होतांच नग्न स्थितींत बाबांची पूजा गार्डमामी स्वतः त्याच नैसर्गिक वेषांत करी. पूजेनंतर ती बाबाला घट्ट आलिंगन देई व बाहेर येऊन बाबाच्या लघुशंकेचें तीर्थ देत असे. कांहीं स्त्रिया बाबांना पंचामृत स्नान घालावयास जात तेव्हां बाबा म्हणत कीं ' मी जसा आहे तशा तुम्ही विवस्त्र होऊन मला स्नान घाला.' बाबांचे नादीं लागणारे महा-मूर्ख आहेत, असें माझें ठाम मत झालेलें आहे. ईश्वर करो व या बुवाशाहीचा विध्वंस होवो !

* *

श्रीमती दत्तीबाई कामत–माझें नांव दत्तीबाई कामत. वय ४०. जात सारस्वत ब्राह्मण. शिक्षण लिहिण्यावाचण्या पुरतें. धंदा घरकाम. राहणार मुंबई. मी सत्यपूर्वक सांगतें कीं,

मी प्रथम माझ्या भावावरोवर साकोरीस गेलें. तिकडे जाण्यास उपासनीचरित्र कारणीभूत झालें. मी भावावरोवर प्रथम १९२४ सालीं तेथें गेलें. बाबांचें गोणपाट नेसणें पाहून आमची श्रद्धा बसली. एकदोन दिवसांनीं बाबा माझ्या बंधूस म्हणाले कीं, ' तुझे वाडवडील येथें पिजऱ्यांत येऊन रडतात, तेव्हां तुम्ही त्यांना तृप्त करा.' माझे बंधू म्हणाले, ' ब्राह्मणभोजन अगर असेंच कांहीं करूं कां ? बाबा म्हणाले " छे, ब्राह्मण खाऊन नुसतें हगतील! ते सर्व पैसे मला द्या. " त्याप्रमाणें त्यांनीं दोन हजार रुपये उपासनींना दिले.

मला परमार्थाचा नाद होता. मी सात वर्षात सुमारें २५ खेपा साकोरीस केल्या. बाबा मला ' एकवीस वाऱ्या करा ' असें सांगत. माझा कल पाहून बाबा म्हणत कीं, ' ईश्वर गुप्त आहे, तो दिसत नाहीं. त्याची कायिक, वाचिक, मानसिक, सेवा घडत नाहीं, तेव्हां कांहीं द्रव्यरूपानें तरी सेवा करावी. मी असा मनुष्यधारी दिसतों तथापि माझी अवस्था परमेश्वरी आहे. मजकडील सर्व कांहीं ईश्वरी आहे तेव्हां मला जें द्याल तें ईश्वराला पोंचेल.

माझ्या मुलांच्या मुंजी तेथेंच केल्या. त्यानिमित्त उपासनींना मी २०० रुपये दिले. ब्राह्मणभोजनाचे शंभर रुपये बाबांनींच घेतले. मजजवळ माझ्या पैशाची व माझे जे नातलग वरोवर येत त्यांच्या पैशाआडक्याची निर-

स्थल प्रत
सं. ... नि. ४७९

निराळ्या तऱ्हेनें ते चौकशी करीत. तिचें कसें चालले, किती पैसे आहेत, कोण व्यवस्था पाहतो असे प्रश्न ते विचारीत.

एकदां एका अधिक आषाढांत मी तेथें गेलें, तेव्हां तीन महिने राहिलें. त्या तीन महिन्यांत या अर्पण केलेल्या मुलींची कांही पारमार्थिक दिनचर्या मला दिसली नाहीं. त्या सारख्या हंसत, खिदळत, खेळत व सर्वांवर टेहळणी करून बाबांना चहाड्या सांगत असत.

मी एकदां बाबांना म्हटलें कीं, 'बाबा, हें काय चालविलें आहे' ते म्हणाले, 'प्रारब्ध भोगलें पाहिजे ना !' मी म्हटलें, 'तुम्हीं जगाचें प्रारब्ध काढतां तर तुमचें कां काढीत नाहीं ?' तेव्हां ते म्हणत कीं, 'मी हें जगाचे प्रारब्ध जगाच्या कल्याणाकरितां भोगतों.'

मी बाबाकडे नैवेद्य व कांहीं खाण्याचें घेऊन जात असे, त्या वेळीं बाबा व गोदी एकत्र बसलेलीं असत. टिपऱ्यांतील मुली टेहळणी करून बाबाला चाहाड्या सांगत. पारमार्थिक चर्चा अशी मीं कधींच ऐकली नाहीं. बाबा मला 'परमेश्वराचें व्हावें' असें वरचेवर म्हणत, त्याचा अर्थ मला समजत नसे. देवाचें व्हावें, म्हणजे काय या प्रश्नास ते 'हळुहळू समजेल' असें उत्तर देत.

एका गोकुळअष्टमीस बाबा गोदीला जवळ घेऊन झोपाळ्यावर बसले. जरीचा पितांबर, डोक्याला मुकुट, कफनी असें घातलें होतें. गोदावरीलाहि जरीचें लुगडें नेसवलें व इतर अलंकार घातले होते. हैदराबादेकडील बायागाणीं म्हणून झोपाळा हालवीत झोंके देत होत्या. तें झाल्यावर नग्न बाबांना स्नान घालण्याची गर्दी उडाली. सुमारें पन्नास स्त्रिया स्नान घालण्यास गेल्या व स्नानाचें अंगावरील पाणी तीर्थ म्हणून सर्वांस वाटण्यांत आलें.

बाबा कधीं पिंजऱ्यांत तर कधीं बाहेर निजत. बाबा निजलेले असतांनाच त्यांची काकडआरती होई. दुपारच्या आरतीची घंटा बाबाच देत असत. आम्ही काकडआरतीला गेलों म्हणजे बाबाभोंवतीं निजलेल्या मुली अंथरुणें गुंडाळून पळून जात असत. हे व अशा तऱ्हेचे आणखी प्रकार पाहून मला असें वाटूं लागलें कीं, कोणताहि बुवा, बाबा किंवा महाराज यांच्या दर्शनास म्हणून यापुढें जाऊं नये. हे सगळे लबाडीचे धंदे आहेत. यापुढें मी केव्हांहि या बुवांच्याकडे जाणार नाहीं.

* * *

श्री. मो. शां. कामत–मी बुवा, किंवा महाराज कोणी जाणत नाहीं. माझी वडील मंडळी साकोरीस जात म्हणून त्यांच्यासमवेत मी दहावारा वेळां उपासनीबाबाकडे गेलों असेन.

उपासनीच्या दर्शनास जेव्हां मी जाई तेव्हां त्यांचें सांगणें एक असे– 'अहो, पैसा ही घाण आहे, मी येथें उकिरड्यांत दसलों आहें. तेव्हां ती तुमची घाण ह्या उकिरड्यांत टाकली कीं, स्वच्छता प्राप्त होईल!' जीं माणसें साकोरीस जाऊन आजारी पडत, त्यांना उपासनी सांगत कीं, 'बाबांनो, आपणां माणसांना प्रारब्ध हें आहेच व तें भोगावेंहि लागतेंच.' कांहीं दिवसांनीं त्यांनीं प्रवचनांत म्हटलें कीं, 'स्त्रियांना प्रारब्ध नाहीं.' तेव्हां मीं विचारलें, 'तें कशावरून? स्त्रिया माणसें नाहींत काय?' तेव्हां ते म्हणाले, 'तूं लहान आहेस, तुला कळत नाहीं. **मी जें बोलतों तें शास्त्र व तें तूं मानावेंस.**' मीं म्हटलें, 'तुमचें शास्त्र मतलबी व स्वतःस सोयीस्कर असें आहे.'

पांचसहा वर्षांपूर्वी उपासनींना मुंबईहून त्यांच्या भोंदूपणाबद्दल पत्रें जात असत. त्या वेळीं ते एकदां मुंबईस आले असतांना मला म्हणाले, 'कोण रे हें असें करतो?' तेव्हां मीं म्हटलें, 'तुम्ही अंतर्ज्ञानी व सर्वज्ञ आहांत, तेव्हां खरें काय तें तुम्हीच सांगा.' असें म्हणतांच ते रागावले व म्हणाले, 'होय, मी पाहिजे तें करतों, तुम्हांला काय करायचें तें करून घ्या' असें म्हणून स्वतःचें गोणपाट वर करून त्यांनीं अत्यंत ग्राम्य शिवी हांसडली. त्या वेळीं मी दुसऱ्याच्या घरीं होतों म्हणून गप्प बसलों. भोंवताली उपासनींचे सर्व प्रज्ञाहत कावळे होते, त्यामुळें माझा नाइलाज झाला.

ह्या उपासनी प्रकरणापासून मित्रमंडळींना माझें असें सांगणें आहे कीं, बुवाशाहीपासून सावध राहा व तिचा विध्वंस करण्यासाठीं झटून यत्न करा. बुवा, किंवा महाराज म्हटला कीं, तिकडे जाऊंच नका, व गेलां तर सोटा घेऊन जा!

* * *

अमोलिकचंद चंद्रभान सांड–राहते येथील एक प्रमुख व्यापारी यांनीं किर्लोस्करमधील (मार्च १९३५) आपल्या लेखांत लीलामृत प्र. २२ मधील सर्व हकीगत खोटी आहे असें लिहिलें असून लीलामृतांत नसलेल्या पण महत्त्वाच्या अशा गोष्टी पुढीलप्रमाणें दिलेल्या आहेत.

(१) सखाराम पाटील हे साकोरीचे वतनदार पाटील होते. त्यांचें नांव चरित्रांत पुष्कळ वेळां आलें आहे, त्यांनीं महाराजांवर फारच उपकार केल्याचें व भक्ति केल्याचें दिसून येतें. परंतु ते आतां पांचसहा वर्षांपूर्वीच निर्वतले आहेत. त्यांच्यामागें त्यांचे पुतणे सर्जेराव पाटील हे गांवचे पाटीलकीचें काम करीत होते, त्याचें वतन जाण्यास या ब्रह्मांडनायकांच्या लीलाच कारणीभूत झाल्या असें म्हणतात.

(२) दुसरे साकोरीचे शंकर पाटील रोहोम यांचेंहि नांव लीलामृतात वरचेवर आलेलें आहे. त्यांची शेती व इस्टेट बरीच होती. त्यामुळें महाराजांची नजर त्या इस्टेटीवर होतीच. त्यांनीं शंकर पाटलाच्या भोळसर स्वभावाचा फायदा घेऊन त्यांस कर्ज वगैरे देऊन जबर व्याज लावून प्रॉमिसरी नोटा करून घेतल्या होत्या. पुढें शंकरराव निर्वतल्यावर त्यांचा थोरला मुलगा रामराव यास तुझेवर 'फिर्याद करूं' अशी धमकी देऊन आज दोनतीन वर्षांपूर्वी ३ जमिनी व नंतर २ जमिनी एकूण ५ नंबरांचें खरेदीखत आतांपर्यंत करून घेतलेलें आहे. ही जमीन अदमासें १५००० रुपयांची आहे. अशी ही योगीराजांची त्यागबुद्धि आहे!

(३) राहतें येथें श्री. मेघराजजी ओझा या नांवाचे मारवाडी सारस्वत ब्राह्मण राहात आहेत. त्यांनीं चितळी स्टेशन ते साकोरीपर्यंत मोटार सर्व्हिस पांचसहा वर्षांपूर्वीं चालूं केली होती, ती तीन वर्षें सारखी चालू होती. या अवधींत सदर गृहस्थास श्री उपासनी महाराज यांनीं वळोवेळीं असें सांगितलें कीं, 'ईश्वरकृपेनें तुला या वेळीं पुष्कळ पैसा मिळत आहे, तरी तूं येथील मंदिरावर नगारखाना बांध.' असें म्हणून नगारखान्या-प्रीत्यर्थ वेळोवेळीं अकराशें रुपये घेतलेले आहेत. परंतु अद्याप नगारखाना वगैरे कांहीं नाहीं. ही गोणपाट धारण करणारांची युक्ति आहे!

(४) नगर येथील आमचे जीनमध्यें राहात असतांनाच महा-राजांनीं एके दिवशीं एका मुलीशीं भयंकर किळसवाणा प्रकार करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ऐन वेळीं मी, बदानमलजी धुळेकर व मोहनलाल बेलापुरकर गेल्यामुळें तो प्रयत्न साध्य झाला नाहीं. मग ताबडतोब महाराजांची दौलूशेटांनीं हकालपट्टी केली. तेव्हांपासून महाराज परत कधींहि आमच्याकडे आले नाहींत!

उपासनीवर दुसरा फौजदारी खटला

उपासनी बाबाबद्दल लेख आले, चर्चा झाली. कोर्टापुढें हा अनंतकोटी ब्रह्मांडनायक आला व सर्व घाणेरडें कबूल केलें. इतकी शोभा झाल्यानंतर तरी स्वस्थ बसावयास पाहिजे होतें. परंतु उपासनींनीं गेल्या वैशाख वद्य २ स कुसुम व गंगु या दोन्ही मुलींशीं लग्नें लावलीं. त्याबद्दल त्यांज-वर कोपरगांवचे श्री. देशमूख वकील यांनीं गोपालकृष्णावरोवर लग्न लाव-ल्याच्या आरोपावरून देवदासी प्रोटेक्शन ॲक्ट कलम ५ प्रमाणें दावा लावला. त्याचें काम सब् डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट मे. व्ही. टी. देहेजिया आय्. सी. एस्. यांचेपुढें चाललें. त्या खटल्यांत पूर्ण चौकशी होऊन उपासनी-बाबाला १०० रुपये दंड झाला. ह्यावर अपील केलें आहे ! तथापि त्या खटल्यांत उपासनीनीं ता. ६।७।३५ रोजीं कोर्टापुढें जी निसुगपणाची जबानी दिली, तींतील महत्त्वाचा भाग देऊन हें प्रकरण आटोपतों.

श्री. उपासनी बाबांच्या जबानीचें सार—मीं गुन्हा केलेला नाहीं. आमचे शास्त्राप्रमाणें लग्न ही अत्यंत पवित्र गोष्ट आहे. **लग्नाचा हेतु परमे-श्वरप्राप्ति हाच आहे.** सदरील मुद्याबाबत पुस्तकांत लिहिलेला मजकूर वरोबर आहे. प्रत्येक लग्न परमेश्वर प्राप्तीकरतां करावयाचें असतें. प्रत्येक लग्नांत वरास नारायण स्वरूपच कल्पिलेलें असतें. परमेश्वरप्राप्ति हाच **लग्नाचा मुख्य हेतु असतो.** लग्नाचे योगानें **परमेश्वरप्राप्ति होते ही** गोष्ट निर्विवाद आहे. ही गोष्ट साधारण माणसास समजणें किंवा आकलन करणें शक्य नसलें, तरी तसें होत नाहीं असें नाहीं, स्त्रिया सत्त्व-प्रधान असतात त्यामुळें त्यांस वरील मनोनिग्रह लवकर साधतां येतो. वस्तुतः **लग्नांत विषयाचा संबंध येत नाहीं.** तरी जगरहाटीकरितां साधारण जनता स्वार्थाकरितां लग्नाचा उपयोग करते. परमेश्वराचे ठिकाणीं विषयाचा संबंध येऊं शकत नाहीं व परमेश्वरप्राप्ति झालेल्या परमेश्वरी पुरुषांचा वैषयिक संबंध येऊं शकत नाहीं. **यदाकदाचित् झाल्यास, जी संतति होते ती संतति जन्मापासून ब्रह्मस्वरूपाची होते,** याबद्दल अनेक उदाहरणें आहेत. अलीकडेहि असे संत श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वर वगैरे झालेले आहेत. ही गोष्ट शास्त्रशुद्ध आहे. त्याकरतां परमेश्वर विवाह

व मानवांचे विवाह निरनिराळे असून त्यांच्या तिथि ठरलेल्या आहेत. मागे ५ मुलींचीं गोपाळकृष्णावरोबर लग्नें लागलीं, तीं कार्तिक शुद्ध १२ चे दिवशीं म्हणजे तुळसीविवाहाच्या दिवशीं झालीं. हल्लीं देवदासी ज्या अर्थानें समजल्या जातात त्या अर्थानें त्या तशा देवदासी मुळींच नाहींत.

एका वेळीं अशीं लग्नें लावण्यास व मनुष्यानें एका वेळीं एकापेक्षां अधिक वधूंशीं परिणय करण्यास शास्त्राप्रमाणें कोणताहि प्रत्यवाय नाहीं, मागील लग्नें लागल्यानंतर हल्लींचा कायदा केलेला आहे. त्यानंतर सौ. कुसुम व गंगु यांचे लग्नाबद्दल आम्हांस गोष्ट काढली; त्यावर **आमचे सॉलिसिटर व कायद्याचे सल्लागार** यांचा विचार घेतला. मूर्तीशीं लग्न न लावतां स्वतःशीं लग्न लावण्यास हरकत नाहीं असें त्यांनी सांगितलें. त्यावर सौ. कुसुम व गंगु यांचे वडील व पालकांनीं आमचे स्वतःबरोबर लग्नें करण्यास विनंति केली. **त्या विनंतीचा अव्हेर करण्याचें कोणतेंच कारण नव्हतें.** सबब वैशाख वद्य २ रोजीं लग्नतिथीस हें लग्न आमचें स्वतःचें करण्याचें ठरलें. त्याप्रमाणें आमंत्रणें गेलीं व मंडळी लग्नास आली. **कायदा जाणणारे सॉलिसिटर, बॅरिस्टर,** इतर सर्व वकील वगैरे मंडळी त्यांत होती. त्या सर्वांसमक्ष आमचें लग्न झालें आहे. आमचेबरोबर व आमचेशीं लग्न झालेलें आहे. धर्मशास्त्राप्रमाणें सर्व विधी झालेले आहेत. कोणताहि विधि राहिलेला नाहीं.

प्रकरण १९ वें. : :

नारायण महाराज

(प्रास्ताविक–उपासनी केस बेलापूर येथें संपल्यानंतर श्री. शंकरराव किर्लोस्कर व आम्ही असे उभयतां कोपरगांवास व पुढें राहात्यासहि गेलों. राहातें येथे श्रीमती राधाबाई गोखले (रा. अशोकरावांच्या वयोवृद्ध आजी) यांची सहज भेट झाली. त्यांनीं आपल्या मुलीची करुणकहाणी निवेदन केली. त्यापूर्वी ता. २०–११–३४ च्या टपालानें रा. अशोक-राव दांडेकर यांजकडून नारायणबुवाबद्दल लेख आलेला होताच. शिवाय नारायणबुवांच्याविषयीं उष्टा विडा देणें, चाफेकरीणवाईंच्या दर्शनाला जाणें, स्त्रियांना दोन्ही पायांना स्पर्श करून नमस्कार करावयास सांगणें, या व अशाच तऱ्हेच्या अनेक कागाळ्या पत्रद्वारें पुष्कळ आल्या होत्या. श्रीमती राधाबाईंच्या तोंडून ती भीषण हकीगत ऐकल्यावर आम्ही गंगाबाई दांडेकर यांचेकडे व अन्यत्र समक्ष जाऊन चौकशी केली, व त्यांनीं पाठविलेल्या माहितीची शहानिशा केली.

हरिनाना काळकुंद्रीकरांचा आणि आमचा पुष्कळ वर्षांचा परिचय असल्या-मुळें त्यांचेंहि सर्व प्रकरण बेळगांवास एकदोन वेळां जाऊन समजावून घेतलें आणि देशपांड्यांनीं उल्लेखिलेले आंकडे सत्य कीं असत्य हें शोधण्या-करितां त्यांच्या डायऱ्या व जमाखर्चहि पाहिला. तात्पर्य नारायण-महाराजाविषयींच्या संग्रहित लेखांनासुद्धां जवळजवळ ८।१० महिने खर्ची घातलेले आहेत,

श्री. पेंडसे हे एक वर्षभर महाराजांच्या सहवासाला होते म्हणून त्यांचें म्हणणें विचारार्ह आहे. आणि सर्वांत महत्त्वाचा लेख म्हणजे रा. कानिटकर यांचा होय ! हे गृहस्थ बुवाशाही विध्वंसक संघ जन्मास येण्यापूर्वी पांच वर्षें स्वतः बेटांत कांही दिवस राहिले होते. अर्थात् त्यांचीं विधानें निःपक्ष-

प.ताचीं असून चमत्कार असा कीं तीं सर्व देशपांडे, दांडेकरीणबाई व राधाबाई गोखले यांच्या विधानांशीं तंतोतंत जुळत आहेत.

आम्हां शास्त्रीमंडळींना निराधार लिहिण्याची किंवा बोलण्याची संवय नसते. वचनाशिवाय म्हणजे आधाराशिवाय आमचें चालत नाहीं. तशी संवय असल्यामुळें नारायणबुवांविषयींच्या संग्रहित केलेल्या लेखांत निराधार, अपूर्ण व असत्य असें कांहीं नाहीं, म्हणूनच ते लेख पुन्हां येथें देत आहों.)

* * *

काळकुंद्रीकर बुवाबाजींत कसे बुडाले ?

(लेखक– मल्हार हणमंत देशपांडे, बेळगांव.)

मी स्वतः नारायणमहाराजांचा भक्त अथवा शिष्य नाहीं, तथापि मला आतांपावेतों अनेकदां केडगांवांत जाऊन तेथें राहावें लागलें व तेथील वस्तुस्थितीचें अगदीं जवळून अवलोकन करण्याची संधि मिळाली आहे. म्हणून नारायणमहाराजांच्या बुवाशाहीचें प्रकरण आपल्यापुढें ठेवणार आहें.

नारायणमहाराजांच्या अगदीं जवळ राहून सुद्धां त्यांच्यामध्यें अलौकिकपणाचा अगर विद्वत्तेचा मला कांहीसुद्धां अंश आढळला नाहीं. त्यांच्या चेहऱ्यावरील तेजाबद्दल भक्त मंडळी जें वर्णन करतात त्या निव्वळ गप्पा होत. अशा माणसाच्या नादीं लोक लागतात कसे याचें मला मोठें गूढ पडे; पण पुढें त्याचा हळुंहळूं मला उलगडा होऊं लागला. बुवा होण्यास मनुष्य धूर्त असावा लागतो. आपल्या सोंगाची बताचणी त्याला बरोबर करतां यावी लागते. त्याचें स्तोम वाढवावयाला इतर मंडळी लागतात.

सन १९१९ सालापर्यंत नारायणमहाराजांचा केडगांवमधील थाटमाट व तेथील इमारती वगैरे सर्व बेताबाताचेंच होतें. पुढें त्यांना नागपुराकडील एक निपुत्रिक श्रीमंत शेट गंगाधरराव लाभले. त्यांच्याकडून महाराज वरचेवर सत्यनारायण करवूं लागले व या सत्यनारायणाबरोबर महाराजांचें महात्म्यहि जोरानें वाढूं लागलें.

छाप कशी बसते ?— केडगांवास जाणारे लोक कांहीं विशिष्ट भावनेनेंच जातात. कोणी आर्त म्हणून, कोणी निर्धन म्हणून, कोणी निपुत्रिक• म्हणून तर कोणी असंतुष्ट म्हणून जातात! बेटाच्या अलीकडे एक झुळझुळ वहाणारा ओढा आहे. तो बारा महिने वाहात असतो. या ओढ्यापलीकडे

केडगांव वेट आहे. झुळझुळ वाहाणारा ओढा, भव्य व सुंदर दत्तमंदिर, मंदिरापासून दिसणारें महाराजांचें निवासस्थान, दत्तमंदिरासमोरची एक मोठी धर्मशाळा हीं पाहिल्यावर माणसाच्या मनावर कांहीं तरी परिणाम होतो, व येथें कांहीं तरी विशेष आहे असें त्याला स्वाभाविक वाटूं लागतें.

कार्यक्रम:— दत्ताची पहांटे काकडआरती होते व त्यानंतर भटजी लोक सारखे एकादशिन्या करीत असतात. महाराज आपलें सकाळचें आन्हिक आटोपल्यावर आपल्या सर्व गणांसह देवदर्शनास जातात. देवदर्शनास जातांना पायांत जरीचे सपात, भोंवतालीं छत्री धरणारे गण अशा थाटानें ते जातात. आठाचे आंत बहुतेक कोणास ते दर्शन देत नाहींत. निवासस्थानाशेजारीं तळघर आहे. तेथेंहि ते केव्हां केव्हां बसतात. ते नेहमी पाय खालीं सोडून उच्चासनावर असे बसलेले असतात कीं, दर्शनोत्सुक स्त्रीपुरुषांना पायांवर डोकें सहज ठेवतां यावें! दोन्ही पायांवर डोकें एकदम न ठेवतां (कारण महाराजांना पाय सतत जुळविण्याचा त्रास पडतो!) एकेका पायावर डोकें ठेवण्याची पद्धत आहे ! लोक इतरहि पदार्थ— नारळ, केळीं, खडीसाखर ठेवतात. या पदार्थांची व्यवस्था भक्तगण लावतात. पण पैसे मात्र महाराज खुद्द जातिनिशीं जाकिटाच्या खिशांत ढकलतात.

सकळचा दर्शनाचा कार्यक्रम साडेनऊ दहा वाजेपर्यंत चालतो. अकरा वाजतां देवाचा नैवेद्य होतो. महाराज साडे अकरा वाजतां जेवतात. महाराजांची आरती झाल्यावर महाराजांना स्तुतिपर श्लोक म्हणून पुष्पांजली अर्पण करावयाची असते. ती होतांच घोळवा या नांवाचा चोपदार **अनंतकोटि ब्रह्मांड नायक राजाधिराज** वगैरे लांबलचक विरुदावलि ललकारतो व लगेच गोविंदरावहि 'फराळाला चला' असें पुकारतो. ही आज्ञा होतांच अगदीं फर्स्ट-क्लास लोक महाराजांच्या पंक्तीस, सेकंड-क्लास लोक आपल्या निराळ्या जागीं व थर्ड क्लास आणि त्याच्या खालचा गुड्स् क्लास लोक धर्मशाळेमध्यें भोजनास जातात.

जेवणाचा थाट— महाराजांच्या भोजनाचा थाट अगदीं स्वतंत्र आणि उत्तम तऱ्हेचा असतो. तीन वेळां धारोष्ण दूध व त्याकरिता तीन स्वतंत्र दुभत्या गाईंची व्यवस्था केलेली असते. विष्णुभट जोशी हा महाराजांचा स्वतंत्र आचारी अ हे तो त्यांची सर्व बडदास्त बरोबर ठेवतो.

दत्तजयंतीसारख्या प्रसंगीं जरी ते रमण्यांत भोजनास आले तरी त्यांचा चांदीचा चौरंग मध्यें मांडलेला असतो व त्यांच्या भोजनाचे सर्व पदार्थ निराळे व पहिल्या दर्जाचे असतात. महाराजांच्या जवळ **चाफेकरांचीं मुलें,** कामटीकर **गंगाधरराव** याचा **नातू व दोन मुली** नेहमीं भोजनास बसतात. इतर कोणी मोठे लोक आले तर त्यांना महाराजांच्या आसपास बसविण्यांत येतें. पण त्यांना बसण्यास पाट देण्याची पद्धत नाहीं. महाराज भोजनास बसले म्हणजे कांहीं भक्त प्रसाद मागतात व महाराज त्यांना उष्टा प्रसाद देतात!

भक्तीचा गलिच्छ प्रकार– असें उष्टें अन्न व तोंडांत चघळलेला विडा प्रसाद म्हणून दुसऱ्यांनीं खाणें ही किळस आणणारी गोष्ट आहे, पण प्रज्ञाहत झालेले भक्त तो मिटक्या मारून खातांना पाहून कोणालाहि अत्यंत उद्वेगच वाटेल! रामटेकच्या उत्तम पानांचे त्रयोदशगुणी विडे तयार करून ते चाफेकरीणबाईनीं चांदीच्या डब्यांत भरले असतात. महाराज ते वरचेवर खातात कोणी प्रसाद मागितला की त्याच्या हातावर थुंकून ते त्याला देतात. असा प्रसाद घेणाऱ्या बायका व पुरुष दोघेहि असतात. मध्यंतरीं कॉफी, फलाहार वगैरे गोष्टी असतातच. एक लहानशा वाटीभर गाईचें तूपहि महाराज रोज पितात.

चाफेकरीणबाई

कै. वा. दांडेकर व हरीनानांना बुवाशाहीच्या जाळ्यांत ओढणारे जे चाफेकर, त्यांचें कुटुंब मुलाबाळांसह महाराजांच्या सेवेकरितां बेटांतच असतें. (अंगांतील कपडे काढणें व घाम पुसण्यापर्यंतचा प्रकार मी स्वतः १९२९ पर्यंत पाहिला आहे, असें रा. पेंडसे लिहितात–संग्राहक) चाफेकरांचा धाकटा मुलगा भाऊ हा बुवांच्या अंगावर नेहमी असतो. याचीच मुंज महाराजांनीं सुमारें दोन वर्षांपूर्वी केडगांव बेटांत मोठ्या थाटानें पुष्कळ पैसा खर्च करून केली. त्या वेळीं नुसत्या या मुलाच्या पोषाखाकरितांच महाराजांनीं बरीच रक्कम खर्च केली! चाफेकरांच्या कुटुंबाकडे महाराजांना विडे करून देण्याचें काम असतें आणि या बाईंच्या दर्शनाला महाराज देवाला जातांना सकाळीं अगर संध्याकाळीं नित्य येत असतात. व पंधरा वीस मिनिटें गप्पा मारून जातात!!!

"गोविंदा"– दिवसांतून चारपांच वेळां महाराज शौचास म्हणजे "गोविंदा करावयास" जातात. ते शौचकुपांत गेले म्हणजे परत येईपर्यंत दहापांच लोक टाळ वाजवीत, भजन करीत बाहेर बसतात. महाराजांच्या पारिभाषिक कोशाप्रमाणें शौच करण्यास "गोविंदा करणें" असा पारिभाषिक शब्द आहे. किंवहुना कोणत्याहि क्रियापदाच्या ऐवजीं "गोविंदा करणें" या क्रियापदाचा ते उपयोग करीत असतात. या अशा शब्दप्रयोगामुळें स्वतःचें अज्ञान लपविण्याची व दुसऱ्यावर छाप पाडण्याची एक अजब युक्ति त्यांनी शोधून काढली आहे. उदाहरणार्थ, एकादा नवखा इसम भेटीला आला असतां महाराज म्हणतात, " तुम्ही गोविंदा केलें काय ? नारायणास तें कळलें " वास्तविक याचा अर्थ कांहींहि नसतो; पण त्या मनुष्याला मात्र यामुळें महाराजांनीं आपल्या मनांतील गोष्ट ओळखली असें वाटून तो चकित होतो. महाराज शौचाहून येतांच मुली व बायका हातांत साबण, टुवाल व पाणी घेऊन तयार असतात. त्यांचे पाय धुणें, पुसणें हीं कामें मुली व स्त्रियाच करतात. नारायण महाराजाभोंवतालची मंडळी भोळ्याभाबड्या लोकांना देवाकरितां अमुक पाठवा तमुक पाठवा असें सांगतात व त्याप्रमाणें वस्तु पुरविल्या जातात. महाराजांच्या प्रभावळींत शास्त्री, वैदिक, ज्योतिषी, हरिदास, पेटीवाले, भजनी, वगैरे मंडळीहि आहेत. कोर्टकचेरीचीं कामें पाहाण्यास एक वृद्ध पेन्शनर आहे. नारायणमहाराज हे स्वतः कधीं कोणाशीं चर्चा करीत नाहींत, लेखणींत तर कधींच गुंतत नाहींत, याचें कारण ते फार धूर्त आहेत.

सोंगट्यांचा नाद–दोनप्रहरीं भोजनानंतर दोन ते पांच पर्यंत महाराज झोंप घेतात. रोज दुपारीं इतकी झोंप घेण्याचें कारण हेंच कीं रात्रीं त्यांना सोंगट्या खेळण्यासाठीं बरेंच जागावें लागतें, बंगलींत रात्रीं फराळ झाल्यावर कोणी गुणी मनुष्य आल्यास अगर कलावंतीण आल्यास तिचें गाणें बजावणें, पेटी, सारंगी वगैरे चालतें. त्या वेळीं महाराज हॉलमध्यें गालिचावर पडल्या पडल्याच तें ऐकतात. या वेळीं त्यांच्या कांहीं भक्तभक्तिणी त्यांचें अंग चेपण्याचें कामहि करतात. हा कार्यक्रम नसल्यास प्रभावळींतील खास मंडळीसह रात्रीं दोन वाजेपर्यंत महाराजांच्या सोंगट्या चालतात.

स्वरूप प्रत
ले. नारायण महाराज
टी.

नारायणमहाराज हा मोठा ऐषआरामी प्राणी आहे. त्यांचा थाटमाट संस्थानिकालाहि खाली पाहावयास लावणारा असतो. रेशमी व जरीचे कपडे, सोनेरी घडयाळ, जरीची टोपी, भरजरी रुमाल, असा त्यांचा पेहराव असतो. पायांत जरीचा सपात आणि बोटांत हिऱ्याची आंगठी नेहमी असते. स्वच्छता व राजविलास यांचे महाराज भोक्ते आहेत. कपड्यावर, बिछान्यावर, लव्हेंडरच्या बाटल्याच्या बाटल्या ओतल्या जातात. इतकेंच काय पण महाराज प्रवासास निघाले म्हणजे त्यांचे भक्तगण प्रवासांतील शौचकुपांत अत्तराच्या बाटल्या ओतून ते सुगंधित करतात !

दिपवाळीचें अभ्यंगस्नान—दरसाल आश्विनामध्यें दिपवाळीच्या दिवशीं या बुवांच्या पादोदकानें अभ्यंग स्नान करण्याचा मोठा टोलेजंग समारंभ असतो. पायाचें तें पवित्र तीर्थोदक आपल्या अंगावर पडावें न आपलें अभ्यंगस्नान व्हावें म्हणून त्या दिवशीं शेकडों भक्तगण तेथें स्नानाकरितां आलेले असतात. पायावरील पाणी नेमकें खालीं व लेल्या माणसांच्या डोक्यावर पडतें व तें पडेल अशाच रीतीनें महाराज बसतात ! बायका, मुलें, पुरुष या सर्वांनी असें पायाखालीं बसूनच पादोदकानें स्नान करण्याची तेथें प्रथा आहे व भोळ्याबापड्यांची समजूत अशी की, पादोदकानें अभ्यंग स्नान घडल्यास पुण्य लागते.

अंतर्ज्ञानाच्या व चमत्काराच्या कंड्या—नारायणबुवा हा मोठा डोक्याचा मनुष्य आहे. तो लुग्यासुंग्याच्या ओळखी कधींच ठेवीत नाहीं. पण जे श्रीमंत, निपुत्रिक, आर्त, दुःखी असे असतात त्यांची ओळख हे अगदी मुद्दाम ठेवीत असतात. असले गृहस्थ कधीं भेटले कीं, नारायणबुवा 'या, बसा, अमुक वेळीं भेट झाली होती नाहीं? नारायणाची कृपा आहे!' असें म्हणून लागलीच ओळख देत असतात. तें पाहिलें कीं असले भोळे लोक म्हणतात, 'पहा, अहो लाखो लोक येत जात असतांना आमची ओळख ठेवणें हें अंतर्ज्ञानावांचून कसें शक्य आहे ? ' झालें ! असे कांहीं लोक अंतर्ज्ञानाबद्दल बोलूं लागले कीं महाराजांचे पित्ते तेथें येतात व महाराज असे आहेत, तसे आहेत, अंतर्ज्ञानी आहेत, वगैरे सांगूं लागतात.

एकदां अशा लोकांचा आपल्या सारख्यांच्या घरांत शिरकाव झाला

म्हणज त हळुहळू महाराजांचें अद्भुत सामर्थ्य व चमत्कार वगैरे वर्णू लागतात.

जोंवर आपलें यथास्थित चालतें आणि मनासारखें होतें तोंवर हे असले लोक वाटेल तसल्या सामर्थ्याच्या कंड्या उठवीत असतात. पण यांच्याविरुद्ध असें कांहीं झालें म्हणजे हे लोक वोटें मोडत असतात. दुसरीकडे जेवायची सोय नसते म्हणूनच हे लोक तेथें राहातात.

ज्यांचे रोग गेले नाहींत, ज्यांना मुलेंहि झालीं नाहींत, ज्यांना नोकऱ्या मिळाल्या नाहींत, पण ज्यांचे पैसे मात्र गेले, असे पुष्कळ समदुःखी लोक केव्हां केव्हां तेथें एकत्र जमतात व मग पश्चात्तापानें असल्या गोष्टी सांगत बसतात. नारायणबुवा हे लेखानें, टांकानें कुठेंच गुंतणारे नसल्यामुळें त्यांच्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं!

मला एकदां एक अगदी नंगा झालेला असाच शेट भेटला होता. त्याचेंहि सर्वस्व महाराजांच्या नादानें गेलें होतें. तो मला म्हणाला, 'काय मल्हारराव! अवो, आमचा सगळा पैसा गेला, कांहींबी राहिला नाहीं! हे अंगांतला अंगीबी राहिला नाहीं. अहो, नळ नाहीं, च्यावी नाहीं व पाणी बी नाहीं अशी स्थिति! तवा आम्हाला कांहीं पैसे द्या.' याला महराजांनीं पुढें कांही दिलें नाहीं!

मेला तर सद्गति व वरा झाला तर गुरुकृपा! :—अनेक उपाय करून हताश झालेले असे श्रीमंत रोगी लोक तेथें मरायला येतात. केडगांव बेटांत तीर्थ व अंगारा हीं दोनच मुख्य औषधें आहेत. महाराज तीर्थ व अंगारा देतात. एखाद्याला जरा बरें वाटलें कीं, 'काय अंगाऱ्याचा प्रताप!' असें भक्तगण म्हणतात व जर त्याचा रोग वाढून तो आटपला तर 'वाः वाः त्याला सद्गति मिळाली! केवळ तीर्थ व अंगाऱ्याकरितांच तो आला!' असेंहि म्हणतात! निपुत्रिक असे श्रीमंत शेट तेथें येऊन स्वर्गस्थ झाले म्हणजे त्यांच्या स्त्रियांची फार दुर्दशा उडते. माझ्या पाहाण्यांत असें एक अत्यंत हृदयद्रावक उदाहरण आलें.

बुवा व पैसा:—हे बुवा पैशाच्या कामांत फारच धूर्त व चाणाक्ष आहेत. त्यांच्या पुढें रुपाया दोन रुपये कोणी ठेवले तर ते स्वतः लगेच

परत देतात, पण पुन्हा जर कोणी ' हे आपल्याकरितां आहेत, आपल्या भांडारखान्यांतच जाऊं देत ' असें विनंतिपूर्वक सांगितलें म्हणजे महाराज त जाकिटाच्या खिशांत ढकलतात ! महाराजांना अंगांत जाकीट नेहमी लागतें, आणि जाकिटाच्या या दोन खिशांमध्यें, आलेले पैसे महाराज स्वतः भरत असतात. शिवाय रोज मनिऑर्डरीहि येतात, त्या महाराज स्वत सही करून घेतात. लोकांच्या दर्शनाची ही सकाळची वेळ व या मनिऑर्डरी घेण्याची वेळ बहुतेक एकच असते; त्यामुळें इकडे लोक दर्शन घेत आहेत व इकडे यांच्या सह्या चाललेल्या आहेत असें एकदम चालू असतें. नहा-जांना लिहिणेंपुसणें, जमाखर्च याची माहिती फारशी नसावी. तथापि त्यांचें डोकें सुपीक असल्यामुळें ते हे पैशाचे व्यवहार मोठ्या चतुराईनें उरकीत असतात.

नारायणबुवा हे आपल्या निवासस्थानांतील एका खोलीमध्यें केव्हां केव्हां बसतात. तेथेंच तिजोरी आहे. ते सर्व पैसा म्हणजे नोटांचीं पुडकी आपल्या तिजोरींतच ठेवतात. अगदीं अंतस्थ लोकांशिवाय इतरांना त्या खोलींत मज्जाव असतो. म्हणून बाहेर पडतांच नारायणबुवा ती खोली लावून घेत असतात. खोली उघडी व तिजोरी उघडी अशा वेळीं ज्यांनीं डोकावून पाहिलेलें आहे त्यांना तेथील संपत्तीची चांगलीच कल्पना आलेली आहे !

श्री शंकराचार्य व नारायणमहाराज---११०८ सत्यनारायण ज्यावेळीं झाले त्यावेळीं श्री शंकराचार्य मठ संकेश्वर यांची स्वारी तेथें उपस्थित होती. त्यावेळीं लोकांवर छाप पडावी व शंकराचार्यांवरहि आपला प्रभाव पडावा म्हणून नारायणबुवांनीं त्यांच्या स्वागताची एक औरच तयारी केली. सत्यनारायणाकरितां कर्नाटकांतील श्री. नागेशशास्त्री यांच्यामार्फत जे शेंकडों भटजी आणलेले होते, त्यांतील दोनतीनशें ब्राह्मणांची एक तुकडी त्यांनीं तयार केली. नारायणबुवा पुढें आणि त्यांच्यामागें एका रांगेंत भस्माचे पट्टे ओढलेले चारचार भटजी वेदघोष करीत चालले होते. शंकराचार्यांची मोटार ओढ्याच्या अलीकडे आणून उभी केली होती. त्यांनी तो वेदघोष, ते ब्राह्मण, ते नारायणमहाराज हा सगळा थाट अवलोकन केला व असें स्वागत कधींहि व कुठेंहि न झालेलें पाहून या वेळीं धन्यता मानली!

आदल्या दिवशीं सत्यनारायणसमारंभ उरकला व दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं आचार्यांची पाद्यपूजा झाली. नारायणबुवा हे मोठे धोरणी असल्यामुळें त्यांनीं या वेळीं धूर्तता दाखविली. शंकराचार्य शंकराचा अवतार व नारायणबुवा दत्ताचा अवतार ! तेव्हां कुणीं कुणाची पूजा करावी ? या दत्त अवतारानें जर शंकराचार्यांची (भटजीची) पूजा केली तर महत्त्व तें काय राहिलें ? तेव्हां आपल्या एका सपत्निक कारभाऱ्याला आचार्यपूजा करावयास त्यांनीं सांगितलें ! हा सर्व समारंभ नारायणबुवांच्या हॉलसमोरील तुळशीवृंदावनाच्या संगमरवरी पटांगणावर उरकण्यांत आला.

अभूतपूर्व स्वागत, थाटाची पाद्यपूजा आणि यथास्थित सत्कार वगैरे झाल्यावर पीठाधिष्ठित आचार्यसुद्धां या बुवाबद्दल कसें बोलतील हें सांगावयास नकोच! पाद्यपूजेनंतर श्रीमत् आचार्यांचें जें भाषण झालें, त्यांत ते म्हणाले—

गरम पाणी व ईश्वरी अंश:—"बाबांनो, ज्या पुण्यभूमीमध्यें अशीं होमहवनादि कृत्यें होतात (शेजारच्या पेटलेल्या यज्ञकुंडाकडे बोट दाखवून) तेथें प्रत्यक्ष ईश्वरी अंश असल्याशिवाय अशीं कृत्यें घडणार नाहींत. आम्ही आज कैक वर्षें संचार करीत आहोत, पण अशा तऱ्हेचा अपूर्व थाट कधींहे पाहिला नाहीं. इथलें वर्णन काय सांगावें ? इथें हजारों लोक रोज गरम पाण्याचें स्नान करतात. अहो! आमच्या लग्नांत सुद्धां असें गरम पाणी आम्हांला मिळत नाहीं आणि इथें तर सर्व लोकांना गरम पाणी मिळत आहे; अर्थात् हें सर्व परमेश्वरी अंश असल्याशिवाय होणार आहे काय? "

नारायणमहाराजांची बुवाशाही

आतां नारायणमहाराजांच्या बुवाशाहीची जी मुख्य हकीकत मला सांगावयाची आहे तिजकडे वळतों.

काळकुंद्रीकरांचें घराणें हें फार जुन्या श्रीमंत, बाळबोध व भाविक वळणाचें असल्यानें हरिनानाहि पहिल्यापासून पूजाअर्चा करण्यांत लक्ष घालीत व ब्राह्मणभोजनें आणि कथा–कीर्तनें करवीत. पुढें ते वयांत येऊन स्वत: कारभार पाहूं लागल्यावर मध्यें एक मोठा खटला उपस्थित होऊन जवळजवळ एक लाख रुपये गेले. त्यानंतर माझे वडील हणमंतरावजी हे

हरिनाना काळकुंद्रीकर व नारायणमहाराज



जरी लोटणें काळदाढेंत लोटा, स्वहस्तेंच, तैं लाभ होईल मोठा (?)

—श्रीनारायणस्तव

त्याचा कारभार पाहूं लागले व १९१८ ते १९२३ पर्यंत त्यांनीं सर्व गाडें पूर्वस्थितीवर आणून ठेवलें. या वेळीं त्यांचा सालीना वसूल सोळा-सतरा हजार रुपये येत होता.

१९१९ सालापासून हरिनानांचा नारायणमहाराजांशीं संबंध आला व ते स्वतःच्या मोटारीनें केडगांवास १९२४ पासून जाऊं लागले. ११०८ सत्यनारायण केडगांवास जेव्हां झाले तेव्हां नानासाहेब तेथें होतें. दत्त-जयंती व वैशाखी या वेळीं ते तेथें जात. चातुर्मासांत तर तेथें त्यांचा मक्कामच होई. याप्रमाणें वरचेवर जाणेंयेणें होऊं लागलें, तेव्हां स्वतःस उपयोगी पडावी म्हणून त्यांनीं तीन हजार रुपये खर्चून तेथें एक इमारत बांधली. या इमारतीसाठीं यांचा खर्च झाला असला तरी तिची मालकी मात्र नानांच्याकडे नाहीं. नानांच्या बरोबर मी स्वतः वेटास बऱ्याच खेपा घातल्या असून माझ्या तेथील सर्व दिवसांची वेरीज केल्यास ती जवळजवळ सहा महिने तरी भरेल.

माझ्या श्वशुरांना फक्त एक मुलगी आहे, मुलगा नाहीं. या मुलीचा मुलगा म्हणजे माझा मुलगा त्यांना दत्तक दिला असल्यामुळें नानांच्या मिळकतीचा वारसा त्याच्याकडेच आला आहे. महाराजांच्या नादीं लागल्याने नानांनीं आपल्या संपत्तीची कशी वासलात लाविली आणि त्यामुळें या मुलाचें केवढें नुकसान झालें तें आतां आपोआप दिसून येईल.

जमीनी व घरें गेलीं !—नारायणमहाराज व त्यांच्या भोंवतालच्या लोकांप्रीत्यर्थ हरिनानांनीं जवळजवळ पंचेचाळीस हजार रुपये गमाविले आहेत. महाराजांच्या स्वाधीन केलेल्या अकरा हजारांच्या दागिन्यांसहि ते मुकले. नानासाहेबांचें केडगांवास जाणेंयेणें सुरू झाल्यापासून त्यांनीं पंधरा वर्षांत अंदाजें पंचावन्न हजारांची मिळकत (जमिनी व घरेंदारें) नारायण-महाराजांकरितां विकून त्यांची वाट लावली ! नानांच्या डायऱ्या पाहिल्या असतांना व कागदपत्रांवरून आणि माझ्या वडिलांच्या सांगण्यावरून श्री-गुरुकृपेकरितां नानांनीं पुढीलप्रमाणें स्थावर मिळकत विकल्याचें दिसून येतें.

बुगडीकट्टी येथील जमीन	रु. १२०००	हुदली ये. जमीन	रु. १२०००
राजगोली ,,	रु. ८०००	निट्टूर ,,	रु. ५०००
संकेश्वर ,,	रु. ४५००	कुद्रेमनी व शिरोळी	रु. ९३९०

वेळगांव येथील घर रु. १२००, संकेश्वर येथील जमीन व घर रु. १२०० एकूण किंमत रु. ५३२९०

येणेंप्रमाणे जमीनी व घरें प्रापंचिक दृष्टया कांही कारण नसतां नानांनीं विकलीं, त्यांच्या १९२० ते १९३४ सालच्या डायऱ्या तपासतां श्री, बेट व चाफेकर यांच्या नांवावर लहानमोठ्या रकमा अनेक पडलेल्या दिसतात. त्यांतल्या त्यांत ९-८-२७ व ५-६-३१ या तारखांस श्रींच्या नांवें वऱ्याच मोठ्या रकमा खर्ची पडल्या आहेत. या वरील त्रेपन्न हजारांत प्रवासखर्च, बरोबरच्या माणसांचा खर्च, वगैरे कारणासाठीं सातआठ हजार रुपये जरी वजा केले तरी बाकीची रक्कम कोठें गेली, हें कोणासहि सहज ओळखतां येण्यासारखें आहे.

प्रत्येक धंद्याला हुषार हस्तकांची फार आवश्यकता असते. बुवाशाहीचा धंदाहि याला अपवाद नाहीं. नारायणमहाराजांजवळील मंडळींत चाफेकर नांवाचा एक इसम होता. तो नानांना वरचेवर म्हणे, 'तुम्हाला काय कमी आहे ? ना मूल ना बाळ ! आहे तें सर्व गुरुचरणीं अर्पण करा व एकदां गुरुकृपा झाल्यावर तुम्हांला कशाची ददात पडणार नाहीं ! ' भोळ्या नानांवर या त्याच्या शब्दांचा फार परिणाम होई. यामुळें नाना बुवाबाजींत जास्त जास्तच खोल रुतत गेले.

जाळें पसरलें !! – हळुहळू बायकामाणसांसह ते केडगांवींच जाऊन तिकडेच जास्त काळ घालवूं लागले. ते अशा तऱ्हेनें जाळ्यांत चांगले गुरफटले गेल्याचें पाहून चाफेकरांनीं एकदां सुचविलें–

' नानासाहेब, तुम्ही तर आतां सद्गुरुसेवेसाठीं येथें येऊन राहाणार, मग चीजवस्तु, दागदागिने सर्व वेळगांवाला ठेवतां कशाला ? जेथें आपला जीव तेथेंच जवळ सर्व असलें तर बरें. जमीनी कांहीं कोणी उचलून नेत नाहीं, पण इतर वस्तूंचा नेम काय ? तेव्हां असेल नसेल तें येथेंच घेऊन या. '

झालें ! हें बोलणें नानांना पटलें. त्यांनीं घरांतील बहुतेक जिनसा व दागदागिने तिकडे नेले. त्यांतील ठळक वस्तूंची यादी पुढें देत आहें–

वस्तु	अजमासें कि. रु.	वस्तु	अजमासें कि. रु.
हिऱ्यांचीं कुडीं-जोड	२५००	तोडे-जोड सोन्याचे	३०००

सरी	६४२	वाकी	१८७
चिचपेट्या	१५००	सोन्याचा गोफ	३००
मोत्यांचें पेंडकें	१२००	नथ	१२००

एकूण किंमत ११३२९ रु.

याशिवाय हिऱ्याची आंगठी बाराशेंची त्यांच्या बोटांत होती, तिची हकीकत ओघानें पुढें येणारच आहे.

केडगांवीं हे जिन्नस गेल्यावर चाफेकर म्हणाले, 'नानासाहेब, जिन्नस आणलेत हें बरें केलेत; पण आतां ते येथें तरी आपल्याच विऱ्हाडीं कां ठेवतां ? कांहीं झालें तरी हें बेट ! सर्व माणसें नारायणसेवेंत गुंतलेली ! तुम्ही आम्हीसुद्धां सदैव तिकडेच. या संधीचा फायदा घेऊन कोणी डल्ला मारला तर करणार काय ? यापेक्षां जिनसांचा डबा महाराजांच्या स्वाधीन करावा हें उत्तम ! त्यांच्या तिजोरींत जिन्नस सुरक्षित राहातील ! कांहीं झालें तरी आपल्या इहपर कल्याणाचा बोजा विश्वासानें महाराजांवर आतां ठेविला आहे. तेव्हां येथें तरी जिनसांची काळजी स्वत:कडे कशाला घेतां ?'

प्रज्ञाहत हरिनानांना तें बोलणें वरोबर पटलें व त्यांनीं तो दागिन्यांचा डबा महाराजांकडे नेऊन त्यांच्या हवालीं केला !

हरिनाना निर्धास्त झाले, चाफेकर कृतकृत्य झाले, आणि आपल्या भक्ताची ही श्रद्धा पाहून महारांजांनीं आनंद व्यक्त केला ! पण माझ्या आत्याबाईंचा जीव दागिन्याकरितां तळमळूं लागला. महाराजांना दुसऱ्याचें मनोगत चटकन् ओळखतां येतें. त्यांनीं आत्याबाईंची वरीच चलविचल पाहून त्या दर्शनास आल्यावेळीं त्यांस मुद्दाम तो डबा दाखविला व म्हटलें, 'हा तुमचा आहे ना ? आहे बरं, काळजी नको.' मात्र असें सांगतांना त्यानीं फक्त डबा दाखविला, तो उघडून आंतील दागिने कांहीं दाखविले नाहींत !

महाराजांनीं असें म्हटल्यावर बिचाऱ्या आत्याबाई दागिन्यांवद्दल जास्त काय बोलणार ? त्या निमूटपणें परतल्या. पण दागिन्यांबद्दलची धाकधूक केव्हांहि कमी झाली नाहीं. पुढें एक सण आला तेव्हां श्री. नानासाहेब हे स्वत: दागिने मागण्यास गेले. महाराजांनीं त्या वेळीं तिजोरींतून एक नथ तेवढी आणून दिली व ती घेऊन नानासाहेब बंगल्यांत आले. त्यानंतर

आणखी एक सण आला. बहुतेक दिवाळी असावी. त्यावेळीं आत्याबाई सर्व जिन्नस मागण्याकरितां गेल्या. महाराज म्हणाले, 'आवो, तुमचा डबा ! ज्यांचा त्यांनीं नेला ! ' मग आत्याबाई म्हणाल्या, ' मला न विचारतां अगर न कळवितां आपण कां दिलात ? महाराज म्हणाले, ' बायकांनीं इतक्या खोलपाण्यांत जाऊं नये. अशी चौकशी केल्यानें पुरुषांचा कमीपणा होतो. चला, गोविंदा करावयास जावयाचें आहे ! ' असें म्हणून बुवा शौचास जावयास उठले ! ! !

आत्याबाईंच्या मनाची स्थिति हे उद्‌गार ऐकून काय झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी ! त्यांनीं बिऱ्हाडीं आल्यावर यजमानांना दागिन्यांबद्दल विचारलें. हरिनाना म्हणाले, ' आपण ते जिन्नस आणले नाहींत, ते महाराजांपाशींच आहेत. ' आत्याबाईंनीं पुनःपुन्हा चौकशी करून पाहिली, पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ते जिन्नस तिकडे आणि हरिनाना इकडे असे दोघे नारायणरूपच झाले असें दिसतें !

नारायणाला काय करतो कावळा ?—आतां हरिनानांच्या हातांतील हिऱ्याच्या आंगठीची गमतीदार हकीकत पाहा !

एकदां कांहीं जवाहिरे महाराजांकडे आले होते. त्यांनी आपले कांहीं जिन्नस दाखविले व लोकांचे कांहीं खडे, हिरे, कुड्या वगैरे जिन्नस पाहिले. हरिनानांच्या बोटांतील बाराशें रुपयांची हिऱ्याची आंगठी त्या जवाहिऱ्यानें पाहिली व तो म्हणाला, " हया हिऱ्याच्या आंत झिरम् म्हणजे बारीक काळा डाग आहे. ही आंगठी अपशकुनी असतांना ती तुम्हीं कां वापरतां ?"

महाराज लगेच म्हणाले, " नानासाहेब याच्यामध्यें कावळा आहे काय ? कावळा आहे वरं कावळा ? ती ठेवावयाची नाहीं घरांत ! काय ती घरांत ठेवावयाची नाहीं वरें ! नारायण त्याची व्यवस्था करील. काय ? (वाक्य संपल्यावरोबर " काय " उच्चारण्याची महाराजांना संवय आहे) नारायणाला काय करतो कावला ? (महाराज चोचरें व बोबडेंहि बोलतात.)

असें म्हटल्यावर हतबुद्ध हरिनाना अधिक काय बोलणार ? त्यांनीं ती आंगठी काढली व महाराजांच्या स्वाधीन केली.

वाघाला उठवूं ?—एकदां महाराज नानासाहेबांच्या निवासस्थानी गेले.

त्या वेळीं मी तेथें नव्हतो. तेथें वाघाचें कातडें अंथरलेलें होतें व त्या कातडचाला वाघाचें तोंड पूर्ववत् बसविलेलें होतें. त्या आसनावर बसून महाराज नानांना म्हणाले, ' नानासाहेब, हें काय ? हें बघितलें काय ?' नानासाहेब म्हणाले, ' हा वाघ होता. ' महाराज म्हणाले, ' त्याला उठवू काय ? वाघ काय करतो ? ' आणि त्याबरोवरच जणुं काय आपल्या म्हणण्याप्रमाणें आपण प्रत्यक्ष करून दाखविणार आहों असा महाराजांनी आविर्भाव केला. त्यासरशीं नाना म्हणाले, ' देवा देवा ! नको नको ! अशी अवकृपा करूं नका ! ' इतकें झाल्यावर महाराज निघून गेले.

मी बाहेरून आल्यावर नानांनीं ही हकीकत मला सांगितली. त्यावर मी म्हटलें,

'नानासाहेब, हें तुमचें चुकलें. अहो, कातडचाचा वाघ जिवंत होणें शक्य तरी आहे काय! उगीच कोणी थाप दिली कीं तुम्ही ती खरी मानन त्यावर कसा विश्वास ठेवतां हें समजत नाहीं.'

त्यावर ते म्हणाले, 'तूं पोर आहेस, आणि ही गुरुलीला कांहीं और आहे! तुला ही कळावयाची नाहीं!'

बुवाच्या नादीं लागणाऱ्या माणसाची मति कशी भ्रष्ट होते याचा हा एक उत्तम नमुना आहे.

माझ्या श्वशुरांना लागलेलें हें बुवाबाजीचें व्यसन त्यांच्या अखेरपर्यंत कायम होतें व त्यांतच त्यांचा गेल्या वर्षी अंत झाला!

* * *

गुरुकृपेमुळें सर्वनाश!

(लेखिका:--श्रीमती गंगाबाई दांडेकर
नर्सिग--क्लास, कामा हॉस्पिटल, मुबई.)

बी. बी. सी. आय्. लाइनवर पालघर येथें दांडेकरांचें एक सुप्रसिद्ध घराणें आहे. या एका घराण्यांतील अनेक भाऊबंद दांडेकर हल्लीं तेथें नांदत आहेत.

पालघरास जीं चारपांच प्रमुख घराणीं राहावयास आलीं, त्यात श्रीमंत कुशाभाऊ हे चुलत्याला दत्तक गेल्यामुळें त्यांना दोन्ही घराण्यांतील मिळून

वरीच संपत्ति मिळाली होती. त्यांना चार मुलगे होते. त्यांतील विनायक कृष्ण दांडेकर हे माझे पति असून, केडगांवच्या नारायणबुवानें आमचें कसें वाटोळें केलें, हें येथें मला दाखवावयाचें आहे.

माझें नांव गंगाबाई. माहेरचें नांव सिंधूबाई गोखले. मातुःश्रींचें नांव राधाबाई. माझे वडील बंधु चिंतामणराव गोखले, हे सबडिव्हिजनल ऑफिसर असून हल्लीं ते नगर जिल्ह्यांत राहाते कँपवर आहेत. माझे एक नातलग श्री. वामन श्रीधर आपटे मुंबई येथें असतात. त्यांच्या आश्रयास मी असते. नारायणबुवांच्या नादीं लागून माझें लक्षाधीश घराणें धुळीला मिळालें. आणि मला हल्लीं नर्सिंगचा कोर्स घ्यावा लागलेला आहे. माझी कर्मकथा पुढीलप्रमाणें आहे:--

आमच्या मंडळीचें शिक्षण बेताचें. घरची स्थिति चांगली असल्यामुळें त्यांचें लक्ष देवधर्माकडे असे. उपास कर, अभिषेक कर, एकादष्णी कर, असें ते करीत असत. त्यांचा देवभोळा स्वभाव पाहून वासुदेवराव चाफेकर व आणखी कांहीं मंडळींनीं माझ्या यजमानांना नारायणबुवांचें खूप महत्त्व सांगितलें. बाजीराव दांडेकर या नांवाचे आमचे एक नातलग होते. त्यांच्याकडे विष्णुपंत लेले या नांवाचे गृहस्थ वरचेवर येत. ते नारायण बुवाजवळ सहकुटुंब होते. रा. लेले यांनीं बाजीराव दांडेकरांना नारायण बुवांचें महत्त्व सांगून केडगांवास दर्शनासाठीं नेलें. त्याचप्रमाणें आमच्या मंडळींना चाफेकर यांनीं 'नाहीं नाहीं' तें सांगून त्यांचा बुद्धिभेद केला.

अंदाजें वीसपंचवीस वर्षांपूर्वीं एकदां नारायणबुवा वसईजवळ निर्मळचे यात्रेस आले होते. त्या वेळीं चाफेकर व लेले मंडळींनीं इतकी गळ घातली व भुरळ पाडली कीं, बाजीराव दांडेकर व माझे यजमान हे वडिलांच्या परवानगीनें नारायणबुवाच्या दर्शनास गेले. तेथें ते दोनतीन दिवस होते. तेवढ्या अवधींत चारपांच वेळां दर्शनास गेले असावेत. आमच्या मंडळींनीं घरीं आल्यावर मला सांगितलें कीं, "महाराजांचें सामर्थ्य काय म्हणून सांगूं ! त्यांनीं किरंगळींतून माझ्या देखत गंगा काढली ! ! बस् ! मला आतां कांहीं नको ! महाराज प्रसन्न झाल्यावर सर्व सिद्धि माझ्यापुढें हात जोडून उभ्या राहातील. अग, पाहा, हा एवढा दीड्शें रुपये पगार मिळविणारा कामदार

चाफेकर (मेकॅनिकल इंजिनियर) तो म्हणतो कीं, नोकरीवर लाथ मारून महाराजांच्या नादीं मी उगाच लागलों नाहीं. महाराजांकडून काय काय लाभ होईल हें सांगणें शक्य नाहीं!"

चाफेकर हा नारायणबुवांचा हस्तक असावा, असें मला शेवटीं शेवटीं वाटूं लागलें. कारण चाफेकर हा वरचेवर पालघरास येई व आमच्या मंडळींना असेंच वरचेवर सांगे. त्याचा परिणाम त्यांच्यावर फार होई. एकदां आमची मंडळी केडगांवीं पंधरा दिवस राहावयास गेली. तिकडून आल्यावर हे मला सांगूं लागले कीं, "अग, केडगांवचा काय थाट विचारतेस? फार मोठीं माणसें महाराजांच्या भजनीं लागलीं आहेत. थाट काय सांगूं? दर पूर्णिमेस सत्यनारायण होतात. चांदीचीं भांडीं आणि इतर थाट असा आहे कीं, तो पाहून संस्थानिकहि लाजतील." हें सर्व ऐकून मला मात्र काळजी वाटं लागली!

माझे मामंजी वरचेवर पैसे देत नसत. त्यांना केडगांवीं जाणें नापसंत होतें. मुलाचें शिक्षण बेताचें व प्रपंचाकडे लक्ष कमी आणि त्यांचा चौथ्या बायकोच्या संसाराकडे ओढा, त्यामुळें मामंजींचें लक्ष माझ्या यजमानांवरून उडालें यांत कांहींच नवल नाहीं. एकदां मामंजींनीं अशी ताकीद दिली कीं, "बस्स! यापुढें तुला मी पैसे देणार नाहीं. वाटल्यास घरांत राहा. नाहीं तर बाहेर वेगळा राहा." मामंजींच्या या वर्तणुकीचा त्रास मलाहि होऊं लागला. बाजीराव दांडेकर व वासुदेवराव चाफेकर, यांचा सल्ला आमच्या मंडळींना आवडूं लागला. चाफेकर नेहमी सांगत असे कीं, "अरे नाना, महाराजांची कृपा झाली कीं आपल्यास कांहीं कमी नाहीं. तूं फक्त महाराजांना शरण जा व तेवढें केलेस म्हणजे लौकिक अगर व्यावहारिक जगाकडे पाहण्याचें तुला कांहीं एक कारण नाहीं."

आमच्या मंडळींना चाफेकराकडून पत्रें येत. त्यांत ते असें लिहीत कीं, "तुमच्यावर महाराजांची मर्जी फार आहे. तेव्हां गुरुपूर्णिमेस दर्शनास यावें." एकदां ह्यांनीं, तिकडे येण्यास पैसे मिळत नाहींत, वडील विरुद्ध आहेत, अशा आशयाचें एक पत्र लिहिलें. त्यासरशीं नारायणबुवांनीं लगेच चाफेकर यांना पाठविलें. ते बहुतेक बंधूकडे उतरत, व आल्यावर शिटा वगैरे घालून आमच्या मंडळींना घेऊन फिराव्ययास जात, व तेथेंच त्यांचीं बोलणी होत.



नारायणमहाराज भक्तांच्या मध्यभागीं बसले आहेत त्यांच्या उजवीकडे सतरा वातलेले विनायकराव दांडेकर हात जोडून गुरुचरणीं लीन झाले आहेत.

चाफेकर म्हणत कीं, " अरे, तुला व तुझ्या कुटुंबाला त्रास चुकविण्याचा आपण निराळाच मार्ग काढूं. " तो मार्ग बहुधा त्यांनीं वेगळें होण्याचाच ठरविला, परंतु तसें स्पष्ट स्वतःच्या तोंडून सांगावयाचें नव्हतें असें दिसतें.

त्या खेपेस आमच्या मामंजींनीं पैसे दिले नाहींत; परंतु वाजीराव दांडेकर यांनीं आपल्या वडिलांपासून पैसे घेतले व ही सर्व मंडळी केडगांवीं गेली. वाजीराव दांडेकर यांच्या वडिलांनाहि बुवांच्या नादीं लागणें नापसंत होतें. त्यामुळें तेहि पुढें पैसे देईनासे झाले. एकदां तर पैसे देण्याचें त्यांनीं साफ नाकारल्यामुळें बापामुलांमध्यें तंटा झाला, अशा अफवा उठल्या होत्या ! केडगांवीं गेल्यावर वाजीराव व आमची मंडळी यांना स्वतंत्र व विनत्रासाचा मार्ग चोखळण्यास नारायण महाराजांनीं उपदेश केला. त्याप्रमाणें घरीं आल्यावर वाजीरावानें वडिलांशीं बोलणें काढलें. पण वडिलांनीं हिस्सा देण्याचें साफ नाकारलें, आणि लागतील तसे पैसे देईन असें आश्वासन दिलें. माझ्या मामंजींनीं मात्र वैतागून व निक्षून सांगितलें कीं, " मला हा त्रास वरचेवर नको. तुझा तूं हिस्सा घे व पाहिजे तें कर. " पण हिस्सा लवकर दिला नाहीं व पैसेहि देईनासे झाले.

पुढें माझ्या यजमानांनीं वाजीराव दांडेकर यांच्या गांवीं ' बहि ' येथें आपलें बिऱ्हाड नेलें. तेथें आम्ही नवरा-बायको, वाजीराव व चाफेकर अशीं चार माणसें होतों. तेथून ही मंडळी वरचेवर केडगांवीं जात. मला मात्र एकटीलाच तेथें राहावें लागत असे. मी गेलें कीं तेथेंच राहण्याबद्दल नारायणबुवा मला आग्रह करी, पण मी त्याला नापसंति दाखवीत असे. मामंजींकडून पैसा नाहीं, घरची अशी स्थिति, त्यांत माझें बाळंतपण व अजार, यामुळें माझी फार आबाळ होऊं लागली. घरांतहि सख्खे सावत्र अशा संबंधींचे त्रासदायक प्रकार होऊं लागल्यामुळें, वेगळें झालें तर बरें असें मलाहि वाटूं लागलें. वेगळें होऊन निराळा संसार थाटण्याची उमेद वाटली. बखले. वकील यांना वकीलपत्र देण्याबद्दल यांना उपदेश मिळाला, आणि त्यांच्यामार्फत हिस्सा मिळण्याबद्दलची नोटीस आमच्या मंडळींनीं मामंजींना दिली

माझे मामंजी हे चांगले व्यवहारदक्ष होते. त्यांना चिरंजिवांचें अवसान समजल्यामुळें त्यांनीं लगेच वागुळसर, या नांवाचें एक खेडें वहिवाटीला दिलें

व तेथें राहून कसा काय कारभार चालवितां तें पाहातों व मगच सर्व देतों अमें सांगितलें.

पण आमच्या मंडळींच्या मनांत केडगांवीं असें भरविलें कीं, "वडिलांकडे सर्व वांटा माग व त्यासाठीं वखले वकील दे." एक जिवंत बाप असतांना दुसऱ्या बापाची काय जरूर? " अशी उठावणी मिळाल्यावर, बखले वकीलांमार्फत सबंध हिश्शाची नोटीस ह्यांनीं दिली. फिर्याद लावल्यावर बखले वकील हे मामंजींना भेटावयास गेले व गोडगोड बोलून " मी हमी घेतों, अफरातफर होऊं देत नाहीं. " असें सांगून वांटा देण्यास सांगितलें. त्यावर मामंजी म्हणाले कीं, " हिस्सा मी केव्हांहि देतों. आतां शेताभाताचाच हिस्सा देणें आहे. चार मुलगे व पांचवी बायको असे पांच वांटे काढले पाहिजेत, मोजणी वगैरे केली पाहिजे, इतकें होण्यास वर्ष तरी लागेल. "

नेपाळची यात्रा—या सुमारास नारायण महाराज काशीयात्रेस व नेपाळच्या यात्रेस निघाले. हें साल १९१६ असावें. या यात्रेंत बाजीराव दांडेकर, चाफेकर वगैरे मंडळी होती. कांहीं बायकाहि बरोबर होत्या. यात्रेस जाण्यापूर्वीपासून चाफेकर हे आमच्या मंडळींना वरचेवर स्तुति करून चढवीत, आणि " या यात्रेचा खर्च तुम्हीच खरे भक्त असल्यानें कराल " असें ते म्हणत. या यात्रांतील एक वेळचा खर्च म्हणे बाजीरावांनीं पतकरला, आणि एक वेळच्या खर्चाकरितां आमच्या मंडळींनीं 'वेणीमंजुरली व तांदुळवाडी' अशीं दोन गांवें अंदाजें दहा ते बारा हजाराला विकलीं. बारा हजारांनीं यात्रेचा खर्च निभणार नाहीं, असें बुवांनीं सांगितल्यावरून, आमच्या मंडळींनीं ' वागूळसर ' हें गांवहि गहाण ठेविलें !

काशीयात्रेची तयारी केली. दोन मुलें, एक गडी व मी, आणि बाजीराव, चाफेकर वगैरे इतर सर्व होते. आमच्या मंडळींनीं मजबरोबर काशीयात्रेची तयारी केल्याचें दाखविलें. परंतु पैसे पुरणार नाहींत, असें जेव्हां महाराजांनीं सांगितलें तेव्हां त्यांनीं मला अशी थाप दिली कीं, " मला काम आहे, मी मागाहून येतों. तूं महाराजांबरोबर जा, सर्व व्यवस्था होईल." तें ऐकून मी चकितच झालें! पण तिकिटें काढलीं असल्यानें मी ठरल्याप्रमाणें प्रवासास निघालें.

नारायणबुवांचा सर्व प्रवास एकदोन शिष्यांसह पहिल्या वर्गानेंच

झाला. आम्ही अश्वमेध घाटावर गेलों. तेथें काळे यांच्या तर्फे सर्व व्यवस्था झाली. त्यांच्या गाड्या फिरावयास नेण्याकरितां येत असत. मी सुमारें दोन महिने काशीस होते. नारायणबुवा पुढें नेपाळास गेले. त्यांच्यावरोवर केसरवाई होती. बाजीरावांची मंडळी काशीसच होती. पंधरा वीस दिवसांनीं नारायणबुवा नेपाळची यात्रा करून परतले. आमच्या मागून सुमारें एक महिन्यानें माझे यजमान काशीस आले. ते नेपाळास गेले नव्हते. काशी येथें चाफेकर यांच्या नांवें माझ्या पतींनीं लिहिलेलें पत्र मीं पाहिलें. त्यांत मजकर असा होता. कीं, "पैसे पुरतील कीं नाहीं? वागुळसर हें गांव अद्याप गहाण पडलेलें नाहीं" इत्यादि. दुसरें पत्र असें होतें कीं, "बाळा-भाई वाणी या पालघरच्या एका वाण्याकडून चार हजार रुपये काढून लौकरच पाठवितों." या पत्राबद्दल मीं त्यांना काशीस आल्यावर विचारलें कीं, "हें काय आरंभिलें आहे? घरादाराचें वाटोळें करून अशा कोठें यात्रा करतात कीं काय?" त्यावर ते म्हणाले कीं, "तुम्ही कारभार करूं नका. आम्हांला सर्व कळतें आहे. तुमची काळजी आम्हांला आहे."

दागिने काढून घेतले—काशीस जाण्यापूर्वी ह्यांनीं एकदां माझ्या अंगावरचे सर्व दागिने काढून घेतले आणि असें सांगितलें कीं, "शेती-सुधारणेकरितां पैसा पाहिजे आहे. शेतीचें उत्पन्न एकदम येत नाहीं. वडील तर पैसे देत नाहींत, तेव्हां तुझे सर्व दागिने मोडून शेतांत घालतों." अंदाजें तीनचार हजारांचे दागिने त्यांनीं घेतले.

यात्रेहून आम्ही सर्व मंडळी मुंबईस आलों, तों माझ्या पोटांत धस्स होण्याजोगा एक प्रसंग मला दिसला! मला असें कळलें कीं, दोन गांवें तर महाराजांकरितां विकलींच आणि तिसरें वागूळसर हेंहि गहाण पडलेलें आहे. माझ्या यजमानांनीं सबंध इस्टेट मिळावी म्हणून दावा लाविला होता. अर्थात् ती जर मिळाली असती तर ती सगळी नारायणबुवाकडे गेली असती, अशी मला भीति पडली व काय करावें असा प्रश्न पडला. अशा वेळीं मला एकटीला ठेवून हे केंडगांवीं गेले. इकडे मी आजारी पडलें! केडगांवीं तारावर तारा केल्या, तरी तेथून ते आले नाहींत. इकडे कार-कुनांनीं पैसे पाहिजेत, कामें थांबलीं आहेत, असा एकसारखा तगादा लावला. त्या वेळीं मी फारच गांगरलें व मामंजींना बोलावणें पाठविलें.

मामंजींना सर्व स्थिति कळून चुकली होती. आम्हीं जे कारकून ठेवले होते, तेहि फितूर झाले आहेत व सर्व लुबाडून नारायणबुवाकडे ते पाठवीत आहेत, असें दिसून आलें. आकाशच फाटल्यावर मला जीव नकोसा झाला! अशा वेळीं मामंजी म्हणाले, "सर्व मिळकत जात आहे वडिलार्जित मिळकत मला नातवाच्या नांवें करतां येत नाहीं; पण वकीलांचा सल्ला असा आहे कीं, तूं जर नवऱ्यावर दावा लावशील, तर तुला कांहीं तरी मिळेल, तुला कांहीं मिळकत पाहिजे असेल तर आतां फिर्याद लाव, मी साहाय्य करतों." नंतर मामंजींनीं माझें सर्व सामान वागुळसर येथें आणविलें आणि मीहि पालघरीं गेलें, पुढें मामंजीच्या सांगण्यावरून व आजारी होतें म्हणून मी माहीमला गेले. तेथें कांहीं दिवस राहून मी मुंबईस आले.

माझ्या बहिणीचे यजमान श्रीमंत वामन श्रीधर आपटे यांनीं हें सर्व प्रकरण हातीं घेतलें, त्यांनीं ठाण्याचे भागवत आणि बापट यांना वकील देऊन, माझ्याकडून आमच्या मंडळींवर फिर्याद करविली. 'मुंबई समाचार' व 'संदेश' या पत्रामध्यें माझ्या नांवाच्या नोटिसा वकिलांनीं दिल्या. माझा मुलगा अशोक हा त्या वेळीं लहान होता. दोन लहान मुली व मुलगा यांसह मी आजारी असतांना केडगांवास वरचेवर पत्रें पाठविलीं, तारा केल्या, तरी माझे यजमान हे एकदांहि केडगांवाहून भेटावयास आले नाहींत. त्यांनीं तर असा निरोप पाठविला कीं, मुलाच्या नांवानें एक कवडीहि ठेवणार नाहीं. मामंजींनीं त्यांना असें कळविलें कीं, नातू चि. अशोक याच्या नांवाची सर्व मिळकत करतो आणि बापानें वहिवाटदार म्हणून तिचा उपभोग घ्यावा. पण हें बोलणें माझ्या यजमानांना पटलें नाहीं. कारण सबंध वांटा घे व तो गुरूला अर्पण कर, असा कानमंत्र त्यांना मिळाला होता. पण समन्सें बजावलीं गेलीं आणि वर्तमानपत्रांत नोटिसा फडकल्या असें पाहून नारायणबुवांनीं असा सल्ला दिला कीं, " माझ्या हिश्शाचीं गांवें मला पोंचलीं, आतां कांहीं येणें नाहीं, असें म्हणून सही कर." वेणी-मंजुरली, तांदुळवाडी व वागुळसर हीं तीं गांवें होत. आमच्या मंडळींनीं याप्रमाणें सही करून दिल्यावर सबंध मिळकत त्यांना आली नाहीं. वरील तीन गांवें व कांहीं रोकड त्यांना पूर्वी मिळाली होती. अर्थात् हीं गांवें

सोडून बाकीचा हिस्सा माझ्या मामंजींनीं माझ्या मुलाच्या नांवाचा करून दिला म्हणून त्याचें थोडेंबहुत तरी उत्पन्न हल्लीं येतें !

आमचे जे इतर भाऊबंद दांडेकर आहेत, त्यांच्या मानानें हें राहिलेलें उत्पन्न म्हणजे कांहींच नाहीं. आमच्या यजमानांनीं नारायणबुवाच्या नादीं लागून जीं तीन गांवें नाहींशीं केलीं, तीं असतीं तर त्यांचाच वसूल दरसाल कित्येक हजारांपर्यंत आला असता. पण आमचें दुर्दैव म्हणून सर्व गेलें ! माझे यजमान केडगांवीं गेले म्हणजे तेथील सर्व शिष्य " गुरुमहाराजांना भिकवाळी अर्पण करा, सलकडीं द्या, पोची द्या, कंठी द्या " असें म्हणत व हे एकेक देत असत. नारायणबुवाजवळ, विशेषतः देवघरांत दत्ताजवळ जें आहे, त्यांतील बरेंच आमचें आहे. सोन्याचा गोफ, चांदीचा झोपाळा, चांदीचीं घंगाळें, गालीचे आणि देव्हारे व इतर देवांवरचे दागिने वगैरे मिळून बरेच जिन्नस आमचे आहेत. आमचें सर्व उत्पन्न, रोकड व दागदागिने आमच्याजवळ राहातें, तर प्रतिवर्षी कांहीं हजारांचें उत्पन्न आणि १।२ लाखांच्या मिळकतीचे आम्ही मालक झालों असतों. पण गुरुकृपेमुळें आमचा हा असा सर्वनाश झाला !

मामंजींवर दावा लावण्यापूर्वी वागुळसर येथें असतांना एकदां आमच्या मंडळींनीं नारायणबुवांना बोलाविलें होतें. बरोबर दहापंधरा मंडळी होती. त्यांत लेले, चाफेकर वगैरे त्यांचे पट्टशिष्यहि होते. तीनचार दिवस सारख्या मेजवान्या व पूजा चालू होत्या. पण आमच्या कुटुंबांतील कोणीहि मंडळी तेथें आली नव्हती.

माझी नारायणबुवावर कधीं श्रद्धाच बसली नाहीं. ज्याला धड बोलतांहि येत नाहीं तो काय डोंबल करणार! असें मला प्रथमपासून वाटे व आतांहि तसेंच वाटतें. नारायणमहाराजाकडे एक भाकड व अति खादाड म्हैस होती, ती प्रसाद म्हणून बुवांनीं आमच्या गळ्यांत अडकवली होती. ती पुढें एकदांहि व्याली नाहीं. माझ्याप्रमाणेंच आणखी कांहीं श्रीमंत घराणीं अशींच बुडाल्याचें मला माहीत आहे.

काशीयात्रेला मी गेले तेव्हां बाजीराव, चाफेकर वगैरे मंडळी बरोबर होती. चाफेकर हा नारायणबुवाचा उजवा हातच. त्याचीं घोरणें फार दूरचीं असत. तो काशीस गेल्यावर मला वरचेवर म्हणे कीं, " वहिनी,

या तुझ्या अशोकाला कुव्यांत टाकून देऊं का ? हा जर बुडून मेला तर काशींत मोक्षाला जाईल व तुझ्या नशिवांत असेल तर तुला दुसरा मुलगा होईल." यावरून माझ्या मुलाला नाहींसा करून सर्व संपत्ति लाटण्याचा त्यांचा बेत असावा हें उघड दिसतें.

साधारणपणें पांचसहा महिने मी केडगांवास राहिलें आहे. तेथील कार्यक्रम म्हणजे पूजा व आरती !! नारायणबुवा विशेष बोलत नाहीं. तो चोचरें बोलतो. लोक त्याच्याकडे येतात, पूजा करतात, त्याचे पाय आपल्या डोक्यावर ठेंवून घेतात आणि तीर्थहि घेतात. दक्षिणेकडील एका संस्थानिकाचा एक पाणक्या केडगांवीं आला. त्याचें नांव दत्त होतें. नारायणबुवाची त्याच्यावर मर्जी बसली व त्याच्या पायांत त्यानें चांदीचा तोडा घातला. पुढें त्याचें लग्नहि करून दिलें. तो पाणक्या म्हणे अवलिया-प्रमाणें वागे. पुढें त्याला मुलें झालीं. त्याच्या बायकोशीं नारायणबुवा हे, खुशाल पलंगावर बसून गप्पागोष्टी करीत व तिच्या मांडीवरहि लोळत तेथें राहाणाऱ्या इतर बायकांच्या मांडीवरहि नारायणबुवा लोळत एकांतांत बोलत बसत आणि सेवा घेत हें मीं स्वतः पाहिलेलें आहे. असो.

नारायणचरित्रांतील गोष्टी विश्वसनीय नाहींत. नारायणबुवा थोडी स्नानसंध्या करतो, आणि वस्त्र धान्य अशासारखे जिन्नस कोणी फुकट आणून दिले तर, आपलें महात्म्य वाढावें म्हणून तो ते वांटून टाकतो. हाच त्याचा मोठेपणा ! आम्हीसुद्धां वागुळसर गांव गहाण टाकलें तेव्हां एक हजारांचीं धोतरें दिलीं होतीं, तीं त्याच वेळीं त्यानें वांटून टाकलीं.

नारायणमहाराजांची एक शिष्या शहापुरीं असते. तिनें बुवाला तिकडे बोलाविलें होतें. तिकडे ते गेले, व परत येतांना माझ्या आईची व नारायणबुवाची बेळगांव स्टेशनवर गांठ पडली. माझ्या आईला पाहतांच नारायणबुवा एकदम डब्यांत शिरला. पण आईनें भर प्लॅटफॉर्मवर शेलक्या शब्दानें त्याची पूजा करण्यास प्रारंभ केला. लोकांची ही गर्दी उसळली ! माझ्या आईचें आंतडेंच कळवळत होतें म्हणून तिला राहावेना. नारायण-बुवा जे एकदां डब्यांत दडून बसले ते पुढें गोकाक स्टेशनवर आई उतरेपर्यंत त्यांनीं डब्याबाहेर तोंड दाखविलें नाहीं !

नारायणबुवाचे चमत्कार–राखेची खडीसाखर करणें, आंगठ्यांतून गंगा काढणें वगैरे सर्व हातचलाखी आहे. निराळे चमत्कार कसलेहि नाहींत. लोक उगाच कंड्या उठवीत असतात. चाफेकर तर मला उघड म्हणे, " हें पहा वहिनी, मी भामटा आहें. माझ्या ताब्यांत तुझे यजमान आहेत व नारायणबुवाहि आहे. मी सांगेन तसें ते दोघेंहि वागतात. तुम्हां नवरा–बायकांत वितुष्ट आणणें वगैरे सर्व माझ्या हातांत आहे. फार काय, पण नारायणमहाराजांचा साधुपणासुद्धां माझ्या हातांत आहे. " या चाफेकरांचीं पत्रें आमच्या यजमानांच्या नावें येत कीं, तूप, मेतकूट, पोहे, पोह्यांचे पापड वगैरे पाठवीत चला, व ते तसे आम्ही वरचेवर पाठवीत होतों. इतर पत्रांविषयीं लिहिलेंच आहे.

आतां शेवटचा क्रूरपणाचा आघात सांगून माझी कर्मकथा पुरी करतें.

माझ्या यजमानांची स्थिति शेवटीं शेवटीं फारच वाईट झाली. ते भ्रमिष्टासारखे वागूं लागले. जवळचा सर्व पैसा गेला, व नारायणबुवा तर त्यांना विचारीना ! म्हणून त्यांना जीव नकोसा झाला. अफू खाऊन जीव द्यावा, असेंहि ते केव्हां केव्हां बडबडत. ना प्रपंच ना परमार्थ ! अशी स्थिति झाल्यावर कोणाचाहि जीव वैतागतो ! ! त्या वैतागांतच ते आजारी पडले, असें मला कळलें. यजमान केडगांवास व मी सांगलीस माझ्या वडिलांकडे अशी स्थिति होती. माझी मुलगी त्या वेळीं आठ दहा महिन्यांची होती. मीहि थोडी आजारी होते. मुलगा २ वर्षाचा होता. अशा स्थितींत एकदम पत्र आलें कीं, 'विनायक कृष्ण हे वारले !' आकाशांतून डोक्यावर वीज आदळावी अशी ती आकस्मिक वातमी ऐकून माझी अवस्था झाली ! शोक, उद्वेग, संताप या विकारांनीं माझें हृदय पेटून गेलें. पण रडण्यावांचून मला काय करतां येण्याजोगें होतें ? त्या वार्तेनें माझी भ्रमिष्टासारखीच स्थिति झाली. इतक्या वर्षांनीं आजहि त्या प्रसंगाची आठवण होतांच अंत:करणाला असह्य वेदना होतात.

कोणी मनुष्य आजारी पडला कीं, त्याच्या आप्तेष्टांस कळविण्याची पद्धति आहे, तसें नारायणबुवानें बिलकुल कळविलें नाहीं. आगाऊ कळविलें असतें तर मी अगर माझे मामंजी तरी खास गेलों असतों. हे वारल्या-

नंतर मामंजींना नारायणबुवांनीं कळविलें. त्यांनीं केडगांवीं मनुष्य पाठविला व आम्हीहि पुढें तपास केला. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, ते आजारी कुठें होते, कसे वारले, कुठें दहन झालें, वगैरे माहिती आम्हाला बिलकुल मिळाली नाहीं ! आमच्या एका माणसाजवळ एक गृहस्थ म्हणाला कीं, "ते विहिरींत बुडून मेले." पण इतक्यांत चपापून त्यानें जीभ चावली, व म्हणाला, " छे, तसें कांहीं नाहीं. मला कांहीं माहित नाहीं. " आणखीहि अशाच संशयास्पद गोष्टी कळल्या. त्यावरून आपल्या मरणानें ते मेले, कां आजारांत मेले, कां कोणी विहिरींत ढकलल्यामुळें मेले हें, त्या ईश्वरासच माहीत ! एकंदरींत या नारायणबुवाच्या पायीं आमचा सत्यानाश झाला हें खरें आहे.

वर जें मी लिहिलें आहे तें अगदीं सत्य आहे. यांत एक अक्षरहि खोटें नाहीं. माझ्या संसाराचें वाटोळें झालें, तसें माझ्या भगिनींच्या संसाराचें होऊं नये म्हणून त्यांस सावध करण्याकरितांच माझ्या दुर्दैवाची ही कहाणी मी त्यांच्या कानावर घालीत आहें.

* * *

नारायणमहाराज व एका वृद्ध स्त्रीचा तळतळाट !

(लेखिका—श्रीमती राधाबाई गोखले, राहाते.)

माझें माहेर व सासर हीं दोन्हीं घराणीं फारच कुलीन व सुजाण आहेत. हें लिहिण्याचें कारण असें कीं, चालू जगाच्या परिस्थितीप्रमाणें बायकांनीं किंवा पुरुषांनीं गुरु करणें, कुठें एखादा साधु आला कीं त्याच्या दर्शनास धांव घेणें हा प्रकार आमच्या घरीं कुणालाहि आवडत नसे. मला पूर्ण ज्ञान होऊन चांगलें वाईट हें समजायला लागल्यापासून असली एखादी गोष्ट पाहाण्यास किंवा ऐकण्यासहि मला मिळाली नाहीं. उलट जर कांहीं प्रमाण पाहावयास मिळालें असेल तर एक नारायणबुवा, जो आपल्याला सद्गुरु म्हणवून घेणारा, याचेंच प्रकरण होय.

या बुवाचें नांव कोणी काढलें कीं माझ्या जिवाची काय स्थिति होते, ती कुणाला सांगून समजणें शक्य नाहीं ! या नारायणबुवापायीं माझे जांवई विनायक कृष्ण दांडेकर यांचा समूळ नाश झाला. समूळ याचा अर्थ असा कीं, नारायणबुवाच्या नादीं लागून माझे जांवई लक्षाधीशाचे भिक्षाधीश झाले आणि शेवटीं बुवानें केडगांवाहून शिष्यांकरवीं आमचे व्याही यांना

पालघरीं पत्र पाठविलें कीं, विनायक याला दोनतीन दिवस ताप येऊन शेवटीं त्यांतच त्यांचा अंत झाला.

माझ्या जांवयाच्या वडिलांच्या हातीं अशा मजकुराचें पत्र पडल्या-बरोबर त्यांची स्थिति कोणत्या प्रकारची व कशी झाली असेल याचा देशबांधव व देशभगिनी विचार करतील काय ?

ज्याला म्हणून खरें शुद्ध प्रेम काय आहे याची जाणीव असेल, त्याचे नेत्र घटकाभर अश्रू ढाळल्याखेरीज राहाणार नाहींत,अशी माझी पूर्ण खात्री आहे. अहो, विचार करा, आपला एखादा जन्माचा हाडवैरी आणि दुष्मन असला तरी तो जर अजारी पडला तर त्याच्याबद्दल आपलें मन द्रवून पूर्वस्थितीचा आपल्या मनाला विसर पडतो, व असें वाटतें कीं, अहो, आतां याचे आप्त, इष्ट, बायको, मुलगा, सासू, जी कोणी जिवलग असतील त्यांना बोलवावें, त्यांच्या भेटी झाल्यानें ह्याची शुश्रूषा, औषधपाणी व्यवस्थित होईल व ह्याला बरें वाटेल. पण या नारायणबुवांनीं माझ्या जांवयाच्या अंतकाळींसुद्धां त्यांची आमची भेट होऊं दिली नाहीं! यावरून सत्पुरुषाचें ढोंग करणारे लोक काय वृत्तीचे असतात याची जाणीव, ज्याला थोडें तरी कळतें, त्याला झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

अशा बुवांच्या नादीं जे लागतात त्यांचा वाईट शेवट झाल्याचें अनेक ठिकाणीं ऐकिवांत आहे. माझ्या जावयाचा सत्यानाश तर झालाच !!

नारायणबुवाचे शिष्य महादेव अप्पा कुदळे हे शहापूर येथें होते. आम्हीं बेळगांवीं असतांना यांची वाटेंत गांठ पडली, त्यावेळीं माझी मुलगी सिंधू (विनायक कृष्ण दांडेकरांची बायको) इजला त्यानें पाहिलें आणि म्हणाला, "वहिनी, तुम्ही इकडे कुठें ?"

वाटेंत बोलणें बरें नाहीं म्हणून माझी मुलगी म्हणाली, ' माझा भाऊ इथें आहे, आम्ही किल्ल्यांत राहातों. उद्यां तुम्ही तिथें या व मग आपण बोलूं.'

त्याप्रमाणें हा कुदळे भेटण्याकरितां किल्ल्यांत आला होता. हा कुदळे नारायण बुवाच्याबरोबर काशीला गेला होता. तिथें तो दोन तीन महिने होता म्हणून आमचे जांवई व मुलगी यांची त्याची ओळख. हा आमच्या घरीं आल्यावर सिंधू म्हणाली, ' आई हे कुदळे नारायणबुवाचे शिष्य आहेत ' हें तिचें बोलणें ऐकल्याबरोबर मला फार दुःख झालें व मीं त्यांना म्हटलें,

"अहो कुदळे, एका आमच्या जावयांचा सत्यानाश तुमचे गुरु नारायणबुवा यांनीं केला तितका पुरेसा नाहीं का झाला? आतां तुम्ही तरी या बुवाचा नाद सोडा." माझ्या जांवयांची श्रीमंती व इतर स्थिति या कुदळ्याला माहित होती म्हणून मला जितकें म्हणून बोलावेंसें वाटलें तितकें बोलून अश्रूंनीं डोळ्यांचें पारणें फेडलें.

माझ्या मुलीच्या सत्यानाशाचें प्रदर्शन त्याच्यापुढेंच होतें, तेव्हां तो काय बोलणार? त्याला सर्व गोष्टी कळल्यावर त्याचे डोळेहि दुःखाश्रूंनीं गळूं लागले.

आपल्या समाजांत चांगल्या बुद्धीचीं माणसेंच फार थोडीं. बायका काय आणि पुरुष काय! अशा बुवाशाहीबद्दल बोलणीं निघालीं कीं त्यांचें म्हणणें असें पडतें कीं, अहो, तुमचा जांवई वेडा, त्याला कोण काय करणार? पण मी म्हणते, वेड्यांना लुबाडण्याकरितां सत्पुरुष आहेत कीं काय? कां त्यांना शहाणे करण्याकरितां? ज्यांच्या पदराला कांहीं चाट बसत नाहीं असे लोक बुवाचे गोडवे गात बसतात हेंच आपल्या राष्ट्राचें दुर्भाग्य होय!

हें लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, बायकांनीं व पुरुषांनीं चालूं जगाच्या राहाटींत खरा सत्पुरुष नाहीं असें समजून चालावें, तरच त्यांचा तरणोपाय आहे. हे असले घातकी बुवा व साधु नाहींसे झाले तर किती समाधान होईल म्हणून सांगूं? किती लिहिलें तरी अपुरेंच आहे. लोकांचें अज्ञानतिमिर नष्ट होणें हेंच जरूर आहे.

लोकांना मी व माझी मुलगी जिवंत आहोत तोंपर्यंत नारायण बुवाचें कपटजाल किती भयंकर असतें तें कळून येईल व तें तसें कळावें अशी माझी इच्छा आहे.

* * *

श्रीमती राधाबाईंच्या एका वक्तृत्वपूर्ण व आवेशयुक्त

पत्रांतील सारांश (२०-८-३५ चें पत्र)

नारायणबुवा, तुम्ही केलेली कृति फार भयंकर आहे. मी तुम्हाला धारवाड, बेळगांव व विजापूर येथून वरींच पत्रें पाठविलीं. त्या एकाचेंहि उत्तर तुम्ही दिलें नाहीं! तुम्ही माझ्या जांवयाचा अर्थानें व प्राणानें सर्वस्वी नाश

केलात. या तुमच्या मायावी कृतीनें माझी मुलगी हाय हाय करीत आहे. नारायणबुवा, ही तुमची अघोर करणी आहे. तुमच्या या कपटजाळांत यापुढें देशबांधव व देशभगिनी सांपडूं नयेत अशी माझी देवाजवळ मागणी आहे.

तुमचे भक्त तुमच्या सिद्धीची महती सांगतात. म्हणे महाराजांनी मेलेली गाय तीर्थ शिंपडून जिवंत केली! पण मी तुम्हांला असें विचारतें कीं इतका तुमचा प्रभाव असून ज्याचे पैशावर यात्रा करून तुमचा तळीराम गार करून घेतलात त्या माझ्या जांवयाला हो तुम्ही कसा जिवंत केला नाहीं ?

जांवयाचा बुद्धिभ्रंश—नाराणबुवा, आम्ही कर्नाटकांत राणी-बिन्नुरास होतो. तेथें चि. सिंधूचें पत्र आलें कीं आतांशा चित्त घरांत मुळींच नाहीं व सारखे केडगांवीं जातात. एक वेळ इकडे येऊन तुम्ही तरी सांगा. नारायणबुवा, मायापाश फार कठीण आहे. मी वागुळसरास गेले व जवळ बसवून घेऊन विनायकरावांना उपदेश केला. माझें बोलणें संपल्यावर जांवई मला म्हणाले कीं महाराज सांगतात कीं ' विनायक तूं माझ्या सर्व शिष्यांत खरा भक्ति करणारा शिष्य आहेस ! वेड्या, या तुझ्या संपत्तीला काय करतोस ? अशीच भक्ति कर म्हणजे तुझ्या पुढें अष्टसिद्धि येऊन उभ्या राहतील. ' हें त्यांचें भाषण ऐकून माझा व माझ्या मुलीचा जीव अगदीं करपून गेला. कारण नारायणबुवा, पोटांत कालकूट विष आणि तोंडांत मात्र मध अशा रीतीची वल्ली तुम्ही माझे जांवयाला पाजली होती. नारायणबुवा, तुमचे कुविचार सांगावे तेवढे थोडे आहेत. याबद्दल यमधर्माजवळ जाव द्यावा लागेल याची आठवण ठेवा. तूर्त तुम्ही ऐषआरामांत गुंतल्यामुळें विसर पडेल म्हणून सुचविलें आहे.

नारायणबुवा ! तुम्ही आतां असें करा कीं, लोकांची हायहाय करून घेतलेली संपत्ति सरकारचे स्वाधीन करून, त्यांना असें सांगा कीं, ' सरकार, ही संपत्ति बहुजनांची आहे. ती मी भूकंप–पीडानिवारणा-प्रीत्यर्थ अर्पण करीत आहे. तेव्हां तिचा सदुपयोग व्हावा.' नारायण बुवा ! अशा हेतूनें जर तुम्ही सर्व संपत्तीचा उपयोग केलात तर तुम्ही आजपर्यंत केलेल्या पातकांचें थोडें तरी क्षालन होईल. नारायण बुवा ! जहागिरी, इनाम व नोकरी या तिनींपैकीं तुम्हाला कांहींच नाहीं! असें असून ही संपत्ति कोठून हो आली? असें जर एखाद्या

अधिकाऱ्यानें तुम्हाला विचारलें तर तुम्ही काय उत्तर द्याल? नारायणबुवा, आज जर माझ्या हातांत राजसत्ता असती तर कायदाच असा केला असता कीं, अशा बुवांनीं व साधूंनीं भरलेले मठ व संस्था, जितक्या म्हणून असतील तितक्या सर्व काढून घ्याव्या. नारायणबुवा ! मी माझ्या मुलीकडे व तिच्या मुलाकडे पाहिल्यावर मला काय वाटत असेल याची कल्पना तुम्हीच करा. अहो ! जी जेवून उठल्यावर हातावर पाणी घालण्यास ब्राह्मण, ती आज पोटाकरितां....पुढें लिहवत नाहीं. जळो ती बुवाशाही!

(दैनिक त्रिकाळ ता. ३०-८-३५)

* * * * *

मी व नारायण महाराज



ले. श्री. शं. पेंडसे, खामगांव

किर्लोस्कर मासिकाचा ऑगस्टचा अंक म्हणजे नारायणमहाराजांच्या कीर्तिघटाला पडलेलें छिद्र होय ! .... माझे मतें तीन्ही लेखकांनीं एका अंगाचा विचार केलेला दिसतो. मी जी बाजू समाजापुढें विचारप्रवृत्त होण्यास मांडीत आहें ती (पैशाची नमून) नैतिक अधःपाताची होय ! ....

मी पुण्यास शिकावयास असतांना बेटांत जावयाचा प्रसंग नेहमी येई. माझी बहीण चि. सौ. लीला ही आजारी होती, तिचें दुखणें पुढें क्षयावर गेलें. तिचे शुश्रुषेकरितां केडगांव बेटांत मला तब्बल एक वर्ष राहाण्याचा प्रसंग आला. नारायणबुवाच्या तीर्थ व अंगाऱ्याचा प्रभाव लटका पडून माझ्या प्रिय बहिणीला आपली जीवनयात्रा नारायणपदीं अर्पण करावी लागली. माझें जेवण घरींच होत असल्यासुळें मी .... मिधा झालों नव्हतों,

मी अतिशय धूर्ततेनें ..... महाराजांच्या आंतल्या खास गटांत शिरकाव करून घेतला. ..... डोक्यावर छत्री धरणें, अंगावरील माशा मारणें अशीं कामें मी सहसा सोडीत नसे. हळुहळू मी त्यांच्या रात्रीच्या सेवेच्या वेळीं बसावयाचा परिपाठ पाडला व तीहि फळी फोडून मी अगदी सोंगटचाच्या खास पटावर बसण्याचा विजय मिळविला.

एका वर्षाच्या सहवासानें नारायण महाराजांत कांहीं विशेष आहे, असें मला मुळींच वाटत नाहीं. पण तो धूर्त व कपटी मनुष्य आहे, एवढें मात्र मी खास सांगूं शकतों.

हें वेट म्हणजे सक्त मजूरी शिक्षा भोगलेल्यांचें, रेसेसच्या नादीं अस-लेल्यांचें, यात्रेकरू म्हणून धर्मशाळेंत उतरलेल्या भावड्या बायांवर आक्रमण करणाऱ्यांचें, मालकीचें कुरण आहे. एक घडलेली हकीगतच आतां देतों.

एकदां नित्याप्रमाणें महाराजांची हातपाय दाबण्याची सेवा चालू होती. शास्त्रीबुवा पुराणांतील कांहीं सांगत होते. मी जवळच बसलों होतों. रात्रीचे अकरा वाजले होते. इतक्यांत एक खेडवळ मनुष्य धांवत तेथें आला व गयावया करून सांगूं लागला कीं, ' महाराज माझ्या बायकोला त्या दरवाज्यावरच्या शिपायानें फुसलावून कुठें तरी लपवून ठेविली आहे. ***पुन्हा पुन्हा तो तसेंच म्हणाल्यावर नारायणबुवांनीं सभोंवार पाहिलें तों सर्व शिष्य सेवेंत दंग असून मीच नुसता रिकामा बसलेला दिसलों. 'राजाभाऊ, गोविंदरावाला घेऊन त्याची बायको तेवढी सांपडून दे, ' काय ? ' असें म्हणून बुवांनीं उशींत डोकें खुपसलें.

मी तेथें राहात असल्यापासून अशा गोष्टी कानावर यावयाच्या ! ही कामगिरी म्हण ` प्रत्यक्ष पुरावा आपल्याला मिळणार या आनंदानें व उत्साहानें मी निघालों. थोडें दूर गेल्यावर तो खेडवळ म्हणाला, ' धर्म-शाळेवरचा पहारेकरी तीन तीनदां आमच्या जागेकडून जातो आणि माझ्या बायकोकडे बघून हसतो. शेवटीं रात्रीं जेवावयाचे वेळीं त्यानें तिला खुणा केल्या व पंगत उठतांच बायकांच्या घोळक्यांत ती पत्रावळ घेऊन पुढें गेली व पहारेकऱ्यानें तिला पळविलें. ' धर्मशाळेंत गेल्यावर गोविंद-रावाला (मॅनेजर, धर्मशाळा बेट,) महाराजांचा निरोप कळविला, त्यांनीं एक कंदील व पहारेकरी माझ्या मदतीस दिला. .... आड बाजूच्य

वाचनालय
ता.

सर्व जागा शोधूनहि मिळायची वस्तु सांपडली नाहीं. वरोरा जर चेरच घेतला तर गोडीगुलावीनें थोडेच तो देऊं विलेला ऐवज दाखविणार ? शेवटीं मी निराश होऊन महाराजांना सर्व सांगितलें. आतां रात्रीं दोनचा सुमार होता. खेडवळाचा जीव तिळतिळ तुटूं लागला. माझ्या मनांत तर अतिशय त्वेष आला, पण करणार काय ? या नंतर महाराजांनीं त्याला झोंपावयास सांगितलें व बायको येईल असें आश्वासन दिलें. (या दरम्यानच्या कालांत पहारेकऱ्यानें आपलें काम करून घेऊन त्या बाईला धर्मशाळेंत पोंचविलें होतें.) खेडवळ धर्मशाळेंत जों जातो तों बायको सामानाजवळ निजलेली ! अर्थात् तेथें तिची व त्याची वाचावाची सुरू झाली व तो तिला मारूं लागला ! ही संधि साधून त्या पहारेकऱ्यानें त्या दोघांनाहि अशा अपरात्रीं धर्मशाळेंतून बाहेर काढून स्टेशनच्या रस्त्यावर खूप लांब हाकून दिलें !

दुसरे दिवशीं खरा प्रकार महाराजांच्या कानावर जाऊनहि त्या पहारेकऱ्यास माफीशिवाय कोणतीच शिक्षा मिळाली नाहीं. महाराजांजवळ राहणाऱ्या तरण्याबांड अविवाहित शिष्यानें (त्याचें नांवहि मी सांगू शकतो) असाच एक अत्याचार भर मध्यरात्रीं अगदीं उघड्यावर करण्याचा यत्न केलेला मला माहीत आहे.

वात्सल्याच्या मागें दडून एका शिष्यानें एका कथेकऱ्याच्या मुलीवर वाईट नजर ठेवल्याचें जेव्हां माझ्या निदर्शनास आलें, तेव्हां मी त्या इसमास अप्रत्यक्षपणें टोमणे मारूं लागलों. प्रत्येक इसम आपआपसांत कुजबुजूं लागे. पण तो केवळ महाराजांचा पट्टशिष्य (व तो ताकदवान) म्हणून भिऊन सर्व गप्प असत असत. आम्ही मात्र याला इकडे तिकडे फिरणें मुष्कील करून सोडलें. हा इसम तेथें अजून राहात आहे. अशा तऱ्हेच्या भयानक कांटेरी वातावरणांत आपल्या लेकी, सुना व बायका घेऊन बेटांत जाणें व राहाणें किती भयंकर आहे, हें समाजाला समजावयाला नको काय ?

नारायणबुवांना माझा असा स्पष्ट सवाल आहे कीं, महाराज आपण जर लोकांचा उद्धार करण्याकरतां अवतरलां आहांत तर बेटाच्या स्थापनेपासून तेथें अव्याहत जे वाईट प्रकार चालू आहेत, त्यांचें निराकरण इतक्या

दिवसांत आपण कसें करूं शकलां नाहीं ? दत्ताचा अवतार समजल्या जाणाऱ्या असामान्य माणसाला हें कां करतां येऊं नये ? (रा. पेंडसे यांनीं आणखी पुष्कळ लिहिलेलें आहे, पण मुख्य विषय वरील उताऱ्यावरून कळून येईल.)

* * * *

नारायण महाराजांचें अलौकिकत्व ?

(लेखकः—राजाराम प्रल्हाद कानिटकर एम्. ए.)

(पूर्वी मुंबईस निघणाऱ्या प्रगति नांवाच्या वृत्तपत्रांत २५।६।३१ रोजीं प्रसिद्ध झालेल्या लेखांतील भाग)



महाराजांना द्रव्य शिवनिर्माल्यवत् नाहीं !

रामदासांनीं आपल्या दासबोध ग्रंथांत साधूचीं, सत्पुरुषांचीं आणि महंतांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. आपणांस फार खोलांत शिरावयाचें न स ल्या मु ळें त्याचा भावार्थच विचारांत घेऊं. साधूचें मुख्य लक्षण निःस्पृहता. पण येथें पाहावें तों सर्वच उलट ! लौकिक-रीत्या दिलेलें दान महाराज लौकिकरीत्या नाकारतात, पण थोडा आग्रह केल्यास ठेवून घेतात. महाराजांना स्वतःसाठीं या द्रव्याचा यत्किंचितसुद्धां अभिलाष नाहीं, पण हें संस्थान त्यांना चालवावयाचें असल्यामुळें केवळ निरुपायानें त्यांना हया ' शिवनिर्माल्यवत् ' द्रव्याचा स्वीकार करावा लागतो ! बाकी त्यांची तशी मुळींच इच्छा नसते ! ?! बिचारे महाराज ! त्यांच्यावर हें

संस्थान चालविण्याचा बोजा कोणी घातला नसता तर ते कुणाच्याहि तनसडीला अभिलाष बुद्धीनें शिवले नसते ! त्यांचा केवळ नाईलाज ! ! !

महाराजांना जर द्रव्यतृष्णा नाहीं, तर सर्व खजिना महाराजांच्या ताब्यांत कां ? तिजोरीची किल्ली खुद्द महाराजांच्या जवळ कां ? पैशासंबंधींचा सर्व व्यवहार ते जातीनें कां पाहातात ? ही अधिकारलालसा कीं द्रव्यमोह ? खुशाल एखाद्या शिष्याच्या होतीं सर्व तिजोरी द्यावी आणि आपण (हरि हरि) करीत बसावें. पण विश्वासू शिष्य तर मिळायला पाहिजे ना ! महाराजांच्या सान्निध्यांत असा एकहि शिष्य निर्माण होऊं नये ना ? मग महाराजांच्या शक्तीचा प्रभाव आपल्या दृष्टीस कसा पडणार ?

महाराजांना जर द्रव्यैषणा नाहीं तर महाराज आपल्या गरीब व श्रीमंत भक्तांमध्यें भेदभाव कां करतात ? एकदां एक गरीब बिचारा भक्त महाराजांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांना आपल्या दुःखाची कहाणी सांगावयाला लागला, इतक्यांत महाराजांच्या दाराशीं एक मोटार उभी राहिली आणि त्यांतून एक धनाढ्य गुजराथी जोडपें उतरलें व महाराजांच्या-कडे गेलें. त्यानें महाराजांच्या पायांवर डोकें ठेवून आपली कथा सांगण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्याबरोबर सगळा रंग पालटला. महाराजांनीं त्या गरीब भक्ताला थांबावयाला सांगून त्या गुजराथी जोडप्याला आपल्या बरोबर आंतल्या खोलींत नेलें आणि तेथें त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें महाराज मोटारीवर व श्रीमंतीवर भाळले असें यावरून सिद्ध होत नाहीं काय ? त्या गरीब भक्ताला चार दोन तास (त्यांच्या नांवानें हाका मारीत) स्वस्थ बसावें लागलें. करतो काय ? धनवान् भक्तांच्या तावडींतून सुटून महाराज मोकळे होतील तेव्हां त्याला दर्शन मिळावयाचें ! आणि दर्शन मिळालें तरी त्याचें सगळें म्हणणें ऐकून घ्यायला महाराजांना फुरसद मिळाली पाहिजे ना ? कारण त्यांच्या ध्यानाची वेळ होत आलेली असा-वयाचीच ! धनिक भक्तांच्यापुढें महाराजांना कसलीच सवड सांपडत नाहीं ! दुर्दैव त्यांचें ! ! महाराजांना जर द्रव्यतृष्णा नाहीं, तर असा भेदभाव त्यांच्याजवळ कां ? ज्यांच्याजवळ असला भेदभाव आहे, तो यःकश्चित् क्षुद्र मनुष्यापेक्षां वरच्या दर्जाचा मुळींच नाहीं, आणि तो 'महाराज' म्हणून घ्यायला लायक आहे काय ?

महाराज राजयोगी आहेत काय ?

तें दत्ताचें कलाकौशल्यानें नटलेलें सुंदर मंदिर, ती 'वेटिंगरूम'सारखी भव्य धर्मशाळा, तो रोज शें दोनशें लोकांना सकाळ संध्याकाळ वाढण्यांत येणारा प्रसाद, ती महाराजांची बंगलेवजा पर्णकुटिका, ती विहारवाटिका, ती मोटार, ती तेथल्या अहंमन्य नोकरचाकरांची अरेरावी, त्या भिंतीवर लावलेल्या 'आज्ञा' वगैरे गोष्टी, संपत्तीच्या आणि वैभवाच्या निदर्शक नव्हेत काय? आणि हें वैभव पाहून त्यांच्या ठिकाणीं लोहचुंबकाप्रमाणें वित्त-चुंबक शक्ति नाहीं असें म्हणण्यास कोण धजावेल ? लोक केवळ स्वार्थी हेतूनें प्रेरित होऊन त्यांच्या पायांवर द्रव्य ठेवतात ही गोष्ट तर सर्वांनीं मान्य केलीच पाहिजे. ही कांहीं खऱ्या राजयोग्याची व्याख्या नव्हे.

महाराज फुकट-यांना पोसतात

महाराजांनीं फुकटचें जेवण घालण्याचें हें अन्नछत्र सुरू केलें त्यापेक्षां दुसरें कांहीं प्राच्यविद्या संवर्धनाचें कार्य आरंभलें असतें तर महाराजांच्या द्रव्याचा व्यय उत्तम तऱ्हेनें झाला असता व तें सत्कारणीं पडलें असतें. हया रिकाम-टेकड्या लोकांना जेवूं घालण्यांत महाराज कोणतें महत्पुण्य संपादन करतात ? सत्पात्रीं दान असेल तर तें खरें दान असा जर दंडक आहे, तर मग हया निरर्थक आणि कुपात्रीं दानपरायणतेचें सार्थक काय ? केडगांवास कितीहि दिवस राहा, महाराज फुकटचें जेवण घालतात, अशी सगळीकडे द्वाही फिरली गेल्यामुळें शे दोनशें लोक सकाळ संध्याकाळ फुकटचा पुरखा झोडायला तयार !

स्थानिक सेवेकऱ्यांचा माजोरीपणा

बरें, हे आयतोबा फुकटचें यथेच्छ जेवून इतर यात्रेकरूंशीं सौज-न्यानें व सभ्यतेनें वागत असतील असें म्हणावें तर मुळींच नाहीं. त्यांना वाटतें आमची येथें मिरास पुरली आहे. आम्ही बरेच दिवस येथें राहात असल्यामुळें येथले हक्कदार झालों आहों; आम्हांला दुसऱ्यावर अधिकार गाजवावयाला कुणाचा प्रत्यवाय आहे ? जणूं काय केडगांव संस्थान त्यांचेंच आहे ! तेथें राहाणारे सत्पुरुष व स्त्रिया इतक्या अरेरावीनें व माजोरी-पणानें वागतात कीं जणुं काय ही दौलत त्यांचीच आहे !! आणि तेच

खरे तिथले मालक आहेत ! बाहेरचे यात्रेकरू त्यांना खपत नाहींत असें त्यांच्या तेथील वर्तनावरून सहज दिसून येतें ! यःकश्चित् विहिरीच्या पाण्याची गोष्ट ! त्या तिथल्या वाया इतक्या उन्मत्तपणानें वागतात कीं यात्रेकरू निमुटपणें ओढचावर जाऊन स्नान करणें पत्करतो. जिथें तिथें आपला अधिकार चालावा असें या फुकटचांना वाटतें ! महाराजांची सेवा करून हे लोक एवढेंच शिकले कीं काय कोण जाणे ! साधें सौजन्यदेखील यांचेजवळ नाहीं ! **महाराजांच्या फुकटच्या अन्नानें तर हे लोक माजुरी बनत नसतील** ! तेथें श्रीदत्तमंदिरांत दर गुरुवारीं पालखी निघत असते. तेथें कुतूहलप्रेरित यात्रेकरू जात असतात. त्या वेळीं त्यांना धड पालखीपाशीं जाऊन मूर्तिसुद्धां पाहाणें शक्य होत नाहीं. कारण चांदीच्या काठ्या घेऊन मत्त झालेले ते वेत्रधारी आपला अधिकार गाजवितात. महाराजांचें दर्शन घेतांना सुद्धां तोच प्रकार. त्यामुळें केडगांवांतून आपण पाऊल बाहेर काढतों केव्हां आणि हया फुकटचा अधिकाऱ्यांच्या नडाक्यांतून निसटतों केव्हां असें होऊन जातें. हया तेथील लोकांच्या— नोकरांच्या अरेरावीबद्दल, उद्धटपणाबद्दल आणि माजोरीपणाबद्दल महाराजच सर्वस्वी जबाबदार आहेत. त्या लोकांना त्यांच्या वागणुकीबद्दल दोषी ठरविण्यापेक्षां महाराजच आपल्या मूक वृत्तीनें त्यांना अप्रत्यक्षपणें उत्तेजन देत असल्यामुळें ते सर्वस्वी दोषी आहेत. महाराज जरी असल्या गोष्टींत मन घालीत नसले किंवा असल्या गोष्टी त्यांच्या कानावर पडत नसल्या तरी महाराज हया गोष्टींना हें एवढें संस्थान चालविण्याच्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेमुळें पर्यायानें जबाबदार आहेत असें म्हटल्यास प्रत्यवाय कोणता ? **महाराजांच्या सान्निध्यामुळें लोकांची असलेली 'माणुसकी' जात चालली आहे असें सिद्ध होत नाहीं काय** ? आपल्या सभोंवतालच्या परिवाराला श्रेष्ठ ज्ञानाचा लाभ देऊन जर त्यांना उच्चपदीं तर राहोच, पण साध्या माणुसकीच्या जागीं बसविता आलें नाहीं किंवा येत नाहीं, तर ते बाकीच्या परस्थ भाविकांस मुमुक्षचा मार्ग कसा सांगणार ? आणि तो मार्ग उपदेशिण्याचा तरी अधिकार त्यांना प्राप्त कसा होणार ? ज्याला स्वतःच्या परिवाराची अंतःशुद्धि करतां येत नाहीं, तो

दुसऱ्यांच्यासाठीं झटणार हें अगदींच विसंगत दिसतें ! ही गोष्ट महाराजांच्या कर्तृत्वाची आणि अवताराची अंशतः साक्ष पटविते ! !

हां अन्नदानाची कीर्ति नव्हे अपकीर्ति

तेथें दररोज सकाळसंध्याकाळ मिळणाऱ्या 'प्रसादा' कडे लक्ष देण्याचें मुळींच कारण नाहीं. वोलून चालून अन्नछत्रांतलें तें जेवण! साधारण यात्रेकरूला तसलें जेवण जेवण्याची मुळींच इच्छा होत नाहीं. पण 'प्रसाद' म्हणून तो मोठ्या नाइलाजानें भक्षण करितो. प्रसादाला नांवें ठेवणें शिष्टसंप्रदायाविरुद्ध असल्यामुळें आपण असें म्हणूं कीं, असला प्रसाद लोकांना कां वाढावा ? ह्यापेक्षां चांगलें अन्न वाढण्याची शक्ति जर आपल्या अंगांत नसेल तर असलें कदान्न वाढून स्वतःच्या अन्नदानाची एवढी टिमकी कां वाजवावी ? कोणी एवढा उपद्व्याप सांगितला होता ? त्यापेक्षां चांगलें आणि सत्पात्रीं अन्न घालून लोकांचा दुवा तरी संपादन करावा. फुकटचांचा आणि अपात्रांचा योगक्षेम चालवावयाला यांना काय अधिकार आहे ? फुकटचांनीं फुकटच्या अन्नाला स्तुतीच्या भूषणांनीं आणि 'प्रसाद' यासारख्या महनीय आणि गोड शब्दांनीं कितीहि भूषविलें तरी कदान्नाला अमृताची चव कशी येणार ? महाराजांना वाटतें आपण रोज शेंदोनशें लोकांना जेवूं घालून मोठें पुण्य संपादन करीत आहों. पण हा त्यांचा भ्रम दिसतो.

महाराजांचें असामान्यत्व !

महाराजांच्याकडे पुष्कळ लोक नेहमी येत असतात. पण मौज ही कीं ज्या कांहीं थोडक्या लोकांना त्यांच्या नशिबानें गुण येतो तेवढ्याच लोकांच्या गोष्टी ऐकूं येतात. तेच लोक आपल्याला महाराजांच्या अलौकिक शक्तीचा अनुभव आला असें जाहीर करतात आणि महाराजांच्या भक्तगणांची संख्या वाढवावयास अप्रत्यक्षपणें कारणीभूत होतात. उलट ज्या दुर्दैवी लोकांना महाराजांच्या हातचा यत्किंचितसुद्धां गुण आला नाहीं, अशा हतभाग्यांचीं नांवें आपणांस कधींच ऐकूं येत नाहींत आणि त्यांचीच संख्या गुण आलेल्यांच्यापेक्षां निःसंशय मोठी आहे. ह्या लोकांत महाराजांच्या नांवानें खडे फोडणारेहि कित्येक लोक सांपडतील !

एकदां एक भक्त आपला मरणोन्मुख मुलगा घेऊन महाराजांकडे गेला. महाराजांनीं त्याला अंगारा देऊन तीन दिवसांनीं मुलाला घेऊन येण्याची आणि केडगांवहून तावडतोब निघून जाण्याची आज्ञा केली. नाइलाज म्हणून त्या भाविक बापाला तसेंच परतावें लागलें. मुलगा आधींच मृत्युशय्येवर आणि त्यांतून जाण्यायेण्याचा त्रास झालेला, त्यामुळें घरीं आल्यावरोबर मुलाची प्रकृति अधिकच बिघडली पण त्या बापाला अंगाऱ्याचा अमृत बिंदूइतका आधार होता. त्यानें अर्थात् दुसरे कोणतेहि उपचार केले नाहींत. पण त्याच्या दुर्दैवानें तो मुलगा त्याच दिवशीं महाराजांच्या अंगाऱ्याची परीक्षा पाहाण्यासाठींच कीं काय इहलोक सोडून गेला ! एकुलतें एक पुत्ररत्न हरपल्यावर बापाची मनःस्थिति काय झाली असेल ! आणि त्यांतून त्यानें मृताला पुनरुज्जीवन देणाऱ्या वैद्यविद्येवर भरंवसा न टेवल्यामुळें आणि सर्वस्वीं महाराजांच्या अंगाऱ्यावर विसंबून राहिल्यामुळें त्याच्या दुःखाला पारावार राहिला नाहीं. केवळ जाण्यायेण्याच्या श्रमामुळें सुद्धां मुलाचें मरण ओढवलें असावें असें त्याला वाटलें. त्यामुळें महाराजांच्याबद्दल त्याच्या मनांत अत्यंत क्रोध, तिरस्कार व अश्रद्धा उत्पन्न झाल्यास नवल काय ? ठरल्याप्रमाणें तिसऱ्या दिवशीं तो महाराजांच्या पुढें दाखल झाला. महाराजांनीं मुलगा कोठें आहे म्हणून म्हणतांच त्यानें महाराजांच्या अंगावर एक मूठभर राख फेकली, व म्हणाला, ' महाराज, ही माझ्या मुलाची राख ! ! माझा मुलगा तुमच्या आशीर्वादानें त्याच दिवशीं वारला. ' त्यावर महाराज म्हणाले ' तुझ्या दैवांतच मुलगा जगावयाचा नव्हता, जाऊं दे, तुझें दुर्दैव ! ' त्यावर तो बाप उसळून म्हणतो, " माझ्या दैवांतच जर मुलगा वांचावयाचा नव्हता तर तुमच्या अंगाऱ्याचा उपयोग काय ? तुम्हीच जर आम्हांला दैवावर हवाला ठेवावयास सांगतां तर तुम्ही हवेत कशाला ? आणि मग तुमचें सामर्थ्य काय ? तुमच्या सारख्या भोंदू महाराजांवर विश्वास ठेवला म्हणूनच माझा मुलगा गेला. तुमच्या नादीं न लागतां योग्य औषधोपचार केले असते तर माझा मुलगा खास जगला असता. "

आत्मगौरवाची वृत्ति !

महाराजांना आपला आत्मगौरव व्हावा अशी खास इच्छा दिसते.

पण ही क्षुद्र इच्छा महाराजांस निःसंशय कमीपणा आणणारी आहे, महाराजांना नमस्कार करण्याची प्रद्धत प्रत्यक्ष त्यांच्या पायावर डोकें ठेवणें ही होय. ही पद्धत सभ्य व कुलवान स्त्रियांना मुळींच पसंत नाहीं. दुरून नमस्कार करणें हें योग्य आणि मर्यादिला धरून असतां परपुरुषाच्या पायावर डोकें ठेवण्याचा मार्ग कोणत्या सभ्य स्त्रीला आवडेल? आतां, अनेकांनीं वहिवाटच पाडलेली असल्यामुळें त्या स्त्रिया नाइलाजानें तो मार्ग अनुसरतात. दुरून नमस्कार करून चालत नाहीं काय? तें चालत नसेल तर त्याच्याहि पुढें जाऊन महाराजांचे चरण चुरावे म्हणजे मग खरी भक्ति प्रगट झाली! लोकांनीं आपल्या पायावर डोकें ठेवावें ही कुठली अहंगौरवाची स्वार्थवृत्ति महाराजांत शिरली कोणास ठाऊक!

प्रस्तुत लेख केडगांवास जाऊन सर्व गोष्टी त्यक्ष नजरेखाली घालून आणि एकंदर परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन करून नंतरच लिहिला आहे. केवळ कर्णोपकर्णी आलेल्या गोष्टीवर व दंतकथांवर भरंवसा न ठेवतां 'चक्षुर्वै सत्यं' या न्यायानें ज्या गोष्टी साधार आहेत तेवढ्याच येथें आडवडदा न ठेवतां निःसंकोचपणें आणि निर्भीडपणें मांडल्या आहेत.

आम्ही केडगांव येथें गेलों त्या वेळीं महाराजांबद्दल आमच्या मनांत थोडी तरी पूज्यबुद्धि वास करीत होती. पण तेथील एकंदर परिस्थिति पाहून मन कलुषित झालें. ही अत्यंत दुःखदायक व दुदवाची करुण कहाणी आहे! तेथें गेल्यावर तरी चांगल्या अर्थीं आमचें मतपरिवर्तन होईल असें वाटलें होतें. पण एका अर्थीं मतपरिवर्तन झालेंहि. त्यांच्याबद्दल जें थोडेंबहुत चांगलें मत होतें, तें अगदीच बदलून त्याच्या जागीं विरुद्ध मत विराजमान झालें! महाराजांना नमस्कार करण्याची सुद्धां बुद्धि होईना. आम्ही आपल्याकडून खूप शिकस्त केली पण डोकें लवेनाच! आम्ही शेजारीं असलेल्या दत्तमूर्तीला नमस्कार केला आणि निघालोंच.

टीप:—कुलीनस्त्रिया लांबून नमस्कार करूं लागल्या म्हणजे महाराज स्वतः सांगतात कीं बाई, पायाला स्पर्श करून नमस्कार करा, ही गोष्ट ४।५ चांगल्या लोकांकडून ऐकली आहे. (संग्राहक)

प्रकरण २० वें.

विलायती छापाचे देशी बुवा !

किर्लोस्कर मासिकामध्यें गेल्या दोन वर्षांत महाराज म्हणून लौकिकांत प्रसिद्ध असलेल्या बुवांचे निरनिराळे नमुने प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं, बुवाशाहीमध्यें तीन वर्ग आहेत. पहिल्या वर्गांत स्वयंसिद्ध बुवा पडतात. ते एकदम चमत्कार व अवतार करीतच पुढें येत असतात. दुसरे कांहीं बुवा धूर्तपणा, थोडें शिक्षण, प्रवचन किंवा कांहीं तरी छाप बसण्याचा गुण या जोरावर पुढें येतात; आणि तिसरा वर्ग असा आहे कीं, त्यांत शिकलेसवरलेले बुवा येतात. सुशिक्षित बुवा व त्यांत तो बी. ए., एम्. ए. झालेला असला म्हणजे सहजच त्याचें महात्म्य वाढतें. त्यांत तो परदेशाला जाऊन आलेला असला, बरोबर गौरकाय शिष्य व शिष्यिणी असल्या म्हणजे मग विचारावयालाच नको ! ! ! अशा तऱ्हेचे तिसऱ्या वर्गांत येणारे, गेल्या दहा वर्षांत बुवा बनलेले व अलीकडे लोकांच्या आदरास(?) पात्र झालेले असे, स्वतःस महाराज म्हणविणारे विश्वनाथबुवा केसकर हे होत. त्यांच्या बुवाशाहीच्या गमती त्यांच्याच स्वाक्षरीच्या पत्राधारें प्रस्तुत लेखांत देत आहें.

हे बुवा १९२७।२८ सालीं मुंबई भागांत होते. त्यावेळीं अनेक लोक त्यांच्या नादीं लागले होते. अनेकांशीं त्यांचा पत्रव्यवहार होता. एक वृद्ध साक्षेपी व व्यवहारज्ञ गृहस्थ असे भेटले कीं, त्यांच्याजवळ बुवांच्या हातचा वराच पत्रव्यवहार सांपडला.

एकंदरींत त्या पत्रव्यवहारावरून व अन्यत्र मिळालेल्या माहितीवरून पाहातां हे बुवा अद्याप कच्चेच दिसतात. स्वतः पत्रें लिहिणें व प्रवचनें देणें म्हणजे टाकांत किंवा शब्दांत गुंतणें होय! **पक्का बिलंदर बुवा तोच कीं, जो टाकांत व शब्दांत कधींच गुंतून घेत नाहीं** व सर्व उपटून पुन्हां



श्री. विश्वनाथ बुवा केसकर

मला कांहीं नको असें म्हणतो! पण केसकरबुवांना हें साधलेलें दिसत नाहीं.

केसकर महाराजांचें, उपासनी–लीलामृत अगर नारायण–लीलामृता-प्रमाणें अद्याप लीलामृत झालेलें नाहीं. तथापि १९३४ सालीं श्री. शं. मुजूमदार यांनीं महाराजांचा अल्प परिचय प्रसिद्ध केला आहे व त्यापूर्वी सन १९२८ सालीं श्रीवर गोपाळ ऋषि यांनीं नाथगीतांजलि या काव्याच्या प्रस्तावनेंत या महाराजांची माहिती थोडीबहुत दिलेली आहे. या दोन्ही लिखाणांत परस्पर विरोध आहे. तथापि त्यांतून जें सार निघतें तें असें—

विश्वनाथमहाराज केसकर यांचा जन्म सातारा जिल्ह्यांतील म्हसवड गांवीं सन १८८० सालीं झाला. यांचे वडील उमरावती येथें वकिली करीत होते. केसकरांचें उमरावती हायस्कुलांतील शिक्षण आटोपल्यावर ते डेक्कन कॉलिजमध्यें शिक्षणाकरितां गेले. बी. ए. झाल्यावर १९०३ ते १९१३ पर्यंत सुमारें नऊदहा वर्षें नूतन मराठी विद्यालयांत प्रथम ते शिक्षक, नंतर लाइफ मेंबर व पुढें सुपरिंटेंडेंटहि झाले. नूतन मराठी संस्था सोडण्याचें कारण कोणींच दिलेलें नाहीं. तथापि त्या संस्थेमुळें 'मनःस्वास्थ्य व अंगि-कारलेलें कार्य साधत नाहीं असें वाटल्यावरून त्यांनीं पुणें सोडलें व हैद्राबाद येथें स्वतंत्र ऊर्दू स्कूल काढलें' असें रा. मुजुमदार लिहितात. १९१८ सालीं हैद्राबाद सोडून हे बनारस येथील राष्ट्रीय विद्यापीठांत दाखल झाले. सृष्टिसौंदर्य, गंगामातेची पवित्रता, काशीविश्वेश्वराचें निर्मळ वातावरण यांमुळें त्यांच्या अंतःकरणांत खळबळ झाली. (ऋषि लिहितात कीं पत्नी वारल्यामुळें त्यांना वैराग्य प्राप्त झालें.') म्हणूनच त्यांनीं हिमालयाकडे प्रयाण केलें. तेथें ते नऊदहा वर्षें होते. सत्पुरुषाच्या भेटी, श्रीगुरु दत्तात्रयाचें दर्शन, भगवंताचा प्रसाद वगैरे मिळाल्यावर सन १९२९ सालीं ते अमेरिकेस गेले.

फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी, अमेरिका, इंग्लंड वगैरे ठिकाणीं त्यांनीं प्रवास केला. वरील देशांत त्यांनीं अठरा मठ स्थापले आहेत. त्यांनीं तिकडे अनेक व्याख्यानें दिलीं आहेत. 'पिलर्स ऑफ लाइफ' या नांवानें पुस्तकरूपानें त्यांचीं कांहीं व्याख्यानें प्रसिद्ध झालीं आहेत. अद्यापहि प्रत्येक पूर्णिमेला 'फुल मून मेसेज' पाठविण्यांत येतात.

इकड आल्यावर महाराजांनीं वांई, पुणें, कोल्हापूर, मुंबई भागांत संचार केला व गोरगरिबांना औषधेंहि मोफत वाटलीं.

श्री. केसरकर महाराज यांच्या चरित्राची ही वरील रूपरेषा आहे. बुवांची राहाणी व थाटमाट सर्व राजयोगी आहे. अर्थात् त्यांचा सर्व खर्च शिष्यांच्या देणग्यांवरच चालत असला पाहिजे.

मुंबई शहर व लगतचा भाग यांतील बुवांचें वास्तव्य

सन १९२७ व १९२८ या सालीं विश्वनाथबुवा हे भोयसर, पालघर, वसई, अर्नाळा, मुंबई, वांद्रें या भागांत होते. तेथें असतांना कोणाला नोकरी लावून देतों, कोणाला कर्जाऊ पैसे देववितों, कोणाचें गुप्त धन काढून दाखवितों, अशा मिषानें त्यांनीं लोकांना नादीं लावलें व प्रथम औषधोपचार सुरू केले. समाजांत आर्त माणसें कांहीं असतातच, त्यांना बुवांच्या औषधामुळें चुकून गुण आला कीं, बुवा त्यांच्याकडून कशा प्रकारें पैसे काढीत हें ता. १७-१-२८ च्या पत्रावरून दिसतें. त्यांत महाराज एका गृहस्थास लिहितात-

(१) चांदीच्या कपबशाचा जोड (दूध पिण्याकरितां) आणावा.

(२) रेशीमकाठी उपरण्याची जोडी, (कांठ लहान असावा.)

(३) प्रवाळभस्म चंद्रपुटी एक तोळ्याच्या लहान बाटल्या आणाव्या व जातांना मुलाच्याकरितां औषध घेऊन जावें.

महाराजांनीं ज्या गृहस्थास हें पत्र लिहिलें ते औषधाच्या हेतूनें त्यांच्याकडे जात होते हें खरें, पण गुण येण्यापूर्वीच महाराजांनीं वरील वस्तूंची (किंमत अंदाजें ३०।३२ रुपयांची) मागणी केली आणि तेवढे पैसे उकळले. याच गृहस्थांना केसकरबुवा पुढें ता. ३०।३।२८ च्या एका पत्रांत लिहितात कीं, 'रा.** रेक्स फोटो स्टूडिओ यांना फोटोबद्दल आमच्यातर्फे वीस रुपये पोंचते करावे.' या गृहस्थांनीं हे वीस रुपये पोंचविले नाहींत हें सांगावयास नकोच. पण यो फोटोंचें महाराजांनीं पुढें काय केलें हें सांगण्यासारखें आहे. त्यांनीं ते फोटो आपल्याकडे जे मोठमोठे लोक येत असत त्यांना फुकट वांटले व ज्या कित्येकांना समक्ष देण्यास बुवा कचरत, त्यांच्याकडे कोणाकडून तरी ते पाठवून दिले. कित्येकांना फोटोची

पूजा करीत जा, असें सांगितलें. लोकांच्या गळ्यांत आपले फोटो अडकवून, त्याची पूजा करण्यास सांगणें हें किती हास्यास्पद आहे बरें ? पण त्याहीपेक्षां आश्चर्य हें कीं, भोंवतालच्या मोठमोठ्या लोकांनीं ते फोटो घेतले व कांहींनी तर त्यांची पूजाअर्चाहि करण्यास प्रारंभ केला ! !

विश्वनाथबुवांचा जन्म फाल्गुन शुद्ध पूर्णिमेला झाला. कारण नाथ-गीतांजली मध्यें सरस्वतीबाई लिहितात 'येती फाल्गुनांत जन्माला। पूर्णिमेला शुभ काला । प्रगटले योग्य कालाला ॥' या फाल्गुनी पूर्णिमेच्या निमित्तानें आपला वाढदिवस जाहीरपणें साजरा करून घ्यावा व त्या निमित्ताने आपला दंभ वाढवावा असें महाराजांच्या मनांत आलें. लगेच त्यांनीं आपल्या शिष्याकरवीं पत्रें पाठविलीं, कीं 'येत्या फाल्गुनी पूर्णिमेस वांद्रा येथें होलिका उत्सव करण्याचें निश्चित झालें आहे. त्या शुभ प्रसंगीं ब्रह्मनिष्ठ श्रीगुरु विश्वनाथ महाराज केसकर यांच्या अध्यक्षतेखालीं पुढील कार्यक्रम पार पाडण्यांत येणार आहेत' वगैरे.

आतां एखादा असा उत्सव आणि तो स्वतःचा साजरा करून घ्याव-याचा म्हणजे चार शिष्य उत्पन्न केले पाहिजेत, आणि त्यांच्या सहयांनी मोठमोठीं निमंत्रणपत्रकें फडकल्याशिवाय जाहिरात होत नाहीं. म्हणून जे. पी., रावबहादूर, एल् एल्. बी. अशा पदव्या असलेल्या मोठ्या लोकांच्या सह्या आमंत्रणपत्रिकेवर घातल्या. परंतु या सह्या त्यांच्या संमतीनें घातल्या नसल्यामुळें त्यांनीं आपल्या सहयांनीं हीं हस्तपत्रकें छापण्यास विरोध केला.

बुवांना ता. ६ मार्च १९२८ रोजीं होळीच्या निमित्तानें आपला ४९ वा वाढदिवस साजरा करून घ्यावयाचा होता. भजनाच्या दिवशीं सर्वांना कॉफी, प्रसादाला लाडू, चिवडा व चहा असावा असेंहि महाराज कार्यक्रमांत लिहितात. हा महाराजांचा उत्सव (निमंत्रणपत्रिकेवर ज्यांच्या संमतीवाचून सह्या घातल्या होत्या त्यांच्या निषेधामुळें) वांद्रयास तर झालाच नाहीं, पण तो पुढें कुठेंच झाला नाहीं, तथापि बुवा ११-२-२८ च्या पत्रीं लिहितात,

"विश्वनाथाचा आशीर्वाद. (बुवा सर्वांना- स्वतःपेक्षां वडीलधाऱ्या गृहस्थांनाहि-आशीर्वादच देत असतात. ुवांना नमस्कार माहीतच नसतो.) तुमची आम्ही परीक्षा घेतली. त्यांत यश आलें. वाईट वाटण्याचें कारण

नाहीं. आम्हांस सर्व माहीत होतें. वसईकरांचा आग्रह कीं वसई येथें उत्सव व्हावा असा आहे. कोठें कां होईना ! प्रभूला रुचेल त्याप्रमाणें होणार." इत्यादि लिहून झालेल्या अपमानावर सारवण घालीत आहेत व संतसेवेमध्यें मानापमान गुंडाळून ठेवावा असेंहि महाराज त्या पत्राद्वारें सांगत आहेत.

पत्रांत मोठमोठ्या लोकांचीं उगीचच नांवें लिहिणें व कुणी भेटावयास गेल्यास सकाळपासून अमके आले, तमके आले, असें वडेजाव वाढविण्याकरितां सांगणें आणि आपलीं स्वतःचीं स्तुतिपर चरित्रें व कवनें फुकट वाटणें, याचें हें वेडच या बुवांना लागलेलें दिसतें. त्याचप्रमाणें आम्ही अमक्या ठिकाणीं आहोंत, नंतर अमक्या ठिकाणीं जाऊं, अमक्या बंगल्यांत भेटीस यावें वगैरे आशयाचीं पत्रें या बुवांनीं लिहिलीं आहेत. आणि त्या पत्रासोवत स्वतःची स्तुतिपर आरती अगर एखादें स्तोत्रहि पाठविलेलें आहे. एखाद्या मोठ्या गृहस्थांवर कांहीं तरी अद्भुत प्रभाव पडावा म्हणून हे विश्वनाथबुवा स्वाक्षरीनें ता. ६–५–२८ च्या पत्रीं लिहितात. " उद्यां सोमवारपासून ध्यानस्थ असावें अशी आम्हांस प्रभूची आज्ञा झाली आहे. रोज तीन वाजेपर्यंत बोलणें होणार नाहीं. एक प्रकारें बरें झालें ! लौकर उपाय करा किंवा आम्हांला घेऊन जा अशी आम्ही प्रभूजवळ प्रार्थना करीत होतों." या पत्रानंतर ता. २०–५–२८ च्या पत्रांत बुवा लिहितात, तें सर्व पत्र गमतीदार आहे म्हणून तें थोडें विस्तारानें देतों.

" काल शनिवार, अमावास्या, म्हणून बरीच रात्र ध्यानांत गेली. त्यामध्यें श्रीची आज्ञा झाली कीं, येत्या चंद्रग्रहणाच्या दिवशीं चांद्रायण व्रताची समाप्ति करून चंद्राच्या स्वाधीन असलेल्या रोगांचा नाशउपाय सुरू करावा. तरी प्रभुआज्ञा म्हणून लिहिलेला मजकूर व्यवस्थितपणें लिहून काढून अनेक वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करावा. "

बुवांनीं स्वतः लिहून पाठविलेल्या हस्तपत्रकांतील आशय पुढीलप्रमाणें आहे.

" आज बरींच वर्षें चित्रकूटचे एक सत्पुरुष दमा खोकला या रोगांवर चंद्रग्रहणाच्या दिवशीं फुकट औषधें देऊन लोकोपकार करीत आहेत ही गोष्ट आमच्या ध्यानांत आहे. पण एक तर प्रभूची आज्ञा नव्हती व

दुसरें ही उपाधि नको असा मनाचा कल. पण काल स्पष्टपणें आज्ञा झाल्यावरून....ही अल्प लोकसेवा ईश्वरचरणीं अर्पण करण्याचें ठरविलें आहे. **लौकिक व्हावा किंवा पैसा मिळावा हा मुळींच हेतु नाहीं.** या दोन्ही गोष्टींस आम्ही विष्टेसमान मानतों. पण प्रभूची इच्छा आहे तेव्हां....या कार्यास प्रवृत्त झालों आहें. "

या पत्रांतील भाषेवरून हे बुवा लोककल्याणार्थ हा औषधिदानाचा प्रयोग करीत आहेत असें भासवितात. पण हें सर्व ढोंग दिसतें. चित्रकूटचा एक महंत औषधें देतो हें पाहून बुवांनीं ही स्वमहत्त्वास्तव टूम काढली असावी, असें त्या पत्रावरून दिसतें.

हिंदु समाजांतील लोकांना अवतारवेड फार आहे. त्यांना उठल्याबसल्या अवतार लागतो. अवताराची हूल कोणी उठवूं लागला कीं, लोकांची त्याच्यावर मोठी भक्ति बसते. अर्थात् या श्रद्धेचा फायदा घेऊन या बुवांनीं मुम्बईच्या आसपासच्या भागांत १९२८ सालीं अशी हूल उठविली कीं, (८-६-२८ च्या पालघरहून पाठविलेल्या पत्रांत ते लिहितात) " सर्व रोगनाशक होम (गेल्या पत्रांत नमूद केलेला) यथासांग पार पडला. भगवान फार प्रसन्न झाले. रात्रौ प्रभूंनीं स्वप्नांत येऊन सांगितलें,... **येत्या चातुर्मास्याच्या शेवटीं एका पवित्र कुमारिकेच्या पोटीं आम्ही अवतार घेणार.** "

प्रश्न असा पडतो कीं, हा अवतार कुमारिकेच्या पोटीं कां व्हावा ? सर्व कुमारिका तर पवित्रच असतात. विवाह झाल्यावर त्या अपवित्र होतात कीं काय ? कोणत्याहि समाजांत वांकडें पाऊल पडलेल्या कुमारिका असणारच, पण त्यांच्याशीं या बुवांना व महाराजांना काय करावयाचें आहे कळत नाहीं ? व हे अवतार कुमारींच्या पोटीं कां येतात कोण जाणे !

बुवा त्याच पत्रांत पुढें लिहितात कीं, " आज आमचें तप फळास आलें. प्रभुकृपा झालीच आहे. " कुमारीला खास मुलगा होणार हें बुवांनीं कसें ताडलें ? बरें, त्या मुलाचा आणि त्या बुवांच्या तपाचा काय संबंध ? पण बुवा अगदीं विश्वासानें लिहितात कीं, " घोडामैदान जवळ आहे. केवळ चार महिन्यांच्या अवधींत ! कालाच्या कठीण कसोटीला जी गोष्ट उतरते ती टिकते. जगत्गुरूचें आगमन होणार असें आजवर अनेक लोक

सांगत आलेले आहेत, परंतु आतां सर्व गोष्टींचा खुलासा होईल. " अवतार होणार म्हणून बुवा लिहितात कीं, " चातुर्मास्यांत लोकांनीं शुद्धाचारानें राहावें, नामस्मरण करावें व ही आनंदाची बातमी सर्वांना कळवावी " इत्यादि.

हा अवतार पुढें झाला नाहीं. कारण त्या पवित्र कुमारीला मुलगा न होतां मुलगीच झाली व ती पंढरपुरच्या आश्रमांत गेली!!! त्यामुळें बुवांचे दांत त्यांच्या घशांत चांगलेच उतरले.

कोणत्याहि बुवाला आपण जगदुद्धारार्थ फार मोठें अगडबंब कार्य करतों असें दाखवावयाचें असतें. त्या दृष्टीनें श्रीमंत सावजांच्या पैशावर एक मोठें कार्य करण्याचें बुवांनीं मनांत आणलें होतें. त्याकरितां एका गृहस्थांनीं जागा देण्याचें कबूल केलें असावें. पालघर येथें सागर तीरावर ज्ञानमठ नांवाची एक अगडबंब संस्था काढण्याचा बुवांचा मानस होता. ते लिहितात, "गेलीं नऊ वर्षें मीं देशांतील अनेक पुण्य स्थळें व शिक्षणसंस्था पाहण्यांत घालविलीं व पूर्वापार चालत आलेले धर्ममठ पाहिले.....गुजराथ प्रांतांत असतांना प्रभुआज्ञा झाली कीं, बोर्डीपासून पालघर येवढ्या टापूंत एक ज्ञानमठ काढून लवकर कार्यास आरंभ करावा व सद्धर्मप्रसार करून लोकजागृति करावी." वगैरे वगैरे.

'ज्ञानमठां'तील प्रचंड कार्याची रूपरेषा

(१) सर्व धर्मग्रंथांचें संशोधन, शुद्धिकरण व एकीकरण.
(२) वेदवेदांगें, उपनिषदें, स्मृति, इतिहास.
(३) जगांतील सर्व धर्मांचे पवित्र ग्रंथ.
(४) इतिहास, प्राकृत ग्रंथ वगैरे वगैरे यांचें अध्ययन करून सद्गुरुधाम, संतमंदिर, सरस्वतिमंदिर, सेवामठ, रुग्णालय, धर्मशाळा, गोशाळा इत्यादि सर्व बुवांना चालवावयाचें होतें. परंतु अवताराचें ओम् फस् झाल्याबरोबर सर्वत्र फजीति-झाली व बुवांना तोंड दाखविण्याची मारामार पडूं लागली. अशा वेळीं बुवांनीं १९२९ च्या अखेरीस परदेशचा मार्ग धरला.

मुंबईच्या आसपास व मुंबईस, जेव्हां केसकरबुवा होते, त्या वेळी

त्यांच्या निकट संबंधांत असलेल्या बऱ्याच गृहस्थांच्या भेटी झाल्या. त्यांचीं आलेलीं पत्रें व त्यांच्या भेटी यांवरून असें दिसतें कीं, केसकरबुवा हे 'प्रभूची आज्ञा अशी झाली, प्रभूनें स्वप्नांत असें सांगितलें' वगैरे पुष्कळ बाता मारीत. पण या प्रभुआज्ञांची सत्यता एकदांहि कोणास आलेली नाहीं. परस्परविसंगत व विरुद्ध अशा प्रभुआज्ञा कशा होतात व त्या साफ खोट्या कशा ठरतात हेंच आश्चर्य आहे! बुवांचें रोजचें आन्हिक फार थोडें असे. ते सुमारें सकाळीं ९।१० वाजतां आंघोळ करीत. त्यांच्या खोलींत खाण्याचे निरनिराळे पदार्थ तयार करून ठेवलेले असत. त्या वेळीं ते दार लावून अर्धा तासपर्यंत म्हणे ध्यानस्थ बसत! तेंच त्यांचें आन्हिक!!!

केसकरबुवा हे औषधें देतात म्हणून कांहीं लोक नादीं लागले. पण एकदां असें झालें कीं, एका गृहस्थानें आपल्या अत्यवस्थ स्नेह्याकडे बुवांना नेलें; तेथें सर्वांदेखत बुवा म्हणाले कीं, 'आम्हां संतांना काय अशक्य!' असें म्हणून त्यांनीं औषधेंहि दिलीं पण ते गृहस्थ तिसऱ्या दिवशीं स्वर्गस्थ झाल्यामुळें बुवांच्या सामर्थ्याची प्रचीति चांगलीच आली! औषधोपचारांचें थोतांड व कुमारीच्या पोटीं होणाऱ्या अवताराचा फोलपणा नजरेला आल्यावर जेवढे म्हणून लोक नादीं लागले तेवढे बाजूला होऊं लागले; व नंतर एकंदरींत या बुवांत कांहीं विशेष तर नाहीं, शुद्ध ढोंग आहे, असें म्हणूं लागले.

केसकरबुवा १९२९ च्या अखेरीस परदेशीं गेले व तिकडून ते परत १९३३ सालीं आले. इंग्लंड, अमेरिका, स्वित्झर्लंड आणि इतरहि देशांत केसकरबुवा होते. त्यांनीं तिकडे 'इल्यूजन' या नांवाचें एक इंग्रजी मासिक चालविलें होतें. स्वित्झर्लंडमध्यें त्यांचीं जीं योगावर व्याख्यानें झालीं त्यांचें एक इंग्रजी पुस्तकहि झालेलें आहे. बुवांच्या तिकडील कामगिरीची विशेष माहिती मिळाली नाहीं.

बुवांना पैशांचा पुरवठा कोणी केला?

बुवांच्या नादीं मुम्बई, ठाणें भागांतील जे अनेक लोक होते, त्यांच्याकडूनहि आर्थिक साह्य केसकर महाराजांना झालें असलें पाहिजे.

केसकरबुवा परदेशांतून आल्यावर ते मुम्बई भागांत व मुम्बईस

फारसे राहिलेले दिसत नाहींत. कारण पूर्वपरिचित गृहस्थांचा व शिष्यांचा यांच्यावद्दल आदर राहिला नव्हता. महाराज आले ते पुण्यास आले व स्टेशनाजवळच एका मोठ्या पार्शी हॉटेलांत उतरले! त्या वेळच्या ज्ञानप्रकाश-मध्यें बुवांच्या वर्णनाचा व मुलाखतीचा अगदीं भडक असा मजकूर प्रसिद्ध झालेला आहे. लकडीपुलापलीकडे हिंगण्याच्या वाटेवर रामबागेंत ते कांहीं दिवस होते. तेथें त्यांचीं प्रवचनें होत असत. पुण्यास कांहीं लोक महाराजांच्या नादीं होतेच. तथापि तेथें बस्तान चांगलें न बसल्यामुळें महाराज पांचगणीस गेले. पांचगणी येथें केसकरमहाराजांनीं शतचंडीचें अनुष्ठान केलें. त्या वेळीं अनेक विद्वानांचीं प्रवचनें, कीर्तनें, व्याख्यानेंहि झालीं. हिंदु हायस्कूलजवळच्या बंगल्यांत ते उतरले होते. तेथें असतांना मोठ-मोठ्यांशीं स्नेहसंबंध आणून त्यांपैकीं ज्याची बायको, मुलगा, मुलगी अजारी असतील त्यांची बारीक चौकशी करून त्यांच्याकडे हे आपण होऊन अंगारा पाठवीत असत. 'असाध्य रोगावद्दल स्वर्गीय संदेश सांगूं असेंहि कळवीत असत. केसकरमहाराजांच्या मनांत वांई येथें एक आश्रम व दवाखाना काढण्याचें आलें होतें. त्या दवाखान्यांत स्वर्गीय आत्म्याकडून येणाऱ्या संदेशाच्या साहाय्यानें रोग्यास औषधोपचार व्हावयाचे होते. या दवाखान्यानिमित्त वांई येथील एका मोठ्या इनामदाराशीं जागेसंबंधीं बरीच वाटाघाट झाली होती. परंतु पुढें कांहीं विशेष झालें नाहीं.

केसकरमहाराज हे पांचगणी व कोल्हापूर येथें मृतात्मे व दैवतें बोलावण्याचा प्रयोग करीत होते. हा प्रयोग रात्रीं होतो. त्यावेळीं दिवे मालविलेले असतात. बसलेल्या मंडळींपासून चारपांच हात अंतरावर एक पाट मांडून त्याच्यापुढें उदबत्त्या लावीत असत. या पाटावर म्हणे आवाहन केलेलें दैवत बसतें अशी कल्पना ! दत्त, शंकर, मारुति, रामदास ज्ञानेश्वर वगैरेंना आवाहन करण्यांत येत असे. कांहीं मृतात्मे न बोलवितांहि येत असत. वर सांगितलेल्या पाटाच्या समोर केसकरांचे शिष्य व जांवई रा. ऐनापुरे हे बसत. त्यांचा उपयोग केसकरमहाराज माध्यमासारखा करून घेत असत. ऐनापुरे यांना दिव्य दृष्टि असून ते पुढें बसलेल्या देवतांशीं बोलतात असा देखावा असे. केसकरबुवा स्वत

ऐनापुरे यांच्या पाठीमागें खुर्चीवर वसत. ऐनापुरे हे समोर आतां मूर्ति दिसूं लागली असें म्हणाले कीं, केसकरमहाराज त्या देवतेस प्रश्न विचारीत व रा. ऐनापुरे देवतेच्या तर्फे उत्तरें देत. त्या उत्तरांची छाननी प्रत्यंतर पुराव्यानें जर केली तर तें देवतांचें बोलणें भ्रमात्मक आहे असेंच ठरतें. पण भोळ्या भाविकांना हेंच खरें वाटे !

खास केसकरमहाराजांचा आमच्या हातीं आलेला पत्रव्यवहार, त्यांच्या निकट संबंधांत असलेल्या लोकांचा अनुभव, हीं विचारांत घेतां त्यांनीं हा एक परमार्थाच्या नांवावर जगण्याचा धंदा सुरू केला आहे हें निश्चित होय.

बुवा व महाराज यांच्या नादीं लागून पुष्कळ लोकांचे पैसे जात असतात. पण तसें जाहीरपणें सांगण्यांत लोकांना कमीपणा वाटतो. कारण पैशापरी पैसे गेलेलेच असतात आणि ते जाहीर करण्यानें अजागळपणा मात्र पदरीं येतो. तथापि अलीकडे कांहीं माणसें धिटाईनें पुढें येत आहेत यावद्दल त्यांचें अभिनंदनच केलें पाहिजे.

रा. शंकर शिवराम गोसावी रां. मालवण हे ता. १२।५।३५ व २६।७।३५ च्या पत्रांत लिहितात कीं,

'केसकरबुवांच्या पायीं माझे सुमारें दोन हजारांवर पैसे खर्च झाले आहेत. केसकरांनीं आपल्या एका भक्ताला माझ्याकडून चार हजार रुपये देवविण्याचा प्रयत्न केला होता; पण मी ते न दिल्यामुळें महाराज माझ्याकडे आले नाहींत. त्यांच्या सांगण्यावरून आणखी एकाला मी तीनशें रुपये ॲमिसरी नोटीवर दिले होते ते कोर्टाचें भय घालून वसूल करून घेतले.'

रा. केसकरांसारख्या पदवीधर माणसानें ही प्रज्ञाहत करणारी बुवाशाही सुरू करणें आणि दुसऱ्या एकाद्या प्राकृत माणसानें हा धंदा करणें यांत फार अंतर आहे. लोकांच्या श्रद्धेचा असा गैरलाभ घेणें हें अत्यंत अनुचित होय ! शिक्षकाची चांगली कायमची नोकरी असतांना व त्या नोकरींत अनेक विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करण्याची संधि असतांना रा. केसकरांना ही अवदशा कां आठवली हेंच कळत नाहीं ! यापुढें तरी त्यांनीं ही बुवाशाही सोडून देऊन लोकोपयुक्त व्यवसाय करून राहावें हें उत्तम.

प्रकरण २१ वें.

उपसंहार

या ग्रंथाच्या गेल्या वीस प्रकरणांमध्यें ब्रह्मविद्या म्हणजे काय, अध्यात्म शास्त्रांतील सिद्धांत कोणते, गुरुकृपा, मोक्ष, भक्ति, चमत्कार षड्रिपुदमन इत्यादि अनेक विषयांची चर्चा करुन शेवटीं उदाहरणें म्हणून तीन बुवांचीं चरित्रें इत्थंभूत दिलीं. त्यावरून ही बुवाशाही कशी अनिष्ट आहे, व बुवांच्या नादीं लागण्यांत कसा धोका आहे, हें सहज समजून येईल. या ग्रंथांत आम्ही तीनच बुवांचीं चरित्रें दिलीं आहेत. पण किर्लोस्कर मासिकांत आम्ही व इतर लेखकांनीं मिळून श्री कुकुरमुंडेकर महाराज, केशवदत्त महाराज, कै. वा. विनायकबुवा फाटक, कै. वा गारुडेकरबुवा, प्रकाशाचे महाराज, ठकुताईची बुवाशाही अशीं अनेकांचीं चरित्रें उघडकीस आणलीं आहेत. या शिवाय आमचे हातीं जें पुष्कळ साहित्य आहे, त्यांत सांगली बुधगांव भागांतील विलासी मळणगांवकर महाराज, हजामतीचा धंदा सोडून, ज्ञानेश्वरीच्या गप्पा मारून मुंबई येथें चाळी खरेदी करणारे व ब्रह्मविद्येच्या भासावर गडगंच पैसा मिळवणारे धंदे वाईक दादामहाराज, पीरवाडीचे कोंडिबा महाराज, जंजिरा येथील बुवाशाही, सुरतेचा अवलिया, गोमती दासगुरु, शांडिल्य महाराज, पराशक्ति महाराज, गाडगेबुवा व त्यांचे शिष्य, गोव्यांतील केशवबुवा, शिवाजीबुवा भोसले, अमळनेरकर महाराज, फडकेबुवा, लक्ष्मण महाराज, निजानंद महाराज, उमरावतीच्या ताईमहाराज, वेंगल्यांचे साटम महाराज, बागवे महाराज, मिरीचे शंकर महाराज, घोसपुरीचे प्रेमानंद, मोरगांवचे मंगलमूर्ति आणि अरणगांवचे मेहेरबाबा इत्यादिकांचे समग्र इतिहास आहेत. या सर्व साहित्याचा उपयोगाकरितां चिकित्सा पूर्वक शोध करणें, प्रवास करणें वगैरे गोष्टी एका व्यक्तीच्या आटोक्याच्या बाहेरच्याच आहेत. तथापि आम्ही या माहितीचा यथाकाल यथावकाश

हळूहळू जरुराप्रमाणें केव्हां तरी उपयोग करून घेऊच. या सर्व महाराजांचीं चरित्रें जरी उघडकीस न आलीं तरी वाचकांनीं हे लोक सत्पुरुष आहेत असें न समजतां हे सर्व धंदेवाले असून अनंगपोटी लचांडनायक भोगिराज झव्वु महाराज आहेत असें बेशक समजावें.

हे सर्व महाराज प्रथमपासून भोगिराज नसतात. त्यांतील कांहीं तर साधक स्थितींत खरोखरीच अत्यंत विरक्त असतात. पण पुढें लोक त्यांच्याकडे भलभलत्या मागण्या करून त्यांचा परमार्थ व स्वतःचा प्रपंचहि बिघडवितात! प्रापंचिक मनुष्य जसा प्रथम मिळतें म्हणून खर्च करतो पण पुढें प्रपंच वाढून गरजा वाढल्या कीं खर्चाची तोंडमिळवणी काय पाहिजे तें करून करूं लागतो, तसेंच या सर्व बुवांचेंहि होतें. प्रथमतः लोक व भक्त हौसेनें पैसे देतात म्हणून हे बुवा पसारा मांडतात. पुढें तो पसारा चालविण्याकरितां (मोठेपणाच्या इच्छेनें) महाराजहि काय पाहिजे तें करून पैसा मिळविण्याचा उद्योग करतो. अर्थात् सच्च्याचा लुच्चा व विरक्ताचा धंदेवाला बनन, पुढें भोगिराज बनतो. वरील सर्व महाराज याच वर्गातील होत!

वाचकांना एवढेंच सुचववयाचें कीं बुवाशाही अनिष्ट असून तिची हकालपट्टी व्हावी हें तत्त्व जर पटलें असेल तर प्रत्येकानें बुवाशाहीच्या विध्वंसनाकरितां थोडाबहुत तरी यत्न केलाच पाहिजे. आम्ही शंभर नंबरी बुवा हातांत घेऊन त्यांच्या चरित्रावर झगझगीत प्रकाश पाडला व नमुना दाखविण्याचा अल्प उपक्रम केला! पण हें कार्य एवढें प्रचंड आहे कीं अनेक जणांनीं सतत प्रयत्न कांहीं दिवस केला तरच या सामाजिक रोगाचें निर्मूलन होणार आहे.

बुवाशाहीचा धंदा मोठा नफेजीचा आहे. त्यामुळें आपल्या इतर व्यवसायाला बुवाशाहीची अर्धी किंवा चतकोर जोड देणारे लोक कांहीं थोडेथोडके नाहींत. बुवाचें वास्तव्य नाहीं असें एक लहानसें खेडेंहि आढळणार नाहीं. हे बुवा सर्व समाजांत—ख्रिश्चन व मुसलमानांतहि—आहेत आणि सर्व जातींत आहेत. ब्राह्मणबुवापेक्षां ब्राह्मणेतरांतील बुवा कमी उपद्रवी आहेत असें मुळींच नाहीं. किंबहुना सातारचे धोंडिबा न्हावी, पीरवाडीचे कोंडिबा, अरणगांवचे मेहेरबाबा आणि असेच इतर जातींतील बुवा

हे पक्के धंदेवाईक, व महाधूर्त असेच आढळतात. बुवाशाहीचा धंदा सर्व जातींतील पुरुषच करतात असें नव्हे तर कांहीं स्त्रियाहि करतात. एवढेंच काय पण कित्येक मेलेले बुवाहि समाजाच्या बोकांडी बसतात ! बुवांची खाने-सुमारीच केली तर ती अफाट भरेल एवढी आहे !

या प्रचंड बुवाशाहीचा नायनाट व्हावा असें वाटत असेल तर शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना, डॉक्टरांनीं रोग्यांना, लेखकांनीं वाचकांना बुवाशाहीपासून दोन पावलें दूर राहाण्याबद्दल वरचेवर सांगितलें पाहिजे. प्रत्येक विचारी व सुसंस्कृत स्त्रीपुरुषानें आपले आप्त, इष्ट मित्र, स्नेही आणि नात्यागोत्याचे जे लोक असतील आणि जे या ना त्या निमित्तानें बुवाशाहीच्या आहारीं पडत असतील, त्यांना वाचविण्याचा अवश्य यत्न केला पाहिजे.

ठिकठिकाणच्या वकील मंडळींनीं जर या बुवामहाराजाकडे थोडें कायदेशीर दृष्टीनें लक्ष्य दिलें तर बुवाशाहीच्या विध्वंसाला फारच साहय्य होणार आहे. कायद्याच्या कचाटींत व कोर्टाच्या क्षेत्रांत बुवा आले कीं सर्व बिंगें बाहेर पडतात हें आतां महशूर झालें आहे. या दृष्टीनें कोपरगांव येथील श्री. देशमुख, श्री. अप्पासाहेब वैद्य, श्री. दादासाहेब कोन्हाळकर, श्री. वझे, आमचे प्रतिपक्षी श्री. भांगरे आणि नगरचे श्री. नानासाहेब सप्तर्षी वगैरे वकील मंडळींनीं फार महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. इतर ठिकाणच्या वकिलांनींहि या मंडळींचें अनुकरण केल्यास बुवाशाहीचा विध्वंस होण्यास वेळ लागणार नाहीं.

या बाबतींत वृत्तपत्रकर्त्यांना फार मोठें काम करतां येण्याजोगें आहे. त्यांनीं आपली जबाबदारी ओळखून बुवाशाहीला उत्तेजन मिळेल असा कसलाहि मजकूर प्रसिद्ध तर करूं नयेच, उलट किर्लोस्कर मासिकाप्रमाणें बुवाशाही विरुद्ध त्यांनीं मधून मधून लिहीत असावें, अशी त्यांना आमची सूचना आहे. आमचा हा यत्न जुन्यांकरतां नसून तरुणांकरतां आहे, हें या ग्रंथांत पूर्वी सांगितलेंच आहे. म्हणून ग्रंथाचे शेवटीं तरुण पिढीनेंच या बुवाशाहीच्या विध्वंसाला प्रवृत्त व्हावें, असें सांगून ग्रंथ पूर्ण करितों.

REFBK-0005232